
નિબંધ
૨૮૯૫



REFBK-0023320

बहुजन बगूल

दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान

REFBK-0023320



बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउस–पुष्प सातवे
'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान'
© बाबुराव बागूल
8/1, लेबर कॅम्प, माटुंगा मुंबई 400 019

संपादक : मधुकर ताकसांडे

प्रथम आवृत्ती– 15 ऑगस्ट 1981
[स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना दिन]

प्रकाशक : सौ. महानंदा ताकसांडे
बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउस
141, उंटखाना, नागपूर 440 009

मुख्य वितरक : डॉ. आंबेडकर बुक डेपो
उंटखाना, मेडिकल चौक, नागपूर 9

आवरण तथा चित्र संकल्पक
आणि पृष्ठ मांडणीकार : वसंत चव्हाण
13, विजयभारत, टिळक पुतळा, नागपूर 2

मुद्रक : दिवाकर धाक्रस
नाग मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर 2
मूल्य रुपये साठ / पृष्ठे 290 + 16

सर्वाधिकार सुरक्षित

समीक्षा किंवा टीकालेखनाव्यतिरिक्त
या पुस्तकाचा कोणताही भाग
[चित्र, परिच्छेद इ.] कोणत्याही प्रकारे
पुनर्निर्मित केला जाऊ नये अथवा
वापरला जाऊ नये.

'DALIT SAHITYA :
AJACHE KRANTIVIDNYAN'
(DALIT LITERATURE :
TODAY'S SCIENCE OF REVOLUTION)
© BABURAO BAGUL 1981 AUG. 15
Anthology/Ed : MADHUKAR TAKSANDE
Illustrator, Designer & Layout Artist :
VASANT CHAVAN
Publisher : Mrs. MAHANANDA TAKSANDE
BUDDHIST PUBLISHING HOUSE
141, UNTKHANA, NAGPUR 440 009
ALL RIGHTS RESERVED.PRINTED IN INDIA

संदर्भ
निबंध
२०९५
23320
८१११८

गुजरातच्या फॅसिस्ट उठावाविरुद्ध
जे खंबीरपणे उभे राहिले
त्या सर्व शूरांना...

अनुक्रम .....▶

लेख

काळोखाच्या कैद्यांची क्रांतिमान कैफियत ! 003
दलित साहित्य हे तर माणसाचे साहित्य ! 013
भारतात फॅसिझमची बीजे आहेत 031
मराठवाडा जातीय दंगल : एक शोध 037
हिंदू साहित्य व जातिवाद 047
ढासळते किल्ले : जाती 085
दलित चळवळ पुन्हा विघटनाकडे ? 099

समीक्षा व प्रस्तावना

दलित साहित्याची दिशा : ऑडिट 113
उत्थानगुंफा : जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर काव्यलेणे 133
आठवणीचे पक्षी : धुमसणारे पंख 151

मुलाखती

दलित साहित्याचा आजचा समर्थ लेखक : बाबुराव बागूल 165
बाबुराव बागूल : दलित जीवनाचा क्रांतदर्शी भाष्यकार 177

स्वगत

स्वगत 227

भाषणे

दलित साहित्य म्हणजे सूडवाद्यांचे साहित्य नाही 257
दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडणारा 267
दलित हाच युगनायक ! 273

प्रकाशकीय नऊ
संपादकीय अकरा
पूर्व प्रकाशन संदर्भ 288

प्रकाशकीय

• बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउसचा मुख्य उद्देश लोकांना स्वतंत्र रीतीने विचार करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणारे ग्रंथ प्रकाशित करणे हा आहे.

• अस्पृश्यता, दारिद्र्य, अज्ञान, लाचारी, गुलामगिरीची प्रवृत्ती, सामंतशाही, भांडवलशाही आणि देवधर्माचा हवाला देऊन माणसाने माणसावरच अनन्वित अत्याचार केले आहेत व आजही तो करीत आहे. अंधश्रद्धा, रूढिवाद, परंपरा,शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, चमत्कार, गुरू व नेते यांच्या अधीन विवशपणे होण्याची प्रवृत्ती, भावनांच्या आहारी सापडणारा स्वभाव आणि सामुदायिक दडपणाखाली मनाचे व बुद्धीचे स्वातंत्र्य गमावण्याची सवय या गोष्टी व्यक्तींना मानसिक दास बनवितात. सुशिक्षितांतील बहुतांश लोकही असेच मानसिक दास आहेत. मनात, दृष्टीत व भावनांत बदल झाला पाहिजे. मानसिक दास्य हे बौद्धिक व वैचारिक जागृतीशिवाय नष्ट होणार नाही. त्याकरिता वैचारिक संघर्षाची आवश्यकता आहे. विविध प्रकारच्या स्वतंत्र संपन्न विचारांचे शिक्षण ज्यांना मिळते तेच वैचारिक संघर्षास प्रवृत्त होऊ शकतात.

• आम्हाला अनीश्वरवाद, अनात्मवाद, गतिवाद, विज्ञानवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद, तर्कवादावर आधारित विचार आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय; प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीवर आधारित समाज अभिप्रेत आहे. ह्या विचारांशी आमची बांधिलकी आहे. ह्या जगात माणूस वर्णाने, वर्गाने, धर्माने, जातीने, जन्माने उच्चनीच म्हणून ओळखला जाणार नाही, जेथे सर्वांना समानसंधी राहील असे जग आम्हाला हवे आहे. दलितांची अस्मिता जागृत करून, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे तसेच मानसिक गुलामगिरी नष्ट करणे, लोकशाहीचा विकास सामाजिक लोकशाहीपर्यंत करणे हा आमचा उद्देश आहे.

• भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याइतकी सर्व तत्त्वज्ञानाचा अनुभवपूर्वक विचार केलेली, श्रेष्ठ अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेली व हिंदुधर्माच्या विषमतावादी चातुर्वर्ण्यव्यवस्था, अस्पृश्यता, जातिभेदांनी रोगग्रस्त असलेल्या भारत देशाला इतर प्रगत राष्ट्रांबरोबर आणण्याचे सामर्थ्य असणाऱ्या विचारांची दुसरी व्यक्ती नाही. म्हणून बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउसचे ते प्रेरणास्थान व दीपस्तंभ आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याकरिता आम्ही वाहून घेतले आहे.

• समाजवादी देशात विज्ञाननिष्ठा ही जीवनाची प्रबळ प्रेरणा झालेली आहे व सामान्य माणसांबद्दल मानवबंधुत्वाची जाणीव निर्माण झाली आहे. भारताव्यतिरिक्त इतर देशांत 'प्रोलिटेरिअट' मजूर लोक, श्रमजीवी, सर्वहारा आहेत. म्हणून तेथे वर्गलढा यशस्वी होऊ शकला. ह्या देशात प्रोलिटेरिअट तसेच 'सोशल प्रोलिटेरिअट'– म्हणजेच दलित आहेत. ह्या दोघांमध्ये जातिभेद, अस्पृश्यतेच्या खोल्या अभिनिवेशामुळे एक विभाजन-


रेषा पडलेली आहे. म्हणून श्रमजीवी असतानाही हे आपसात लढत असतात. ह्याला कारण हिंदू मानसिकता. सत्ताधारी वर्ग सत्ता टिकविण्याकरिता याचा पूर्ण उपयोग करून घेतो. ह्या दोघांचेही शोषण करणारी शक्ती एकच आहे. ही वर्गजाणीव यांच्यात जेव्हा वाढू लागेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने दलित, शोषित एकत्र येतील व श्रमजीवी लोकांची एक फळी निर्माण होईल. ह्याकरिता माणसाला गुलाम करणारे जे अस्पृश्यतेचे, वर्ण-व्यवस्थेचे, जातिव्यवस्थेचे, वर्गव्यवस्थेचे सापळे आहेत ते मुळापासून उखडले पाहिजेत. ते सामर्थ्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात आहे. अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याकरिता स्टॅलिन-सारख्या कृतिशील माणसांची जरुरी आहे. अशीच माणसे कडक बंदोबस्त करू शकतात. ह्या देशातील संघर्ष वर्णलढ्यापासून (जाति–धर्म–लढा) सुरू होऊन त्याची वाटचाल लोकशाही समाजवादाकडे राहील.

• आपली सोडून इतर सर्व तत्त्वज्ञाने व विचार फालतू म्हणून अव्हेरणे, असा अतिरेक टाळला गेला पाहिजे. आधुनिक यंत्र–विज्ञानामुळे [Modern Technology] जी नवीन नवीन दुःखे निर्माण होऊ पाहत आहेत ते फक्त कोणताही एक वाद-तत्त्वज्ञान दूर करू शकत नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. ही दुःखे सर्व वाद-तत्त्वज्ञान मिळून जरी दूर करता आलीत तरी पुरे. ते दूर करण्याकरिता या भूतलावर बुद्ध, आंबेडकर, फुले, मार्क्स, लेनिन, माओ ह्या महापुरुषांनी आटोकाट प्रयत्न केलेत. ह्यांची करुणा व चिकित्सक दृष्टिकोण ह्या मानवाला फार मोठ्या देणग्या आहेत. हे सर्व महामानव जग व जीवन बदलविणारे आहेत. म्हणून आमचे आहेत. ह्यांनी माणूस हा देव, धर्म व देशापेक्षाही मोठा असतो हा संदेश जगाला दिला आहे. तद्वतच लोकशाही समाजवादी शोषण मुक्तीच्या लढ्यातील वीर हुतात्मे व जगातील सर्व पुरोगामी–क्रांतिकारी बंडखोर ह्या सर्वांचे विचार, लढे दलितांकरिताच असल्यामुळे ते सर्व आमचे आदर्श आहेत.

• आकर्षक सजावट, आधुनिक मांडणी व दर्जेदार निर्मिती, उत्कृष्ट कागद ही बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउसची वैशिष्ट्ये होत. ही प्रकाशनसंस्था उद्दिष्टांप्रमाणे लोकांना स्वतंत्र रीतीने विचार करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देणारे ग्रंथ प्रकाशित करीत असते.

• बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउस मुख्यतः वैचारिक साहित्यालाच वाहून घेणारे आहे. आमच्या प्रकाशनाचा उद्देश आहे : बहुजनहिताय–बहुजनसुखाय.

— महानंदा ताकसांडे



संपादकीय

ज्या हिंदुसंस्कृतीने मानवतेला पायाखाली तुडवून येथील तळागाळातील लोकांना पशुतुल्य जीवन जगण्यास बाध्य केले तिला 'बदनाम संस्कृती' शिवाय दुसरे काय म्हणता येईल. ह्या देशातील माणसाचे दुःख जसे सामाजिक आहे तसे आर्थिकही आहे. संपत्तीच्या मालकीहक्कातून, अस्पृश्यतेतून शोषणसत्तेचा व दुःखाचा उगम झाला. दुःखाला कारण आहे जात. जातीने दुःख, दैन्य, दास्य, अस्पृश्यता निर्माण केली. जातीला कारण आहे वर्ण, तिचा समर्थक हिंदू धर्म व वेद, श्रुति-स्मृती, पुराणे आणि धर्मशास्त्रे. ज्यांना देवत्व बहाल करण्यात आले त्यांनीच ईश्वराचा आधार देऊन स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, पुनर्जन्म, आत्मा, परमात्मा, देव-देवळे, पंडे-पुरोहित ह्या विषमतावादी संकल्पनाचा उगम केला. ही व्यवस्था बळकट करणारी साधने होत. ब्राह्मणशाही, भांडवलशाहीला जशी आर्थिक विषमता हवी असते तशीच धार्मिक विषमताही हवी असते. दलित, शेतकरी, कामगार, समुदाय हा जर धर्मात, जातीत विभागलेला असेल तर तो संघटित होत नाही. म्हणून त्यांना समाज हा विभागलेला हवा असतो. जनता जीवनभर घाम गाळीत असते व गरिबीत आपले जीवन कंठित असते. त्यांना गरिबीचे कारण कळू नये म्हणून धर्माच्या अफूची गोळी दिली जाते आणि शिकविले जाते की, स्वर्गामध्ये सर्व प्रकारची भरपाई मिळेल म्हणजे फळाची अपेक्षा न करता आयुष्यभर शूद्र-अतिशूद्रांनी, मजुरांनी, किसानांनी

मरेपर्यंत कर्म करीत राहावे व धर्माच्या ठेकेदारांनी, भांडवलदारांनी त्यांचे रक्त शोषून मलई खात राहावे. भांडवलशाही लोकशाहीचा उद्देश अफाट नफा कमविणे हा आहे. म्हणजे वस्तूचे उत्पादन व वितरण हे नफ्याच्या दृष्टिकोनातून केले जाते. त्यामुळे वस्तूचे कितीही प्रचंड प्रमाणात उत्पादन झाले तरी किंमती ह्या वाढतच असतात. गरीब-श्रीमंतामधील दरी पूर्वीप्रमाणेच कायम असते. श्रमणारा-कष्टकरी हा विवंचनेतच असतो. हे टाळण्याकरिता समाजव्यवस्था बदलावी लागेल. त्याकरिता अर्थकारण, राजकारण, सत्ता व समाजरचनेचा उपयोग जनतेच्या कल्याणाकरिता झाला पाहिजे. ह्याकरिता लोकशाही समाजवाद हवा. म्हणजे राष्ट्राची सर्व संपत्ती, उत्पादनसाधनावर मालकी दलितांची हवी. सत्ताच दलितांच्या हाती हवी. भांडवलशाही व जातिवादाविरुद्ध वर्गकलह केल्यानेच दलित श्रमिक जनता गुलामगिरीच्या बेड्या तोडून बाहेर पडू शकेल.

दलित हा जुनी व्यवस्था नष्ट करण्यातच सक्षम आहे असे नाही तर नवीन जग घडविण्यातही समर्थ आहे. माणसाच्या करुणा क्रोधातून, कष्टाळू करकमळातून क्रांत्या जन्म घेत असतात. ज्यांच्या मनगटात व्यवस्था उलथवण्याची धमक असते तेच उद्याचे भवितव्य घडवू शकतात. पाचही बोटांच्या हाताच्या भक्कम मुठीत सर्वांगीण विकास साधण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे. हे सामर्थ्य दलित साहित्यातून त्याला आज भरपूर मिळत आहे. या दलित साहित्याचा सूत्र्यग्रस्तंभ उभा आहे तो बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, दया पवार, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, रावसाहेब कसबे, प्र. ई. सोनकांबळे, माधव कोंडविलकर, प्रल्हाद चेंदवणकर, इ. निर्मितिक्षम कलावंतांमुळे. क्रांतिकारी दलित साहित्य हे जनतेचे शस्त्र आहे. ते क्रांती येण्याआधी क्रांतीकरिता विचारधारा तयार करते. साहित्य क्रांतीची प्रेरक शक्ती आहे. शेवटी माणसेच क्रांती घडवून आणतात. पण त्यामागची प्रेरणा क्रांतिकारी साहित्याची असते.

प्रस्तुत पुस्तकाचे लेखक बाबुराव बागूल म्हणतात 'दलित साहित्याची उत्पत्ती अस्पृश्यतेत होते. लोकशाहीची मानसिकता, वैचारिकता आणि आदर्श मराठी साहित्याने व्यक्त केले असते तर दलित साहित्य जन्माला आले नसते.' आशय आणि सामाजिक कार्य अशा दोन्ही बाबतीत दलित संस्कृती ही अखिल मानवजातीची संस्कृती आहे. संस्कृतीचे परिवर्तन होऊन ती सर्व जनतेची संस्कृती बनणे ही दलित साहित्याची भूमिका होय. दलित साहित्यातून शोषित जीवन प्रभावीपणे प्रकट व व्यक्त होत आहे. भटक्या टोळ्यापर्यंत दलित साहित्य पोहचत आहे. दलित साहित्याचा उद्देश बहुजन हिताय बहुजन सुखाय हा आहे. बहुजन (MASSES) म्हणजे व्यवस्थेत ज्याचे शोषण होते तो म्हणजे दलित. बहुजनाकरिता लिहिलेले जे साहित्य ते दलित साहित्य. बहुजन हा चातुर्वर्ण्यातील शूद्र होय. जोपर्यंत जगात विषमता आहे तोपर्यंत दलित साहित्य राहील.

बाबुराव बागूल हे आजचे तडफदार व तेजस्वी लेखक. त्यांचे अंतःकरण कवीचे. उत्तम कवी, कथाकार, नाटककार, कांदबरीकार. पहिली 'दौलत,' नावाची कथा

१९५२ मध्ये 'आहार' मासिकात प्रकाशित. 'भाई' (१९५२-५५) नावाचे नाटक लिहिले. 'युगांतर' व नंतर 'नवयुग' मधून अनेक कथा प्रकाशित. 'आंबेडकरी कथा' विशेष उल्लेखनीय. 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३) 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९), हे कथा संग्रह व 'सूड' (१९७०) ही दीर्घकथा. 'कोंडी,' 'भूमिहीन,' 'मूकनायक,' इ. कादंबऱ्या मासिकातून प्रकाशित. 'आम्ही' मासिकाचे संपादक. तसेच 'पावश्या' ही आंबेडकरी चळवळीपूर्वीचा व नंतरचा दलित जीवनावरील प्रदीर्घ कांदबरीचा काही अंश प्रकाशित. सध्या 'तिसरी लाट' कांदबरी लिहीत आहेत. बाबुराव बागूलांनी ललित साहित्यात दलितांना क्रांतीच्या लढ्याचे नेतृत्व करणारे युगनायकत्व दिले आहे. जुलुमाविरुद्ध झगडणाऱ्या स्वतंत्र मानवाची धग बागूलांच्या साहित्यात आहे. बाबुराव बागूलांची प्रस्तुत साहित्यकृती म्हणजे दलित साहित्याचा कलात्मक प्रतिभेचा आविष्कार, दलित अस्मितेचा शोध व विद्रोही विचारांचा कोष. समाजपरिवर्तनाचे, दलितांच्या व कामगारवर्गाच्या क्रांतीचे तत्त्वज्ञान.

दलित साहित्याशी परिचय होण्या आधी मी हिंदीमधूनच वाचन करीत होतो. माझे आवडते लेखक डॉ. आंबेडकर, राहुल सांकृत्यायन, भदंत आनंद कौसल्यायन, यशपाल, मार्क्स–एंगल्स–लेनिन–स्टॅलिन–गोर्की– माओ. या सर्वांचे साहित्य त्या वेळेस वाचून काढले. राहुलचे जवळ जवळ सर्वच साहित्य वाचून काढले. बौद्धधर्म व इतर धर्माचे तुलनात्मक परिशीलन केले. यामुळे माझी डावी विचारसरणी आधीच तयार झाली होती. आज स्वार्थासाठी जसे विचार व छावण्या बदलतात तशांपैकी मी नाही. बाबुराव बागुलांची सर्व प्रथम कथा वाचनात आली ती 'जेव्हा मी जात चोरली होती' ही. ती कथा वाचल्यानंतर मला मॅक्झीम गोर्कीच्या 'आई' ह्या कादंबरीची आठवण झाली व मराठीतही क्रांतिकारी साहित्य लिहिल्या जात आहे, ह्याबद्दल आनंद झाला. बागूलांचे जेवढे मिळेल तेवढे साहित्य वाचू लागलो. इतरांचेही दलित साहित्य वाचू लागलो. पण बागूलांचे विशेष आकर्षण राहिले. मराठीमध्ये राहुल आल्यासारखे वाटले. बागूल व इतर लेखकांमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे तो म्हणजे ते कोणत्याही घटनेच्या खोलात जाऊन तिचा कार्यकारण भाव शोधून काढतात. त्यामुळे दुःख, शोषण हे व्यवस्थेने निर्माण केले आहे हे चटकन लक्षात येते. विद्रोहाचा ज्वालामुखी मनात खदखदू लागतो. त्यांनी निर्माण केलेले नायक हे परिस्थितीला शरण जात नाहीत, पळत नाहीत तर जग बदलविण्यास अविरत संघर्ष करीत असतात. त्यांचे लिखाण हे जागतिक आहे. कारण दुःख, दैन्य, दास्य व त्या वेदनांचा विद्रोह जागतिक आहे.

डावी विचारसरणी मला स्वीकृत असल्यामुळे दलित साहित्यातील डाव्या विचारधारेच्या प्रवाहात सहज सामील होऊ शकलो. पुढे असे खूप वाटायला लागले की बागूलांचे लिखाण विशेष महत्त्वपूर्ण आहे व ते जनतेपर्यंत जायलाच हवे, याच अेका तळमळीचे पर्यवसान म्हणजे–'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान' हे पुस्तक होय.

बागुलांची प्रथम भेट झाली ती नागपूरच्या डॉ. आंबेडकर बुक डेपो येथे १९७७ मध्ये. त्या वेळेस काही मित्रांच्या सोबतीने 'दलित क्रांती संसदेची' स्थापना झालेली होती. 'दलित क्रांती' चा महाड सुवर्ण महोत्सव विशेषांक काढला. सा. चौफेरच्या संपादकीय 'मंडळावर' होतो व त्यातून सडेतोड लिखाण केले. बाबा आढावांची अेक गाव अेक पाणवठा चळवळ चालविली. या सर्व चळवळीसंबंधी बागुलांशी मन मोकळेपणे चर्चा झाली. ते म्हणालेः 'तू लिहीत जा!' तेव्हापासून इतके जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत की ज्याप्रमाणे बंदुकीचा व गोळीचा संबंध असतो त्याप्रमाणे आम्ही मनाने बांधल्या गेलेले आहोत. रूपक वाचकांच्या लक्षात चटकन आले असेलच !

प्रस्तुत पुस्तक पाच विभागात आहे. पहिला : लेख; दुसरा : समीक्षा व प्रस्तावना; तिसरा : मुलाखती; चवथा : स्वगत व पाचवा : भाषणे. प्रत्येक भागातील लिखाणाची कालानुक्रमानुसार मांडणी केली आहे. सोयीकरिता शेवटी पूर्व प्रकाशन-संदर्भ दिला आहे. पृष्ठांची मर्यादा असल्यामुळे त्यांच्या इतरही लिखाणाचा समावेश करता आला नाही. बागूलांची कविता, कथा, कांदबरी, नाटके, रिपोर्ताज, पत्रे इ. बरेच साहित्य पुस्तकरूपात यायचे आहे. पुढेमागे शासनाने किंवा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ते प्रकाशित करून जनतेसमोर आणावे इतके ते महत्त्वाचे निश्चितच आहे.

पुस्तकाच्या चित्र संकल्पनाबाबत थोडे स्पष्टीकरण आवश्यक वाटते. ही चित्रे चित्रकार वसंत चव्हाणांनी बाबुरावांच्या लेखनांतूनच काही प्रसंग, काही अमूर्त विचार आणि काही टिकाणी लेखनाचा सूर हेरून पूर्णतः नव्याने संकल्पिलेली आहेत. प्रसंग, स्थळ, व्यक्तिसादृश्य (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स आणि बुद्ध यांची काही ठिकाणी आलेली रेखाटने सोडल्यास) केवळ काल्पनिक (FICTITUOUS) आहे. चित्रीकरणातील सूचकता व अर्थवाहीत्व, समर्पकता इ. वाचकांनी पडताळून काय ते मूल्यांकन करावे.

लेखकाला जसा चाहणारा वाचक असतो, तसाच त्याची निंदा टीका करणाराही असतो आणि असणे जरुरी आहे. त्यामुळे समतोल साधला जातो. दोन्ही वर्गांकडून दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान ह्या ग्रंथाचे सडेतोड मूल्यमापन व्हावे ही अपेक्षा आहे. जय क्रांती ! जय भारत !!

आज अस्मितादर्शचे संस्थापक संपादक डॉ.म.ना.वानखडे आपल्यात नाहीत. बागुलांची साहित्यकृती पाहून त्यांना किती हर्ष झाला असता ?

ज्या वर्तमानपत्रातून, मासिकातून व पुस्तकांतून हे लिखाण घेतले आहे त्यांचा व काही दुर्मिळ अंक प्रा. यशवंत मनोहर, शिवचरण थूल, प्रसेनजित ताकसांडे, व्यंकट सूर्यवंशी, प्रा. प्रकाश खरात या मित्रांनी देऊन बहुमोल

साह्य केले त्याबद्दल त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

रसिकांना सहज आकलनक्षम, कलात्मक व अर्थगर्भ मुखपृष्ठ प्रख्यात चित्रकार श्री. वसंत चव्हाण यांनी तयार करून, वेळोवेळी पुस्तकनिर्मितीसंबंधी मौलिक सूचना दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केल्याशिवाय कसा राहू ? त्यांनाही धन्यवाद !


नाग मुद्रणालयाचे संचालक दिवाकर धाक्रस तसेच कर्मचारीवर्ग यांनी पुस्तकाकरिता घेतलेली विशेष काळजी व परिश्रमाबद्दल त्यांचा आभारी आहे.

सुंदर व यथानिर्देश ब्लॉक्स करून दिल्याबद्दल तरुण भारत प्रिन्टर्स व प्रोसेसर्स, श्याम प्रोसेस स्टुडिओ, जगदंबा ब्लॉक मेकर्स यांचे; आवरण-चित्राच्या प्रोसेसिंगविषयी साधना लिथो ऑफसेट वर्क्स यांचे; दर्जेदार व पाहिजे तसा कागद पुरविल्याबद्दल महेन्द्र अँन्ड सन्स; सी. पी. पेपर अँड स्टेशनरी स्टोर्स व दिनेश पेपर मार्ट यांचे आभार.

बुद्धिस्ट पब्लिशिंग हाउसच्या प्रकाशिका व डॉ. आंबेडकर बुक डेपोच्या संचालिका सौ. महानंदा ताकसांडे यांनी ग्रंथप्रकाशन व वितरणाची जबाबदारी घेतल्याबद्दल त्यांचा आभारी आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच हे सर्व काही होत आहे. तसेच माझे चिरंजीव बुद्धरत्न, धम्मरत्न, संघरत्न या त्रिरत्नांनीही आपआपल्यापरीने मदत केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मधुकर ताकसांडे

नागपूर : दि. १ ऑगस्ट, १९८१



काळोखाच्या कैद्यांची क्रांतिमान कैफियत !

दलित साहित्य: हे तर माणसाचे साहित्य !

भारतात फॅसिझमची बीजे आहेत

मराठवाडा जातीय दंगल : एक शोध

हिंदू साहित्य व जातिवाद

ढासळते किल्ले : जाती

दलित चळवळ पुन्हा विघटनाकडे ?

काळोखाच्या कैद्यांची
क्रांतिमान
कैफियत !

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वा. सं. .....
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



या देखण्या देशाचा दुर्धर रोग म्हणजे अस्पृश्यता. हिन्दू विचारवंत ज्यांच्या पुढे माथा नम्र करतात त्या मुनि महात्म्यांनी ही अस्पृश्यता इतक्या कुशलतेने रचली आहे की, त्यांच्या अमानुष प्रतिभेने डोके दुभंगून जाते. तिला त्यांनी धर्माचे अमोघ सामर्थ्य दिले आहे, तसेच अर्थ, समाज-व्यवस्था, गावाची मांडणी ह्यामुळे ती अभेद्य झाली आहे. धर्मान्तर करूनही ती जात नाही. कारण ती मनामनात जाऊन बसलेली आहे. तेथून ती ढळू नये म्हणून शास्त्रे, पुराणे, दंतकथा यांत केवढी तरी सामग्री भरलेली आहे आणि तिला अचल ठेवण्यासाठी विष्णूचा अंश असलेली राज्ययंत्रणा, हातात प्रभुरामचंद्रांनी आणि भगवान श्रीकृष्णांनी दिलेली हत्यारे घेऊन राखणदारीस सज्ज आहे. एवढ्या कडेकोट बंदोबस्तात आणि एवढ्या उच्च आणि अवघड जागेवर असलेल्या किल्ल्यातून कैदी कसा सुटणार ? आत्महत्या करायलादेखील त्याला संधी नाही.... या कैद्याचे जीवन, त्याच्या आशा-आकांक्षा, राग, संताप, संघर्ष म्हणजे दलित साहित्य....

दलितांचे साहित्य असू शकते काय ? आणि आज जेव्हा मराठी साहित्य कथा, कादंबरी, नाटक, काव्य आणि वैचारिक वाङ्मय एवढी नवनवी रूपे घेत आहे, तरी दलितांचे साहित्य ? ते कसे ? त्याची जरुरी काय ? वैशिष्ट्ये काय ? आणि ते वेगळेपणाने वाढावे काय म्हणून ?

ह्या सर्व प्रश्नांना उत्तर होय असेच द्यावे लागेल. अगदी निश्चितपणाने. कारण दलित साहित्याची उत्पत्ती मराठी साहित्याच्या वैचारिक ललित शाखेत होत नाही, तर ती होते अस्पृश्यतेत.

इथे अस्पृश्यता नसती, माणसाच्या भौतिक, आध्यात्मिक शक्तीचा संहार करणारी, अगदी राखरांगोळी करणारी शक्ती तिचे ठायी नसती, तिच्याविरुद्ध गेल्या आठशे वर्षांत किंवा शे पाचशे वर्षांत मराठी हिंदू साहित्याने निर्णायक झुंज सुरू केली असती, ती टिकून राहावी यासाठी हिंदू धर्माने ज्यांना वरचे मानले आहे, त्यांनी धडपड केली नसती, सर्वांनी–जुन्यानव्या विचारवंतांनी, कलावंतांनी, डाव्या-उजव्यांनी–तिचे विरुद्ध सतत संघर्ष केला असता, खूप मोठमोठी परिवर्तने केली असती तर दलित साहित्याचा जन्म झाला नसता.

दलित साहित्यिकांना देव, धर्म, देश आणि जात ह्यांचा अभिमान नाही, दुरभिमान नाही. त्याने जे लिहिलेले असते ते साहित्य असते. टीकाकारांनी पोथीसाठी वास्तववादी, अस्तित्ववादी, समाजवादी अशी काही तरी नावे दिलेली असतात किंवा थोडी दुसरीही. अनेक साहित्यिक मित्रांना राग येतो, ते मागे निंदा करतात. तरी दलित साहित्यिक आग्रहपूर्वक सांगतात की, आमचे साहित्य आहे. दलित साहित्य ! ते वेगळे आहे. त्याचे वेगळेपण त्याच्या अंगभूत विशेषांमध्ये आहे. ते कोणते ?

ते विशेष सांगण्याआधी हे स्पष्ट केले पाहिजे, ते असे. इथे तेवीस-चोवीस वर्षांचे तरणेबांड स्वातंत्र्य आहे, इथे गांधीवाद आहे, विनोबांचा सर्वोदयवाद आहे, सोशॅलिस्ट आहेत, कम्युनिस्ट आहेत. तरी आदिवासी अजूनही गुहा–जीवनाच्याच जवळपास आहेत. डॉ. आंबेडकर आले नसते तर अस्पृश्य समाजही तसाच असता. आदिमतेजवळ. रामचंद्र प्रभूने जसा ठेवला होता तसाच राहिला असता.

ते आले आणि अस्पृश्य समाजात माणूसपणाचे वादळ उठू लागले. ते गरगरू लागले. तसे देवाच्या व्यवस्थेचे रखवाले झुंजीला उठले. कोणत्याही परचक्राशी दिली नसेल अशी प्रखर लढत त्यांनी दिली. ह्या लढ्यात प्रचंड संहार झाला. 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' ह्या पद्धतीने अनेक संकेत, रूढी, परंपरा, श्रद्धा, देव ह्यांचा होम झाला आणि दलित समाजातील निरक्षर माणूस एकदम वेगळा झाला. नवा झाला. चार्वाक आणि लेनिनही त्याच्या नव्या रूपावर खूष झाला असता. त्या वेळी गांधीच्या आणि डाव्या पक्षांच्या

पुढारपणाखालचा सामान्य माणूस राष्ट्रीय स्वातंत्र्य, महात्माजी व त्यांची ऐक्याची विचार-सरणी विसरून जात होता, तसाच तो क्रांती, जागतिक कामगारांचे ऐक्य, बंधुभाव आणि वर्गीय नाते विसरून हिन्दू असला तर हिन्दू होत होता, मुसलमान असला तर मुसलमान होऊन दंग्यात सामील होत होता.

आजही असेच घडते. जातीयवादी पक्ष भरकन बलवान होतात आणि डावे पक्ष कमकुवत होतात. त्याचे कारण एकंदर भारतीय समाज अजून आधुनिक होत नाही. याचे उलट बाबासाहेबांनी घडविलेला माणूस मात्र त्याच्या भीषण देवदेवता, त्याचे पूजा-प्रकार, तो जगलेला जुने पारंपरिक जीवन फेकून देतो. कारण त्याचे मन अग्नीला आलिंगने घेऊन, हीन नष्ट करून, कठीण बनलेल्या पोलादासारखे बाबासाहेबांनी बनविले आहे. दलित समाजाचे ते तेजस्वी मन नकार, विद्रोह (संताप) आणि माणुसकीने ठासून भरलेले आहे. बाबासाहेबांनी कुठलाही निर्णायक मरणाच्या दारातून जाणारा लढा पुकारला असता तरी लोक त्यात सामील झाले असते. हसत हसत मेले असते. ह्या लढ्यातून आणि त्यातून बनलेल्या मनातून-माणसातून दलित साहित्य जन्माला आले. डॉ. बाबासाहेब त्याचे जनक. तसेच दलितांतील पहिले आणि महान लेखक.

बाबासाहेबांचे वर्तमानपत्रातील निबंध वाचून, भाषणे ऐकून त्यांच्या विचाराने प्रभावित झालेला फार मोठा कविवर्ग निर्माण झाला. त्याने गीते लिहिली, जलसे केले आणि नकारात्मक होऊन लोकांना हिन्दुधर्माच्या बाहेर ओढून काढण्याचे फार मोठे कार्य केले. पण हे साहित्य प्रचारकी असल्याने एकसुरी झाले.

चळवळ वाढत गेली. शिक्षण वाढत गेले. लोक शिकत गेले. नोकऱ्या मिळत गेल्या आणि एक मध्यमवर्ग अस्पृश्य समाजात तयार झाला. ह्या देशाच्या विशेषाप्रमाणे तो मध्यमवर्ग ऑफिसात पांढरपेशांच्या उपेक्षेला घाबरून आणि आपल्या जन्मखुणा ह्या देशात गौरवाच्या मानल्या जात नाहीत हे पाहून त्या विसरण्याचा यत्न करू लागला. ब्राह्मण किंवा साहेब होण्याचा आटोकाट यत्न करू लागला. काही तर बाबासाहेबांवरच ब्राह्मण होण्यासाठी हल्ले करू लागले. अन् काहींनी आईबाप सोडून दिले. ह्या पराभूतांच्या काळात फडके-खांडेकरांचे अनुकरण करणारी कथा लिहिली गेली पण ती वाचली गेली नाही.

ह्यानंतर अण्णाभाऊ साठे उदयाला आले. त्यांच्या काव्यात तमाशात जो प्रभाव होता तोच त्यांच्या कथांतही होता. दलितांना एक थोर कथालेखक आणि त्याची कथाही मिळाली होती. तरीही अण्णाभाऊंच्या कथांत अस्पृश्यतेतून आलेली कथा कमी प्रमाणात होती. त्यांची कादंबरी तर मोठ्या संख्येने मराठावर्गात, श्रीमंत शेतकऱ्यांत घडली गेली. वर्गकलहाचे तत्त्वज्ञान त्यांनी हिन्दूंच्या नैतिक मूल्यावर नेले. अन्याय, अत्याचार

करणारे आणि त्याचा प्रतिकार करणारे असे त्यांच्या कादंबरीला 'राम रावण पार्टीचे' रूप आले. खेडे, खेड्यांची जातीयवादावर असलेली उभारणी आणि अस्पृश्यतेसंबंधी असंतोष त्यांच्या कथांत कमी होता. सामंतशाहीच्या गुणावगुणांवर, त्यांच्या कथेचा लोभ जडलेला होता.

अण्णाभाऊ लिहीत असतानाच शंकरराव खरात लिहू लागले. त्यांच्या कथेतील नायक अस्पृश्य समाजातून आले. ते अस्पृश्यतेतील दुःख, दैन्य दाखवीत राहिले. अण्णाभाऊंचे नायक हिंदू धर्माच्या जातिव्यवस्थेवर अस्पृश्यतेसंबंधी मुके असतात. (पण अन्याय अत्याचारांचा प्रतिकार करतात.) शंकररावांचे नायक मात्र सहनशील असतात. अस्पृश्यतेसबंधी चीड निर्माण करण्याऐवजी अस्पृश्यतेबद्दल करुणा निर्माण करतात.

याच काळात अस्पृश्य समाजातून आलेल्या सुशिक्षित तरुणांनी कविता लिहायला सुरुवात केली. ही कविता त्यांच्या जीवनातून, त्यासंबंधीच्या विचारांतून आलेली नव्हती, तर ती एकंदर मराठी नव्या कवितेच्या प्रेरणेतून आलेली होती. खरे म्हणजे कवीने त्यांच्या जीवंत जीवनानुभवाला कवितेत आणायला हवे होते. पण ते झाले नाही. कारण तो जिथे जन्मला, त्या जातीला, समाजाला ह्या दुर्दैवी देशात कमालीचे तुच्छ मानलेले होते. एखाद्याने त्याची जात सांगितली तर ज्ञानवंत व कलावंत यांच्या बैठकीचे वातावरण पटकन बदलते. पुन्हा सुशिक्षितांना, गुणवंताला आपली अवमानलेली जात सांगताना भय वाटते. मन हीनगंडाने झपाटले जाते. पुन्हा प्रकाशनव्यवस्था उच्चवर्णीयांच्या हाती. त्यांना आपले लेखन आवडेल की नाही ही धास्तीच. ह्यात ही पिढी नोकरी मिळवणारी म्हणून स्वतःचे अथवा दुसऱ्याचे डोके फोडून टाकण्याची हिंमत नसलेली. शिक्षण आहे, अभिमान आहे, चीड आहे, संताप आहे आणि स्वतःच्या जन्माबद्दलची मनावर प्रचंड जखमही आहे, अशी ती दुभंगलेली पिढी. तसा दलित-समाजातून येणारा प्रत्येक बुद्धिजीवी हा दुभंगलेला असतो. एक ब्राह्मण, एक मराठा, एक इंग्रज, एक फ्रेंच, एक रशियन, अमेरिकन जेवढा माणूस म्हणून एकात्म, एकसंध आणि भरलेला असतो तेवढा दलितवर्गातील सुशिक्षित नसतो. ह्या देवळांच्या आणि देवांच्या देशात आणि येथल्या धर्माने हीन मानलेल्या जातीत जन्म घेतल्याचे दुःख अजूनही त्याला छळीत असते, जाळीत असते. हे दुःख व्यक्त करायला दडपणरहित वातावरण व प्रकाशन नसल्याने ह्या दुभंगलेल्या सुशिक्षितांनी खोटी कविता लिहिली. ती जशी खोटी होती तशी खरीही होती. कारण ती त्यांच्यातील मध्यमवर्गीय मनोवृत्तीतून आलेली होती म्हणून खरी होती. परंतु त्यांच्या तळाला बांधलेल्या जीवनाच्या दृष्टीने ती खोटी होती. म्हणून त्यांचा जीवनानुभव एकसंध व्हावा यासाठी आणि साहित्य सर्व मराठी भाषिकांचे व्हावे असे वाटत असेल तर अलीकडे नव्या पद्धतीने विचार करू लागलेल्या विचारवंतांनी अस्पृश्य, आदिवासी होण्यासाठी धाडसाने पुढाकार घ्यावा. मराठीत एकटे माटेच महार असावेत... !

अस्पृश्यता, स्त्री-शूद्रांचे दास्य ज्यांच्यामुळे डोंगराप्रमाणे दीर्घायू झाले, विषाप्रमाणे या देशातील माणसांच्या, हिंदुमुसलमानांच्या मनांमध्ये जाऊन बसले. मने सडवून टाकली. तो धर्म, ते देव, ती समाजव्यवस्था, ती गावांची रचना आणि त्यांतून आलेले साहित्य, इतिहास हवा आहे–कशासाठी... ? वैर, विद्वेष, दुफळी, दंग्यासाठी ?

आजच्या अपोलो युगातील माणसाला ढाल-तलवारी घेऊन लढणाऱ्या इतिहासातील वीरांची काय जरुरी आहे ? आजच्या मराठीला तुकाराम-ज्ञानेश्वरांच्या मराठीची काय उपयुक्तता आहे ? ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, मुक्तेश्वर, इतर संत, पंत व शाहीर हवेत कशाला ? आजची मराठी खरी म्हणजे परदेशी साहित्यांच्या पुढे जात आहे ! ज्यांनी जातिभेदाचा पुरस्कार केला, ज्यांच्या विचारांचा, भाषेचा, काव्याचा आजचे जीवन पुढे नेण्यासाठी काहीच उपयोग होत नाही, ज्यांच्या सुरांशी सूर मिळत नाही, आनंद लाभत नाही, ते हवे आहेत कशाला ?

माणसाचा विचार आजच्या जागतिक साहित्याने केवढा केला आहे ! यंत्र, तंत्रशास्त्र केवढे पुढे गेले आहे ! विज्ञानाने माणसाला विश्वविजयी केले आहे. तरी माणसाला देवाचे, दैवाचे खेळणे मानणारे हे जुने कवि-लेखक कोण आणि कशासाठी आजच्या जीवनाला जोडताहेत ?

माझे तर म्हणणे आहे. शासन, संस्कृती आणि शिक्षणाचे संचालक ऐकत नसतील तर दलितांनी निग्रोप्रमाणे स्वतःच्या शाळा, विश्वविद्यालये आणि विद्यापीठे सुरू करावीत. तिथे माणसाला मुक्त, महान करणारे ज्ञान द्यावे आणि जातिभेदाचा, जातीयवादाचा पुरस्कार करणारे, माणसाला शूद्र समजणारे सर्व हद्दपार करावेत.

दलित साहित्याने तर विद्रोह पुकारला आहे. ते विचार ते आठशे वर्षांतील मराठी साहित्यात अस्पृश्यतेला विरोध करणारे किती ? अस्पृश्यांतून संत-कलावंत आले किती ? रणांगणावर अस्पृश्यांपैकी लढले किती ? थोर झाले किती ? त्या शूरांची वर्णने त्यांच्या जीवनगाथा मराठी ज्यांच्या मालकीची होती, तेव्हा त्यांनी का केली नाही ?

मला तर वाटते जे बहुजन समाजातून संत आले ते संक्रमणकाळातले. हिन्दू-मुसलमान ह्या सामंतशाहीच्या झगड्याच्या काळातले. जेव्हा शिवशाही स्थिर झाली तेव्हा बहुजन समाजातून एकही संत आला नाही. मग शूद्रांतून कसा येईल ? पेशवाई दिशादिशांनी दौडत होती तेव्हाही बहुजनांतून संत नाही आणि नंतरही नाही. त्यांचे साहित्य नाही असे का व्हावे ?

ब्रिटिश राजवटीत डॉ. आंबेडकर यावेत आणि धर्मांतर करून मुसलमान झालेल्यातून 'किंगमेकर' मुत्सद्दी, वीर जन्माला यावेत, असे का व्हावे ?

कारण उघड आहे. ज्या प्रेरणेने रामचंद्र प्रभूने शंबुकाचे शिर छेदले, सीतेला त्यागिले, शूर्पणखेला विटंबिले, कृष्ण-अर्जुनाने खांडववन जाळले, पांडवांनी कर्णाला छळले आणि द्रोणाचार्यांनी एकलव्याची बोटे छाटली, तीच प्रेरणा युगे युगे नात्सीच्या निष्ठुरपणाने आदिवासी, हरिजन, गिरिजन ह्या प्रचंड समाजाचा संहार करीत राहिली. त्यांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक सामर्थ्याची राखरांगोळी होत राहिली. ती थांबवावी म्हणून महाराष्ट्राच्या या हिन्दू सामंतशाहीतील कोण्या राजाने क्षत्रियाने, ब्राह्मणाने यत्न केले ? कायदे केले ?

जग केवढे बदलत आहे ? मार्क्सने कामगारवर्गाचे हाती समाजसत्ता देणारे तत्त्वज्ञान मांडले. समाजवाद आला. सामान्यांची शक्ती युरोपात वाढली. एक अद्‌भुत क्रांती मार्क्सवादाला अनुसरून होण्यासाठी रशियात लेनिनने यत्न सुरू केले. अन् इथे राष्ट्रीय पुढाऱ्यांनी प्रायश्चित्ते घेतली. अन् सुधारकांनी त्यांच्या (वर्गाच्या गरजेपुरती) सुधारणा मागायला सुरुवात केली. जिकडेतिकडे सामान्यांची जीवने महान महान लेखकांनी कथा, कादंबऱ्यांत आणली. सारे जग दुःखाच्या दर्शनाने आणि दिव्याच्या ध्यासाने बेचैन झालेले, त्या वेळी मराठीने काय लिहिले ? सदाशिव पेठेतील जीवन ... फक्त केशवसुत तेवढे थोर निघाले ... मराठीत मार्क्सवाद आला, गांधीवाद आला, समाजवाद आला. पण एकंदर अर्वाचीन मराठी कादंबरीत अस्पृश्यांच्या, आदिवासींच्या जीवनावर पुस्तके किती ... नाटक-कादंबऱ्यांमध्ये अस्पृश्य आदिवासी नायक किती ... बरे, मांग, महार, चांभारवाडे दूर नाहीत ... अगदी गावाजवळ, त्यांची दखल किती ?

त्या वेळी कोणी लिहिले नाही. आजही कोणा संतप्ताने, भुकेल्या पीढीवाल्याने, मार्क्सवाद, सोशॅलिझम मानणाऱ्याने लिहिले नाही. ख्रिश्चन धर्मीय देशातील लेखक अनुभवासाठी नरकातदेखील उतरतील. पण हे...

मराठी साहित्यातील मुसलमान पात्रे बघावीत, ख्रिश्चन बघावेत, ... दलित, आदिवासी बघावेत ... वाचकांना त्यांच्याबद्दल तुच्छता वाटते. चीड येते. दुश्मनी वाटते. ही पात्रे खुनी, हलकट, मूर्ख, लाचार आणि पशुवत आहेत असे वाटते.

ही तुच्छता, हा वैरभाव चिरंजीव आहे. अस्पृश्यतेबरोबर त्यांचाही जन्म झालेला आहे. प्रभुरामचंद्राठायी ते होते. कुलस्त्रिया बिघडतील, वर्णसंकर होईल, म्हणून हे अर्जुना, युद्ध कर, अशी शिकवण देणाऱ्या कृष्णाने ते पुढे रेटले. हा तुच्छतेचा, वैराचा महापूर प्रत्येक ग्रंथातून वाहतो आहे. प्रत्येक मनातून वाहतो आहे. याला रोखण्याचा प्रयत्न गांधीजींनी परंपरेबद्दल प्रेम ठेवून केला आणि त्या महापुराने त्यांचा बळी घेतला. त्यानंतर जो वैर-तुच्छतावादाचा वणवा पेटला त्यात अनेकांचे संसार उद्‌ध्वस्त झाले... हा तुच्छतावाद उसळतो आहेच ... दंगे पेटवितो आहेच...

हे ह्या देशाचे वैशिष्ट्य पाहून दलितांतील कवी वैतागून म्हणतो–

'ज्याने चूक केली इथे जन्म घेण्याची
ती त्याने सुधारलीच पाहिजे–'
देशांतर करून ... भीषण युद्धे करून !

देश, माणूस नवा करण्याचे हे युद्ध करायचे कसे ? दलितांच्या विद्रोही साहित्याचे बळ तरी किती ? संतप्त, भुकेलेले ... हे तर नागवे होण्यास आणि दुसऱ्यांच्या कासोट्याला हात घालण्यात संताप दाखवितात. ह्या देशात नागवे काय कमी आहेत ? देवळाच्या भिंतीवर नाना तऱ्हेची कामसूत्रे आहेत. धार्मिक स्त्री-पुरुषांच्या गुह्यांगांबद्दल वाटेल तेवढे लिहिले. भारूड, अध्यात्म, भेदिक लावण्या यात स्त्री-शरीराची काय थोडी विटंबना केली आहे...

दलितांच्या विद्रोही साहित्याला सोबती नाही. सोबती पाहिजे, माणसावर प्रेम करणारा, प्रेषिताप्रमाणे दुःखाला सामोरे जाणारा, उद्याची भव्य स्वप्ने बघणारा ... पण हे संतप्त, यंत्र-तंत्रविज्ञानाला विरोध करतात. माणसाला मुंगी समजतात ... ? का समजतात ? यंत्राला विरोध का करतात ? युरोपातील विरोध कळू शकतो. पण इथे यंत्रे आलीत तरी कितीशी ? इथे भांडवलशाही आणि सामंतशाही ही नेहमीच अस्पृश्यतेची राखणदारी करते. तिचा स्वीकार दलितांचे साहित्य करणार नाही. कारण यंत्राच्याच पावलाखाली अस्पृश्यता चिरडली जाणार आहे. ती माणसाची मुक्ती ठरणार आहे. यंत्राला विरोध करणारे आणि रामराज्यवाले एकाच जातकुळीचे, एकाच वर्गाचे, हिंदू सामंतशाहीतले.

हा वर्ग म्हातारा आहे. साचलेला आहे. प्राचीन अश्वमेध यज्ञ करणाऱ्या चक्रवर्ती सम्राटापासून तो मुसलमान, ब्रिटिशांचे सचिवालय आणि शासनयंत्रणेची अंमे हाच चालवीत आला आहे. आताही तोच धर्म, शासन, शिक्षण आणि संस्कृतीचा अन साहित्य कला वगैरेचा संचालक आहे. असा संतुष्ट, श्रीमंत, साचलेला वर्ग पूर्ण क्रांतिकारक-दलिताएवढा विद्रोही कसा होईल ? ... तो थोडीशी सुधारणा करील ... संतापला तरी त्याच्या संतापात युद्धे असणार नाहीत.

आता मात्र आमच्यावर छुपेपणाने केल्या जाणाऱ्या आरोपांचे आणि काही अर्धवटांच्या भ्रमांचे खंडण करावे म्हणतो.

डॉ. बाबासाहेबांनी आणि नंतर त्यांच्या अनुयायांनी महात्मा गांधी, गांधीवादावर आणि कम्युनिझमवर टीका केली आहे. त्यामुळे दलित साहित्य जातीयवादी कसे ठरते ?

ज्या जातिभेदाने मानवतेचा, त्याच्या बौद्धिक शक्तीचा, आत्मिक शक्तीचा केवढा संहार केला ? जातिभेदात आणि जातीयवादात माणसाला मातीमोल करणारा द्वेष, तिरस्कार

किती ज्वालाग्राही असतो याचे पुरावे दलित समाजातील प्रत्येक व्यक्ती देते आहे. अजूनही वाढत्या संख्येने माणूस होऊ बघणाऱ्या दलितांवर अत्याचार होत आहेत. दलित साहित्याचा ध्येयवाद, एकंदर दलित समाजाचे संख्याबळ आणि युगाने लिहिलेली कामगिरी विसरून आम्ही पुनः त्या जळत्या नरकात शिरू, कशासाठी ?

आम्ही आहोत युगायुगाच्या उत्पीडितांच्या बाजूचे. त्यांच्याप्रमाणे दुःखाच्या पोटी जन्म घेतलेले. आम्ही त्यांचे जीवन, दुःख, वेदना, व्यथा आणि विद्रोह व्यक्त करू नये काय ?...

माणसाला महान करणे, क्षुद्रत्वात त्यांचे मनुष्यत्व, व्यक्तित्व दवडले आहे त्यांना ते मिळवून देणे, जीवनातील त्यांचे सन्मान त्यांना दाखविणे हा आमचा ध्येयवाद. हे सांगून झाल्यावर आम्ही आमच्या मित्रांना विचारतो, स्पेनच्या लोकशाहीच्या संरक्षणासाठी यूरोप अमेरिकेतील कम्युनिस्ट लोकशाहीवादी कलावंत लढले, मेलेही. इथे तर मानवताच खांडववनात जळत असलेली, तिच्या बाजूने कम्युनिस्ट, सोशलिस्ट कलावंतांनी चार ओळी तरी लिहिल्या आहेत काय ? या डाव्या पक्षांना अस्पृश्यतेबद्दल बोलायला पन्नास वर्षे लागली. ह्यातली वीस तर स्वातंत्र्याचीच आहेत.

आंबेडकरी आंदोलनाचे वयच मुळी पन्नास वर्षांचे. दलित साहित्य तर फारच तरुण. नाव मिळाले आहे असे तीनचार लेखक, काही कवी. त्यातले अण्णाभाऊ गेले. एक त्रैमासिक. दोनतीन साप्ताहिके. बंद पडणारी. प्रकाशनव्यवस्था नाही आणि वाचकही पुढारलेले नाहीत. समीक्षक तर नाहीच नाही. समीक्षक वरच्या वर्गातले. त्यांना हे जीवन माहीत नाही. समाजात बारीकबारीक किती तरी थर. गुहाजीवनाचे, भूमिहीनांचे, मजुरांचे, मध्यमस्थितीतले आणि संस्कृतीजवळ पोहचलेले. माणसे तर दुभंगलेली, भंगलेली, हरवलेली. काही ह्या देशाबाहेर पळू बघणारी, वरच्या वर्गात जाऊ पाहणारी, वरच्या वर्गाचा द्वेष करणारी, चिडलेली, पेटलेली ... एखाद्या घनदाट अरण्याप्रमाणे जटिल.

तरी दलित साहित्य जोमात आहे. कारण त्याने दुःखाचे दर्शन घेतले आहे. जे दुःख देखून येतात, त्यांनाच देव आणि धर्म घाबरून असतात. दलित साहित्यिकांना दुःखे चांगली माहीत आहेत. दुःख तर काव्याचे उगमस्थान. तरी ते चौकटीत शिरणार नाहीत. चौकट त्यांना कशी बसणार ... ते जीवन चितारतील तेच मुळी दुःखासारखे दुर्निवार आहे. म्हणून दलित साहित्याला नैसर्गिक स्वातंत्र्य पाहिजे. समुद्राचे, उधाणाचे, वाऱ्याचे, ताऱ्याचे. तरच त्याचा संताप, विद्रोह पूर्णपणे व्यक्त होईल. वास्तववादी होईल.

दलित साहित्याला असेही वाटते की, जीवनाचा अर्थ जर एखाद्या वादातून, तत्त्वांतून, पक्षाच्या जाहीरनाम्यातून लावला तर ते साहित्य एकसुरी होते. म्हणून जीवनाचा अर्थ जीवनाच्या स्वाभाविकपणाने लावावा.


माणूस ? साक्षात देहधारी निसर्ग ! ह्याच्या वासना, भावना, विकार म्हणजे सूर्य, चंद्र, ऊन, पाऊस, वादळ, वारे, ह्या वासना, भावनांचे विकार सहा शत्रू झाले. चिरडले गेले. तेव्हाच धर्म व देव चिरंजीव झाले आणि उषासूक्ते गाणारे जीवन काळोखात कोंडले गेले.

म्हणून माणसाच्या सर्व शक्ती स्वतंत्र व्हाव्यात म्हणजे वादळे होतील, वणवे पेटतील. प्रकाश येईल. पथ पडतील. रथ येतील. झाडावर उतरणाऱ्या पक्ष्याप्रमाणे युगे येतील. सुखे वर्षतील-विश्वाच्या महाकाव्याचा नायक असलेल्या माणसाला एकच प्रार्थना–

हे प्रज्ञावंत प्रलयंकारी माणसा,
साऱ्या विश्वाचे नामकरण तू केलेस
आणि सर्वांना गळा भरून हाक मारलीस–
हे सूर्या, हे चंद्रा, हे शून्या
हे संख्ये, हे मुंगी आणि हे पर्वता
आणि तुझ्या हाकेप्रमाणे ते झाले.
.....
आताही तसेच होईल ... तू हाक मार,
ते तुझे होऊन येतील !

•

दलित साहित्य :
हे तर
माणसाचे साहित्य !



दुःखाचा जन्म

मानवी समाजात मालकी हक्काचा जन्म झाला तेव्हापासून शोषणसत्तेचा, दुःख, दैन्य, दास्याचा, देवधर्माच्या कर्मकांडाचा, स्वर्ग-नरकाचा आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या अनेक तत्त्वांचा, संकल्पनांचा, सत्तेच्या गरजेप्रमाणे आविष्कार होऊ लागला व आदिम गणराज्यात्मक संकल्पनांचा क्षय होऊ लागला. शोषणसत्तेला पाहिजे तशी संस्कृतीची व समाजाची रचना होऊ लागली.

सम्यक दृष्टी

एकतंत्री राज्यसत्तेच्या उदयकाळी व गणराज्याच्या अस्तकाळी भगवान बुद्धाचा धम्मोदय झाला. समाजात होणारे संपत्तीचे केंद्रीकरण, सत्ता-संपत्तीच्या केंद्रीकरणासाठी उसळणारी युद्धे, यादव्या, त्यामुळे होणारी हिंसा, वाढणारी विषमता, दुःख, दैन्य, दास्य पाहून महान कारुणिकाने धम्मचक्र फिरविले व दुःख कोठे आहे ते सांगितले. दुःखाच्या निरोधाचे मार्ग सांगितले, शोषणाचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वाचा व या तत्त्वाद्वारे घडत असलेल्या सामाजिक व्यवस्थेचा

व वैचारिकतेचा धिक्कार केला. पण एकतंत्री शोषणसत्ता कोसळली नाही. सत्तासंपत्तीचे केंद्रीकरण रोखले गेले नाही. गुलामांना स्वातंत्र्य मिळाले नाही. सत्ता-संपत्तीचे सामाजीकरण हा विचार सर्वमान्य झाला नाही. युद्धे वाढत गेली. दास वाढत गेले. सत्ता, संपत्ती व शस्त्रे ज्यांच्याकडे संख्येने अधिक आहेत ते अधिकाधिक गुलामांचे स्वामी होत गेले. राष्ट्रेच्या राष्ट्रे गुलाम होऊ लागली. विषमता वाढू लागली. वर्णाचा, वर्गाचा पुरस्कार करणारी तत्त्वे समाज व विचारव्यवस्थेचे दृढीकरण करू लागली. विषमतेच्या आगीत सर्व समाज होरपळू लागला. फक्त भगवान बुद्धाच्या संघात सामाजिक लोकशाही नांदत होती. समुद्रात अनेक नद्या मिळाव्या तसे अनेक वर्णाचे आणि वर्गांचे लोक संघात येऊन एकरूप होत होते. सामाजिक लोकशाहीचे, समता-शांतीचे सुख अनुभवीत जगत होते.

शोषणसत्तेचा स्वभाव

शोषणसत्तेचे एक स्वाभाविक वैशिष्ट्य असते. ती तिला उपकारक होईल तीच व्यवस्था, तीच तत्त्वे जीवंत ठेवीत असते. वाढवीत असते. जी विधायक वाटतात ती तत्त्वे, मते ती नष्ट अथवा भ्रष्ट करते. विषमता, अस्पृश्यता शोषणसत्तेला पाहिजे होती, म्हणून तिने ती टिकविली. वाढविली. आणि तशीच संस्कृतीची आणि विचारांची रचना केली. परंतु विषमतेचा, अस्पृश्यतेचा पुरस्कार न करणाऱ्या तत्त्वांना एकतर नष्ट केले अथवा भ्रष्ट केले आणि वाढू दिले नाही.

राज्यसत्तेला अनात्मवाद, अनीश्वरवाद, तिच्या वर्गीयहिताचे संरक्षण न करणारा वाटतो. तो मान्य केला की परमात्म्याचा व त्याच्या पावित्र्याचा, त्या पावित्र्याचे प्रतिनिधी असलेल्या धर्मसत्तेचा, दंडसत्तेचा विलय आपोआप होतो. श्रेष्ठ कनिष्ठातील धर्मरेषाच ही तत्त्वे पुसून टाकतात. देवाने दिलेली विषमताच लुप्त होऊन गेलेली असते. अशा वेळी कोणालाही गुणकर्तृत्वाच्या जोरावर पुढे जाता येते. हे एकतंत्री राज्यसत्तेला मृत्यू एवढेच अप्रिय असते. परंतु गणराज्य सत्तेत मात्र अनात्मवाद, अनीश्वरवाद जीवनाएवढाच प्रिय असतो. कारण तो तिला स्वाभाविक असतो.

बुद्धधर्म शोषणसत्तेचा, विषमतापूर्ण समाजाचा स्वभावसिद्ध धर्म होऊ शकत नाही. बुद्धधर्माची तत्त्वे शोषणसत्तेच्या विषमतेच्या विरोधात स्वाभाविकपणे आहेत म्हणून एकतंत्री राज्यसत्तेच्या विस्तारकाळात तो फक्त मार्गदर्शकच होऊ शकत होता; एक आदर्शच राहू शकत होता. त्या आदर्शाकडे, त्या प्रकाशाकडे पाहून एकएक व्यक्ती किंवा काही व्यक्ती अथवा व्यक्तींचा समूह आकर्षित होऊ शकत होता. तसेच होत होते व एकएक येऊन संघात सामील होत होते. शोषित, शोषक, शासक समाजातील भिक्षू होत होते. वर्ण, वर्णविहीन समाजाचे सुखी जीवन संघात अनुभवीत होते. बहुजनकल्याण, बहुजनहित साधीत होते. बुद्धाचा संघ हे वाळवंटातील ओयासिस होते. तो

संपूर्ण समाज, ते संपूर्ण युग शोषणसत्तेचा पुरस्कार करणारे होते. म्हणून बुद्धधर्माची तत्त्वे ही सामाजिक व्यवस्था निर्माण करणारी व तशीच मानसिकता निर्माण करणारी होऊ नयेत असेच शोषणसत्तेला वाटत होते. म्हणून सर्व पातळ्यांवरून शतकानुशतके बुद्ध-धर्माशी सतत संघर्ष चाललेला होता. शोषणसत्ता जेव्हा कळसास पोहचली तेव्हा विषमता आणि अस्पृश्यताही पक्की झाली. एवढी की, अंत्यजांपैकी बोधिसत्त्व म्हणून जातक कथांचा नायक कोणीही होऊ शकला नाही. जातक कथांचे जेवढ्या संख्येने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व पशुपक्षी नायक आहेत, त्या मानाने त्या वेळच्या उपेक्षित समाजातील नायक नाहीत. याचे कारण सुविधा उपेक्षितांच्या समाजात राहिली नव्हती. म्हणजे अस्पृश्यतेची कल्पना अनेक संकल्पनांशी पक्की जखडलेली होती व सर्व सत्तांनी आणि शक्तींनी अस्पृश्यता एक स्वाभाविकता म्हणून स्वीकारलेली होती.

मालकी हक्क : वर्ण व जात

सत्ता, संपत्ती व सामाजिक वर्चस्व समाजातील दुसऱ्या वर्णाकडे जाऊ नये म्हणून व दुसऱ्यावर लादलेले दैन्य, दास्य व दुःख कनिष्ठत्व मानलेल्या वर्णाकडे जाऊ नये म्हणून वर्ण व जात जन्माधारित करण्यात आली. जन्माला पूर्वकर्माचा, पूर्व पापपुण्यांचा व ईश्वरी न्यायबुद्धीचा अतूट आधार देऊन टाकला. त्यामुळे वर्ण व जात अपरिवर्तनीय झाले. हे मालकीहक्काचे अतिशय कुटिल कौशल्यपूर्ण असे रूप आहे. यामुळे समाज भीषण विषमतेने तुकडे तुकडे होऊन विभागला गेला. हे तुकडे तुकडे वरिष्ठ वर्णीयांना त्यांच्या वर्गीय स्वार्थासाठी हवे होते. एका बाजूला सुख, संपत्ती, सत्ता, देवधर्माचे प्रियत्व, प्रतिनिधित्व बहाल केलेले लोक; तर दुसरीकडे देवधर्माने निषेधनीय ठरविलेले लोक, ज्यांच्याकडे दुःख दैन्य, दास्य व शूद्रत्व चिरंजीव होऊन आलेले. या लोकांना उद्धाराचे मुक्ततेचे सर्व मार्ग व साधने धर्म-दंड शक्तीच्या नावाने व ईश्वरीइच्छेच्या नावाने नाकारलेले आहे. त्यामुळे सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेपासून ते दूर ठेवले गेले.

सामाजिक उत्पादन-साधने व त्यांचे स्वामी या दोहोंमध्ये बदल झाले की वर्ग बदलतात व समाज पुढे जातो. समाजात वर्गीय बदल होतात. परंतु हे बदलही सामाजिक उत्पादनक्रियेचा विकास न झाल्याने होऊ शकले नाही.

अपौरुषेय

ज्यांना पूजनीयत्व व देवत्व मिळाले आहे, अशांनीच पाप पुण्य, पुनर्जन्म, दैववाद, नियतिवाद, नशीब इत्यादी भाकडकथा सांगून या भाकड कथांना पूजनीयत्व प्राप्त करून दिलेले आहे. यामुळे अन्याय, अत्याचार करणारा, दुःख दैन्य देणारा वर्ग व समाजव्यवस्था अदृश्य करून जो दिसत नाही असा परमेश्वर पुढे करण्यात आला. त्यामुळे पिळवणूक करणाऱ्याचा सुगावा पिळल्या गेलेल्यांना लागला नाही. म्हणून दलितांनी त्यांच्या दुःखाविरुद्ध सामुदायिक उठाव केल्याचे दाखले दिसत नाही, ते दिसूच

नेय अशी रचना केलेली आहे. भारतीय जीवनात सामूहिक जीवनाचा निषेध केलेला आहे. मोक्ष एकट्याने प्राप्त करून घ्यावा असेच प्रमेय मांडलेले आहे.

माणसाचे शरीरच दुःखाचे मूळ आहे. शरीर नसते तर दुःख नसते. दुर्दैव नसते. माणूस मेला की दुःख मरते. दुर्दैव मरते म्हणून जिवंतपणच दुःखदायक. जिवंतपण म्हणजे वासना विकाराचे चलनवलन. तेच नष्ट करून टाकावे असा प्रचार म्हणजे सामाजिक जाणिवा, सामुदायिक जाणिवेतून येणारा बंधुभाव, क्रोध, प्रतिकार आपोआप नष्ट होतो. सामान्य माणसाला कुटल्याही पातळीवरून त्याच्या दुःखाची, त्याच्या वास्तवाची, त्याला दुःख देणारे कोण आहेत त्याची जाणीव होऊ नये म्हणून हिंदू सामंतशाहीने सर्व पातळ्यांवर काम केलेले आहे. याच बरोबर सैन्य, शिपाई, तुरुंग व स्मृतीही वापरल्या आहेत व या सर्वांना धार्मिकत्वही दिलेले आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल की या युगायुगांच्या इतिहासात एखाद्या सत्तेला जर वाटले असते तर तिने या वैचारिक व सामाजिक रचनेच्या विरोधात असणारे मत वाढू दिले असते. जगू दिले असते. जेव्हा शासनसत्तेने अनात्मवाद, अनीश्वरवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, गतिवाद वाढवू दिला तेव्हा बुद्धधर्म फोफावला. पण जेव्हा शोषणसत्तेला तो नकोसा वाटला तेव्हा तिने शस्त्रांनी व भ्रष्टाचारांनी नष्ट करून टाकला. म्हणून दोष केवळ एका जातीचा नाही, तर हिंदू सामंतशाहीचा आहे. तिने रचलेल्या व्यवस्थेचा आहे. ती समग्र व्यवस्थाच, ती युगेच राजेशाहीची युगे होती. पावित्र्याच्या, मांगल्याच्या, स्वर्गीयत्वाच्या दैवी, अवतारी व अपौरुषत्वाच्या संकल्पनांना जन्म देणारी व वाढविणारी ती युगे होती. सर्व प्रेषितांचे जन्म आणि धर्मांचे जन्म या युगाने दिलेले आहेत.

युद्धमानता

हिंदू धर्माने देव करून देवळात बसविले आणि पूजनीयत्व दिले ते वीरपुरुष सत्तेसाठी लढलेले आहेत. त्यांची युद्धे, त्या युद्धांची कथानके पवित्र ग्रंथ म्हणून पूजनीय झालेले आहेत, अनेक सणवारही या वेळोवेळी झालेल्या युद्धांशी संबंधित आहेत. जे या सत्ताप्राप्तीच्या युद्धात पराभूत झाले, त्या त्या सत्ताधाऱ्यांचे राक्षशीकरण केलेले आहे व विजयी वीरांचे उदात्तीकरण झालेले आहे. सूड, द्वेष, मत्सर, वैर, तिरस्कार, अहंकार या हिंसक प्रवृत्तींना आदर्श म्हणून स्थान आहे. या सर्वांना सांस्कृतिक महत्त्व आहे. यावरून हिंदु-संस्कृतीत युद्धाचे अग्रस्थान आहे. सत्ता आणि सामर्थ्य दुसऱ्या वर्णाकडे व पंथाकडे गेली तेव्हा व समझोता झाला तेव्हा वेगळे आदर्श समाजापुढे आले. हा क्रम वाढत गेला असता तर सीता-शूर्पणखेची विटंबना करणारा, खांडववन जाळणारा पवित्र ग्रंथांत, देवळात बसला नसता. आदर्श (मिथ) झाला नसता. परंतु सत्ता-सामर्थ्य, ब्राह्मण, क्षत्रिय या वर्णाकडेच राहिल्यामुळे त्यांची सत्ता स्थापणारे देव झाले. नायक झाले. त्यांना हवी तशीच सामाजिक व्यवस्था बनत गेली. म्हणून पौराणिकता व मानसिकता वर्णानुकूल राहिली व साहित्यरचना या आदर्शानुसार होत गेली. तुच्छता, मत्सर,

अहंकार ही विषमतेची अपत्ये आदर्शवत राहिली. परंतु करुणा, प्रेम, बंधुभाव, समता इत्यादी आदर्शांना साहित्य आणि समाजात प्राथम्य व महत्ता आली नाही.

ख्रिस्तः वेगळे आदर्श

जिजस ख्रिस्ताने परमेश्वर मानला. त्याचे स्वर्गाचे राज्य मानले. स्वतःला परमेश्वराचा परमप्रिय पुत्र मानले. आदाम इव्हने पाप केले. म्हणून त्यांना स्वर्गातून हाकलले. स्त्री-पुरुष-संबंध हे पाप आहे असे मानले. परंतु जिजसने सांगितल्याप्रमाणे वागल्यास म्हणजे प्रेम, करुणा, सेवा, बंधुभाव, समता, त्याग, सहनशीलता इत्यादी सद्भावाने जीवन व्यतीत केल्यास स्वर्गातील परमेश्वराचे प्रेम संपादन करता येते. पश्चात्ताप, प्रार्थना याद्वारेही परमेश्वराचे प्रेम प्राप्त होते. ख्रिश्चन समाज, संस्कृती व साहित्य या तत्त्वांवर उभा असल्याने गरीब-श्रीमंत, रंक-राव हे भेद असूनही दुःखी दुर्दैवी जनविभागांना धर्मात व साहित्यात स्थान मिळाले. याउलट हिंदु धार्मिक व ललित साहित्यात शूद्र, अति-शूद्रांना स्थान मिळाले नाही. कारण पूजनीयत्व अपौरुषेयत्व प्राप्त झालेल्या देवांनी व ग्रंथांनी शूद्र अतिशूद्र या गरीब दुबळ्यांच्याविरुद्ध शत्रुत्वपूर्ण प्रचार केलेला आहे. ईश्वर आणि ईश्वरी पुस्तके जर द्वेष, मत्सराचा, तिरस्काराचा, अहंकाराचा प्रचार करतात तर त्यांना म्हणजे शूद्र, अतिशूद्रांना समाजात व साहित्यात स्थान कसे मिळणार ? म्हणून बंधुभाव, समता, स्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्यवाद व आजचे लोकशाही समाजवाद इत्यादींना भारतीय हिंदू समाजात व साहित्यात पौराणिकता नाही. आधार नाही. आदर्श नाही. संत साहित्यदेखील ह्यांना साह्यभूत होत नाही. परंतु वंशवादाला, विकृतीकरणाला व फॅसिझमला भरपूर वाव आहे.

संस्कृत साहित्य

जे सत्तेवर होते व ज्यांनी हिंदुधर्माची रचना करण्यासाठी तत्त्वे दिली, मते दिली, युद्धे केली त्यांनाच संस्कृत भाषेतील ललित व धार्मिक साहित्याचे नायकत्व मिळाले. तेच देवळातले देव झाले. हे आपण पाहिले. त्यांचीच जीवने साहित्याचे विषय झाले. पण ज्यांना धर्मदंडसत्तेने निषेधनीय ठरविले होते त्यांच्यापैकी कोणीही नायक- उपनायक वा देवी झालेला नाही. म्हणजे संस्कृत ललित व धार्मिक साहित्य धर्मदंडसत्तेशी प्रतिबद्ध होते. वरिष्ठ वर्णातील राजा महाराजांची देवत्व प्राप्त झालेल्यांची स्तुती, प्रशस्ती करीत हे साहित्य संख्यात्मक दृष्टीने वाढत आलेले आहे. या दोन वर्णांशिवाय एक दोन अपवाद वगळले तर दुसरे वर्ण साहित्यात आलेले आठवत नाही. सत्ता, संपत्ती व शिक्षण या वरिष्ठ वर्गांकडेच असल्यामुळे साहित्य स्मृतींच्या परिघाबाहेर गेलेले नाही. म्हणून ते एकसुरी आहे. त्याची वर्णव्यवस्थेशी व वर्णव्यवस्थेच्या वैचारिकतेशी प्रतिबद्धता पाहून ते दलित साहित्याची पौराणिकता व पूर्ण परंपरा होऊ शकत नाही.

संत साहित्य

इस्लामी आक्रमण भारतावर आदळू लागले. इस्लामी सत्तेच्या विजयाच्या व हिंदुसत्तेच्या अस्ताच्या संक्रमणकाळात संत साहित्य उदयास आले. कोसळत्या हिंदु-सत्तेला व वर्णव्यवस्थेला सावरून धरण्याचे व इस्लामी धर्माचे प्रसरण रोखण्याचे काम संतसाहित्याकडून झाले. वर्णाच्या वैचारिकतेचा प्रसार झाला.

या अंधाधुंदीच्या-हिंदू संतांच्या अधःपतनाच्या व मुसलमानी संतांच्या उगवत्या काळात समाजाच्या वेगवेगळ्या थरांतून-शूद्र अतिशूद्रांतून, स्त्रीवर्गातून प्रवक्ते उगवू लागले. हिंदू सत्तेचे दमणयंत्र मुस्लीम आक्रमणाच्या आघाताने निकामी झाले नसते तर ह्या शूद्र अतिशूद्रांतून प्रवक्ते, कलावंत, बुद्धिवंत येण्याचा चमत्कार घडला नसता. हिंदू सत्तेचे दमणयंत्र खिळखिळे झाल्यामुळे अल्पकाळ का होईना समाज सृजनक्षम झाला.

पुढे इस्लामी सत्ता स्थिर झाल्या. मांडलिक होऊन अथवा स्वतंत्र राहून हिंदू सत्ता सावरल्या गेल्या. वर्णव्यवस्था पुन्हा दमणक्षम झाल्या. इस्लामी सत्तांनी शोषण यंत्रणेस उपयुक्त असलेली हिंदु समाजव्यवस्था पाहून तिला जशीच्या तशी ठेवण्याचे ठरविले. यामुळे समाजाची सृजनक्षमता ब्रिटिशसत्ता येईपर्यंत करपून गेली. तसे पाहिले तर संतसाहित्य संक्रमणकाळातले आहे. शतकाच्या युद्धकाळाची त्याला पार्श्वभूमी आहे. या काळाची वाङ्मयरचना कशी असायला हवी होती ?

युद्धकाळात जन्मलेले संतसाहित्य पूर्णपणे वर्णव्यवस्थेशी तिने निर्माण केलेल्या वैचारिक व वाङ्मयीन आदर्शांशीच बांधलेले राहिले. या संस्कृत साहित्याने रूढ केलेल्या संकल्पना, सिद्धांत व नायक आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणारी तत्त्वे संत साहित्याने जशीच्या तशी स्वीकारली व प्रकट केली. शोषणव्यवस्था, वर्णव्यवस्था यामुळे अधिक बळकट झाली. जातिप्रथा आणि तिची मानसिकता इस्लाम समाजानेही आत्मसात केली. संतांची भक्ती ती सामाजिक समता खपवू शकली नाही. त्यांनी केलेली समीक्षा आदर्श होऊन, पौराणिकता होऊन समाजापुढे येऊ शकली नाही. भक्तिमार्ग सर्वत्र पसरला पण भक्तांच्या टोळ्या जातीजातीतच अडकून राहिल्या. कर्मवाद, पुनर्जन्मवाद, दैववाद आणि 'ठेविले अनंते तैसेची राहावे' ही प्रवृत्ती सार्वत्रिक झाली. हिंदुसामंतशाहीला अशीच वैचारिक व सामाजिक व्यवस्था हवी होती व ती तशीच राहिली.

नव्या सत्तेचे व विज्ञानाचे आगमन

ब्रिटिश आले आणि हिंदु-इस्लाम संतांचा पूर्ण पराभव करून भारताचे सत्ताधारी झाले. तसेच नवे ज्ञानविज्ञान यंत्र-तंत्रे, उद्योग-व्यवसाय इथे प्रस्थापित झाले आणि समाजाच्या उत्पादनपद्धतीत बदल येऊ लागल्यामुळे सामाजिक चौकट खिळखिळी झाली. नवी वैचारिकता स्वीकारण्यास जागा रिकामी झाली. त्यामुळे युरोप-अमेरिकेतील वैचारिक

जागृतीचे प्रकाशकिरण इकडे येऊ लागले आणि आत्मसमीक्षेचे विचार इथे उभे राहू लागले. या आत्मटीकेच्या विचारातून व ललित साहित्याच्या अभ्यासातून आधुनिक ललित साहित्याचा अवतार होऊ लागला. पहिल्या प्रथम आध्यात्मिक, पारलौकिक व धार्मिक विषयांऐवजी सामाजिक विषय आकारबद्ध, शब्दबद्ध होऊ लागला.

जे पूर्वीपासून धर्मामुळे समाजाच्या अग्रभागी होते, अर्थसत्ता, धर्मसत्ता व दंडसत्ता ज्यांच्या हातात होती, तेच उच्चवर्णीय आपले कौटुंबिक प्रश्न घेऊन सामाजिक चळवळीचे जसे पुढारी होते तसेच लेखक, कवी म्हणूनही पुढे येत होते. व्यासपीठावर त्यांचेच कौटुंबिक प्रश्न चर्चिले जात होते. या साध्या चर्चेसाठीही हिंदुधर्माची समीक्षा करणे भाग पडत होते. शेकडो वर्षांनंतर ही समीक्षा अवतीर्ण झाली होती. ती जरी सुधारणा मागत होती तरी त्यातून समाजाची मानसिक प्रगती होत होती.

स्त्री

शेकडो वर्षांनंतर साहित्याचा विषय होऊन स्त्री येऊ लागली. बालविधवा, बालविवाहिका, सासुरवाशीण अशी एकत्र हिंदु कुटुंबात चिरडली जाणारी स्त्रीची विविध रूपे साहित्यात प्रकट होऊ लागली. नवे ज्ञान-विज्ञान, नवे धंदे-व्यवसाय व नवे वाङ्मयीन, वैचारिक आदर्श समाजापुढे आल्यामुळे स्त्रीजीवन चित्रित करण्याचे धाडस लेखकांना करता आले.

शूद्र कोण ?

स्त्री पाठोपाठ तिच्याप्रमाणेच उपेक्षित असलेला शूद्र अतिशूद्र हा विचाराचा विषय व्हायला काही अडचण उरली नव्हती. पेशवाई नव्हती. केवढे तरी बलाढ्य साम्राज्य सर्व शक्तीनिशी उदारमतवादाचा पुरस्कार करीत होते. केवळ शासनसत्ता नव्हेच तर चळवळीही पाठीशी उभ्या होत्या. स्त्रीला साहित्यात स्थान दिले म्हणून शंबूकाप्रमाणे साहित्यिकांचा शिरच्छेद ब्राह्मणांच्या कागाळ्या ऐकून राज्यकर्त्याने केलेला नव्हता. उलट कायद्याचा पाठिंबाच दोता आणि नवे उद्योगधंदे व हुद्दे प्राप्त झाल्यामुळे ब्राह्मणवर्गामध्ये फूट पडलेली होती. सुधारणावादी ब्राह्मण आणि पुराणमतवादी ब्राह्मण असा संघर्ष इतिहासात पहिल्यांदाच उद्भवला होता. आता स्त्रीच्या पाठोपाठ शूद्राला साहित्यात स्थान मिळायला काही अडचण नव्हती. एवढेच नाहीतर इंग्रजी वाङ्मयात शूद्र-अति-शूद्राप्रमाणे असलेल्या गरीब दुबळ्यांची चरित्रेही नॉव्हेलांत आलेली होती. इतकी अनुकूलता असूनही शूद्र अतिशूद्रांना साहित्यात प्रवेश मिळाला नाही, असे का ? हे लेखक कलावादी होते ? सौंदर्यवादी होते ? त्यांना प्रबोधन नको होते ? दैन्य, दास्य, दुःख, दुर्दैव मांडण्याचे शब्दसामर्थ्य त्यांच्या ठायी नव्हते ?

ते असमर्थ होते असे म्हणता येणार नाही. त्यांना सामाजिक सुधारणा हवी होती. प्रबोधनही हवे होते. परंतु त्यांना शूद्र अतिशूद्र दिसले नाही व त्यांनी ते साहित्यात

मांडले नाहीत याचे कारण त्यांचे संस्कार, त्यांचे मन आणि त्यांची पौराणिकता हे होय.

आदर्श

इंग्रजी लेखकांना गरीब-दुबळे लोक दिसले त्याला कारण ते येशु खिस्ताला दिसले होते. तो परमेश्वराचा पवित्र पुत्र असूनही त्यांनी गरीब-दुबळ्यांना अपवित्र मानले नव्हते. तुच्छ मानले नव्हते. पापाची संकल्पना त्यांनी स्वीकारली होती. पण पापपुण्याची वाटणी जन्मावर, जातीवर आधारित नव्हती. गरिबासाठी प्रेम व करुणा देण्यासाठी त्याने आपले दोन्ही बाहू दिशांत पसरले होते. परमेश्वराच्या पुत्राने-येशु खिस्ताने गरीब दुबळे जवळ केले म्हणून खिश्चन धर्माला, खिश्चन संस्थानाला, खिश्चन समाजाला ते जवळचे वाटले. म्हणून बुद्धिवंतांना आणि कलावंतांना ते जवळचे वाटले. हा आदर्श, ही पौराणिकता खिस्तांनी साहित्याला दिली होती. म्हणून प्रेमातून, करुणा क्रोधातून क्रांतिकारक उठावांनाही जिजस खिस्तांची प्रेरणा मिळत होती.

अंधत्व

हिंदू लेखकांना शूद्र अतिशूद्र दिसले नाहीत याचे कारण हिंदूंच्या नायकांना, परमेश्वरत्व प्राप्त झालेल्यांना व अपौरुषेयत्व प्राप्त झालेल्या पवित्र पुस्तकांनाच ते कधी दिसले नव्हते. असंख्य अवतार झाले, संत आले परंतु शूद्र अतिशूद्र व स्त्रियांचे दुःख कोणाला दिसले नाही. देव, संत आणि धर्म जर गरीब दुबळ्यांबद्दल शत्रूता आणि तुच्छता प्रकट करतात तर हिंदू पौराणिकतेत व संस्कारात शूद्रांना कसले स्थान असणार ? म्हणून समाजात व मनात कुठून जागा असणार ? हिंदूंच्या वर्णव्यवस्थेत करुणेला, प्रेमाला, भ्रातृभावाला वाव नसल्यामुळे शूद्रअतिशूद्रांना समाजात व साहित्यात स्थान नव्हते म्हणून त्यांच्या उद्धाराचे मार्गही कोणालाच सुचले नव्हते. कोणीही त्यांच्यामध्ये जाऊन त्यांना अंगीकारले नव्हते. तसेच शिकविले नव्हते. संघटित केले नव्हते. लढ्यास उठविले नव्हते. त्यांना लढ्यात उठविणे म्हणजे कर्मवादाचा, पुनर्जन्माचा आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या विचारव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा निःपात करणे, हे शक्यच नव्हते. म्हणून सर्वांनी वर्णव्यवस्थेच्या गरजेतून आलेल्या तत्त्वांचा व पौराणिकतेचा प्रचार व पुरस्कार केला आहे.

बौद्ध धर्म असता तर

परंतु जर बुद्धधर्म लोकांचे मन घडविण्याएवढा प्रभावशाली राहिला असता तर भारतीय पौराणिकतेमध्ये प्रेम करुणेला महत्त्वाचे स्थान असते. खिश्चन धर्माप्रमाणेच शाळा, आश्रम, दवाखाने व गरीब दुबळ्यांची सेवा करणाऱ्या अनेक धार्मिक संस्था ठायीठायी अस्तित्वात असत्या. या सर्वांच्याद्वारे मानवतेचे अनंत आदर्श समाजापुढे आले असते. एवढेच नव्हे तर अनात्मवाद, अनीश्वरवाद, बुद्धिप्रामाण्यवाद व गतिवाद अनेक शास्त्रांना

व सामाजिक उत्पादनाच्या साधनांचा सतत विकास करण्याला साह्यभूत झाला असता. सामाजिक उत्पादनाची साधने नुसती विकसित झाली तरी सामाजिक रचनेत बदल होतात. सामाजिक उत्पादकाचे मालक बदलले की समाजात क्रांतिकारक बदल होतात. हे बदल केवळ सामाजिकच बदल करतात असे नाही तर ज्ञान–विज्ञानाच्या क्षेत्रातही अनेक नवी संशोधने आणून परिवर्तने घडवितात. भारतीय वैद्यक, रसायन, व्याकरण, कायदा व तत्त्वज्ञान यांच्यामध्ये तशीच कलेमध्ये बौद्धधर्माने प्रचंड भर टाकलेली आहे.

भगवान बुद्धाचा धर्म गती, प्रगती व क्रांतिवादी आहे. अनात्मवादी आहे. स्थितिशीलतेचा तो पुरस्कर्ता होऊ शकत नाही. ईश्वर व आत्मवाद मात्र होऊ शकतो. बुद्धाचे तत्त्वज्ञान त्याच्या मूलभूत सिद्धांतांवरून समाजाला लोकशाहीकडे घेऊन गेले असते. अन् लोकशाही जेव्हा मानसिकता होते तेव्हा आर्थिक विषमता असली तरी, सत्ता धनवंतांच्या हातात असली तरी, सामान्य माणूस अस्पृश्य, उपेक्षित, तुच्छ, तिरस्कृत असत नाही. तो विचाराचा विषय होऊ शकतो.

बौद्ध धर्मात तो तसा आला होता म्हणून थेर, थेरीगाथामध्ये त्या वेळच्या उपेक्षितांना स्थान मिळाले आहे. तात्पर्य हे की जशी पौराणिकता असेल तशी मानसिकता असते व कला–साहित्यही तसेच तयार होते.

जेव्हा इंग्रजी साहित्याच्या अनुकरणाने आधुनिक साहित्य अवतरत होते तेव्हा शासनसत्तेचा आशय बदललेला होता. पाप–पुण्य, कर्म–पावित्र्य, आत्मा आणि जन्म म्हणजे काय, अस्पृश्यतेच्या पाठीशी शोषण व शत्रुत्व कसे आहे हे दाखविण्याची शक्ती असलेले तत्त्वज्ञान शासन व उत्पादनाच्या साधनांतून प्रकट होणाऱ्या ज्ञानाच्या जोरावर ते स्पष्ट करू शकले असते. महात्मा फुले यांनी मूलभूत विचाराचे धन समाजापुढे ठेवले होते. त्यांचे कार्य, त्यांचे विचार घेऊन बुद्धिवादी वर्गाला लोकशाहीकडे, सामाजिक चळवळीकडे घेऊन जाता आले असते. पण असे काही झाले नाही. याचे कारण आपला बुद्धिवादी वर्ग प्रस्थापित व्यवस्थेशी, विचारांशी पूर्णपणे बांधलेला असतो. कारण तो त्या वर्गाचा पुत्र आणि प्रतिनिधी असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचारलेल्या एका प्रश्नात आपल्या बुद्धिवादीवर्गाचे वर्गीय स्वरूप स्पष्ट झाले आहे. त्यांनी विचारले आहे, " ब्राह्मणाची ज्ञानाची परंपरा इतकी प्रदीर्घ असून एकही व्हॉल्टिअर का दिला नाही ?"

व्हॉल्टिअर होण्यासाठी धर्मसत्तेविरुद्ध, दंडसत्तेविरुद्ध उभे राहावे लागते. ते इथल्या ब्राह्मणांना आणि बुद्धिजीवी वर्गाला शक्यच नव्हते. कारण धर्म, सत्ता आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणारी सर्व व्यवस्था त्याने त्याच्यासाठी निर्माण केलेली आहे. लेखकही त्याच वर्णातून येत असल्यामुळे त्याचे लेखन मनुस्मृतीच्या कक्षेतील असण्याचे कारणही तेच आहे.

राष्ट्रीय प्रबोधन

राष्ट्रीय प्रबोधनाच्या वेळी वर्णव्यवस्थेला आव्हाने देत हिंदू समाजाच्या जाती, जातीतून जागृती उठू लागली आणि केवळ इथला ब्राह्मण टीकेचा विषय होऊ लागला. खरे म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रिय हाही अन्यायकारक व्यवस्था रचणारा आणि सांभाळणारा होता. एकाच्या हातात शासनसत्ता होती व दुसऱ्याच्या हातात धर्मसत्ता होती. इथल्या बुद्धिवादी वर्गाने या जातीजातीतून उठणाऱ्या सामाजिक चळवळींचे पुढारीपण करायला पाहिजे होते. या सामाजिक चळवळींना लोकशाहीचा आशय द्यायला पाहिजे होता. आर्थिक, राजकीय विचार घेऊन ती सामाजिक चळवळ राष्ट्रीय विमोचनाची क्रांतिकारक चळवळ करायला पाहिजे होती. परंतु इथल्या बुद्धिवादीवर्गाने म्हणजेच राष्ट्रीय पुढाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत फूट पाडली. राजकीय चळवळ विरुद्ध सामाजिक चळवळ असे या प्रबोधनाचे दोन भाग करून त्यांना युद्धाच्या छावण्यांचे स्वरूप दिले. सामाजिक चळवळ करणारे, शेतीसंबंधी, उद्योगधंद्यासंबंधी विचार करणारे त्यांनी ब्रिटिशाचे हस्तक, देशद्रोही ठरवून टाकले.

राष्ट्रीय चळवळीलाही क्रांतिकारक लढ्याचे स्वरूप न देता ऐतिहासिक, पौराणिक काळाचे, पूर्वजपूजेचे स्वरूप दिले. खरे म्हणजे गतकाळातील युद्धांचे व त्यातील वीरांचे पूजन करण्याचे काही कारण नव्हते. गतकाळामध्ये सामान्य माणूस आणि स्त्री गुलाम होते. त्या काळाचा आणि सामान्य माणसाचा काही ऋणानुबंध नव्हता. वेठबिगार करणारा, चिरडला जाणारा, युद्धात, यादव्यांत आणि पेंढाऱ्यांच्या पुंडाईत उद्ध्वस्त होणारा हे त्याचे त्या युगातील पददलित स्थान होते. त्याला अस्तित्व या युगात प्राप्त झाले. सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेतील त्याच्या स्थानामुळे, विज्ञानामुळे त्याचे स्थान निर्णायक व महत्त्वाचे ठरले. त्याच्या संख्याबळाने, लोकशाही तत्त्वज्ञानाने संघर्षात त्याला नेतृत्व बहाल केले. भूतकाळात जे जातीने, वर्णाने, वंशाने मोठे मानले जात होते, तेच अग्रपूजेचे मानकरी होते. पण यंत्रयुगाने व त्याच्या ज्ञानविज्ञानाने पारडे बदलून टाकले. जे वर होते ते खाली गेले. आणि समाजाचे लोकशाही स्वरूप ज्यांना नको होते व जे सामाजिक विषमतेचा पुरस्कार करीत होते त्यांनी इतिहासपुराणाचे व गतकाळाचे उदात्तीकरण काव्य नाटकांद्वारे सुरू केले. कारण पौराणिक व ऐतिहासिककाळी ते सर्व श्रेष्ठ होते, जेते होते, नेते होते. तो काळ त्यांचा म्हणून त्यांची आणि पूर्वजपूजेची आठवण इथल्या बुद्धिवादी वर्गाला होत होती. शूद्र अतिशूद्रांचे दुःख, दैन्य, दास्य सांगणारे, वर्णव्यवस्थेवर आघात करणारे, सामाजिक, आर्थिक, राजकीय पुनर्रचना मागणारे फुले, आगरकर, गोखले, रानडे यांना शत्रू ठरवून शत्रूवर करावेत तसे चौफेर हल्ले त्यांच्यावर करीत होते. त्यामध्ये त्यांना यश आले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा एकांगी करण्यात यशस्वी झाले. बाकीचे लढे दुय्यम ठरविण्यात त्यांना यश आले.

याउलट युरोपात घडले. नवे विचार, नवी संशोधने, नवे ज्ञान-विज्ञान व नवी उत्पादन-

साधने प्रस्थापित करण्यासाठी ते धर्म-दंडसत्तेशी लढले. त्यांनी मरण, देहदंड स्वीकारले व जनलढे, जनजीवन पुढे नेले. हा फरक का दिसतो ? तिथला बुद्धिवादी वर्ग जाति-व्यवस्थेतून जन्माचा, धर्माचा खास अधिकार, आशीर्वाद घेऊन श्रेष्ठ म्हणून येत नाही. धर्माने त्याला सत्तेत, समाजात व संपत्ती संपादन करण्यात अग्रहक्क दिलेला नाही. तो स्वतःच्या गुणकर्तृत्वाने पुढे येऊ शकतो. पण इथल्या बुद्धिजीवी वर्गाला भूतकाळ प्रिय असतो. देव झालेला, परमेश्वर झालेला, वीर झालेला त्याचा पूर्वज असतो. वर्तमान-काळ यंत्रयुगामुळे, ज्ञानविज्ञानामुळे भूतकाळातील त्यांचे नेमके मूल्य देतो. अन् श्रमणा-च्याला अग्रस्थान देतो. हा वर्तमानकाळ त्याच्या क्रांतीवत्तेसह स्वीकारणे इथल्या वर्गीय बुद्धिवाद्यांना नको असते.

त्यांना सत्ता, सामर्थ्य देणारी ही नवी ज्ञानविज्ञाने, त्यांची उत्पादनसाधने हवी असतात, पण ह्या युगाची क्रांतीवत्ता नको असते. त्यांना समाजवादी व्यवस्था नको असते. वर्णव्यवस्था हवी असते. सुधारणा चालते. एक दोघांना अथवा काहींना खालून वर जाऊ देण्यासाठी ते वैदिक काळाचा आधार पुढे करतील. पण सम्यक परिवर्तन, वर्ग, वर्ण उच्चाटन, जाती निर्मूलन, समतास्थापन त्यांना नको असते.

म्हणून त्यांनी सम्यक परिवर्तनामध्ये विकसित होणारे सामाजिक लोकशाहीचे लढे रोखले. एकाकी पाडले आणि पारंपरिकतेचा रंग देऊन स्वातंत्र्यलढ्याला आपल्या वर्गानु-कूल-वर्णानुकूल केले.

या सामाजिक अवस्थेतून, या वैचारिकतेतून स्वातंत्र्य-संघर्ष काळातले अर्वाचीन साहित्य निर्माण झाले.

जेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा म्हणजे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परि-वर्तनाचा लढा होऊ दिला जात नव्हता. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक क्रांतीचा लोकशाहीचा संघर्ष उभा राहिला. जीवनाचाच तो अपरिहार्य आविष्कार होता. पण आधीच्या सामाजिक लढ्याचे भवितव्य ह्या लढ्याचे भवितव्य ठरणार होते. तो राष्ट्रीय होऊ दिला जाणार नव्हता. एकाकी ठेवला जाणार होता. हे बाबासाहेबांना माहीत होते तरी ते लढ्याला उभे राहिले. राहणारच होते. कारण दुःख त्यांनी साक्षात अनुभवले होते. जगले होते. म्हणून ते दावानल झाले होते. महान करु-णेने, महान संतापाने, करुणा आणि क्रोध जेव्हा एक होतो तेव्हा क्रांतीचा अवतार होतो व युगाचा आरंभ होतो.

बाबासाहेब बोलू लागले. लढू लागले. अन् अनेक चिरंजीव धाराशयी होऊ लागले. जे कधी रडलेही नव्हते, लढलेही नव्हते ते दीनदुर्बळ, दुर्दैवी आपल्या डोक्यावरले डोंगर भरार झिरकावून देऊन युद्धाला उभे राहिले. कुठेय् शत्रू···असे ललकारू लागले.

शत्रूने अवघे भारतीयत्व व्यापून टाकलेले होते. तो रीतिरिवाजात होता. तो रचनेत, व्यवस्थेत, पुस्तकात, शब्दात आणि मनातही होता. आणि मित्रांचा तर राष्ट्रीय लढ्यात पराभव होत होता. कम्युनिस्ट-सोशॅलिस्टांचे राष्ट्रीय लढ्याला श्रमिकमध्यवर्तित्व देण्याचे प्रयत्न अपयशी ठरत होते. सरंजामशाहीने आणि भांडवलशाहीने स्वातंत्र्यलढ्याला आपल्या हातात ठेवले होते. मानवेंद्रनाथ रॉयसह सर्व क्रांतिकारक बाजूलाच सारले गेले होते.

अशा वेळी शेकडो वर्षांनंतर पहिल्या प्रथम शूद्र अतिशूद्र भारतीय साहित्यात नायक उपनायक म्हणून आला. पण तो आंबेडकरी विचार बोलत नव्हता. बोलू शकतही नव्हता. कारण राष्ट्रीय चळवळीनेच वर्णवाद नाकारलेला नव्हता. सर्व समाजच जातीत जगत होता. बुद्धिजीवी वर्ग हा धर्माशी संबद्ध होता. भांडवलदार वर्ग हा क्रांतीचे नेतृत्व करू शकत नव्हता. तो सरंजामदार वर्गाचा निकटवर्ती होता. बुद्धिजीवी वर्ग याच वर्गातून आलेला असल्यामुळे त्याची पौराणिकता, वैचारिकता व मानसिकता प्रस्थापित वर्गाशी जखडलेली असते. वर्णाचे व जातीचे एक वैशिष्ट्य असते. एक गरीब असला दुसरा अतिश्रीमंत असला तरी या दोहोंत वर्ण हा वर्गजाणीव निर्माण होऊ देत नाही. त्याचप्रमाणे हिंदु तत्त्वज्ञानातील संकल्पना दैव इत्यादीही वर्गजाणीव दुबळी करीत असतात. त्यामुळे आंबेडकरी विचाराचा नायक म्हणजे विज्ञानवादी, विद्रोही नायक, हिंदु लेखकांना झेपवत नाही. पण कर्ण, एकलव्याप्रमाणे असणारा नायक त्यांच्या संस्काराशी आणि पौराणिकतेशी सुसंगत असतो.

वर्णव्यवस्थेला शरण गेलेला पण वर्णव्यवस्थेत योग्य ते स्थान न मिळाल्यामुळे कर्ण एकलव्याप्रमाणे जन्म एक दुःख आहे असे मानणारा शूरवीर पण धर्म प्रतिकूलतेमुळे (दैव-नियतीचे खेळणे बनलेला) नायक खूप दुःख, खूप नाट्य, खूप रसात्मकता व समरप्रसंग देत असतो. या नायकाद्वारे नियतीचे तत्त्वज्ञान म्हणजे वर्गीय समाजात जगण्यासाठी स्वीकारलेली धर्मशरणता प्रकट करता येते. जन्म हे दुःख आहे हे वाचकाला पटवून देता येते. त्याला पटतेही. नायकाचे चरित्र-चित्र वाचकाला पुनःप्रत्यय आनंद देत असते. ही कलाकृती हिंदु पौराणिकता व मानसिकताच व्यक्त करीत असते. या आदर्शाला अनुसरून जे साहित्य निर्माण होते त्याचा परिवेष जरी आधुनिक असला तरी ते पारंपरिक असते.

फुले, आंबेडकरवादी नायक अथवा विषय वा विचार ज्यांचा पिंड हिंदु संस्कारांनी घडलेला आहे त्या लेखकांना रुचतच नाही. ते जीवन शब्दबद्ध करण्याचे सामर्थ्य त्यांच्याठायी नसते. परंतु मार्क्सवादी लेखकांनीही हिंदु पौराणिकतेशी व मानसिकतेशी जडलेले नायक निवडलेले आहेत. खरे म्हणजे फुले, आंबेडकरी नायक हा जात, धर्म, धर्माधिष्ठित अर्थ व समाजव्यवस्था नाकारीत असतो. आणि सहजपणे लोकशाही समाजवाद स्वीकारीत असतो. विषमतेचा तो कट्टर विरोधक असल्यामुळे विषमतापूर्ण समाजरचनेतून

आलेल्या विभूती, अवतार, पुरुषोत्तम इत्यादी संकल्पनांना त्याचा स्वाभाविक विरोध असतो. ही समाजवादी लोकशाहीवृत्ती फुले, आंबेडकरी विचारातून आपोआप प्राप्त होते. असा नायक मार्क्सवादी लेखकांना आकर्षित करू शकतो. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात तो आकलन झाला नाही, हे सत्य आहे. ते वर्णवादी आहेत हे त्याचे कारण नाही. पण संस्कार व वर्गीय मर्यादा किती प्रबळ असतात हे मात्र त्यातून स्पष्ट होते. दलित साहित्याचा विचार प्रगतिशील, क्रांतिदर्शी व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या लेखकांना का सुचला याची कारणपरंपरा ही अशी आहे.

भारतीय सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा हा इतिहास स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासापेक्षा मोठा आहे. स्वातंत्र्य मिळाले. पण अनेक सामाजिक प्रश्न मात्र अजूनही सुटलेले नाहीत. देशाने लोकशाही स्वीकारली आहे आणि घटनेने अस्पृश्यता नाकारून हजारो वर्षांची धार्मिक व सामाजिक रचना व्यर्थ ठरविली आहे. घटनेने हिंदु धर्मावर मात केलेली आहे तरी अस्पृश्यता आहे, विषमता आहे. एवढेच नव्हे भारतात लोकशाही आहे तशी वर्णव्यवस्थाही आहे. भीमस्मृती आहे तशी मनुस्मृतीही आहे. भारत एकाच वेळी विसाव्या शतकात आणि मध्ययुगात, एकाच वेळी हा समाज दोन जीवनपद्धतींत आणि दोन व्यवस्थांत जगतो आहे.

देश आणि देशवासीय अशा द्विधा स्थितीत असण्याचे कारण काय ? लोकशाही असताना जातिभेद कसा काय ? लोकशाही आणि जातिव्यवस्था एकत्र जगू शकत नाही. त्या परस्परविरोधी शक्ती असतात. वर्णव्यवस्था अथवा जातिव्यवस्था असल्यावर लोकशाही अव्यंग आहे असे म्हणता येणार नाही. परंतु भारतात लोकशाही आहे व वर्णव्यवस्थाही आहे. याचा अर्थ भारतीय लोकशाही औपचारिक लोकशाही आहे. भांडवलशाही लोकशाही आहे. भांडवलशाही लोकशाही आर्थिक विषमता जशी सांभाळते तशीच ती धार्मिक वांशिक विषमतेच्या विरोधी नसते. अस्पृश्यता असल्याने व जातीच्या नावाने लोकसमूहाचे वाटोळे होत राहिले तरी भांडवलशाही लोकशाहीस खेद वाटत नाही. ती कायदे करते, पण ते तत्काळ अमलात आणण्याचे नसतात. अस्पृश्यता असल्याने आणि त्यात अनेक व्यक्तिमत्त्वांचा होम होत असल्याने भांडवलशाहीचे काहीही नुकसान होत नसते. अन् भारतीय भांडवलशाही ही काही एक सामाजिक गरजेतून, विकासातून, उत्पादन–साधनांच्या मालकीच्या संघर्षातून उदयाला आली नाही तर तिला ज्ञानविज्ञानासाठी दिलेल्या लढ्याचा इतिहास नाही तर ज्या वर्गाला धर्माने सत्ता संपत्ती धारण करण्याचा खास हक्क दिला होता त्यांनीच संचिताच्या आधारे यंत्रे विकत घेऊन कारखाने काढले, वाढवले. नफे केले. यंत्राबरोबर त्यांनी त्याचे स्वाभाविक पुढारीपण केले नाही. उलट कामगारवर्ग, समाज जातिभेदात, धर्मभेदात दुभंगलेला असेल तर वर्गीय लढा संघटित होण्यात, वर्गीय समाज उभा राहण्यात अडथळे येतात. म्हणून भांडवलशाहीस समाज धर्माने विभागलेला हवा असतो.

स्वातंत्र्यानंतर भांडवलशाहीचा पुष्कळ विकास झालेला आहे. लहानसहान युद्धे जिंकण्याची क्षमता तिच्या ठायी आलेली आहे. पण सामाजिक विषमता त्या गतीने कमी झाली नाही. उलट गरिबी, श्रीमंती प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे.

भांडवलशाहीच्या आर्थिक विकासाने सामाजिक प्रश्न सुटतात असे नाही. उलट भांडवलशाहीच्या विकासाने युद्धाचा, वसाहतवादाचा आणि फॅसिझमचा अवतार होतो हा इतिहास आहे. सर्वाधिक युद्धे भांडवलशाहीनेच जीवनावर लादलेली आहेत. वसाहती जिंकण्यासाठी, बाजारपेठा मिळवण्यासाठी व विरोधी लढे व तत्त्वज्ञान नष्ट करण्यासाठी म्हणजे नफ्यावर आधारलेला आर्थिक विकास, सामाजिक प्रश्न सोडवतो असे नाही.

पण केवळ सामाजिक चळवळीनेही अस्पृश्यतेचा प्रश्न सुटलेला नाही. अस्पृश्यता अजून टिकून आहे.

म्हणून दलित साहित्य आपल्या सामाजिक जाणिवा व्यक्त करताना अर्थकारण कसे असावे, राजकारण कसे असावे, सत्ता कशी असावी, समाजरचना कशी असावी या प्रश्नांचा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचाही विचार करते. कारण दलितांचे जीवन या सर्व प्रश्नांशी निगडित आहे.

साहित्याने एवढा व्यापक विचार करावा काय ? ज्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारली आहे, दलित जीवनाचे प्रवक्तेपण स्वीकारले आहे त्या साहित्याने–दलित साहित्याने एवढा व्यापक विचार करणे जरूरच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे पुराणपुरुष आहेत. आदर्श आहेत. दलित साहित्याची ते पौराणिकता आणि अस्मिता आहेत. मिथ आहेत. त्यांनी ह्या सर्व प्रश्नांचा विचार केला आहे. त्यासाठी आंदोलने केली आहेत. भारतीय लोकशाहीला आदर्श देण्यासाठी त्यांनी अनात्मवादी, अनीश्वरवादी, गतिवादी व माणसाला केंद्रवर्तित्व देणाऱ्या बुद्धधर्माची पुनःस्थापना केली आहे. जमिनीचे आणि उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करावे असेही त्यांनी सांगितले. जीवनाच्या सर्व प्रश्नांसंबंधी त्यांनी आपले विचार मांडले आणि त्यासाठी चळवळी केल्या.

म्हणून जे प्रश्न दलित जनांचे आहेत ते प्रश्न दलित साहित्याचेही आहेत. सामान्यजनांशी–दलित जनांशी एकरस झालेले हे साहित्य म्हणून प्रस्थापितांच्या विरोधी आहे. प्रस्थापितांच्या विरोधी असल्यामुळे ते डावे आहे. म्हणून भारताच्या भवितव्याला आकार देणारेही आहे.

नकार व पुरस्कार

भारतामध्ये वर्णाधिष्ठित हिंदुधर्म सर्व धर्मांत मोठा धर्म आहे. बौद्ध धर्माचा लोप झाल्यामुळे भारतीय समाजावर, संस्कृतीवर आणि म्हणून जनमानसावर हिंदुधर्माचा सर्वा-

धिक प्रभाव आहे. भारतातील बहुसंख्य जनता हिंदुधर्माचेच अनुसरण करते. पोथी, पुराणांतील अन् वेद–उपनिषदांतील अनेक संकल्पना सत्य म्हणून, वास्तव म्हणून स्वीकारते. पुराणांनी, पोथ्यांनी ज्यांना देव अथवा राक्षस मानले आहे त्यांनी देव म्हणून पूजा व राक्षस म्हणून तिरस्कार करते. निषेध करते.

भारतात हिंदु बहुसंख्य आहेत. म्हणून शासनयंत्रणा आणि राष्ट्राच्या आर्थिक सांस्कृतिक नसणाड्या हिंदूंच्याच हातात आहेत. भारतातील मुसलमान जनता देवधर्म, पूजा, प्रार्थना वेगळी करत असली तरी त्यांची मानसिकता हिंदूंचीच आहे आणि परमेश्वर, आत्मा, स्वर्ग नरकाच्या, पापपुण्याच्या कल्पना सारख्याच असल्यामुळे भारतातील इतर धर्म या अर्थाने हिंदुधर्माचे बंधुधर्मच आहेत. म्हणूनही हिंदुअहिंदूंची मनोधारणा सारखीच आहे. म्हणून साहित्यरचना जवळ जवळ सारखीच आहे. हिंदु मानसिकता–पौराणिकताच प्रभावी आहे.

म्हणून आजच्या युगाच्या तत्त्वज्ञानाला समता, स्वातंत्र्य, बंधुभाव म्हणजे लोकशाही समाजवादाला भारतीय मानसिकतेत, पौराणिकतेत आधार नाही. संत साहित्यही पुरेसा आदर्श देत नाही. पण फॅसिझमला, वर्ण अथवा व्यक्तिवर्चस्वाला, पुरुषोत्तमत्वाला, अहंकार तिरस्काराला, द्वेषमत्सराला भरपूर वाङ्मयीन व वैचारिक आधार आहे.

लोकशाही समाजवाद, ज्ञानविज्ञान ज्याचे पंचप्राण आहेत, आजचे क्रांतिमय वर्तमान युग ज्याचे सारसर्वस्व आहे त्या दलित साहित्याला ही पूर्वपरंपरा स्वीकाराहार्यही वाटत नाही. दलित साहित्याची परंपरा, पौराणिकता जागतिक क्रांतिदर्शी साहित्यात आहे, जे साहित्य सामान्य माणसाला नायकत्व देते आणि समाजवादाचा पुरस्कार करते ते साहित्य दलित साहित्याचा आदर्श आहे.

दलित साहित्य

माणूस मूलतः दलित, उपेक्षित अथवा अस्पृश्य नसतो. त्याला ह्या अवनत अवस्थेला व्यवस्था पोहचवते. ती बदलून टाकली म्हणजे माणूस फक्त माणूस होतो. आणि म्हणून त्याचे चरित्रचित्रण करणारे साहित्यही दलित साहित्य नसते. हे ठावे असूनही एक प्रभावी धारा आपल्या लेखनाला दलित साहित्य म्हणवून घेते. हे म्हणणे हाच मुळी उद्योग आहे. कारण वर्णाधिष्ठित समाजाने आणि त्याच्या साहित्याने दलित म्हणजे हीन, तुच्छ, तिरस्कृत, गतजन्माचा पापी आणि इहलोकी दुःखी दरिद्री, अपमानित, ज्याला काही इतिहास नाही, ज्याच्या पूर्वजांना देवळात अथवा ग्रंथात पूजनीयत्व मिळाले नाही असा मानलेला आहे. भारतीय समाजाची हे सारे दुःख, दैन्य, दास्य, अपमान, अवहेलना, तुच्छता, तिरस्कार दलित साहित्याने शिरावर धारण केले आहेत. बुद्धाने जसे दुःख स्वीकारले, अनेक क्रांतिकारांनी दलितपण स्वीकारले तसे दलित साहित्याने दलितत्व स्वीकारले आहे. स्वप्नरंजन, प्रस्थापितांचे चित्रण, त्यांचे जे जे काही

आहे ते कितीही सुंदर (सत्तेमुळे) दिसत असले तरी त्यांनी स्त्रीशूद्रांना गुलाम केले; अस्पृश्यत्व दिले हे विसरता येत नाही. सामाजिक क्रांतित्व बनलेले, मिथ बनलेले, आदर्श बनलेले आणि दलितांची पौराणिकता झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना महार मानीत म्हणून ते दलितांचे नेते झाले नाहीत तर दुःख, अस्पृश्यता, जातिभेद नष्ट करण्यासाठी ते दलितांचे नेते झाले. पूर्वकर्माला, पूर्वपापाला म्हणून जन्माला, जातीला, वर्णाला आणि वर्गाला बळकट करणाऱ्या वैचारिकतेला मानत नव्हते म्हणून ते दलित झाले होते असे नाही. ते महान क्रांतिकारक योद्धे होते, महापंडित होते तरी त्यांनी स्वतःला दलित अस्पृश्य म्हणवून घेतले. त्यांची जी कारणपरंपरा आहे त्याच-मुळे जागतिक श्रेष्ठ साहित्यामध्ये ज्यांचे लेखन स्थान मिळवीलं असे लेखक–आजचे आणि उद्याचेही–स्वतःला दलित साहित्यिक म्हणवून घेत आहेत.

भारतातील प्रस्थापित साहित्य हे हिंदू साहित्य आहे. आणि सम्यक परिवर्तन करू शकणारी, विज्ञान आणि समाजवाद सहजपणे स्वीकारू शकणारी भारतातील क्रांतिकारक ताकद दलित समाजच आहे. दलित हे विशेषण सम्यक क्रांतीचे नाव आहे. क्रांतीचा साक्षात्कार आहे.

•

भारतात
फॅसिझमची बीजे
आहेत



अगदी चार शब्दांत फॅसिझमचे वर्णन करायचे झाले तर हिंसक अहंकार आणि इतरांविषयी तिरस्कार, असे करता येईल. या अहंकाराचा आणि तिरस्काराचा साक्षात प्रत्यय भारतात हजारो वर्षांपासून हजारो लोकांना येतो आहे. अस्पृश्यता म्हणजे या अहंकाराचे आणि तिरस्काराचेच एक भयंकर रूप आहे. फॅसिझम म्हणजे भारतीयांच्या वर्णवादाची नवी आवृत्ती; आणि फॅसिझमचे तत्त्वज्ञान म्हणचे वर्णवादाचा पुरस्कार करणारे नव्या परिभाषेतले हिंदू तत्त्वज्ञान. परमेश्वर आणि त्याचे सर्वश्रेष्ठत्व मान्य केले की पुरुषोत्तम, प्रेषित, अवतारी पुरुष, अवतार, परमेश्वराचे प्रियत्व व प्रतिनिधित्व प्राप्त झालेले महाभाग मान्य करावे लागतात; आणि असे मान्य केले की ज्येष्ठ आणि कनिष्ठ, उच्च आणि नीच हेही मान्य करावे लागते. ईश्वर, परमात्मा मान्य केला की आत्म्याचे सातत्यही मान्य करावे लागते. तसेच हीन, पापी, आत्मा मान्य करावा लागतो. म्हणजेच श्रेष्ठ व पुण्यात्माही मान्य करावा लागतो. पाप-पुण्य, ज्येष्ठ-

कनिष्ठ, उच्च-नीच ही विषमता मान्य करावी लागते.

अहंकार आणि तुच्छता हा पाया

विषमतेचा पुरस्कार करण्यासाठी वर्णवादी हिंदू तत्त्वज्ञानाने कर्म, पुनर्जन्म, पूर्वकर्म, पूर्व-पाप, पूर्वपुण्य इत्यादी संकल्पनांचा शोध लावला. ईश्वरी न्यायबुद्धीच्या अनुसार माणसाला जन्म मिळतो. त्या जन्मात मिळणारे सुख, सन्मान, समृद्धी, श्रेष्ठत्व हे पूर्व-जन्माच्या पुण्याचे फळ असते. ज्यांनी पूर्वजन्मी पुण्याच्या राशी निर्माण करून ठेवल्या आहेत त्या पुण्यवंतांनाच पवित्र कुळात, मोठ्या कुळात जन्म मिळतो, आणि तोच पूर्वपुण्याईवर, ईश्वरी कृपेच्या जोरावर सर्व सुखे भोगण्याचा अधिकारी असतो. परंतु ज्याने पूर्वजन्मी पापाच्या राशी रचल्या आहेत त्यांना दुःख, दैन्य, दास्य व अस्पृश्यत्व मिळाले आहे. अस्पृश्यता चिरंजीव राहण्याचे कारण हे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञाना-तूनच भारतीय संस्कृती आणि भारतीय मने तयार झालेली आहेत. अहंकार, तुच्छता, वैर, मत्सर, द्वेष, दुःख, दैन्याबद्दल, दुःखी, कष्टी लोकांबद्दल उपेक्षा ही भारतीय मनाची व संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. यामुळेच अस्पृश्यतेविरुद्ध आदिवासींच्या पशुतुल्य जीवनासंबंधी एकही आवाज भारतीय धार्मिक व ललित साहित्यात उठलेला दिसत नाही ! अनेक संत, महंत आणि महात्मे आले, पण कोणीही सामाजिक दुःखाविरुद्ध, सामाजिक विषमतेविरुद्ध, वैचारिक अथवा सशस्त्र लढा केलेला नाही. सेवाभावनेने कोणीही दलित, उपेक्षित, वंचित, स्त्री व शूद्र यांच्यासाठी संस्था अथवा संघटना केलेल्या नाहीत. हजारो वर्षांत अगणित संत, महात्मे, बुद्धिवंत पंडित, महापंडित कवी, महाकवी आले; पण कोणीही या तत्त्वज्ञानाच्या एखाद्या संकल्पनेविरुद्ध आवाज उठवला नाही. कुणाच्याही बुद्धीला एकाही संकल्पनेची व्यर्थता जाणवली नाही.

म्हणजे सर्वजण हे विषमतेचा पुरस्कार करीत होते, हे सर्वच निष्ठुर सुलतानी सत्तेचे सेवक होते असे म्हणता येत नाही, तरीही त्यांनी स्त्री-शूद्र, अतिशूद्रांची दुःस्थिती मान्य केलेली होती. कारण त्यांचे मन तसे घडवलेले होते. एके काळी सोशालिस्ट-कम्यु-निस्ट तत्त्वज्ञान मान्य करणारा जर्मन माणूस फॅसिस्ट होऊन वंशवादी कसा झाला याचे उत्तर इथे आहे.

तात्त्विक बैठक फॅसिझमला सोयीची

मानवेन्द्रनाथ रॉय यांनी आपल्या पुस्तकात व ठिकठिकाणी केलेल्या भाषणांत भारतीय तत्त्वज्ञानाची फॅसिझमबद्दलची अनुकूलता स्पष्ट केलेली आहे. त्याचप्रमाणे डॉ. बाबा-साहेब आंबेडकर यांनीही या वर्णवादी, विषमतावादी तत्त्वज्ञानाचा, त्यातून निर्माण झालेल्या समाजव्यवस्थेचा आणि अर्थव्यवस्थेचा सतत निषेध केलेला आहे. तरीही वर्णव्यवस्था व वर्णव्यवस्था मान्य करणारे मन, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था अजूनही अस्तित्वात आहे. भारतामध्ये फॅसिझम हा जर्मनीप्रमाणे भांडवलशाहीच्या

गरजेतून येईल असे वाटत नाही. परंतु फॅसिझम आलाच तर तो वर्णव्यवस्था आणि तिचा इतिहास मानणाऱ्या वर्गाकडून येण्याची शक्यता आहे. या वर्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा हा सामाजिक क्रांतीचा लढा होऊ दिला नाही. या वर्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा सामाजिक लोकशाहीत विकसित होऊ दिला नाही. या वर्गाने सर्व लढे वेगवेगळ्या परिघामध्ये ढकलून दिले आणि देशाला सामर्थ्यशाली व अभिनव करू बघणारे विचार व कार्य एकाकी पाडले. त्यामुळे स्वातंत्र्याचा लढा लढत असताना जे महामंथन होणार होते आणि त्यातून स्त्री-शूद्र यांना केंद्र करून येणारे स्वातंत्र्य, त्यांनी जे हजारो वर्षांपासून सत्ता, संपत्ती आणि श्रेष्ठत्वाचे स्वामी होते त्याच वर्गाच्या आणि वर्णाच्या स्वाधीन केले.

धर्म-संस्कृतीत फॅसिझमची बीजे

हजारो वर्षांपासून अस्पृश्य आहेत, आदिवासी आहेत, आणि स्त्रीबद्दलचा तुच्छतावाद आहे; याचा अर्थ असा आहे की, फॅसिझमची मनोभूमिका इथे धर्म, संस्कृतीने तयार करून ठेवलेली आहे. म्हणून लोकशाही वर्णव्यवस्था आणि मनुस्मृती या परस्परविरोधी सत्ता, विचार आणि आचारपद्धती अस्तित्वात आहेत. विजय कोणाचा व्हावा याचा विचार दलित जनता जसा करील त्याचाच विजय होणार आहे. समाजवाद, लोकशाही यांचा पुरस्कार दलितांचे अग्रदल असलेल्या आंबेडकरी चळवळीने केलेला आहे. लोकशाही समाजवादाचे महान पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांतून, 'स्टेट्स् अँड मायनारिटीज' या पुस्तकातून लोकशाही समाजवादाची मूलभूत तत्त्वे हिरिरीने मांडली आहेत. अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचा लढा करणे याचाच अर्थ सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व मानसिक परिवर्तनाचा लढा करणे होय. बाबासाहेबांनी या सम्यक क्रांतीचा आरंभ करून ठेवलेला आहे, एवढेच नव्हे तर भारतीय लोकशाहीला वर्णव्यवस्थेची बैठक मिळू नये, आणि जातिभेदातून वाढणारी व जातिभेद टिकवणारी लोकशाही राहू नये म्हणून त्यांनी लोकशाहीला वर्णवादाविरुद्ध असलेली अनात्मवादी, अनीश्वरवादी, बुद्धिप्रामाण्यवादी परंपरा देण्यासाठी बौद्धधर्माची पुनःस्थापना केली. लोकशाही समाजवादाची राखणदारी करण्याची जबाबदारी अशा तऱ्हेने दलित जनतेच्या शिरावर बाबासाहेबांनी टाकलेली आहे, या जबाबदारीचा अंगीकार दलित जनतेशी संबंध असलेल्या दलित साहित्याने केलेला आहे.

साहित्य कधी दलित नसते आणि साहित्याचा नायक होणारा माणूसही दलित नसतो. हे ठाऊक असूनही दलित–साहित्य हे नाव घेतले गेले आहे. ज्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःला अस्पृश्य–दलित म्हणवून घेत होते, अथवा ज्याकरिता भगवान बुद्धांचे मत प्रतिपादित होते आणि ज्याकरिता अनेक क्रांतिकारक धर्मसत्तेच्या व दंडसत्तेच्या विरोधात देशोदेशी उभे ठाकले होते त्याचकरिता दलित साहित्य हे नाव धारण केले आहे आणि आपली प्रतिबद्धता व वामत्व सिद्ध केले आहे.

आता एक लघुतमकथा सांगून हा लेख संपवत आहोत :

महाराष्ट्र शासनाने अस्पृश्य अनुसूचित नोकरदारांच्या संदर्भात एक जी. आर. अलीकडेच प्रकाशित केला आहे. तो जी. आर. वाचून एका सरकारी कचेरीतील कारकून मंडळींनी आणि अधिकाऱ्यांनी छळ करून एका मागासवर्गीय तरुणाला आत्महत्या करण्यास भाग पाडले.

' या आंबेडकर,' ' या जगजीवनराम ! '

' साले आमचे नशीब गांडू, म्हणून आम्ही महार झालो नाही ! '

' झालो असतो तर मॅट्रिक पास झाल्याबरोबर नोकरी आणि दुसऱ्या वर्षी ऑफिसर '

अशा अनेक कथा, अनेक संवाद अनेक ऑफिसांतून रोज घडत आहेत आणि केवळ इथे जन्म घेतला म्हणून अवमानाचे, उपेक्षेचे, दुय्यम दर्जाचे नागरिकत्व दलितांना सहन करावे लागते आहे. संहार तेव्हाही होत होता, आताही होतो आहे. आता हत्यारे फक्त दिसत नाहीत, पण ती बाहेर येणार नाहीत याची शाश्वती देण्याएवढी लोकशाही व समाजवाद समर्थ आहेत असे वाटत नाही. लोकशाही समाजवादाचे मानसीकरण, सांस्कृतीकरण झाले तरच ही स्थिती पालटू शकेल.

•

मराठवाडा
जातीय दंगल :
एक शोध



१. दुसऱ्या जातीबद्दल तुच्छता आणि तिरस्कार आणि स्वजातीबद्दल प्रेम आणि अहंकार, हे हिंदु–मानसिकतेचे वैशिष्ट्य आहे.

दुसऱ्या जातीचा माणूस वरचढ झाला तर त्याच्याबद्दल वैरभाव आणि स्वजातीचा माणूस महत्पदाला चढला तर त्याच्याबद्दल प्रेमादरभाव हेही हिंदु मानसिकतेचेच वैशिष्ट्य आहे.

स्वप्रेम आणि परद्वेष ही पशूची आणि गुहामानवाची वैशिष्ट्ये आहेत. जातीव्यवस्थेमुळे हिंदू माणूस मानसिक दृष्ट्या गुहाजीवनाच्या जवळपास आहे. याला अपवाद उच्चवर्णातले जसे नाहीत; तसे नीचवर्ण मानले गेले आहेत त्यातीलदेखील नाहीत.

२. दुसऱ्याबद्दल तुच्छता, तिरस्कार आणि स्वकीयाबद्दल प्रेम आणि अहंकार, दुसऱ्याच्या विकासाबद्दल द्वेष, तिरस्कार व वैरभाव व स्वकीयाबद्दल प्रेमादरभाव ही हिंदू मनःस्थितीची लक्षणे आहेत. हिंदू माणूस (जो जात जपतो तो) नेहमी या युद्ध मनःस्थितीत असतो.

३. त्याने नेहमी जातीत जगावे म्हणजे

जातीशी भांडावे असे ज्यांनी हिंदू धर्माची रचना केली त्यांना वाटत होते. आणि हिंदू माणसे नेहमी भांडत राहिली, जाती जपीत राहिली.

४. जी माणसे नेहमी अशी युद्ध मन:स्थितीत असतात त्यांना भूतकाळ फार प्रिय असतो. इतिहास-पुराणांचा ते सदैव गौरव करतात. पूजन करतात. कारण ते ज्यांचा द्वेष, तिरस्कार करतात, ते ज्यांना हीन, नीच समजतात ते इतिहासात, पुराणात कोणी नव्हते. पण ते वीर मात्र होते. गुरू होते. राजे महाराजे होते. ग्रंथकार होते. महाकवी, आणि देवही होते. आज देवळात आणि काव्य-नाटकांत, ग्रंथांत-पोथी पुराणांत असलेली नावे, वंश, कुल, यांच्याशी ते गोत्र जमवतात.

५. अशी पुराणांत आणि भूतकाळात पळणारी, जुन्या पुराण्या हिरोवर प्रेम करणारी, व त्यांची पूजा करणारी माणसे आधुनिकतेचा स्वीकार करू शकत नाहीत. लोकशाही समाजवाद तुच्छ, तिरस्कृत, उपेक्षित-वंचितांना जवळ करणारी तत्त्वज्ञाने आणि राजकारणे त्यांना अप्रिय असतात. शत्रुवत वाटतात. ती नष्ट करून टाकावीत अशी त्यांची मनोधारणा असते.

६. ही पराभूत मनोवृत्तीची माणसे लोकशाहीचा विकास जर सामाजिक लोकशाहीकडे, जनतेच्या लोकशाहीकडे होऊ लागला तर ते हुकुमशाहीचा स्वीकार करतील.

आणि समाजवादी डावी चळवळ जर वाढू लागली तर ते फॅसीझम आणून बसवतील.

फॅसीझम दुसरे तिसरे काही नसून हिंदूंची वर्णव्यवस्थाच आहे. फक्त वर्णव्यवस्थेतील उच्च वर्णीयांच्या हातात सर्रास राज्ये आली आणि त्यांनी कत्तली सुरू केल्यात की फॅसीझम सुरू झाला आहे असे समजावे.

७. देशात गेल्या वर्षभरात बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्रातील मराठवाड्यातल्या दलितांवर (सामाजिक) अमानुष अत्याचार झालेत. आणि शासनयंत्रणेने बघ्यांची भूमिका बजावलेली आहे.

हरिजनांवर (सरकारी शब्द) झालेले हल्ले युद्धसदृश हल्ले आहेत. ते का केले ? ही पुढील युद्धाची रंगीत तालीम आहे काय ? प्रतिकार किती होतो हे अजमावून पाहिले जाते आहे काय ?

८. राजकीय लोकशाहीचा विकास कोणत्या वर्गाच्या दिशेने होणार आहे, कोणता वर्ग विचाराचा आणि कार्यक्रमाचा केंद्र होणार आहे, दलित श्रमिकवर्ग लोकशाहीच्या विकासात केवढे महत्त्वाचे कार्य करणार आहे, हे सिद्ध झाले तर ह्या हल्ल्याचे निराकरण होणार आहे. आणि नजीकच्या काळातच या प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत.

९. लोकशाही आणि वर्णव्यवस्था ह्या परस्परविरोधी शक्ती आहेत. दोन्ही शक्तींच्या मागे राजकारण आहे. तत्त्वज्ञान आहे. आणि म्हणून वर्गीय-वर्णीय कार्यक्रमही आहे त्यामुळे दोन्हीच्या पाठीमागे जनसमुद्रही आहेत.

लोकशाहीचा विकास व्हायचा असेल तर वर्णव्यवस्था, तिची वैचारिकता मृतवत झाली पाहिजे.

१०. आणि वर्णव्यवस्था जातिभेद टिकवायचे असेल तर लोकशाही गतिशून्य झाली पाहिजे. ज्यादा से ज्यादा राजकीय राहिली पाहिजे.

लोकशाही राजकीय राहिली, तिची संवेदनक्षमता कमी करीत नेली तर वर्णव्यवस्था आणि राजकीय लोकशाही गुण्यागोविंदाने राहू शकतात.

११. त्यासाठी आदिवासी, अस्पृश्य इतर मागासलेले हे लोकशाहीला गतिमान करणारे, लोकशाहीचा विकास सामाजिक लोकशाहीकडे, जनतेच्या लोकशाहीकडे करणारे जन–विभाग आहेत. हे जनविभाग असंघटित, दुर्बल, परस्पर विरोधी असणे आवश्यक असते. त्यांच्यात जर युद्ध, दंगे, धांदली झाल्या, त्यांच्या संघटना फोडून टाकण्यात आल्या तर लोकशाहीला गती येत नाही. वर्णव्यवस्था नष्टही होत नाही. प्रस्थापित वर्ग ह्या कारवाया करीत असतो. दलित श्रमिकांच्या चळवळी संघटना पदभ्रष्ट करीत असतो. दुर्भंगवीत असतो.

१२. अस्पृश्य, आदिवासी, इतर मागासलेल्या जाती–जमाती आणि श्रमिकवर्ग असंघटित, वेगवेगळ्या संघटनांत विखुरलेल्या आहेत. अन् म्हणून राजकीय लोकशाहीला गतिमान करणारा रेटा तो देत नाही.

म्हणून लोकशाहीचा विकास होत नाही आणि वर्णव्यवस्था नष्ट होत नाही.

१३. वर्णव्यवस्था आणि तिची वैचारिकता नष्ट झाल्याशिवाय अस्पृश्यता आणि तिच्याबरोबर असलेली हीनता नष्ट होत नाही म्हणून वर्णव्यवस्था आणि तिची वैचारिकता नष्ट केली पाहिजे.

अस्पृश्य मानल्या गेलेल्यांनी अस्पृश्यता नाकारली म्हणून जशी अस्पृश्यता जात नाही, वर्णव्यवस्था नष्ट होत नाही, तर स्पृश्यांनीही स्पृश्यता नाकारली म्हणजे अस्पृश्यता आणि स्पृश्यताही नाकारली जाते. नष्ट होते.

१४. पण स्पृश्यता नाकारणाऱ्यांची संख्या अल्प आहे. ज्यांनी अस्पृश्यता नाकारली आहे त्यामध्ये बुद्धिवादी म्हणजे सोशालिस्ट, कम्युनिस्ट, लोकशाहीवादी, सुधारणावादी इत्यादी लोक आहेत.

पण स्पृश्यतेचा आणि अस्पृश्यांचा धार्मिक नीतीने पुरस्कार करणारे अनेक आहेत.

१५. सामाजिक व आर्थिक विषमता व अस्पृश्यता हा हिंदुधर्माचा–समाजाचा–आत्मा आहे. विषमतेचा पुरस्कार हिंदुधर्म, कर्म–पुनर्जन्म, पूर्वकर्म, पाप–पुण्य, दैव, विपत्ती, ग्रहगोल इत्यादिकांच्या आधारे करतोच.

पण सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हिंदूंचे सर्व पूजनीय देव, गुरू, मुनी, ऋषी, आचार्य, संत, राजे–महाराजे, संस्कृत काव्यातले, नाटकांतले नायकही विषमतेचाच पुरस्कार करतात. ही ईश्वरीय निर्मिती आहे असे प्रचारितात. विषमतेचाच या देशात इतिहास आहे. पुराण आहे. पुराणपुरुष आहेत. समतेला मात्र कसलाही आधार नाही. एकही देव, एकही संत, पंडित अथवा दंडुका हातात असलेला हिंदू राजा समतेचा समर्थक म्हणून पुढे आलाच नाही.

त्यामुळे सामान्य माणूस जो ज्यांची पूजा करतो, ते देव, ते संत, ते ग्रंथ जर विषमतेचे समर्थन करतात तर सामान्य माणूसही विषमतेचे समर्थन करतो. कारण हे संस्कार त्याचे मातृसंस्कार असतात. लोकशाही–समाजवाद ही तत्त्वे त्याच्या बुद्धीची करामत असते. मनाच्या घरात हे भांडेकरू नंतर येतात, सर्वात आधी येऊन घर व्यापून घेते विषमता, अस्पृश्यता, स्पृश्यता, परजातीबद्दलचा तिरस्कार, स्वजातीबद्दलचा अहंकार आणि जातीय वैर.

१६. म्हणून स्पृश्यता नाकारणारे हे वर आलेले बुद्धिवादी सोडून दिले तर बाकीची तमाम जनता स्पृश्यता, अस्पृश्यता आणि विषमता ईश्वरीय देणे आहे असे मानणारीच आहे.

१७. पण अस्पृश्यता नाकारणारे अस्पृश्य हे मात्र शंभर टक्के आहे. कारण अस्पृश्यतेचा स्वीकार केला तर दैन्य, दारिद्र्य, दुःख आणि दुर्दैवाचा अंगीकार करावाच लागतो. हिंदुधर्माने आणि हिंदू दंडसत्तेने आणि म्हणून धर्मावलंबी असलेल्या हिंदू आर्यसत्तेने अस्पृश्यांना दैन्य, दास्य, दुःख, दुर्दैवच मिळाले पाहिजे असेच त्याचे स्थान तयार करून ठेवलेले आहे. क्वचितच त्याच्याकडे द्रव्य आले, शहाणपण आले, ज्ञान आले तर त्याला ठार करून त्याचे द्रव्य व ज्ञान लुटून नेण्याचा अधिकार राजपुरुषांना दिलेला आहे. अन् तो प्रतिज्ञापूर्वक अमलात आणला जात होता हे शंबूक, एकलव्य इत्यादी अपवादाच्या हत्या करून जसे सिद्ध होते तसेच भारतीय जनतेच्या एकपंचमांश लोकसंख्या असलेल्या या जनतेतून एकही विद्वान, वीर पुरुष वर आलेला नाही. काव्य-नाटकाचा नायक झालेला नाही. देवळात देव होऊन बसलेला नाही. (अर्थात सर्व देव आणि काव्य-नाटकांचे हिरो राज्यकर्ते शासकच आहेत.) (गम्मत अशी की हिंदू, मुसलमान, ख्रिस्तांचा देव पिता आहे. अन् हिंदूंचे देव अथवा देवता शासक आहेत. आज्ञा करणारे आणि मानणारे.)

१८. अस्पृश्यातून पुढे आलेले पहिले महापुरुष-महापंडित म्हणजे डॉ. आंबेडकर हे आहेत. पण केव्हा ?

जेव्हा हिंदू सत्ता पूर्ण पराभूत झालेल्या होत्या, तेव्हा.

विषमतेचे समर्थन करणाऱ्या हिंदू वर्णवादी वैचारिक सत्तेवर लोकशाहीच्या विचाराने जबर प्रहार सुरू केले होते.

उत्पादन–संबंध बदलले होते. नवे वर्ग, नवी औद्योगिक शहरे उदयाला आली होती. नेटिव्हा–एतद्देशीयांच्या हातात स्वराज्य अजून पडले नव्हते आणि राज्य परकीयांचे होते म्हणून गुणी व्यक्तीला वर येण्याच्या वाटा वर रोखल्या गेल्या नव्हत्या. त्या काळात डॉ. आंबेडकर उदयाला आले.

१९. ब्रिटिशांनी हिंदुस्थान जिंकले असते अन् फक्त हत्यारे आणि हत्यारे वापरणारे सैनिक वा अधिकारीच आणले असते तर बाबासाहेबांचा उदय होऊ शकला नसता.

बाबासाहेबांचा उदय झाला त्याला कारण झाला ब्रिटिशांनी आणलेला लोकशाहीचा विचार. प्रत्येक व्यक्तीला शिकण्याचा हक्क आहे हे मान्य करणारा विचार.

या लोकशाही प्रवृत्तीमुळेच बाबासाहेब शिकू शकले, पुढे येऊ शकले, नेते होऊ शकले आणि अस्पृश्यांचे हजारो वर्षांनंतर पहिले राजकीय संघटनही बांधू शकले ते लोकशाही-मुळेच. पुढे ते मागण्या करू लागले, हक्क मागू लागले, मिळवू लागले, कायदे करून घेऊ लागले तेही लोकशाही होती म्हणून. बाबासाहेबांच्या चळवळीतून आणि विचारा-तून अनेक तरुण शिकू लागले, पुढे येऊ लागले, नोकरी–धंद्यात लागू लागले आणि हजारो वर्षांनंतर दोन पैसेही गाठीला बांधू लागले तेही लोकशाहीमुळेच.

लोकशाहीमुळेच हिंदूंमधील अनेक लोक बाबासाहेबांच्या चळवळीला पाठिंबा देऊ शकले.

२०. अगदी तेव्हापासून तो आतापर्यंत वर्णव्यवस्थेने दडपून टाकलेल्या लोकांतील काहींचा जो विकास झाला, होतो आहे, त्याला कारण लोकशाही आणि यंत्र–तंत्राचा–विज्ञानाचा विकास हे होय.

म्हणून वर्णव्यवस्थेने दडपून टाकलेला समाज लोकशाहीच्या कट्टर पुरस्कारात आणि वर्णव्यवस्थेच्या कट्टर विरोधात आघाडीवर असतो.

लोकशाहीमुळेच त्याला वर्णव्यवस्थेने नाकारलेले माणसाचे मूलभूत हक्क मिळू शकलेत. लोकशाहीमुळेच सत्ता, राजकारण, अर्थकारण, कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत काही मूठभर लोक चमकू लागले आहेत. लोकशाही नसती तर शंबूकाप्रमाणे त्या सर्वांच्या सर्रास कत्तली वर्णव्यवस्थेच्या समर्थकांनी केल्या असत्या अन् ह्या सामूहिक हत्या-

कांडाला धर्माचा पाठिंबा असता. कारण पूर्वी असे हत्याकांड झालेले आहे. दलितातून वर आलेल्या चमकू लागलेल्या व्यक्ती मारलेल्या आहेत आणि ज्या ग्रंथात ह्या कथा आहेत ते ग्रंथ हिंदूंना पूजनीय आहेत.

म्हणून वर्णव्यवस्थेने दडपून टेवलेल्या अस्पृश्यांना लोकशाही ही प्राणवायूप्रमाणे जगण्यासाठी अत्यावश्यक आहे.

२१. पण लोकशाहीला तीस वर्षे होत आली तरी लोकशाही अजूनही राजकीयच लोकशाही आहे. ती सामाजिक लोकशाही होत नाही. ती जेव्हा सामाजिक लोकशाही होते तेव्हा ती प्रत्येकाच्या शिक्षण, नोकरीचा, अन्न, निवाऱ्याचा प्रश्न सोडवीत असते. तेव्हा जमिनीची आणि उद्योगधंद्यांची वेगळी वाढ होत असते आणि नफ्याचा विनियोग लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी झालेला असतो.

सामाजिक लोकशाहीचा विकास समाजवादी समाजरचनेपर्यंत होत जातो. राजकीय लोकशाहीचा विकास अशा प्रकारे व्हावा म्हणून अस्पृश्य आदिवासी आणि इतर दडपलेले वर्ग आंदोलने, संघर्ष करीत राहणार.

सामाजिकदृष्ट्या दलित असलेला समाज तर भाषा, आचार, विचार, लोकव्यवहार, सणवार इत्यादींमध्ये असलेल्या वर्णव्यवस्थेला घालविण्यासाठीही चळवळी करणार. कारण ह्या कार्यातूनच त्याचे वर्णव्यवस्थेने लुबाडलेले माणूसपण पूर्ण प्रस्थापित होत असते.

म्हणून त्याच्या चळवळी जशा सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, आर्थिक असतील, तशाच देशाचे औद्योगिक धोरण, उत्पादन वेगासंबंधीचे धोरण, अन्न-उत्पादन, साधनाच्या मालकीसंबंधीचे धोरण काय असावे हे सांगणाऱ्याही पण असणार आहेत.

२२. पण लोकशाहीचा इतका विकास, इतक्या वेगाने विकास आणि लोकशाहीचा कला साहित्यामध्ये प्रवेश वर्णव्यवस्थेविरोधी असतो; म्हणजेच विषमतेच्या विरोधी असतो. आणि जे विषमतेच्या विरोधी असते, ते हिंदुधर्माच्या विरोधीही असतेच.

भारतातील बहुसंख्य जनता तर हिंदुधर्माला मानते. जातीत जगते. निवडणुकींमुळे तर जाती संघटित होऊ लागल्या. बहुसंख्याकांची जात ज्या पक्षात जाईल तो पक्ष मोठा होतो. महाराष्ट्रातील काँग्रेस मराठा-जातीचा पक्ष-काँग्रेसची सत्ता म्हणजे मराठ्यांची सत्ता-देशभर तिथल्या बहुसंख्याक आणि आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या जातीच सत्तेवर जातात.

आणि ज्या आज जाती सबळ पुढारलेल्या आहेत त्यांना वर्णव्यवस्थेने सत्ता, संपत्ती, शिक्षण घेण्याचे अधिकार दिले होते. म्हणूनच त्या सबळ, पुढारलेल्या झालेल्या आहेत. त्यांच्याच हातात अर्थसत्तेच्या नाड्या आहेत. त्यांच्याच मांडीखाली प्रचार प्रसाराची राष्ट्रव्यापी साधनसामग्री आहे. आणि त्यांच्याच हातात शासन-यंत्रणाही आहे.

राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीपर्यंत विकसित होऊ नये असे ज्यांना स्वभावतःच वाटते तेच वर्ग–तेच वर्ण सत्ता, शिक्षण–संस्था, अर्थ–सत्ता, शासन–यंत्रणा मुठीत घेऊन आहेत.

आणि ज्यांना राजकीय लोकशाहीचा सामाजिक लोकशाहीपर्यंत विकास व्हावा असे वाटते ते वर्ग आणि वर्ण तर असंघटित आहेत, जाती–जातीत व जमातीत विभागलेले आहेत. आर्थिक व संख्यात्मकदृष्ट्या दुर्बल आहेत.

पण त्यांना लोकशाहीचा विकास होणे जगण्यासाठी, अस्तित्वासाठीच हवे आहे. आणि लोकशाहीचा विकास मागणे म्हणजे वर्णव्यवस्थेच्याविरुद्ध युद्ध पुकारणे आहे. वर्णव्यवस्थेला मृत्यू मागणे आहे.

२३. म्हणून वर्णव्यवस्थेचे समर्थक विषमतेचे–सामाजिक–आर्थिक विषमतेचे पूजक, जमिनीचे मालक, एका बाजूला आणि ज्यांना लोकशाही हवी आहे ते, तिला सामाजिक लोकशाहीमध्ये परावर्तित करू पाहणारे एका बाजूला–अशा दोन फळ्या भारतीय ग्रामीण समाजात पडलेल्या आहेत.

आणि दोन्ही फळ्यांत बळाची, संख्येची, हत्यारांची अजिबात समानता नाही आणि म्हणून सबळ, पुढारलेल्या वर्णवादी–विषमतावादी फळीने हमला केला की लोकशाहीवादी फळी मार खाते. कारण अर्थसत्तेचा आणि शासन–यंत्रणेचा मूक पाठिंबा ह्या विषमतावादी–वर्णवादी शक्तीलाच असतो कारण त्यांचा वर्ग आणि स्वार्थ समान असतो.

२४. देशभर खेड्या–खेड्यात, मतामतात हे लोकशाही विरोधाचे म्हणजे दलित–आदिवासी अस्पृश्य जनतेच्या विरोधाचे युद्ध चालले आहे.

एका पाणवठ्यावर पाणी भरले म्हणून, देवळात प्रवेश केला म्हणून, शाळेत मास्तर–हेडमास्तर होऊन आला म्हणून, मुलांना कॉलेजात पाठविते म्हणून, माडीचे घर बांधतो म्हणून, मोटार सायकल वापरतो म्हणून, सहकारी शेती करतो म्हणून, पदवीधर झाला म्हणून अन् कॉलेजात टाय लावून पोरांना शिकवतो म्हणून, विधानसभेचे–झेड. पी. चे इलेक्शन लढवितो म्हणून, धंदा करतो म्हणून.

अशा अनेक धार्मिक, सामाजिक, आर्थिक कारणांमुळे भारतातील खेडेन् खेडे खदखदते आहे. अन् मग कोणतेही निमित्त मिळाले की वर्णवादी लोक एकतर्फी युद्ध सुरू करतात. आणि आंबेडकरपूर्वकाळात जसे अस्पृश्य होते त्या दीनदरिद्री अवस्थेत सुधारलेल्या अस्पृश्यांना आदळून देतात.

२५. पण असे प्रकार केरळ अथवा बंगाल राज्यात घडल्याचे ऐकिवात नाही. वर्तमानपत्रातून तसे वाचण्यात आलेले नाही.


तेथेही जाती आहेत. जातिभेद आहे. वर्णव्यवस्थाही आहे. स्पृश्य-अस्पृश्य आहेत. पण तिथे आंध्र शहरासारखे, मराठवाड्यासारखे प्रकार घडले नाहीत. याचे कारण काय असावे ?

जाती–जातीत दंगे व्हावेत, जमाती–जमातीत दंगे व्हावेत, लोक जातीत संघटित व्हावेत आणि जाती युद्धमनःस्थितीत याव्यात, जातीय दंगे व्हावेत, वैमनस्य वाढावे आणि वर्णव्यवस्था याद्वारे अधिक बळकट व्हावी आणि वर्णव्यवस्थेच्या या शत्रुसंस्थांचे सहजीवन सुरू व्हावे असे तिथे कोणालाच वाटत नाही !

•

2 dec
23320
निजाध
2/99

हिंदू साहित्य
व
जातिवाद



एक :

१. प्राचीन भारतामध्ये अस्पृश्यता व जातिभेद का निर्माण झाले ? आणि तेव्हाच्या पुढारलेल्या वा मागासलेल्या अहिंदू जगात का निर्माण झाले नाहीत ? तसे पाहिले तर हिंदू धर्माप्रमाणेच ख्रिस्ती व इस्लाम धर्मातही परमेश्वराने सृष्टी निर्माण केली आहे ही कल्पना मांडलेली आहे. हिंदू धर्माप्रमाणेच आत्मा-परमात्मा, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक आणि ग्रंथप्रामाण्य इत्यादी कल्पना काटेकोरपणे स्वीकारल्या आहेत. तरी तिथे अस्पृश्यता व जातिभेद निर्माण का झाले नाहीत ?

मार्क्स म्हणतो त्याप्रमाणेच तिथेही गरीब-श्रीमंत, शोषक–शोषित हे वर्ग समाजात निर्माण झाले. गरिबांचे हाल व शोषकावरील अत्याचार व शोषण त्या समाजातही तीव्र होत गेलेले आहेत. पण भारतीय हिंदूप्रमाणे तेथे अस्पृश्यता व जातिभेद का निर्माण झाले नाहीत ? ते तीव्र व चिरंजीव का झाले नाहीत ?

२. हिंदू धर्माप्रमाणेच आत्मा-परमात्मा, पाप-पुण्य,स्वर्ग-नरक आणि

शब्दप्रामाण्य इत्यादी गोष्टी मानणाऱ्या ख्रिस्ती आणि इस्लाम समाजात धर्माच्याच प्रेरणेने गोरगरिबांसाठी, दुःखी–पीडितांसाठी सार्वजनिक दवाखाने, अनाथालये, अन्नछत्रे निघू शकली. देवळेच हे सेवाकार्य करण्यास पुढे आली. ख्रिस्ती धर्माने तर ही सेवेची केन्द्रे जगभर उभी केली व शेकडो वर्षे ती चालवून दाखवली. अशी सेवाकेन्द्रे परमेश्वरानेच हे जग आणि जीवसृष्टी निर्माण केली आहे ही कल्पना मानणाऱ्या हिंदू धर्माने का निर्माण केली नाहीत ?

३. जातिभेद हे कारण आहे ? की जातिभेद चिरायू करण्यासाठी निर्माण झालेले कर्मविपाकाचे तत्त्वज्ञान हे कारण आहे ? की परमेश्वर हा पिता न राहता फौजदार बनला, पाप-पुण्याचा हिशेब करून जाती घडवू लागला; ही जातिभेदाची आणि अस्पृश्यतेची तरफदारी करणारी विचारसरणी कारणीभूत झालेली आहे ? की अवताराची कल्पना कारणीभूत आहे ?

मार्क्सला मानवी इतिहासामध्ये वर्गकलह दिसला. उत्पादन-साधनांच्या मालकीवरून संघर्ष झालेले दिसले. तो वर्गसंघर्ष हिंदुभारताच्या इतिहासात दिसत का नाही ? जाती एकवटून वर्ग होण्याऐवजी जाती विभागून पोटजातीचे घनदाट जंगल का निर्माण झाले ?

४. हिंदू धर्म, ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम धर्म तसे बंधू-धर्म आहेत. तिन्ही धर्मांच्या मूलभूत कल्पना सारख्याच आहेत. पण ख्रिस्ती आणि इस्लाम धर्मीय ललित साहित्यात आणि लोककथांत, सणवार-उत्सवात श्रमिकवर्गाला स्थान आहे. पण हिंदू धर्माच्या ललित साहित्यात, लोककथांमध्ये, सणवार आणि उत्सवांमध्ये हिंदू श्रमिकवर्गातील प्रमुख जाती अभावाने आढळतात आणि दलित जाती तर दिसतच नाहीत. याची कारणे काय असावीत ?

५. ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी ख्रिस्ती व हिंदू धर्मांतील पूजनीय ग्रंथांवर आणि धर्मदेहावर आणि परमेश्वरावर ओझरती नजर टाकली पाहिजे.

ख्रिस्ती परमेश्वर प्रेमळ पिता आहे. आदमला त्याने स्वतःची प्रतिकृती म्हणून निर्माण केलेले आहे. आणि आदमच्याच देहातून त्याने इव्हला निर्माण केले आहे. अन् ते दोघेही परमेश्वराला प्रिय आहेत. नंदनवनातील सर्पाचे ऐकून इव्ह ज्ञानफळ आदमला देते. स्वतः खाते. परमेश्वर ह्या अपराधाबद्दल त्यांच्यावर रागवतो. आणि त्यांची पृथ्वीवर हकालपट्टी करतो. त्यांना देहज्ञान झाल्यामुळे त्यांना मुले होतात. आदम–इव्ह हे मानववंशाचे आई-बाप.

पाप वाढते. स्वार्थ वाढतो. संघर्ष वाढतात. हे पाहून प्रेमळ परमेश्वर पिता रागवतो. प्रलय करायचे ठरवितो. पण नोव्हाला सांगतो. माणसावर त्याचे प्रेम आहेच.

नंतर परमेश्वराचा प्रिय पुत्र येशू ख्रिस्त येतो. सृष्टी निर्माण करणाऱ्या परमेश्वराचा

पुत्र-प्रेषित येशू ख्रिस्त श्रमिकवर्गातील एका सुताराचा अन् एका कुमारी मातेचा मुलगा म्हणून जन्माला येतो. विश्वातील एका सर्वोच्च शक्तीचा प्रतिनिधी सुताराघरी जन्म घेतो. मोझेसदेखील गुलामाचा मुलगा. गुलामासाठी संघर्ष करणारा नेता. त्याचा संघर्ष देखील ख्रिस्ती परमेश्वराला मान्य.

ख्रिस्ताच्या शिष्यांमध्ये मजूरवर्गातील, कोळी वगैरे असेच फार लोक होते. ख्रिस्त म्हणतो,

परमेश्वर प्रेमळ आहे. पिता आहे. त्याचा मी पुत्र गोरगरिबांसाठी, पापी, पीडित लोकांच्या उद्धारासाठी आलो आहे. येशू ख्रिस्ताने दीनदलितांमध्ये पाचसहा वर्षे प्रचार केला. त्याच्याभोवती गोरगरिबांची गर्दी वाढू लागली. गोरगरिबांना एकत्र करणारा प्रस्थापित वर्गाला नेहमीच बंडखोर वाटत असतो. ख्रिस्त तसा वाटतो. आणि त्याला क्रुसावर चढवतात.

ख्रिस्ती धर्म-समाज-संस्कृती आणि साहित्याचा पुराण-पुरुष असलेल्या येशू ख्रिस्ताच्या धर्माची तत्त्वे तरी काय आहेत ?

६. परमेश्वर प्रेमळ आहे. तो पिता आहे. आदम इव्हने चूक केली तरी परमेश्वराचे त्याच्यावर प्रेम होते. पश्चात्ताप व्यक्त केला, कबुली दिली की परमेश्वर राग विसरतो. दुःखितांची पीडितांची सेवा केली पाहिजे. सर्वांवर प्रेम केले पाहिजे कारण ती परमेश्वराची लेकरे आहेत म्हणजे आपली भावंडे आहेत. स्वार्थी आणि शोषण करणारे परमेश्वराला अप्रिय असतात.

इतकी सरळ साधी शिकवण ख्रिस्ताची आहे.

प्रेमळ पिता-परमेश्वर, चूक करणारे आदम-इव्ह व पुरुषाला चूक करण्यास प्रवृत्त करणारी स्त्री, प्रलय, आणि नोव्हाला सांगून सृष्टीचे संरक्षण, आणि माणसाला क्षमा, पश्चात्तापाची अपेक्षा, ख्रिस्ताची गोरगरिबांबद्दलची, पापी–पीडितांबद्दलची प्रेम, करुणा. ही सूत्रे ख्रिस्तधर्मीय साहित्याची पौराणिकता झाली.

७. उत्पादन–साधनांच्या विकासक्रमाने समाजात वर्ग पडले. शोषण, युद्धे, पिळवणूक, तुरुंग, शासनयंत्रणा ही वर्गसमाजाची वैशिष्ट्ये ख्रिस्ती समाज आणि संस्कृतीत इतिहासक्रमाने आली. वर्गकलह उसळत राहिला. शेतकऱ्यांची आणि गुलामांची बंडे उसळत राहिली. पण ह्या दलित श्रमिक जनतेच्या बंडाला गतिरोधक म्हणून ख्रिस्त उभा राहिला नाही. धर्मसंस्था आणि तिचे अधिकारी, ख्रिस्त आणि त्याची वचने प्रस्थापितांच्या स्वार्थासाठी वापरत होते. वापरतात. पण बंडखोरही ख्रिस्तांचा आधार घेऊ शकत होते. कारण त्यांचे बंडच मुळी जोरजुलुमाच्या प्रतिकारातून जन्मलेले होते.

८. खिस्त असा, खिस्ती धर्म असा आणि खिस्ती परमेश्वर प्रेमळ पिता असल्यामुळ खिस्ती धर्मीयांच्या ललित साहित्यात श्रमिकवर्ग, त्याचे दुःख, दैन्य, त्यांची बंडे, कलाकृतीचा, अभिजात कलाकृतीचा–विषय होऊ शकली. कारण खिस्ती समाज–संस्कृतीचा पुराणपुरुषच गोरगरिबांच्या बाजूचा होता.

खिस्ती परमेश्वराने आदम–इव्हची चूक असूनही त्यांना क्षमा केली. ही क्षमादेखील साहित्य आणि अनेक लोकोपयोगी संस्था निर्माण करण्यास कारणीभूत झाली.

पण खिस्ती परमेश्वराच्या पुत्राला–आदमला–इव्ह ज्ञानफळ खायला देते आणि परमेश्वराच्या आज्ञेचा भंग करते. ही गोष्ट खिस्ती साहित्य आणि समाजात स्त्रीला दोषी ठरविण्यास, तिचा दर्जा कमी करण्यास आणि ती टीका, निंदा–निर्भत्सनेचा विषय करण्यास कारणीभूत झाली.

तसेच स्त्री कामतृप्तीसाठी काय वाटेल तो धार्मिक, नैतिक गुन्हा करू शकते ही समजही रूढ झाली. ही समजही अनेक शोकनाट्ये अजरामर करण्यास कारणीभूत झाली.

९. आदम–इव्हने केले ते पाप नव्हते. आज्ञाभंग नव्हता. असे बायबलने म्हटले असते तर स्त्रीला समाजात पुढारीपण मिळाले असते आणि अनेक अमर शोकनाट्यच लिहून झाली नसती.

पण पुरुषाला नंदनवनातून स्वार्थाच्या, संघर्षाच्या जंजाळात ओढून आणणारी स्त्री आहे असे म्हटल्यामुळे अनेक शोकनाट्यांची आधारशिला स्त्री झाली. जशी हॅम्लेटची आई.

१०. खिस्ती समाज आणि साहित्याचा पुराणपुरुष येशूखिस्त गोरगरीबांना आपल्या करुण कवेत प्रेमाने कवटाळीत होता म्हणून दलित, श्रमिक, शेतकरी वाङ्मयाचे विषय झाले. लेखक, कवींना कार्लमार्क्सच्या आधी फारच महान आधार मिळाला. प्रत्यक्ष परमेश्वराचा. प्रत्यक्ष गोरगरिबांसाठी क्रुसावर चढणाऱ्या परमेश्वराच्या प्रिय पुत्राचा.

पण हिंदू साहित्यात असा आधार मिळत नाही. हिंदूचा प्रत्येक देव विषमतेचा पुरस्कार करतो. अगदी ऋग्वेदापासून पाहिले तरी ' तसा ' आधार मिळत नाही.

११. भारतीय हिंदू साहित्यामध्ये वेदांना अत्युच्च स्थान आहे. ते अपौरुषेय आहेत. परमेश्वराने रचले आहेत. असे हिंदू मानत आले आहेत. असे परमज्ञान कोणी माणूस प्रकट करू शकत नाही. म्हणून प्रत्यक्ष परमेश्वराने सांगितलेल्या वेदांचा अभ्यास करण्याचा जे पवित्र आहेत त्यांनाच हक्क आहे. आता पवित्र आणि थोर कोण आहेत ? तर ब्राह्मण. बाकीच्यांना वेदाभ्यास करता येणार नाही आणि शूद्र अतिशूद्रांनी तर नुसता शब्द ऐकण्याचा वा उच्चारण्याचा प्रयत्न केला तर त्यांना देहदंडाची शिक्षा ठोठावली आहे.

तिकडे खिस्ताने आणि त्याच्या अनुयायांनी सांगितलेले जीवनाचे ज्ञान सर्वांना ऐकता येते, पण हिंदूंचे परम ज्ञान शूद्र–अतिशूद्राने ऐकले तर देहदंडाची शिक्षा होते. अशा या हिंदू परमेश्वराने अपौरुषेय वेदांमध्ये ज्ञान तरी काय सांगितले आहे ?

१२. तर पंचमहाभूतांचे दैवीकरण केलेले आहे. ही पंचमहाभूते प्रार्थना केली तर अन्न आणि सोमपान करायला येतात. सोमपानाची, अन्नभक्षण करण्याची विनंती वेदातील सूक्तकारांनी वेदांतील देवांना केली आहे. गायी बैलांची खिल्लारे मागितली आहेत. गार्यींना वासरे मागितली आहेत. धनधान्य पुष्कळ असावे. मुले–बाळे पुष्कळ व्हावीत आणि ती देणाऱ्या बायकाही मिळाव्यात अशी वेदाने पंचमहाभूतांना आणि इतर देवतांकडे कळवळून मागणी केलेली आहे. अग्नी, वरुण, मरुत आणि इंद्राची खूप स्तुती केलेली आहे आणि इंद्राशी संघर्ष करणाऱ्यांना अपमानकारक नावांनी संबोधले आहे. त्यांची निंदा निर्भत्सना केलेली आहे. इंद्र आणि इतरांची अपरंपार स्तुती केलेली आहे. हे इंद्राचे आणि अपौरुषेय वेदांचे शत्रू कोण होते ?

१३. संशोधक म्हणतात की, ह्या इंद्राच्या शत्रूंना नद्यांना धरणे बांधता येत होती. कालवे, पाटबंधारे काढून ते शेतात पाणी खेळवीत होते. त्यांचे शेतकीविज्ञान पुढारलेले होते. त्यांची शहरांत मोठमोठी धान्य साठविणारी कोठारे होती. कोठारे भरून निघतील एवढी पिके ते काढीत होते. ते नौकानयनात पारंगत होते आणि दूरदूरच्या देशांत ते व्यापाराच्या निमित्ताने जात होते. त्यांची घरे आधुनिक घरांप्रमाणे सुखसोयींनी युक्त होती. अन् ती भाजलेल्या विटांची होती. त्यांची मोठमोठी आखीव–रेखीव शहरे होती आणि त्यांची समाजात आणि शहरांत वर्गविभागणी झालेली होती. इंद्राला आणि ऋग्वेदाला शत्रुवत वाटणारे लोक सुसंस्कृत आणि पुढारलेले लोक होते.

१४. पण वेदांतील सूक्तकाराने ह्या प्रगत लोकांची स्तुतिस्तवने गायली नाहीत. त्यांनी केलेल्या प्रगतीचा गौरव केलेला नाही आणि प्रगत संस्कृती उद्ध्वस्त करणाऱ्या इंद्राची निर्भत्सनाही केलेली नाही. उलट ते त्याची स्तुती करतात. धरणे, बांध–बंधारे फोडून पूर मोकळे करणाऱ्या आणि शहरे जाळून टाकणाऱ्या पुरंदराचा–इंद्राचा–गौरव करतात.

१५. इंद्राने एक प्रगत संस्कृती उद्ध्वस्त केली म्हणून हिंदुसाहित्यात त्याला केवढे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे ? कालानुक्रमाने आलेले देव त्याचे दरबारी झाले. जेवढे हिंदू देव आहेत त्यांचा तो राजा आहे. अनेक पोथ्यापुराणांतून, काव्य–नाटकांतून तो प्रकटला आहे. प्रत्येक असुराशी, दैत्याशी, राक्षसाशी झालेल्या युद्धाचा तो सल्लागार आहे, सेनापती आहे, मार्गदर्शक आहे. एवढे त्याला हिंदू साहित्यामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे.

इद्राला एवढे श्रेष्ठत्व, अमरत्व, देवाधिदेवत्व का मिळाले असावे ? त्याने अनार्यांची प्रगत संस्कृती उद्ध्वस्त केली म्हणून व आर्यांची यज्ञसंस्कृती स्थापन केली म्हणून ?

१६. हिंदूंच्या सर्व देवदेवतांनी असुरांशी, दैत्यांशी, राक्षसांशी लढाया केलेल्या आहेत. ही युद्धे हिंदू देवदेवतांनी जिंकलेलीआहेत.

प्रत्येक देवदेवतेने असुरांचा, राक्षसांचा द्वेष केला आहे. आर्येतरांचा द्वेष केलेला आहे. आणि ब्राह्मण-क्षत्रियांचे वर्चस्व, श्रेष्ठत्व मान्य केलेले आहे. म्हणजे बाकीच्या हिंदू श्रमिक जातीचे कनिष्ठत्वही मान्य केलेले आहे.

१७. देवत्व प्राप्त होऊनही हे हिंदू देव आर्येतरांचा, असुरांचा, राक्षसांचा, दैत्यांचा एवढा द्वेष का करतात ? ब्राह्मण–क्षत्रियांचे श्रेष्ठत्व का सिद्ध करतात ? देव पक्षपाती का असावेत बरे ?

त्याचे एक कारण असू शकेल. ते असे की बाहेरून आलेले आर्य आणि आदिवासी आर्येतर यांच्यात भूमीच्या मालकीवरून दीर्घकाळ युद्धे चाललेली होती. आणि ही युद्धे बाहेरून आलेल्या आर्यांना अत्यंत महत्त्वाची-पवित्र वाटणे सहज शक्य आहे. जीवन व मरणच त्या युद्धात गुंतलेले होते. पराभव म्हणजे नष्ट होणे किंवा परत जागा शोधीत दिशा धुंडाळीत जाणे. म्हणून ह्या युद्धात विजयी होणाऱ्या नेत्याला आर्यांच्या साहित्यामध्ये कमालीचे महत्त्व येणे, देवत्व प्राप्त होणे शक्य आहे. आर्येतरांचे पराभव आणि आर्यांचे विजय सांगणाऱ्या ह्या कथा व ग्रंथ पूजनीय वाटणेही शक्य आहे. ह्या पूजनीय ग्रंथांत आर्येतरांचे विकृतीकरण होणेही शक्य आहे. सर्व शत्रू दुष्ट, आणि आपले सर्व वीर सद्गुणी, सुष्ट असणेही शक्य आहे.

१८. पण हे साहित्य युद्ध-साहित्य असल्यामुळे ते स्वाभाविकपणेच पक्षपाती असणारच, तसे ते आहेच. आर्य वीरांचे उदात्तीकरण त्यामध्ये आहे. तसेच आर्येतर शत्रूंचे विकृतीकरण आहे.

हिंदूंच्या अनेक धार्मिक ग्रंथांचे स्थान हे युद्धसाहित्यामध्ये आहे आणि ह्या ग्रंथांना धार्मिक महत्त्व आहे. पूजनीयत्व आहे.

एके काळी विजयगाथा म्हणून आणि नंतर देव–विजयगाथा म्हणून.

१९. पण युद्धसाहित्यामध्ये प्रेमाचा, करुणेचा, भ्रातृभावाचा, समतेचा संदेश असू शकत नाही. त्याचप्रमाणे अहिंसेचा, अपरिग्रहाचा आणि संहाराबद्दल संदेह निर्माण करणारा विचारही असू शकणार नाही.

२०. खिस्तचरित्र अन् बायबल हे अनाथालये, शाळा, अन्नछत्रे, दवाखाने काढण्याची प्रेरणा होऊ शकते. अशी प्रेरणा कोणत्या हिंदू देवाने दिलेली आहे ? कोणत्या हिंदू

ग्रथाने दिलेली आहे ? अस्पृश्यतानिवारण्यासाठी झगडलेला कोणता हिंदू देव वा ग्रंथ आहे ? समतेचा पुरस्कार करणारा व विषमतेला विरोध करणारा हिंदू देव व ग्रंथ कोणता आहे ?

२१. अगदी शोधायचे ठरविले तर आपणाला काय आढळेल ?

सर्व हिंदू देव ब्राह्मण-क्षत्रिय आहेत. सर्व वीर विद्वान ब्राह्मण, क्षत्रिय आहेत. सर्व मंत्रद्रष्टे आणि ग्रंथकार ब्राह्मण, क्षत्रिय आहेत. सर्व कवी नाटककार ब्राह्मण, क्षत्रिय आहेत.

सर्व काव्य नाटकांचा विषय व नाटक, सर्व पोथ्या पुराणांचे विषय आणि नायक सर्व देवळांतील देव ब्राह्मण-क्षत्रिय आहेत.

ह्या ब्राह्मण क्षत्रियांचे जन्मदिवस, विवाह, युद्धे, विजय आणि मृत्यू हेच हिंदूचे सणवार आहेत, अथवा उत्सवाचे दिवस आहेत.

२२. एवढेच नव्हे तर समाजजीवनांच्या सर्व व्यवहारांत ब्राह्मण क्षत्रियांनाच प्रामुख्य आहे. सत्ता-संपत्तीचा आणि शिक्षण घेण्याचा हक्क फक्त ब्राह्मण-क्षत्रियांना आहे.

सर्व विशेषाधिकार ब्राह्मण-क्षत्रियांना आहे. ब्राह्मण-क्षत्रियांना सर्वत्र सोयी-सवलती आणि संधी आहेत. अगदी कायद्याच्या दृष्टीने व नीतीच्या दृष्टीने केलेल्या गुन्ह्याबद्दल ब्राह्मण-क्षत्रियांना सौम्य शिक्षा आहेत.

२३. म्हणजे हिंदू धर्म, हिंदू समाजव्यवस्था, हिंदू धार्मिक व ललित साहित्य, हिंदू अर्थव्यवस्था आणि हिंदू शासनयंत्रणा फक्त ब्राह्मण क्षत्रियांसाठी आहे. त्यांचे वर्चस्व व स्वामित्व अबाधित राहील अशीच रचलेली आहेत.

सत्ता आणि अर्थसत्ता ही बळकावून बसता येतील. पण धर्मातदेखील इतरांना वाव असू नये.

२४. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक श्रमिकवर्गातून आला तसा हिंदू श्रमिकवर्गातून कोणीच कसा वर आला नाही ? कथा, काव्य-नाटकाचा विषय का होऊ शकला नाही ? सर्वत्र ब्राह्मण-क्षत्रियच कसे ? असे मानवी समाजाच्या इतिहासात घडलेले आहे काय ?

२५. पण एवढे कशाला ? भारतीय तत्त्वज्ञानामध्ये जडवादी, अनात्मवादी, अनीश्वरवादी, बुद्धिप्रामाण्यवादी व इहवादी इत्यादी विचारांची केवढी तरी महान परंपरा आहे. अशा विचारांना अनुसरणारे जनसमूहदेखील होते. बौद्धजैनमतांने तर अनेक शतके आणि केवढे तरी जनसमूह स्थापलेले होते. ज्ञान आणि कलेच्या क्षेत्रावर बौद्धमताचा केवढा तरी प्रभाव आहे. पण जैन-बौद्ध मताचे नायक काव्य-नाटकांमध्ये आढळत

नाहीत. उलट जैन-बौद्ध भिक्षूंबद्दल उपहासाचे, तुच्छतेचे उल्लेख आढळतात. चार्वाक तर खात्रीला पुरेल एवढाच बाकी ठेवला आहे.

बौद्ध धम्माच्या इतिहासात शूद्र-अतिशूद्र महत्पदाला चढलेले दिसतात. इस्लाम सत्तेत धर्मांतरित शूद्र सत्ताधारी झाल्याचे आढळतात.

२६. ह्या सर्व संदर्भावरून असा निष्कर्ष काढता येईल की हिंदू धर्म, हिंदू धार्मिक व ललित साहित्य ब्राह्मणक्षत्रियांचे पक्षपाती आहे. विषमतेचा पुरस्कार करणारे आहे व श्रमिक हिंदूंना निष्प्रभ करणारे आहे. श्रमिक हिंदूंना प्रेरणाप्रद ठरणारे अनात्मवादी, जडवादी, अनीश्वरवादी तत्त्वज्ञान हे हिंदू तत्त्वज्ञानासाठी ब्राह्मण-क्षत्रियांच्या वर्चस्वाला आव्हान देणारे होते म्हणून ते नष्टभ्रष्ट केलेले आहे.

हिंदू धर्म आणि समाजव्यवस्था हे ब्राह्मण-क्षत्रियांचे कुरण आहे. आणि हिंदू श्रमिकांचा कोंडवाडा आहे.

२७. एखादी व्यवस्था शतकानुशतके चिरंजीव कशी राहू शकते ? हिंदू समाजव्यवस्था इतकी शतके अबाधित कशी राहू शकते ? ब्राह्मण-क्षत्रियांना सदैव अग्रभागी कशी ठेवू शकते ? ब्राह्मण–क्षत्रिय इतके शक्तिशाली होते काय ? इतिहास तशी साक्ष देत नाही. इस्लामी सत्तेने सर्व भारतभर ब्राह्मण-क्षत्रियांचे पराभव केले आहेत. तसेच मूटभर कंपनीच्या सैन्यानेही केले आहेत. ब्राह्मण-क्षत्रियांचा इतिहास हा शतका-शतकांच्या पराभवाचा आणि गुलामीचा इतिहास आहे. तसेच ज्ञान-विज्ञानातही त्यांना काहीही स्थान नाही.

तरी हिंदू समाजात ब्राह्मण-क्षत्रिय सदैव वर राहिलेले आहेत. आणि श्रमिक हिंदू सदैव खाली. दैन्य, दुःख आणि दास्यात खितपत पडलेले आहेत. हे दोन्ही वर्ग अगदी दगडासारखे कसे काय इतकी शतके वर आणि खाली राहू शकले ?

२८. मानवी समाजाचा इतिहास तर वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. वरचे खाली येतात. खालचे वर जातात. आणि वर्ग-समन्वय, वर्ग-विग्रह होत राहतात. हे चक्र भारतात स्थिर कसे राहिले ? फक्त जेव्हा जेव्हा धर्म उदयास आले त्या धर्मात खालचे हिंदू प्रचंड वेगाने गेले. शस्त्रधारी धर्मात शस्त्रधारी होऊन त्यांनी ब्राह्मण-क्षत्रियांच्या कत्तली केल्या. सत्ता धुळीला मिळविल्या. पण ज्यांनी धर्मांतर केले नाही ते खालीच राहिले आहेत.

२९. विवेकबुद्धी आणि उत्पादन-साधने व हात वापरता येत नसल्यामुळे वाघ-सिंह, गायी-बैल इत्यादी पशू जसे फक्त वंश टिकवून राहिले तसेच हिंदू होते काय ? वाघाचा सिंह होत नाही. बैलाचा हत्ती होत नाही तसेच हिंदू बदलत नाहीत की काय ? उत्पादने करत असूनही, सतत युद्धे होत असूनही ? जीवनाला गती असूनही ?

३०. मानवी इतिहास म्हणतो, समाजात वर्ग नव्हते तर मृगया करणाऱ्या टोळ्या होत्या. शेतीचा शोध लागला. संपत्तीचा संग्रह होऊ लागला. अन् वर्ग पडू लागले. गणराज्ये आली. संपत्ती वाढू लागली. आणि राजे निर्माण झाले. संपत्ती वाढू लागली. उत्पादन-साधने बदलू लागली. नवे नवे वर्ग तयार होऊ लागले. राजे-महाराजे मागे पडून भांडवलदार आले आणि भांडवलदारांना मागे टाकून कामगारवर्गाचे राज्य आले. समाजवादी सत्ता उदयाला आल्या. जिथे वर्ग-समाज होता-तिथल्या मानवी इतिहासाला वेग होता. तिथला इतिहास त्या क्रांत्यांचा इतिहास आहे. पण हिंदू समाजाचा इतिहास ? हा घडलाच नाही. जो काही आहे तो ब्राह्मण-क्षत्रियांचा इतिहास आहे.

३१. फ्रेडरिक एंजल्स् म्हणतो, जेव्हा गरजेएवढे उत्पादन होत असेल व जननवेगाबरोबर भौतिक उत्पादन होत नसेल तेव्हा समाज रक्तबंधांनी बांधलेले एक कुटुंब असतो. पण भौतिक उत्पादन वाढले, संपत्ती वाढली की वर्ग पडतात. आणि हे वर्ग संघर्ष करीत असतात.

३२. हिंदू समाजही वर्ग-समाज होता पण प्रस्थापित आणि विस्थापित वर्गात संघर्ष झाल्याचे, ब्राह्मण-क्षत्रियांचे वर्चस्व नष्ट झाल्याचे, आणि ब्राह्मण-क्षत्रिय देव, कथानायक झाल्याचे दिसत नाही. ब्राह्मण-क्षत्रिय फार प्रबळ होते असेही नाही. तर ते इस्लाम आणि खिश्चन धर्मीयांपुढे पराभूत ठरले आहेत. तरी हिंदुसमाजामध्ये ते अग्रभागी राहिले याचे कारण काय असावे ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी हिंदुसमाजरचनेचा विचार केला पाहिजे.

३३. हिंदू समाजातील वर्ग वर्णांमध्ये विभागलेले आहेत. आणि वर्ण जातींमध्ये विभागले गेले आहेत. जाती पोटजातींत विभागल्या गेल्या आहेत.

३४. प्रत्येक जातीला तिचा व्यवसाय आहे. ह्या व्यवसायातदेखील जात आहे. व्यवसायाकडे सामाजिक गरजेच्या दृष्टीने अथवा आर्थिक दृष्टीने पाहिले जात नाही तर जातीच्या दृष्टीने पाहिले जाते. व्यवसाय पुरेसा पैसा देत नाही म्हणून पैसा देणारा व्यवसाय स्वीकारता येणार नाही.

जे व्यवसाय पुरेसे पैसे देत नाहीत ते व्यवसाय खालच्या जातीच्या नावे आहेत. वरिष्ठ जातीचे व्यवसाय खालच्या जातीला करण्याची मनाई आहे. कारण त्यामुळे दोन जाती जवळ येण्याचा धोका संभवतो. भेदभाव कमी होऊ शकतो.

३५. जातीत आर्थिक दृष्टीने दोन तीन वर्ग असतात. श्रीमंत, मध्यम व गरीब असे वर्ग जातीत असतात. वेगवेगळ्या जातींतील हे समानशील वर्ग एक होऊ शकत नव्हते. ते एक झाले असते तर जाती नष्ट झाल्या असत्या व हिंदू–समाज वर्ग–समाज झाला असता. म्हणजे ब्राह्मण–क्षत्रियांचे वर्चस्वही नष्ट झाले असते. वर्ग एक होऊ नयेत,

पोटजाती एक होऊ नयेत, समान आर्थिक दर्जा असलेल्या श्रमिक हिंदू जाती एक होऊ नयेत अशी व्यवस्था हिंदू–धर्माने केली आहे. ती म्हणजे सजातीय विवाह. आंतरजातीय विवाहाला विरोध आणि जन्मसिद्ध सदस्यत्व. जातीचे होण्यासाठी जातीत जन्मावे लागते. अन् आईबापदेखील एकाच जातीचे असावे लागतात म्हणजे तो जातिवंत असतो. संकर नसतो. भेसळ नसते.

जाती वर्गविद्वेष करीत नाहीत. जात परजातीचा द्वेष करते. आणि स्वजातीवर प्रेम करते. म्हणून जातीतील धनवान जातीला प्रिय असतो. अन् परजातीतील समानशील दुष्मन वाटतो.

जात चमत्कारिक संस्था आहे. व्यक्तीवर हुकमत गाजविण्याची तिच्यामध्ये शक्ती आहे. पण अशी ही जात केव्हा निर्माण झाली असावी ? कोणी केली असावी ? का केली असावी ?

३६. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१६ साली अमेरिकेत शिकत असताना एका परिसंवादात एक शोधनिबंध वाचला होता. ' भारतातील जाती, त्यांचा उद्गम व विकास ' असे त्या शोधनिबंधाचे नाव. त्या निबंधात बाबासाहेब म्हणतात:

' समाजात वर्ग असतात. आणि समाजातील प्रत्येक माणूस हा कोणत्या तरी एका वर्गाचा सभासद असतो. हिंदू समाजही ह्या नियमाला अपवाद असू शकत नाही. हिंदू समाजातही संपत्तिवान आणि संपत्तिहीन वर्ग असतील. आणि जर असे असेल तर आपणाला हे पाहावे लागेल की, ' जात ' ह्या सदरात पडेल म्हणजे स्वतःला जातीत बंद करून घेण्यात कोणता वर्ग पुढे आला असेल ? जात आणि वर्ग हे अतिशय जवळचे नाते आहे. वर्ग बंद झाला की तो जात होतो. अन् जात खुली झाली की ती वर्ग होते. म्हणजे खुले होणे आणि बंद होणे हे वर्ग आणि जातीतील अंतर आहे.

३७. बाबासाहेबांनी केलेली ही व्याख्या घेऊन आपण हिंदुधर्मीय श्रमिक जाती–जमातीचा शोध घेऊ. हा हिंदुधर्मीय श्रमिकवर्ग उच्चवर्गीय हिंदूंपेक्षा संख्येने मोठा आहे, हा हिंदुधर्मीय श्रमिकवर्ग जर जाती बनला असेल तर बाकीचे वरिष्ठ वर्गही जाती होतील. म्हणजे लोहार, सुतार, कुंभार, चांभार, विणकर आणि इतर श्रमिक हिंदू समाज जर जातीत बंद झाला तर बाकीचा अल्पसंख्य उच्चवर्गीय हिंदू समाजही जात होईल. कारण बाबासाहेब म्हणतात की, जात एकटी राहत नाही. ती तिची प्रतिकृती करीत राहते. जात एकटी–दुकटी राहत नाही. जगण्यासाठीच तिला अनेक जाती हव्या असतात. तर जात कोण झाला असेल. शोषित की शोषकवर्ग ?

भगवान बुद्धाला श्रमिकवर्गातून असंख्य अनुयायी मिळाले आहेत. इस्लाम धर्म भारतात आला तेव्हा त्यालाही अधिक अनुयायी श्रमिक हिंदूंतूनच मिळाले आहेत. ख्रिस्ती

धर्मालादेखील इथल्या प्रस्थापित वर्गापेक्षा अधिक अनुयायी श्रमिकवर्गातून मिळाले आहेत. शिख, वारकरी, महानुभाव हे पंथ श्रमिक हिंदूंतून वाढले आहत. महात्मा फुले आणि डॉक्टर आंबेडकर यांनी जातिभेदाविरुद्ध आणि हिंदुधर्माविरुद्ध जे बंड उभारले आहे त्यामध्ये वाढत्या संख्येने श्रमिक हिंदूच सामील होत आहेत. हिंदू धर्माचा त्याग करीत आहेत आणि समाजवादाचा स्वीकार करून क्रांतीसाठी पक्षात सामील होणारेही हिंदू श्रमिकच अधिक आहेत.

३८. म्हणजे बुद्धापासून हिंदू श्रमिकवर्ग, वर्ग–व्यवस्था आणि तिचा शोषणावर आधारलेला हिंदुधर्म यांच्या विरोधात आहे. म्हणून तो सहजपणे हिंदू धर्माचा त्याग करून बाहेर पडतो. वरिष्ठवर्गातील कोठलीही जात एवढ्या मोठ्या संख्येने, उत्साहाने आणि वेगाने आपली जात, वर्ण आणि हिंदुधर्म सोडण्यास तयार झालेली नाही.

म्हणजे जातीची निर्मिती म्हणजे वर्गांतर बंद करणे. हे कार्य श्रमिक हिंदूंनी केलेले नाही.

३९. बाबासाहेब म्हणतात, जातीचे अटळ परिणाम म्हणून सती, विधवा, बालवधू, कुमारी–जरठ–विवाह इत्यादी प्रथा समाजात आल्या. कारण जात टिकविण्यासाठी स्त्री महत्त्वाची भूमिका पार पाडते. स्त्री गर्भधारण करते म्हणजे जातच पोटात वाढवीत असते आणि प्रसूत होऊन जातीलाच जन्म देत असते. जाती–समाजात–स्त्रीला आणि तिच्या समग्र देहाला फार महत्त्व येते. तिचे शुद्ध कौमार्य, तिचे योनिपावित्र्य, तिचे पातिव्रत्य आणि तिचे विधवापणातील कठोर कडक ब्रह्मचर्य जात टिकवून धरण्यासाठी आवश्यक असते. म्हणून जातिबद्ध समाजात स्त्रीवर अनेक बंधने येत असतात आणि ही बंधने सुसह्य करण्यासाठी अनेक मनोरंजक कल्पना आणि संकल्पनाही समाजात रूढ होत असतात.

तर सती, विधवा, तिचे कडक कठोर ब्रह्मचर्यपालन, बालविधवा आणि तिची केलेली निष्ठुर कोंडी, बाल–जरठ-विवाह हे सारे दुष्ट प्रकार ब्राह्मण-क्षत्रियांतच अधिक आहेत. म्हणजे स्त्रियांवर सर्वांत अधिक बंधने ब्राह्मण-क्षत्रिय जातींतील स्त्रियांवरच अधिक होती. म्हणून प्रथम जात बनलेला आणि जात प्राणपणाने जपणारा वर्ग ब्राह्मण–क्षत्रिय असला पाहिजे.

ब्राह्मण–क्षत्रिय हा वर्ग जात का झाला असेल? त्याने बंद करून घेणे का पसंत केले असेल?

४०. तर ब्राह्मण–क्षत्रिय वर्गापाशी सत्ता आली असेल. म्हणून संपत्ती आली असेल. सत्ता आणि संपत्ती आपल्या वारसाकडे राहावी, त्याला इतर प्रतिस्पर्धी बनू नयेत, लढू नयेत, विजयी होऊ नयेत आणि आपल्याशिवाय दुसऱ्याकडे काहीच राहू नये म्हणून असे ज्याला वाटत असेल तो मालमत्ताधारक जात बनला असेल. आपले स्वार्थ सुरक्षित करीत असेल.

अन् ब्राह्मण-क्षत्रियांनी जातीत बंद होऊन सर्व कायदे कानून, आणि समाजरचना आपले स्वार्थ सुरक्षित टेवील अशी रचून, सत्तेत, अर्थसत्तेत आणि धर्मसत्तेत व्यवस्थित भागीदारी करून घेतलेली दिसते.

आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतील सर्व विशेषाधिकार ब्राह्मण-क्षत्रियांकडे आहेत. म्हणून सर्व सोयीसवलती, संधी ही ब्राह्मण-क्षत्रियांकडे आहेत. म्हणून सर्व संपत्ती ब्राह्मण-क्षत्रियांकडे आहे. म्हणून सर्व सुखे आणि ऐश्वर्य ह्या दोघांकडेच असणे स्वाभाविक आहे. बाकीच्या श्रमिक जातींना हक्क नाकारण्यामुळे दुःख, दैन्य आणि दास्य चिरंजीव होऊन राहणेही अटळच आहे.

४१. म्हणजे जातिभेदाची कारणे पारलौकिक, पावित्र्य-अपावित्र्य ह्या धार्मिक कल्पनेत नाहीत. तर ती शुद्ध व्यावहारिक आहेत. आर्थिक आहेत. ब्राह्मण-क्षत्रिय आणि शूद्र-अति-शूद्र हा भेद श्रीमंत-गरीब, शोषक-शोषित, शासक शासित, सुखी-दुःखी, स्वाधीन-गुलाम असाच आहे. ही वर्गीय विभागणी आहे. अन् वेदापासून ते भिकार पोथीपर्यंतच्या सर्व ग्रंथांनी, देवांनी, राजांनी आणि स्मृतिकारांनी, विचारवंतांनी तिला वेगवेगळ्या पातळ्यांवरून पक्की केली आहे. ह्या विषमतेला बळकटी आणण्यासाठी शासनसत्ता, धर्मसत्ता ह्या दोन सत्ताच काम करीत नाहीत तर कर्मविपाक, पापपुण्य, पुण्यकर्म अशा शेकडो संकल्पनाही कार्य करीत आहेत. अन् हिंदू परमेश्वरही राज्यकर्त्या ब्राह्मण-क्षत्रियांना हवी असलेली कामगिरीच पार पाडतो.

तो स्वर्गात बसून पापपुण्याचा, पूर्व-कर्माचा हिशेब करून कनिष्ठ किंवा वरिष्ठ जातीत आत्म्याला देह धारण करायला भाग पाडतो.

४२. जाती अनेक आहेत. आणि सर्वात वर ब्राह्मण-क्षत्रिय आहेत. म्हणजे ब्राह्मण-क्षत्रिय जातींना असलेले जीवनातील विशेषाधिकार मिळविण्यासाठी, सुख ऐश्वर्य भोगण्यासाठी आत्म्याला खूप जन्म घेत घेत वर चढावे लागणार आहे. पुण्याचा प्रचंड साठा साठवावा लागणार आहे.

म्हणून देहाबरोबर आत्मा नष्ट करून चालणार नाही. त्याला अमर केले पाहिजे. आणि चार्वाक आणि बौद्धमतही नष्ट केले पाहिजे.

हिंदू राजकर्त्या वर्गाने आत्म्याला अमर केले. आणि चार्वाक बौद्धमतही नष्ट करून दाखविले.

म्हणजे भौतिक गरजेतून अनेक आध्यात्मिक कल्पना रूढ केल्या गेल्या. ज्या ब्राह्मण-क्षत्रियांच्या वर्चस्वाला साह्यभूत होतील अशा, ज्या बंडांचा, शोधाचा बिमोड करतील, ज्या गोरगरिबांना दिलासा देतील.

पूर्वजन्म, पूर्वकर्म, पापपुण्य, पापपुण्याचा हिशेब ठेवणारी स्वर्गीय यंत्रणा, नंतर हिशेब देणारा परमेश्वर, स्वर्ग-नरक, प्रारब्ध, नियती, अवतार, आत्म्याचे सातत्य इत्यादी.

पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या आणि गोरगरिबांना भ्रमात घालणाऱ्या अनेक कथा, कल्पना शोधल्या गेल्या.

४३. हिंदू परमेश्वर जाती निर्माण करतो. ख्रिस्ती परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त गोरगरिबांचा उद्धार करतो. हिंदू परमेश्वराचे अवतार असलेले सर्व हिंदू देव ब्राह्मण–क्षत्रियांच्या वर्चस्वाचा पुरस्कार करतात. जातिभेदाला, विषमतेला धर्म मानतात. आणि वर्णसंकराचा तिरस्कार करतात. जातिभेद आणि विषमता हिंदू धर्माचा प्राण आहे. हिंदू धर्माची संपूर्ण इमारत विषमतेवर उभी आहे. म्हणून हिंदूंचे सर्व प्रकारचे साहित्य हे विषमतेचा, अस्पृश्यतेचा, ब्राह्मण–क्षत्रियांच्या वर्चस्वाचा, श्रेष्ठत्वाचा स्वाभाविकपणे पुरस्कार करणार.

४४. हिंदूंचे सारे पुराणपुरुष विषमतेचा धर्म म्हणून, कर्तव्य म्हणून, नीतिमत्ता म्हणून अंगीकार करणार. तसा त्यांनी केलेला आहे. कर्णाबद्दल सहानुभूती व्यक्त करणारे लेखन हे आधुनिक मराठी लेखन आहे. पण महाभारतापासून तो संतांपर्यंतच्या साहित्यामध्ये कर्णाची निदाव्यंजक शब्दांनी उपेक्षा केलेली आहे. मग शंबूकाकडे कोणाचे लक्ष जाईल ?

४५. रामाने शंबूकाचा शिरच्छेद करून, त्याला आराध्य दैवत मानणाऱ्यांना, त्याचे जीवन आदर्श म्हणून पाळणाऱ्यांना रामाने एक संदेश दिला आहे.

शंबूकाच्याच शिरच्छेदाच्या कथेत ब्राह्मण–क्षत्रिय आहेत.

एकलव्याच्या आंगठ्याच्या गोष्टीत ब्राह्मण–क्षत्रिय आहेत.

खांडववनाच्या अग्निप्रलयात ब्राह्मण–क्षत्रिय आहेत. आणि कर्णाच्या कथेतही ब्राह्मण–क्षत्रिय आहेत. ही ब्राह्मण–क्षत्रिय युती अपवादाने वर आलेल्या ह्या ब्राह्मण–क्षत्रियेतर नायकांना नामशेष करते.

४६. हिंदू पुराणपुरुषांनी–आदर्शांनी केलेली ही हत्या धर्म झालेली होती. नंतरच्या हिंदू साहित्यामध्ये ब्राह्मण–क्षत्रियेतरांतील कोणीही वीर, विद्वान पुढे आलेला नाही. मुसलमान आले तेव्हा जी खळबळ झाली त्या संधिकाळात आणि ब्रिटिशांनी आणलेल्या कायद्याच्या राज्यापर्यंत हिंदू श्रमिकांना मान वर काढायला संधी मिळाली.

४७. चार्वाकाचे इहवादी मत नष्ट होते. जडवादी मत नष्ट होते. जैन, बौद्धमत अंधारात फेकले जाते. अनात्मवादी, अनीश्वरवादी मत चुकूनही काव्य नाटकांतून व्यक्त होत नाही. ह्या सर्व पुराव्यांवरून आपण म्हणू शकतो की हिंदुधर्म ब्राह्मण–क्षत्रियांचे स्वामित्व सिद्ध करणारी यंत्रणा आहे. आणि हिंदू साहित्य हे जातिवादी साहित्य आहे.

४८. ख्रिस्ताप्रमाणे हात पसरून कोणताही हिंदू देव हिंदू श्रमिकांना कवटाळण्यासाठी उभा नाही. अगदी प्रेम शृंगाराचे प्रतीक असलेला कृष्णसुद्धा नाही. उलट प्रत्येक हिंदू देव हातात शस्त्र घेऊनच आहे. वर्णधर्माच्या आणि विषमतेच्या रक्षणासाठी ज्याने अनार्यांची शहरे जाळली–आणि पुरंदर होऊन पुर मोकळे केले तो इंद्र त्यांचा राजा आहे !

दोन :

४९. जातिव्यवस्थेमुळे आणि अस्पृश्यतेमुळे संपत्तीचा ओघ ब्राह्मण-क्षत्रियांकडेच वाहतो आहे. अस्पृश्य जाती तर दारिद्र्यात कोंडून टाकलेल्या आहेत. सर्व जाती-जमातींचे व्यवसाय, वेष, अलंकार निश्चित झालेले आहेत. वेष, व्यवसाय बदलण्याचे कोणालाच स्वातंत्र्य नाही. कारण वेष आणि व्यवसाय जातीचे झाले आहेत.

ब्राह्मण-क्षत्रियांना सर्व विशेषाधिकार आहेत म्हणून सर्व सुखे ब्राह्मण-क्षत्रियांपुढे हात जोडून उभी आहेत.

निसर्गाच्या अनुकूलतेमुळे आणि वाढत्या श्रमिकांच्या श्रमामुळे संपत्तीचे डोंगर निर्माण झाले आहेत. भारतभूमीचा सुवर्ण-भूमी म्हणून जगात लौकिक झाला आहे. अपरंपार संपत्ती वाढल्याने राजे संपत्ती उधळत आहेत. मंदिरे वाढताहेत. मोठमोठे यज्ञ होत आहेत. अन् ब्राह्मण-क्षत्रिय मजेत आहेत.

५०. आणि तिकडे अरबस्थानात मोहमद पैगंबराच्या विचारांचे चैतन्य पिऊन तेजस्वी झालेले अरब तरवारी नाचवीत अल्ला हो अकबराच्या घोषणा देत दौडत निघाले आहेत. अनेक सत्ता कोसळवीत इस्लामी सत्ता स्थापित त्यांनी आशियाभर धुमाकूळ घातला आहे.

आणि अरब भारतात येतात. संपत्तीचे डोंगर फस्त करून पुन्हा स्वदेशी जातात. अरबांच्या, तुर्कांच्या आणि मोगलांच्या धाडीवर धाडी पडत राहतात. ब्राह्मण-क्षत्रियांच्या कत्तली उडवीत संपत्ती गोळा करतात. संपत्तीचे साठे असलेली देवळे उध्वस्त करतात. आणि परत जाण्याऐवजी भारतातच स्थायिक होतात.

५१. वादळाच्या वेगाने हिंदू सत्ता धराशयी करीत भारतभर पसरत जातात. हिंदू श्रमिक जातींतून भराभर लोक धर्मांतर करून मुसलमान होतात. आणि ज्या देवळाच्या पायरीवर पाय देण्याची मुभा नव्हती ती देवळे उध्वस्त करून दाखवितात. ज्याच्यावर सावली पडू नये म्हणून जपावे लागत होते, त्याच्या कत्तली उडवतात.

अल्पावधीतच भारत बदलून जातो आणि हिंदू-मुसलमानांचा भारत होतो. आणि अधिसत्ता इस्लामची होते. ब्राह्मण-क्षत्रियांच्या किरकोळ सत्ता मांडलिक होऊन जीवदान मिळवतात.

५२. कालांतराने इस्लामी सत्ता शांततेकडे वळल्या. आणि इस्लाम धर्म स्थिर झाला. इस्लाम जात मानत नाही, वर्ग मानतो. पण भारतातील सर्व जनता जातीत विभागलेली आणि जातीत जगत असल्यामुळे आणि जातीची बंधने पाळीत असल्यामुळे जात-पात न पाळणारा इस्लामदेखील एक जात झाला. जात, जाती घडवीत असते. ती सजातीय विवाहाने व आंतरजातीय विवाहाच्या निषेधाने स्वतःला बंद करते. म्हणजे जातीय ऐक्याचा प्रवाहच बंद करणे, स्वतःला बंद करून ती दुसऱ्याला बंद करते, जातीत कोंडते. सर्वच हिंदू जातीत बंद असल्यामुळे मुसलमानाशी कोणी रोटी-बेटी व्यवहार करीत नव्हते. म्हणून सामाजिक गरज म्हणून त्यांना स्त्रिया मिळवाव्या लागत होत्या. पण ज्या स्त्रिया मिळत त्या जातिबहिष्कृत ठरविल्या जात. मुसलमान ठरविल्या जात. त्यामुळे मुसलमानांना सजातीय विवाह करणे भाग पडले. आणि ते जातीमुळे जात झाले. सत्ताधारी असूनही, जातिभेद मानीत नसूनही, वर्ग-समाज मानीत असूनही मुसलमानांना जात व्हावे लागले. जातिभेद मानावे लागले. भारतातील सर्वच धर्म जाती झाले. आणि त्यामुळे ब्राह्मण-क्षत्रियांचे हिंदूमधील स्थान वरचढच राहिले. म्हणून इतर धर्मांनाही जात बनावे लागले.

५३. एखादा जात–पात न मानणारा धर्म जात बनला की ब्राह्मण–क्षत्रिय वरचढ होतातच. कारण हजारो हिंदू जाती ब्राह्मण-क्षत्रियांना श्रेष्ठ मानतात आणि हिंदू धर्माला मानतात. म्हणून जात बनलेल्या धर्मालादेखील ब्राह्मण–क्षत्रियांना मानावेच लागते.

५४. मोहमद पैगंबर आणि त्याचा परमेश्वर हिंदू श्रमिक जातींत लोकप्रिय होऊ शकले असते. पण इस्लाम धर्मीयांना जातीच्या गर्दीत जात होऊन जावे लागल्यामुळे मोहमंद पैगंबर आणि त्याचा परमेश्वर एका इस्लाम नावाच्या जातीचे झाले. समग्र भारतीय जनतेचे झाले नाहीत आणि म्हणून हिंदू साहित्यामध्ये काव्य नाटकाचा विषयही झाले नाहीत. गौतम बुद्धाला बहिष्कृत करणाऱ्या ब्राह्मण ग्रंथकारांनी इस्लामच्या, पारशांच्या, ज्यूंच्या आणि भारतात आलेल्या प्रत्येक धर्माच्या परमेश्वराला त्या त्या जातीचा करून टाकले. त्यांच्यासंबंधात कधी काही लिहिलेच नाही.

५५. जात, जातीत दुरावा, दुफळी, दुष्मनी निर्माण करते. ब्राह्मण शूद्रामध्ये जो दुरावा असतो तोच दुरावा मुसलमान आणि शूद्र यांच्यामध्ये अथवा मुसलमान आणि इतर हिंदू जातींमध्ये आपोआप निर्माण झाला.

५६. इस्लामी सत्ता ब्राह्मण-क्षत्रियांच्या सत्तेचा पराभव करीत असताना, इस्लाम धर्म हिंदू जनतेतून मोठमोठे जनसमूह फोडीत असताना, हिंदू देवळे व देव भंग होत असताना व इस्लामी देव व मशिदी उभ्या होत असताना ह्या संक्रमण काळात संतांचा उदय झाला.

५७. म्हणजे असेही म्हणता येईल की ब्राह्मण-क्षत्रियांची हिंदू श्रमिक जनतेवरील पकड

जेव्हा ढिली होते, तेव्हा दबून राहिलेले हिंदू श्रमिकवर्ग आपल्या शौर्याचे आणि प्रतिभेचे प्रचंड चमत्कार दाखवीत असतात.

५८. हिंदू श्रमिक जाती–जातीतून संत आले. ह्या संतांनी आणलेले देवदेखील अभ्यास करण्याजोगे आहेत. त्यांनी ह्या देवांच्या कोणत्या अंगावर भर दिला हे पाहिले तर आपणाला असे दिसेल की :

संतांनी प्रथम गवळ्याचा मुलगा कृष्ण प्रचारला. त्याचे बालपण, त्याच्या गवळी वाड्यातील लीला, त्यांनी मोठ्या रसाळपणाने रंगविल्या. नंतर त्यांनी पांडव, द्रौपदी आणि सुदाम्याला केलेले साह्य त्यांनी लोकप्रिय केले. तत्त्वज्ञ कृष्ण, योद्धा कृष्ण, कपट–कुशल कृष्ण त्यांनी लोकांपुढे ठेवला नाही.

५९. आणि लगेच भक्तवत्सल, परम प्रेमळ भक्तिप्रिय, भक्ताच्या हाकेसरसी धावून जाणारा, भक्तांची जात पात लक्षात न घेता भक्ती लक्षात घेणारा, भक्ताची ढोरे ओढणारा, भक्ताचे शेले विणणारा, मडकी भाजणारा, दळण–कांडण करणारा असा प्रेमळ विठोबा संतांनी देव म्हणून निवडला. लोकप्रिय केला.

जातिभेद न पाळणारा, विषमतेचा प्रचार न करणारा विठोबा संतांनी का रंगविला असेल ? पैगंबराच्या परमेश्वरांच्या दयाळूपणाची ही प्रतिक्रिया होती काय ?

की इस्लाम हा वर्ग–समाजातील धर्म असल्यामुळे लोक–व्यवहारात आणि मशिदीमध्ये जी सामाजिक समता प्रत्ययाला येत होती त्याची प्रतिक्रिया म्हणून विठोबा प्रत्येक जातीच्या भक्ताकडे सहजपणे जाऊ लागला होता ?

६०. की बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे तो विठोबा हा गौतम बुद्ध अथवा बोधिसत्व असावा ? म्हणून तो जातिभेद पाळत नसावा ?

६१. ख्रिश्चन धर्माचे गरीब आणि श्रीमंत देवाच्या प्रार्थनास्थळी एकत्र येऊन प्रार्थना करीत होते. देवाची लेकरे एक म्हणून वर्गभेद पाळीत नव्हते. हिंदू लोकांपुढे हा सामाजिक समतेचा आदर्श आणि पैगंबराचा प्रेमळ परमेश्वर आणि जीवनासंबंधीचा एक नवा विचार आला म्हणून विठोबा जातिभेद न पाळणारा झाला. पण विठोबाच्या मंदिरात मात्र चोखामेळ्याला प्रवेश नव्हता. देव प्रेमळ पिता आहे, माणसे त्याची लेकरे आहेत हा इस्लामने भारतात आणलेला विचार संतांनी स्वीकारला. तशी काव्ये रचली. तशा कथा रचल्या. त्या लोकप्रियही झाल्या. ह्या काव्यकथांतून लोकप्रिय झालेला विठोबा पैगंबराच्या प्रेमळ परमेश्वराला पर्याय झाला. पण वास्तवात चोखा-मेळ्याला मंदिरात प्रवेश नव्हता. मशिदीत दोन्ही वर्ग गुण्यागोविंदाने प्रार्थना करीत असल्याचे दिसत असतानाही हा विरोधाभास का निर्माण झाला असावा ?

६२. कारण संतांनी रंगविलेल्या प्रेमळ, जातिभेद, विषमता न पाळणाऱ्या विठोबाला आधार नव्हता. पुराणकथा नव्हती. मागे आधार नव्हता. आणि वास्तव तर एकदम विरोधी होते. जाती होत्याच. ब्राह्मण क्षत्रियाची दमन आणि दंडसत्ता जरी नव्हती तरी ब्राह्मणक्षत्रियांची आर्थिक व धार्मिक शक्ती प्रचंड होती. शासनसत्ता इस्लामच्या हातात असल्यामुळे संत वर येऊ शकले. पण वर आले तरी ते काही देऊ शकत नव्हते. समता स्थापण्यासाठी समाज वर्ग–समाज असावा लागतो. वर्ग–समाजात व्यक्तीला महत्त्व असते. जाति–समाजात जातीला महत्त्व असते. म्हणून संतांना देवाने जग निर्माण केले, जीव निर्माण केले, जातीही निर्माण केल्या, हे सांगणे भागच पडत होते. म्हणून जातीच्या समर्थनासाठी उभे केलेले पिळवणुकीचा प्रचार करणारे तत्त्वज्ञानही मांडावे लागत होते. आणि हेही तत्त्वज्ञान मांडले तर समतेचा विचार कसा मांडणार ?

६३. संत विठोबाला लोकप्रिय करू शकले. म्हणजे ब्राह्मणांना एक उत्पादनाचे अमोल साधन फक्त देऊ शकले. संतांमुळे ब्राह्मणांना द्रव्य देणारी देवळे निघू शकली. समाजात मात्र काही बदल झाला नाही. मराठी साहित्याला मात्र कविता मिळाली.

६४. ख्रिस्ती समाजसुधारकांची, बंडखोरांची पाठराखण ख्रिस्ती धर्माचा पुराण–पुरुष येशू ख्रिस्त करू शकतो. कारण गोरगरिबांसाठी पापी पीडितांसाठी तो क्रुसावर चढला. काटेरी मुकूट त्याने शिरावर धारण केला. असा ख्रिस्त किंवा गौतम बुद्ध जर हिंदू संतांना मिळाला असता तर हिंदू–धर्मयंत्रणा सुधारत आल्याच्या काळात ते फार मोठे बंड करू शकले असते.

६५. पण त्यांना असा पुराण–पुरुष, इतिहास, आदर्श हिंदू धर्म अथवा हिंदू पुराणे देऊ शकत नसल्यामुळे संतांना दुःखाचे कारण, दुःख देणारे कोण आहेत ते कळले नाही. त्यांना दुःख दिसले पण ते देणारी व्यवस्था दिसली नाही. म्हणून जन्मणे आणि जगणे हे दुःख आहे असे त्यांनी मानले. त्यांनी खूप जोरदार संताप व्यक्त केला. त्यांना व्यवस्थेविरुद्ध बोलावेसे वाटत होते. पण बोलता येत नव्हते.

म्हणून ते सर्वात अधिक चिडले जन्म देणाऱ्या स्त्रीवर. तिच्या देहाचीच त्यांनी निर्भत्सना केली.

६६. ख्रिस्त पुन्हा जन्म घेण्याचे आश्वासन देऊन जातो. हे आश्वासन धिरावा बनते. अनेक बंडखोरांना हे आश्वासन बंड करण्याची प्रेरणा देते. त्यांचे उदात्तीकरण करते. म्हणून क्रांतिकारी साहित्याला ते जागा करून देते. आधारशिला होते. आणि संत काय म्हणतात ?

जन्म दुःखदायक आहे. जग दुःखदायक आहे. चांगले आहे वैकुंठ !

संत पराभूत होणारच होते. कारण त्यांच्या विरोधी वास्तव होते, त्यांच्या विरोधी धर्माचे

मक्तेदार होते. इस्लामचा विचार आणि सत्ता आली नसती तर ते वर आलेच नसते. कारण पूर्वी हिंदू श्रमिकांतून संत आलेले नाहीत. आणि हिंदू मुसलमान सत्ता स्थिर झाल्यावरही श्रमिक हिंदूंतून कोणी वर आले नाही. संत शब्द देऊन गेलेत. ब्राह्मण–क्षत्रियांच्या हितसंबंधाविरोधी हे शब्द नसल्यामुळे आणि त्यांनी लोकप्रिय केलेला विठोबा देवळे काढण्याएवढा झाल्यामुळे ब्राह्मण–क्षत्रियांनी संतांच्या शब्दांना जगू दिले. पण संतांना मृत्यूच्या आधीन केले.

तीन :

६७. इस्लामने हिंदू सत्तांचा म्हणजे ब्राह्मण–क्षत्रियांच्या सर्वश्रेष्ठत्वाचा मैदानात पराभव केला होता. हिंदूंच्या देव–देवळांचा विध्वंस करून इस्लामने हिंदूधर्माचा विध्वंस केलाच पण ब्राह्मणांच्या सर्वश्रेष्ठत्वाचीही धुळधाण केली.

हिंदूंमधून फार मोठी लोकसंख्या आपल्या धर्मात ओढून घेऊन पुन्हा ब्राह्मण–क्षत्रियांना धूळ चारली होती आणि गोमांस भक्षण करीत, मंदिरे भ्रष्ट करीत असतानाच इस्लामी सत्ताधाऱ्यांनी चाकरीला ठेवून त्यांचे सर्वश्रेष्ठत्व निकालात काढले होते. त्यांचे पावित्र्य मोडीत काढले होते.

आणि संतांनी भक्तवत्सल जातिभेद न पाळणारा विठोबा लोकप्रिय करून ब्राह्मण–क्षत्रियांचे प्राणतत्त्व जो जातिभेद तो शब्दांत तरी नाहीसा केला होता.

वर्ग–समाज असता तर भारतीय समाजाचे नेतृत्व इस्लामकडे गेले असते. कारण त्यांनी हिंदूंचे जे जे म्हणून होते, ते पराभूत केले होते.

६८. पण सत्ता असूनही, सर्वजयी होऊनही इस्लाम नेता झाला नाही. त्याला कारण ब्राह्मण–क्षत्रिय आपले नेतृत्व टिकविण्यासाठी कार्य करीत होते. बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्य करीत होते असे नाही. वा नेतृत्व टिकविण्यासाठी ते संघर्ष करीत होते असेही नाही. तर ते सुलतान देईल ती चाकरी बजावीत होते. सुलतानाच्या हुकुमाप्रमाणे वागत होते.

हिंदूधर्म, हिंदुसमाज वा त्याची जात ह्यांसाठी त्यांनी कार्य केल्याचंही दाखले नाहीत.

६९. असे असूनही हिंदूसमाजाच्या अग्रभागी ब्राह्मण–क्षत्रियच होते, काहीही कारण नसताना, वर्ग-समाजात ते नष्ट झाले असते आणि अग्रजागी दुसरे वर्ग वा धर्म आला असता. पण जाती समाज असल्यामुळे व जाती-समाजात ब्राह्मण-क्षत्रिय जातींना श्रेष्ठ मानल्यामुळे ते श्रेष्ठ राहिले.

७०. नाही तर कामोत्सुक दोन शरीरे एकत्र येतात. कामशांती मिळवतात आणि गर्भ

राहतात–जन्म होतात. हे जनन काही कामोत्सुक शरीरे सतत करीत असतात आणि जन्म घेतला की हिंदूसमाजात जात मिळते. वा श्रेष्ठ कनिष्ठपणाही मिळत असतो.

म्हणजे कनिष्ठपणा आणि श्रेष्ठपणा का मिळतो ? तर जातीत जन्म घेतला म्हणून, म्हणजे जाती नसत्या, वर्ग असते तर सतत पराभूत होणारे ब्राह्मण-क्षत्रिय समाजाच्या उच्च-स्थानी राहिले नसते. ते वर राहिले त्याला कारण जाती.

७१. तसे पाहिले तर भारतीय ज्ञानाची परंपरा फार प्राचीन आहे. हे प्राचीनत्व लक्षात घेऊन आपल्याला अशी सार्थ अपेक्षा व्यक्त करता येईल की विज्ञानयुगाचा, ज्ञानयुगाचा जन्म आणि विकास भारतात व्हायला पाहिजे.

रावणाचे पुष्पक विमान घेऊन राम अयोध्येला आला. म्हणजे विमानकर्ता राक्षस रामाने पराभूत केला म्हणजे रामानंतरचे राजे विमानविद्या वाढवीत गेले असते तर पुण्याच्या पेशव्यांनी स्कायलॅब वापरली असती. पण शेती सापडली तेव्हापासून सुरू झालेला लाकडी नांगर अजून आहे. लाकडी रथ अजून आहे. लाकडी माग अजून आहे.

वेद-शास्त्रे-पुराणे तयार झाल्यानंतरचे वाङ्मय काय आहे ? तर त्या ग्रंथांतील कथा-विषय, नायक, नंतरच्या काव्य, नाटकांचे कथाविषय आणि नायक आहेत. ह्याच प्राचीन ग्रंथांवर भाष्ये, रूपांतरे, अनुवाद, सारांश आणि विस्तार शतकानुशतके होत राहिले आहेत.

म्हणजे अतिप्राचीन काळी जेवढे ज्ञानविज्ञान आणि उत्पादन-साधने ब्राह्मण क्षत्रियांना माहीत होती तेवढीच माहिती युनियन जॅक शनिवार वाड्यावर फडकविणाऱ्या आणि कंपनी सरकारच्या सेनेपुढे हारणाऱ्या ब्राह्मण-क्षत्रियांना होती.

७२. आणि त्याच वेळी युरोपात केवढी ज्ञान, विज्ञानांची, विचारांची वादळे उसळत होती. भूगोलाचा शोध लागल्यापासून पृथ्वी बघण्याची केवढी दुर्दम्य इच्छा खिस्ताच्या अनुयायांच्या अंतःकरणात होती.

आणि जहाजे व बंदुका घेऊन सुवर्णभूमीच्या शोधार्थ युरोपातील साहसी वीर निघाले व भारतभूमीच्या किनाऱ्याला लागले.

डबघाईला आलेल्या हिंदू सत्ता आणि इस्लामी सत्ता त्यांनी अल्पावधीतच धुळीला मिळविल्या आणि भारतभर आपले साम्राज्य पसरविले.

७३. हिंदू श्रमिकवर्गातील जातीजातींतून लोक येशू खिस्ताच्या धर्मांचा स्वीकार करू लागले. तसे त्यांना शिक्षण मिळू लागले. नवे व्यवसाय मिळू लागले, वर्गांतर करण्याची संधी मिळू लागली. सत्तेच्या जवळपास जाण्याची संधी मिळू लागली, तशी खिस्ताबद्दल

त्यांना अधिक जवळीक वाटू लागली. केवळ आराध्य दैवत बदलत नव्हते तर व्यवसाय-परिवर्तनही करण्याचे स्वातंत्र्य मिळत होते. म्हणजे जातीच्या व्यवसायांतून सुटका करून घेता येत होती. आणि प्रतिष्ठित, पैसा देणारा व्यवसाय करता येऊ लागला होता. हा बदल अतिशय महत्त्वाचा बदल होता. हा बदल जेव्हा व्यक्तीच्या पातळीवरून राष्ट्राच्या पातळीवर जातो तेव्हा क्रांती झाली असे म्हणता येते. व्यवसाय-परिवर्तनाला, शिक्षणाला एवढे महत्त्व असते आणि ही महत्त्वाची उपलब्धी केवळ धर्मांतर करून मिळू लागली होती.

७४. युरोपात झालेल्या सामाजिक, वैचारिक व वैज्ञानिक उलाढालींची वादळे उरात घेऊन येणारे वाङ्मय भारतात येऊ लागले. आणि त्याचबरोबर नवे उद्योगधंदे हळूहळू भारतभर पसरू लागले. टेलिफोन, रेल्वे, कारखाने पसरू लागले. तसतसे हिंदू समाजातील जातीजातींतून लोक नव्या उद्योगधंद्यांत आणि औद्योगिक शहरांत येऊ लागले.

७५. जातीचे व्यवसाय आणि जातीची दडपणे दूर झाल्यामुळे उद्योगधंदे आणि औद्योगिक शहरे लोकांना मुक्ती देणारे वाटू लागले. त्याचबरोबर एकाच कारखान्यात वेगवेगळ्या श्रेष्ठ-कनिष्ठ जातींचे लोक एकाच दर्जाचे काम करताना पाहून एक भावनिक समता आणि जवळीकही वाढू लागली. आणि ह्या स्वातंत्र्यातून, ह्या व्यवसाय-परिवर्तनातून, ह्या भावनिक समतेतून पुढील सामाजिक चळवळीचा जन्म होणार होता.

७६. नवे व्यवसाय मिळाल्यामुळे स्वावलंबी झालेले आणि नव्या विचाराने प्रेरित झालेले ब्राह्मण विचारवंत हिंदू धर्माची समीक्षा करू लागले. पहिल्यांदा सर्वश्रेष्ठ असलेली, सर्व ग्रंथांनी पूजिलेली ब्राह्मण जात टीकेचा विषय होऊ लागली आणि महान आश्चर्य म्हणजे दैत्य, राक्षस, असुरानंतर हिंदू साहित्यात खलनायकही झाले. केशवसुतांच्या कवितेत हजारो वर्षांनंतर 'अंत्यज' 'मजूर' यांना स्थान मिळाले, सहानुभूती मिळाली आणि हरिभाऊंच्या आणि इतरही कादंबऱ्यांत 'ब्राह्मण' खल-नायक झाला.

एवढेच नव्हे तर जिचा गौरव हजारो वर्षे केला गेला ती मिळविण्यासाठी पुण्य करावे लागते, जाती-जातीत जन्म घेत जावे लागते. जिच्या संरक्षणासाठी अनेक स्वार्थी संकल्पना रूढ केल्या होत्या ती ब्राह्मण जात केशवसुत बिनदिक्कत नाकारून टाकतात. इतकी ब्राह्मण जात टीकेचा विषय झाली होती. हा चमत्कार का घडला ? कोणी घडविला ?

युरोपातील सामाजिक, वैज्ञानिक व औद्योगिक क्रांतीने जे ज्ञान-विज्ञान घडविले, जे यंत्रोद्योग निर्माण केले, त्या नवतेने सर्वश्रेष्ठ ब्राह्मण तुच्छ ठरविले, भारतीय हिंदू समाजाचे दुःख दैन्याचे आणि दास्याचे कारणही ब्राह्मण-क्षत्रिय ठरविले.

आणि म्हणूनच भारतीय साहित्यामध्ये पहिल्या प्रथम विधवेला स्थान प्राप्त झाले. जी

हिंदुधर्मात समाजात तुच्छ, तिरस्कृत, प्रेतवत मानली जात होती, ती विधवाही सहानुभूतीचा विषय झाली.

७७. वर्ग-समाजात सती, विधवा, बाल–जरठ विवाह आणि बाल–विधवा, विधवेचे ब्रह्मचर्य, पतिव्रता आणि जन्मोजन्मीचा जोडा ह्या कल्पना व प्रथा नसतात. ह्या प्रथा व कल्पना फक्त जाती-समाजात असतात.

७८. जात ही मर्यादित लोकसंख्येची टोळी असते, जर जातीत पुरुष जास्त असतील आणि स्त्रिया कमी असतील तर एका स्त्रीला एकापेक्षा अनेक नवरे असतील. कदाचित ते पांडवांप्रमाणे भाऊ असतील आणि एका बाईला अनेक नवरे असणे हे तिचे सद्‌भाग्य, सौभाग्य आणि सुखही समजले जाईल.

७९. जर जातीत पुरुष कमी असतील आणि बायका जास्त असतील तर एका पुरुषाला जास्त बायका असतील. सवतीमध्ये सख्य निर्माण करणाऱ्या संकल्पना तयार होतील. कारण जात टिकविण्यासाठी ह्या संकल्पनांची गरज असते.

८०. पण जातीत स्त्री आणि पुरुषांची संख्या समान असेल तर प्रत्येक उपवर तरुणीचा नवरा निश्चित असणारच. ह्या समसमान सख्या असलेल्या जातीत 'जोड्याची,' 'जन्मोजन्मीच्या जोड्याची' कल्पना वास्तवच असते. हिंदू साहित्यामध्ये ह्या जन्मोजन्मीच्या जोड्यांच्या कल्पनेला फार महत्त्व आहे. हा जोडा जन्मोजन्मी टिकविण्यासाठी अनेक व्रते, विधी आणि पूजा आणि सणवार हिंदू समाजात आहेत. तशाच अनेक कल्पनाही रूढ आहेत. ह्या जन्मोजन्मीच्या जोड्याच्या कल्पनेच्या पायावर अनेक कथानके रचली गेलेली आहेत.

८१. ख्रिस्ती वा इस्लामी समाज वर्ग-समाज असल्यामुळे तिथे स्त्रीवर गुलामी बंधने असूनही जन्मोजन्मीच्या जोड्याची कल्पना तिथे सुचली नाही. सुचणे शक्यही नव्हते. कारण तिथे जात नव्हती. त्यामुळे सती जाणे, बाल-जरठ विवाह सामाजिक गरज म्हणून होणे ह्या कुप्रथाही तिथे साकारल्या नाहीत.

८२. तर जात असल्यामुळे प्रत्येक उपवर मुलगी ही जातीतील कुणाची तरी पत्नी होणारच असते. म्हणजे जोडा असतोच आणि अशा जोड्या प्रत्यक्षपणे ठरलेल्या समाजात एखाद्याची बायको मेली तर ?

तर त्याला बायको देण्यासाठी एका अविवाहित तरुणाला ब्रह्मचर्य पाळणे भाग पडेल. किंवा परजातीतील स्त्री बायको करून आणावी लागेल. परजातीची मुलगी बायको केली तर त्याची आणि तिचीही जात जाते. असे होऊ नये म्हणून जी अजून कोणाची बायको नाही म्हणजे लग्नाजोगी झालेली नाही अशा मुलीशी त्याचे लग्न करून दिले पाहिजे.

बाल-जरठ विवाहाला कारण जात आहे. जात टिकविण्यासाठी ही प्रथा सुरू झालेली आहे.

८३. पुरुषाला दीर्घकाळ ब्रह्मचर्य पाळायला भाग पाडणे शक्य नाही. कारण तो पुरुष आहे. पिता आहे. अनेक स्त्रियांना गरोदर ठेवून जातीला अधिक सभासद देण्याची त्याच्यापाशी क्षमता आहे. बाई अनेक पुरुषांशी संबंध ठेवूनही एकच अपत्य देते. म्हणून त्याची बायको मेली तर त्याने लग्न केलेच पाहिजे.

८४. पण बाईचा नवरा मेला तर ती उणी पडली. कमनशिबी, पांढऱ्या कपाळाची ठरली. सावित्रीने नाही आपल्या तप-सामर्थ्याने व पुण्याने आपला अल्पायुषी नवरा परत मिळविला ? तसा प्रत्येक बाईने पुण्य करून, पावित्र्य करून आपला नवरा टिकवून धरला पाहिजे आणि त्याच्या आधी मेले पाहिजे व हे लेणे लेवून स्वर्गात गेले पाहिजे.

म्हणून जिचा नवरा जातो, ती दुर्दैवी आहे. तिने त्याच्याबरोबर गेले पाहिजे. तिला ठेवून करायचे काय ? एक तर तिला नवरा दिला पाहिजे. म्हणजे कोणातरी विवाहेच्छू तरुणीला ब्रह्मचर्य पाळायला लावले पाहिजे. अथवा परजातीत नवऱ्यापाठोपाठ जायला परवानगी दिली पाहिजे. असे करता येत नाही. म्हणून जिचा नवरा मेला आहे तिने नवऱ्याबरोबर मेले पाहिजे. अथवा मेल्यागत जगले पाहिजे. ब्रह्मचर्य पाळले पाहिजे.

जातींमुळे स्त्रियांवर गुलामीची अनेक बंधने आली. स्त्रीची स्थिती पशुवत केली गेली.

८५. बायबलानेही परमेश्वराची अवज्ञा करणारी म्हणून स्त्रीला अपराधी ठरविली. हिंदुधर्माने स्त्रीला अपराधी ठरविली नाही पण जातिसंस्थेने मात्र तिची अत्यंत दुर्दशा केली. तिला जात टिकविण्यासाठी अनेक बंधनानी जखडून टाकले. सती दिले, बाल-विधवा केले आणि तिला विधवा ठरवून अत्यंत क्रूर विटंबना केली.

खिस्ती स्त्री अपराधी मानली गेली आहे. पण ती वर्ग–समाजात जगत असल्यामुळे तिला नवरा मेला म्हणून मरावे लागत नाही. तिला नवरा मेला म्हणून विटंबित आयुष्य जगावे लागत नाही.

८६. जाती फार जुन्या आहेत. पण जुन्या हिंदुसाहित्यामध्ये विधवा, सती, आढळत नाहीत.

जाती फार जुन्या आहेत आणि भक्तवत्सल आणि जातिभेद न मानणाऱ्या प्रेमळ विठ्ठलाला अजरामर करणाऱ्या संतांना सती, विधवा, बालविधवा दिसल्या नाहीत.

८७. पण इस्लामी सत्ताधाऱ्यांना त्या दिसल्या. काहींनी तसे कायदे केले.

नंतर आलेल्या ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना सती, विधवा, बालविधवा दिसल्या आणि त्यांनी तसे कायदे करण्याचे प्रयत्न केले.

मुसलमान, ख्रिस्ती लोकांना स्त्रियांची ही दुर्दशा दिसावी आणि हिंदू कवी कलावंतांना हजारो वर्षे दिसू नयेत याचे कारण काय असावे ?

८८. राजा राममोहन रॉय यांनी झगडून कायदा करून घेतला. त्यासाठी प्रचाराचे काहूर उठविले. अनेक ख्रिस्ती धर्मोपदेशक ह्या दुःखावर बोलत होते. ख्रिस्ती धर्म स्वीकारून समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या बाबा पदमनजी यांनी ' यमुना पर्यटन ' ही कादंबरी १८५७ साली लिहून विधवांचा प्रश्न प्रथम साहित्यात आणला.

८९. म्हणजे हिंदू समाजाने निर्माण केलेली दुःखे अहिंदूंना जाणवतात, दिसतात. पण हिंदूंना दिसत नाहीत. पण जर त्या हिंदूंनी नवा धर्म वा नवा विचार स्वीकारला तर त्यांना हिंदूंची दुःखे दिसू लागतात.

' विधवा ', ' सती ', ' बालविधवा ' प्रथम दिसली हिंदुत्व नाकारणाऱ्यांना. ह्या केवळ जातीमध्ये जन्मल्यामुळे दुर्दैवी ठरलेल्या स्त्रियांना आश्रय करून देणारे ज्योतीराव फुले अथवा पंडिता रमाबाई हेही हिंदुत्व नाकारणारे. जातिभेद नाकारणारे. नंतर जे हिंदू पुढे आले त्यांनी नवे ज्ञान, नवा दृष्टिकोण स्वीकारलेला होता.

९०. म्हणजे असा निष्कर्ष काढता येईल की जोपर्यंत माणूस जातीची बंधने पाळतो, तिचे तत्त्वज्ञान मान्य करीत असतो तोवर त्याला माणसाचे मोल वाटत नाही. तो दुःखाला दुःख म्हणत नाही, दासतेला दास्य म्हणत नाही, शोषणाला शोषण मानत नाही. पण जेव्हा तो हिंदूंचा, जातीचा दृष्टिकोण टाकून देतो तेव्हा तो दुःखाला दुःख म्हणू लागतो. शोषणाला शोषण म्हणू लागतो. दास्याला दास्य म्हणतो.

९१. इथे जाती आहेत. सर्व हिंदू लेखक कवी जातीत जन्मतात. जातच त्यांची पहिली संस्कार–शाळा असते. जात त्यांना बालपणीचे मित्र आणि अनुभव देते. जातच त्याला सगेसोयरे भाऊ–बहीण आणि पत्नीही देते. जाती त्याला कौटुंबिक आणि भावनिक जीवन देते. म्हणजे जात त्याचे मन, त्याचे विचारआचार, वर्तन घडविण्याची कामगिरी करते. जातीमुळे त्याच्या विचारांवर संस्कार होत असतात. त्याच्या अहंकाराला, तिरस्काराला, प्रेम–द्वेषाला, लोभ–मत्सराला जातीने दिलेल्या पापपुण्याचा, देव, दैव, नियतीच्या कल्पना त्याच्या मनात वावरत असतात.

जात अनेक धार्मिक, जातीय बंधनांनी व्यक्तीला जखडून घेत असते. म्हणून जातीत जगणाऱ्याचे जीवन जगणे, विचार करणे एकसुरी होते.

९२. जातीत जगणाऱ्या हिंदू लेखकाला परजातींचा, परधर्मातील लोकांचा अनुभव

घेताना अडचण पडते. एक तर त्याला स्वजातीचे भय खात असते आणि परजातीचे त्याला नवेपणामुळे भय वाटत असते. तो जो अनुभव घेतो तो त्याच्या मनावर असलेल्या जातीच्या जाणिवेने. जातीच्या संस्काराने. म्हणून त्याचा अनुभव पूर्ण अनुभव होण्याला अडचण असते. किंवा त्याचा अनुभव पूर्ण अनुभव असू शकत नाही.

९३. दुसरी गोष्ट म्हणजे तो स्वजातीची चिकित्सा करू शकत नाही. आलेला स्वजातीचा अनुभव त्याला मोकळेपणाने मांडता येत नाही. तो वाईट असेल तर जात चिडू शकते. जात एक सत्ता असते म्हणून जातीची चीड नुकसान करू शकते. लेखकाला भाऊ, बहीण, मुलं–मुली असतात. त्यांची लग्न–कार्य करायची असतात. ती जातीतच होणार असतात. जातीने चिडून बहिष्कार टाकला तर ती लग्न–कार्ये होऊ शकत नाहीत म्हणून स्वजातीला रुचेल, पचेल, असेच बोलावे लागते. लिहावे लागते. म्हणजे हिंदू लेखकाला स्वजातीचा अनुभव सकसपणे मांडताना अडथळे येतात व परजातीचा अनुभव घेताना जातीने दिलेले संस्कार आडवे येतात. परधर्मात जाऊन अनुभव घेणे तर अधर्मच असतो. तर हिंदू लेखक असा जातीमुळे कोंडीमध्ये सापडलेला असतो.

९४. जुन्या साहित्यामध्ये तोचतोपणा आणि संस्कृत साहित्याची भाषांतरे, रूपांतरे, अनुवाद, सारांश, विस्तार आणि भाष्ये आणि पोथ्यापुराणांतीलच कथानके असण्याचे कारणदेखील हेच असावे. जातीबाहेर पडता येत नाही आणि जात स्पष्ट बोलू देत नाही. म्हणून प्रतिभा व्यक्त करण्यासाठी रूपांतर, भाषांतर हा उद्योग करावा लागतो.

९५. मग हरि नारायण आपटे यांना यमुना कशी दिसली? शंकर मामंजी कसा दिसला? केशवसुतांना 'अंत्यज' व 'मजूर' कसा दिसला? 'ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा', ही क्रांतिकारी घोषणा महाकवी केशवसुत आधुनिक मराठी साहित्याच्या भल्या सकाळी करू कसे शकले?

९६. पहिली गोष्ट म्हणजे युरोपातील अनेकांनी गरिबाची बाजू घेऊन शासन सत्तेला आव्हाने केली होती. वर्गविषमतेची जाणीव दिलेली होती. आणि भारतातील अहिंदूंना 'यमुना', 'शंकर मामंजी' दिसले होते. त्यांनी त्यांच्यासाठी आश्रयस्थाने खुली केली होती. पंडित रमाबाई आणि ज्योतीराव फुले कार्य करीत होतेच. म्हणजे जातीत जगणाऱ्या हिंदू लेखकांना 'यमुना' जाणवू लागली होती.

९७. आणि हरिभाऊंना जेव्हा यमू दुःखाचा विषय वाटली, शंकर मामंजी दुष्ट वाटला, तेव्हा त्यांनी त्याला काळ्या रंगाने रंगविला. खलनायक केला. हे जातीत राहून कसे करता येईल? अनेक यमुना व शंकर मामंजी समाजात असूनही कोणासच काही वाटत नव्हते. यमूला जातीने दिलेली दुःखे, त्रास, अपमान हे सार्वत्रिकच होते. स्त्री-जन्माची ती अटळ कहाणीच होती. पण ती हरि नारायण यांना भावली याचा अर्थ

असा आहे की हरि नारायण थोडे तरी जातीबाहेर आलेले होते. ते पूर्णपणे जातीत असते तर यमूला ते सहानुभूती देऊ शकले नसते.

९८. ब्राह्मणाला सर्वच भूदेव मानत होते. पण ज्योतीराव फुल्यांच्या आणि खिश्चन धर्मीयांच्या आणि सुशिक्षित ब्राह्मणांच्या चळवळीमुळे पुढे ब्राह्मण 'ब्रह्मराक्षस' झाला. सत्यशोधक काळात तर हा 'ब्रह्मराक्षस' निंदेचा टवाळीचा विषय झाला. म्हणजे अनेक काळचा भूदेव, सर्वोच्च ब्राह्मण राक्षसात जमा होऊ लागला.

९९. याचे कारण लोक जातीतून थोडेसे बाहेर आले. लोकांना बाहेर कोणी आणले ? तर नवे राज्य, नवे उद्योगधंदे, नवी उत्पादन–साधने आणि नवा सामाजिक आदर्श, नवा ज्ञानविज्ञानाचा उदय आणि जाती जातींतून फुटून उदयाला येणारे नवे वर्ग. विज्ञानाचा साक्षात दिसणारा अनुभव पाहून लोक जातीची रूढी–बंधने तोडू लागले. म्हणून जुन्याची राखणदारी करणारे दुष्ट, दैत्य वाढू लागले.

१००. खिश्चन धर्मीयांनी आणि हिंदू समाजसुधारकांनी सुरू केलेल्या समीक्षेमुळे साक्षात यंत्र–तंत्राच्या क्रियाशीलतेमुळे, नवे उद्योगधंदे आणि नवे वर्ग उदयाला येऊ लागल्यामुळे, शासन धर्माचे न राहता कायद्याचे झाल्यामुळे आणि ब्राह्मण–क्षत्रिय ह्या हिंदू सत्ताधाऱ्यांचा सर्व क्षेत्रांत दणदणीत पराभव होत असल्यामुळे समग्र हिंदू समाजातच बेचैनी निर्माण झाली होती. दुफळी पडली होती. एका बाजूला नव्याचा पुरस्कार करणारे होते. अन् हे बहुतेक तरी उपजीविकेचे धंदे करणारे होते आणि दुसऱ्या बाजूला परंपरावादी होते. ब्राह्मणेतर समाजाचे नेते, कार्यकर्ते, शिक्षणाचा प्रचार करीत होते. शाळा बोर्डिंग्स काढीत होते. ब्राह्मणांवर टीका करीत होते. सरकार नवे उद्योग काढते आहे म्हणून त्याचे स्वागत करीत होते. गिरण्याकारखान्यांत गावचे गरीब, कामगार म्हणून जात होते. शिवराम जानबा कांबळे, गोपाळबुवा वलंगकर फौजेत महारांना भरती करा म्हणून सरकारकडे मागणी करत होते. हिंदू धर्मावर आणि ब्राह्मण–वर्गावर समाजाच्या सर्व थरांतून हल्ले सुरू झालेले होते. सर्व ब्राह्मणेतरांचे शत्रू फक्त ब्राह्मणच होते.

हिंदू समाजाच्या सर्व थरांना वर्गांतर हवे होते. हिंदू वर्णव्यवस्थेने व जातीने माथी मारलेली कर्मे, दैन्य, दास्य, दुःखे लोकांना फेकून द्यायचे होते. कायस्थ, सारस्वत, प्रभू, भंडारी, मराठा, महार, चांभार सर्वचजण जातींच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जोखडांतून सुटू बघत होते. वर्गांतर मागत होते.

१०१. पण वर्गांतर करण्यासाठी वेगवान औद्योगीकरण व आधुनिकीकरण व्हायला पाहिजे होते. क्रांतीनंतर लेनिन–स्तालीनने ते ज्या वेगाने जुनाट रशियाचे औद्योगीकरण, आधुनिकीकरण केले तो वेग हवा होता आणि हा वेग द्यायला ब्रिटिश

साम्राज्य–सत्ता तयार नव्हती. कारण वेग तिच्या वर्ग–हिताला, साम्राज्यवादी आर्थिक धोरणाला बाधक होता.

साम्राज्य–सत्तेला प्रचंड भारत एक प्रचंड वसाहत, प्रचंड उतार पेठ, प्रचंड कच्चा माल देणारी व पक्का माल घेणारी बाजारपेठ हवी होती.

साम्राज्य रक्षणासाठी आवश्यक तेवढेच धंदे अथवा ब्रिटनमधल्या उद्योगधंद्यांना पूरक ठरतील असेच उद्योगधंदे आणि व्यापारांचे, कराचे धोरण सरकारने ठरविले होते. त्यामुळे धंद्यांच्या विकासाचा वेग आणि शिक्षणाचा वेग आणि नमुना ती त्या धोरणाने ठरवीत होती.

१०२. ह्या अल्पशा प्रयत्नामुळे देशातील काही शहरे व लगतचे टापू आधुनिक, धंदे व शिक्षणक्षेत्रे झाली. बाकीचा अवाढव्य मुलूख जुन्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जोखडात, अंधारात धडपडत होता.

तुलना केली तर जुना भारत फार प्रचंड होता. जुनी व्यवस्था फार प्रचंड होती. वर्ण-व्यवस्था सर्वत्रच होती. ब्राह्मण–क्षत्रियांची सत्ता फार मोठी होती.

शिक्षण आणि उद्योगधंदे अल्प होते. परंतु बाजूला सक्रिय झालेले विश्वविजयी विज्ञान होते. शिकलेल्या लोकांच्या हातात जगाच्या पाटीवरील शूरवीर क्रांतिकारक सुधारकांची चरित्रे होती. विचार होते. आणि नवे उद्योगधंदेही त्यांच्याच बाजूचे होते. एक रेलगाडी जुन्या शेकडो भाकड कथा चिरडून गेली होती.

लोकांना वेगवान उद्योगविकास हवा होता. त्यांना जुन्या उत्पादन–पद्धतीच्या, आणि समाजव्यवस्थेच्या बोजातून सुटायचे होते. विचाराला बळकटी येण्यासाठी नवे व्यवसाय हवे होते. जुने व्यवसाय टाकता येतील अशी स्थिती हवी होती.

१०३. धर्मांतर करून आर्थिक दर्जा बदलत नाही. नवा विचार घेऊन समाजांतील स्थान बदलत नाही. वर्गांतरासाठी उद्योगधंदे पाहिजेत. गिरणी कारखान्यांत कामाला लागले की गाव सुटते. गावाची गुलामी नाहीशी होते. एवढेच नव्हे तर जातही थोडी बसून जाते. पण सरकार साम्राज्यवादी होते. ते आपले स्वार्थ राखीत भारतीय भांडवलाला वाव द्यावा की नाही हे बघत होते. वेगाने देशाचे आधुनिकीकरण झाले असते तर सुधारक विजयी झाले असते.

पण सरकारलाच सुधारकांचा जसा विजय नको होता, तसाच जीर्णमतवाद्यांचा पूर्ण पराजयदेखील नको होता. ह्या दोन्ही गोष्टी साम्राज्याला हितकारक नव्हत्या.

१०४. म्हणून ब्रिटिश साम्राज्य कायदे करत होते. पण दैन्य–दुःखाशी बांधलेल्या जातीची सुटका करीत नव्हते. व्यक्ती बदलल्या तर सरकारला पाहिजे होते. पण सर्व जात

बदलण्यासाठी सरकार काही करायला तयार नव्हते. सरकारला सामंती व्यवस्था जपायची होतीच. वर्णव्यवस्था नष्ट करायची नव्हती.

पण नव्या जुन्यामध्ये, खालच्या आणि वरच्या जातींमध्ये संघर्ष पेटताही हवा होता. आणि तो संघर्ष चाललेला होता. हा संघर्ष जीर्णमतवाद्यांना नको होता. त्यांना सुधारणावाद्यांना नष्ट करायचे होते. ते त्यांनी पुढे नष्ट केलेही.

१०५. भारतीय हिंदू समाज जातिबद्ध समाज आहे. हिंदू लेखक जातीत जन्मतो. जातीत वाढतो. जातीपासूनच तो पहिले धडे घेतो. पण तो जर हिंदू समाजाने अस्पृश्य मानलेल्या जातींमध्ये जन्मलेला असेल तर त्याच्या जातीवर लादलेले दुःख, दैन्य, दास्य, हीनदीनपणा आणि तिचा कनिष्ठ दर्जा आठवून त्याला प्रथम जातीबद्दल अप्रीती निर्माण होते. नंतर वरिष्ठ जातींबद्दल आणि हिंदू धर्मांबद्दल. म्हणून तो धर्म आणि त्याची जात टाकून देण्याच्या मनःस्थितीत लवकर येतो.

पण तो उच्च जातीचा असेल तर त्याच्या टायी दलित श्रमिक–हिंदू जातीतील लेखकांची स्वजातीबद्दल नकाराची प्रवृत्ती नसते. उलट त्याला त्याच्या जातीबद्दल, वर्णव्यवस्थेबद्दल, हिंदू धर्मांबद्दल आदर, पुण्यभाव असतो. कारण त्या धर्माने, जातीने त्याला ऐहिक लाभ दिलेले असतात. त्याच्या जातीचा इतिहास थेट वेदापर्यंत असतो. वेद तर अपौरूषेय. त्याच्या जातीच्या पुराण पुरुषाला इतिहास–पुराणांतील राजे वगैरे वंदनीय मानत असतात. हिंदू सत्तेत, इतिहास–पुराणांमध्ये, हिंदू समाज संस्कृतीमध्ये त्याच्या जातीला अग्रपूजेचा मान असतो. आणि विशेषाधिकार असल्यामुळे पूर्वजांनी कमविलेली संपन्नताही असते.

१०६. कोणतीही जात स्थिर, अविचल असते. पण जीवन वेगवान असते. जीवनामध्ये ज्ञान, विज्ञान, चमत्कार घडवीत असते. क्रांत्यांचे, संघर्षांचे कल्लोळ उठवीत असते. वर्ग–संघर्ष, आणि स्वार्थाचे संघर्ष, युद्धे उसळत असतात. कोणी वर येत असतो. कोणी खाली कोसळत असतो. जगामध्ये आणि जीवनामध्ये कितीही वादळे उठली तरी जात दगडासारखी स्थिर असते.

१०७. जातीत जाण्यासाठी, श्रेष्ठ, कनिष्ठ होण्यासाठी काहीही कर्तृत्व दाखवावे लागत नाही. फक्त दोन भिन्न लिंगी कामोत्सुक शरीरे एकत्र यावी लागतात. जन्म होतो. जात मिळते तर अशा आपोआप मिळालेल्या स्थिर जातींत लेखक जगत असतो. जीवन गतिमान असते. जीवन पुढे जात असते. जात भूतकाळाशी बांधलेली असते. भूतकाळाने जातीला खूप देणी दिलेली असतात. जात मोठी विलक्षण संस्था आहे. ती आपल्या पोटात अनेक वेगवेगळे वर्ग एकत्र ठेवीत असते. जातीची ही इतिहास पुराणाने दिलेली देणी जातीच्या श्रीमंत, मध्यम, गरीबवर्गाला आदरणीय वाटत असतात आणि ह्या

दानामुळे हे तिन्ही वर्ग आपले स्वाभाविक संघर्ष विसरून ह्या जातीच्या दातृत्वाने सलोख्याने नांदतात.

१०८. पण जात काही दुःखेही देत असते. ही दुःखे जात टिकविण्याच्या हेतूने उद्भवलेली असतात. विधवा झालेल्या तरुण स्त्रीच्या, विधवा म्हातारीच्या सर्व विटंबना व शिक्षा सारख्याच असतात. जातीमुळेच अनेक 'यमू', 'शारदा', 'शंकर मामंजी' तयार झालेले असतात.

ही दुःखे आणि दुष्टावा जातीतून निर्माण झालेला असतो, तो सहन करावा लागतो.पण जातीचे समाजातील स्थान, त्यामुळे होणारे आर्थिक राजकीय लाभ ही दुष्टता व दुःखे सुसह्य करते.

ब्रिटिशांची सत्ता आल्यानंतर व नवे ज्ञान विज्ञान आल्यानंतर हिंदू धर्माची, जाति–व्यवस्थेची आणि त्याने निर्माण केलेल्या चिरंजीव दुःखाची जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हापासून वरच्या जातीतील विवेकी व्यक्ती अस्वस्थ होऊ लागली. दुभंगू लागली. जातीने अमर करून दिलेली दुःखे आणि लाभ पाहून द्विधा होऊ लागली. ज्या लेखकाची स्थिती द्विधा होते, आणि समाजात जातीची समीक्षाही सुरू असते, तेव्हा लेखक, कवी समीक्षकांच्या बाजूने होऊन 'यमू', 'शारदा' ही जातीने दिलेली दुःखे वेशीवर टांगतो. जातीविरुद्धच कृत्य करतो. पण जातीबाहेर जात नाही. 'यमू', 'शारदा', 'शंकर मामंजी' ही दुःखे आणि दुष्टता कोणी निर्माण केली याचा तो विचार मांडत नाही. जातीला, धर्माला दोष देत नाही. स्वभावावर तो भर देतो. पण ते पुरेसे खरे नसते. हॅम्लेट, अथेल्लो, आणि शेक्सपिअरच्या अनेक पापांची दुःखे त्यांच्या स्वभावामुळे निर्माण होतात. तीव्र होतात. यमू, शारदा यांची दुःखे त्यांच्या स्वभावामुळे निर्माण झालेली नाहीत. तर ती दुःखे जातीने निर्माण केलेली आहेत. त्यांचे स्वभाव जातिवैशिष्ट्येच आहेत.

गडकऱ्यांच्या सिंधूचा स्वभाव हा तिचा आहे की, हिंदू सतीत्वाचा आदर्श आहे ? सत्यवानाचा प्राण मिळवून देणारी सावित्री, खूप सहन करणारी सीता ह्या आदर्शाप्रमाणे सिंधू नाही ? सिंधू ह्या आदर्शाप्रमाणे आहे. पतिपरायणता, पति–पूजा हा हिंदू स्त्रीचा आदर्श आहे. आणि तोही जातीनेच दिलेला आहे.

१०९. जाती जेवढी उच्च असेल, तेवढ्या जातीच्या भिंती आणि जात शीर्षस्थानी ठेवण्याचे कायदेकानून कडक असतात. म्हणजेच स्त्रीवर अधिक कठोर बंधने येतात. कारण स्त्री गर्भधारण करते. जात पोटात वाढवते. ही स्त्री मुक्त असली, कडक बंधनात नसली तर कोणतीही जात पोटात वाढू शकते. म्हणून जात टिकविण्यासाठी स्त्रियांवर अनेक बंधने असतात. 'सती' का जायचे ? कडक ब्रह्मचर्य विधवेने का पाळायचे ? तिचे देहसौंदर्य नष्ट का करायचे ? तिला अवमानित का ठेवायचे ? तर तिने

बाहेर पडू नये, दुसऱ्या जातीत जाऊ नये, दुसरी जात जन्माला घालू नये म्हणून तिला कोंडून ठेवण्यासाठी केवढा खटाटोप जातीने केला आहे. किती रूढी, संकेत, शिव्या, संस्कार उत्पन्न करून ठेवले आहेत.

११०. हे सर्व लक्षात आले तरी उच्चवर्णीय लेखक जातीविरुद्ध ब्र काढीत नाही. तो आपला राग यमूला अधिक निर्बल, दुःखी, करुणास्पद करून आणि शंकर मामंजीला अधिक दुष्ट करून व्यक्तीवर व्यक्त करतो. जाती उद्ध्वस्त करण्याचा संदेश तो देत नाही. 'अंकल टॉम्स कॅबिन' आणि 'यामा', 'जंगल' ह्या कादंबऱ्या अमेरिकेत आणि जगात खळबळ उडवून देतात. सत्तांना कायदे करायला भाग पाडतात. सज्जन लोकांना लढायला उत्सुक करतात. पण हिंदू लेखक जातीचा अटळ परिणाम असलेल्या 'सती', 'विधवा', 'बाल विधवा' आणि त्यांची दुःखे मांडून जाती मोडण्याचा संदेश देत नाहीत. असे का ?

कारण त्यांची जात सर्व पातळ्यांवरून ऐहिक लाभ देते म्हणून ? ती हिंदू समाजाच्या शीर्षस्थानी आहे म्हणून ? फक्त केशवसुत याला अपवाद आहेत. प्रारंभापासून अंतापर्यंत ते नव्या युगाचो रचना करण्यात मग्न आहेत. तसेच आगरकरही सर्व प्रहार सहन करीत आपला बुद्धिवाद मांडत होते.

पण इतर ललित लेखक कुठे होते ? तेव्हा सामाजिक सुधारणावादी राष्ट्रवाद आणि सामाजिक सुधारणा विरोधी राष्ट्रवाद असा संघर्ष सुरू झालेला होता.

सामाजिक सुधारणा म्हणजे पारतंत्र्याचा पुरस्कार होता काय ? सामाजिक सुधारणा म्हणजे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार होता काय ? आणि सामाजिक सुधारणा म्हणजे इंग्रजांना शरण जाणे होते काय ? साम्राज्य टिकविणे होते काय ?

असे काही होणार नव्हते. समाज आधुनिक होणार होता. समाज आधुनिक होतो तेव्हा तो जातिभेद टाकून देतो. प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी देतो. अस्पृश्यता वगैरे गोष्टी व्यर्थ ठरवतो आणि वर्ग मान्य करतो. जाती जाऊन वर्ग यावेत अशी अपेक्षा करतो.

महात्मा फुले शूद्र-अतिशूद्रांना एक व्हायला सांगत होते. याला कारण सावकार, भट, सरकारी अंमलदार त्यांचे शोषण करीत होते. आणि त्यांच्या उद्धाराचे कार्य पुढारलेले ब्राह्मण वगैरे लोक करीत नव्हते म्हणून.

शूद्र-अतिशूद्र जवळ आले, जातीच्या भिंती तुटल्या तर वर्ग-समाज होतो. जगाच्या पाठीवर जाती नाहीत, वर्ग आहेत हे माहीत झाल्याने शूद्र-अतिशूद्रांनी एक व्हावे हे सांगणे क्रमप्राप्त आहे.

आणि आगरकर इत्यादी समाजसुधारक तरी वेगळे काय सांगत होते. बुद्धीच्या कसोटीवर सर्व पारखून पाहा, ग्रंथप्रामाण्य अथवा रूढिप्रामाण्य मानू नका आणि अधिक जवळ या.

यामध्ये चुकीचे काय होते ? राष्ट्रविरोधी काय होते ? इंग्रजधार्जिणे काय होते ? पारतंत्र्य टिकविणारे काय होते ?

मग चिपळूणकर, टिळक आणि इतर सर्वच पारंपरिक लोक मोठ्या अग्रपणाने विरोधी का गेले ? एवढे क्रूर का झाले ?

सामाजिक सुधारणावादी राष्ट्रवादाने यमूला, शारदेला, शंकर मामंजीला ओळखू शकणारी दृष्टी आणि धैर्य दिले होते. आणि जातीत जगणाऱ्या लेखकांना हे माहीत असूनही, आणि समाजातील दुःखे वैगुण्ये दिसत असूनही हे जातीत जगणारे उच्चवर्णीय लेखक पुनरुज्जीवनवादाच्या बाजूने उभे का राहिले ?

ते इंग्रजसरकारविरोधी लढ्यात उतरणार होते काय ?

त्यांना कायद्याचे राज्य नको होते काय ? त्यांना आधुनिक यंत्र-तंत्रे आणि उद्योगधंदे नको होते काय ? फुले-शाहूमहाराजांमुळे जागृत झालेल्या शूद्रअतिशूद्रांना त्यांचा विरोध होता काय ? त्यांना शारदा, यमू, शंकरमामंजीचा समाजच समाज आहे असे वाटत होते काय ? मग ते वर्तमान, वास्तव टाकून गतकालाकडे का पळाले ? कारण जाति-व्यवस्था धोक्यात आली आहे असे त्यांना वाटू लागले होते. विज्ञानामुळे, ज्ञानामुळे, कायद्याच्या राज्यामुळे खिश्चन मिशनऱ्यांच्या टीकेमुळे शूद्र-अतिशूद्रांच्या जागृतीमुळे, आगरकर, फुले, शाहू महाराज यांच्या कार्यामुळे जाति-भेद, जाति-वर्चस्व धोक्यात आले होते.

आणि हा धोका ते नाहीसा करणार होते काय ? कायद्याचे राज्य बदलून ते मनुस्मृतीचे राज्य आणू शकणार होते काय ? बाष्पशक्तीला मागे रेटून, आणि विजेच्या उरावर पाय देऊन वीज आणि विज्ञान ते नष्ट करणार होते काय ? आणि ही सारी अस्वस्थता निर्माण करणारे इंग्रजांचे बलिष्ठ राज्य ते बुडविणार होते काय ?

यापैकी आपण काहीच करू शकत नाही हे माहीत असूनही केवळ जातीच्या स्वाभाविकतेमुळे सर्वच ब्राह्मण आणि तत्सम पुनरुज्जीवनवादाकडे वळले.

त्यामुळे झाले काय ? यमू, शारदांना अजून काही जोडीदार होणार होते ते जोडीदार आले नाहीत. आले घोडे, पडझड झालेले किल्ले. बेनाम झालेली भुयारे. निरर्थक ठरलेल्या व हारलेल्या ढाल तरवारी, भाले आणि हर हर महादेव, आणि अल्ला हो अकबरच्या गर्जना करणारे ते शिपाई. सरदार. शिलेदार. ती देवळे आणि देवळातल्या त्या आणाभाका. चमत्कार.

आणि गदा, तिर कमटे, लाकडी रथ वापरणारे ते पुराणातील वीर. ते ब्राह्मण वगैरे.

एकाकडे विश्वविजयी विज्ञान. त्याचे साक्षात दिसणारे चमत्कार, बाष्प आणि विद्युत्-शक्तीचा होऊ लागलेला वापर. त्या काळात मराठी साहित्य सरितेच्या दोन्ही थड्या पौराणिक, ऐतिहासिक पात्रांनी गजबजून गेल्या होत्या.

कारण हिंदू पुनरुज्जीवनवादाने, हिंदुत्ववादी राष्ट्रवादाने हिंदुसमाजसुधारणावादी राष्ट्रवादावर तात्पुरती मात केली होती, म्हणून ऐतिहासिक, पौराणिक ब्राह्मण-क्षत्रियांची मराठी साहित्यामध्ये भाऊगर्दी झाली होती.

हे साहित्यामध्ये ब्राह्मण-क्षत्रिय क्षणाक्षणाला विजयी होणाऱ्या विज्ञानावर मात करणार नव्हते. हे ब्राह्मण-क्षत्रिय रेल्वे, रोड, ब्रीज, गिरणी कारखाने उखडून ठेवणार नव्हते. आणि ह्यामुळे जाती-जातीत जन्माला येणारे नवे वर्णसंभवही नष्ट करणार नव्हते. हे अशक्यच होते.

पण जातीत जगणाऱ्या लेखकांना हे स्वप्नरंजन करावे लागले. आपल्या गत वर्णवर्चस्वाचे, सर्वश्रेष्ठत्वाचे, वर्णव्यवस्था टिकविण्यासाठी लढलेल्या वीराचे स्मरण करावे लागले. पण कसे ?

महात्मा फुल्यांना, आगरकर, रानड्यांना धर्मद्रोही म्हणता येत नव्हते, जरी ते धर्मद्रोह करताहेत असे जीर्णमतवादी ब्राह्मणांना मनापासून वाटत होते. ब्राह्मण-विरोधी टीकाही धर्मविरोधी होतीच.

म्हणून हिंदु मुसलमान सत्तेच्या संघर्षाचा काळ कथाविषयक म्हणून निवडला गेला काय ? तेव्हा एक धर्मसंकट आले होते. आताही एक धर्मसंकट आले आहे. कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे ? विज्ञान आले आहे, दडपलेले शूद्र-अतिशूद्र बोलू लागले आहेत. आणि त्याच्या जोडीला ब्राह्मणही आहेत. हे केवढे संकट.

पण स्वातंत्र्याच्या मागणीकरिता हिंदु मुसलमानांच्या लढायाची, त्या जुन्या शत्रुत्वाची खरोखरीच गरज होती काय ?

कायद्याचे राज्य खोटे आहे, विज्ञान खोटे आहे, बुद्धिवाद दुष्ट आहे, शब्दप्रामाण्य खरे आहे. वर्णवाद खरा आहे. आणि ब्राह्मण वर्चस्व खरे आहे. बाकीचे सर्व खोटे आहे, पापमय आहे असे लोकांना पटवून द्यायला पाहिजे. पण हे पटवून देणे शक्य नव्हते. म्हणून हिंदू मुसलमान सत्तांचा काळ घेतला गेला.

मुसलमान खलनायक व्हावा आणि त्या जुन्या शत्रुत्वाची आठवण यावी असे काही घडले नव्हते. जातीय दंगे सुरू झाले नव्हते. इंग्रजांच्या नेतृत्वाखाली लढून मुस्लिमांनी हिंदूंची राज्ये कोसळवून पाडली नव्हती. शनिवारवाड्यावर युनियन जॅक कोणी रहीमतखानने चढविला नव्हता. उलट मुसलमान अतिशय कडवेपणाने इंग्रजांशी लढले होते. १८५७ चे

युद्ध हिंदु-मुस्लीम सेनादलांनी बादशहाच्या नेतृत्वाखाली लढवले होते. इंग्रजांचा द्वेष मुसलमान दीर्घकाळ करत होते. इंग्रजी भाषा शिकवण्याचे, व इंग्रजांची चाकरी करण्याचे त्यांनी नाकारले. पण हिंदू ब्राह्मण इंग्रजी शिकून शासन यंत्रणेत सामील झाले होते. इंग्रजांशी यशस्वी संघर्ष करणारे शेजारील राष्ट्रातील मुसलमान इथल्या मुसलमानांना खरे नायक वाटत होते. इंग्रजांची सत्ता मोडून काढण्यासाठी ते परदेशी गेले. तरी राष्ट्रीय जागरणाच्या काळी मुसलमान शत्रू म्हणून, खलनायक म्हणून का चितारले ? उलट इंग्रजांचा भयंकर द्वेष करणारा मुस्लीम सरदार, शिपाई हाच मुळी कादंबरी, नाटकाचा नायक, विषय व्हायला हवा होता.

दुसरी गोष्ट म्हणजे इंग्रजी आणि इस्लामी सत्तांचा संघर्ष आणि १८५७ चे बंड नजीकच्या कालखंडात घडलेले. तसेच हिंदू सत्ता आणि इंग्रज यांचा संघर्ष अलीकडील काळातला. आपले राज्य राखण्यासाठी या दोन्ही सत्तांनी इंग्रजांशी आपआपल्या कुवतीनुसार सामना दिला. त्यावेळी मुस्लीम सत्ताधाऱ्यांच्या सेनेत हिंदू–मुस्लीम सरदार शिपाई होतेच तसेच हिंदू सत्ताधाऱ्यांच्या सेनेत हिंदू–मुस्लीम सरदार शिपाई होते. ह्या संमिश्र सत्तेने इंग्रजांशी लढाई दिली.

हे हिंदू–मुस्लीम राजे, सरदार आणि दोन्ही धर्मांतील शिपाई राष्ट्रीय जागरणासाठी योग्य अशी कथावस्तू देतात ती भावी काळासाठी उपयुक्त आणि अर्थपूर्ण होते. मुस्लिमांची संस्थापक व संघर्षात्मक ताकद दुर्लक्ष करण्याएवढी नव्हतीच आणि ते या भूमीचेच पुत्र होते, याच मातीवर त्यांच्या पिढ्यान पिढ्या पोसलेल्या. ते पूर्णपणे भारतीय आणि इंग्रजां-विरोधीच्या संघर्षात ते हिंदूएवढेच महत्त्वाचे होते आणि पुढेही असणार होते. असे असतानासुद्धा हिंदु–मुस्लिम ऐक्याची एवढी उदंड आणि राष्ट्रतेजाने तळपणारी कथानके नजीकच्या इतिहासात खच्चून भरलेली असताना हिंदू लेखकांचे लक्ष ह्या कथानकाकडे का गेले नाही ?

इंग्रजी सत्तेचे भय वाटत होते म्हणून ? की इंग्रजी सत्तेबद्दल आदर, प्रेम वाटत होते म्हणून ? मुसलमानाबद्दल तिरस्कार वाटत होता म्हणून ? मुस्लीम नको वाटत होते म्हणून ? ते नकोसे का झाले होते ?

१११. मुस्लीम सत्ता आणि हिंदू सत्ता लढल्या म्हणून ? पण मुस्लीम सत्ता मुस्लीम सत्तांशीही लढल्या तशाच हिंदुसत्ताही हिंदुसत्तांशी लढल्या. लढणे, राज्यविस्तार करणे हे सत्तेचे स्वाभाविक कार्यच असते. त्याला अपवाद कोणत्याही धर्माची स ा नसते. अगदी भगवान बुद्धाची पूजा करणाऱ्या सत्ताही लढल्या आणि त्यांनी संहार केलेला आहे.

हिंदु सत्ता हिंदु सत्तांशी लढल्या. इस्लामी स ा इस्लामी सत्तांशी लढल्या. ह्या लढाया कादंबरीचा विषय होऊ शकतात. हिंदू सत्तेतील चांगला राजा हिरो होईल. वाईट हिंदू

राजा खलनायक होईल. इस्लामी सत्तेचा चांगला राजा हिरो होईल. वाईट राजा खलनायक होईल. पण ह्या लढाया कथा कादंबरीचे विषय झाल्या नाही.

११२. तसे पहिले तर मराठी कादंबरी, नाटकांमध्ये मुसलमान शत्रू, खलनायक झाले तेव्हा ते काही अरबस्तानात, तुर्कस्तानात कादंबरीतील विजय पाहून पळून जाणार नव्हते. त्या देशाशी त्यांचा काहीही संबंध नव्हता. त्यांची जन्मभूमी, मातृभूमी भारत देशच होती. ते अलग वाटतात त्याला करण जातिसंस्थेने त्यांना अलग पाडले म्हणून. हिंदू शूद्र-अतिशूद्रही मुसलमानांएवढेच ब्राह्मणांना दूरचे होते आणि हिंदू शूद्र–अतिशूद्रांना ब्राह्मण तर फार फार दूरचे होते. त्या मानाने मुसलमान जवळचे होते. हा दुरावा, परकेपणा जातिसंस्थेने निर्माण केलेला.

११३. मराठी साहित्यामध्ये जेव्हा मुसलमान खलनायक झाले होते तेव्हा इस्लामी समाजही जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था मानीत होता. म्हणजे इस्लामी समाजही हिंदू समाजाची वेगळी प्रतिकृती झाली होती. तिथेही जाती होत्या. फक्त कुराण, पैगंबर, मशिद, अहिंदू राहिली होती. मुस्लीम समाजाने हिंदू समाजरचनेचा आकृतिबंध स्वीकारलेला होता.

असे असतानाही हरि नारायण आपट्यांसह अनेक हिंदू लेखकांना हे सरळ सोपे ज्ञान का झाले नाही ? त्यांना हिंदू मुसलमान सशस्त्र संघर्षाची कथानके का निवडावी लागली ? कोणत्या सामाजिक राष्ट्रीय गरजेतून त्यांनी हे कथाविषय निवडले.

इंग्रज विरुद्ध इस्लाम, इंग्रज विरुद्ध हिंदू, सुलतान विरुद्ध हिंदु-मुसलमान प्रजा, महाराजा विरुद्ध हिंदु-मुसलमान प्रजा, हे कथाविषय हिंदू लेखकांना का दिसले नाहीत ? मुसलमान त्यांना आपले का वाटले नाहीत ? अत्याचार सत्ता करतेच मग ती हिंदू असो, ख्रिस्ती असो, बौद्ध असो वा इस्लामी असो. अत्याचार हिंदू सत्तांनी केले नाहीत ? अस्पृश्यता हिंदूनी शतके न शतके जपली नाही ? कनिष्ट जातींना शतके न शतके ज्ञानापासून, मानापासून वंचित ठेवले नाही व अगतिक स्त्रियांना सती दिले नाही ? यमू, शारदा करून छळले नाही ? पण हे सर्व अधर्म आहे आणि धर्म, वर्ण वर्चस्वाला आव्हान आहे शूद्र अतिशूद्राची जागृती. अधर्म आहे कायद्याचे राज्य.

हरि नारायण आणि इतर कादंबरीकार नाटककारांना राग वाटत होता. नव्याने उद्भव लेल्या सामाजिक संघर्षाने ते बेचैन झाले होते. त्यांच्या जातीला आलेल्या आव्हानामुळे.

म्हणून ज्यांनी प्रथम पराभूत केले आणि जे परतंत्र झालेत, ज्यांची दमन करण्याची शक्ती नष्ट झालेली आहे पण संकट इस्लामी संकटाप्रमाणेच अस्तित्वाला आव्हान देणारे आले आहे. म्हणून त्यांनी सोयीसाठी खलनायक मुस्लिम केले.

आणि जातीत जगत असल्यामुळे आणि जात खूप लाभ देणारी असल्यामुळे आणि त्या जातीला आव्हान देणारे, सुधारणा मागणारे म्हणजे काही लेखकांना अत्याचार करणारे गुंडपुंड वाटणेही शक्य आहे, आणि चहूबाजूंनी होणारे प्रहार पाहून स्वस्थिती स्त्रियांप्रमाणे शोचनीय, दयनीय वाटणेही शक्य आहे.

आणि दुसरेही खरे की हिंदू लेखकांना मुस्लिम नायक मिळणे कसे शक्य आहे ? त्या समाजाचा, त्या कुटुंबाचा दीर्घ परिचय असल्याशिवाय नायक मिळणे अवघड पण खलनायक शोधून काढणेही अवघड. पण खलनायक तर करायचा आहे. आणि हिंदूंच्या दृष्टीने खलनायक करायचा सर्वांत सोपा मार्ग खलनायकाला बायका पळवायला लावणे. बायकांवर त्याला अत्याचार करायला लावायचे.

पण सर्वच धर्मांच्या नीतितत्त्वांनी सद्गुणांची तरफदारी केलेली आहे. दुर्गुणांची निर्भत्सना केलेली आहे. व सद्गुण ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. चोरी, दरोडे, फसवणूक, विषमतापूर्ण समाजाची वैशिष्ट्ये आहेत. वाघ, लांडगे हे आपल्या मादीच्या शीलाचा संशय घेत नाहीत आणि तिला ठार करीत नाहीत. आदिम समाजात स्त्री स्वच्छंद होती. आदिवासी समाजामध्ये आहेही. माणसाला वाईट कृत्य करायला लावणारी आहे व्यवस्था. माणसाच्या मूलभूत विचारांवर प्रभाव पाडतात त्या व्यवस्थेने निर्माण केलेले संस्कार ! सीतेला घराबाहेर काढणारा केवळ धोबी व राम होता काय ? ह्या दोघांवर प्रभाव पाडणारा होता स्त्रीबद्दलचा, पातिव्रत्याचा व पावित्र्याचा विचार. तो नसता तर सीतेला बाहेर काढले नसते. आणि ते बाहेर काढणे समाजाला पटले नसते. तर मुख्य आहे व्यवस्था. माणूस मूलतः सच्छील, सद्गुणीच आहे. म्हणून तर सद्गुण सर्वच धर्माने पुरस्कारिले आहेत. दुर्गुण तिरस्कारिले आहेत.

११४. एकदा जातीत जगणाऱ्या हिंदू लेखकांनी मुस्लिमांना शत्रू ठरविले तेव्हा त्यांच्याकडून थरारक कृत्ये करून घ्यायला हवीत. जाती असल्यामुळे स्त्रीशरीराच्या पावित्र्याला, पातिव्रत्याला महत्त्व फार. हिंदूंच्या इतिहासामध्ये पातिव्रत्याचा, पावित्र्याचा भंग झाला म्हणून अग्निप्रवेश करणाऱ्या स्त्रियांच्या अगणित कथा आहेत, सीतेच्या कथेपासून त्या कथांचा प्रवास सुरू झालेला आहे.

'सती', 'विधवा' तिचे कडक ब्रह्मचर्य, तिची विटंबना, 'बालविधवा' वगैरे स्त्रियांच्या अवस्था जाती-समाजाने निर्माण केल्या आहेत हे आपण जाणले आहे.

रामाच्या सीतेच्या शीलासंबंधी एक कनिष्ठ व्यवसाय करणारा माणूस संशय व्यक्त करतो आणि सर्वोच्च शक्ती असलेला राम सीतेचा त्याग करतो. स्त्रीच्या पावित्र्याला व पातिव्रत्याला एवढे महत्त्व आहे.

११५. हिंदू पुरुष परजातीच्या स्त्रियांच्या प्रेमात पडत नव्हते. असे प्रेमात पडणे

म्हणजे तिची आणि स्वतःची जात बुडविणे. दोघांच्याही सग्यासोयऱ्यांपासून बहिष्कृत होणे व या भिन्न जातींच्या जोडप्याच्या संततीला दोघांच्या जातीत स्थान नसते. जातच नसते. किंवा संकर जात असते. हिंदूंच्या कल्पक पूर्वजांनी अशा पुष्कळ संकर जातींची नोंद केलेली आहे. म्हणून हिंदू पुरुष अथवा स्त्री जातीमध्येच लग्न करणे, प्रेम करणे पसंत करते.

इस्लाम हा मूलतः वर्ग समाज. भारताबाहेर अजूनही तो वर्गातच विभागलेला आहे. भारतात येऊन वर्ग समाज धर्म-जात झाले. ज्यू, ख्रिस्ती, पार्शी व स्वतः इस्लामही. ह्या सर्व धर्मांना सजातीय विवाह करावे लागले. ज्यू, पार्शी राज्यकर्ते धर्म न झाल्यामुळे ते वाढले नाहीत. म्हणून त्यांच्यात हिंदुधर्माप्रमाणे जातिभेद आले नाहीत. इस्लाम राज्यकर्ता झाल्यामुळे सक्तीने आणि खुषीने हिंदूंमधून अगणित लोक इस्लाममध्ये गेले.

ऋग्वेदातील आर्यांना बायकांची आणि मुलांचीही गरज भासत होती असा एका पुस्तकात उल्लेख आहे. आणि त्यांनी ही गरज अनार्यांच्या स्त्रिया आणि मुले यांची पळवापळव करून भागविली. तशीच गरज मुस्लिमांना असणार. त्यांनी ती हिंदू बायका पळवून भागवून घेतली असणार.

परजातीच्या स्त्रीमुळे जात व धर्म बुडण्याचे भय जातिनिष्ठ हिंदूंप्रमाणे इतर कोणालाही वाटत नाही. पापही वाटत नाही.

११६. जिथे जातिनिष्ठ समाज नाही आणि अनेक धर्मांचे लोक एकत्र राहतात, तिथे सत्ता मिळविण्यासाठी हे धर्म परस्परांशी लढलेले असतातही. पण कालांतराने लोक एक झालेले असतात. एका कुटुंबात बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, सुना, जावई असू शकतात. हिंदू जातिबद्ध समाज असल्यामुळे त्यांना परजातीचा पुरुष अथवा स्त्री भयंकर परकी वाटते. त्यांना घरात घेणे, कुटुंबात सामील करून घेणे मोठे संकट वाटते. म्हणून ते असे करण्याचे टाळतात.

जातीत जगणाऱ्या हिंदू लेखकांच्या त्या वेळच्या लेखनामध्ये हिंदू बायका पळविण्याचे प्रकरण मोठ्या संख्येने आले आहे. कारण ते अनेक रस निर्माण करण्याला कारण होते. पण अहिंदूंच्या व वर्गसमाज असलेल्या समाजात ते मुळीच थरारक, रसात्मक वाटणार नाही.

११७. राष्ट्रीय प्रबोधनाच्या काळातील हिंदू साहित्यामध्ये ही पळवापळवीची प्रकरणे नाटक, कादंबऱ्यांचा विषय होऊ लागली. कारण ती रसात्मक होतात. लोकांच्या मनात क्षोभ, द्वेष, त्वेष निर्माण करू शकतात.

जातिनिष्ठ नसलेल्या लेखकाला ह्या प्रकरणात काही रस वाटणार नाही.

११८. राष्ट्रीय प्रबोधनाच्या काळातील लेखकांना ही प्रकरणे मोठी आकर्षक वाटली.

आणि बाकीची वाटली नाहीत. खरे म्हणजे अस्पृश्यतेचा प्रश्न महत्त्वाचा होता. पुढे तो राष्ट्रीय प्रश्न झाला. पण प्रबोधन कालातील लेखकांना महत्त्वाचा वाटला नाही.

केवळ जातीत जन्मले म्हणून काही मानवी समूह शूद्र-अतिशूद्र झाले. युगेयुगे त्यांच्यावर दुःख, दैन्य, दास्य लादलेले. काळोखाचे कैदी प्रबोधन कालातील लेखकांना दिसले नाहीत. सावकाराचे, भट-ब्राह्मणाचे, सरकारी अंमलदाराचे जुलूम, शेतकरी, शेतमजुराची रोगराई, दुष्काळामुळे होणारी अवहेलना हेही प्रबोधन कालातील लेखकांना दिसले नाही.

उद्योगधंदे, जातीत निर्माण होणारे वर्ग, विज्ञान, ब्रिटिशांनी सर्व देशाचे चालविलेले शोषण, ग्रामीण भागात ब्रिटिश बाजारपेठेने उडवून दिलेला हाहाःकार, टाकले जाणारे रेल्वेमार्ग, खोदले जाणारे बोगदे, बांधली जाणारी धरणे, आणि नव्या औद्योगिक शहरांतील प्रश्न यांपैकी काहीही साहित्यामध्ये आले नाही.

ज्योतिराव फुले, रानडे, आगरकर यांनी आपल्या लेखनातून जवळ जवळ सर्वच प्रश्न मांडले होते. हे प्रश्न राष्ट्रीय प्रश्न होते. नंतर झालेही. पण जातीत जगणाऱ्या लेखकांना हे प्रश्न लिहिण्याजोगे वाटले नाहीत.

ही विचारसूत्रे घेऊन केवढे मोठे व्यापक जीवन मांडता येईल. पण ह्या विचारसूत्रांना स्वीकारून मांडलेले कथानक वर्ण-व्यवस्थेच्या, वर्ण-वर्चस्वाच्या विरोधी जाते. वर्णव्यवस्थेने निर्माण केलेली दुःखे वर्णन करते. आणि वैज्ञानिक दृष्टीचा, जातिभेद नष्ट करण्याचा त्यासाठी शिक्षणप्रसार आणि उद्योगधंद्यांच्या विकासाचा आकार धरते.

पण हेच त्यांना नको होते. वर्णव्यवस्थेवर सकट आलेले आहे. ते घालविण्यासाठी त्यांनी बाण, तरवार, भाले, तिर-कमठे आणि लाकडी रथ वापरणारे वीर नायक निवडले.

कशाकरिता ? तर लेखकांची जात, लेखकांचा वर्ण, लेखकांचे पूर्वज त्या कालखंडात सर्वोच्च स्थानी होते म्हणून. देवळातीळ देव व त्या देवा खालोखाल होते म्हणून.

ह्या जुन्या देवांच्या आणि वीरांच्या गौरवगाथा काय विश्वविजयी विज्ञानाचा पराभव करणार होत्या ? त्यासाठी विज्ञानाचा आणि नव्याने उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा गौरव करायला पाहिजे होता. पण ते शक्य नव्हते.

कारण विज्ञान वर्ण-वर्चस्व सिद्ध करीत नाही. ब्राह्मणाला सर्वश्रेष्ठ असे सिद्ध करीत नाही. म्हणून जातीत जगणारे माती उकरीत राहिले. फक्त कवी केशवसुत विज्ञानाचा झेंडा फडकावीत म्हणत होते–

'जुने जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका, सडत न एक्या ठायी टाका, सावध ! ऐका पुढल्या हाका !'

पण जातीत जगणाऱ्या साहित्यिकांनी आणि लोकांनी त्यांचे ऐकले नाही. कारण लोकही जातींमध्येच जगत होते. म्हणून फुले, रानडे, गोखले, आगरकर त्यांना शत्रुवत वाटत होते.

पण पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींना अनंत प्रश्नांना तोंड द्यावे लागले. बुद्धिवाद अनेक वेळा वर्णवादाने कोसळवून दिला. केवढी प्रचंड खूनखराबी झाली. जातीत जगणाऱ्या बुद्धिमंतांना हा भविष्यकाळ दिसला नाही. दिसू शकतही नाही. जात दूरचे दिसू देत नाही. वैज्ञानिक दृष्टी स्वीकारू देत नाही. लोकशाही समाज अंगीकारू देत नाही. तिला फक्त गतकाळ प्रिय असतो.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
केंद्र शाखा (स्थळ प्रत)

ढासळते किल्ले : जाती



जगाच्या पाठीवर विषमता असूनही कोणत्याही मानवी समाजामध्ये जाती नाहीत. जातिभेद नाहीत. अस्पृश्यता नाही. फक्त भारतीय समाजानेच हे जातीचे किल्ले रचले आहेत. अगदी पोलादी. विषमता सर्वत्र आहे. संपत्तीचा शोध लागला तेव्हापासून विषमता मानवी समाजात निर्माण झाली. संपत्तीच्या शोधाबरोबर, वाढीबरोबर आदिम काळातील समता, बंधुभाव नष्ट होत गेला. युद्धे, हिंसा, गुलामी, तुरुंग, हत्या, राजा, पुरोहित, स्त्री-दास्य, स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म, कर्म, पूर्वजन्म, पुनर्जन्म इत्यादी कल्पनांचा उदय होत गेला. ही विषमता टिकवून धरणारी हत्यारे आहेत. हिंदू समाजाच्या जातींचे जसजसे पोलादीकरण होत गेले तसतशी भारतीय प्रतिभा, कर्तृत्व, जिज्ञासा गोठत गेली. समाज दैववादी, निराशावादी, पराभूत, दुभंगलेला होत गेला. प्रत्येक आक्रमणापुढे हरत गेला. पण जाती घडवणाऱ्या वरिष्ठ वर्गाने ह्या पराभवाची कारणे शोधली नाहीत. ज्यांना कुंठा दिसली, जाति-भेद मिटवण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले,

त्यांचा निःपात करण्याचा यत्न जाती जपणाऱ्या वरिष्ठ वर्गाने–ब्राह्मण, क्षत्रियांनी केलेले आहेत व विषमतेला जिवंत ठेवले आहे, समतेला मारले आहे.

हिंदू समाजधुरीणांची कुशलता

जात, जातिभेद, अस्पृश्यता ह्या सर्व कारणांनी हिंदू श्रमिकवर्गामध्ये जो वर्गकलह करीत समाजाला पुढे नेतो त्या वर्गातच, दुही, बेकी निर्माण करून ठेवली, परस्परात द्वेष, मत्सर निर्माण केले. त्यामुळे त्यांना त्यांचा वर्गशत्रू कधी दिसला नाही. ब्राह्मणक्षत्रिय त्यांना शासक-शोषक वाटला नाही. त्यांना नष्ट करण्यासाठी, वर्णव्यवस्था नष्ट करण्यासाठी हिंदू श्रमिक कधी एक झाले नाही. ते बैतागून धर्म सोडून गेले. पण धर्म, समाजव्यवस्था बदलून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. इतकी विषमतेची रचना कुशलतापूर्ण केलेली आहे.

वर्ग व जाती

हिंदू समाज गजबजून गेलेला दिसत असला तरी त्यामध्ये दोन वर्ग स्पष्टपणाने दिसतात. त्यांतील वरिष्ठवर्ग म्हणजे ब्राह्मण–क्षत्रियांचा. ज्यांना सर्व विशेषाधिकार आहेत. धर्मसत्ता, दंडसत्ता, ज्यांच्या हातात आहे, म्हणून धनसंपदा ज्याच्याकडे आहे असा शासक शोषकांचा वर्ग. दुसरा वर्ग म्हणजे हिंदू श्रमिकांचा. ह्या श्रमिकांमध्ये दोन भाग आहेत. हिंदुधर्म जो श्रम करतो त्याला शूद्र म्हणतो–आणि परपुष्टांना राजन्–ब्राह्मण म्हणतो. ह्या शूद्रांतील स्पर्शास पात्र झालेला जो विभाग आहे, तो म्हणजे सामाजिक महत्त्वाचे उत्पादन करणारा, ज्याचे उत्पादन जीवनासाठी आवश्यक आहे, जे संपत्ती निर्माण करते. ह्या संपत्ती निर्माण करून देणाऱ्या श्रमिकास, स्पर्शास पात्र असलेला शूद्र ठरवले.

श्रमिकांचा वैचारिक प्रवास

दुसरा श्रमणारा विभाग म्हणजे ज्याचे उत्पादन, संपत्ती निर्माण करीत नाही, जो कनिष्ठ दर्जाचे काम करतो, सेवा चाकरी करतो, मोल मजुरी करतो, त्याला त्यांनी स्पर्शास अपात्र ठरवले. अतिशूद्र म्हटले. ह्या दोन विभागांतील श्रमिकांची संख्या अफाट आहे आणि श्रमिकवर्गाच्या चारित्र्याप्रमाणेच भारतीय हिंदू श्रमिकांचे चारित्र्य, तो वर्णव्यवस्थेच्या, विषमतेच्या जातिभेदाच्या विरोधामध्ये प्रचार करणाऱ्या बुद्धाच्यामागे प्रचंड संख्येने गेला. ईश्वर एक आहे, माणसाचा तो बाप आहे, म्हणून सर्व माणसे त्याची लेकरे आहेत, सर्व समान आहेत, असा प्रचार करणाऱ्या मोहंमद पैगंबराच्या धर्मातदेखील तो प्रचंड गर्दीने गेला. त्या धर्माची सत्ताच त्याने येथे स्थापन केली. त्यानंतर संत आले. त्यांचे पंथ आले. त्या पंथांतही तो मोठ्या प्रमाणात सामील झाला. हे संत आणि हे पंथ समतेचा पुकारा करीत होते. समता, ममता सांगणाऱ्या खिस्ती धर्मातही तो सहजपणाने गेला. फुले–आंबेडकरांच्या पाठीशी तोच उभा राहिला आणि समाजवाद आण-

णाऱ्या क्रांतिकारी डाव्या पक्षांतही तोच संख्येने अधिक आहे व १९५६ साली बौद्ध धर्म घेणाराही तोच आहे.

हिंदू श्रमिक जातीचा आधार

हिंदू श्रमिकवर्ग सतत समतेच्या बाजूने उभा राहिलेला आहे. त्याला हिंदू धर्म आणि वर्णव्यवस्था फारशी प्रिय नाही, तो हिंदू धर्माच्या विरोधी असलेल्या धर्मामध्ये, पंथामध्ये सहज शिरतो, तो यासाठी की त्याला माणुसकीचे हक्क मिळावेत. त्याचे वागणे वर्गसमाजातील श्रमिक वर्गाप्रमाणेच आहे. विषमतेच्या विरोधी आणि समतेच्या बाजूचेच आहे. तरी त्याने वर्णव्यवस्था मोडली नाही. समता स्थापलेली नाही. त्याचे कारण तो जाती सोडून, मोडून एक वर्ग झाला नाही. जाती सोडून तो एक वर्ग झाला असता तर त्याच्या संख्यात्मक शक्तीवर तो वर्णव्यवस्था नष्ट करू शकला असता.

मोहंमद पैगंबराच्या धर्मामध्ये तो सर्वच्या सर्व गेला असता तर वर्णव्यवस्था राहिली नसती. ब्राह्मण-क्षत्रियांचे वर्चस्व नष्ट झाले असते. कारण हिंदू म्हणून बाहेर थोड्याच जाती राहिल्या असत्या. ब्रिटिश काळामध्ये हिंदू श्रमिकवर्ग शूद्र, अतिशूद्र, आपल्या अनेक जातींसह, ख्रिस्ती झाला असता. अथवा ज्योतिराव फुल्यांच्या धर्मात आपल्या जाती टाकून सामील झाला असता तर वर्णव्यवस्था टिकली नसती. कारण तिचा मुख्य आधार आहे हिंदू श्रमिकवर्ग.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हाकेबरोबर महार जात हिंदुधर्म सोडून बौद्ध धर्मामध्ये गेली. महार जातीबरोबर इतर दलित जातीजमाती बौद्ध झाल्या असत्या तर जातिभेद नष्ट झाला असता अन् बौद्ध झालेल्या शूद्र; अतिशूद्रांची संख्यात्मकशक्ती त्यांना सहजपणे सत्ता प्राप्त करून देणारी ठरली असती. महाराष्ट्राची राज्यकर्ती जमात दलित समाज झाला असता. पण हिंदुधर्मीय वर्गाचे दोन्ही विभाग शूद्र, अतिशूद्र केव्हाही आपल्या जाती सोडून गेलेले नाहीत. काही बौद्ध झाले, काही मुसलमान झाले, काही फुले, आंबेडकरांचे अनुयायी झाले, पण जाती मोडून वर्ग मात्र झालेले नाहीत. तरी पण वर्ग समाजातील श्रमिकवर्गाप्रमाणेच त्यांनी अगदी भगवान बुद्धापासून फुले-आंबेडकरांपर्यंत समतेच्या बाजूने झगडे दिलेले आहेत. आणि या त्याच्या वर्गचरित्रावरून असे म्हणता येईल की हिंदू श्रमिकवर्ग शूद्र अतिशूद्र जो संपत्ती निर्माण करतो, सुखसमृद्धी देशाला देतो, तो संख्येने फार मोठा आहे. हा शक्तिशाली-लढवय्या वर्ग जातीत जगतो, जातिभेद पाळतो म्हणून जाती आहेत. जातीचा जन्मदाता तो नसूनही जाती जगवणारा, टिकवणारा तो झाला आहे. त्याने जाती सोडल्या तर जाती नष्ट होतील आणि जातिबद्ध हिंदुसमाज वर्गसमाज होईल.

जात होणारा वर्ग

जात म्हणजे काय आहे हे समजून घेतले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एका निबं-

धात म्हणतात, 'वर्ग जेव्हा बंद होतो तेव्हा जात निर्माण होते.' जो वर्ग शेतीचा शोध लावल्यावर सत्ता-संपत्तीचा मालक झाला, त्याला ती सत्ता-संपत्ती आपल्याकडेच राहावी असे वाटले, त्या वर्गाने स्वतःला बंद करून घेऊन आपले रूपांतर जातीत करून घेतले. बाबासाहेब त्या निर्बंधात सिद्ध करतात की, ब्राह्मण स्त्रियांवरील बंधने, त्यांची सती, विधवा, बालविधवा ही स्वरूपे जातिसंस्थेच्या संरक्षणासाठी तयार केली आहेत. ब्राह्मणांनी अनेक ग्रंथांतून केलेले जातिभेदाचे समर्थन, जाती टिकवून धरण्यासाठी त्यांनी रूढ केलेले कायदेकानून व रूढी यांवरून जातीचा जन्मदाता ब्राह्मण-क्षत्रिय हा मालमत्ताधारक वर्गच आहे. तो प्रथम जात झाला अन् शेवटपर्यंत जातीचा संरक्षक राहिला. पण हिंदू श्रमिकवर्गाने मात्र स्त्रियांवर ब्राह्मणांएवढी बंधने घातलेली नाहीत. अन् जातिधर्मा-बद्दलही ब्राह्मणाएवढी आत्मीयता दाखवलेली नाही. तो समतेसाठी जाती सोडून गेलेला आहे. सतत तो वर्णव्यवस्थेच्या विरोधात राहिलेला आहे. तसा ब्राह्मण-क्षत्रिय राहिलेला नाही. म्हणून जात होणारा वर्ग ब्राह्मण-क्षत्रिय हाच आहे.

धर्मांतराने काय साधले ?

एकटी जात जात होऊ शकत नाही. जातीला जगण्यासाठीच अनेक जातींची गरज लागते. म्हणून जात जाती घडवत जाते. म्हणून जाती सोडून जातीला कंटाळून ज्या जाती परधर्मात गेल्या, त्या जातीही अहिंदू होऊनही जातीच झाल्या. जात परजातीशी विवाह निषिद्ध मानते, आन्तरजातीय विवाहाचा निषेध करते. सजातीय विवाह व जन्मसिद्ध सदस्यत्व पुरस्कारते. ह्या बंधनांमुळे व जिकडेतिकडे जातीच जाती असल्यामुळे जे जाती तोडण्यासाठी अहिंदू झाले तेही तिकडे जातच होऊन राहिले. त्यामुळे हिंदू धर्माच्या संरचनेमध्ये काहीही फेरबदल झाले नाहीत. ब्राह्मण-क्षत्रिय वरचढच राहिले. शूद्र-अतिशूद्र तळा-गाळातच राहिले. फक्त जातीच्या जंगलात एक जातीचे नवे रोपटे लागले गेले. एवढेच धर्मांतराने झाले किंवा होते.

नवी उत्पादनसाधने व महार

हिंदू श्रमिकवर्गातील शूद्र-अतिशूद्रांना बंधमुक्त होण्याची संधी मिळाली ती त्यांच्या डोक्यावरल्या हिंदू मुसलमानसत्ता ब्रिटिशांनी पराभूत केल्या तेव्हा आणि कायद्याचे राज्य सुरू झाले तेव्हा. नवे यंत्रोद्योग सुरू झाले तेव्हा. औद्योगिक कामगार म्हणून खेड्यातील शूद्र-अतिशूद्रांतून लोक येऊ लागले. रेल्वे टाकणारा, बोगदे खोदणारा, रस्ते बांधणारा, मुंबईची बंदरे, रस्ते तयार करणारा, मुंबई वसवणाऱ्या कामगारांत महार समाज प्रामु-खयाने होता. कारण ग्रामीण अर्थव्यवस्थेशी तो उत्पादनसंबंधाने इतर शूद्र उत्पादक जाती-अतिशूद्र उत्पादक जातींप्रमाणे जखडलेला नव्हता. औद्योगिक शहरांजवळच्या जिल्ह्यांतून आणि जिथे सत्यशोधक चळवळ पोचली होती तिथून महार लोक शहरात आले. औद्योगिक कामगार बनू लागले. गावापेक्षा शहर अधिक स्वातंत्र्य देते. ते महार

शहरवासी झाले. कामगार झाले आणि त्यांना ज्ञानाचा अनुभव येऊ लागला. शहरांतील सामाजिक, राजकीय, आर्थिक चळवळी त्याला दिसू लागल्या. याचा अर्थ कळू लागला. तो अधिक निर्भय होऊ लागला. आणि परदेशांतून उच्च विद्याविभूषित होऊन डॉ. आंबेडकर येताच तो त्यांच्याभोवती गोळा होऊ लागला. वर्णव्यवस्थेशी संघर्ष करण्यास सज्ज होऊ लागला. १९२७ साली त्यांनी हिंदू धर्माशी मोठा संघर्ष सुरू केला. त्याची लढण्याची क्षेत्रे वाढत गेली. संघटना वाढत गेली. त्याने त्याची पहिली राजकीय संघटनाही उभी केली. देव, धर्म, ब्राह्मणाची तो कवी, लेखक, होऊन आंबेडकरी जलसाकार होऊन टवाळी करू लागला. सामाजिक लढ्यात, संपात आणि राजकारणात तो वेगाने पुढे जाऊ लागला.

ग्रामगाड्याशी जखडलेल्या द. ज जाती

शेती उत्पादनाला साह्यभूत होणारे काम मातंग, चांभार आणि ढोर समाज करीत होता. त्याचे उत्पादन पक्क्या स्वरूपाचे, परंतु व्यक्तिगत पातळीवर तयार होणारे आणि ग्रामगाड्याशी जखडलेले असल्यामुळे त्याला द्रव्यप्राप्ती फारशी नाही, म्हणून उपजीविकेसाठी त्याला शेतकरी समाजावर अवलंबून राहावे लागे. पक्क्या मालाचा उत्पादक असूनही त्याला कच्चा माल उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्यास धनी, अन्नदाता मानावा लागे. त्यामुळे अन्नदाता ब्राह्मणेतर चळवळीत तर हा उत्पादक दलित समाजही ब्राह्मणेतर चळवळीत. अन्नदाता मराठा समाज काँग्रेसमध्ये तर हा उत्पादक दलित समाजही काँग्रेसमध्ये, अशी स्थिती झाली.

दुही कायम

त्यामुळे दलितमुक्तीची चळवळ करणारे, जातिभेद नष्ट करू बघणारे, वर्ग समाजाची उभारणी करू बघणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आंदोलने मान्य असूनही तो आंबेडकरी आंदोलनात महार समाजाच्या गतीने, संख्येने, आवेशाने आला नाही तर काँग्रेसमध्येच राहिला. काँग्रेसलाही आंबेडकरांना एकाकी पाडण्यासाठी दलित म्हणून ओळखले जाणारे हवे होते, ते मिळाले. त्यांतील काहींचे भले झाले. पण मांग, चांभार इत्यादी दलित जातींच्या अनुपस्थितीमुळे दलित चळवळ मात्र कमजोर राहिली. तिची आघात करण्याची शक्ती दुर्बल राहिली. त्याचा परिणाम असा झाला की काँग्रेस सामाजिक समतेच्या प्रश्नावर योग्य भूमिका घेऊ शकली नाही आणि डावी चळवळ ही राजकीय आणि आर्थिक प्रश्नांभोवती घोटाळत राहिली.

पुनरुज्जीवनवादाचा जोर

अतिशूद्र समाजाची वर्णव्यवस्थेविरुद्ध उठावणी, त्याची सामाजिक समतेची मागणी, ज्ञान-विज्ञानाचा वाढता प्रभाव, लोकशाहीचा होऊ लागलेला स्वीकार पाहून वर्णवर्चस्व-

वादी प्रस्थापित वर्ग हवालदिल होऊन गेला होता. वर्णव्यवस्था तिच्या त्या सामर्थ्यासह टिकून राहावी, म्हणून त्यांनी तिच्या गौरवगाथा गायला सुरुवात केली. काँग्रेसचे पुढारी आणि जहाल मतवादी तरुणदेखील पुनरुज्जीवनवादाच्या प्रभावाने प्रभावित होत होते.

कोंडीची अवस्था

युगेयुगे दडपलेल्या दलितांना हिंदूंचा भूतकाळ नको होता. वर्णव्यवस्था नको होती. त्यांना उठून उभे राहण्याची संधी देणारी लोकशाही हवी होती. त्यांना जात्यंतर-वर्गांतर, व्यवसाय परिवर्तन हवे होते. जातीने दिलेले दैन्य, दास्य त्यांना फेकून द्यायचे होते. म्हणून उद्योगधंद्यांचा गतिमान विकास हवा होता. तिच्याबरोबर येणारी लोकशाहीही हवी होती. पण उद्योगधंद्यांचा पुरेसा विकास होत नव्हता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीवर अजूनही पुनरुज्जीवनवादाचा प्रभाव असल्यामुळे ती सामाजिक लोकशाहीचा उच्चार करीत नव्हती. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झेंड्याखाली दलित जातींना जाऊही देत नव्हती. बाबासाहेबांची चळवळ ही काँग्रेसला पर्यायी चळवळ होऊन खेड्यापाड्यातील दलित जातीजमातींना एकवटण्यात कमी पडत होती आणि डाव्या पक्षांना जातिबद्ध भारतीय समाजाला एक करण्याची नाडी सापडत नव्हती. ते भरकटत होते. सर्व शक्ती कोंडीत सापडल्या होत्या.

मराठ्यांचे अपयश

ब्राह्मणेतर चळवळीतून काँग्रेसमध्ये आलेले मराठे ज्योतिराव फुले, शाहू महाराज, यांचा वारसा घेऊन आलेले होते, पण त्यांनी ज्योतिराव फुले, शाहू महाराज यांचे कोणतेही स्वप्न, विचार साक्षात कार्यवाहीत आणलेला नाही. काँग्रेसमध्ये चांभार, ढोर, मातंग इत्यादी जाती एकत्र आल्या होत्या. शूद्र–अतिशूद्र एकजुटीचे, एक वर्ग करण्याचे ज्योतिराव फुले यांचे स्वप्न ते साकार करू शकले असते, पण त्या दृष्टीने त्यांनी काहीही केले नाही. मराठा समाज गावात संख्येने मोठा, शेतीचा मालक असलेला. ग्रामगाड्यात प्रमुख. सरकारची शेवटची सत्ता खेड्यात राबवणारा. शेती, संख्या आणि सत्ता या तिन्ही ताकदी त्यांच्या ठायी एकवटल्यामुळे तो गावाचा नेता. त्याने महात्मा फुल्यांचे विचार कार्यवाहीत आणायचे ठरवले असते तर तो होणाऱ्या विरोधावर मात करू शकला असता. बंधमुक्ततेची ज्याला तहान लागली होती असा दलित समाज स्वाभाविकंपणे त्याच्यामागे उभा राहिला असता आणि मराठा समाज सामाजिक सुधारणांचा पुढारी झाला असता. पण संख्यात्मक कुवत असूनही मराठा समाजाने खेड्यापाड्यात सामाजिक सुधारणेची चळवळ उभी केली नाही. उलट आंबेडकरी चळवळींना, ती करू बघणाऱ्या महारांना सक्त विरोध केला आणि मांग चांभार समाज आर्थिक बाबींनी, उत्पादन–संबंधांनी मराठा शेतकऱ्यांशी बांधलेला असल्यामुळे तोही महारांच्या विरोधात राहिला. हिंदू श्रमिकवर्गातील शूद्र–अतिशूद्रांचे वर्गचरित्र हे असे आहे. दोन्ही विभाग

ब्राह्मण–क्षत्रियसत्तेच्या विरोधी जातात, पण एक होत नाहीत. शूद्र (मराठे तत्सम) हे अतिशूद्रांचे ऐक्य होऊ देत नाहीत. अन् अतिशूद्रही एक होत नाहीत. हे समानता मागतात, पण परस्परांत मात्र विषमता टिकवू बघतात.

जातीच्या बेड्या तशाच राहिल्या

युरोप–अमेरिकेत वैज्ञानिक प्रगती भरधाव होत होती. रशियामध्ये क्रांती होऊन ती-देखील उत्पादनाचे उच्चांक गाठण्यासाठी भरधाव निघाली होती. जगभर कामगार चळवळ सत्ताधाऱ्यांवर आघात करीत होती. भारतीय कामगारवर्गही ब्रिटिश विरोधी लढ्यात उतरला होता. तरी हिंदू श्रमिकवर्ग जातीच्या बेड्या तोडून काँग्रेस, कम्युनिस्ट अथवा आंबेडकरी आंदोलनात वर्ग होऊन एक होत नव्हता.

स्वातंत्र्य कोणत्या वर्गाचे ?

मिळालेले स्वातंत्र्य कोणाचे ? कोणत्या वर्गाचे ? दलितांचा ह्या स्वातंत्र्यात वाटा काय ? स्थान काय ? असे प्रश्न डॉ. बाबासाहेब काँग्रेसला विचारत होते, कारण हजारो वर्षांपासून हिंदू वरिष्ठ वर्ग दलित हिंदू जातींना दडपत होता, लुटत होता. पुन्हा स्वातंत्र्य व सत्ता हातात आल्यामुळे ती दडपशाही पुन्हा सुरू होऊ नये म्हणून डॉ. आंबेडकरांनी नेहरूंना घटना कशी असावी हे सांगणारा मसुदा दिला. स्वातंत्र्यात दलितांच्या उद्धाराचा कार्यक्रम काय असावा, यावर प्रचारमोहिमा त्यांनी केल्या. ह्या सर्वांच्या परिणामातून डॉ. आंबेडकरांवर घटना समितीचा भार टाकला. त्यांनी अस्पृश्यता, जातिभेद गुन्हा ठरवला आणि दलित जाती–जमातींना शिक्षण आणि नोकरीमध्ये राखीव जागा मंजूर करून घेतल्या.

आरक्षणाचे हत्यार

हिंदू धर्म व समाज हा शिक्षण आणि व्यवसाय परिवर्तन हे शूद्र–अतिशूद्रांना नाकारीत आला आहे. स्वजातीचा व्यवसाय टाकणे व परजातीचा व्यवसाय स्वीकारणे हा धर्मद्रोह, जातिद्रोह मानला गेलेला आहे. व्यवसायपरिवर्तन व शिक्षण हे जाती मोडण्याचे अमोघ साधन आहे. हे साधन जातीला एकवटून वर्गात नेते. वर्ग करते. म्हणून सक्तीने व्यवसायपरिवर्तन करता यावे, ह्यासाठी शिक्षण घेता यावे म्हणून डॉ. बाबासाहेबांनी राखीव जागा मंजूर करून घेतल्या. आरक्षण हा जातीच्या किल्ल्यावर केलेल्या तोफेचा भडिमार आहे.

जातीच्या किल्ल्यावर बाबासाहेबांनी दुसरी एक तोफ रोखून ठेवली. ती म्हणजे हिंदू कोड बिल ही होय. जातिबद्ध समाजामध्ये जाती टिकवण्यासाठी सर्वात अधिक बंधने स्त्रीवर येत असतात, कारण ती जात पोटात वागवत असते. म्हणून योनिशुचिता, पातिव्रत्य, ब्रह्म-

चर्य इत्यादी संकल्पना जातीच्या राखणदारांनी स्त्रियांवर लादल्या. सती-विधवा, बालवधू, बालविधवा ही स्त्रियांची म्हणजे जीवनाच्या गतीची, सौंदर्याची विरूपे निर्माण केली. जाती मोडण्याच्या प्रक्रियेला जर गती यायची असेल तर स्त्रियांना स्वातंत्र्ये दिली पाहिजेत. ही स्वातंत्र्ये जात मोडण्याचे कार्य करू शकतील. कारण जात सजातीय विवाह व आंतरजातीय विवाहनिषेध यावर टिकून आहे. जाती टिकवण्यात स्त्री महत्त्वाचे कार्य करते. तशीच ती जाती मोडण्यातही महत्त्वाचे कार्य करू शकते. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल मोठ्या हिरिरीने तयार केले, पण जातीच्या राखणदारांनी त्या बिलाची परवड केली.

जुटीचा नवा मार्ग

हिंदू कोड बिलाला विरोध, निवडणुकांमुळे सत्ता काबीज करण्याकरिता ग्रामीण भागातील बहुसंख्याक जातींचे मजबूत होणारे संघटन, त्यामुळे इतर जातींच्या होणाऱ्या संघटना ह्या सर्व संघटित जातींनी काँग्रेसमध्ये केलेली भाऊगर्दी, सत्ताधारी झालेल्या ग्रामीण जातींचे घटनाबाह्य, वर्णव्यवस्था व्यक्त करणारे वर्तन, दलितांवर होणारे वाढते अत्याचार, पण त्याच वेळी दलित जाती–जमातींतील वाढता हिंदुधर्माबद्दलचा असंतोष आणि कम्युनिस्ट–सोशालिस्ट चळवळीचे हिंदू श्रमिक जातींना वर्गात नेण्यात आलेले अपयश, हे पाहून आणि सर्व श्रमिक जातींना शूद्र–अतिशूद्रांना आकर्षित करील आणि वर्ग बनवण्याची प्रक्रिया वेगवान करील, पुन्हा सत्ता हस्तगत करण्यासाठी हिंदू श्रमिक जातींना एकत्रित आणील आणि विसाव्या शतकातील ज्ञान, विज्ञान, आंदोलनात गतिरोधक होणार नाही, बुद्धिवादाला मदतकारी ठरेल अशी सर्वांची, दलित जातींची जूट साधू शकणारा बौद्ध धर्म त्यांनी स्वीकारला अन् आपल्या लाखो अनुयायांनाही दिला.

बौद्ध धर्म स्वीकारायचे प्रयोजन

दलित समाज अतिशूद्र–श्रमिकवर्ग जागृत होणारच. वर्णव्यवस्था, विषमतेच्या विरोधात लढे उभारणारच. हिंदुधर्माच्या जातिभेदाचा निषेध म्हणून बौद्धधर्माचा स्वीकार करणारच, म्हणजे घडणार काय ? तर बौद्ध म्हणून सर्व अतिशूद्र जाती एक होणार. त्यांचा एक जातिविहीन वर्ग होणार. म्हणजे महाराष्ट्रात जातिबद्ध हिंदू समाज व वर्गमय बौद्धसमाज असे दोन समाज, दोन आदर्श अस्तित्वात येणार. वर्गसमाज म्हणून बौद्ध धर्म वाढत राहणार आणि विषमतेचा पालनकर्ता हिंदू धर्म घटत राहणार, असा विचार करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्णव्यवस्था मोडण्यासाठी, जातिभेद नष्ट करण्यासाठी, अतिशूद्र जाती एक करण्यासाठी वा वर्ग समाज करण्यासाठी बौद्धधर्म घेतला. आपल्या लक्षावधी अनुयायांना दिला. जातिबद्ध भारतीय समाज वर्गमय करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी भारतीय जनतेच्या हातात पाच महाअस्त्रे दिली ती म्हणजे– (१) अस्पृश्यता हा गुन्हा, (२) आरक्षण, (३) हिंदू कोड बिल व संविधान, (४) बौद्धधर्म, (५) त्यांचे लेखन, त्यांनी निर्माण केलेल्या संस्था व लोकशाही.

वारसदार अपात्र

त्यांच्या अनुयायांनी बाबासाहेबांचा विचार घेऊन भारतातील सर्व दलित जातींत जायला हवे होते. त्यांना बौद्ध अथवा आंबेडकर अनुयायी करून घ्यायला हवे होते. विज्ञान आणि भांडवली लोकशाही वा समाजवादी लोकशाहीला एवढाही अपायकारक नसलेला बौद्धधर्म व आंबेडकर विचार त्यांनी सर्वत्र सांगायला पाहिजे होता पण असे काही न करता श्री. बी. सी. कांबळे यांनी पुढाकार घेऊन रिपब्लिकन पक्ष फोडला. बौद्ध धर्म फोडला आणि त्याचे काँग्रेसला हवे तसे-तेवढे तुकडे होत गेले. पक्ष आणि समाज हे पुढाऱ्यांनी सौदेबाजीचे दुकान केले.

गतीचे परिणाम

आंबेडकर अनुयायांनी जरी बौद्धधर्म आणि आंबेडकरी विचार इतर जातीत नेले नाहीत, त्यांना विचाराच्या पातळीवर, बौद्ध धर्माच्या पातळीवर एक केले नाही, तरी विज्ञान आणि बाबासाहेबांची महान कल्पना 'आरक्षण' आपले कार्य करीत होते. भांडवली विकासामुळे, लोकशाहीमुळे आणि बाबासाहेबांच्या प्रतिभेतून आलेल्या आरक्षण व्यवस्थेमुळे म्हणजे बहिष्कृतांना शिक्षण घेण्याचे, व्यवसायपरिवर्तन करण्याचे व सत्ता, संपत्तीजवळ जाण्याचे स्वातंत्र्य कायदेशीररीत्या प्राप्त झाल्यामुळे युगायुगाच्या बहिष्कृतांतून वेठबिगारी, मोलमजुरी करणाऱ्या अतिशूद्रांतून एक बुद्धिजीवी वर्ग तयार झाला आहे. त्या बुद्धिजीवी वर्गातही दोन थर आहेत; एक सधन, एक मध्यम. म्हणजे शतकानुशतके जो समाज केवळ गुलाम होता, त्या समाजात भांडवली लोकशाहीमुळे व बाबासाहेब आंबेडकरांमुळे वर्ग निर्माण झाले.

आरक्षणाची तरतूद

आरक्षणाची अगदी सोपी व्याख्या करायची झाली तर अशी करता येईल : आरक्षण म्हणजे हिंदुधर्माने ज्यांना वरिष्ठ मानले आहे त्या वरिष्ठांचा व्यवसाय व वृत्ती अंगीकारण्याचे व स्वजातीचे व्यवसाय नाकारण्याचे स्वातंत्र्य होय. जातीचे पोलादी किल्ले ढासळून टाकण्यासाठी आरक्षण ही 'फायर' केलेली तोफ आहे अन् तिचा भडिमार चालू आहे. लोक शिक्षण घेत आहेत. व्यवसाय-परिवर्तन करीत आहेत आणि तरीही त्यांना शंबुकाला दिली ती शिक्षा कोणी देत नाही. आरक्षणाने अस्पृश्यता, वरिष्ठ-कनिष्ठ जातींतील आर्थिक, सांस्कृतिक दुरावा कमी कमी करण्याचे काम केले आहे. पण त्याचा दुसरा परिणाम असाही झाला आहे की आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी दलित लोक हिंदुधर्मात व जातीत राहण्याचे पसंत करू लागले आहेत, बौद्धधर्मात येऊन अनेक जातींचा एक किंवा दोन वर्ग होण्याऐवजी हिंदुधर्माच्या जातीत राहणे लोकांना योग्य वाटू लागले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की जातीच्या पोटातच दोन वर्ग तयार झाले आहेत. एक हिंदू धर्माचे खास उत्पादन असलेला दरिद्री श्रमिकवर्ग व दुसरा

आरक्षणामुळे शिकून येणारा बुद्धिजीवी वर्ग व अल्पसा श्रीमंत वर्ग. एका जातीत नवे एक, दोन वर्ग वाढू लागल्यामुळे मोठी विचित्र स्थिती निर्माण झालेली आहे. ह्या नव्या दोन वर्गा वर्गात स्वभावतः जातीबाहेर पडण्याची, वरिष्ठ वर्गात वर्ग म्हणून मिसळण्याची अनिवार इच्छा आहे, पण बाहेर जिकडे तिकडे सजातीय विवाहावर उभ्या असलेल्या जाती आहेत. त्यामुळे वरिष्ठ वाटणाऱ्या जातींत जाता येत नाही. जातीत प्रवेश करण्यासाठी जन्मसिद्ध सदस्य असावे लागते. ते त्या जातीत जन्म घेतल्यानेच मिळते. म्हणजे वर्ग होऊनही वर्गांतर करता येत नाही. जात नको असतानाही जात्यंतर करता येत नाही, पण धर्मांतर करता येते, पण फायद्यासाठी ते करायचे नाही. जात कनिष्ठ मानली म्हणून नको. तिला कनिष्ठ मानणारा हिंदू धर्म नको. म्हणजे आरक्षणाने दलित तरुण एकाच वेळी हिंदू व अहिंदू झालेला आहे ! आरक्षणाने दुसरा एक परिणाम केला आहे : तो म्हणजे बौद्ध धर्माची वाट रोखून धरली आहे व जे जात सोडून गेले, त्यांचीचं एक बौद्ध जात झाली. जात जाती तयार करीत असते.

चमत्कार : ब्राह्मण

त्यांनी एक व्हावे, वर्ग व्हावे, बौद्ध व्हावे, ते शूद्र, अतिशूद्र जातींच्या संघटना मजबूत करीत असतानाच एक चमत्कारही दिसतो आहे. तो म्हणजे सामाजिक आर्थिक विषमतेची, जातिभेदाची आणि अस्पृश्यतेची गेली कित्येक शतके डोळ्यांत तेल घालून राखणदारी करणाऱ्या ब्राह्मण जातीने हे जातीय धार्मिक-सांस्कृतिक कार्य करण्याचे सोडून दिले आहे, एवढेच नव्हे तर सार्वत्रिक शिक्षणाचा अन् जातिबद्ध व्यवसाय टाकून परजातीचे व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्यही मान्य केले आहे. यावरही आणखी ताण म्हणजे स्त्रीशिक्षण, स्वावलंबन तर मान्य केलेच, पण शंभर टक्के स्त्री-शिक्षणही केले आहे. विधवाविवाहाला तर फार पूर्वीच मान्य करून प्रौढ, प्रेमविवाह सर्रास अमलात आणला आहे. म्हणजे वर्णव्यवस्था जातिभेद टिकवून धरण्याची जन्मसिद्ध जबाबदारी ब्राह्मण जातीने टाकून दिलेली आहे. अन् तेदेखील जेव्हा सर्व महत्त्वाची केंद्रे शिक्षण, प्रशासन, व्यापार, उद्योग, कला, प्रचार, प्रसार, अर्थार्जनाची सर्व केंद्रे ब्राह्मण जातीच्या हाती असूनही ती शूद्र-अतिशूद्रांना पुढे येऊ देते आहे. शूद्र-अतिशूद्रांची प्रगती म्हणजे वर्णव्यवस्थेची अधोगती, हिंदुधर्माची अवनती असे ती पूर्वीप्रमाणे आता मानीत नाही.

जात टिकवण्यासाठीच ब्राह्मणांनी स्त्रियांवर अनेक बंधने एके काळी लादली. ती बंधने ब्राह्मणस्त्री तोडते आहे, तरी त्याला ब्राह्मण विरोध करीत नाहीत. शूद्र-अतिशूद्र जाती जातीचे व्यवसाय सोडून अधिक धनसंपदा, सन्मान देणारे व्यवसाय स्वीकारू लागले आहेत तरी ब्राह्मण मनुस्मृतीची तरवार घेऊन उभा राहत नाही. शूद्र-अतिशूद्र जाती वर्णवर्चस्व नाकारीत आहेत, समता मागत आहेत, तरी ब्राह्मण हिंदुधर्माचा, समाजव्यवस्थेचा ऱ्हास होतो असे मानत नाहीत. याचा उघड अर्थ हा आहे की ब्राह्मण

आता हिंदू जात राहिलेली नाही, तर भांडवली समाज व्यवस्थेतील एक वर्ग होतो आहे, तो वर्गाची लक्षणेही प्रकट करू लागला आहे. ते म्हणजे स्त्रीशिक्षण स्वावलंबन व स्वातंत्र्य. म्हणजे स्त्रीला सती जाण्याची सक्ती करणारी, स्त्रीला वैधव्याची केशवपन करून शिक्षा देणारी, बालजरठ विवाह करणारी बालविधवा बाळगणारी ब्राह्मण जात आता हे अन्याय करीत नाही, हे वर्गलक्षण आहे. दुसरे वर्गलक्षण म्हणजे, हिंदु धर्माची राखणदारी करण्याचे धार्मिक काम त्याने सोडलेले आहे व भांडवली व्यवस्थेत उपयुक्त ठरणारे, यंत्र-तंत्र, ज्ञान विज्ञान तो आत्मसात करतो आहे. पूर्वी तो जातीच्या जोरावर जगत होता. म्हणून जातिभेद सांभाळीत होता. आता तो भांडवली व्यवस्थेत शिरून भांडवली व्यवस्थेचा सक्रिय वर्ग झाला आहे पण जिकडे तिकडे जाती आहेत म्हणून तोदेखील जात आहे, तरी जातीच्यामुळे निर्माण झालेली मराठी कांदबरीतील जी पात्रे यमू इत्यादी सदाशिव पेठेतून नाहीशी झालेली आहेत पण यमू, शारदा, सिंधू ही स्त्री पात्रे खेड्यापाड्यांतून पाटील देशमुखांच्या वाड्यांतून मात्र विपुलतेने आज आढळत आहेत.

काँग्रेस : सत्तेसाठी संघटित झालेली जात

जात टिकवून धरण्याचे जन्मसिद्ध कार्य ब्राह्मणांनी टाकून दिले तरी जाती आहेत. कारण जात जन्मण्यातून मिळते, पण काँग्रेस, जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निवडणुका-आरक्षण इत्यादी संस्था आणि संकल्पना जाती बळकट करीत आहेत. जातींना राजकीय अर्थ प्राप्त करून देत आहेत. ग्रामीण भागात देशाची सत्तर टक्के लोकसंख्या राहते. लोकसभेत व विधानसभेत अधिक खासदार-आमदार धाडणारा ग्रामीण भाग आहे. काँग्रेस ग्रामीण भागातील मोठा व प्रभावी पक्ष आहे. ग्रामीण भागात काँग्रेस मोठी असण्याचे कारण ग्रामीण भागातील संख्यात्मक मोठ्या जाती काँग्रेसमध्ये आहेत आणि म्हणुन छोट्या जातीही काँग्रेसमध्ये आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी काँग्रेसमध्ये आहेत म्हणून शेतीशी संबंधित असलेल्या इतर लोहार, सुतार, विणकर जातीही काँग्रेसमध्ये आहेत. काँग्रेस म्हणजे सत्तेसाठी संघटित झालेल्या जातींची जत्रा आहे ! आणि विशेष महत्त्वाचे म्हणजे हिंदू वर्णव्यवस्थेने ज्यांना शूद्र-अतिशूद्र मानले होते त्या बहुसंख्याक व श्रमिक जातीही काँग्रेसमध्ये आहेत. अन् जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये ज्यांना शूद्र-अतिशूद्र मानलेले नाही अशा जाती संघटित आहेत. हिंदू वर्ण-व्यवस्थाच ह्या दोन पक्षांत संघटित झालेली आहे. एकीकडे सर्व शूद्र-अतिशूद्र, दुसरी-कडे जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये अशूद्र.

दोन छावण्या

ह्या दोन छावण्या आहेत. सत्ता-संघर्ष करणाऱ्या. ह्या दोन छावण्या सत्तेसाठी जनता पक्षामध्ये एकवटून आल्या, पण त्यांचे ऐक्य टिकले नाही, टिकणार नव्हतेही. कारण

समाज जातिबद्ध असल्यामुळे व जातीतील वर्ग एकवटलेले नसल्यामुळे, परस्परांत मिसळून एकजीव न झाल्यामुळे ह्या दोन छावण्या एक होऊ शकत नाहीत. सत्ता संघ-जनसंघाच्या हातांत गेली तर वर्णव्यवस्था येईल काय ? ती जुनी समाजव्यवस्था परत आणली जाईल काय ? असा प्रश्न वर्णव्यवस्थेचा तीव्र तिरस्कार करणाऱ्या शूद्र–अति-शूद्र समाजाला पडतो अन् तो त्यांच्यामधून अलग होतो. तसाच काँग्रेसमधील शूद्र–अतिशूद्रांमध्ये संघर्ष असतोच.

यशवंतराव चव्हाणांचे धोरण

यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेसमधील शूद्र–अतिशूद्रांतील संघर्षावर सहजपणे मात केली होती. कारण महाराष्ट्रातील अतिशूद्रांतील जागृत अग्रदल डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वा-खाली संघटित झालेले होते. अन् काँग्रेसमध्ये चांभार, मांग यांतील चांभागला खूष केले जात होते. पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी काँग्रेसची फाटाफूट झाली, तेव्हा काँग्रेसच्या हातांतून सत्ता जवळ जवळ गेली, ती सत्ता मिळविण्यासाठी यशवंतराव चव्हाणांनी समिती फोडली, प्रत्येक पक्षातील मराठा समाज ओढून काँग्रेसमध्ये आणला आणि रिपब्लिकन पक्षामध्येही फूट घडवून आणली. काँग्रेसमध्ये आलेल्या मराठ्यांची त्यांनी एकजूट घडवून आणली. ती प्रत्येक निवडणुकीत भक्कम करीत नेली. मराठ्यांच्या हातांत ग्रामीण भागातील सर्व अर्थशक्ती दिली, पण इतर अतिशूद्र वंचित, बुभुक्षित राहतील याचीही दक्षतापूर्वक काळजी घेतली. कोणताही दलितमंत्री दीड-दोन वर्षांपेक्षा जास्त काळ सत्तेवर राहणार नाही, सबळ होणार नाही, हे धोरण त्यांनी अमलात आणले. अन् हा हा म्हणता त्यांनी मराठा जातीला सधन, समर्थ केले. ज्ञानाच्या क्षेत्रांतील ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी तालुक्या–तालुक्यातून शिक्षणसंस्था उभ्या केल्या.

काँग्रेसमध्ये गेल्याने मराठा जातीकडे आलेले ऐश्वर्य पाहून इतर जातीही संघटित होऊन काँग्रेसमध्ये येऊ लागल्या. पण त्यांना सत्तेपासून, अर्थसत्तेपासून दूर ठेवण्याचे धोरण सत्ताधारी मराठा नेतृत्व करीत होते. हे जातीचा जो स्वभाव आहे त्यानुसार होते. त्याच्याबरोबर जी थोडीबहुत सामग्री होती ती जास्तीत जास्त मराठा जातीकडे जाईल अशी दक्षताही होती. पण असंतोषही त्यामुळे धगधगत होता. त्याचा स्फोट पुढे इंदिरा गांधी यांनी घडवून आणला.

काँग्रेस फुटली

यशवंतराव चव्हाणांची काँग्रेस फुटली. काँग्रेसमध्ये असलेल्या शूद्र समाजातील उत्पादक मराठेतर सर्व जाती भराभर इंदिरा काँग्रेसमध्ये गेल्या आणि इंदिरा काँग्रेसनेही मराठेतरांना जास्त जागा देऊन निवडून आणले. इंदिरा काँग्रेसमध्ये मराठेतराचे संख्या-

बळ अधिक आहे. हे मराठेतर आमदार आपल्या जातीच्या उद्धाराचा, धार्मिक विकास घडवून आणण्याचा यत्न करणार.

अगदी स्वातंत्र्यप्राप्तीपासून मराठा जातीच्या हातांत सत्ता असूनही मराठा जातीतील प्रत्येकाचे प्रश्न मराठा सत्ता सोडवू शकली नाही, तसेच मराठेतरांच्या हाती आलेली सत्ताही मराठेतरांचे सर्व प्रश्न सोडवू शकत नाही. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठेतरांना वाव देणारी, बँ. अंतुले यांना मुख्यमंत्री करणारी इंदिरा काँग्रेस जातिविघटनास मदतनीस होत आहे. कारण मराठा जातीत तिने जातीय फाटाफूट केली आहे. अन् मराठेतरांना मराठा नेतृत्वाविरुद्ध उठवले आहे. जाति–विघटनास हा आंतरविरोध उपयोगी ठरणार नाही.

जातिविघटन

जाति–विघटन वेगाने होत नाही, परंतु विघटन चालू आहे. शंबुकाचा शिरच्छेद करणारी व कर्ण–एकलव्याला नामोहरम करणारी वर्णव्यवस्था दलितांतून येणाऱ्या उच्च विद्याविभूषितांच्या झुंडी रोखू शकत नाही. कारण भांडवलशाही सत्तेवर आहे. भांडवलशाहीला जातिभेदांची, वंशभेदांची जरुरी नसते. तिला उत्पादनकार्यात कुशलता फक्त हवी असते. यंत्रोत्पादनाला जातीची नव्हे तर जगाची बाजारपेठ लागते. म्हणून उत्पादन–पद्धती बदलल्याबरोबर हिंदू समाज बदलला, शूद्र संख्येच्या जोरावर सत्तेवर आला. अल्पसंख्य ब्राह्मण त्याचे वर्णवर्चस्व गुंडाळून सत्तेपासून आता फेकला गेला. जन्माधिष्ठित व्यवसाय कल्पनाच निकालात निघाली. सत्तेसाठी संख्या आणि अर्थसत्तेसाठी यंत्रतंत्रातील कुशलता जरुरीची झाली. जातीची जूट संख्येसाठी उपयोगी ठरत असे, पण प्रत्येक जातीत वर्ग पडत आहेत अन् ते आपल्या हितासाठी धडपडत आहेत. वेगाने औद्योगीकरण, आधुनिकीकरण होईल तर जातीचे विघटन वेगाने होईल. जातीतील वर्ग जातीतून फुटून बाहेर पडतील. भांडवलशाही उत्पादनपद्धतीने ग्रामीण शूद्र, अतिशूद्र उत्पादक जातींना बेरोजगार करून टाकले आहे. जातीचा पायाच उखडला गेला आहे. जातीचे किल्ले ढासळत आहेत. फक्त उद्योगधंद्यांचा शिक्षणाचा वेगवान विकास हवा आहे. भांडवलशाहीचा अनुभव सर्व जाती घेत आहेत. समाजवादी पद्धतीचा अनुभव घेणे राहिले आहे. लोक तिकडे वळल्याशिवाय राहणार नाहीत. वर्गांतर ही शूद्र–अतिशूद्र ह्या बहुसंख्य जनतेची मागणी आहे. ते प्राप्त करून घेण्यासाठी तो झगडतो आहे. हा झगडा पुढे जाणार आहे. जातीचे ढासळते किल्ले कोसळून पडणार आहेत. कारण जातीत वर्गपद्धत आहे. अन् जगातील वर्गसमाज वर्गविहीन समाजाकडे वाटचाल करीत आहे. हे युग त्या संघर्षाचेच आहे.

•

दलित चळवळ
पुन्हा
विघटनाकडे ?

मार्क्स ग्रंथालय
23320



प्रा. गंगाधर पानतावणे हे गेली बारा वर्षे 'अस्मितादर्श' नावाचे त्रैमासिक चालवीत आले आहेत. या बारा वर्षांत त्यांनी दलित साहित्याला, दलित समाजाला, दलित समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक चळवळींना उपयोगी ठरेल असा एकही विचार मांडलेला नाही. त्यांच्या नावे नवा अनुभव देणारे, अनुभवाचा नवा आशय व्यक्त करणारे ललित लेखन आलेले नाही. त्यांनी ललित लेखन केले आहे पण त्यामध्ये व्यथा-वेदनांचे, वासना-भावनांचे सूक्ष्म, नाजूक अथवा विराट, विक्राळ विश्वात्मक दर्शन घडविणारे लेखन आलेले नाही. त्यांच्या लेखनाचा आवाका मर्यादित असतो. वैयक्तिक टीकेच्या, निंदानालस्तीच्या पातळीवर असतो. भांडण ज्या मानसिक पातळीवर बावरते त्या पातळीवर त्यांचे लेखन असते. सुडाची, वैराची, द्वेष-मत्सराची भावना त्यांना लिहिण्यास भाग पाडते. ते असेच लिहितात. संशय वाटत असेल तर त्यांचे एकांगी लेख डोळ्यांखाली घालून पाहावे. वाचले तर फायदा नाही. आनंद

नाही. तत्त्वबोध नाही. नाही वाचले तर नुकसान होत नाही. खेद वाटत नाही.

केसरीच्या संपादकांनी १५ जूनचा केसरीचा अंक घरी पाठवला. प्रा. पानतावण्यांच्या लेखाखाली बाबुराव बागूल आणि प्रा. केशव मेश्राम यांचे फोटो छापले होते. लेखाच्या मजकुराशी विसंगत असलेले पण वाचकांना आकर्षित करू शकणारे शीर्षक दिले होते, 'दलित साहित्यिक अंतर्मुख होणार का ? ··· मला मोह पडावा अशाच अवस्थेत मी होतो. रात्रीचे अकरा वाजून गेलेले होते. हॉटेलात एका कविमित्राने प्याले भरभरून गझला, नजमा ऐकविल्या होत्या. त्यामुळे मन मऊ मधुर झालेले होते. उशीजवळ ठेवलेली पत्रे न बघता मी अंक बघत अंथरुणावर अंग टाकले. वरचा लेख वाचला. थोर सामाजिक जाणीव व्यक्त करणारा तो जोगतिणी-मुरळीवरला लेख आवडला. त्या लेखाचा पाठपुरावा करण्यासाठी, दलित लेखकांचे लक्ष 'जोगतिणी, मुरळी' या दलित स्त्रियांच्या दुःखाकडे वेधण्यासाठी प्रा. पानतावणे सुचवीत असावेत असा माझा गैरसमज झाला. बाबुराव बागूल आणि केशव मेश्राम यांना तेथे जाऊन अभ्यास करण्याचे सुचवीत असतील, असेही मला वाटले. मी वाचायला लागलो. पण फसलो. चूकच केली. भांडण ज्या पातळीवर वावरते त्याच पातळीवरून प्रा. पानतावण्यांनी लिहिले होते.

दुसऱ्या दिवशी मित्रमंडळी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये भेटली. हे मित्र म्हणाले, उत्तर देण्याच्या पात्रतेचे ते लेखन नाही. नेहमीच करत आलो तसे दुर्लक्ष करावे. मलाही मित्रांचे म्हणणे पटले. दलित साहित्यिकांनी अंतर्मुख व्हावे असा एकही मुद्दा त्यांनी मांडलेला नाही. पण मला सारखे वाटत होते की उत्तर दिले पाहिजे.

दलित साहित्यिकांनी अंतर्मुख व्हावे असा मुद्दा पानतावण्यांनी मांडलाच नव्हता. तर मुरळी, जोगतिणींवर लिहिलेला लेखच अंतर्मुख करणारा होता. पुण्याचे काही तरुण वेश्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आणि संस्कार करण्याची जबाबदारी अंगावर घेऊन कार्य करीत आहेत ही बाबदेखील अंतर्मुख करणारी आहे. वेश्याव्यवसाय करण्याची पाळी स्त्रियांवर कोणती आर्थिक, सामाजिक, धार्मिक परिस्थिती आणते ? स्त्रियांचे अधःपतन कोण करते, स्त्रियांना दुय्यमत्व का प्राप्त झाले ? स्त्री उपभोग्य कोणी केली ? स्त्रीला विधवा कोणी व का मानली ? सती जाण्याची सक्ती स्त्रियांवर कोणी आणली ? हे सर्वच विषय दलित साहित्यिकांना अंतर्मुख करणारे आहेत. प्रा. पानतावणे यांनी हे प्रश्न लेखात का मांडले नाहीत ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत बौद्धमय करण्याची घोषणा केली. पण दोन तपे होऊन गेली तरी भारत बौद्धमय झाला नाही. पण बाबासाहेबांची कर्मभूमी असलेला महाराष्ट्रही बौद्धमय झालेला नाही. याची कारणे काय असावीत हे शोधणे महत्त्वाचे आहे. उद्‌बोधक आहे. हा प्रश्न अंतर्मुख करणारा आहे.

बळ अधिक आहे. हे मराठेतर आमदार आपल्या जातीच्या उद्धाराचा, धार्मिक विकास घडवून आणण्याचा यत्न करणार.

अगदी स्वातंत्र्यप्राप्तीपासून मराठा जातीच्या हातांत सत्ता असूनही मराठा जातीतील प्रत्येकाचे प्रश्न मराठा सत्ता सोडवू शकली नाही, तसेच मराठेतरांच्या हाती आलेली सत्ताही मराठेतरांचे सर्व प्रश्न सोडवू शकत नाही. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठेतरांना वाव देणारी, बॅ. अंतुले यांना मुख्यमंत्री करणारी इंदिरा काँग्रेस जातिविघटनास मदतनीस होत आहे. कारण मराठा जातीत तिने जातीय फाटाफूट केली आहे. अन् मराठेतरांना मराठा नेतृत्वाविरुद्ध उठवले आहे. जाति–विघटनास हा आंतरविरोध उपयोगी ठरणार नाही.


जातिविघटन

जाति–विघटन वेगाने होत नाही, परंतु विघटन चालू आहे. शंबुकाचा शिरच्छेद करणारी व कर्ण–एकलव्याला नामोहरम करणारी वर्णव्यवस्था दलितांतून येणाऱ्या उच्च विद्याविभूषितांच्या झुंडी रोखू शकत नाही. कारण भांडवलशाही सत्तेवर आहे. भांडवलशाहीला जातिभेदांची, वंशभेदांची जरुरी नसते. तिला उत्पादनकार्यात कुशलता फक्त हवी असते. यंत्रोत्पादनाला जातीची नव्हे तर जगाची बाजारपेठ लागते. म्हणून उत्पादन–पद्धती बदलल्याबरोबर हिंदू समाज बदलला, शूद्र संख्येच्या जोरावर सत्तेवर आला. अल्पसंख्य ब्राह्मण त्याचे वर्णवर्चस्व गुंडाळून सत्तेपासून आता फेकला गेला. जन्माधिष्ठित व्यवसाय कल्पनाच निकालात निघाली. सत्तेसाठी संख्या आणि अर्थसत्तेसाठी यंत्रतंत्रातील कुशलता जरुरीची झाली. जातीची जूट संख्येसाठी उपयोगी ठरत असे, पण प्रत्येक जातीत वर्ग पडत आहेत अन् ते आपल्या हितासाठी धडपडत आहेत. वेगाने औद्योगीकरण, आधुनिकीकरण होईल तर जातीचे विघटन वेगाने होईल. जातीतील वर्ग जातीतून फुटून बाहेर पडतील. भांडवलशाही उत्पादनपद्धतीने ग्रामीण शूद्र, अतिशूद्र उत्पादक जातींना बेरोजगार करून टाकले आहे. जातीचा पायाच उखडला गेला आहे. जातीचे किल्ले ढासळत आहेत. फक्त उद्योगधंद्यांचा शिक्षणाचा वेगवान विकास हवा आहे. भांडवलशाहीचा अनुभव सर्व जाती घेत आहेत. समाजवादी पद्धतीचा अनुभव घेणे राहिले आहे. लोक तिकडे वळल्याशिवाय राहणार नाहीत. वर्गांतर ही शूद्र–अतिशूद्र ह्या बहुसंख्य जनतेची मागणी आहे. ते प्राप्त करून घेण्यासाठी तो झगडतो आहे. हा झगडा पुढे जाणार आहे. जातीचे ढासळते किल्ले कोसळून पडणार आहेत. कारण जातीत वर्गपद्धत आहे. अन् जगातील वर्गसमाज वर्गविहीन समाजाकडे वाटचाल करीत आहे. हे युग त्या संघर्षाचेच आहे.

•

दलित चळवळ
पुन्हा
विघटनाकडे ?

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ शाखा स्थळ प्रत
2099
23320
निवड
1991



इतर दलित जातिजमातींना बौद्ध करून घेण्यात का आले नाही ? त्यांच्यामध्ये बौद्ध प्रचारक का गेले नाहीत ? किंवा गेले असतील तर त्यांना यश का आले नाही ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे, अंतर्मुख करणारा आहे.

दलित जाति-जमातींची एका पक्षामध्ये, एका धर्मामध्ये संघटना उभी राहिली तर संख्या निवडणुकीच्या मार्गाने सहज सत्ता काबीज करू शकेल एवढी मोठी होते, म्हणून दलित जातिजमातीची एकी कशी होईल, राजकीय संघटना कशी उभी राहील हा प्रश्न अंतर्मुख करणारा आहे. तसेच सामाजिक महत्त्वाचाही आहे.

कलह कोण पेटवितो ?

कोठलेही ऐतिहासिक, सामाजिक वा आर्थिक कारण नसताना मुद्दाम दलित जातिजमातीत कलहाचे वातावरण आहे. हा कलह पेटविण्याचे आगलावे काम प्रस्थापित व्यवस्थेचे काही पक्षपाती मुद्दाम करीत असतात. परंतु हा कलह लोकशाहीला आणि दलितांच्या सत्तेच्या राजकारणाला अपायकारक आहे. तेव्हा कलह का आहे ? कोण तो तेवत ठेवतो आहे, का ठेवतो आहे हे शोधून काढणे, त्यावर उपाययोजना करणे, ही बाब अंतर्मुख करणारी आहे.

ईश्वराला, आत्म्याला, ग्रंथप्रामाण्याला न मानणारे वाढत आहेत. बुद्धिप्रामाण्यवाद वाढतो आहे तरी बौद्धधर्माचा इतर दलित जाति-जमाती स्वीकार करीत नाहीत. याचे कारण 'रिझर्व्हेशन (राखीव जागा) आहे की, स्वजातीबद्दलची प्रीती आहे ? जाती उद्ध्वस्त का होत नाहीत ? लोकशाहीला इतकी वर्षे होऊनही लोकशाहीविरोधी असलेली जाति–संस्था का टिकून आहे ? तिचा बीमोड कसा होईल ? कोण करील ? लोकशाही की समाजवाद ? औद्योगीकरण की शिक्षण ? सत्तेचे राजकारण की ध्येयवादी राजकारण ? या प्रश्नांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. हे प्रश्न खऱ्या अर्थाने अंतर्मुख करणारे आहेत.

राखीव जागांचे प्रकरण

'राखीव जागा' म्हणजे काय ? राखीव जागांचे धोरण हे जाती टिकवून धरणारे, जातींच्या संघटना बळकट करणारे झाले आहे काय ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात राखीव जागेबाबत नेमकी कोणती संकल्पना होती ? हिंदुधर्मामध्ये कोणत्याही जातीला व्यवसायपरिवर्तन करण्याची सोय नव्हती. संधी नव्हती. परवानगी नव्हती. कोणालाही आपल्या जातीचा व्यवसाय टाकून दुसऱ्या जातीचा व्यवसाय करता येत नव्हता. ब्राह्मण चांभाराचा व्यवसाय करू शकत नव्हता, अन् चांभाराला उपाध्याय, पुरोहित होता येत नव्हते. व्यवसायपरिवर्तन हिंदुधर्माच्या दृष्टीने मोठा गुन्हा होता, धर्मद्रोह होता. राखीव जागा म्हणजे या हिंदु कायद्यावर, रूढीवर, नीतिधर्मावर केलेला

मोठा आघात आहे. दलित जाति–जमातींना व्यवसायपरिवर्तन करता यावे म्हणून घटनेने केलेली ही कायदेशीर तरतूद आहे. राखीव जागांमुळे हिंदू बहुसंख्य असूनही, शासन यंत्रणा आणि जीवनाचे व्यापार हातात असूनही दलित जाति–जमातीतून प्रतिवर्षी शेकडो तरुण शिक्षण घेत आहेत. खरे म्हणजे हा हिंदूधर्माच्या नीतिकायद्यांप्रमाणे अघोर असा गुन्हा आहे. हा गुन्हा शंबुकाने, एकलव्याने, कर्णाने केला म्हणून त्यांचा हिंदू शासनसत्तेने निःपात केला. पण आजचे शेकडो दलित रोज व्यवसाय–परिवर्तनाचे, शिक्षण घेण्याचे गुन्हे करीत आहेत तरी त्यांना शासन होत नाही. याचे कारण काय ? घटनेने केलेली ही राखीव जागांची तरतूद. शिक्षणाचे सार्वत्रीकरण आणि उद्योगधंद्यांची वाढ, भांडवली लोकशाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उत्पादन–साधनांचा झालेला बदल. वेगवान यांत्रिक उत्पादन.

' राखीव जागा ' म्हणजे व्यवसाय–परिवर्तन करण्याची दलित जाति–जमातींना दिलेली पहिली संधी. त्या संधीद्वारे ते सत्ता, संपत्ती, सन्मान मिळवू शकतील अशी त्यामागची एक भावना. दुसरी भावना म्हणजे जातिसंस्थेने दोन जातींत जी दरी निर्माण करून ठेवली होती, ती बुजविण्याचा, लोकांना जीवनाच्या मार्गाने जवळ आणण्याचा प्रयत्न. असे असतानाही शेकडो वर्षांनंतर औद्योगिक युगाने, त्याच्या नोकरशाहीने, भारतीय दलित जाति–जमातींना पहिल्यांदाच लहानशी संधी दिली असताना, राखीव जागा व दलित जाती–जमातींच्या विरोधात देशभर उठाव होत आहे. मराठवाड्यात, बिहारमध्ये या विरोधाने यादवीचे स्वरूप धारण केलेले होते आणि या उठावाचे पुढारीपण लोकशाहीत जन्मलेल्या तरुणाने केले होते. या परिस्थितीचा, या तरुणांच्या मनःस्थितीचा आणि अदृश्य दृश्य कारणांचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा देशभर चाललेला दलित-विरोध हा अंतर्मुख करणारा प्रश्न आहे.

काही हिंदुसंघटना जातिद्वेष पसरवीत आहेत. जातियुद्धाची भावना जोपवीत आहेत. या हिंदुसंघटनांना आवर कोण आणि कसा घालणार ? यासाठी कोणती आर्थिक राजकीय नीती उपयोगी पडेल ? कोणते तत्त्वज्ञान उपयोगी पडेल ?

लोकशाहीमुळे दलित जाति–जमातींना आपली उन्नती करून घेण्याची थोडीशी सवलत प्राप्त झाली. पण राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही झाली तर अस्पृश्यता जातिभेद–दलितपण नष्ट होईल. म्हणून असलेल्या राजकीय लोकशाहीचा विकास सामाजिक लोकशाहीकडे, जनतेच्या खऱ्याखुऱ्या लोकशाहीकडे कसा होईल याचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा प्रश्न लेखक–कवींना अंतर्मुख करणारा आहे.

समाजवादी लोकशाही व भांडवली लोकशाही असे दोन पर्याय समोर आहेत. त्यांपैकी कोणती लोकशाही वेगाने दलितपण, दैन्य, दास्य, दुःख नष्ट करणारी आहे ? राखीव

जागांची लहानशी संधी सर्व प्रश्न सोडविण्यासाठी पुरेशी आहे काय ? की प्रत्येकास शिक्षण, नोकरी, निवारा याची हमी देणारी समाजवादी जीवनपद्धती आणणे उचित ? त्यासाठी कोणत्या चळवळी केल्या पाहिजेत ? कोणते मित्रपक्ष निवडले पाहिजेत ? असे शेकडो प्रश्न आहेत. यापैकी कोणता प्रश्न प्रा. पानतावण्यांनी दलित साहित्यिकांपुढे ठेवला आहे ? ते मराठवाडा विद्यापीठामध्ये शिकवितात त्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून मोठे आंदोलन झाले. ते आंदोलन, त्यांतील आंतर्विरोध, त्यातून निर्माण झालेले सवाल हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांची चर्चा केली असती तरी ' दलित साहित्यिकांना अंतर्मुख व्हा ' असे सांगण्याचा त्यांना अधिकार होता. पण त्यांनी कोठल्याही प्रश्नाची चर्चा केलेली नाही. केवढे अक्राळविक्राळ प्रश्न आहेत. पण त्यांना हे प्रश्न सुचत नाहीत, दिसत नाहीत. खरे म्हणजे त्यांना हे प्रश्न सुचले पाहिजेत एवढेच नव्हे तर, ढळढळीतपणे दिसले पाहिजेत. गेली पंधरा वर्षे ते औरंगाबादमध्ये राहत आहेत. गेली बारा वर्षे ते लोकांशी संपर्क साधणारे अवजार—एक त्रैमासिक चालवीत आहेत. विद्यार्थी, विचारवंत, कलावंतांशी त्यांचा सतत संपर्क आहे, तरी ते दलित साहित्यिकांना अंतर्मुख करतील असे महत्त्वाचे ज्वलंत प्रश्न उपस्थित का करू शकले नाहीत ? त्यांचे सामाजिक प्रश्नांचे आकलन मर्यादित आहे म्हणून ते नेहमी भांडणाच्या पातळीवरील—वैर, द्वेष, मत्सर व्यक्त करणारे लेखन करीत असतात ?

पानतावण्यांनी काय केले ?

दलित साहित्यिक अंतर्मुख होतील काय, असा ज्ञानीपणाचा मुखवटा धारण करून त्यांनी लेख लिहिलाय. त्यांना दिसत असते, सुचत असते तर त्यांना बौद्ध साहित्यवाल्या मंडळींचे दुटप्पी वागणे दृष्टीस आले असते. ही बौद्ध साहित्यवाली मंडळी (अडसूळ गट) बौद्ध साहित्याचा हिरिरीने प्रचार करीत आहेत काय ? खरे म्हणजे त्यांनी वेगवेगळ्या दलित जाति—जमातींत जाऊन तिथे धर्मांतरे घडवून आणली पाहिजेत. तसे ते काही करतात का ? जे बौद्ध झाले त्यांचे धार्मिक शिक्षण व्हावे म्हणून त्यांनी लहान लहान आकर्षक अशा पुस्तिका काढल्या पाहिजेत. ते असे बौद्धधम्म शिक्षणाचे कार्य करतात काय ? लहान मुलांवर आणि तरुण पिढीवर बौद्ध धम्माच्या, बुद्धिवादाचा, गतिवादाचा संस्कार व्हावा म्हणून त्यांनी अनित्यवाद लोकांना समजेल अशा भाषेत मांडला पाहिजे. तो मांडला आहे काय ? बौद्ध धम्माचे अनेक पंथ आहेत. काही पंथ तर थेट हिंदु धर्माचेच आहेत. त्याबद्दलची माहिती त्यांनी लोकांना व्हावी म्हणून सचित्र पुस्तकमालिका काढल्या पाहिजेत. त्या काढल्या आहेत काय ? वज्रयान, हीनयान, महायान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले बौद्धधम्माबद्दलचे विचार त्यांनी लोकांना स्पष्ट करून, तुलना करून सांगितले पाहिजेत, ते असे काही कार्य करतात का ?

डॉ. बाबासाहेबांनी लोकांना दिलेल्या २२ प्रतिज्ञा त्यांनी घरोघर पाठविल्या आहेत

काय ? बाबासाहेबांची धम्मासबंधीची व्याख्याने, लेख त्यांनी लोकांच्या हातात सहज पडावेत म्हणून कार्य केले आहे काय ?

ही कामे त्यांनी केलेली नाहीत. मग त्यांचे बौद्ध साहित्य म्हणजे आहे तरी काय ? ते बौद्ध ललित साहित्याचा पुरस्कार करू बघतात काय ? मग त्यांनी बौद्ध कादंबरी, बौद्ध नाटक, बौद्ध संगीत, बौद्ध शिल्प, बौद्ध चित्रकला या संबंधात काही केले आहे काय ? अशी किती पुस्तके त्यांनी प्रकाशित केली ? असे किती लेखक–कवि–कलावंत त्यांनी प्रकाशात आणले ? असे त्यांनी काहीही केलेले नाही. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, संगीत, शिल्प, चित्रकला निर्माण करणारे बौद्ध प्रतिभावंत त्यांच्याकडे फिरकत नाहीत. मग त्यांनी बौद्धधर्म संस्कृती ज्या देशांत आहे त्या देशांतील बौद्ध कादंबरी, नाटक, शिल्प, चित्रकला मराठीत आणण्याचा प्रयत्न धम्मचक्र परिवर्तनापासून केला आहे काय ? १९५६ पासून त्यांनी अशी किती पुस्तके प्रकाशित केली आहेत ? हेही काम केले नाही. मग ते 'बौद्ध साहित्य' ही पाटी लावून करतात तरी काय ?

केवळ निंदामोहीमच !

म्हणजे धम्मप्रसाराचे कार्य करीत नसूनही, बौद्ध कादंबरी, नाटक, काव्य, कथा प्रकाशित न करूनही बौद्धसाहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र न मांडताही हे लोक स्वतःला बौद्धसाहित्य-वाले समजून घेतात आणि 'दलित' या शब्दाला सनातन्यांच्या कठोरपणाने विरोध करतात. पण भारतातील फार मोठी लोकसंख्या दलित आहे. आदिवासी, अस्पृश्य, इतर मागासलेले आणि स्त्रिया यांना हिंदुधर्माने शूद्र समजले आहे. या बहिष्कृत भारतीयांची बाजू घेणाऱ्या, त्यांना अधिनायकत्व देणाऱ्या साहित्याबद्दल त्यांना दुःश्वास वाटण्याचे कारण नाही. पण बौद्ध साहित्यवाले दलित साहित्यावर चिडतात का ? त्यांना तिथे त्यांची जात दिसते. पण जात नाही म्हटल्याने जाते काय ? जाती नष्ट करण्यासाठी सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनाच्या चळवळी उभ्या कराव्या लागतात. त्या चळवळी तर बौद्ध साहित्यवाली मंडळी करीत नाहीत. करू शकत नाही. तेवढी कुवत नाही. निदान त्यांनी जे लोक एकीकडे हिंदु महार आहेत अन् दुसरी कडे बाहेर बौद्धही आहेत, किंवा निवडणुकांमध्ये हिंदु–महार होतात, त्यांच्याबाबत तरी भूमिका घ्यावी. तीही ते घेत नाहीत. त्यांनी एकच कार्य बौद्ध साहित्य म्हणून अंगीकारले आहे, ते म्हणजे काही दलित लेखक–कवींविरुद्ध निंदामोहीम करण्याचे. बौद्ध साहित्यवाल्या त्या मंडळीबद्दल प्रा. पानतावणे काहीही प्रश्न उपस्थित करीत नाहीत. तेव्हा त्यांना ही निंदामोहीम मान्य आहे असे मानावयाचे काय ?

ब्राह्मण समाज संख्येने मोठा नाही. पण कलाक्षेत्रात ब्राह्मण आहेत. शासनयंत्रणेत ब्राह्मण आहेत. आधुनिक सर्व व्यवसायांत ब्राह्मण आहेत. एवढेच नव्हे तर आधुनिक

अर्थार्जनाची जेवढी म्हणून क्षेत्रे आहेत तिथे तिथे ब्राह्मण आणि तत्सम जाती आहेत. कारखाने–कंपन्या, व्यापारी संस्था; बँका, एजन्सीज त्यांनी निर्माण केल्या आहेत. नावा-रूपाला भरभराटीला आणल्या आहेत. मोठमोठ्या वास्तू, नाट्यगृहे, चित्रमंदिरे, ग्रंथालये, संशोधन संस्था, सार्वजनिक उपयोगाच्या इमारतींसह त्यांनी उभ्या केल्या आहेत. गेल्या तीस वर्षांतच महाराष्ट्रातील मराठा समाज जागृत झाला आहे. त्यांनीही ग्रामीण महाराष्ट्रातील मराठा समाज जागृत झाला आहे. त्यांनीही ग्रामीण महाराष्ट्रातील सर्व अर्थ-कारण आपल्या हातांत घेतले आहे. आधुनिक अर्थार्जनाची क्षेत्रे, ग्रामीण भागांतील स्थानेही व्यापून टाकली आहेत. दलित मध्यमवर्गाने अशी आधुनिक अर्थार्जनाची क्षेत्रे व्यापायला हवीत. कंपन्या, बँका, एजन्सीज, व्यापारी संस्था, सहकारी संस्था उभ्या करायला हव्यात. अशी किती तरी क्षेत्रे आहेत की, त्यांद्वारे भरपूर द्रव्य प्राप्त होऊ शकेल. दलित समाजातील बुद्धिजीवी वर्ग तिकडे वळत का नाही ?

भांडणाची पातळी

या प्रश्नांची सखोल चर्चा केली तर दलित तरूण बुद्धिजीवी अंतर्मुख होतील, विचार करू लागतील. त्याच चर्चेतून दलित समाजाला उपयुक्त होईल असे किती तरी दीपस्तंभ प्रकाशित होतील. पण प्रा. पानतावणे त्यांची भांडणाची पातळी सोडायला तयारच नाहीत. म्हणून त्यांचे लेखन अंतर्मुख करणारे लेखन झालेले नाही. अंतर्मुख करणारे लेखन सरावामुळे न दिसणारे दुःख दाखवीत असते. एखाद्या प्रश्नाचे अज्ञात असलेले धागेदोरे उजेडात आणीत असते. हे लेखन दृष्टी देणारे असते. दृष्टी विशाल करणारे असते. प्रा. पानतावण्यांचा लेख दृष्टी देणारा झाला आहे काय ? दृष्टी विशाल करणारा झाला आहे काय ? वाळूवर बसलेला माणूस मुठी भरभरून वाळू फेकतो तशी त्यांनी वांझ वाक्ये पहिल्या परिच्छेदात आणि संपूर्ण लेखात फेकून दिलेली आहेत.

पहिल्या परिच्छेदात प्रा. पानतावण्यांनी महाड, नाशिक सत्याग्रहाच्या यशापयशाची थोडक्यात चर्चा करणे आवश्यक होते. तसेच साठ वर्षांच्या दलित चळवळीसंबंधीही त्यांनी काही विचार मांडायला हवे होते. पण ते म्हणतात, 'दलितांना अल्प मूल्य' मिळाले. 'स्वभाषा' मिळाली. पण नाशिक सत्याग्रहाच्या अपयशाची कारणे मात्र सांगत नाहीत. ते सांगू शकणारच नाहीत. कारण भांडणाच्या पातळीवर राहण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांना फारसे दिसत नाही. त्यांना खूप खूप दिसावे एखाद्या लहानशा घटनेतील वादळ–वणवे, महाकाव्ये आणि सुकोमल आसवेही दिसावीत आणि ते सदैव ज्ञानाच्या प्रकाशित पातळीवर वावरावेत अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे. म्हणूनच मी हा लेख लिहायला घेतला.

कामाचे स्वरूप बदलले

हिंदु धर्म–समाजव्यवस्थेने दलित जातींच्या माथी निकृष्ट दर्जाची कामे आणि व्यवसाय

लादलेले होते. हे फक्त दैन्य, दुःख देणारे व्यवसाय टाकून देता येत नव्हते. दुसरे स्वीकारता येत नव्हते.

पण ब्रिटिशांनी नवे उद्योगधंदे, व्यवसाय उपलब्ध करून दिले. युद्धामुळे ते वाढू लागले तसे खेड्यापाड्यांतील गोरगरीब दलित शहरांकडे धावू लागले. नव्या औद्योगिक जगात औद्योगिक कामगार बनू लागले. कामामध्ये ट्रेड युनियन, बाहेर राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ, सामाजिक प्रबोधनाची चळवळ, यामुळे दलित जातींतील स्वावलंबी बनलेल्या कामगारवर्गाचे वस्तुनिष्ठ शिक्षण होऊ लागले. कर्मवीर शिंदे कार्य करीत होतेच. बाबासाहेब आंबेडकर परदेशातून येताच दलित कामगार त्यांच्याभोवती गोळा होऊ लागले.

महाड परिसरात राहणारे निवृत्त दलित सैनिक, अधिकारी आणि मुंबईचे औद्योगिक कामगार यांच्या संयुक्त शक्तीने महाडचा सत्याग्रह १९२७ साली सुरू केला. पण त्या आधी मुंबई सरकारने रा. बोले यांनी मांडलेला सार्वजनिक पाणवठे-मंदिरे सर्वांना खुली करण्याचा ठराव मंजूर केला होता. हा ठराव १९२४ साली मंजूर झालेला होता. म्हणजे ब्रिटिशांचे कायद्याचे राज्य, भांडवलशाही, तिचा उदारमतवाद, दलित जनांतून आलेला कामगारवर्ग, सामाजिक, राजकीय स्वातंत्र्याची चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि १९२४ चा सरकारने मंजूर केलेला रा. बोले यांचा ठराव, इतक्या घटना महाड सत्याग्रहाच्या, नाशिक सत्याग्रहाच्या मागे होत्या. समजा, या घटना क्रमाने घडल्या नसत्या म्हणजे ब्रिटिश नसते, कायद्याचे राज्य नसते, भांडवली उद्योगांचा उदय झाला नसता, औद्योगिक युगाने दिलेले ज्ञान–विज्ञान इथे आले नसते; तर दलित समाज ग्रामगाड्याशी, बलुत्याशी, दैन्यदास्याशी जखडून राहिला असता. कोणालाच शिक्षण घेता आले नसते. कोणालाच व्यवसाय-परिवर्तन करता आले नसते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरही झाले नसते. आणि ते दलित मुक्तीचे आंदोलनही करू शकले नसते. शंबुक, एकलव्य, कर्ण यांचे अंत जसे हिंदुधर्म दंडसत्तेने केले तसाच अंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदु–धर्म–दंड सत्तेने केला असता. जातिभेदाचे, अस्पृश्यतेचे पालन, विषमतेचे संवर्धन, शूद्र–अतिशूद्र, स्त्रियांचे दमन हे हिंदुधर्माचे वैशिष्ट्य आहे. प्राणतत्त्व आहे. म्हणून बाबासाहेबांचा, त्यांच्या चळवळीचा बीमोड हे हिंदूंच्या दृष्टीने धार्मिक कार्य आहे. त्यामुळे त्यांचे इथले व परलोकातील सर्व देव संतुष्ट होऊन जातात, आशीर्वाद देतात. बाबासाहेबांचा बीमोड झाला नाही, त्याची दलितमुक्तीची चळवळ मारली नाही, हे अशुभ होऊ शकले नाही याचे मुख्य कारण इथे आलेली भांडवलशाही, तिचे ज्ञान, तत्त्वज्ञान आणि व्यवस्था हे आहे.

जलसाकारांचा उल्लेख

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली चळवळ शहरात साकार झाली. दलित साहित्याची चळवळ शहरात सुरू झाली. दलित पँथरचा जन्म शहरातच झाला. दलित चळवळीचे बहुसंख्य नेते, कार्यकर्ते, शहरवासीच आहेत. दलित चळवळी शहरामध्येच का जन्मल्या ?

बहुसंख्य कार्यकर्ते, नेते शहरवासीच का ? खेड्यातून मोठा नेता, कवि–लेखक का पुढे आला नाही ? खेड्यांत दुःख फार. दैन्य फार. दास्य फार. म्हणून संघर्ष आणि संघर्ष व्यक्त करणारे खेड्यातूनच उठायला हवे आहेत. पण उठलेले नाहीत. याचे कारण काय ? हे सर्वच प्रश्न विचार करण्याजोगे आहेत. अंतर्मुख करणारे आहेत पण प्रा. पानतावण्यांना ते दिसत नाहीत, कारण ते द्वेष–मत्सराच्या भांडणाच्या पातळीवरच वावरतात. म्हणून ते सत्य सांगण्याचे टाळतात. आंबेडकरी जलसाकारांचा मी वेळोवेळी केलेल्या भाषणांत, लेखनांत गौरव केलेला आहे. दलित साहित्याच्या पुरवण्यांमध्ये त्यांचे उल्लेख आलेले आहेत. महाराष्ट्र टाईम्स च्या दलित साहित्य पुरवणीत आंबेडकरी जलसाकारांवर मी स्वतंत्र लेख लिहिलेला आहे. हे सर्व डावलण्यासाठी प्रा. पानतावणे असा भास निर्माण करतात की, दलित साहित्य चळवळीतील लोक त्या जलसाकारांना डावलतात. असा खोटेपणा करून त्यांच्या पदरात खोटेपणाशिवाय, दंभाशिवाय दुसरे काय पडणार आहे ?

प्रा. पानतावण्यांच्या लेखाचा तिसरा आणि चवथा परिच्छेदही असाच भांडणाच्या पातळीवरच वावरतो. त्यांचे मत वैर, मत्सर, द्वेषाच्या कचाट्यातून कधी मुक्त होणार नाही काय ? माझे नाव गेली काही वर्षे लेखक म्हणून गाजत नाही. माझे लेखनसातत्य तुटले आहे.एक कादंबरी मी लिहितोय् त्याला दोन वर्षे होत आली तरी ती पूर्ण होत नाही. गेली कित्येक वर्षे मला स्थिर बसून लिहिता येईल अशी जागा नाही, अशी स्थिती प्राप्त झालेली नाही. अनेक अडचणींना मला तोंड द्यावे लागते. चतुर्थ श्रेणीतून माझी आर्थिक स्थिती वर जात नाही. तरीही मी नाराज नाही. दुःखी कष्टी नाही. कोणाचा द्वेष करीत नाही. राव आणि रंकांच्या घरांत मी वाऱ्याच्या सहजतेप्रमाणे वावरतो. तरुणांच्या चळवळींशी होता होईल तेवढे संबंध, हे सारे उघड असूनही प्रा. पानतावणे माझा द्वेषच करीत आहेत. तसे ते गाजणाऱ्या प्रत्येक दलित-लेखक कवींवर दात खाऊन असतात. त्यांच्या गाजणाऱ्या पुस्तकांबद्दल लेखक कवीचे त्यांनी कधीच आनंदाने उचंबळून येऊन स्वागत केलेले नाही. अलीकडेच यशवंत मनोहरांचे 'उत्थान गुंफा,' दया पवारांचे 'बलूत' प्र. ई. सोनकांबळे यांचा 'आठवणीचे पक्षी', श्री. माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' ही पुस्तके फार गाजली. मराठीतील मोठमोठ्या लेखकांनी मुक्त कंठाने या पुस्तकांची प्रशंसा केली. मराठीतील मोठमोठ्या लेखकांनी ज्या मोकळेपणाने, रसिकतेने, सामाजिक जाणिवेने या पुस्तकांबद्दल लिहिले त्याप्रमाणे प्रा. पानतावण्यांनी कोठे भरगच्च लिहिले आहे काय ? ते तर स्वतःला दलित साहित्य चळवळीतील फार मोठी असामी आहेत असे मानतात. त्यांच्या हाताशी सतत बारा वर्षे त्यांचे त्रैमासिक असूनही त्यांनी या पुस्तकावर मनमोकळेपणाने लिहिले आहे काय ? का लिहिले नाही ?

साहित्य चळवळीतही फूट

दलित चळवळ सबल होऊ नये, तिने योग्य ध्येयधोरणे स्वीकारू नये, ती गतिमान होऊ

नये, तिला आघात करण्याची शक्ती प्राप्त होऊ नये. ती फुटावी, तिची शक्ती परस्परांत लढण्यात खर्च व्हावी, तिला क्रांतिकारक आशय आणि कार्यक्रम प्राप्त होऊ नये, नि सत्तेच्या राजकारणात योग्य दिशेने जाऊ नये असे प्रयत्न दलितविरोधी असलेल्या 'एजन्सिज' अनेक पातळ्यांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पद्धतीने करीत असतात. त्यांनी रिपब्लिकन पक्ष फोडला, दलित पँथर फोडली. सत्तेच्या राजकारणात शिरू न शकणारी दलित साहित्य चळवळही फोडली. कशी ?

नागपूरला अस्मितादर्श मेळावा घेण्याचे ठरले. नागपूरचे दलित साहित्यिक, प्राध्यापक, साहित्यप्रेमी जमले. विचार करू लागले. त्यांतून अस्मितादर्श मेळाव्याऐवजी दलित साहित्य मेळावा घ्यावा असा विचार सर्वानुमते ठरला. हा विचार कदाचित प्रा. पानतावण्यांना आवडला नसेल. नंतर अध्यक्ष, उद्घाटक कोण, यावर चर्चा सुरू झाली. निरनिराळी नावे आली. पण डॉ. म. ना. वानखडे व बाबुराव बागूल यांना अध्यक्ष आणि उद्घाटक म्हणून बोलविण्याचे ठरले. प्रा. पानतावणे यांना ते अजीबात आवडले नाही. नागपूरच्या त्या साहित्य संमेलनापासून आम्हांविरुद्ध प्रचाराची दगड-फेक जोरात सुरू झाली. तो प्रचार म्हणजे आंबेडकरवाद विरुद्ध मार्क्सवाद. आम्ही सर्व मार्क्सवादी म्हणून आमच्याविरुद्ध जिकडे तिकडे प्रचार. याचे सूत्रधार बहुधा प्रा. पानतावणेच असतील.

अस्मितादर्शचे कार्य

अस्मिता काढणारे डॉ. म. ना. वानखडे, रा. ग. जाधव, प्रा. रायमाने, सुखराम हिवराळे, वामन निंबाळकर, गंगाधर पानतावणे आणि इतर साहित्यप्रेमी प्राध्यापक, विद्यार्थी यांनी 'अस्मिता' काढले. मिलिंद साहित्य सभा काढली. पुढे अस्मिताचे नाव बदलावे लागले. 'अस्मितादर्श' झाले. पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये डॉ. म. ना. वानखडे आल्यामुळे संपादक प्रा. गंगाधर पानतावणे झाले. अस्मितादर्शला मुंबईवरून मदत करणाऱ्यांमध्ये नारायण सुर्वे, केशव मेश्राम, बाबुराव बागूल, प्र. श्री. नेरूरकर, दया पवार आणि आम्हा सर्वांचे मित्र होते. जाहिराती, वर्गण्या आणि इतरही मदत करण्यासाठी सर्वांनी आपआपल्यापरीने मदत केली. त्यानंतर अनेकदा या सर्वांचे लेखन आणि सहकार्य अस्मितादर्श घेत राहिले. कम्युनिस्ट पक्षाचे सभासद, लोकवाङ्मय प्रकाशनाचे मराठी विभागाचे सल्लागार नारायण सुर्वे हे अस्मितादर्शला अधिक मदत करीत होते. नारायण सुर्वे व प्रा. पानतावणे असे दोघे मिळून दलित साहित्य अन्थॉलॉजीचे संपादक. साहित्य गोळा करण्याचे कार्य सुरू झाले. लोकवाङ्मय प्रकाशनगृह हे पुस्तक काढणार होते. प्रा. गंगाधर पानतावणे संपादक झाल्यापासून आम्ही सर्वच त्यांना सहकार्य देत होतो. या प्रदीर्घ काळामध्ये प्रा. पानतावण्यांना मार्क्सवाद, आंबेडकरवाद हे भांडण आठवले नाही. त्यांनी तंटा सुरू केला नाही. तो आठवला नागपूरच्या साहित्य संमेलनात. त्यांना प्रामुख्य मिळाले नाही, त्यांच्या इच्छेप्रमाणे संमेलनाची

आखणी झाली नाही म्हणून. नागपूरचे सर्वच्या सर्व लोक त्यांच्या वागणुकीवर नाराज झाले, चिडले. तेव्हा त्यांच्या बाजूचे कोणीच राहिले नाही.


राजकारणात न शिरू शकणाऱ्या दलित साहित्य चळवळीतील हे भांडण अनेक वर्तमानपत्रांनी खूप रंगविले. ज्यांना ज्यांना हीही फाटाफूट हवी होती, त्यांनी त्यांनी त्यामध्ये हिरिरीने भाग घेतला. तेल ओतले. प्रा. पानतावण्यांनी ज्यांना कम्युनिस्ट ठरविले होते, त्यांच्यापैकी कोणीच या प्रचाराला उत्तर दिले नाही. तरी प्रचार चालूच होता. कारण त्यांना दलित साहित्य चळवळीत मोठी दरी पाडायची होती, पाडली. झाले काय ? पानतावणे एका बाजूला आणि सर्व निर्मितिक्षम कलावंत एका बाजूला. सर्व नामवंत एका बाजूला. प्रा. पानतावणे एकटे दुसऱ्या बाजूला. ते एकटे सर्व निर्मितिक्षम कलावंताच्या विरोधात. आपले लहानसे त्रैमासिक घेऊन, ज्याला साहित्य संस्कृति मंडळ वर्षाला आता पाच हजार रुपये मानधन देते ते.

फाटाफुटीस साह्य ?

दलित चळवळीत फार लवकर फाटाफुटी का होतात, कोण घडवून आणतात, का आणतात, याचा विचार व्हायला हवा आहे. प्रा. पानतावणे अंतर्मुख होऊन विचार करीत नाहीत. त्यांना त्याची जरुरीच नाही. म्हणून केसरीतील लेख ती फाटाफूट अधिक वाढविण्यासाठी त्यांनी लिहिलेला आहे. म्हणजे दलित चळवळ कधीच संघटित होऊ नये, सबळ होऊ नये, परिवर्तन करण्याची शक्ती तिच्या ठायी येऊ नये, ती आपसात लढावी, कूजावी, अशा ज्या मंडळींना वाटते तसाच प्रयत्न प्रा. पानतावणे करीत आहेत की काय ?

फार पूर्वी दलित जनता एक होऊ नये म्हणून तेव्हाच्या हिंदू सत्ताधाऱ्यांनी जाती निर्माण केल्या. जातींना त्यांचे व्यवसाय टाकून देण्याची, नवे व्यवसाय पत्करण्याची मनाई केली. जातिभावना वाढवून एकजुटीत पाचर मारली. कौटिलीय अर्थशास्त्रातदेखील गणसंघटना कशी फोडावी याचे नियम दिलेले आहेत. दलित चळवळीत फाटाफूट करण्याचे कार्य अनेक संस्था करीत आहेत. पण दलितांना एक करण्याचे कार्य त्यांचे जीवन हे क्रांतिकारी युग करणार आहे. ती इतिहासाची गरज आहे. दलित साहित्य चळवळीतील आम्हांला हे माहीत आहे. म्हणून भांडणाऐवजी आम्ही शिक्षण देतो. प्रा. पानतावण्यांनी एक दोन धडे घेतले तरी खूप झाले. म्हणून हा लेख लिहिण्याचे कष्ट घेतले. प्रा. पानतावणे थोडेसे जरी भांडणाच्या पातळीपासून दूर झाले तरी कष्ट सार्थकी लागले असे मला वाटेल.

•



दलित साहित्याची दिशा :
ऑडिट

उत्थानगुंफा :
जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर लेणे

आठवणीचे पक्षी :
धुमसणारे पंख

दलित साहित्याची दिशा : ऑडिट



'ऑडिट' हा प्रल्हाद चेंदवणकर यांचा पहिला कवितासंग्रह. दलित समाजाचे प्रकाशन, वितरण नाही. जे आहे त्याचे बळ फार अपुरे असते. त्यामुळे उदयाला येणाऱ्या अनेक कवी, लेखकांना मोठ्या अडचणीतून जावे लागते. अशा अडचणींवर मात करून चेंदवणकरांचा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

या वर्षी जानेवारी महिन्यामध्ये नागपूर येथे दलित साहित्य संमेलन झाले. या संमेलनाने जे विचार दिले त्यामुळे अनेक कवी, कलावंत गतिरोधातून बाहेर आले. दलितत्व म्हणजे सम्यक क्रांतित्व. देशाची नवी रचना करण्याचे ऐतिहासिक कार्य युगानेच दलितांच्या खांद्यावर टाकले आहे. त्याला हवा तसा देश त्याने निर्माण केला पाहिजे आणि दलित साहित्याने देशाचे संवेदनाक्षम पुढारीपण केले पाहिजे. लेखन हे क्रांतिकारी कृती झाले पाहिजे आणि पुढे आले पाहिजे.

देशात सामाजिक, आर्थिकदृष्ट्या जे दलित लोक आहेत, त्यांचे आणि

इतरही समाजाचे ऐक्य झाले पाहिजे. जनतेचे विभाजन वर्णव्यवस्थेला आणि शोषणांचा पुरस्कार करणाऱ्यांना हवे असते.

भगवान बुद्धाचे व डॉ. आंबेडकर यांचे अनुयायी माणसाचे महानत्व व मुक्ती देण्याच्या संघर्षात अग्रभागी राहतील.

दलित लेखक सामान्य जनतेशी पक्का बांधलेला असतो. त्याची प्रेरणा, आदर्श आणि त्याची पौराणिकता ही माणसासाठी कार्य करणारे जगातील थोर पुरुष आहेत व जगातील महान पुरोगामी, मानवतावादी, क्रांतिकारी वाङ्मय आपलेच वाङ्मय आहे; हे आणि अशा प्रकारचे अनेक विचार नागपूर दलित साहित्य संमेलनाने चर्चिले, त्याचा अनेकांवर प्रभाव पडला. सर्वत्र विचारविनिमय होऊ लागला. कलावंतही क्रियाशील झाले.

ठिकठिकाणावरून पुस्तके निघण्याचे जाहीर होऊ लागले. मुंबईवरून दलित साहित्य संसदेचे दोन क्रियाशील कवी अर्जुन डांगळे व प्रल्हाद चेंदवणकर यांचे कवितासंग्रह प्रकाशनासाठी वर उसळून आले. तिघाचौघांच्या पुस्तकांच्या प्रस्तावना लिहिण्याचे काम माझ्याकडे आले. तसेच दलित साहित्य संसदेचे अध्यक्ष डॉ. वानखडे यांच्यावर काहींनी आपले काम सोपवून दिले.

हा उत्साह पाहून आनंद वाटतोय. कारण भारताची बहुसंख्य असलेली जनता–दलित–श्रमिक जनता, जी स्वातंत्र्यासाठी लढली, जी देशाला अन्न, वस्त्र पुरवते, जी भारताला 'नवी तीर्थक्षेत्रे' देते व भारताचे भवितव्य घडविते, तिला तिचे जीवनचित्रण बघायला, वाचायला, ऐकायला, मिळत नाही. कारण तिला तिचे लेखक, कवी, कलावंत नाहीत.

जे हात व डोके सरंजामी युगात लेखन करीत होते ते हात आणि डोके आताही–लोकशाहीत लेखन करीत आहे. म्हणून ते त्यांचेच–आजचे अन् गतकालाचे चरित्रचित्रण करीत आहेत. निरर्थक स्वप्ने दलित–श्रमिक जनतेला सिनेमा–नाटकांत पाहावी लागत आहेत. ऐकावी लागत आहेत आणि वाचावीही लागत आहेत.

मार्क्स आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन एक एक लेखक–कवी दलित–श्रमिकांतून पुढे येत आहे. आता आजच्या युगाचे आणि त्याची वैचारिकता–आदर्श व्यक्त करणारे वाङ्मय येईल असे वाटू लागले आहे. त्याची सुरुवात झाली आहे.

असाच आनंद, उत्साह महाड, बौद्ध साहित्य संमेलनाच्या आधी व नंतर दिसू लागला होता. मुंबईच्या दलित श्रमिकांच्या वस्त्यांतून एक एक कवी प्रकटत होता. नामदेव ढसाळ, दया पवार, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, उमाकांत रणधीर, प्रल्हाद चेंदवणकर, कसबे असे अनेकजण पुढे येत होते. आम्ही सर्वजण जमत असू. तास न् तास इराण्याच्या हॉटेलमध्ये, रस्त्यावर घनश्याम तळवटकर यांच्या ऑफिसात अथवा बागेत

बोलत बसत असू. प्रत्येक जण आपल्या मित्राला घेऊन येत असे. साहित्यावर चर्चा होत. साहित्य, समाज, संस्कृती, धर्म, राजकारण, समाजवाद, अस्पृश्यता, विषमता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, मार्क्स, लेनीन, माओ, चे, हो चि मिन्ह, गोर्की, मायकोवस्की, पाब्लो नेरुदा, काळे अमेरिकन साहित्य, हिन्दी, उर्दू, मराठी कवितांवर चर्चा होत. बैठकीत आलेल्या कवींच्या कवितांवरही चर्चा होत. अन् कवी बदलत. त्यांच्या कविता बदलत. जीवनाकडे येत. आजचे दलित कवितेचे आघाडीचे कवी नामदेव ढसाळ, दया पवार, हे आधी भावगीते, प्रेमकविता लिहीत. या कवींची कविता बदलत गेली. दलित कविता होत गेली.

उमाकांत रणधीर खूप चांगल्या कविता लिहीत असे. सर्वांनाच त्याच्या कवितेबद्दल खूप आशा वाटे. मला तर फार वाटे. तसेच ज. वि. पवारबद्दलही वाटे.

पुढे राजा ढालेही आमच्यात बसू लागले. त्या वेळी ते 'गांडूंची पिढी' ह्या मध्यमवर्गीय तरुणांच्या सोबत राहत होते. अनेक वर्षे म्हणजे दलित साहित्य परिषद सोडल्यापासून ते तिथेच होते. लिट्ल मॅक्झीन काढणे आणि आपण षंढ आहोत, आपण काही करू शकत नाही हे 'गांडूंच्या पिढीचे' वाङ्मयनिर्मितीचे सूत्र होते. अन् त्या सूत्रानुस लिट्ल मासिकांतून लेखन येत होते.

या उलट आमचे होते. हे जग आणि जीवन आपण बदलू शकतो. आपण देव, देश धर्मापेक्षा मोठे आहोत. आपल्यामुळेच हे जग गुहाजीवनापासून विसाव्या शतकाच्या क्रांतिकाळापर्यंत आलेले आहे. बाबासाहेब, मार्क्स, लेनिन, चे, माओ हे जग व जीवन बदलणारे आहेत. आशा, संघर्ष आणि मानवता, तिच्या नीतिनियमांवर आमचा विश्वास होता. त्याला अनुसरून आमच्या चर्चा चालत होत्या. क्रांती हा त्यातील महत्त्वाचा विषय होता.

कारण नफेखोरीला, धनलालसेला तेव्हा ऊत आला होता. सामान्य माणसाला जगणे अवघड झाले होते. खेड्यापाड्यात तर अन्याय, अत्याचार वाढत होते आणि त्याला कारण केवळ जातीय अहंकार नाही, धर्म नाही, तर त्यामागे नफेखोरी आहे. या धनलालसेने त्यापायी काळाबाजार, दडपेगिरी चालविली आहे. कृत्रिम टंचाई, भेसळ, साठे लपविणे हे तिचे उद्योग आहेत, असे मला वाटे. त्यामुळे कामगारांचे संप, ग्रामीण भागात होणारे लढे यांना माझा पाठिंबा असे. मी तसे बोलत असे.

आजच्या साहित्याबरोबरच राजकारणावर, अर्थकारणावर, समाजवादावर चर्चा चालत. अस्पृश्यता, विषमता, हे तर असेच आणि हे न आवडून ढाले परत त्यांच्या जुन्या मित्रांत गेले.

प्रगत साहित्य सभेत मी होतोच. तिथेच दलित साहित्याच्या सूत्राचा आराखडा मी

प्रथम वाचला. त्यानंतर मी माझा हा विचार प्रा. वा. ल. कुलकर्णी, अनंतराव भालेराव व पु. ल. देशपांडे यांना पत्रे लिहून कळविला. अजूनही काही लेखकांना कळविला असेल.

आणि या बैठकीत येत असतानाच नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे, चेंदवणकर, उमाकांत रणधीर, सोरटे, कसबे इत्यादींनी दलित पॅन्थरची स्थापना केली.

देश तेव्हा असंतोषाने खदखदत होता. काळा बाजारवाल्यांनी, भांडवलदार, जमीनदार, सावकार आणि अशाच प्रकारच्या समाजातील दुष्ट शक्तींनी लोकांना अनेक अडचणींत टाकले होते. नफे करणे हे एकच ध्येय त्यांच्यापुढे होते.

बेकारीचे प्रमाण सारखे वाढले होते. गरीब दुबळे घटक मरणाकडे फेकले जात होते. जिकडे तिकडे चळवळी उठत होत्या. असंतोष प्रकट होत होता.

शहरातील दलित वस्त्यांतील पोरांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. झोपडपट्टीत अजूनही रखादी सुधारणा येत नव्हती.

ग्रामीण खेड्यात सरकारी तिजोरीतील द्रव्याचा महापूर, हरितक्रांती फक्त बागाईतदार, श्रीमंत शेतकऱ्यांच्या शेतात घुसली होती. जमिनीच्या अपहरणाची प्रवृत्ती वाढली होती. दीनदुबळे पोट भरण्यासाठी धडपडत होते. खेड्यात दैन्य आणि श्रीमंती वाढत्या वेगाने वाढत होती अन् भार फक्त गरिबांवर पडत होता. धनदांडगा वर्ग लोकशाहीचे आणि धर्माचेही नीतिनियम बुडवू लागला होता. त्याला वचक नव्हता. अन्याय, अत्याचार, अपहरणाचे प्रमाण वाढले होते.

आणि हा सर्व असंतोष, अन्याय, अत्याचार पाहत असलेली, एका वैचारिक वाङ्मयीन असंतोषातून उद्भवलेली, सामान्य जनतेशी रक्ताने, मनाने, विचाराने पक्की बांधलेली दलित साहित्याची एक लहानशी धारा एका जळजळत्या विजेला जन्म देण्याला कारण झाली.

सारे असंतोष, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सारे आक्रोश, सारी तडफड, साऱ्या वेदना, व्यथा, सारी चिरडली जाणारी स्वप्ने, आशा, झोपडपट्टीत साध्या मानवी गरजाही भागत नाहीत, गावात माणूस होऊन जगता येत नाही, नोकरी मिळत नाही, मिळाली तर सहकारी शांत मनाने नोकरी करू देत नाहीत, प्यायला पाणी मिळत नाही, मजुरी वाढवून मिळत नाही, मागितली तर मारझोड, सरकारी पैसा, योजना आणि मोहिमा सर्वांच्या हितासाठी वापरल्या जात नाहीत. पुढारी आणि पक्ष यादवीत नष्ट झाला आहे. लोकशाही समाजवाद कुठे दिसत नाही, क्रांती होत नाही. व्हावी असे वाटते. असे अनेक अपेक्षाभंग, असंतोष, दुःखे, वेदना पॅन्थर हे नाव घेऊन उठल्या.

या वेदना अगदी वणव्याच्या वेगाने वाढत गेल्या आणि काल कविता करणारे, आपल्या भावना शब्दांमध्ये व्यक्त करण्यासाठी तळमळत असलेले, आपल्या विचारांना प्रसिद्धी मिळावी म्हणून धडपडणारे तरुण भराभर पुढारी झाले. गर्दी, कीर्तीच्या लाटेवर आरूढ झाले. गर्दीने आणि कीर्तीनेच ओढून त्यांना डोक्यावर घेतले.

कलावंत म्हणूनच ते तयारी करीत होते. त्यांचे सर्व प्रयत्न हे कलानिर्मितीसाठीच चालले होते. अनेक अभावांच्या तीव्र माऱ्याखाली असल्यामुळे ते प्रयत्नही मनःपूर्वक करता येत नव्हते. पुढारी होण्यासाठी त्यांनी काहीही केले नव्हते.

क्रांतीच्या, स्वातंत्र्याच्या, समाजाच्या अथवा एखाद्या लहानशा कामासाठी जे करावे लागते, जे सहन करावे लागते तसे त्यांनी काहीही केले नव्हते, पुढारी होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षाही नव्हती. प्रारंभी फक्त लेख चांगला व्हावा, फक्त कविता चांगली व्हावी, फक्त चांगले लिहावे असेच सर्वांना वाटत होते. पण ते एका बाजूला राहिले. अन् ते पुढारी झाले. हजारोंच्या सभांत बोलू लागले.

साहित्यात–कथा कादंबऱ्या, कविता, नाटके यामधील पात्रांच्या तोंडी येईल ती भाषा ते वापरू लागले. अन् सभा गाजू लागल्या आणि प्रक्षोभक बोलले म्हणून नामदेव, [illegible] ढाले आणि इतरांवर केसेस होऊ लागल्या.

त्या चळवळीत चेंदवणकर सक्रिय होते. त्या काळातच लिहिलेल्या कविता या संग्रहात आहेत आणि या कवितांवर त्या खळबळीचा, आवेशाचा, राग–संतापाचा, गर्दीच्या आवडीचा परिणाम आहे. तो स्पष्ट दिसतोही.

चळवळ चालू असताना चळवळीसाठी लिहिलेली कविता तिची वैशिष्ट्ये घेऊन येते. ती साधी, सोपी व आवेशपूर्ण असते.

सर्वांना समजणारी कविता वाईट असते असे म्हणणे चूक. चांगली कविता समजतेच आणि ती नेमकी गोष्टही सांगते.

पाटलाने मुंबईवरून गेलेल्या दलित तरुणाला बोलावले. तो गेला. चेंदवणकर म्हणतात–

'पाटलानं बोलावलं'
म्हणून मी गेलो.
'बस' मला म्हटलं,
पण, अंगण होतं ओलं;
फाटकं बारदान
अंगावर भिरकावलं

तरीही मी उभाच
तोंड नव्हतं उघडलं;

तोंड उघडले असते तर भांडण झाले असते. हा संघर्ष खेड्याखेड्यांतून चालू आहे.

फुटक्या कपात
काळं पाणी आणलं
घाण त्यातली पाहून
मी, 'चहा नको' म्हटलं;

पाटील अजून जुनाच आहे. त्यामुळे तो जसा अंगणात बसायला सांगतो तसा चहा द्यायलाही विसरत नाही. पण कवी संपूर्णपणे जागृत झालेला, सम्यकदृष्टी आलेला. लोकशाही समाजवादाची वैचारिकता आत्मसात केलेला आहे. तो केवढे तरी अंतर कापून गेलेला आहे. त्याला त्याचे दुःख देणारे कोण हे कळले आहे. म्हणून राग आलेला आहे तरी तो शांत उभा आहे. कारण झगडा पाटलाशी नाही. व्यवस्थेशी आहे.

टिन्या खाजवीत पाटील
न्हाय, न्हाय ते बरळलं
तरीही मी उभाच
बूट नव्हतं काढलं;

बूट काढले असते तर गावमहारवाड्याचा झगडा झाला असता. जाळपोळ झाली असती. कारण ते दोघे एका वैचारिक, मानसिक पातळ्यांवर नाहीत. एक मानसिक दृष्ट्या मागे आहे, मध्ययुगात आहे. नवी उत्पादनसाधने तो वापरतो तरी नवा होत नाही. तो नवा झाला की संख्येच्या दृष्टीने मोठा आहे. तो बदलेल, नवा होईल, तर प्रत्येक खेडे संपूर्णपणे बदलेल. क्रांतीचे पुढारी होईल. कारण त्या वेळी गावातले सर्व गरीब एक झालेले असतील. अन् धनदांडगे अलग पडलेले असतील. त्यांची ताकद कमीच असेल. पण नव्या उत्पादनसाधनांबरोबरच नवी वैचारिकताही गावात गेली नसल्यामुळे, ती संस्कार, नीतिमत्ता न झाल्यामुळे गावात अजूनही मध्ययुगीन मनःप्रवृत्ती आहे. दुर्दैव हे की ती शासन करते आहे. त्याच्यात लोकशाहीची, समाजवादाची सामाजिकता यायला हवी म्हणजे तो निदान दुभंगेल—जातीच्या आणि मध्ययुगाच्या बाहेर येईल. विसाव्या शतकाचा होईल. संख्येमुळेच नव्हे, तर विचारामुळे तो खेड्याचा पुढारी होईल. तसे होत आहे.

चेंदवणकरांनाही ते दिसले आहे. ते म्हणतात,

तो मला
मुंबईला भेटतो

हंसतो
हात मिळवतो
मी त्याचा गाववाला म्हणून
माझ्याकडून तो
चहा, सिगारेट किंवा
बिर्याणीसुद्धा चापतो,

पण कवी खेड्यावर गेल्यावर मात्र तो त्याला ' महारडा ' म्हणून टाळतो. कारण तेव्हा तो त्याच्या जातभाईत बसलेला असतो.

वैचारिक धीटपणा आला नाही, याला कारण निवडणुकांचे राजकारण. लोकशाही आली पण तिच्या स्वाभाविकतेप्रमाणे ती जातिसंस्था नष्ट करणारी न होता जातिसंस्था अधिक बळकट करू लागली.

आणि म्हणून बाबासाहेबांनी इशारा दिला होता : ' जर राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक–आर्थिक लोकशाही आली नाही–सामाजिकता झाली नाही तर...वर्णव्यवस्था व तिचा हिंदुधर्म तिला भ्रष्ट करून टाकील–आणि प्रल्हाद चेंदवणकर यांनी त्या खेड्यातील लोकशाहीचे वर्णन केले आहे.

तळागाळात रुजावी लोकशाही म्हणून
गावपाटीलकी जाऊन
पंचायत आली
सागवानी झोपाळ्यावर झुलणारी सत्ता
जीपगाडीत बसून
मिरवायला लागली;

आणि मग ही लोकशाही कसा स्वार्थ साधीत जाते, द्राक्षाच्या वेलींना विटाळ होईल म्हणून सरकारी विहिरीचे पाणी दलितांना भरायला मनाई करण्यात येते–पण सरपंचाच्या मळ्याला मात्र ते पाणी जाते, स्वच्छता–मोहिमेत स्वच्छता म्हणून डोंबाऱ्याची पाले हटविण्यात येतात–अन् सरपंचाच्या घरावर स्वच्छता मोहिमेच्या पैशातून मंगलोरी कौले चढतात. आणि हरिजन सप्ताहात गावकीची जुनी कामे नाकारली म्हणून बौद्धांवर हल्ले होतात. ही आपली लोकशाही आहे.

जोपर्यंत वर्णव्यवस्थेवर, तिच्या मानसिकतेवर, वैचारिकतेवर कठोर हल्ले होत नाहीत, तिचे समूळ उच्चाटन होत नाही, तोपर्यंत लोकशाही, सामाजिकता, वैचारिकता होत नाही, नीतिमत्ता आणि संस्कृतीमध्ये परावर्तित होत नाही. असे झाले नाही म्हणजे देश, माणूस

व समाज एकाच वेळी दोन ठिकाणी, दोन युगांत, दोन आदर्शात, दोन पौराणिकतांत असतो. ही व्यवस्था फक्त विकृती, भ्रष्टाचार, स्वार्थ, दांभिकता, दाखवेगिरी निर्माण करते व वाढवतेही.

खेड्यात मोटार, बीज, व्यापारी उत्पादनतंत्र व यंत्रे गेली आहेत. सरंजामशाहीमध्ये उत्पादनाबद्दल व ते देणाऱ्या शेतीबद्दल ज्या उदार कल्पना होत्या, त्या व्यापारी वृत्तीने नष्ट केल्या आहेत. नफा हे ध्येय झाले आहे. भांडवलशाही ग्रामीण भागात वाढत आहे. तिला विक्री व नफ्याचे गणित कळू लागले आहे. त्यामुळे जमिनीचे अपहरण, दडपशाही, स्वस्त मजुरी मिळावी म्हणून गरीब दुबळ्या घटकावर अन्याय, तीव्र स्वरूपाचा जाति अहंकार, राजकारण व सत्तेसाठी जातीच्या संघटना, पैशाचे महत्त्व या प्रवृत्ती तीव्र स्वरूपाला पोहोचल्या आहेत.

म्हणजे खेड्यात भांडवलशाही विकसित होत असताना तिचा उदारमतवादी स्वभाव मात्र दिसत नाही. दिसतो जातिवाद. जातिवादातून येणारा अहंकार, तुच्छता–तिरस्कार, आणि अकारण शत्रुत्व.

व्यापारी वृत्ती आणि जुन्या जातिभेदाचे मिश्रण सर्वत्र दिसते. त्याचे प्रत्येक खेड्यात दिसणारे स्मारक म्हणजे प्रत्येक खेड्यात आढळणारे 'व्हटील' व त्या हॉटेलात आढळणारा कप.

'कप' ही चेंदवणकरांची कविता या दोन जगांत वावरणाऱ्या खेडवावर मोठा झगझगीत प्रकाश उपरोधिकपणाने टाकते.

'कप;
तुटलेल्या कानाचा,
फुटलेल्या तोंडाचा,
विटलेल्या अंगाचा,
ठार मेलेल्या मनाचा;
मारला तरी मरत नाही
जीता अजून सुकाळीचा
खेडेगावातल्या हॉटेलातला
कप...एक चहाचा !'

हा कप धंदा करतो–गिऱ्हाइकाशी चांगले वागा, त्याला संतुष्ट ठेवा, हा धंद्यातील नियम पाळला जात नाही. पण गिऱ्हाईक हवे आहे–हा कप वापरणारे आणि हा कप न वापरणारे—

ह्या कपाची उत्पत्ती स्वच्छतेच्या–पावित्र्याच्या कल्पनेतून झाली नाही. अस्पृश्यतेला कारण

स्वच्छता आहे; पावित्र्य आहे ही कल्पना ढोंगीपणाची आहे, तसेच तिला रंग, रूप, स्वभाव, इतिहास असला कुठलाही आधार नाही. आधार आहे धर्माचा. धर्माची रचना युद्ध आणि सूड भावनेवर आहे. सारी पुराणे, पण युद्धाशी निगडित आहेत. जे लढतात ते देव होतात–नायक होतात. विरोध करतात, लढतात, आणि हरतात ते खलनायक आहेत–राक्षस आहेत–दैत्य आहेत. ह्या खलनायकांना कधीच न्याय मिळाला नाही. तशाच ह्या नायकांचीही कोणी चिकित्सा केली नाही–कारण ते देवळात देव होऊन बसलेले होते.

असे पुष्कळ आहे, की ज्याची कोणी केव्हा चिकित्सा केलीच नाही. चिकित्सा करण्याचे आणि लोकजागृती करण्याचे काम बुद्धिवंतांचे असते. पण बुद्धिवंतालाच वर्णव्यवस्थेने धर्माचे आणि सत्तेचे धनी करून टेवले होते. जास्तीत जास्त बंधने निर्माण करून लोकांना मूर्ख करून टेवणे, लुटणे, शोषण करणे आणि केवळ जन्माच्या नावावर श्रेष्ठ, वरिष्ट राहणे हे त्यांच्या स्वार्थाचे होते.

त्याला आव्हान फक्त नवे ज्ञान, विज्ञान, यंत्र तंत्र आले तेव्हा झाले. नवे तत्त्वज्ञान आले आणि मग अगदी प्रथम हजारो वर्षांनंतर बुद्धिवंतांनी आत्मसमीक्षा सुरू केली. ज्योतिराव फुले यांनी कठोर समीक्षा केली. त्यानंतर बाबासाहेब आले, समाजवादी तत्त्वज्ञान आले. आणि त्यांनी समाजरचनेचे, अर्थरचनेचे, शासन सत्तेचे, राज्यकारभाराचे नवे आदर्श दिले. आणि वर्णव्यवस्थेवर अनेक पातळ्यांवरून हल्ले होऊ लागले.

महात्मा फुले-आंबेडकरांनी
तुमचे अकाउन्टस् ऑडिट केलेत.
ग्रंथा ग्रंथाच्या पानांवरचे फ्रॉडस्
सगळे डिटेक्ट केलेत;

ज्योतिराव फुले यांचेपासून सुरू झालेले हे काम अजूनही चालूच आहे. त्यामुळे काही बुद्धिजीवी लोक धर्मविरोधी होतात. अनेक लोक मुसलमान झाले, ख्रिश्चन झाले. बाबासाहेबांनी अनेकांना बौद्ध केले. अजूनही लोक बौद्ध होत आहेत. तरीही अस्पृश्यता आहे. पूर्वी होती तशीच निष्ठुर आहे असे म्हणता येणार नाही. पण आहे. कारण ती जशी धार्मिकतेशी, समाजरचनेशी निगडित झाली आहे तशीच ती आर्थिक विषमतेशी निगडित आहे.

जमिनीचे राष्ट्रीयीकरण होईल, आणि खेड्याच्या पातळीपर्यंत औद्योगीकरण जाईल, तेव्हा ती मोठ्या वेगाने मरू लागेल–नव्या उद्योगधंद्याबरोबर, ज्ञानविज्ञानाच्या उदयाबरोबर ती ढासळू लागेल आणि हजारो वर्षांनंतर राष्ट्रीय उत्पादन-यंत्रणेत अस्पृश्य कामगार म्हणून सामील झाले. वरिष्ठ जाती जमातीतही गरीब कामगार म्हणून आले. औद्योगिक कामगार

सर्व देशभर हळूहळू वाढू लागला. स्वातंत्र्य, संघर्षात कामगारवर्गाला महत्त्व येऊ लागले. तो शासनसत्तेवर व भांडवलदारवर्गावर आघात करू लागला. संघटित कामगारांचा अजस्र आघात सत्ता कोसळून पाडतो. क्रांत्या करतो. नव्या समाजवादी सत्ता निर्माण करतो. भारतीय कामगारवर्गाने ब्रिटिश व नंतर कॉंग्रेस सत्तेवर, भांडवलदारवर्गावर हल्ले करून आपल्या अनेक मागण्या मान्य करून घेतल्या.

पण अनेक सामाजिक, धार्मिक रूढींविरुद्ध, धर्म, जातीच्या नावावर होणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय-अत्याचारांविरुद्ध कामगारवर्गाची बलाढ्य सत्ता उलथून टाकणारी अमोघ ताकद मात्र वापरली गेली नाही. राजकीय व आर्थिक सुधारणा करण्यासाठी केलेल्या संपात सामाजिक, धार्मिक सुधारणा करणाऱ्या मागण्या मांडल्या गेल्या नाहीत. डॉ. बाबासाहेब ज्याला 'कामगारातील दुही' म्हणत होते ती दुही म्हणजे जातिभेद मोडण्याच्या मागण्याही कधी संपात आल्या नाहीत. याला कारण जसे कामगार आहेत, तसेच त्यांचे पुढारीपण करणारे पक्ष आणि त्यांच्या ट्रेड युनियन्सही आहेत.

याच कामगारवर्गातील अस्पृश्य कामगाराला घेऊन डॉ. बाबासाहेबांनी मात्र अनेक सामाजिक, धार्मिक सुधारणांचे लढे लढविले. सत्याग्रह केले. तसेच त्यांनी त्याला 'खोती' विरुद्ध आलेल्या शेतमजूर शेतकऱ्यांच्या मोर्चात सामील करून घेतले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी तर न्हाव्यांना संपावर पाठवून विधवा स्त्रियांच्या केशवपनाला नकार दिला. अत्यंत दुष्ट रूढीविरुद्ध कारागिरांकडून त्यांनी आवाज उठविला.

म्हणजे पुढारीपण जर सामाजिक जाणीव असणारे असेल तर ते कामगारांकडून जसे राज्यकर्त्यांला, भांडवलदाराला नमविते तसेच धार्मिक, सामाजिक सुधारणा करून घेते. म्हणजे कामगारांची क्रांतिकारी ताकद संपूर्ण क्रांतीसाठी वापरते. पण तेव्हाचे कामगारवर्गाचे पुढारीपण फार राष्ट्राभिमानी, फार टिळकभक्त आणि तसेच आगरकर, फुले, आंबेडकरविरोधी होते. सामाजिक सुधारणेची चळवळ म्हणजे ब्रिटिशांना मदत असा त्यांचा समज होता, टिळकांपासून मार्क्सला मानणाऱ्यांचा हाच गैरसमज होता. आणि कामगारवर्गही जागृत नव्हता. तसेच वर्ग ह्या व्याख्येत बसण्याएवढा वर्गीय जाणिवेने शिक्षित झालेला नव्हता. त्याला त्याची जात होती, धर्म होता-कुळ, गोत्र होते आणि त्या कुळ, गोत्राचे इतिहास होते, पुराणपुरुष होते. त्यांच्या कथा होत्या. त्या कथा त्यांचे आदर्श होते. त्या कथांतील शत्रु-मित्र त्याचेही शत्रु-मित्र होते.

जागतिक कामगारांच्या चळवळीचे क्रांतिकारी इतिहास, नेते, वीर हुतात्मे त्यांचे आदर्श पुराणपुरुष झाले नव्हते. त्यांच्या त्यागाच्या, शौर्याच्या कथा त्यांच्या प्रेरणा होत नव्हत्या. त्यांचे इतिहास, त्यांचे इतिहास झाले नव्हते.

उलट भारतीय कामगाराचा इतिहास, आदर्श, प्रेरणा, जाणिवा त्याच्या जातीत, कुळात,

गोत्रात व धर्मात होता. एका अर्थाने तो संपात, संघर्षात कामगाराच्या चाळीत, गर्दीत. गिरणीत राहूनही अजूनही त्याच्या जाती कुळीत, गोत्रातच होत्या.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील नेते, वर्तमानपत्रे, लेखक, कवी, नाटककार, त्याला त्याचा भूतकाळ अतिरंजित करून सांगत होते. तो एका नव्या वर्गात–औद्योगिक कामगारवर्गात जुने जग उलथून टाकणाऱ्या क्रांतिकारीवर्गात आला असूनही हा व्यापक राष्ट्रीय प्रचार त्याला त्याच्या जातीत ढकलीत होता. वर्गातून आणि कामगारवर्गाच्या जागतिक क्रांतिकारी चळवळीच्या इतिहासातून बाहेर काढीत होता. अन् भूतकाल त्याच्या माथी मारत होता. ते जुनाट सरदार, राजे महाराजे, ऋषिमुनी, मार्क्स, लेनीन इत्यादींपेक्षा त्याच्या मनावर अधिक प्रभाव पाडीत होते. त्याची मानसिकता ही भूतकाळातील भूते घडवीत होती. अन् क्रांतिकारी नेत्याचे त्याच्या खऱ्या खुऱ्या आदर्शाचे स्मरण त्याला फक्त प्रसंगोपात्त होत होते.

भांडवलदारी वर्तमानपत्रे, सांप्रदायिक नेते तर सातत्याने क्रांतिकारी चळवळी, नेते, वीर हे परके, गोरे, देशाचे दुश्मन असाच प्रचार करीत होते.

कम्युनिझम, कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीय वाद, भारतीय कामगारवर्गाची जूट, समाजसत्तावाद, लोकशाही इत्यादीबद्दलचा प्रचार कामगारवर्गाला जातीच्या, धर्माच्या बाहेर पडू देत नव्हता.

आणि अनेक वेळा हा कामगार हिंदु–मुसलमान, स्पृश्य–अस्पृश्य होऊन एकमेकाच्या प्राणावर उठत होता. आजही जातीयवादी पक्षांचे कामगारवर्गावर असलेले वजन पाहून वाटते, की कामगार 'वर्ग' म्हणून अवतरलेला नाही. तो अजूनही त्याच्या जातीत आहे. धर्मात आहे. म्हणजे एकाच वेळी तो लोकशाहीत आहे आणि जातीतही आहे. त्याच्यापाशी क्रांतिकारक आघात करणारी ताकद आहे आणि तिला दुभंगून टाकणारा आत्माभिमान व धर्माभिमानही आहे.

पण जेव्हा त्याला सामाजिक जाणीव होते, वर्णव्यवस्था आणि तिच्या पिळवणुकीचा पुरस्कार करणारी वैचारिकता कळते, तेव्हा तो जसा कामगार म्हणून भांडवलशाहीवर व शोषणाचा पुरस्कार करणाऱ्या सत्तेवर आघात करतो तसाच तो सामाजिक, धार्मिक–चळवळी करून भारतीय क्रांतिकारी आंदोलन कसे असावे हेही स्पष्ट करतो. वर्णव्यवस्थेमुळे कामगार–आंदोलन जेवढे राजकीय, आर्थिक क्रांतीशी बांधलेले आहे, तेवढेच ते सामाजिक सांस्कृतिक क्रांतीशीही बांधलेले आहे.

म्हणून जात ही संस्था ज्या पायावर उभी आहे त्या पायावर हल्ला केला पाहिजे. दलित कामगार डॉ. आंबेडकरांचे ऐकून एका दिवसात अनात्मवादी, अनीश्वरवादी, बुद्धिप्रामाण्यवादी झाला. इतर कामगारांप्रमाणेच तोही जातीत जगत होता. पण वर्णव्यवस्थेचे

आणि अस्पृश्यतेचे ज्ञान होताच तो तिचा विरोधक झाला. हे ज्ञान इतर कामगारांना मिळाले तर ते जातिविरोधात जातील याबद्दल तिळमात्र शंका नाही.

यावरून असे म्हणता येईल की दलित श्रमिक जनतेला–सामान्य माणसाला आपल्या विचारांचे केंद्रवर्तित्व देऊन, क्रांतिकारक सामाजिक बांधिलकी स्वीकारून जे लेखक लेखन करू बघतात, शोषणरहित समाज निर्माण करण्याचा ध्येयवाद ज्यांनी स्वीकारला आहे, त्या लेखकांनी जसे मार्क्सवादी तत्त्वज्ञान आत्मसात केले पाहिजे तसेच भारतीय समाजाचे, वर्णव्यवस्थेचे, तिच्या वैचारिकतेचे ज्ञान देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधनही आत्मसात केले पाहिजे. तसेच दलित जनतेतून वर येणाऱ्या लेखकांनी लोकशाही समाजवादाचा–त्याच्या अर्थ, समाज–संस्कृती निर्माण करणाऱ्या शास्त्राचा–मार्क्सवादाचा अभ्यास केला पाहिजे. आजचे क्रांतिकारी युग अभ्यासिले पाहिजे.

असे झाले म्हणजे उद्योगधंदे वाढूनही, लोकशाही स्वातंत्र्य येऊनही, वर्णव्यवस्था नष्ट होत का नाही हे कळते. तसेच समाजवादी विचारांचा प्रचंड प्रसार होऊनही समाजवाद तर सोडाच, पण लोकशाही समाजाच्या मनात का उतरत नाही हेही कळते. आणि भारतीय माणसाचे सम्यक दर्शन होते.

भारतीय माणूस, त्याचे मन, त्याचा समाज कलाकृतीत समर्थपणे मांडता यावा आणि शोषणरहित समाज व्हावा असे ज्यांना वाटते त्यांनी आपल्या लेखनाला दलित साहित्य हे नाव घेतले. त्याची विचारसूत्रे :

१. माणूस हा देव, धर्म, देशापेक्षा मोठा,

२. त्याचे हे माहात्म्य स्थापायचे असेल तर त्याला तुच्छ–तिरस्कृत, अस्पृश्य मानणाऱ्या, व त्यांची धर्म, वंशात वाटणी करणाऱ्या संस्था या नाकारल्या पाहिजे,

३. पण केवळ ह्या संस्था नाकारून भागत नाही–कारण त्यासाठी भूमी असावी लागते. ह्या भूमीसाठी ज्ञान, विज्ञान, बुद्धिवाद, उद्योगधंद्याचा विकास, व्हावा लागतो. त्यासाठी ज्ञान, विज्ञान आणि यंत्राचा पुरस्कार केला पाहिजे,

४. पण उद्योगधंदे वाढले आणि शेतीचे यांत्रिकीकरण झाले तर भांडवलशाही वाढते. भांडवलशाही उन्मत्त झाली तर आक्रमक बनते. युद्धे लादते–तेव्हा उद्योगधंद्याची–ज्ञानविज्ञानाची वाढ झाली तरी ती देशासाठी–जनतेसाठी वापरली पाहिजे–म्हणून समाजवाद पाहिजे,

५. आणि तुच्छतेचा, अहंकाराचा, वैरांचा अंत करणारा व जगातील सर्व मानवांबद्दल बंधुभाव व्यक्त करणारा विश्वकुटुंबवाद पाहिजे.

दलित साहित्याची धारा ही सूत्रे घेऊन चालली आहे. प्रत्येक दलित लेखक, कवी आपआपल्या कुवतीप्रमाणे व्यक्त होतो आहे. पण दलित कवितेत मोठ्या प्रमाणात व्यक्त होणारी दलित साहित्याची दोन सूत्रे आहेत आणि ती म्हणजे विद्रोह आणि नकार. प्रल्हाद चेंदवणकरांच्या कवितेतही ही दोन तत्त्वे आक्रोश होऊन, संताप होऊन अथवा ओरड होऊन प्रकट होतात.

आणि सर्वच दलित कवितेत हा विद्रोह, नकार प्रकट होण्याचे कारण आहे–अस्पृश्यतेची तीव्र जाणीव–

अस्पृश्यता दिली कोणी ? टिकविली कोणी ? का टिकली ? लोकशाही येऊनही ती का गेली नाही ? उद्योगधंदे सारखे वाढत असूनही ती धरणीसात का झाली नाही ? अस्पृश्यता गुन्हा मानणारे कायदे येऊनही अस्पृश्यता टिकून आहे याला जबाबदार कोण आहे ?

प्रचार असा आहे की, याला जबाबदार केवळ ब्राह्मण आहे.

ब्राह्मण आहे तर क्षत्रियांनी या अस्पृश्यतेविरुद्ध किती उठाव केले आहेत ? क्षत्रियांच्या हातांत तर दंडसत्ता होती. शासनाला जे हवे असते तेच शासन टिकू देते. म्हणजे अस्पृश्यतेला जबाबदार केवळ ब्राह्मणच नाही तर क्षत्रियही आहे.

ब्राह्मणाप्रमाणेच क्षत्रियांनीदेखील ग्रंथरचना केलेली आहे. सुविख्यात मनू हा क्षत्रियच होता. म्हणजे क्षत्रिय–ब्राह्मणांना ही विषमतेवर आधारलेली व्यवस्था हवी होती. पण वैश्यांनी, शेतकरी, व्यापाऱ्यांनी याविरुद्ध उठाव केले आहेत काय ?

तर या दोन्ही वर्णांनी उठाव केलेले नाहीत. व्यापाराला अडथळा येत असेल तर सत्तेविरुद्ध आणि धर्माविरुद्धही व्यापारी गेल्याचे दाखले आहेत. पण भारतात तसे काही झाल्याचे आढळत नाही. याचा अर्थ सर्वांना अस्पृश्यता हवी होती.

या विचारांतून दलित साहित्याची भूमिका आकार घेते. ती म्हणजे एक वर्ण, एक जात मात्र अस्पृश्यतेला जबाबदार धरता येणार नाही. तर संपूर्ण व्यवस्थाच त्याला जबाबदार आहे आणि ह्या विचाराने हिंदू माणसाच्या मनात असणाऱ्या तिरस्कार, तुच्छता, अहंकार, वैर, अकारण शत्रुत्व व अविश्वास या युद्धाला जन्म देणाऱ्या भावनांतून दलित साहित्य मुक्त झालेले आहे.

देशाच्या आणि महाराष्ट्राच्या पहिल्या प्रबोधन काळात नाटक, कादंबऱ्यांतून जे खलनायक आले ते बहुसंख्येने मुसलमान होते. कारण शिवाजीशी त्यांचे सत्तासंघर्ष झाले होते.

गांधी विचारधारेविरुद्ध असलेले लेखक पाकिस्तानची मागणी उठली तेव्हा, हिंदु मुसलमान दंगे झाले तेव्हा व देशाची फाळणी झाली तेव्हा, गांधीजींचे हिंदु मुसलमान

ऐक्याचे सूत्र संतापाने ठोकरून मुसलमानांना खलनायक म्हणून चितारू लागले.

पण दलित साहित्य वाचले तर असे आढळेल की जातीचा, वर्णाचा तिरस्कार त्यात आढळत नाही. उलट ते राग, तिरस्कार शत्रुत्वाने धगधगते आहे असे दिसले असते तरी स्वाभाविक आहे असेच वाटले असते. काळ्या अमेरिकन वाङ्मयात गोऱ्यांबद्दलचे शत्रुत्व, तिरस्कार आढळतो.

पण दलित साहित्यात तसा आढळत नाही त्याचे कारण हे आहे की एक जातीचा, एक वर्णाचा द्वेष करून प्रश्न सुटणार नाही; तर व्यवस्था बदलण्यातून प्रश्न सुटणार आहे, हे दलित साहित्याचे आकलन आहे.

दलित साहित्याचा नकार आणि विद्रोह आहे तो विचार, तत्त्वे, संकल्पना आणि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या त्या पुराणकथा ज्या हिंदुधर्मात आहेत त्याला.

ज्याच्या संस्कारामुळे एका आर्थिक स्थितीत वावरणारे, एका यंत्रावर काम करणारे व एका चाळीत राहणारे कामगार अलग होतात.

पण मराठी भाषेवर देवधर्माचा आणि त्याद्वारे आलेल्या विचारांचाच प्रभाव फार आहे. भाषेचा विकास सर्वांगीण झालेला नाही. देवधर्माच्या बाबीशिवाय इतर ज्ञान, शास्त्रे, उत्पादनसाधने विकसित होऊ न दिल्यामुळे आणि इतर जातींना शिकण्याची आणि बोलण्याची मनाई असल्यामुळे मराठी भाषा फार एकसुरी झाली आहे. आपले म्हणणे सांगण्यासाठी पारंपरिक प्रतिमांचा, संकल्पनांचा वापर करावा लागतो—पण दलित लेखक, कवी त्या वापराला तयार नसतो.

माझ्या एका मित्राने ' लोकशाही ' वरील आपली कविता आपल्या निरक्षर आईला वाचून दाखविली आणि तिचा अर्थ विचारला तर तिला सांगता आला नाही-पण शाहीर अमरशेख यांचा अभंग ' काळ्या आईचा सखा पुत्र तू , तूच खरा घनश्याम ! ' हा अभंग तिला कळला-कामगार शेतकरी यांनीच जग निर्माण केले आहे; राम, कृष्ण, विष्णू, महेश, ब्रह्मा यांनी केलेले नाही हे तिला पटले—

' महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती ' या तुकारामाच्या अभंगातील मुख्य भावना ' नम्रता ' आहे हेही ती ओळखू शकली.

तिची भाषा आहे देवधर्माबद्दल अधिक शब्द देणारी—व माणसाबद्दल कमी बोलणारी. आमचे विचार आहेत लोकशाही, समाजवाद, ज्ञान—विज्ञानातून आलेले—राम, कृष्ण, महेशाने जे दिले नाही ते देणारे. माणसाला मोठे करणारे. पण लोकशाही समाजवाद आणि आजच्या ज्ञानविज्ञानाचे अनंत आविष्कार हे लोकांची भाषा, संस्कृती शहाणपण झालेले नाही. जनतेच्या सांघिक प्रतिभेने त्यांना प्रतिमांत, म्हणींत, सुभाषितांत, संकल्पनांत

परावर्तित केले नाही. कारण ते लोकांत रुजले नाहीत.

पण म्हणून लोकांना समजण्यासाठी क्रांती, समाजवाद, लोकशाहीसारख्या थोर कल्पना, जुन्या संकल्पना, प्रतिमा अथवा पुराणकथा–पुराण पुरुष बरोबरीला घेऊन मांडाव्यात हे बरोबर वाटत नाही.

उदा. ' राम ' ही गोष्ट भारतीयांचे मन व्यापून बसली आहे. हिंदु माणसाच्या मनात अनेक संदर्भात तिला जागा आहे. राम आदर्श झाला आहे. राम सीतेसाठी रावणाशी लढतो, राम शूर्पणखेची विटंबना बघतो. राम सीतेचा त्याग करतो – शंबुकाचा शिरच्छेद करतो.

लोक शत्रुगोटातील स्त्रीची विटंबना करतात. संशय आलेल्या पत्नीचा त्याग करतात–खून करतात. आणि पुढे येणाऱ्या ज्ञानी, गुणी, शूर शूद्रांचा तिरस्कार करतात. खेड्यांत, शहरांत, ऑफिसमध्ये व सर्वत्र हा अनुभव येतो.

रामाने, कृष्णाने, अनेक पुराणपुरुषांनी, पुराणकथांनी लोकांचे मन, वर्तन, स्वभाव, विकार, वासना, भावना आदी विचार घडविले आहेत. अन् हे काम भारतात जन्म घेतला की चालू होते.

रामाला व रामायणाला जाहीरनामा करून, कार्यक्रम कल्पून राजकीय संघटना निघतात. त्या निवडणुका लढवितात.

राम, कृष्ण राजा आहे. तो राज्यविस्तारासाठी लढला. पण त्याचे शत्रू लोकांचे शत्रू झाले. लोक त्यांना राक्षस मानतात, आणि रामाला देव मानतात. त्याच्या विजयाचे आणि त्याच्या शत्रूंच्या पराभवाचे सण साजरे करतात.

क्रांतिकारी लेखक, कवि वर्गशत्रूंना–त्यांच्या विरोधकांना रावण म्हणतात.

क्रांतिकारी पुढारी सावकार, भांडवलदार, जमीनदार यांना रावण म्हणतात–म्हणजे क्रांती राम होते. समाजवाद राम होतो व क्रांतिकारी कार्यकर्ताही राम होतो. ब्राह्मण एखाद्या क्षत्रियावर चिडला तर तो त्याला, अन् एखादा शूद्र ब्राह्मणावर चिडला तर ब्राह्मणाला रावण म्हणतो ! अन् राम कसा आहे ?

त्याला प्रत्येक जातीने तिच्या पायरीप्रमाणे वागावे असे वाटते–शंबूक कोणी होऊ नये असे त्याला वाटते–तसा कोणी झाला तर तो त्याचा शिरच्छेद करतो–स्त्रियांसंबंधीही त्याचे हेच मत आहे. म्हणून तो एकीला बाहेर काढतो, एकीची विटंबना बघतो.

असा राम लोकांचे सर्व काही व्यापून बसलेला आहे. राम उपमा होतो. प्रतिमा होतो, भांडवल होतो, धंदा होतो–जाहीरनामा आणि कार्यक्रम होतो. रामराज्याचा, त्या

संघटनांचा पुढारी होतो. पण शोषणावर, विषमतेवर आधारलेल्या वर्णव्यवस्थेचा पुरस्कर्ता होतो. शूद्र जातीत जन्म घेतला म्हणून दुःख, दैन्य, दास्य देणाऱ्या आणि व्यक्तीच्या विकासाच्या वाटा रोखणाऱ्या व्यवस्थेचा तो राखणदार आहे.

म्हणून त्याच्या मंदिरात प्रवेश करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांना सत्याग्रह करावा लागला. त्याच्या चरित्रात खिस्ताप्रमाणे तो सर्वांवर प्रेम करीत असल्याचा, सर्व दुःखितांचा, दलितांचा आणि पतितांचा तो उद्धारकर्ता असल्याचा पुरावा नसल्यामुळे सत्याग्रह करावा लागला. आणि कोणालाच त्याच्या चरित्राचा आधार घेऊन त्या सत्याग्रहाचे समर्थनही करता येणार नाही. म्हणून तर शंबुकाच्या शिरच्छेदाची गोष्ट त्याच्या नावाशी जोडलेली आहे. वर्णव्यवस्था व तिची विचार–व्यवस्था तो पाळतो हेच ती गोष्ट सांगते.

म्हणून राम आणि वर्गवादी विषमतावादी समाजरचनेने विकसित केलेल्या पुराणकथा, पुराणपुरुष, आदर्श नाकारले पाहिजेत. आणि नवे आदर्श, नवे नायक, नवे महापुरुष स्वीकारले पाहिजेत.

जागतिक क्रांतिकारी चळवळीत आणि दंडसत्तेविरुद्ध लढणारे, आपले विचार, आपले संशोधन प्रस्थापित करण्यासाठी मृत्यू, शिक्षा सहन करणारे, माणसाच्या सेवेसाठी झिजणारे महापुरुष, जगाच्या इतिहासात पुष्कळ आहेत. त्यांना आपले पूर्वज, आपले आदर्श, आपले पुराणपुरुष म्हणून स्वीकारण्याला काय अडचण आहे ?

काहींचे म्हणणे असे आहे की ते आपल्या देशाचे, आपल्या संस्कृतीतील नाहीत. नसोत. जो माणसाच्या बाजूचा असतो तो सर्व देशातील माणसांचा असतो. त्याचा विचार, त्याचा संघर्ष सर्व जगातील माणसांचाच असतो. तो आपल्या देशाचाच कशाला पाहिजे.

माणूस सर्व जगभर सारखा आहे. सर्व जगभर धर्म आणि दंडसत्ता आहे. सर्व जगभर प्रस्थापित वर्ग आहे. धर्माने आणि शासनसत्तेने जादा हक्क दिलेले वर्ग आहेत. आणि धर्माने व शासनसत्तेने हक्क नाकारलेले लोक आहेत. सर्वत्र विषमता आहे. आणि तिला हजारो वर्षांची परंपरा आहे.

सर्व जगातील माणसे आकाश, सूर्य, पाऊस, निसर्ग यांचा आदिम कालापासून सारखा विचार करीत आलेले आहेत. म्हणून सर्व जगातील अद्‌भुत वाङ्मय जवळ जवळ सारखेच आहे. कारण मानवी शरीर सर्वत्र सारखे आहे. आणि त्या शरीराला येणारे निसर्गाचे बरे वाईट अनुभवही शरीर सारखेच असल्यामुळे सारखेच आहेत. सर्व जगाने राक्षस, दैन्य, सैतान आणि देव, संत आणि पिळवणुकीच्या जगात न दिसणारे इनोसंट 'निष्पाप जग' कला साहित्यात निर्माण केलेले आहे. आणि मानवी शरीर सर्वत्र सारखेच असल्यामुळे सर्वत्र विकार, वासना, भावना आणि त्याच्या लक्षावधी छटाही

सर्वत्र सारख्याच आहेत. मग परदेशातील, परसाहित्यातील क्रांतिकारक मानवतावादी आदर्श का स्वीकारता येणार नाहीत ? नायक रामासारखा असावा की व्होल्टेअरसारखा असावा, हे का ठरविता येणार नाही ? स्त्री जातीची निंदा, निर्भत्सना करणारे पौराणिक आदर्श झिडकारून नव्या क्रांतिकारी आदर्शाने स्त्रीला जीवनाची स्वामिनी म्हणून कवितेत का चितारता येणार नाही ?

नवे उद्योगधंदे स्वीकारलेले आहेतच, त्याचबरोबर वर्णव्यवस्थेच्या व तिच्या वैचारिकतेच्या कट्टर विरोधी असलेले लोकशाही समाजवादाचे तत्त्वज्ञानही स्वीकारले जात आहे. ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान जर क्रांतिकारी आहे आणि त्याचबरोबर वर्णव्यवस्थेच्या विरोधी असलेले समाज, संस्कृती व माणूस यांच्या संदर्भात जर समाजवाद स्वीकारलेला आहे तर, साहित्य काय असावे, संतांचा आदर्श स्वीकारणारे ? दैववाद कर्मकांड सांगणारे ? दुःख देणारा दिसत असताना आणि सुख, शांती, सभ्यता आणण्याचे मार्ग स्पष्ट झाले असताना विठ्ठलाकडे टाहो फोडणारे ?

आजची क्रांतिकारी जागतिक कविता मानवतेच्या विजयाचे झेंडे घेऊन निघालेली आहे. त्या मोर्चामध्ये दलित कविताही आपले मानवी मुक्ततेचे आणि अस्पृश्यता नष्ट करण्याचे घोषफलक आणि पताका घेऊन सामील झाल्याशिवाय राहणार नाही. नव्हे ती सामील झालीच आहे.

मानवाच्या मुक्तीसाठी जगाच्या पाठीवर लढलेले महापुरुष, त्यांची चरित्रे हे आमचे आदर्श म्हणून आम्ही स्वीकारलेले आहेत. वर्तमान घडविणारे आम्ही लोक ह्या आमच्या युगाच्या हातात हात घालून एक-एक विजय मिळवीत व विश्वबंधुत्वाचे बंध, ऑफ्रिकेत, अमेरिकेत, ऑस्ट्रेलियात...जिथे जिथे माणसाच्या मुक्ततेची लढाई चाललेली आहे; तिथे तिथे आम्ही निघालो आहोत. आमचा राष्ट्रवाद हा असा अवघे विश्व आपल्यात सामावून घेणारा आहे. आमचे साहित्य असे अवघ्या मानवजातीला कवटाळणारे आहे. असे असल्याने आम्ही, जे आमचे नव्हतेच, जे आमच्यासाठी लिहिले गेले नव्हतेच, ते साहित्य व त्या साहित्यातील नायक आमचे आहेत, हे कसे काय म्हणावे ?


" मी चाललो आहे
एका निश्चित दिशेने
जिथे तारांची कुंपने तोडून
निर्धास्त बनली आहेत शेते
अंगणाभोवतीचे दिंडी-दरवाजे मोडून
ताठ मानेने उभी आहेत घरे
जाती जमाती, पंथ महंतांची
थडगी बांधून

दिमाखाने डोलताहेत हिरवीगार राने
नद्या, डोंगर, समुद्र, दगड, माती, विटा
यांच्या देवत्वाला मूठमाती देऊन
त्यांना शिकविले जातेय विज्ञानाचे गाणे
मी चाललो आहे आता
एका निश्चित दिशेने ... "

वरील कवितेत म्हटल्याप्रमाणे आमच्या वाटा आणि दिशा निश्चित झालेल्या आहेत. ह्या वाटा आणि दिशा माणसाला युगायुगाच्या बंधनातून मुक्ती देणाऱ्या आहेत. म्हणून दलित कविता एखाद्या संपासारखी, एखाद्या संघर्षासारखी शक्तिशाली होवो आणि माणसाला त्याचे हरवलेले माहात्म्य देवो, अशी मी आशा व्यक्त करतो आणि ही बरीच लांबलेली प्रस्तावनाही इथेच पुरी करतो.

•

उत्थानगुंफा :
जडवादी क्रांतीचे
रुद्रसुंदर काव्यलेणे



यशवंत मनोहर यांची कविता म्हणजे अग्निप्रलय. ती रुद्रसुंदर, क्रूर-कोमल व क्रांतीसारखी भव्योदात्त आहे. ती अंगावर अग्नीचे अलंकार ल्याली आहे. तिच्या हातांत वादळे अन् वणवे आहेत.

एके रात्री मात्र निश्चय करून मी या कवितेवर लिहायला बसलो. अगदी सूर्योदय झाला तरी हरकत नाही पण लेख पुरा करायचाच. लिहू लागलो. बारा एक वाजेपर्यंत लिहिले. पाणी प्यायला गेलो. पाणी पिऊन आल्यावर सिगारेट पेटवून लिहिलेला मजकूर वाचू लागलो आणि वाचता वाचताच मन नाराज झाले. क्रांती-सारख्या भव्योदात्त कवितेला लिहि-लेला हा मजकूर न्याय देणारा नाही, असे वाटू लागले. तसे मी कागद बाजूला केले. दुसरे कागद घेऊन लिहू लागलो. पण मन इतके बेचैन झाले, इतके काही कल्पनांनी, विचा-रांनी, डोके भरून आले की लिहिणे थांबवावे लागले. अतिशय अशांत होऊन मी कागद दूर केले. दिवा विझविला. अंधार झाला. सिगारेट पेटवून मी खिडकीतून बाहेर पाहू

लागलो. बाहेर उजेड होता. त्या उजेडात एक कुत्रे हाडूक चघळत बसले होते. समाधानी वाटत होते.

मी असा बाहेरचा उजेड, कुत्र्याचे समाधान बघत असताना मनात काही तरी चमकले. मला वाटले, मी अंधारात, दुःखात. बाहेर कुत्रे उजेडात. समाधानात. ह्या जाणिवेचा परिणाम होऊ लागला. अस्वस्थता, अशांतता एका वेगळ्याच रसायनात परावर्तित होऊ लागली आणि आत एक अग्नि–प्रवचन आकारू लागले.

मी अंधारात अन् बाहेर उजेड. कुत्रे समाधानात. मी ? मी तर महान. माणूस. माझ्या श्रमाने अन् प्रतिभेने हे जग उभे''सुंदर ! आणि जिवंत ! मीच त्या विश्वाचे नामकरण केले. मी सूर्याला सूर्य म्हटले अन् तसे झाले. माझ्या समक्ष तर स्वामित्वाचा, स्वर्गाचा, देवाचा, दुःखाचा, दैवाचा, दुर्दैवाचा अन् नियतीचा जन्म झाला. धर्म आणि विषमता हे जुळे माझ्यापुढे नागडे फिरत होते. मी अंधारात ··· मी माणूस, देवापेक्षा, धर्मापेक्षा, देशापेक्षा मोठा.

एवढा मोठा की मला स्वर्गवाले, विषमतेत जन्मलेले देवऋषी घाबरत होते. मला मारण्यासाठी, दुःख-दैन्यात कोंडण्यासाठी कटकारस्थाने रचीत होते. बांधीत होते.

आणि माझे दुःख पाहून, दैन्य पाहून, दास्य पाहून सिद्धार्थ गौतम बुद्धाला दुःख दूर करण्याचे तत्त्वज्ञान सुचले. मी काळोखात ? कैदेत ? मी तर माणूस आणि त्या उद्गारा-बरोबरच मला डॉ. बाबासाहेबांचे आयुष्य आठवू लागले.

उच्च विद्याविभूषित डॉ. बाबासाहेब पण त्यांचा शिपाई त्यांची जात लक्षात घेऊन फायली दूर फेकून देतो आणि बाबासाहेबांच्या अंगावरून येणाऱ्या वाऱ्याने बाटणारा धर्म असा वाचवतो.

उच्च विद्याविभूषित व तज्ज्ञ बाबासाहेब नोकरी मिळत नाही म्हणून शेअर बाजारात व्यापाऱ्यांना सल्ला मसलत देणारी फर्म उघडतात आणि त्यांची जात कळताच व्यापारी त्यांच्यावर बहिष्कार टाकतात आणि नंतर महार बॅरिस्टर म्हणून त्यांना धंदा मिळणे मुष्कील होते.

महाडच्या मुक्तिसंग्रामाचे उद्गाते बाबासाहेब पण तहान लागली असताना हॉटेलवाले त्यांना प्यायला पाणी द्यायचे नाकारतात आणि हा युगंधर ढसाढसा रडतो.

असे किती प्रसंग, किती घटना, किती यातना, केवढे मोठमोठे अपमान. केवढे मोठे दुःख. गुन्हा एकच. या देशात, हिंदु धर्मात महार म्हणून जन्म घेताच ही शिक्षा करणारे कोण ? सर्वच. कारण ! वर्णव्यवस्थेची शिकवणूक, देवाचे, ग्रंथाचे, कथा देवकथांचे सांगणे एकच.

अतिशूद्राने भूकबळी बनले पाहिजे. लाचार, भिकार, बेघर राहिले पाहिजे. अज्ञानी, आंधळे, बहिरे, मुके राहिले पाहिजे. माणूस नावाचे प्राणी म्हणून मरण जगले पाहिजे. जिवंत राहून प्रेतवत जगले पाहिजे. एवढेही माणूसपण व्यक्त होऊ न दिले पाहिजे. हा हिंदुधर्माच्या वर्णव्यवस्थेचा कायदा. ही संस्कृती. ही धर्मनीती. ही वैचारिकता. मानसिकता आणि सामाजिकताही.

अवमानाचा, तुच्छता, तिरस्काराचा, दुःखाचा, यातनांचा वाऱ्याएवढा व्यापक पसारा. हिंदुसमाज ह्याच प्राणवायूवर जगतो. ह्या सर्वव्यापी विषवायूपासून थोडेसेही तोंड लपवायला एकही छत नाही. एकही पंथ नाही, संत नाही, करुणा नाही, काही काही नाही. फक्त बहिष्कार ! फक्त तिरस्कार !

ह्या तुच्छतेची, तिरस्काराची, अवमानाची, दुःख यातनांची प्रतिक्रिया अंतःकरणात एका भयंकर वादळाला, एका महायुद्धाला, एका बुद्धाला, एका भयानक अभियानाला जन्म देत होती आणि डॉ. बाबासाहेबांनी इतिहास घडविला. युग घडले आणि बाबासाहेब आदर्श झाले. पुराणपुरुष झाले, प्रेरणा प्रकाश देणारे सूर्य झाले.

सिद्धार्थ गौतम बुद्धाला दुःख, दैन्य, दास्य दिसले अन् एक महान तत्त्वज्ञान, एक जीवनमार्ग जगाला मिळाला.

मार्क्सला शोषण दिसले आणि एक समाजवादी शास्त्र उदयाला आले आणि जन्मापासून विजय मिळवीत त्याने अर्ध्या जगावर शासन सुरू केले अन् ज्याच्या कानावर पडले त्याचे मनच व्यापून बसले.

हे सारे लक्षात येताच यशवंत मनोहर यांची कविता रुद्रसुंदर का आहे, क्रूर-कोमल का आहे, क्रांतीसारखी भव्योदात्त का आहे, ती अंगावर अग्नीचे अलंकार का त्याली आहे आणि तिच्या हातात वादळे अन् वणवे का आहेत हे मला कळले.

ज्या वेदनेतून आंबेडकरी आंदोलन जन्मले अगदी त्याच जाणिवेतून यशवंत मनोहर यांची कविता जन्म घेते.

जे दुःख, दैन्य, दास्य सिद्धार्थ गौतम बुद्धाला दिसले तेच दैन्य, दुःख, दास्य यशवंत मनोहरांच्या कवितेने ' सम्यक दृष्टीने ' पाहिले आहे.

कार्ल मार्क्सला जे शोषण दिसले, त्याची कारणपरंपरा जाणवली, अगदी तेच ज्ञान यशवंत मनोहर यांच्या कवितेला झाले आहे. म्हणून त्यांची कविता क्रांतीसारखी भव्योदात्त झाली आहे.

यशवंत मनोहर यांच्या कवितेने आणखी एक पाहिले आहे.

चंद्रावर माणूस गेला आहे आणि व्हियतनामवर भयंकर बॉंबवर्षाव झाला आहे, कोट्यावधी डॉलरचा चुराडा करीत, शेकडो सैनिकांचा बळी देत, बळी घेत अमेरिका लढली आहे पण चिमुकले व्हिएतनाम एका कवीच्या पुढारीपणाखाली विजयी झाले आहे.

चंद्रावर माणूस गेला आहे. ज्ञान, विज्ञान निसर्गावर मात करीत आहे. मानवी श्रमाने अन् बुद्धीने अलौकिक विजय मिळविले आहेत. मिळवीत आहे. समाजवादी राष्ट्रांची प्रगती वायुवेगाने चालली आहे. चिमुकल्या व्हिएतनामने बलाढ्य महासत्तेवर विजय मिळविला आहे. भयानक शस्त्रास्त्रांचा साठा असूनही जीवन, शांतता, स्वातंत्र्याकांक्षा वसाहतवादी राष्ट्रांवर विजय मिळवीत आहे. आफ्रो–आशियायी राष्ट्रे विजयी होत आहेत आणि स्वदेशात.....

स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे झाली आहेत. लोकशाहीदेखील आली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीमुळे देशाच्या संपत्तीत प्रचंड वाढ झाली आहे. भांडवलशाहीची आणि राष्ट्रीय मूलभूत उद्योगधंद्यांची वाढ झाली आहे. खेड्यात विजेने आणि शिक्षणाने उजेड पाडायला सुरुवात केली आहे. देश प्रगतिपथावर आहे.

बाबासाहेबांनी धम्मचक्रप्रवर्तन केलेले आहे. तेराव्या शतकापासून निर्वासित झालेला बुद्धधर्म, त्यामुळे लाखो अनुयायांचा धम्म झाला आहे. अजिंठा, वेरुळ, साची, सारनाथच्या अनाथ झालेल्या क्षेत्रांना वारसा मिळाला आहे आणि ज्याला डॉ. आंबेडकरांशिवाय दुसरे काही नव्हते त्यांना ज्ञानाची, कलेची, उज्ज्वल इतिहासाची महान संपत्ती मिळाली आहे. ज्यांच्याजवळ तुच्छता, तिरस्काराशिवाय काही येत नव्हते, सगे सोयरे नव्हते, त्यांना श्रीलंका, ब्रह्मदेश, चीन, जपान, रशिया आणि जगाच्या पाठीवर असलेले असंख्य भाऊबंद मिळाले आहेत.

पण औद्योगिक प्रगतीमुळे गरिबी संपलेली नाही. बेकारी वाढतेच आहे. श्रीमंतीही वाढते आहे. शिक्षण वाढते आहे–पण पदवीधर बेकारांची संख्याही वाढते आहे. समाजवादाचा विचार वाढतो आहे आणि भांडवलशाहीची वायुवेगाने भरभराट होते आहे. लोकशाही दोन अडीच तपे अस्तित्वात आहे. तरी देश आणि माणूस एकाच वेळी दोन जगांत, दोन युगांत, दोन शासनात वावरतो आहे. माणसाच्या मनावर एकाच वेळी दोन–दोन राज्यसत्ता हुकमत गाजवीत आहेत.

एक सत्ता आहे भांडवली लोकशाहीची आणि दुसरी आहे वर्णवादी मनूची. लोकशाही दृश्यस्वरूपात वावरते आहे. मनूची सत्ता अदृश्यपणे जनमनावर राज्य करते आहे. भांडवली लोकशाहीजवळ पार्लमेंट आहे. कौन्सिले आहेत. निवडणुका आहेत. सैन्यदल आहे. शिपायी, गुप्तचर आहेत. जगड्व्याळ शासनयंत्रणा आहे.

तरीही वर्णव्यवस्था आणि मनूचे अदृश्य राज्य लोकशाहीवर मात करते आहे. पावलो–

पावली संघर्ष करते आहे आणि लोकशाहीचा पराभवही करते आहे. याची कारणे काय आहेत ?

पहिली कारणमालिका ही आहे की वर्णव्यवस्थेच्या पाठीशी अज्ञान आहे. आंधळे मन आहे. संस्कार आहेत. पक्षपाती संस्कृती आहे. देव आहेत. धार्मिक पुस्तके आहेत. ते लिहिणारे ऋषिमुनी आहेत. विषमतेवर आधारलेली ग्रामव्यवस्था व ग्रामअर्थरचना आहे. मनूने ज्यांचा निषेध केला आहे त्या अस्पृश्य वर्गांना निर्धन ठेवलेले आहे. देशाची अर्थव्यवस्थाही धर्मावलंबी आहे. स्वर्गातील देवापासून मातीवरच्या संतमहंत आणि मूर्खांपर्यंत विषमतेचाच पुरस्कार करणारे आहेत. त्यामुळे कथा, दंतकथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार वरील पक्षपातातून तयार झालेल्या असल्यामुळे त्या जडवादी, समतावादी विचाराच्या विरोधात निंदा, निर्भत्सना व्यक्त करणाऱ्या आहेत. विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या आहेत.

मनूच्या बाजूची सामग्री एवढी मोठी, अभंग, अमर अशी आहे आणि लोकशाही भांडवली असल्यामुळे ती मानसिकता, वैचारिकता आधुनिक संस्कृतीत परावर्तित व्हायला बुद्ध्याच तयार नाही.

लोकशाही चालविणारी सारी मंडळी ही मनूने ज्यांना विशेष अधिकार दिलेले आहेत त्या वर्णातील आहे. वर्णव्यवस्थेने ज्यांना श्रेष्ठत्व दिलेले आहे तेच लोक सत्ता, प्रचार, प्रसाराची साधने आणि अर्थयंत्र आपल्या ताब्यात घेऊन बसलेले आहेत. त्यांना लोकशाहीचा परिपूर्ण विकास नको आहे. तळागाळातील माणूस जागृत व्हायला नको आहे. सत्तेवर, अर्थसत्तेवर गंडांतर यायला नको आहे. म्हणून वर्णव्यवस्था, उद्ध्वस्त करणे त्यांच्या अहिताचे आहे. संकट आहे.

लोकशाहीचा विकास करू बघणाऱ्या आणि भांडवली लोकशाहीचा विकास दलिताच्या हाती सत्ता जाईल इथपर्यंत करू बघणाऱ्या डाव्या शक्ती अत्यंत दुर्बळ आहेत. त्यांची ताकद अतिशय मंदगतीने वाढते आहे.

लोकशाही अशी कागदावर अन् वर्णव्यवस्था मन, समाज, संस्कृती, साहित्य, भाषा, अर्थरचना, या सर्वांद्वारे अस्तित्वात असल्यामुळे सैन्य, शिपायी, लोकसभा, प्रचार, प्रसाराची साधने हाताशी असूनही लोकशाहीवर ती मात करते आहे.

वर्णव्यवस्था व लोकशाही ह्या स्वभावतःच परस्परविरोधी, वैरी संस्था आहेत. त्या एकमेकीच्या प्राण घेऊनच वाढू, जगू शकतात. त्यांच्यातील एकीचे मरण हे दुसरीचे सामर्थ्य आहे, जीवन आहे. त्या स्थितीत वैर वाढणे, अन् लोकशाहीने वर्णव्यवस्थेला घायाळ करणे, गतप्राण करणे, म्हणजे वर्णव्यवस्थेने चिरडून टाकलेल्या दलित, उपेक्षित जनविभागाला स्वातंत्र्य, शक्ती वाढत्या प्रमाणात मिळणे असे होते. पण भारतात ह्या दोन वैरी संस्थांत

संघर्ष दिवसेंदिवस वाढत न जाता समजदार शेजाऱ्याप्रमाणे त्या गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. याचा अर्थ असा की भारतातील लोकशाही जनतेची लोकशाही नाही. प्रस्थापित वर्गाची लोकशाही आहे. आजचा प्रस्थापित वर्ग, वर्ण हा वर्णव्यवस्थेचा लाडका लेक आहे. वर्णव्यवस्थेने त्याला सर्व विशेष अधिकार दिलेले आहेत. म्हणूनच तो तेव्हा सत्ता, धर्मसत्ता, साहित्याचा नायक व नियंता होता. वर्णव्यवस्थेने दलितांचा निषेध केला आहे. म्हणून वर्णव्यवस्थेचा व तिच्या समग्र आधाराचा विध्वंस झाल्याशिवाय दलितांना स्वातंत्र्य नाही.

दलितांची, बहिष्कृतांची लोकसंख्या देशात राज्यसत्ता काबीज करण्याएवढी मोटी आहे. आंबेडकरी चळवळ स्वातंत्र्यपूर्वकाळापासून इथे कार्य करते आहे. परंतु सत्ता काबीज करणे तर दूरच पण स्वसामर्थ्यावर ती सत्तेच्या मैदानातदेखील नाही.

सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी सर्व बहिष्कृत जाती एकत्र आणल्या पाहिजेत. पण रिपब्लिकन पक्षाची अनेक शकले पडलेली आहेत. आणि आंबेडकरांचे नाव हे सवतेसुभे उभे करण्यासाठी वापरले जात आहे.

देशातील डावी चळवळ स्वातंत्र्यपूर्वकाळापासून लोकांत कार्यरत आहे. पण तिचीही वेगाने वाढ नाही. ह्या दोन्ही चळवळीत स्नेहसंबंधही नाहीत.

पण हिंदुत्ववादी, पुराणमतवादी प्रत्येक निवडणुकीत शक्ती वाढवीत आले आहेत. शासनयंत्रणा, वर्तमानपत्रे, साहित्य आणि उद्योगधंद्यांचे मालक त्यांना सर्व प्रकारे साह्य करीत आहेत. ते सत्तेवर यावेत असे प्रयत्न चालू आहेत आणि ते सत्तेवर आले आहेत.

पण जगात ठायी ठायी दलित, श्रमिक विजयामागून विजय मिळवीत आहेत.

ह्या विरोधाभासाचा विचार कोण करतो आहे ? तिकडे दलित, श्रमिक ठायी ठायी लढत आहेत. विजयी होत आहेत. अन् इथे जे प्रस्थापित होते, ज्यांना धर्मांनी विशेषाधिकार दिले होते ते जमीनदार भांडवलदार आणि त्याचे प्रतिनिधी सत्तेवर आहेत. सामर्थ्यवान आहेत. सर्व काही व्यापून बसले आहेत.

आणि म्हणून खेड्यापाड्यात दलित जनतेवर अन्याय अत्याचार वाढत आहेत. भूकबळी वाढत आहेत. दारिद्र्य वाढते आहे.

आदिवासी तर पाषाणयुगात जगावेत तसे जीवन जगत आहेत. हे डोंगराएवढे दुःख, हे अरण्याएवढे विपुल प्रश्न यशवंत मनोहर यांना दिसताहेत.

हे डोंगराएवढे दुःख आणि अरण्याएवढे विपुल असलेले प्रश्न पाहून कवी दुर्बल असेल,

तर पळून जाईल. हताश, निराश होईल. अथवा प्रस्थापित वर्गाला प्रिय होणारी कविता लिहील अथवा कविता लिहिणारच नाही. विसरण्यासाठी वाटेल ती निमित्ते, मद्ये स्वीकारील. पण यशवंत मनोहर हे पळत नाहीत. अंधारात शिरत नाहीत. दुःख देणाऱ्याला देवाधिदेव म्हणून पूजत नाहीत तर ते सरळ मैदानात शत्रूसमोर उभे राहतात आणि आपली प्रज्वलित प्रज्ञावंत आणि शूर कविता अस्त्राप्रमाणे शत्रूच्या अंगावर भिरकावून देतात.

'मी विघ्नसंतोषी.
उतट समाधानाने मला पाहावेशी वाटतात
असल्या विषविलासाची चटपट मरणे
त्याच्यातील बाटग्या श्रद्धानिष्ठांसहित
अवसानघातकी मूल्यपरंपरेसहित'

कारण

सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडविले.
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडविले'
'ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा
नांगर धरतो.'

कारण

'ते सर्व देव, दैववादी माझे वैरी आहेत.
... ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली.
... ते शब्दप्रामाण्यवादी सगुणनिर्गुण वैरी आहेत माझे.'...

म्हणून ते म्हणतात

'मला मान्य नाही तुम्ही माझ्या पहाटेची आई म्हणून...
मला मान्य नाही मी तुमचा कुणी नातलग म्हणून
मला मान्य आहे फक्त आता माझ्यापुढची अटळ युद्धभूमी
तिथे प्रथमच जमीनदोस्त होणारी तुमची संस्कृती, तुमचा परमात्मा...'

लेखक, कवी शूर नसेल, त्याची प्रतिबद्धता पक्की नसेल तर तो दोन्ही वर्गांची मेहरबानी

प्राप्त करण्यासाठी लेखन करतो. यशवंत मनोहर क्रांतिकारक कवी आहे. ते असे वाटेल तो अर्थ लावणारी अवगुंठित, गूढ, अबोल कविता लिहीत नाहीत. ही कविता मेघासारखी गुरुगर्जना करते, विजांसारखा कडकडाट, लखलखाट करते.

'फसवणूक' नावाची त्यांची कविता अशीच लखलखाट, कडकडाट करते. भारतात आणि हिंदुधर्मात जन्म घेतल्यामुळे जन्माचीच महाभयंकर फसवणूक होते.

...'आता स्वतःच्याच श्वासांवर मी क्रूर सूड घेतो.
मेंदूमधल्या श्मशानात काळातून तुम्हातून
स्वतःला वजा करून घेतो
हा वणवा. हा स्वार्थ. हे मतलब. हे अघोर हेतू.
ही बेइमानी
ही पिळवणूक
ही तत्त्वज्ञाने
हा सक्रिय दुस्वास
ही नाकेबंदी
हे खच्चीकरण. हे मृगजळ, ह्या भिंती, ह्या वृत्ती
अस्तित्वाचा कापूस पिंजून काढणारी
ही एकेक क्रूर धनुकली
परमेश्वराच्या लाडक्या पोरांनो
इथे जीव लागत नाही,
इथे जीव जगत नाही'...

यशवंत मनोहर हे निष्ठावंत पक्षधर आहेत. त्यांचा पक्ष दलितांच्या बाजूचा आहे. अस्पृश्यता नष्ट करण्याचा आहे. माणसाला मुक्ती आणि महती देणारा पक्ष आहे. साहजिकच ते जडवादी आहेत. चैतन्यवादाचे विरोधक आहेत. ज्ञान, विज्ञान, निरीश्वर, अनात्म, गतिवादाचे पुरस्कर्ते आहेत. आणि त्यांची कविताही म्हणूनच स्वप्नरंजन, मद्य देत नाही. ती शहाणपण आणि शस्त्रे देणारी आहे. जिथे कार्यकर्ता नसेल तिथे कार्यकर्ता होऊन कार्य करणारी, कार्यकर्ता, पुढारी निर्माण करणारी कविता आहे. मोर्चे काढणारी, लोकांना संघटित करणारी, कार्यक्रम देणारी कविता आहे. अशी कविता पाब्लो नेरुदाची आणि मायकोवस्कीची आहे.

यशवंत मनोहर यांच्या कवितेचा आणखी एक विशेष आहे. भगवद्गीतेतील कृष्ण जितक्या प्रमाणात 'मी' बोलतो त्यापेक्षा अधिक 'मी' यशवंत मनोहर यांच्या कवितेत आहे.

श्रीकृष्णाचा 'मी' कौरव पांडव युद्धाला उभे असताना प्रकटला आहे. यशवंत मनोहर यांचा 'मी' वर्ण, विषमता, दुःख, दैन्य, दास्य यांच्या विरोधात जो संघर्ष चालू आहे त्या संघर्षात प्रकटतो आहे.

कौरव पांडवांच्या युद्धात प्रकटलेला श्रीकृष्णाचा 'मी' कौरवपांडवांपेक्षा श्रीकृष्ण मोठा आहे हे सांगतो आणि यशवंत मनोहरांचा 'मी' देखील देव, धर्म, देशापेक्षा माणूस मोठा आहे, मोटमोठी सिंहासने, संकल्पना तो उद्ध्वस्त करीत आहे, निसर्गावर तो स्वामित्व स्थापित आहे, मरणावर तो मात करीत आहे, अनेक क्रांत्यांना तो आपल्या रणपांडित्याने जिंकीत आहे, अन् युगायुगाच्या सत्ताधाऱ्यांना तो धूळ चारीत आहे. ह्या विश्वासातून, विसाव्या शतकातील माणसाच्या सर्वजयित्वातून 'त्यांचा' मी आलेला आहे.

त्यांच्या 'मी' ला आणखी एक कारण आहे. यशवंत मनोहर यांचा मी कृष्णाप्रमाणे आपले परमेश्वरत्व सिद्ध करण्यासाठी येत नाही. तर माणूसपण सिद्ध करण्यासाठी येतो. हा माणूस बुद्धाच्या विचाराचा केन्द्र होता. हा माणूस जर केन्द्र नसता तर माणसापेक्षा मोठी असलेली ताकद म्हणजे 'स्वर्गातील बाप', 'प्रेषितांचा पिता', 'परमात्मा', 'ब्रह्म' इत्यादी संकल्पना बुद्धाने कल्पिल्या असत्या. पण बुद्धाने गतिवाद, अनात्मवाद, अनीश्वरवाद सांगून माणसाला महत्त्व, मोठेपण दिले आहे. शब्दप्रामाण्यवाद आणि ईश्वरवाद माणसाला दुय्यमत्व देतो.

आणि हे दुय्यमत्व आंबेडकरी आंदोलनाची आग प्राशून आलेल्या बंडखोरांना अजिबात सहन होत नाही. वर्णव्यवस्थेने आणि मनुस्मृतीने चिरडून टाकलेल्याची ही तीव्र प्रतिक्रिया आहे.

यशवंत मनोहर यांच्या 'मला पाहून आता' ह्या कवितेतील 'मी' कृष्णाच्या 'मी' पेक्षा, त्याच्या विराट रूपापेक्षाही विराट आहे. आणि वास्तव आहे–

... "माझ्या डोळ्यात फुले मार्क्स आणि गळ्यात आंबेडकर होता
मस्तकावरच्या तटतट्या शिरांत बुद्ध आणि चार्वाक होता
शब्दांत ज्वालांच्या रांगोळ्या होत्या
आवेशात आगरकर आणि करात क्रांतीचा आसूड होता
मी म्हटले ती कयामतीची घडी आहे
अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या पाखंड्यांनो
तुम्हाला घेरून माझी सुरुंगांची फौज खडी आहे
मी म्हटले मी आता थांबणार नाही
अध्यात्माला फक्तच मी तुरुंगात डांबणार नाही
मी म्हटले आता मी थकणार नाही

आणि वणवा लागलेले हात आता सागरात फेकणार नाही
युगांच्यापासून मी फाटलो आहे
आणि आज भी अपरंपार पेटलो आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायावर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला 'मी प्रलयंकारी सूर्य आहे.'

आलमशाखान ह्या समांतर लेखकाच्या कथेवर पत्र लिहिणाऱ्या त्या हिंदुत्ववादी पत्र-लेखकाने जर ही प्रलयंकारी कविता वाचली तर तो बिचारा भिंतीला धडका देईल. एवढी भयंकर ही कविता त्याला वाटेल. पण ह्या कवितेतील अहंकार केवढा मोटा आहे ! हा येतो कोठून ?

सहज आठवले म्हणून उल्लेख करतो. जगातील सर्व क्रांतिकारी कवींच्या कवितेत हाच पर्वतप्राय अहंकार, 'मी' असतो. मला वाटते हा अहंकार ह्या युगाने आणि मार्क्स-वादी सिद्धांतांनी क्रांतिकारी कवींना दिला असावा. त्याचे पहिले कारण हे जग माझे आहे. हे मानवी जग घामाने घडविले आहे. श्रमिकांच्या श्रमांतून घडले आहे. हे जग आता घडविणारा 'मी' आहे. श्रमिक आहे. आता होणारा वर्गकलह हे शेवटचे युद्ध आहे. ह्या अंतिम युद्धात 'मी' क्रांतिकारक, श्रमिक विजयी होणार आहे. आणि 'मी' नवे जीवन उभे करणार आहे. जिथे दैन्य, दुःख, दास्य नाही, शोषण नाही आणि पुढे तर सर्व जगच शोषणहीन, शासनसत्ताहीन 'मी' करणार आहे.

हा कुठल्याही प्रेषिताने न दिलेला आत्मविश्वास मार्क्सवाद देतो. मार्क्सवादाच्या आधीच्या कुणा कवीने एवढा अहंकार 'मी' पणा दाखविलेला नाही. त्या वेळी कवी-जवळ फक्त कविता होती. कवीपेक्षा तेव्हा राजपुरुष–धर्मपुरुष मोठे होते. कारण त्यांच्या-जवळ सत्ता होती. पैसा होता. परमेश्वर होता. पण क्रांतिकारी कवितेने ह्या सर्व सत्तांना ठोकरले आहे. नाकारले आहे. अन् आपली समाजवादी सत्ता स्थापण्याचे स्वप्न बाळ-गले आहे. पूर्वी कवी प्रजा होता. आता तो क्रांतिकारक असल्यामुळे एक जगनिर्माता झाला आहे आणि ही भावना आणि पाठीशी असलेली जागतिक जनता ही क्रांतिकारी कवीची ताकद ठरली आहे. ह्या ताकदीच्या बळावर अनेक क्रांतिकारी कवींनी हिंस्र सत्ते-वर मात केलेली आहे.

यशवंत मनोहर यांच्या कवितेत जे शौर्य, निर्भयता, क्रांतिकारी प्रखरता आणि ह्या युगात चाललेला दलितांचा मुक्तिसंग्रामाच्या विजयाचा विश्वास जाणवतो त्यामुळेच त्यांची कविता ही प्रकाशाप्रमाणे स्वच्छ होते. डॉ. आंबेडकर, मार्क्स, बुद्ध यांच्या विचाराप्रमाणे

भाष्य होते. केशवसुतांच्या परंपरेचा आजचा प्रखरतम टप्पा होते. विद्रोही काव्यपरंपरेचा कळस होते.

तिला शास्त्रीय दृष्टिकोण लाभलेला असल्यामुळे ती इतर कवितेप्रमाणे व्यक्तीशी न भांडता व्यवस्थेच्या विरोधात उठाव करते आणि त्यामुळे तिला विश्वात्मकताही येते. दुनियेतील दलित एक आहेत, त्यांचे दैन्य, दास्य, दुःख एक आहे व ते देणारेही एक आहेत. म्हणून नीग्रो, चिलीयन, ऑफ्रिकन कविता जशी इथे कळते तशीच यशवंत मनोहर यांची कविताही जगातील कोणालाही कळेल. कारण तिला विश्वात्मकता देणारे दुसरे एक परिमाण तिच्यात आहे आणि ते म्हणजे क्रांतित्व. क्रांतित्व ही विश्वजाणीव आहे. यशवंत मनोहर यांच्या कवितेत ही विश्व–जाणीव पुरेपूर आहे.

अस्पृश्यता आहे आणि ती अजूनही टिकून आहे. ती अजूनही टिकून राहण्याचे कारण आहे आणि ते म्हणजे ती टिकून जिच्यामुळे राहते ती स्थिती अजूनही आहे.

वर्णव्यवस्थेने ती टिकवून धरण्यासाठी धर्मसत्तेचा आणि शासनसत्तेचा वापर केला आहे. ह्या दोन्ही प्रबळ शक्तींनी बलप्रयोगाने जनविभागाला आर्थिक विपन्नता आणि बहिष्कृतता दिलेली आहे.

धार्मिक–सत्तेने, पूजनीय देव, ऋषी, मुनी, पवित्र ग्रंथ यांच्याद्वारे प्रचार करून अस्पृश्यता अमर केली. देव अमर, ग्रंथ अपौरुषेय म्हणून अमर. तेव्हा त्यांची शिकवणही अमर. त्यांची दुष्टताही अमर.

हिंदुराजसत्तेने कायदे करून आणि ते दंडशक्तीच्या बळावर अमलात आणून अस्पृश्यतेला, दैन्याशी, दास्याशी बांधून टाकले. दैन्य, दास्याला आणि अस्पृश्यतेला एक केले.

ऋषींनी पूर्वजन्म, पाप, पुण्य, पूर्वकर्म, पावित्र्य इ. कल्पनांचा वापर करून, ईश्वराला जगाचा नियंता करून, अस्पृश्यता, दुःख, दैन्य, दास्य त्याने निर्माण केले आहे. असे ग्रंथ रचले आणि पिळवणूक करणाऱ्यांची सुटका केली आणि ईश्वराबद्दलही राग, विद्रोह उद्‌भवू नये म्हणून पूर्वकर्म, पूर्वजन्माचा शोध लावून ईश्वराचीही सुटका केली.

म्हणजे अस्पृश्यता घालविण्यासाठी अनेक ग्रंथ, अनेक देव-ईश्वर, पिळवणुकीचा पुरस्कार करणारे अनेक सिद्धांत, चैतन्यवाद इत्यादिकांचा बळी द्यावा लागेल. ही असंख्यपणाने असलेली फौज अदृश्य आहे. निराकार आहे. संस्कार होऊन ते वावरतात. मनात आणि शब्दांत राहतात. देवळे पाडून, ग्रंथ जाळून, ते नाहीसे होत नाही.

त्यांना नाहीसे करण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना नाकारले पाहिजे. पण नाकारण्यासाठी जडवाद सांगितला पाहिजे. पण जडवादाचा अनात्म, अनीश्वर-गतिवादाचा प्रचार

किती होणार ? कोट्यवधींशी चर्चा कोण करीत फिरणार ?

कोट्यवधींशी चर्चा करीत एक आगगाडी, एक विमान, एक चंद्रावर उतरणारे यंत्र फिरते, यशवंत मनोहरची विद्रोही, वणव्यासारखी अग्निबंबाळ कविता ऐकायला एक खेडे तयार होते. मी ते खेडे आणि ती कविताही पाहिली आहे. ते खेडे एक एवढे सहनशील, शांत झाले त्याला कारण विज्ञानाचा साक्षात्कार आहे. आणि यशवंत मनोहरची प्रतिमा एवढी ज्वलज्जहाल झाली त्यालाही कारण विज्ञानाचाच साक्षात्कार आहे. असेही म्हणता येईल की, यशवंत मनोहर यांची ही कविता विज्ञानाचा उद्‌गार आहे.

म्हणजे ज्ञान-विज्ञान, यंत्र-तंत्र-ज्ञान पाहिजे. म्हणजेच यांत्रिकीकरण, औद्योगीकरण झपाट्याने वाढले पाहिजे. स्वराज्य मिळाल्यापासून उद्योगधंदे वाढताहेत. भांडवलशाही वाढते आहे. भांडवल आणि नफे वायुवेगाने फोफावले आहेत. तरीही अस्पृश्यता आहे. दैन्य आहे. दास्य आहे. दुःख आहे.

यावर उपाय म्हणून उद्योगधंदे, भांडवल राष्ट्राच्या मालकीचे व्हायला पाहिजे. म्हणजे धनाचा उपयोग अधिक चांगल्या प्रकारे करता येईल.

माजी पंतप्रधानांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. सरकारी मालकीचे उद्योगधंदे प्रचंड प्रमाणात वाढविले. २० सूत्री कार्यक्रमाखाली वरकड जमिनीचे दलितांसाठी वितरण केले. कर्जमुक्ती केली. आधीचे अस्पृश्यता निवारणाचे कायदे होतेच. एवढे असूनही काही लोकांचे प्रश्न सुटूनही अस्पृश्यता आहेच. दैन्य, दास्य, दुःख आहेच.

म्हणून चांगले कायदे, चांगल्या योजना अमलात आणण्यासाठी चांगली शासनयंत्रणा पाहिजे. सरकार चांगले पाहिजे. चांगले सरकार म्हणजे स्वतःचे सरकार. दलित जनतेचे सरकार. सत्ताच दलितांच्या हाती. शासनयंत्रणा दलितांची. ज्ञान, विज्ञान दलितांच्या हाती. राष्ट्रीय संपत्ती दलितांच्या हाती.

हे विवरण म्हणजे दलित साहित्याची सूत्रे आहेत. सम्यक्‌क्रांतीचा नकार, विद्रोह, मानव मध्यवर्तित्व, अनात्मवाद, अनीश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञान आणि ह्या ज्ञानविज्ञानाचा योग्य उपयोग करण्यासाठी सत्ता, अर्थसत्ताच दलितांच्या हातात असणे ही सम्यक्‌क्रांतीची सूत्रे आहेत. हीच दलित जाणीव होय.

ही सर्व सूत्रे यशवंत मनोहर यांच्या कवितेत आढळतात.

१. 'जळण जळावे तसा चाललो जळत मुक्याने
हृदयावर क्रूर नाचत हासत होती मरणे

हाक न फुटली कधी नि मन मोहरले नाही
नित्य उभ्या हंबरल्या रक्तामधल्या गायी. '

२. ' वर्तमान ज्यांच्याशी कृतान्त खलपुरुषासारखा वागतो
आणि भूतकाळाने कोंडून मारले ज्यांना शतकांच्या अग्निवनात
या माझ्या शब्दांचे विद्युत दिवे होतोत
त्यांच्या अंधारखिन्न स्मशानात
आणि ज्यांच्या मागे मरणे दौडविली जातात
त्यांच्यासाठी संरक्षक कवच ठरोत हे शब्द माझे '

३. ' परमात्मा अमुचा। शत्रु सर्वकाळ। शोषकांचे बळ। हेतुसिद्ध '

४. ' काळ्या गोऱ्या साऱ्या। वाळल्या पोटांनी।
बेहिशेबी वन्ही। व्हावे आता॥ '

५. ' आणि पेरून ठेवू येथील खोपटातील
यातनाच्या ऐतिहासिक अरण्यात
विक्राळ विजांचे शिस्तशीर काफिले '

६. ' क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
आपण उद्याच्या सूर्याशी करू दोस्ती
आपण विजांशी करू गोष्टी आपण नाचू वादळांच्या मोर्चात
उजेडाची आपण उभारू वस्ती. '

७. ' माफ कर सिद्धार्था तुझ्या शत्रूंनी तुला दिलेल्या
पाखंडी या बिरुदामुळे तू मला अधीकच जवळचा वाटतोस... '
तू अनात्मवादी म्हणून माझा सोबती वाटतोस
निरीश्वरवादी म्हणूनच माझा साथी वाटतोस ?

८. ' ज्योतीबा, तुझ्याही पराक्रमाच्या विजा आमच्या मनगटात सळसळत आहेत. '

९. ' मार्क्स तुझ्या हृदयाचे वणवे
या कवितांच्या हाती मी दिले आहेत... '

१०. ' अरे, या बेशरम अत्याचाऱ्यांना फाडताना आम्हीच विजयी होऊ
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस, कुठे ठेवलेस ? '

युद्ध अटळ आहे. क्रांती अटळ आहे. हा क्रांतिकारी कवीप्रमाणे यशवंत मनोहर यांचा विश्वास आहे. क्रांतीची त्यांची हत्यारे–शब्द ते फार विचारपूर्वक वापरताना दिसतात. हिंदुवर्णवादी पुराणांतून, इतिहासातून, कथा–काव्यांतून आलेली प्रतिमा प्रतीके, आदर्श, पुराणकथा, अलंकार उपमा ते वापरत नाहीत.

दलितांची क्रांती ही फक्त ह्या युगाची निर्मिती आहे. म्हणून तिचे आदर्श, तिच्या प्रतिमा, तिच्या पुराणकथा ह्याही ह्याच युगातल्या पाहिजेत. वर्णव्यवस्थेशी अथवा भांडवलशाहीशी लढणाऱ्या दलित श्रमिकाला राम म्हणून, भांडवलदार अथवा वर्णव्यवस्थेला रावण म्हणून ह्या युद्धाचे वर्णन यथार्थ होणार नाही. ह्या नव्या युद्धातून वर्ण, वर्ग, दैन्य, दास्य, दुःख आणि माणसाचे दुय्यमत्व नष्ट होणार आहे.

पण राम-रावण युद्धातून शंबुकाचा शिरच्छेद झाला. शूद्रांचा प्रभावी होण्याचा हक्क नाकारण्यात आला. सीतेला आत्मत्याग करावा लागला. स्त्री, शूद्र, अतिशूद्र यांना दुय्यमत्व आले. वर्णव्यवस्थेला बळ मिळाले. म्हणूनच रामाला कथा-काव्यांत नायकत्व मिळाले. देवळात देवत्व प्राप्त झाले.

तेव्हा आजचे युद्ध, आजच्या युद्धाचे नायक हे महान नायक आहेत. आजचे युद्ध अद्वितीय युद्ध. तुलना करायची झाली तर ती बौद्ध साहित्यातील काही नायकांशीच होऊ शकते. एवढे हे युद्ध, हे नायक अतुलनीय आहेत.

यशवंत मनोहर यांची कविता हे जाणते म्हणूनच ती इतर पुरोगामी क्रांतिकारी कवींच्या कवितांपेक्षा अधिक युगसमांतर आहे. अधिक क्रांतिपूर्ण आहे. आणि म्हणूनच ती अहिंदू आहे. म्हणून पूर्णपणे मानवी आहे. म्हणजेच दलित कविता आहे; म्हणून विश्वात्मक आहे.

हिंदु-मुसलमान जनतेत द्वेष, शत्रुत्व व दंगे पसरविणारे इथले पक्षपाती इतिहास, माणसात जातिभेद निर्माण करणारी पुराणे, माणसाचा अवमान करणारे, देवदैवते नाकारणारे आणि ह्या क्रांतिकारी युगातील क्रांतिकारी मानवतावादी, मानवी मुक्तीसाठी, महतीसाठी झगडणारे सामाजिक लढ्याचे, विचाराच्या संघर्षाचे साहित्य स्वीकारणारे, त्यातील क्रांतिकारकांना आदर्श मानणारे, लोकशाही समाजवादी संघर्ष करणारे, ज्ञानविज्ञानाचा स्वीकार करणारे आणि त्यांचा समाजाच्या सेवेसाठी उपयोग व्हावा म्हणून मक्तेदारीशी विरोध करणारे, आणि माणसाला महान मानणारे दलित साहित्य आहे. आणि ह्या त्याच्या विचारामुळे ते साहित्यात नवे युग-आणणारे युगकर्ते साहित्य आहे.

माणूस-दलित-श्रमिक माणूस त्याचा नायक, केन्द्रबिंदू असल्यामुळे व माणूस-श्रमणारा माणूस हा त्याच्या स्वाभाविकतेमुळेच विश्वमानव असल्यामुळे दलित साहित्य हे

विश्वसाहित्य आहे. माणसाला महत्त्व देणारा बौद्धधर्मही विश्वधर्म आहे. ईश्वर, त्याची पूजापद्धती, धर्म इत्यादीमुळे माणसे त्या त्या धर्माची होतात. वेगवेगळी होतात पण माणूस आणि व्यवस्था, माणूस आणि निसर्ग असा पुढे आला तर तो विश्वमानव होतो.

पावसाळा येणार असल्याची शुभवार्ता घेऊन वारे येतात, पक्षी येतात. पावश्या तर शेतकऱ्यांना सृजनाला सज्ज राहण्यास सांगतो. क्रांती येण्याआधी असे क्रांतिकारी लेखक, बुद्धिवंत येत असतात आणि क्रांतीच्या आगमनाची शुभवार्ता प्रकट करीत असतात. युरोप अमेरिकेमध्ये असे लेखक आले आहेत. रशियामध्ये तर केवढी मोठी परंपरा आहे. भारतात ही क्रांतीची शुभवार्ता घेऊन दलितसाहित्य येत आहे.

माझे हे म्हणणे खरे वाटत नसेल तर माझ्या प्रश्नाची समर्पक उत्तरे द्यायला पाहिजेत. 'प्रश्न' पहिला :

कधी काळी एवढे कवी, एवढे लेखक दैन्य, दास्य, दुःख, अस्पृश्यतेविरोधी आपल्या ताकदी, एवढ्या लेखण्या घेऊन सरसावले होते काय ?

दुसरा : कधी काळी कलावंतांनी, बुद्धिवंतांनी, वर्णव्यवस्था आणि तिच्या वैचारिकतेविरुद्ध, भांडवलशाही आणि तिच्या औपचारिकतेविरुद्ध एवढा नकार, एवढा विद्रोह पुकारला होता काय ?

तुक्या, चोख्या हे शूद्रातिशूद्र समाजातून वर आले. त्यांनी एक तरी शुद्ध तत्त्व नाकारले काय ? दुःख, दैन्य देणारा त्यांना दिसला काय ?

तिसरा : धर्मसत्ता, अर्थसत्ता, कला, साहित्य, सौंदर्यशास्त्रा व त्यांचे आदर्श याविरोधी एवढ्या स्पष्टपणाने, शूरपणाने कोणता लेखक, कवी पुढे आला आहे काय ?

परंतु दलित साहित्यातील लेखक, कवी, धर्मसत्ता, अर्थसत्ता, नीती, संस्कृती, साहित्य, संकल्पना, मानसिकता या सर्व केन्द्रांस बदलू बघत आहेत. हे लेखक कवी चाळीचाळीतून, खेड्याखेड्यांतून, झोपडपट्ट्यांतून येत आहेत. क्रांतीची आवाहने करत आहेत. नवे जीवन, नवा देश, नवा समाज उभारू बघत आहेत. असे एवढे, झपाटल्यासारखे साहित्याच्या इतिहासात घडले होते काय ?

एवढ्या आवेगाने, आवेशाने, संख्येने, क्रांतिकारक उत्साहाने साहित्याच्या इतिहासात आपल्या देशात कधी वादळ आले आहे काय ?

प्रत्येक तरुण कवी, लेखक आपले क्रांतित्वाने, क्रोधाने, कारुण्याने गदगदून आलेले

अंतःकरण घेऊन मैदानाकडे धावतो आहे. आपले मनोगत मैदानातील माणसांना सांगतो आहे. हे कशाचे लक्षण आहे ?

मला वाटते आहे, क्रांती मनामनाचे दार ठोठावते आहे. शब्दांत, उद्‌गारांत, कवितेत साकारते आहे. असे जेव्हा होते, दुःखाची दवा, दैन्याची दवा, क्रांती होते, बेकारी दूर करणारे स्वप्न क्रांती होते. अपमानित जीवांना सम्मानित करणारी क्रांती होते. आशा, उत्साह, प्रकाश क्रांती होते तेव्हा त्या देशात क्रांती येणार असते. भारतीय स्वातन्त्र्यलढ्याच्या काळातील साहित्य, रशियन क्रांतीआधीचे रशियन साहित्य, पॅरीस कम्युन घडविणारे फ्रेंच साहित्य याला साक्ष देईल.

भारतातील चिरडलेल्या समाजातून दुःख सांगत, संतापत, चिडत, शिव्याशाप देत, आणि क्रांतीला आवाहने करीत पक्षामागून पक्षी यावा तसे, आकाशात ओळच्या ओळ लागावी, ढगामागून ढग यावे अन् आकाश गद्‌गदून यावे तसे दलित साहित्यिक येत आहेत.

यावरून नक्कीच म्हणता येईल युगारंभ होतो आहे. क्रांतीची शुभवार्ता घेऊन एक एक पक्षी, एक एक ढग येतो आहे. एवढे म्हणून आणि यशवंत मनोहरांची कविता देऊन थांबतो.

'डोळ्यांत तेल घालून भोवताल पाहा
नजरेतील क्षितिजे सांभाळा आणि ध्यानात ठेवा
माती ज्यांच्याजवळ आपली मनोगते मांडते
त्यांचा विचार उजेडाच्या युगासाठी कळस होत असतो ··· '

•

आठवणीचे पक्षी : धुमसणारे पंख

मराठी ग्रंथ संग्रहालय वर्धा
२८९५
२३३२०
निषेध
१९१७
संग्रह आवृत्ती (स्थळ प्रत)



१. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे पुस्तक दलित साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे ही फार महत्त्वाची आणि आनंदाची घटना आहे. कारण दलित साहित्याचे महत्त्व वाढविणारे हे पुस्तक ठरणार आहे.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला हवे होते. म्हणजे दलित साहित्य चळवळीचे नेते, मार्गदर्शक डॉ. म. ना. वानखडे हे पुस्तक पाहू शकले असते. आणि पुस्तकाचे महत्त्व विशद करणारी प्रस्तावनाही लिहू शकले असते.

प्र. ई. सोनकांबळे त्यांचे विद्यार्थी. प्र. ई. वर त्यांचा लोभ होता. त्यांचे लेखन गुण, त्यांनी अनुभवलेले जीवन पाहून त्यांनी प्र. ई. ना लिहायला उत्सुक केले. त्यांचे लेखन प्रकाशित व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. ते पुस्तकरूपाने वाचकाच्या हाती पडावे म्हणून त्यांनी यत्न केले. आणि पुस्तक प्रकाशित होत असताना ते आमच्यात नाहीत याचे दुःख होते.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला

पाहिजे होते. याचे आणखी एक कारण होते. ते म्हणजे हे पुस्तक मराठवाड्याच्या दलित जीवनाचे वास्तव चित्रण आहे. मराठवाड्यातील दलित जीवन कसे आहे, दलित माणूस कसा आहे, मराठवाड्यातील सामंतशाही समाजव्यवस्थेने किती भयंकर दैन्य, दास्य निर्माण केलेले आहे हे लोकांना दिसले असते आणि मराठवाड्याचा औद्योगिक विकास व्हावा हे अनेकांना पटले असते. महारवाड्याच्या औद्योगिक उद्धारासाठी काही प्रचारक ह्या पुस्तकाने तयार केले असते.

हे पुस्तक हे कार्य आताही करीलच पण नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात जी एकतर्फी दंगल उसळली, प्रचंड आर्थिक, भावनिक, सांस्कृतिक हानी करून गेली अन् त्यानंतर त्या दंगलीचे समर्थन करण्यासाठी दलितांवर जे आरोप करण्यात आले, त्या आरोपाचे निराकरण हे पुस्तक करणार आहे. दलितांची बाजू हे पुस्तक मांडणार आहे. सांगणार आहे. दंगलीला कारण नामांतर नाही, दलित नाही तर मराठवाड्यातील सामंतशाही समाजरचना, अर्थरचना आहे व तिने घडविलेली मानसिकता आहे.

आणि शाहीर अण्णाभाऊ साठे येथील सामंती वृत्तीतून येणारा मुजोर अन्याय, अत्याचार प्रकट करतात. इतरही लेखक ह्या अन्याय अत्याचारावर भर देतात. पण प्र. ई. सोनकांबळे प्रथमच तेथील दलितजीवन जनतेपुढे मांडीत आहेत. मराठवाडा कसा आहे ?

२. पोलीस कारवाई करीपर्यंत मराठवाडा निझामाच्या एकतंत्री राजवटीं खाली होता. महाराष्ट्रात आणि भारतात नव्या ज्ञान-विज्ञानाचा, उद्योगधंद्यांचा विकास होऊ लागल्यामुळे लोकहितवादी, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, नेहरू आदी डाव्या चळवळी लोकांची मानसिकता वाढवीत होते. पण मराठवाड्यात निझामी राजवट असल्यामुळे ह्या चळवळी, हे नवे विचार स्पर्श करू शकले नव्हते.

प्र. ई. सोनकांबळे, अण्णाभाऊ साठे आणि मराठीतील इतर काही लेखकांनी मराठवाड्यातील सामाजिक, सांस्कृतिक जीवन आपल्या ललित कृतींतून व्यक्त केले आहे. हे जीवन कसे आहे ?

प्र. ई. सोनकांबळे यांनी दलितजीवनाचे दैन्य, दास्य आणि दुःख व्यक्त केले आहे. विषमता किती भयंकर स्वरूपात तिथे वावरत आहे अन् दलितजीवन भुकेच्या आगीतच कसे होरपळत आहे. म्हणजे दलित समाजाचे आर्थिक जीवन गुहा-मानवाच्या जवळपासचे आहे. हे प्र. ई. चे पुस्तक वाचताना वर्णसंबंध, जातिसंबंध ती खिळखिळे करते. ह्या भांडवशाहीचे क्रांतिकारी पाऊल मराठवाड्यात निझामाने शिरूच दिले नव्हते. त्यामुळे मोठे उद्योग नाही, मोठे दळणवळण नाही, त्यामुळे जुने जसेच्या तसे टिकून राहिलेले. विषमता. अस्पृश्यता.

मराठवाड्याला संतांची जन्मभूमी म्हणतात. जन्मले असतील संत मराठवाड्यात अन् त्यांच्या जन्मामुळे कदाचित साहित्याचा फायदा झालाही असेल. गाणी-भजने लोकांना गायला मिळाली असतील. पुजाऱ्यांना काही अधिक देवळे बांधून मिळाली असतील. एखादा देव ह्या संतांनी अधिक लोकप्रिय केला असेल. वाङ्मयात आणून चिरंजीव केला असेल.

संत एवढेच कार्य करतात. ते वर्णव्यवस्था मोडीत नाहीत. ते जातिभेद मोडीत नाहीत. ते शोषितांची बाजू घेऊन शोषकांना वठणीवर आणीत नाहीत, ते जमिनीचे फेरवाटप करून भूमिहीनांची संख्या कमी करीत नाहीत, ते फक्त घुराळा उडवतात. समाजव्यवस्था जशीच्या तशीच राहते. विषमता, शोषण जसेच्या तसे राहतात. उलट शोषक पूर्व-कर्माचा, पाप-पुण्याचा, ईश्वराचा, धर्माचा आणि संतांचा आधार घेऊन शोषण करीत असतात.

मराठवाडा असा सामंतशाही समाजव्यवस्था असलेला मुलूख आहे. निझामाने त्याचे औद्योगीकरण होऊ दिले नाही. नवे वर्ग जातीजमातींतून होऊ दिले नाही. विसाव्या शतकात असूनही आणि मुंबई पुण्यापासून फार दूर नसूनही मराठवाडा मध्ययुगात वाटावा एवढा मागासलेला आहे.

अशा ह्या मागासलेल्या, सामंतशाहीचा मठ, किल्ला असलेल्या म्हणजे अस्पृश्यता कमालीची तीव्र स्वरूपात असणाऱ्या अशा मराठवाड्याची बाबासाहेबांनी आपली शिक्षण-संस्था उभारण्यासाठी सहेतुक निवड केली.

३. अस्पृश्यता निवारण्यासाठी बाबासाहेबांनी अनेक सूत्रे वापरात आणली. त्यानुसार चळवळी केल्या. शिक्षण हे एक त्यांतील महत्त्वाचे सूत्र. शिक्षणव्यवस्था परिवर्तनाला कारणीभूत होते व व्यवसायपरिवर्तन अस्पृश्यता आणि जातिभेद नाहीसे करते.

वर्णव्यवस्था वृत्ती आणि व्यवसाय परिवर्तन नामंजूर करते. तसेच सामंतशाही शोषण-व्यवस्थेलाही व्यवसायपरिवर्तन नामंजूर असते. हिंदू समाजाच्या शीर्षस्थानी असलेल्या ब्राह्मण क्षत्रियांनादेखील व्यवसाय परिवर्तन करता येत नव्हते. हिंदू वर्णव्यवस्था आणि समाजव्यवस्था अशी माणसांची कोंडी करते. हिंदू म्हणून जन्म घेतल्याची ती प्रत्येकाला अशी सजा देते. जातिधर्माच्या, जातिकर्माच्या कारावासात अशी ती माणसाला बंदी करून टाकते.

ब्रिटिश पक्के स्वार्थी. त्यांनी भारताला बाजारपेठ केली. कच्चा माल देणारी, पक्का माल विकत घेणारी. त्यामुळे ह्या खरेदी विक्री पुरते शिक्षण, ह्या खरेदी विक्रीला पुरेसे ठरेल एवढीच उद्योगधंद्यांची वाढ ब्रिटिश साम्राज्य सत्तेने केली आणि हिंदी भांडवल-शाहीची वाढ रोखून धरली. त्यामुळे व्यवसायपरिवर्तन करण्यासाठी उसळून येणाऱ्या

अनेक जातीजमातींना व्यवसाय परिवर्तन करता आले नाही. जातीजमातींच्या कदमात कुजावे लागले.

मराठवाड्यात वर्णव्यवस्था आणि तिची सामंतशाही तर समाजाला दगडाप्रमाणे स्थिर करून ठेवू पाहणारी. गति–प्रगती रोखून धरणारी. आणि ही दगड डोंगर झालेली मराठवाड्यातील समाजव्यवस्था सुधारित करण्यासाठी बाबासाहेबांनी एक क्रांती केंद्र, एक स्फोटकाचे कोठार, स्फोटकाची एक अॅम्युनिशन फॅक्टरी औरंगाबाद येथे नागसेन वनात सुरू केली. त्याचे नाव मिलिंद महाविद्यालय.

मिलिंद महाविद्यालय निघाले. आणि मराठवाड्याच्या खेड्यापाड्यांतून थोडे थोडे विद्यार्थी दलित समाजातून येऊ लागले. भांडीकुंडी गहाण ठेवून, घराच्या छपराचे अथवा कुडाचे पत्रे विकून, घरातील शेळी–बकरी विकून आईबाप आपली मुले शिकण्यासाठी मिलिंदमध्ये पाठवू लागले. हे मुलांना शिकविणे आणि उच्च शिक्षणासाठी मुलांना पाठविणे वर्णव्यवस्थेविरुद्ध होते.

४. सर्वांनाच महार–मांगपणातून म्हणजे दैन्य–दास्यातून सुटायचे होते. शिक्षण घेऊन, व्यवसाय–परिवर्तन करून, जातीतून–तिच्यावर लादलेल्या दैन्य–दास्यातून सुटका होणार होती. म्हणून शिकणे आवश्यक होते. आणि शिकण्यासाठी विद्यार्थ्यांच्या लाटांवर लाटा मिलिंदकडे धावू लागल्या. सर्व नद्या जशा समुद्राकडे धावतात तसे ग्रामीण महाराष्ट्रातील दलित विद्यार्थी दिशादिशातून मिलिंदकडे येऊ लागले. आणि मिलिंदमध्ये विद्यार्थ्यांचा समुद्र उचंबळू लागला.

५. समाजाच्या तळागाळांतून, दैन्य–दास्य चिरंजीव झाले आहे. तेथून आलेल्या ह्या विद्यार्थ्यांचे हादरून टाकणारे अनुभव ऐकून, त्या अनुभवातील सामाजिक–सांस्कृतिक, आर्थिक व सामंतशाही समाजरचनेवर प्रकाश टाकणारे किरण पाडून डॉक्टर म. ना. वानखडे, प्राचार्य चिटणीस यांनी ते कॉलेजच्या वार्षिकांमधून छापण्यास प्रारंभ केला. त्यातील काव्यगुण, वाङ्मयीन गुण पाहून कला साहित्याच्या जाणिवा देणारे, वाढविणारे एखादे व्यासपीठ असावे म्हणून मिलिंद साहित्य सभा आणि 'अस्मिता' हे त्रैमासिक सुरू करण्यात आले.

मिलिंदमध्ये शिक्षण सामर्थ्य मिळत आहे. बोलण्याचे, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळत आहे. आणि सुट्टीत गावी गेले की दैन्य, दास्य, उपेक्षा, वंचना, दुय्यमत्व प्राप्त होत आहे. हे कसे काय ?

द्विधा होणाऱ्या, दुभंगणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचे कारण कळत नव्हते. त्याचे कारण उघड होते. मिलिंद निघाले म्हणून अनेक शिक्षण संस्था निघाल्या. मराठवाडा विद्यापीठही

निघाले. शूद्र–अतिशूद्रातील मुले शिकू लागली. शिकून बाहेर पडू लागली. पण मराठवाड्याचा औद्योगिक विकास होत नसल्यामुळे, सामंतशाही कोसळत नसल्यामुळे, कॉंग्रेसचे पुढारीपण ह्या सामंतशाही समाजव्यवस्थेतून आल्यामुळे ते सामंतशाही कोसळून पाडणारी व्यवस्था विकसित होऊ देत नव्हते. अन् सामंतशाहीत तर कोणाचेही पदविधराचेही स्थान शेतमजुराएवढेच असते. दीड दोन रुपये मजुरी मिळविणाऱ्याचेच असते. शेतीशिवाय तिथे दुसरा रोजगार नसतो.

म्हणजे व्यवसाय–परिवर्तन करण्यासाठी केवळ शिक्षण पुरे पडत नाही. तर शिक्षणाबरोबरच उद्योगधंदे वाढावे लागतात. हे उद्योगधंदे काढण्याचे काम शासन आणि भांडवलदार ज्यांचेकडे आहे ते करीत असतात. मराठवाड्यातील धनवानांना शेतीतून अफाट पैसा मिळतो. म्हणून नवा उद्योगधंदा काढण्याचा मोह होत नाही. आणि दुसरे म्हणजे औद्योगिक वाढ ही सामंतशाही रचनेचा समाजव्यवस्थेचा आकृतिबंधच उद्ध्वस्त करीत असते ? भांडवलशाही नवे वर्गसंबध निर्माण करते, नवे वर्ग घडवीत असते अन नवे वर्ग वाढले म्हणजे वर्णव्यवस्था नष्ट होते. सामंती समाजव्यवस्था नष्ट होते.

मिलिंदमधले बहुसंख्य विद्यार्थी दलितांतील, भूमिहीन समाजातील, आई बाप मोलमजुरी करणारे म्हणजे दैन्यदास्याच्या चिखलात रुतून बसलेले. ही मुले जेव्हा गावी जात होती तेव्हा तेथील दैन्य, दास्य, उपेक्षा, जातिभेद पाहून दुभंगत.

ह्या दोन स्थितीतून परस्पर विरोधी वातावरणातून, आधुनिक मिलिंद आणि सामंती समाजरचनेतून ह्या दोन परस्परविरुद्ध शक्तीच्या तुलनेतून दलित तरुणांना एक आत्मजाणीव, जीवनाचे सत्य, जाणवू लागले. ते कथा–काव्यरूप घेऊ लागले. हे कथा–काव्य बीज वाढविण्यासाठी डॉ. म. ना. वानखडे, प्रा. चिटणीस व त्यांचे सहकारी प्राध्यापक आणि मिलिंद साहित्य सभा कार्य करीत होते.

आणि मिलिंदने लेखक–कवींची कधी आटणार नाही अशी साहित्य वाहिनीच निर्माण केली. वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, सुखराम हिवराळे, नरेश इंगळे, अविनाश डोळस, अरुणा लोखंडे, झिलटे आणि राम दुतोंडे आणि इतर अनेक नामवंत, प्रतिभावंत एकामागे एक येत आहेत.

६. प्र. ई. सोनकांबळे हे मिलिंदचे विद्यार्थी. त्यांचा जन्म मराठवाड्यातील. आई-वडील भूमिहीन. महार. आई-वडील लहानपणीच वारलेले. थोरल्या बहिणीने सांभाळलेले. थोरल्या बहिणीचे सासर गरीब. भूमिहीन मोलमजुरी करून दिवसाचा डोंगर कसा तरी पार करणे. अशा गरिबीत म्हणजे महारपणात प्र. ई. चे बालपण, किशोरपण गेलेले. एका निराधार भूमिहीनाचे मुलाने, एक मोलमजुरी करणाऱ्या बहिणीच्या पोरक्या भावाने

सामंतशाहीच्या विषमतापूर्ण समाजात जे जे पाहायचे, सहन करायचे, ते सर्व सहन केलेले आहे आणि ते 'आठवणीचे पक्षी' यामध्ये त्यांनी मांडलेले आहेत.

७. 'आंबेडकरी चळवळ' सुरू होऊन पन्नास वर्षे उलटन गेली आहेत. धर्मांतर करून वीस वर्षे होऊन गेलेली आहेत. दलित साहित्य चळवळ सुरू होऊन पंधरावीस वर्षे झाली आहेत. स्वातंत्र्य आणि लोकशाही येऊन तीस वर्षे झालेली आहेत. तरी बहुसंख्य दलित तरुणांना आपले आयुष्य सांगायला संकोच वाटतो. अपमान वाटतो. कारण तो जी त्याच्या जीवनाची कहाणी सांगणार आहे ती केवळ दुःखाची, दैन्याची, दास्याची आणि अपमानाचीच मालिका असते. हे सांगणे त्याच्या जीवावर येते. कारण त्याने तसे काही वाचलेले नसते. प्रेमशृंगार, सुखदुःखाचे आणि उच्च किंवा मध्यम वर्गीयांचेच जीवन साहित्यात रंगविलेले असते. साहित्य म्हणचे हे प्रेमशृंगार, स्त्रीसौंदर्याचे वर्णन, सुखदुःखे आणि सुखवस्तू समाजाचे चित्रण.

आणि इथे घोटाळा होतो. त्याचे अनुभव रसात्मक, नाट्यात्मक, भावनोत्कट, जळजळीत असूनही सरस साहित्याचे गुण त्या अनुभवात ठासून भरलेले असूनही तो ते लिहायला कचरतो. त्याला कारण ते अनुभव त्याच्या जातीचे असतात. अन् त्याची जात हिंदु सामाजिक दृष्ट्या हीन मानलेली असते.

तसे पाहिले तर भारतातील सर्व हिंदू लेखकांचे अनुभव व श्रेष्टता पावलेले साहित्य हे त्याच्या जातीचेच वा वर्गाचे अनुभव असतात. पण त्या जातींना वर्गांना प्रतिष्टा असल्यामुळे ते जातीचे वर्गाचे अनुभव प्रतिष्ठित होतात. रससिद्धांत अथवा कलासिद्धांत होतात. पण दलित लेखकाची जात वा वर्ग प्रतिष्ठित नाही म्हणून त्याचे अनुभवही प्रतिष्ठित होत नाहीत.

आणि म्हणून काही तरुण दलित लेखकांना आपले अनुभव सांगण्याचा संकोच वाटतो. ते उत्कृष्ट, उत्कट असूनही त्याला लिहावेसे वाटत नाहीत. त्याला ते हीन वाटतात. म्हणजे जातीचा सामाजिक दर्जा जसा असेल, जेवढा असेल तसा अनुभवाचा दर्जा मानला जातो. म्हणजे वर्णवाद हा वाङ्मयाचा सिद्धांत घडवितो.

पण प्र. ई. सोनकांबळे यांनी इतर कोणाचीही भीडमुर्वत न धरता स्पष्टपणाने आपले आयुष्य सांगितले आहे आणि वर्णव्यवस्थेवर मात केली आहे. जात वा वर्ग माणसाच्या वैचारिक, अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करीत असते हे लक्षात ठेवायला हवे आहे.

८. प्र. ई. सोनकांबळे यांच्या ललित लेखात भुकेची मुख्य भावना आहे आपल्या देशातील वर्णव्यवस्थेने हेतुपूर्वक निर्धन ठेवलल्या, सोयी सवलती नाकारलेल्या जाती मांसभक्षक आहेत. महाराष्ट्रातील महार मांग मृतमांस खात होते. प्र. ई. सोनकांबळे यांनी धीट-

पणाने हे मृतमांस भक्षण करण्याचे वास्तव स्वरूप आपल्या एका लेखात चित्रित केलेले आहे.

मी आणि माझ्या पिढीतील लेखकांनी मृतमांस प्रकरणावर लिहिलेले मला आठवत नाही. त्याला कारण काहींना त्याचा अनुभव नाही आणि काहींना अनुभव असूनही सामाजिक चळवळीच्या दाबामुळे ते सांगण्याचे धाडस होत नाही. पण प्र. ई. ने ते धाडस केले आहे.

आंबेडकरी आंदोलनाने अनेक लहानमोठ्या सामाजिक विषयांवर चळवळी केल्या आहेत. जसे की, जानवे घालणे, जातीचा वेष टाकून देणे, नाव बदलणे, आहार बदलणे, व्यवसाय बदलणे, शिक्षण घेणे, मंदिर प्रवेश, महार वतन, वेठ बिगार, येस्करकी, राजकीय आणि धार्मिक. थोडक्यात म्हणजे जिथेजिथे भेदभाव होतो, ज्यामुळे होतो तेथे तेथे संघर्ष केलेला आहे. मृतमांस भक्षणाविरुद्ध मोटी चळवळ झालेली आहे आणि आंबेडकरी जलसाकारांनी आपल्या कलेद्वारे, कार्यकर्त्यांनी सभा बैटकींद्वारे ती केलेली आहे.

हा गतकाळ कित्येकांना नको असतो. त्यातील दैन्य, अज्ञान आणि लाचारीपासून त्यांना वेदना होतात, शरम वाटते म्हणून ते आग्रहपूर्वक सांगतात की ही जुनी खरकटी आता उजेडात आणू नका. हा जातीचा अपमान आहे.

मृतमांस खाणे हे जसे दैन्याशी संबंधित आहे तसाच त्याला इतिहासदेखील आहे आणि जेव्हा हिंसा करणे धर्मविरोधी झाले तेव्हा अहिंसेचे पालन करणारे मृतमांस खाऊ लागले असे विद्वानांचे म्हणणे आहे.

प्र. ई. सोनकांबळे यांच्या एका ललित लेखात मृतमांसाची घटना वर्णन केलेली आहे. गावात पडे पडते. महारांना ते आणणे भाग पडते, ते आणतात, फाडतोड होऊन ते मास घरोघर शिजते. प्र. ई. च्या मोठ्या बहिणीच्या घरी ते आणले जाते. प्र. ई. तिथे वेगळे होऊन दारिद्र्याचे वर्णन करीत बसत नाहीत. सांगण्याच्या ओघात घटनाच येतात आणि ह्या घटना सर्व स्पष्ट करतात. प्र. ई. ची थोरली बहीण मोठ्या प्रेमाने म्हणते :

बाळ, प्रल्हादा खा की रे...तिला माहीत असते की प्रल्हाद खाऊ शकत नाही. कारण त्याच्या गळ्यात आईने लहानपणीच माळ घातलेली आहे. पण आज पोट भरणार असते, अति कष्ट करून मिळविलेल्या भाकरीच्या कोरभर कुटक्याबरोबर ताटलीभर मास खाऊन पोट भरल्याचे, तृप्तीचे समाधान सर्वांना मिळणार असते. कारण पैसे देऊन घेतल्यामुळे भाकर कोरभरच खर्च करणे भाग आहे. त्यामुळे प्रल्हाद नुसती भाकरी खाऊन अर्धपोटी राहणार आहे. असे अपरंपार दैन्य !

हे कोणी दिले ? ही कधीच पुरी न झालेली भूक कोणी कायम टेवली ? कितीही कष्ट

कले तरी पोटभर अन्न मिळण्याची मारामार. ही कष्टाची किंमत कमी कोणी ठेवली ? आणि त्यामुळे माणसाचेच मोल कवडीकिंमतीचे झाले. हे अधम कृत्य कोणी केले ?

प्र. ई. सोनकांबळे कोठेही भाषण करीत नाहीत. कोठेही थांबून असल्या प्रसंगांना गडद करत नाहीत. नाट्य निर्माण करीत नाहीत. नाट्याच्या रसात्मक, स्फोटक अशा किती तरी घटना त्यांच्या सांगण्यातून येतात. पण ते तिथे कलाकुसर करीत नाहीत. ते सरळपणाने, सहजपणाने मांडत जातात. आणि जेव्हा सांगणे संपलेले असते तेव्हा आपल्या मनाच्या टिकऱ्या उडालेल्या असतात. डोक्यात प्रश्नांचे वादळ उडलेले असते. वृत्ती तापलेल्या असतात. आपण विचारतो असे का ?

या देशात आणि हिंदुधर्माच्या दलित जातीत जन्म घेतला म्हणून एवढे दैन्य, दुःख, दास्य, भूक, अपमान वाट्याला यावेत ?

पण ही असते आपली एका वाचकाची प्रतिक्रिया. प्र. ई. सोनकांबळे त्यांच्या वाचकाची अशी प्रतिक्रिया व्हावी म्हणून काहीही कलाकुसर करत नाहीत.

प्र. ई. सोनकांबळे यांचा पहिला लेख प्रकाशित झाला आणि अनेकांना वाटू लागले, मला तरी वाटले मराठी साहित्याला जीवनाभिमुख करणारा, स्वदेशी करणारा, युग समान करणारा असा समर्थ लेखक उदयाला आला.

९. सोनकांबळे दलित जीवनाची अंतरूपे सहजपणे व्यक्त करतात. आणि हे करताना किती यातना होतात हे मला एक लेखक म्हणून माहीत आहे. पण प्र. ई. ते सहजपणे सांगून जातात. सांगताना त्यांनी कोठे अधिक उणे केलेले आहे. कोठे भडक रंग भरलेले आहेत. कोठे रंग कमी केलेले आहेत असे जाणवत नाही. ते सर्वांकडे, सर्व पात्रांकडे मायाळूपणाने बघतात. त्यांच्या पात्रात कोणी दुष्ट असत नाही. तसेच पतितही असत नाही. खरे म्हणजे पात्र महत्त्वाचे नसतेच. महत्त्व आहे अनुभवाला. एका लहान मुलानी भोगलेल्या अनुभवाला. तो अनुभव पूर्ण करण्यासाठी पात्रे असतात. पण त्यांचे नामोल्लेख किंवा नातीच नसतात. तर घटनेच्या ओघात त्यांचे स्वभावही स्पष्ट होतात. परंतु ही माणसे दुष्ट नसतात. नीच नसतात. गरिबीमुळे ती अधम नसतात तशीच श्रीमंतीमुळे अन्यायी, अत्याचारी झालेली वाटत नाहीत. असे का व्हावे ?

त्याचे एक उत्तर हे संभवते. ते हे की, लेखक प्रचारक नाही. तो फक्त अनुभव सांगतो आहे.

मराठीतील ग्रामीण आणि दलित कथेत जे दैन्य, दुःख व्यक्तविले असते तेच प्र. ई. सोनकांबळेही सांगत असतात. पण या लेखकांच्या लेखनातून वाचकावर परिणाम करण्याचा प्रयत्न दिसतो. म्हणून पात्रांना रंग, रूप, स्वभाव मिळतात. त्यासाठी भाषेचे

अलंकार येतात. प्र. ई. सोनकांबळे असे काही करीत नाहीत. कारण त्यांच्यापुढे त्यांचा वाचक नाही. टीकाकार नाही. आहे ते फक्त अनुभवलेले जीवन. पण कलाशास्त्राच्या नियमापासून लिहिलेल्या कलाकृतीएवढेच हे सहज सांगणे परिणाम करीत असते.

तहान लागली म्हणून लहानगा प्रल्हाद एका खड्ड्यातले साचलेले पाणी पीत असतो. कोणी पाहील की काय ही भीती त्याच्या मनात असते. तो महार आहे ना. जिथे सवर्णांची गुरे पाणी पितात ते पाणी पिऊन तो बाटबीत होता आणि पाणी पीत असताना एक शेतकरी येतो. रोखतो. सांगतो. असे करू नको. पाणी बाटवू नको. मार पडेल.

दुसरी घटना आहे. मित्राचा निरोप घेऊन तो गावी त्याच्या घराकडे निघालेला असतो. आणि मित्राची बहीण नांदायला निघालेली असते. महार आडवा आला. अशुभ आडवे आले असे वाटून सर्वांनाच वाईट वाटते आणि पाऊस, पूर आडवा येऊन त्या मुलीचे सासरी जाणे रद्द होते.

प्र. ई. ही आणि अस्पृश्यतेच्या अशाच आठवणी सहजपणाने सांगतात. त्यांच्यातील संघर्ष वाढवीत नाही. कारण त्या वेळी तो संघर्ष नसतोच. जे येईल ते सहन केले पाहिजे... म्हणून.

भूक लागली की लहानगा प्रल्हाद घळघळा पोटभर पाणी पिऊन पोट भरून घेतो. पण भूक पोटात कायमची आहे. ती भागविण्यासाठी तो मोठ्या बहिणीकडे वाटेल ती कष्टाची कामे करतो. रानावनातून काही आणून पाटील, ब्राह्मणांच्या घरी देतो. अन् भाकर मागतो. पण त्याला कोणीच पोटभर देत नाही. अन् ही भूक कधी भागतच नाही. परीक्षा द्यायला मोठ्या गावात गेलेला प्रल्हाद भूक भागविण्यासाठी संडासाच्या मागे जाऊन तो शिळे कुटके चोरून खातो.

झोपेसाठी गोठा मिळतो. गुरांच्या गोठ्याच्या जवळ झोपावे लागते. ह्या पशूवर बसणाऱ्या माशीचे, गोमाश्यांचे चावे सहन करावे लागतात. अन् त्वचारोग सहन करावे लागतात.

थंडी पडलेली असते. अंगावर पांघरूण नसते. म्हणून उसाची चिपाटे, गवत जिथे असते तिथे आत घुसून झोपतो आणि मारका बैल सुटतो. जवळ त्याला दिसले तर तो मारील हे भय असते. म्हणून लहानगा प्रल्हाद तसाच पडून राहतो. अन् बैल तुडवून जातो...

कुत्र्याच्या तोंडातला मासाचा तुकडा पाहून तो कुत्र्याच्या तोंडातून काढण्याची कल्पना डोक्यात येते. अन् तसा प्रयत्न करताच कुत्रा अंगावर येतो.

केवळ ह्या देशात आम्ही हिंदू म्हणून जन्म घेतला म्हणून एका निष्पाप मुलाला पाप-पुण्याची ज्याच्या मनात जागती जाणीव आहे त्याला पुष्कळ सहन करावे लागते. तो ते सहन करीत राहतो. त्याची ही सहनशीलता संतापेक्षाही मोठी आहे. एकनाथाच्या त्या कौतुक केलेल्या सहनशीलतेचे आणि ह्या आठवणीतील प्रसंगांची तुलना केली तर एकनाथाची सहनशीलता काहीच नसते. त्या घटनेला महत्त्व येते ते एकनाथ नामवंत आणि ब्राह्मण असूनही त्यांच्या अंगावर ते कोणी तरी थुंकत होते. एकनाथ ब्राह्मण नसते तर त्या थुंक्याला तसे महत्त्व प्राप्त झाले नसते. गरिबावर कोणीही थुंकत असतेच.

पोटात सतत भूक आहे. आणि बहीण मटन खाण्याचा आग्रह करते आहे. पण लहानगा प्रल्हाद गळ्यात माळ आहे म्हणून नाकारतो. भूक सहन करतो. हा नकार कोण कमी प्रतीचा म्हणू शकेल ?

आठवणीचे पक्षींमध्ये कथानायकाला अनंत यातना सहन कराव्या लागतात. तो त्या सहन करतो. या यातनांचे स्वरूप दुहेरी आहे. गरिबी आहे. आणि अस्पृश्यता हे एक दुसरे कारण आहे. पण या दोन्हीला कारण आहे वर्ण–व्यवस्था. आणि तिच्यातून विकसित झालेली सरंजामशाही, जी सर्व संपत्ती एकवटून बसलेली आहे. आणि तिने बेकारी, भिकारीपण खालच्या जातींवर लादलेले आहे.

उच्च वर्णांतील मुलावर देखील अशी गरिबी असू शकते. तो प्रल्हादासारख्या उत्कृष्ट गुणाचा असेल तर माधुकरी मागून शिकू शकतो. मान–सन्मान मिळवू शकतो. पण दलित मुलाला प्रल्हादासारखे उत्कृष्ट गुण असूनही आपले नशीब काढणे अवघड होते. कारण अंत्यजाच्या मुलाचे शिकणे हे कर्म नाही. शिकणे हा धर्म नाही. म्हणजे दलित मुलाविरुद्ध केवळ धर्मच नाही तर अर्थसत्ता आणि शासनसत्ताही असते. म्हणजे सर्वच प्रतिकूल असते. पण वरच्या वर्णाच्या मुलाची गरिबी असली तरी त्याला गुणाच्या जोरावर पुढे जाता येते.

जगू बघणाऱ्या, शिकू बघणाऱ्या प्रल्हाद ई. सोनकांबळे यांच्या या आठवणी म्हणजे दलित जीवनाचे करुण नाट्य आहे.

१०. त्यातील कारुण्य जागतिक स्वरूपाचे आहे. त्यांचे जीवन जगातील अनेक थोर लेखकांनी रंगविले आहे. ' ऑलीव्हर ट्विस्ट ', गोर्कीचे ' माझे बालपण ' याचे उदाहरण आपल्याला घेता येईल.

भारतातील हिंदुधर्मीय लेखकात जीवनाचा अनुभव फक्त दलित लेखक घेत असतात. त्यांनी अनुभवलेले दैन्य, दुःख, शोषण हे उच्च वर्णीय हिंदू लेखकाच्या वाट्याला येत नाही.

कारण भारतात भौतिक सुखदुःखाची, गरिबी श्रीमंतीची, विशेषाधिकार आणि निषेधाची, सोयी सवलतींची वाटणी वर्गाप्रमाणे झालेली आहे. भारतातील बरेचशे लेखक हे हिंदू आहेत आणि उच्च वर्गातील आहेत. त्यांचा अनुभव हा त्यांच्या जातीचा अनुभव असतो. त्या अनुभवाला, त्यांच्या प्रश्नाला जागतिक पातळी मिळू शकत नाही. बाल-विधवेला जागतिक पातळी कशी मिळायची ? हुंड्याची गोष्ट जागतिक जनतेला कशी कळायची ? मौंजीबंधनाचे प्रकरण हे जगाला काय कळणार ? हिंदू विधवेच्या दुःखाला जग कशी काय दाद देणार ? विधवेच्या प्रेमाच्या आणि तिला झालेल्या अपत्याचा प्रश्न जगाला कसा कळणार ? आंतरजातीय प्रेम, त्यातील तेढ, त्यातील तिचा वा त्याचा पराक्रम काय हे जगाला पटू शकत नाहीत. हिंदू लेखकांनी निर्माण केलेली ट्रॅजेडी जागतिक ट्रॅजेडीत बसू शकतच नाही.


कारण हे प्रश्न त्यांच्या जातीचे प्रश्न आहेत. वर्गाचे नाही. म्हणून त्यांचे लेखन केवळ हिंदू उच्च वर्णाचे प्रश्न आणि मनोरंजन करणारे लेखन ठरते.

जातीत स्वतःला बंद करून घेणाऱ्या एका लहानशा गटाचेच लेखन असते तर दलित लेखकांचे लेखन जागतिक जनतेचे लेखन असते. दैन्य, दुःख, दास्य, शोषण, कोंडी ही जरी तशी जातीची वाटली तरी ती भारतातील बहुसंख्य जनतेची स्त्री, शूद्र, अतिशूद्र आणि वन्य जातीजमातींचीच जीवनकथा आहे.

दास्य, दुःख, दैन्य, शोषण हे जागतिक समाजात अस्तित्वात आहेत. म्हणून प्र. ई. सोनकांबळे यांच्या आठवणींचे पक्षीतील जीवन हे जगातील श्रमजीवींचे जीवन होऊ शकते. त्यांनी सजीव केलेली भूक जगातील सर्वांना कळू शकते. तात्पर्य हे की दलित लेखकांचे लेखन जागतिक आहे कारण ते जागतिक विषयावरच लिहितात. ते केवळ त्यांच्या जातीचे दुःख नसते. दैन्य नसते. तर जगभर असलेले दुःख, दैन्य, दास्य, शोषण असते.

म्हणून प्र. ई. सोनकांबळे यांचेकडून मी सार्थ अपेक्षा करतो की त्यांनी आम्हाला थोर थोर कथा–कादंबऱ्या द्याव्यात. त्यांना जागतिक कीर्ती मिळेल ही मी त्यांचे आठवणीचे पक्षी वाचून म्हणतोय. अगदी आत्मविश्वासाने म्हणतोय.

•



दलित साहित्याचा
आजचा समर्थ लेखक :
वाबुराव बागूल
मुलाखत : प्रकाश खरात, मुंबई; किरण तांबे

वाबुराव बागूल :
दलित जीवनाचा क्रांतदर्शी भाष्यकार
मुलाखत : प्र. श्री. नेरूरकर

दलित साहित्याचा आजचा समर्थ लेखक : बाबुराव बागूल



९ जुलैच्या रात्री आम्ही बाबुरावांना माटुंगा लेबर कँपातल्या त्यांच्या राहत्या घरी गाठतो. आपण बाहेरच बोलू असं बाबुराव सांगतात. आम्ही तिघेजण गप्पा मारीत 'आरोरा' टॉकीजजवळ येतो. .... तिथल्याच एका निवांत इराण्याच्या हॉटेलात शिरतो. बाबुराव चहा मागवतात.

आम्ही : आपण लेखनाची सुरुवात कधी केलीत ?

बाबुराव : तशी मला बालपणापासून लेखनाची आवड होती. चवथीत असताना मी कविता लिहिली होती. १९५८ साली 'नवयुग'मध्ये माझी पहिली कथा प्रसिद्ध झाली.

आम्ही : त्या वेळेस तुमच्या लेखनाची प्रेरणा कोणती ?

बाबुराव : मी जी माणसं पाहत होतो. जीवन पाहत होतो, त्यावरच मी लिहायचं ठरवलं होतं. एका विशिष्ट भूमिकेतूनच लिहायचं ठरवलं. ही विशिष्ट भूमिका डॉ. आंबेडकर, मार्क्स आणि ज्योतिराव फुले तसेच क्रांतिकारी साहित्याच्या वाचनामुळे झाली होती.

आम्ही : त्या वेळचे तुमचे आवडते भारतीय लेखक ?

बाबुराव : शरच्चंद्र चटर्जी, प्रेमचंद, डॉ. केतकर इत्यादी.

आम्ही : तुम्ही सांगितल्याप्रमाणे धार्मिक, राजकीय व तात्त्विक वाचनाचा तुमच्या लेखनावर काही परिणाम ?

बाबुराव : हो, परिणाम झाला ना ! माझ्या कथा, कवितांतून तो जाणवतोय असे वाटत नाही काय ?

आम्ही : बौद्ध धर्माचा केंद्रबिंदू माणूस आहे. तुम्हीसुद्धा साहित्याचा केंद्रबिंदू माणूस मानता. आम्हांला बौद्ध विचारात आणि तुमच्या विचारात साम्य वाटते.

बाबुराव : हे खरे आहे. बुद्धापासून हा विचार मी घेतला आहे. बुद्ध धर्म हा माणसाला महत्त्व देतो. इतर धर्मांपासून बौद्धधर्म वेगळा आहे. हिंदू, मुस्लिम व खिश्चन ह्या धर्मांनी परमात्मा, आत्मा, पाप, पुण्य, पवित्र हे मानलं आहे. म्हणजे हे साम्य आहे. विषमता ईश्वरनिर्मित असल्याचं हे धर्म सांगतात. त्यांनी विषमतेलाच पावित्र्य दिलं. म्हणून हे धर्म 'बंधु-धर्म' आहेत. आत्मा, परमात्मा न् ईश्वर ह्या गोष्टी बुद्ध-धर्म नाकारतो. तो निरीश्वरवादी, अनात्मवादी आहे. ··· बुद्ध दोन प्रकारचं दुःख, सांगतो. दुःख अहंकार, कामवासना इ. विकारांतून निर्माण होते ··· म्हणून आपल्या वासनाविकारांवर नियंत्रण हा एक दुःखनिरोधाचा मार्ग बुद्धाने सांगितला. हा विचार कुणीही मान्य करील. तसेच दुःख मनुष्यनिर्मित असल्याचं बुद्धानं सांगितलं. परंतु बुद्धानं दुःख देणारा दाखविला नाही ··· दुःख देणारा कार्ल-मार्क्सने दाखविला ··· पिळवणुकीवर आधारलेला समाज, अर्थ-व्यवस्था मार्क्सने दाखविली ··· इथं बुद्ध आणि मार्क्स यांच्यात फरक आहे.

आम्ही : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सच्या विरोधात होते का ?

बाबुराव : बाबासाहेब मार्क्सविरोधी नव्हते. ते एक हिंदु-वर्ण व विचारव्यवस्थेच्या विरोधात होते. ते मार्क्सच्या विरोधात फारसे बोलले नाहीत. मात्र ते हिंदी कम्युनिस्टांच्या विरोधात दोन चारदा बोलले आहेत.

आम्ही : परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या कालखंडात बाबासाहेबांच्या लोकशाही विचाराचा कम्युनिस्ट विरोधात खूप प्रचार झाला. त्याचे कारण काय ?

बाबुराव : बाबासाहेब लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. ते ज्या जनतेचे नेते होते त्यामुळेच त्यांना लोकशाहीचा पुरस्कार करणे प्राणप्रिय होते. कारण लोकशाही

ही कशीही असली तरी ती वर्ण-व्यवस्थेच्या, माणसाला जातीत बसायला भाग पाडणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक, व्यवस्थेच्या विरोधात गेली नाही तर ती लोकशाही नसते. अशी वर्णव्यवस्थेची पाळेमुळे खणून काढणारी लोकशाही त्यांना हवी होती आणि या लोकशाहीला मानसिक व सांस्कृतिक शक्ती प्राप्त व्हावी म्हणून बाबासाहेबांनी अनात्मवादी, अनीश्वरवादी, गतिवादी, बुद्धिप्रामाण्यवादी अशा माणसाला महत्त्व देणाऱ्या बुद्ध धर्माचा स्वीकार केला.

रात्र बरीच झालेली असते. उद्या भेटण्याचं आश्वासन बाबुराव देतात. आम्ही एकमेकांचे निरोप घेऊन निघतो.

संध्याकाळी पाचच्या सुमारास श्री. किरण तांबे 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'च्या संदर्भ विभागात येतो. आम्ही थोडा वेळ वाचन करतो. नंतर भटाकडे जाऊन कॉफी घेतो. बाबुरावांच्या घरी जायला निघतो, तेव्हा धुवाधार पावसाला सुरुवात होते. अतिवृष्टी होते. परंतु आज बाबुरावांची मुलाखत घ्यायचीच अशी आमची जिद्द असते. पावसापाण्यात बस पकडून आम्ही माटुंगा लेबर कँपात येतो. दोघेही भिजून ओलेचिंब झालेले असतो. सुदैवानं बाबुराव घरीच असतात. त्यांची प्रकृती बिघडलेली ··· मुलाखतीस ते फारसे उत्सुक दिसत नाहीत. तरी मी त्यांना बोलण्यास प्रवृत्त करतो. कॉटवर त्यांची दोन लहान मुलं अभ्यास करीत असतात. थोड्या वेळातच आमच्यासाठी गरमागरम चहा येतो. आम्ही उत्तेजित होतो.

आम्ही : तुमच्या कथा प्रक्षोभक व विद्रोही आहेत. विद्रोहाची भावना तुमच्या मनात कशी प्रबळ होत गेली ?

बाबुराव : अस्पृश्यतेच्या जाणिवेतून माझ्या मनात विद्रोही भावना निर्माण झाली. माणूसपणाची जाणीव, हक्काची जाणीव माणसात विद्रोहाची भावना प्रभावी करते. माझ्या कथांमधील नायकांचे मी सूर्याशी वगैरे नाते जोडलेय, कारण त्याला आपल्या मोठेपणाची जाणीव झालेली असते. माझ्या एका कथेतल्या नायकाच्या चैतन्याचा मी निसर्गाशी संबंध जोडला होता. ही जाणीव मला आंबेडकर, मार्क्स, बुद्ध व फुले यांनी करून दिली.

आम्ही : तुमच्या 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहातील 'कवितेचा जन्म' ही कथा मला हृद्य व वेगळी वाटली. ती तुम्हाला कशी सुचली ?

बाबुराव : 'कवितेचा जन्म' ही माझी आत्मकथा आहे.

आम्ही : ती कथा वाचताना माझ्या नजरेसमोर तुमचं व्यक्तिमत्त्व उभं राहिलं.

बाबुराव : त्या कथेतला नायक कविमनाचा आहे...स्वप्न आणि वास्तव यामधील फरक पाहून तो दुभंगलेला आहे. ती कथा म्हणजे कविमनाची तडफड आहे...तशी ती कथा पोएटिक (Poetic) झाली आहे.

आम्ही : आपल्या बौद्ध समाजातीत लोक तुमच्या कथांना विरोध का करतात ?

बाबुराव : बौद्ध समाजात जो नवा मध्यमवर्गीय वृत्तीचा वर्ग आहे, तो आपला दुःखद भूतकाळ विसरू पाहतो आहे. उदाहरणादाखल फडके, खांडेकरांचे स्वप्नरंजनात्मक लेखन त्या वर्गाला अधिक आवडते. अशा तऱ्हेचं स्वप्नरंजनात्मक लेखन पूर्वी बौद्ध समाजातील काही लोकांनी केलं. माझ्या लेखनातील वास्तव हा मध्यमवर्ग स्वीकारीत नाही.

आम्ही : ' दलित साहित्य ' आपण नेमकं कशाला म्हणू ?

बाबुराव : ज्या साहित्याला सम्यक परिवर्तन अभिप्रेत आहे; व जे साहित्य क्रांतीला सामोरं जातं ते ' दलित साहित्य !...'

आम्ही : दलित वर्गातून आलेल्या लेखकांनाच दलित साहित्यिक म्हणायचं का ? दलित साहित्यिकाच्या लेखनालाही आपल्याला गुणवत्तेचा निकष लावावा लागेल.

बाबुराव : दलित वर्गातून आलेले लेखकच दलित साहित्याची निर्मिती करतील असं नाही. तसेच लेखकाची गुणवत्ता व क्रांतिवत्ताही आपल्याला पाहावी लागणार आहे.

आम्ही : दलित–साहित्याचे क्रांतिकारकत्व कशात आहे ?

बाबुराव : साहित्य हे व्यवस्थेशी प्रतिबद्ध असतं. न्याय, कला, संगीत ह्या गोष्टीही व्यवस्थेशी प्रतिबद्ध असतात. गडकऱ्यांची सिंधू व शरच्चंद्रांच्या नायिका हिंदु–संस्कृतीतील आहेत. त्या पूर्वापार रीतिरिवाजाप्रमाणे वागतात. दलित–साहित्य हे व्यवस्थेच्या व परंपरेच्या विरोधात आहे. जशी आर्थिक व सामाजिक व्यवस्था दुःखाचे कारण आहे. आपल्याला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेत बदल हवा आहे.

बाबुरावांना खोकल्याची तीव्र उबळ आल्यामुळे आम्ही एवढ्यावरच थांबतो. बाबुराव आम्हाला निरोप द्यायला येतात...दुसऱ्या दिवशी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागात येण्याचं कबूल करतात.

ठरलेल्या वेळेप्रमाणे किरण चार च्या सुमारास मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागात येतो. बाबुरावांची मुलाखत घ्यायची, या भावनेनं त्याचा उत्साह दुणावलेला

असतो. आम्ही दोघेजण सहा वाजेपर्यंत संदर्भ विभागात वाचन करतो. बाबुराव येत नाहीत असे पाहून आम्ही त्यांच्या घरी जायला निघतो. परंतु आम्ही पाचदहा पावलं चालून जातो, तोच बाबुराव मुंबई मराठी ग्रंथालयाच्या दिशेनं येताना दिसतात...आम्ही आनंदित होतो...थोडा वेळ श्री. वामनराव भटांच्या पुस्तकांच्या दुकानात बसतो... नंतर तिथून निघून दादर फायर-ब्रिगेडच्या विरुद्ध बाजूनं असलेल्या पारश्याच्या हॉटेलात जातो.

आम्ही : मराठीतील एका मान्यवर समीक्षकाने असा विचार मांडला आहे की, संतवाङ्मयाच्या प्राचीन परंपरेशी आपले नाते अतूट आहे. साहित्यपरंपरा ही सर्वस्वी निर्दोष नसते, ती समृद्ध करायची असते. प्राचीन साहित्यपरंपरेशी असलेलं नातं तोडणं हितावह नाही–हा विचार तुम्हाला पटतो का ?

बाबुराव : परंपरेशी असलेलं नातं तोडता येत नाही म्हणजे काय ? परंपरा समृद्ध करायची म्हणजे काय ? आम्ही विटोबाला घरोघरी पोहचवायचं का ? संतांनी आध्यात्मिक समानतेचा प्रचार केला, परंतु त्यांनी सामाजिक समता सांगितली नाही. संतांनी पाप, पुण्य, कर्म व पावित्र्य, जातिभेदाची वैचारिक न् सांस्कृतिक कारणं नाकारली नाहीत. ईश्वराचं अस्तित्व नाकारलं नाही. देवानं लिहिलेले ग्रंथ नाकारले नाही. फक्त ते संस्कृतऐवजी प्राकृतात बोलले. त्यांनी भक्तिमार्गाची शिकवण दिली. त्यांचे बंड फार मर्यादित होते. संतांमध्ये कबीर काय तो बंडखोर होता. तुकाराम थोड्याफार प्रमाणात बंडखोर होता. विचारवंत म्हणून आम्ही संतांना नाकारतो, कवी म्हणून नाही. त्यांची वैचारिक मूल्ये नाकारतो. त्यांच्या काव्याची रसवत्ता नाकारीत नाही. मध्ययुगीन संकल्पना आम्ही स्वीकारीत नाही. कारण आम्हाला जीवन सुसह्य व समृद्ध सुंदर करायचे आहे. अस्पृश्यता नाकारायची आहे. साहित्य परंपरेशी असलेलं नातं आम्ही पूर्णपणे तोडतो असं मात्र नाही.

आम्ही : विद्यमान मराठी साहित्य संकुचित आहे, असं वेळोवेळी सांगतात. मग मराठी साहित्य दलित साहित्यामुळे कसे विशाल व समृद्ध होईल ?

बाबुराव : मराठी साहित्यात मध्यमवर्गीय जीवन जास्त प्रमाणात आहे. मध्यमवर्गीय लेखकांचे संस्कार त्याला कारणीभूत आहेत. आपट्यांपासून स्त्रीचं दुःख साहित्यात आलं परंतु शूद्रांचं दुःख मात्र साहित्यात आलं नाही. ते का आलं नाही ? ख्रिश्चन, यहुदी, न् मुसलमान यांचं जीवन मराठी साहित्यात आलं नाही. लेखकांचे संस्कार त्यांना जीवनाकडे जाऊ देत नाही. व्यापक, भीषण अनुभव मराठी लेखकांनी कधी घेतलाच नाही. बहुसंख्य खलनायक मुसलमानच

आहेत. याचे कारण धर्म–संस्कारामुळे त्यांचे अनुभव-विचार मर्यादित झालेले आहेत. पण हे अनंतकाळ असेच राहील असे मात्र म्हणता येणार नाही. कारण जीवन सारखे बदलत असते. त्या बदलाचे प्रत्यंतर आपणाला येत आहे. उदाहरणादाखल, हिंदु बदलले नसते तर आपले लेखन प्रकाशित होऊ शकले नसते, ते मान्यताही पाऊ शकले नसते.

दलित लेखकांची अनुभव घेण्याची क्षमता अधिक आहे. त्यांच्या मनात माणसाविषयी पूर्वग्रह नाहीत. त्यांच्या लेखनात सम्यक जीवनाचे चित्रण येऊ शकते... म्हणून दलित साहित्यामुळे मराठी साहित्य समृद्ध होईल, असा माझा आशावाद आहे.

आमचे प्रश्न संपलेले असतात. बाबुराव मात्र उत्स्फूर्तपणे बोलतच असतात. आम्ही एकाग्रतेने त्यांचे बोलणे ऐकत असतो. अण्णाभाऊविषयी बोलताना ते म्हणाले, 'कथाकार म्हणून अण्णाभाऊ थोर आहेत. त्यांनी लिहिलेल्या चारपाचशे कथांपैकी शे-दीडशे कथा निःसंशय सर्वोत्कृष्ट आहेत.' स्वतःच्या लेखनाविषयी बोलताना ते म्हणाले, 'गरोदर स्त्री जशी नऊ महिने व नऊ दिवसांनंतर प्रसूत होते, तसेच साहित्यनिर्मितीचे आहे. लेखकाने स्वतःला खूप जपले पाहिजे. आपण साहित्यनिर्मिती करतो म्हणजे प्रतिजीवन घडवीत असतो. ह्या दृष्टीने मी माझ्या लेखनाशी अतिशय प्रामाणिक राहिलो आहे.

रात्र झालेली असते. आम्ही उद्या पुन्हा मुलाखतीसाठी भेटू असे बाबुरावांना सांगून निघतो.

१२ जुलैला शनिवारी पूर्वनियोजित वेळी दुपारी दोन वाजता आम्ही बाबुरावांच्या घरी जातो. बाबुराव घरीच असतात. बाबुरावांचा सर्वांत धाकटा चिरंजीव विनोद ह्याची प्रकृती ठीक नसते. विनोदची आणि किरण तांबेची खूपच गट्टी जमलेली असते. तशी बाबुरावांच्या घरातील सर्व लहानथोर माणसांची आमच्याशी ओळख झालेली असते. आम्ही त्यांच्याशी गप्पा मारतो. बाबुरावांची थोरली कन्या कु. शोभा ही आम्हाला तिच्या वडिलांविषयी बरंचसं सांगते. ते चांगले चित्रकार असल्याचं तसेच एकटे असल्यावर छानपैकी गाणं गुणगुणतात वगैरे वगैरे. बाबुराव छोट्या विनोदला घेऊन दवाखान्यात निघतात. आम्हीही त्यांच्याबरोबर निघतो. दवाखाना थोडासा दूर असतो. आम्ही गप्पा मारीत चालतो.

आम्ही : 'दलित पँथर' चा जन्म कसा झाला ?

बाबुराव : 'दलित पँथर' चा जन्म हा दलितांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचारातून झाला. तसा दलित साहित्याच्या बैचारिकतेनेही दलित पँथरला प्रभावी प्राण

दिला. दलित-पँथरला उठाव राजा ढालेच्या 'साधने'तील लेखाने दिला, परंतु त्या लेखातील राष्ट्रध्वजासंबंधीचे जे खळबळजनक विधान होते त्याला माझा विरोध होता व आताही आहे. तो ध्वज भारतातील साठ कोटी जनतेने आपला राष्ट्र-ध्वज म्हणून स्वीकारला आहे. त्या ध्वजासाठी शेकडो लोक मृत्युमुखी पडले आहेत आणि भारतीय राष्ट्रध्वज घडविण्यात डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे. त्या ध्वजावर असलेले अशोक-चक्र हे बौद्ध-धर्माचे प्रसादचिन्ह आहे. तो ध्वज बौद्ध-धर्माची वैचारिकता विशद करणारा आहे.

आम्ही : अलीकडे दलित-पँथरचे ऐक्य घडविण्याचे प्रयत्न चालू आहेत. दलित-पँथरचे ऐक्य घडेल काय ?

बाबुराव : दलित-पँथरचे ऐक्य घडले तरी त्याला अर्थ नाही. दलित-पँथरला फारसे भवितव्य नाही. ती चळवळ जवळ जवळ संपलेली आहे.

आमची मुलाखात रस्त्यातच चालू झाली असल्याचे लक्षातच आले नाही.

आम्ही : दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारावरच सातत्याने लेखन झाले तर ते एकसुरी होईल अशी भीती व्यक्त केली जाते. तुम्हाला काय वाटते ?

बाबुराव : दलितांच्या अन्याय-अत्याचारावरच सातत्याने लेखन झाले तर ते एकसुरी होईल. परंतु अन्याय-अत्याचारांवर निरनिराळ्या दृष्टिकोनांतून लिहिले गेले तर ते लेखन एकसुरी होणार नाही. केवळ अन्याय-अत्याचारांवर लिहायचे म्हणून काही दलित-साहित्य निर्माण झाले नाही. माझ्या कथा जशा अन्याय-अत्याचारांसंबंधी होत्या; तशाच त्या माणसाचे दुःख व प्रतिकार यांच्याही कथा होत्या.

डॉ. कोप्पेकरांचा दवाखाना बंद असतो. म्हणून आम्ही जवळच्याच 'संदेश' दुग्धालयात जातो. बाबुराव आमच्यासाठी दूध मागवतात. काही वेळानं ल. ग. जोग व बऱ्याच तरुण-तरुणींचा घोळका दुग्धालयात येतो. आमच्या पाठीमागील सीटवर ते सर्वजण बसतात. बाबुरावांकडे श्री. जोगांचे लक्ष नसते. त्यांच्याकडे निर्देश करून बाबुराव सांगतात, 'ते पिकलेल्या केसांचे गृहस्थ आहेत ना, ते रूपारेल कॉलेजचे मराठीचे प्राध्यापक आहेत. त्यांच्यासोबत आलेल्या तरुण-तरुणींशी ते गप्पा मारीत असतात. त्यांच्या बोलण्यात 'संतोषी-माते'चा उल्लेख स्पष्ट ऐकू येतो. बाबुराव विनोदला दवाखान्यात नेतात. डॉ. कोप्पेकर विनोदसाठी औषध देतात...आम्ही घरी निघतो. मध्ये येताच पाऊस लागतो. झोपडपट्टीत पावसाचं पाणी साचतं...आम्ही चिखल तुडवीत, वाट काढीत निघतो. बाबुराव रस्ता दाखवीत असतात. आम्हाला ते झोपडपट्ट्यांनी, माणसांनी गजबजलेला, बकाल गलिच्छ लेबर कँपचा (कुंभारवाडा) विभाग दाखवितात...'एस्ट्रेला बॅटरी'ची इमारत

दाखवून म्हणतात. इथेच पूर्वी आसपास दिवंगत अण्णाभाऊ साठे राहत होते...मग ते टाटा पॉवर हाऊस दाखवितात नि अण्णाभाऊंची ' बरबाद्या कंजारी ' ही कथा जिथे घडली ती झोपडपट्टी दाखवितात. अण्णाभाऊंच्या काही आठवणी सांगतात. नंतर आम्ही सायन–कोळीवाड्याला येतो. तिथली ' आदर्श जनता सहकारी बँक ' ही बौद्ध समाजातील कार्यकर्त्यांनी सुरू केलेली बँक दाखवितात. वठवतात. बँकेचे संचालक श्री. जी. जी. कांबळे, श्री. अहिरे व श्री. रोकडे यांच्याशी आमचा परिचय करून देतात. श्री. कांबळे, अहिरे व रोकडे हे अतिशय प्रामाणिक व उत्साही कार्यकर्ते असल्याचे बाबुराव सांगतात. बाबुराव फिरण्याच्या मूडमध्ये असतात. परंतु आम्हाला मात्र मुलाखत कशी पूर्ण होईल ही चिंता असते. किरण तर फारच अस्वस्थ होतो. तो आपण जवळपास कुठंतरी बसू असं बाबुरावांना सुचवितो. आम्ही जवळच्या ' डॉ. श्रीकांत दोशी गार्डन 'मध्ये मध्यभागी असलेल्या उंच न् मोठ्या विस्तीर्ण टाकीवर बसतो. बाबुराव किरणला पनामा सिगारेटचं पाकीट आणायला सांगतात.

आम्ही : दलित साहित्य कलादृष्ट्या हिणकस आहे अशी टीका केली जाते याबद्दल तुमचे मत काय ? (दलित–साहित्याकडे पुन्हा वळताना)

बाबुराव : दलित साहित्य कलेच्या निकषावर हिणकस ठरतं हा आरोप खोटा आहे. लेखकाच्या सामर्थ्यावर त्याच्या लेखनाची उंची अवलंबून असते. हा आरोप करणाऱ्यांची वर्ण–वर्चस्ववादी वृत्ती दिसून येते. दलित लेखक कलात्मकदृष्ट्या चांगले साहित्य लिहू शकणार नाही असा त्यांचा ग्रह आहे. पुढच्या दलित साहित्यिकांच्या पिढीतून 'वैश्विक-साहित्य' निर्माण होईल अशी मला आशा आहे.

आम्ही : दलित साहित्यिक कसे वैश्विक साहित्याची निर्मिती करतील ?

बाबुराव : साहित्याचा, कलेचा केन्द्रबिंदू ' माणूस ' आहे. माणसाचं सम्यक चित्रण श्रेष्ठ साहित्यात येते. दलित–साहित्य ही अशी एक धारा आहे की, ती लेखकाला माणसाला पाहू देते. बौद्ध–धर्मातसुद्धा ' पाहणे ' हा एक विचार आहे. दलित साहित्य हे माणसाला सम्यक पाहू शकते व त्यांचे सम्यक चित्रण करू शकते. मराठीमध्ये प्रतिभावंत लेखक होऊन गेले. परंतु त्यांचे लेखन संकुचित झाले. दलित साहित्य हे मराठी आणि भारतीय साहित्याच्या विकासाची वैचारिक आणि वाङ्मयीन चळवळ आहे. कलाव्यवस्थेशी संबंधित असते. पारंपारिक कलेचे निकष दलित साहित्याला लावता येणार नाहीत. कारण आजचे निकष हे आजच्या विषमतापूर्ण वैचारिक आणि सामाजिक व्यवस्थेशी निगडित आहेत. परंतु लोकशाही, समाजवादी वैज्ञानिक दृष्टिकोनांतून जे कलाशास्त्र तयार होत आहे त्याच्या कसोटीवर दलित–साहित्यातील काही कलाकृती श्रेष्ठ आहेत हे सिद्ध झालेले आहे.

आम्ही : डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक प्रेरणेतून दलित-साहित्याचा जन्म झाला हे तुम्हाला मान्य आहे ना ?

बाबुराव : (किंचित हसून) हो, आहे ना ?

आम्ही : मग मार्क्सच्या वैचारिकतेचा दलित-साहित्यिक पुरस्कार करतात, त्यासंबंधी तुमचे काय म्हणणे आहे ?

बाबुराव : त्याचे असे आहे. डॉ. आंबेडकर आणि मार्क्स दोघेही दलित जनतेचा विचार करतात. दोघांनाही सम्यक परिवर्तन हवे आहे. फक्त अस्पृश्यतेचा प्रश्न मार्क्सच्या पुढे नव्हता. परंतु आज हे सिद्ध झालेल आहे की, केवळ समाज सुधारण्याने अस्पृश्यता जात नाही. अस्पृश्यता घालवायची असेल तर केवळ समाज बदलून जमणार नाही. तर राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. ' सम्यक क्रांति ' (Right Revolution) म्हणतात ती हीच.

आम्ही : तुम्ही सशस्त्र क्रांतीकडे जाणार आहात काय ?

बाबुराव : क्रांती केवळ शस्त्रानेच होते असे नाही. सत्ता हस्तगत करण्यासाठी लोकशाहीमार्गदेखील उपयोगात येतात. तसेच पार्लमेंटमध्ये क्रांतिकारक कायदे कानून करून समाजामध्ये क्रांतिकारक बदल करता येतो. दुसरी गोष्ट अस्पृश्यता निवारण करायची असेल तर अस्पृश्य व त्याला अस्पृश्य मानतो तो दोघेही एकत्र आले तर अस्पृश्यता नष्ट होईल. परंतु ही मानीव संस्था नष्ट होऊ नये म्हणून दोघांना एकत्र येऊ दिले नाही. रिपब्लिकन पक्षाचे व दलित पँथरचे नेते आपली चळवळ दलित जनतेपासून अलग ठेवतात. अशाने जाति-बंध तुटणार नाहीत. बाबासाहेबांनी लोकशाहीचा पुरस्कार केला व ' शेडुल्डकास्ट फेडरेशन ' विसर्जित केले. याचे कारण जातिसंस्था आणि जातीय संस्था नष्ट व्हाव्यात हा होता. बौद्ध धर्म हा सर्व समावेशक धर्म आहे. त्याचे पालन करण्याचे ठरविले व त्याचा प्रसार करायचा ठरवला तर आम जनतेमध्ये जावे लागते. दलित साहित्य या बाबतीत पुढाकार घेते. हा पुढाकार काही लोकांना कम्युनिस्ट वळणाचा वाटतो.

आम्ही : हे ' काही लोक ' कोण ?

बाबुराव : ते तुमचेच मित्र आहेत. (आम्ही हसतो).

आम्ही : बाबुराव, आपण पुन्हा दलित-पँथरकडे वळू या. दलित-पँथरच्या चळवळीशी तुम्ही संबंधित होता काय ?

बाबुराव : दलित–पँथरचा वैचारिक गाभा दलित–साहित्याने घडविलेला आहे. आणि त्यामध्ये माझा हिस्सा आहे हे तुम्हाला माहिती आहे.

आम्ही : मग तुम्ही दलित–पँथरच्या चळवळीत सहभागी का झाला नाही ?

बाबुराव : मी स्टेजवर दिसलो नाही याचे कारण मी लेखक आहे. आणि लेखन करणे ही माझी सक्रियता आहे हे मी कधीही विसरलेलो नाही, त्यामुळे कोणत्याही प्रसिद्धीच्या मंचावर जाण्याचे मी टाळले. दलित–पँथरचे आजचे नेते हे माझे सहकारी होते. मी संपादित केलेल्या ' आम्ही ' चे सहसंपादन करण्याची जबाबदारी आजच्या वरिष्ठ नेत्यांनी पार पाडलेली आहे. मी दलित–पँथरच्या चळवळीत सहभागी झालो नाही याचे मुख्य कारण दलित–पँथरच्या नेत्यांनी जे कार्यक्षेत्र निवडले होते, ते मला पसंत नव्हते.

आम्ही : ' सूड ' तुम्ही कोणत्या दृष्टिकोनातून लिहिलीत ?

' सूड ' विषयी बोलायचं बाबुराव टाळतात म्हणून पुन्हा प्रश्न विचारावासा वाटला.

बाबुराव : ' सूड ' वर आपल्याला प्रदीर्घ चर्चा करायला हवी. आता तेवढा वेळ नाही. मी तुला पूर्वीच ' सूड ' विषयी सांगितले आहे.

पूर्वी बाबुराव प्रकाशला वडाळ्याच्या ' सिद्धार्थ विहारा 'त भेटले होते. तेव्हा त्यांनी ' सूड ' संबंधी सांगितले होते. ' त्यातील स्वामीजी ' ची व्यक्तिरेखा ही भगवान बुद्धाची व्यक्तिरेखा आहे–असे ते म्हटल्याचे आठवते.

आम्ही : नव्या पिढीतील तरुणांना, कवि-लेखकांना तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

बाबुराव : काही सांगावयाचे नाही.

आम्ही : तुम्ही काही तरी सांगायला हवे.

प्रकाश त्यांना आग्रह करतो.


बाबुराव : वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या मनोवृत्तीचा आपल्यातील नवोदित मध्यमवर्गाने जो स्वीकार केलेला आहे, तो आपल्यातील बुद्धिजीवींनी आणि तरुणांनी नाकारला पाहिजे. ज्या दुःख, दैन्यात आणि वास्तवात ते उभे आहेत, तेथून पळून जाण्याची पलायनवादी वृत्ती त्यांनी टाकून दिली पाहिजे. पळू नका. बदला. हेच आपल्यातील तरुणांना सांगायचे आहे. तसेच ज्या सांस्कृतिक, कौटुंबिक आणि सामाजिक आदर्शाविरुद्ध आंबेडकरी आंदोलन होते, तेच आदर्श आंबेडकरी चळवळीचे नेते आणि कार्यकर्ते व आपल्यातील नवा बुद्धिजीवी वर्ग स्वीकारीत असल्याचे दिसते. तेच ' आंबेडकरी चळवळ ' पुढे नेण्यास मारक आहेत.

रात्रीचे आठ वाजलेले असतात. बाबुरावांना लोणावळ्याला दहाच्या गाडीने रवाना व्हायचे असते. आमची मुलाखत संपलेली असते. आम्ही 'श्रीकांत दोशी उद्याना' मधून बाहेर पडतो. लोणावळ्याला जाण्यासाठी कमलेश्वर, प्र. श्री. नेरूरकर इत्यादी साहित्यिक मंडळी व्ही. टी. स्टेशनवर येणार असल्याचे सांगतात. लोणावळ्याला आम्ही 'दलित साहित्य' भारतव्यापी करण्यासाठी विचारविनिमय करण्यासाठी जाणार आहोत असं ते मनमोकळेपणानं सांगतात. बाबुराव किंग्जसर्कल स्टेशनालगतच्या 'क्रांति' हॉटेलात चहा देतात. पावसाचे टपोरे थेंब पडू लागतात–पावलं जलद गतीनं पडू लागतात. बाबुराव किंचित हसून आमचा निरोप घेतात. आमचे तीन–चार दिवसांचे परिश्रम सार्थकी लागतात. मुलाखतीच्या निमित्ताने बाबुरावांशी असलेले स्नेहसंबंध दृढ होतात. त्यांचे विचार ऐकण्याचा लाभ होतो व त्यांच्यातील विचारवंताचे दर्शन घडते.

•

बाबुराव बागूल :
दलित जीवनाचा
क्रांतदर्शी भाष्यकार

ग्रंथालय ठाणे
23320
निबंध
ठाणे (स्थळ प्रत)



(चित्रकार श्री. दिलीप बडे व बाबुराव यांचं माझ्या घरी अनपेक्षित आगमन. वेळ सकाळची. दिलीप बडे यांनी जवळ जवळ बाबुरावांना त्यांच्या घरून धरून आणलेलं. पहिल्यांदा आमचा बराच वेळ ऐसपैस बोलण्यात जातो.... मूड हळूहळू जमतात....मग बाबुराव म्हणतात, 'मी मराठवाड्यावर लिहितोय त्या 'रिपोर्ताज' पद्धतीच्या कादंबरीची काही प्रकरणे मी तुम्हाला वाचून दाखवतो....' बाबुराव आपले कागद हातात घेतात. बाबुराव खुर्चीत बसलेत. मी आराम खुर्चीत बाबुरावांच्यासमोर बसलोय. माझ्या डाव्या बाजूला दिलीप बडे बसलेत.... बाबुराव आपला 'रिपोर्ताज' वाचताहेत....मग चहा येतो....बाबुराव म्हणतात, भूक लागलीय. काही तरी खायला आणा....आणि स्वयंपाकघरातून आमची स्वयंपाकीण बाई झक्क दोन जेवणाची ताटे घेऊन येते....बाबुराव गाणे गुणगुणत जेवणावर ताव मारतात. गाणे गाणाऱ्या बाबुरावांच्या आवाजात घनांचं घनघोर गर्जित मला जाणवतंय. मला सैगलची आठवण होते. मग आमच्या

तरुणपणातील सैगलचा जमाना आठवू लागतो...जेवणं संपतात... आता बाबुराव ओसरीमात खुर्चीत बसले आहेत...दुपारचे बारा वाजताहेत...मी आता बाबुरावांना प्रश्न विचारण्याच्या 'मूड'मध्ये येतोय...तर ते माझ्या टेबलावरचं 'द न्यूड' हे चित्रकलेवरचं पुस्तक चाळताहेत–आपल्या झब्याचे दोन्ही खिसे चाचपीत पानाची पुडी शोधताहेत... 'न्यूड'मधील पुरुषी व स्त्री–नग्नत्वाच्या सौंदर्याने बाबुराव भारावून गेले आहेत.)

मी : बाबुराव, अगदी तुमचं लहानपण जसं आठवंत तसं मला सांगा पाहू.

बाबुराव : (पान चघळत) सांगतो ना...('न्यूड' चाळताहेत. अंतर्मुख...पुस्तक बंद करून ठेवतात...उठतात. बेसिनमध्ये तोंड साफ करून येतात...एक अर्धं गुणगुण...) कुठून सुरुवात करायची म्हणता... !

मी : लहानपण...

बाबुराव : मी सांगणार आहे ते कसं घेणार तुम्ही...

मी : तुम्ही सांगायला लागा...मी कसेही घेईन. (मी कागद हातात घेतो.)

बाबुराव : माझं गाव नाशिकरोड स्टेशनपासून दोन फर्लांगांवर आहे–देवळालीच्या मिलिटरी कँपाच्या जवळ आहे...म्हणजे स्टेशन...रेल्वे आणि इंडिया सेक्युरिटी प्रेस आणि डिस्ट्रिलरी आणि मिलिटरी कँप ही उद्योगधंदा पुरविणारी केंद्रे माझ्या गावापासून बरीच जवळ आहेत. त्या वेळी ब्रिटिश राज्य होतं व त्या वेळचा निर्धन-समाज जो महार तो येथे नोकरीधंद्याला लागला...बटलर म्हणून...इंडिया सेक्युरिटी प्रेसमध्ये कामगार म्हणून...रेल्वे फलाटावर हमाल म्हणून...आता एक जिल्ह्यामध्ये व नाशिक शहरातील स्टेशन म्हणून त्या जागेला महत्त्व येतं...तसं नाशिकरोडमध्येसुद्धा धान्य खरेदी करून गोदामात ठेवणारे...असे व्यापारी लोक तिथे आले व नाशिकरोडची भरभराट सुरू झाली. गरीब दुबळ्या लोकांना अन्न मिळण्याची सोय उपलब्ध झाली. माझा जन्म होण्याच्या आधी जवळपासच्या गावांमधील महार कुटुंबे येऊन नाशिकरोडला कामगार झाली होती. सेक्युरिटी प्रेसमध्ये. डिस्ट्रिलरीमध्ये. रेल्वेमध्ये. त्याच वेळी शाहूमहाराजांची सत्यशोधक समाजाची एक वैचारिक लाटदेखील समाजामध्ये वावरत होती...

डॉ. आंबेडकर यांनी १९२७ साली महाडला सत्याग्रह केला होता आणि त्या सत्याग्रहाचा प्रकाशच म्हणा प्रत्येक महाराच्या हृदयात आणि मनात पडला होता. त्यामुळे झालं असं की एका आत्मजागृतीची, प्रबोधनाची भावना दलितांमध्ये निर्माण झाली होती. त्या वेळच्या आपल्या हिंदू कास्टममध्ये म्हणा प्रत्येकाचे पोषाख ठरलेले असायचे...

ब्राह्मणांचा एक पोषाख...मराठ्यांचा एक...महारांचा एक असतो...परंतु सत्यशोधक व शाहू महाराजांची चळवळ, १९२७ सालचा सत्याग्रह आणि बाबासाहेबांनी केलेली चळवळ, नोकरीधंदा आणि कायद्याच्या राज्याचा, ब्रिटिश राज्याचा एक दबदबा. हिंदुवर्णवादी...(अनपेक्षितपणे ॲडव्होकेट जयंत गडकरींचं आगमन.)...

दुपार सगळी जयंत गडकरींच्याबरोबर बौद्धिक गप्पागोष्टीत जाते...खाणे पिणे... चहा...पुनः मूड जमतात. (सौम्य संध्याकाळचा शिडकावा सुरू होतो...)

मी : तर बाबुराव तुम्ही इथपर्यंत आला...

बाबुराव : तर कायद्याचं राज्य होतं...हिंदुवर्णवादी व्यवस्थेचं नव्हतं...त्यामुळे काही-तरी मला गोंधळायला होतंय...हां, तर प्रत्येक जातीचे पोषाख ठरलेले असत. तर या पोषाखाविरुद्ध पहिल्यांदा इंडिया सेक्युरिटी प्रेसमध्ये असलेला कामगार होता. त्याने उठाव केला...साधारणपणे त्याच्या पोषाखाचं वर्णन असं...दुटांगी धोतर...कोट...काळी उंच दिवालची टोपी...आणि पायामध्ये बूट असा पोषाख घालायला त्यानं सुरुवात केली. १९२५ च्या दरम्यान नाशिकरोड आणि नाशिक या परिसरामध्ये पतितपावन वर्धेकर बुवा नावाचे एक अतिशय ज्वलज्जहाल... (सुकन्या आगाशे येतात...थोडी बातचीत...) कीर्तनकार, पवाडेकार, फटकेबाज...अतिशय फायरी भाषण करीत असे हा...या परिसरात या बुवाने फार मोठं काम केलं...ह्याने पहिली चळवळ सुरू केली...महारवाड्यातून दिंड्या सुरू केल्या...वारकरी किंवा भागवत धर्माची शिकवण दिली...त्यानंतर या शिकवणी-मुळे लोकांना मांस खाण्याची बंदी करण्यात आली. गावाची जी कामे असतात... महारांची येस्करकीची कामे बंद पडली...आणि चमत्कार असा घडला तिथे की जे महार इंडियन सेक्युरिटी प्रेस, किंवा डिस्ट्रीलरी किंवा मिलिटरी कँपमध्ये नोकरीला होते त्यांनी झटक्यात घराघरात ही कामे सोडून दिली. गावकऱ्यांनी विरोध केला तरी यांनी तो जुमानला नाही. न जुमानण्याचं कारण म्हणजे आर्थिक दृष्ट्या ही मंडळी स्वावलंबी झाली होती. म्हणजे बाबासाहेबांच्यामुळे, पतितपावन बुवांच्यामुळे, शाहूमहाराजांच्या व सत्यशोधक समाजाच्या प्रचारामुळे जी वैचारिक जागृती झाली होती व तिला जी आर्थिक स्वातंत्र्याची जोड मिळाली, यामुळे या परिसरातला महार किंवा दलित समाज सामाजिक चळवळीमध्ये सदैव पुढारी राहिला. नाशिकला १९३० चा जो काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह झाला त्यामध्ये या मंडळीने नेतृत्व दिलं. त्याचा आर्थिक बोजा उचलला. दादासाहेब गायकवाडांच्याबरोबर यानी डोपाडी जाऊन सत्याग्रहाची भूमिका समजावून देण्याचा प्रसार केला. सार्वजनिक म्हणजे सरकारच्या मालकीच्या विहिरी, पाणवठे (जयंतला उद्देशून...हा काळ म्हणजे सत्याग्रहापूर्वीचा दोन तीन वर्षांच्या अगो-

दरच आहे.) पोरांच शाळेत नाव घातलंय...पण मास्तर पोरांना वर्गात बसू देत नाहीत...तर दादासाहेबांनी पायी पायी खेड्यात जाऊन काम केलं...महान कामे केली.

गडकरी : अजून ते चालू आहे का ?

बाबुराव : नाही. ते गेले आणि संपलं...(मला उद्देशून) अशा संघर्षाच्या, चैतन्याच्या व जागृतीच्या कालखंडात माझा जन्म झाला.

मी : म्हणजे किती साली ?

बाबुराव : १९३१...अर्थात आई काय शिकलेली नाही...तीस, एकतीस, बत्तीस... तिहीपैकी काहीही असू शकेल...

मी : तुमचा जन्मदिवस तुम्ही साजरा करता का ?

बाबुराव : मी माझ्या पोरांचासुद्धा करीत नाही...म्हणजे 'सतरा सात' ही जन्म दिवसाची तारीख आहे...म्हणजे ज्यांची जन्मतारीख मिळत नाही त्यांची 'सतरा सात' हीच तारीख मानली जाते...म्हणजे सतरा ही तारीख आणि सात हा महिना.

मी : वडील काय करीत असत ?

बाबुराव : ते सांगतो ना...माझ्या आईची मुले जगत नसत...माझ्या आधीचे चार मुलगे वारलेले होते...त्यामुळे मीही जगेन की नाही याचा तिला भरवसा नव्हता ...तिच्या मुलांच्या मृत्यूची एक पद्धत होती...ती अशी...ती गरोदर राहिली... दिवस भरत आले...की खेळणारं मूल वारत असे...एक गेलं की दुसरं मांडीवर येई...

गडकरी : असं होतं का ?

दि. बडे : असं होतं...

बाबुराव : मी जन्मलो तेव्हा माझा आधीचा भाऊ वारलेला होता. तेव्हा मी जगावं म्हणून माझ्या आईने शेजारच्या गावातल्या मांग समाजातील तिच्या ओळखीच्या बाईच्या ओटीत मला टाकलं. प्रत्येक दिवशी केव्हाना केव्हा मी त्या बाईच्या घरात असे. कारण ती माझी आईच झालेली होती. पण मी आजारी पडू लागलो तेव्हा तिने एका मुसलमान बाईच्या ओटीत मला टाकले.

... : मग तुम्ही काय मुसलमान कुटुंबात वाढलात का ?

बाबुराव : नाही. नाही...त्या मागचा माझ्या आईचा हेतू असा होता की तिचा मातृत्वाचा हक्क मी मरू नये म्हणून तिने सोडलेला होता...भोळी समजूत आहे ही... आणि या दोघींच्या सद्भावना माझ्या पाठीशी मी जगावा म्हणून उभ्या केल्या होत्या. माझे वडील शेतकरी होते. गाईबैलांची त्यांना अतिशय हौस होती. दूध-दुभत्या जनावरांची. विशेषतः बैलांबद्दल त्यांना विशेष आवड होती. त्यामुळे ते वरचेवर बैल बदली करीत असत...या आवडीपायी त्यांच्यावर कर्जही होत असे.

गडकरी : मी एक प्रश्न विचारू का ?...तुमची जमीन होती ती स्वतःची होती की महार वतनाची होती ? आणि ती कशी काय आली ? म्हणजे तिचा सामाजिक संदर्भ...

बाबुराव : (खोकतात)...काय उत्तर देऊ याचं ?...महारवतनाची...पश्चिम महाराष्ट्रा-मध्ये बहुतेक जिल्ह्यातील महार समाजाला वतनी जमीन आहे. तिला ' हाडकी हाडोळी ' किंवा ' हराळी ' अथवा ' महारवतनाची जमीन ' असे म्हणतात. ही जमीन परंपरेने आलेली असते. साधारणपणे एका महारवाड्यासाठी ती तीनशे चारशे बिघे जमीन असते...दोनशे म्हणा...कुठे जास्त असते...कुठे कमी असते...ही जमीन नदीच्या काठी असते...कामाच्या दृष्टीने ती सवर्णांच्या जमिनीपेक्षा कमी कसाची असते. साधारणपणे एका कुटुंबाच्याकडे कमीत कमी ती दहा बारा बिघे असते...

मी : मग तुमची जमीन किती होती ?

बाबुराव : नऊ बिघे होती. कोरडवाहू...

गडकरी : नदीच्या काठी ?

बाबुराव : जमीन वर व नदी खूप खाली. घरी जायचं तर चढउतार करीत जायचं...

मी : मग पुढे ?

बाबुराव : तर माझे वडील ही जमीन कसीत असत व उरलेल्या वेळात ते गाडीबैल घेऊन माल वाहण्याच्या कामाला...कधी कुणाची लाकडं, कधी कुणाचं धान्य...बहुधा व्यापाऱ्यांचं...नेआण करण्यासाठी मजुरीला जात. कधी दूर बागलाण तालुक्याकडे लाकडाच्या वाहतुकीसाठी जात...कधी उंबरगावाकडे...असे वाहतुकीसाठी येत असत...इकडे नाही गेलेत तर गावोगाव गाडी घेऊन फिरत आणि लोकांनी जमवलेली जनावरांची हाडके विकत घ्यायचे आणि गाडी भरून हाडकांच्या व्यापाऱ्यांना विकून टाकायचे. आई कधी गावातल्या शेतकऱ्यांकडे शेतीच्या कामा-

साठी जात असे किंवा स्टेशनावर किंवा रस्त्यावर बसून भाजी किंवा केळी असे काहीतरी विकत असे...शेंगा...(बोलता बोलता 'पूर्वा' मासिकाच्या वाचनात गडप...मध्येच भानावर येऊन)...काय ? झालं लिहून ?...आमच्या गावामध्ये शाळा नव्हती. शेजारच्या देवळाली गावामध्ये महारवाड्याच्या चावडीमध्ये शाळा होती. चवथीची मुले एका कोपऱ्यामध्ये... दुसरीची दुसऱ्या कोपऱ्यामध्ये... तिसरीची तिसऱ्या ..असे चावडीच्या चार कोपऱ्यांमध्ये चार वर्ग भरत असत आणि एक मास्तर या चार आघाड्यांवर हातात छडी घेऊन वावरत असत.

मी : बाबुराव, या शाळेत तुम्हाला एक बालक म्हणून कोणता अनुभव आला ?

बाबुराव : सांगतो...मी लहानपणापासून स्वभावाने मित्रा, बुजरा व संवेदनाक्षम होतो... तेव्हा मास्तर आणि छडी पाहून मी घाबरायचो. तव्येतीनेही अतिशय किरकोळ ...बारीक मान आणि मोठं डोकं...त्यामुळे मला 'डोकमासा' म्हणून मुले चिडवीत असत...तेव्हा माझी शाळा आईच्या लाड कौतुकामुळे व मास्तरांच्या छडीमुळे झालीच नाही.

मी : तर मग तुम्ही पुढे काय केलंत ?

बाबुराव : इकडे तिकडे फिरणे हाच उद्योग...शेतावर, नदीवर पोरांबरोबर जाणं... कधी कधी घरातून जनावरे घेऊन शेतावर किंवा रानात जाणं आणि अधून मधून आजारी पडणं...

मी : कोणता आजार, बाबुराव ?

बाबुराव : काय...लहानपणचा आजार...खरूज म्हणा...हिवताप म्हणा...डोळे येणे ...सर्दी खोकला...

मी : बाबुराव, या वेळी तुमचं घरातलं खाणंपिणं काय होतं ?

बाबुराव : बाजरीची भाकरी, अधूनमधून मटण, दूधसुद्धा...दुधामध्ये भाकरी चुरून खाणं...गूळ, भाकरी आणि तेल...त्याला गुळातेलाचा काढा म्हणतात...तो खायचा...बाकीचं भाजी भाकरी असे...

मी : भात वगैरे ?

बाबुराव : भात फक्त सणावाराला...

मी : बाबुराव, मटण कोणतं खात होता ?

बाबुराव : सगळंच...गोमांस...बैल...बोकड...

मी : जास्त काय असायचं ?

बाबुराव : गोमांस...ते स्वस्त...

मी : अजूनही तुम्ही ते खाता ना बाबुराव ?

बाबुराव : नाही...पुढे जेव्हा समज आली त्या वेळी अनेकांबरोबर मी मांसमच्छी खाण्याचं सोडून दिलं होतं...कारण ब्राह्मणाचं अनुकरण...

मी : बाबुराव, ब्राह्मण इथे मध्येच कुठे आला ? त्याचं अनुकरण कसं काय ?

बाबुराव : सांगतो...ब्राह्मण हा त्या वेळेस सांस्कृतिक व धार्मिक सत्तेचा प्रमुख होता आणि समाज नेहमी सत्ताधाऱ्यांचंच अनुकरण करीत असतो...

मी : असं असेल तर बहुजनसमाज शाकाहारी व्हायला हवा होता.

बाबुराव : या प्रश्नाचं उत्तर देऊ का ? आमच्या रहाळात पतितपावन बुवा यांनी जो प्रचार केला होता त्यामुळेसुद्धा मासमच्छी खाण्याचे अनेकांनी सोडलेले होते. हा काळच मुळी सर्वत्र आपली जात सोडण्याचा किंवा आपल्या जातीचे संस्कार सोडण्याचा म्हणजे एकजातीय होण्याचा काळ होता. या कालखंडातच लोकांनी जानवे घालायला सुरुवात केली होती.

मी : महारांनी ?

बाबुराव : हो...महार मांग चांभार इत्यादींनी...विशेषतः महारांनी...

मी : जानवे घालण्याचा अर्थ काय बाबुराव ?

बाबुराव : मटण मच्छी न खाणे एवढाच त्याचा अर्थ...बाबासाहेबांनी आपल्या 'शूद्र पूर्वी कोण होते ?' या ग्रंथात जानवी घालण्याच्या अधिकारापासून वंचित केलेले जे लोक ते म्हणजे शूद्र असा मुद्दा खूप विस्तृत प्रमाणात मांडलेला आहे. तर केवळ जानवे घालण्याचीच नव्हे तर नाव, आडनाव बदलण्याची व मुलांना शिक्षण देण्याची, स्वतः शिकण्याचीच आणि ग्रामीण जीवनापासून सुटून औद्योगिक जीवनात शिरण्याची एक लाटच आलेली होती.

मी : या पार्श्वभूमीवर तुम्ही लहानाचे मोठे होत होता बाबुराव ... नेमके कोणते संस्कार घेऊन ... सांगू शकाल का ?

बाबुराव : आठवून सांगता येईल ते ... परंतु माझं गाव हे रेल्वे स्टेशनापासून व नव्याने बांधल्या गेलेल्या या औद्योगिक केन्द्रापासून जवळ असल्यामुळे, गाव-

गाड्याच्या विरोधात, महारपणाच्या विरोधात, एक बंडाची भावना वावरत होती. आंबेडकरी विचाराच्या प्रेरणेने अनेक लोककवी, जलसाकार, जलसा घेऊन प्रचार करीत होते. काळाराम मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहामुळे या बंडखोरीला एक धार आलेली होती. तेव्हा खेडोपाडी महार मराठे अशा मारामाऱ्यांना ऊत आलेला होता आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे महार कमी पडत नव्हते. हरत नव्हते. एक मोठं चैतन्यच आणि शौर्यपूर्ण बंडावा महाराठायी निर्माण झालेला होता.

मी : अशा एखाद्या मारामारीत तुम्ही भाग घेतला होता का ?

बाबुराव : नाही ... पण मी मारामारी पाहिली.

मी : कुठे ? कशी ?

बाबुराव : एके दिवशी बाबासाहेबांची किंवा दादासाहेबांची सभा असावी. तेव्हा त्या सभेची घोषणा देत आमच्या गावचे लोक येत होते. त्यांना पलीकडल्या गावातल्या देशमुख मराठ्यांनी अडवलं आणि घोषणा देऊ नका म्हणून सांगितलं.

मी : त्या घोषणा कोणत्या होत्या आणि पुढे काय घडलं, बाबुराव ?

बाबुराव : इन्कलाब झिन्दाबाद ! थोडे दिनमें भीमराज ! तरुण पार्टी झिन्दाबाद ! डॉक्टर आंबेडकरांचा विजय असो. अशा प्रकारच्या या घोषणा होत्या. या घोषणांमध्ये काँग्रेसविरोधीही घोषणा उठत असत. बहुधा काँग्रेसविरोधी घोषणा दिल्यामुळेच त्यांना अडविले असावे. हे लोक थोडेच होते व अडविणारे अधिक होते ··· तरी यांनी त्यांच्याशी यशस्वीपणे सामना दिला व आनंदाने परत आले. मार लागल्याचं त्यांना दुःख नव्हतं. उलट लढ्याचा आनंद होता ··· दुसरी गोष्ट मला आठवते ... आमच्या गावापासूनच खाली म्हणजे मुंबई रेल्वे रस्त्यावर घोटी नावाचं रेल्वे स्टेशन आहे. तिथे त्या रहाळातील महार मंडळींनी भंडारा घातला होता.

मी : भंडारा घालणे म्हणजे काय असतं ?

बाबुराव : गावोगावच्या जास्तीत जास्त लोकांना आमंत्रणे पाठवून किंवा चिठ्ठ्या फाडून बोलावलेले असते.

मी : कशासाठी ?

बाबुराव : येथे सर्वांना जेवण केलेले असते...

मी : जेवण कोणतं ?

बाबुराव : गहू भरडून गूळ पाणी आणि तेल टाकून हे गहू शिजवलेले असतात. ... तोंडी लावायला उसळ किंवा तिखट पदार्थ केलेला असतो. पत्रावळ्यांवर हे जेवण वाढलं जातं ... संध्याकाळी ... नंतर सभा होत असते ... सभेमध्ये बाबासाहेबांचे विचार पुढारी मंडळी सांगत असत. भाषणानंतर जलशाचा कार्यक्रम होत असतो ... या सर्व कार्यक्रमाला भंडारा म्हणायचं. मग सगळे लोक निघून जातात.

मी : बाबुराव ...

बाबुराव : थांबा ... एक आठवण मी सांगत होतो ... भंडाऱ्याचं जेवण झालं आणि पतितपावन बुवांनी अतिशय प्रक्षोभक भाषण केलं ...

मी : हे बुवा स्पृश्य समाजातील होते का ?

बाबुराव : नाही ... ते अस्पृश्य समाजातील होते. ... बी. ए. झालेले ... गोरा ... अतिशय देखणा ... ऐकणारे लोक बुवांच्या भाषणाने अगदी पेटून गेले होते. परत जाताना काही लोक माऱ्यामाऱ्या करीत गेले. बुवा त्या गावातच राहिले होते आणि बुवांच्या भाषणामुळे बिथरलेली गावकरी मंडळी आणि भंडाऱ्याहून परत जाणाऱ्या लोकांनी चिडवलेली मंडळी त्या गावात आली होती. त्यांनी बुवाला पकडले. मारले आणि झाडाला बांधून टाकले. ही वार्ता रातोरात सर्वत्र पसरली आणि सर्व भागातून लोक बुवांच्या सोडवणुकीसाठी गेले आणि त्यांनी बुवांना सोडून आणले.

मी : हे दृश्य तुम्ही लहानपणी पाहिलंत ?

बाबुराव : नाही. ऐकलंय ... आठवण झाली म्हणून दुसरं दादासाहेब गायकवाडांच्या-संबंधी सांगू काय ?

मी : सांगा ना.

बाबुराव : तर एक सार्वजनिक विहीर होती ... त्या गावचं नाव आठवत नाही मला ... या विहिरीवर पाणी भरुन. सार्वजनिक पाणवठ्यावर आपला पाणी भरण्याचा हक्क प्रस्थापित करायचे महार समाजाने ठरविले होते. दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली नाशिकरोड परिसरातील आणि आजूबाजूच्या गावातील आणि त्या गावातील ... मंडळी तेथे जमली. सभा झाली. आणि मोर्चा नेला. त्या विहिरी-कडे निघालो. १९२४ साली रावबहादुर बोले यांनी मुंबई कौन्सिलमध्ये जो ठराव आणला होता त्यातूनच १९२७ ते १९३० व पुढचे अनेक सत्याग्रह त्या

ठरावाच्या बळाने किंवा प्रेरणेने झालेले आहेत ... तर मंडळी मोर्चाने निघाली होती. तर तिकडे गावच्या पाटलाने आजूबाजूच्या गावची मंडळी जमवून विहिरीच्या संरक्षणाकरिता आणली होती ... पोलिसांच्या लक्षात ही कुणकुण आलेली असावी ... गडबड होण्याची ... त्यामुळे एका बाजूला मोर्चाने पुढे चाललेली सत्याग्रही मंडळी, दुसऱ्या बाजूने सत्याग्रहाची विरोधी मंडळी ... आणि विहिरीजवळ पोलिस पार्टी ... यांनी पाणी भरविण्याचे ठरविले होते व त्यांनी पाणी न भरू देण्याचे ठरविले होते.

मी : हं ...

बाबुराव : त्यामुळे दोन्हेही अटीतटीला येऊन मोठी मारामारी झडणार होती. पोलिस फौजदारांच्या लक्षात हे आल्यामुळे त्यांनी दोन्ही पार्ट्यांना विहिरीजवळ येऊ न देता थोपूवन धरले होते. दादासाहेब आवाज चढवून म्हणाले, 'पाटील, आम्ही सत्याग्रह करणार आहोत' ... ते ऐकून पाटील तिकडून ओरडून म्हणाला, 'आम्ही सत्याग्रह करू देणार नाही ...' (बाबुराव ओरडून सांगतात) तेव्हा दादासाहेब म्हणाले, 'रावसाहेब बोले यांनी ठराव मांडलेला आहे व तो सरकारने पास केलेला आहे ...' पाटील म्हणाले, 'सरकारी कायद्यापेक्षा धर्माचा आणि देवाचा कायदा भारी असतो. म्हणून तुम्हाला विहिरीवर पाणी भरता येणार नाही ...' काय मी सांगू सारा संवाद ?

मी : सांगा ना ...

बाबुराव : तर इकडून दादासाहेबांचा आवाज आला ... 'आम्ही देवाचा धर्माचा कायदा मानीत नाही... आम्ही पाणी भरणार' ... पाटील म्हणाले, 'आम्ही भरू देणार नाही.' तेव्हा दादासाहेब म्हणाले, 'मंडळींनो चला ... म्हणा डॉक्टर आंबेडकर की जय ... इन्किलाब ...' आणि मंडळी पुढे झाली. दोन्ही बाजूची. तेव्हा फौजदार पाटलाला म्हणाला, 'पाटील, तुम्हाला या मंडळींना रोखता येणार नाही. तसा कायदा आहे. ही विहीर सार्वजनिक आहे. त्यांना रोखणे म्हणजे कायदाभंग करणे ... आम्ही तुम्हाला पकडू शकतो. ... पाटीलकी काढून घेऊ शकतो. ... हे ऐकून पाटील थंड झाले ... आपली मंडळी घेऊन निघून गेले ... तर असे गावोगाव सामाजिक सुधारणेच्या, सामाजिक लोकशाहीच्या, समतेच्या व सांस्कृतिक क्रांतीच्या ध्येयवादाने आंबेडकरी आंदोलनातील आग पिऊन मंडळी लढत होती. कोणालाच कशाही प्रकारचे भय वाटत नव्हते.

मी : ते कसे काय बाबुराव ?

बाबुराव : त्याची दोन कारणे होती. एक ब्रिटिश सत्तेचं परकेपण. दुसरे निःपक्षपातीपण ... आणि आपल्या लढ्याबद्दल आत्यंतिक निष्ठा. ही मनोवृत्ती कम्युनिझमने किंवा कामगारक्रांतीने झपाटलेल्या कार्यकर्त्यांच्या मनोवृत्तीसारखीच होती ...

मी : बाबुराव, त्या वेळी तुम्ही कुमार वयात होता ... तुमच्या मनामध्ये त्या काळात कोणती आंदोलने उमटत होती सांगाल का ?

बाबुराव : मला तुमच्या प्रश्नाचं उत्तर देताना एक गोष्ट आठवते ... तेव्हा मी मराठी चवथीत होतो ... आणि कविता म्हणा की गाणी म्हणा लिहिण्याचा प्रयत्न करीत होतो.

मी : चवथीत असताना ...

बाबुराव : हुं.

मी : ही प्रेरणा तुम्हाला कशी काय झाली ?

बाबुराव : आमच्या शेजारी ओळखीचे महार मास्तर होते. त्यांचे नाव शेजवळ. ते अशी सामाजिक गाणी लिहीत असत. त्यांची गाणी मी म्हणत असे. गुणगुणत असे. त्या वेळेस तो काळच असा चैतन्याचा होता की अनेक लोक गाणी लिहीत असत. कविता लिहीत असत. जिथून तिथून कानावर गाणीच गाणी येत असत.

मी : कोणती गाणी ?

बाबुराव : हिंदुवर्णव्यवस्थेने केलेल्या अन्यायाच्या जाणिवेची. डॉ. आंबेडकरांच्या जय-जयकाराची. माणुसकीचा हक्क प्रस्थापित करण्याच्या लढ्याची. समतेच्या प्रस्थापनेची आणि क्रांतीचा जयजयकार करणारी अशी गाणी असायची.

मी : एखादं दुसरं गाणं आठवत का बाबुराव तुम्हाला ?

बाबुराव : (आठवीत) ... हे गाणं पाहा असे आहे... बाबासाहेब दिल्लीहून आलेले आहेत आणि लोकांनी त्यांच्या सभेला जावं असं कवीला सांगायचं आहे ... ह्यातील दोन ओळी मला आठवतात ... (बाबुराव गाणे गाऊ लागतात).

भीम दिल्लीहून आले ।
चला की सभेला ॥

किंवा

माणुसकीच्या हक्कासाठी ।

(आठवत ... कसल्या बेड्या तोड ... बुचकळ्यात पडलेले ... लिहा ... धर्माच्या

बंड्या तोड तोड रे ... समतेच्यासाठी ... जोड जोड रे ...) मला धड आठवत नाही ... जोड जोड रे ... तोड तोड रे ... मोड मोड रे ... असं काही आहे ...

मी : तुम्ही काय लिहीत होता ?

बाबुराव : हां. तर या गाण्याच्या महापुरात मी सापडलो होतो. कानावर व मनावर बाबासाहेबांच्या चळवळीचे आघात होत होते आणि मी थोडासा तल्लख मनोवृत्तीचा असल्यामुळे व पोरांचा पुढारी असल्यामुळे एक दिवस मी गाणे लिहिले.

मी : एक मिनिट ... तुम्ही पोरांचे पुढारी कसे झालात बाबुराव ?

बाबुराव : पुढारीपण म्हणजे काय ? ... थोडासा धावण्यात पहिला आणि बोलण्यात वाचाळ ... समज थोडी अधिक होती. त्यामुळे पोरांच्या टोळीमध्ये मी पुढे असे. मलाही पोरांच्या पुढे जाण्याची हौस असे. या वेळी मी जे पहिलं गाणं लिहिलं ते असं होतं ... अरे कृष्णा, तू पांडवांना मदत केलीस आणि कौरव पांडवांच्या लढ्यामध्ये त्यांना विजयी केलेस. पण आमच्या लढाईमध्ये तू आम्हाला काही मदत करीत नाहीस.

असा काहीतरी त्या गाण्याचा मतलब होता आणि हे गाणं शेजवळ मास्तरांना आवडलं होतं.

मी : चवथी यत्ता पूर्ण केलीत का बाबुराव ?

बाबुराव : हो. मी व्ह. फा. पास झालो. त्यानंतर इंग्रजी शिकायला एका वर्षात दोन इयत्ता करून दादर विद्या मंदिरात दाखल झालो...

मी : ही केव्हाची गोष्ट ...

बाबुराव : तेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळून गेलं होतं ... १९४७ साल होतं... त्या वेळी व्ह. फा. ... १९४८ साली ... (क्षणभर स्तब्ध)

मी : १९४८ साली तुम्ही विद्यामंदिरात दाखल झाला आणि पुढे कुठंवर गेलात ?

बाबुराव : तर मी...स्वातंत्र्य नुकतंच मिळालं होतं...हरिजनांचे प्रश्न घेतले जात होते तर शाळेने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ' हरिजन दिन ' साजरा करायचा ठरवलं होतं असं मला आठवतं...तर आमचे प्रिन्सिपॉल शर्टाच्या बाह्या वर करून व हातात झाडू घेऊन मुलं लघ्वीसाठी वापरत होते ते संडास साफ करीत होते आणि आम्ही मुले आजूबाजूला होतो. मला या प्रकारचं हसूं यायला लागलं म्हणून मी व माझे दोन मित्र आम्ही खाली उतरून गेलो. आम्ही खाली उतरत असताना आमच्या वर्गशिक्षकांच्या लक्षात ही गोष्ट आली. ते काही

म्हणाले नाहीत. पण दुसऱ्या दिवशी मात्र त्यांनी मला विचारलं. मी उत्तर दिल की एक दिवसाच्या झाडू मारण्यानं काय होणार आहे ? आणि प्रिन्सिपॉलनी दुरून संडास झाडले आणि प्यूनने पाणी टाकल्यामुळे हरिजन दिन कसा काय साजरा होणार ? खरं म्हणजे माझ्या मनात त्या वेळी असंतोष व राग होता. पण मी काय फारसं बोललो नाही. शांत राहिलो. आमच्या त्या शिक्षकांनी...ते गांधीवादी होते...आम्हाला एक व्याख्यान झोडले. त्या शिक्षकांचं हे भाषण आणि ते संडास साफ करणं जरी मला आवडलं नाही तरी या शिक्षकांनी एकदा सांगितलेली गोष्ट माझ्या मनावर कायमचा परिणाम करून राहिली आहे. गरीब किंवा शेडयूल्ड कास्ट विद्यार्थ्यांना द्यावयाची स्कॉलरशिप मला मिळाली होती. पैसे खिशात होते. मला वाचनाची लहानपणापासून आवड म्हणून तिथे काही पुस्तकं घ्यायची मी ठरविली होती. रस्त्यावरची. आणि आमच्या शिक्षकांनी एक भाषण करून आम्हाला सांगितले, ' मुलांनो, तुम्हाला आता स्कॉलरशिप मिळाली आहे. तर या पैशांचं तुम्ही काय करणार ? ' मी काय करणार होतो हे मी सांगायला तयार होतो. पण त्यांनी मला न विचारता किंवा कुणालाच न विचारता बोलायला सुरुवात केली... ' तुम्ही कदाचित कपडे घ्याल, सिनेमा पाहाल, मिलवाल्याचे कपडे जर तुम्ही घेतलेत तर ज्याच्याकडे फार पैसा आहे, त्याच्याकडे तुमचे पैसे जातील. पण तुमच्यासारखे गरीब, खेड्या-पाड्यातले, हातमाग चालविणारे, यांच्या हातमागाचे जर तुम्ही कापड घेतलेत तर ते पैसे त्या गरिबांना मिळतील व एक दोन दिवस त्यांच्या संसाराला तुम्ही मदत केल्याचं श्रेय तुम्हाला मिळेल. ' मी खादी वापरायला जे लागलो किंवा आताही खादीचे जे दोन तीन जोड ठेवतो, त्याची कारणं त्या शिक्षकांनी केलेले ते भाषण...

मी : बाबुराव, ते शिक्षक, व त्याचं व्यक्तिमत्त्व तुम्हाला आठवते का ?

बाबुराव : आठवतं ना. आजही ते मराठीतले प्रसिद्ध कवी प्रफुल्लदत्त म्हणून ओळखले जातात. ते आमचे शिक्षक होते. नंतर मी ज्या लेबर कॅम्पात राहत होतो तिथे अधून मधून आपल्या विद्यार्थ्यांना भेटायला येत असत. तिथे मीही त्यांना भेटत होतो.

मी : बाबुराव, लेबर कॅम्पमधील जीवन तुम्ही जगलात ?...मला आठवतं, एका इंग्रजी वर्तमानपत्रकाराने, माटुंगा लेबर कॅम्पचं वर्णन ' मुंबई नगरीतील महानरक ' असं केलेलं होतं...या नरकाचा अनुभव तुम्ही लहानपणापासूनच घेत आलात...आणि पुढे मराठीतील प्रस्थापित कथालेखनाला जो तुम्ही लेबर कॅम्पमधील मानवी पात्रे तुमच्या कथांमधून आणून हादरा दिलात...ते त्या वेळचं तुमचं जीवन...

अनुभवप्रक्रिया... तुमच्या अंतःकरणात घोंघावणारी वादळं सांगू शकाल का ?

बाबुराव : (स्मृतीत खोल जात...) लेबर कॅम्प ही तेव्हा बकाल वस्ती होती. मुंबईमध्ये या कामगारवस्त्यांची काही वैशिष्ट्ये आहेत. म्हणजे अगदी इतिहासात जाऊन जर आपण पाहिलं तर लेबर कॅम्प्स म्हणजे मुंबईची रचना करण्यासाठी इथला एखादा मुकादम खेड्यात जात असे. आपल्या जातीपातीची नात्यागोत्यातली माणसे गोळा करून मुंबईला आणीत असे...रस्ते, पूल, इमारती, अंडरग्राऊंड गटारे इत्यादी मुंबईचं जे बांधकाम चाललं होतं...ते या मजुरांच्या टोळ्या काम करीत असत. या मजुरांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये महार मजूर असायचे. यांच्या बॉम्बे पोर्ट ट्रस्टने किंवा म्युनिसिपालिटीने बांधलेल्या तात्पुरत्या वसाहती म्हणजे लेबर कॅम्प. जुनी माणसे सांगतात की या चाळी काही टिकाणी चटईच्या होत्या. जुने लोक त्यांचा उल्लेख ' चटई चाळी ' म्हणूनच करतात. मी राहत आहे हे लेबर कॅम्प पूर्वी आताचं सायन हॉस्पिटल आहे, त्या जागेवर होतं. नंतर ते १९३५ साली म्युनिसिपालिटीने त्या पत्र्यांच्या चाळीचं लेबर कॅम्प बांधलं तेव्हा तिथले रहिवाशी इकडे आले. यांना आठवड्याला एक रुपया भाडं होतं. मी जेव्हा लेबर कॅम्पात आलो तो पहिला दिवस मला चांगला आठवतो. वेळ तेव्हा संध्याकाळची होती. अंधार पडलेला होता. रस्ता खडी टाकून केलेला होता. बाजूला एक मोठा मातीचा ढीग होता. त्याच्यावर मुंग्यांचं वारूळ का काहीतरी होतं आणि बाजूलाच एक खुर्ची टाकून एक कार्यकर्ता मोठमोठ्याने ओरडून भाषण करीत होता. त्याच्या बाजूला भला मोठा लालबावटा घेऊन एकजण दुसऱ्या बाजूला उभा होता. पुष्कळ लोक उभे राहून भाषण ऐकत होते. गिरणी कामगारांच्या कुठल्या तरी सार्वत्रिक संपाचा प्रचार चालला होता. मी हळूहळू पुढे गेलो होतो. भाषण मला समजले नव्हते आणि आता आठवतही नाही. परंतु ' इन्किलाब झिन्दाबाद 'च्या घोषणा मात्र मला समजल्या. कारण नाशिकच्या परिसरातील माझे नातेवाईकसुद्धा दादासाहेब गायकवाडांची किंवा दुसरी सभा संपली म्हणजे ' इन्किलाब 'च्या घोषणा देत...

मी : तो प्रसंग तुम्ही सांगितलाच आहे...पुढे मग तुम्ही कसे दिवस काढलेत ?

बाबुराव : तर लेबर कॅम्पाचं माझं हे पहिलं दर्शन...त्यानंतर लेबर कॅम्पाची अनेक न मिटणारी चित्रे माझ्या मनात आहेत. उदाहरणादाखल लेबर कॅम्पामध्ये राहणारे सर्व लोक जातीने महार. जवळ जवळ सर्वजण बाबासाहेबांचे अनुयायी. कामगार म्हणून डांगे, कम्युनिस्ट पार्टी, लालबावटा, यांची माहिती असलेले. त्यांची मतं ऐकलेली असं असूनही यांच्यात महार म्हणून किंवा कामगार म्हणून तशी एकजूट नव्हती. नाशिक, नगरचे लोक एकमेकांशी वैर करून होते. त्यांच्यात नेहमीच

रक्तपाती माऱ्यामाऱ्या होत असत. सातारा, नगरचे लोक यांच्यात आपसात नेहमी मारामाऱ्या. म्हणजे प्रत्येक जिल्ह्यातील लोक दुसऱ्या जिल्ह्यातील लोकांशी झगडत. एकमेकांची डोकी फोडत. कोर्टदरबार, पोलीस करीत बसत. तर मारामाऱ्यांची वर्णने मोठी भयंकर...एका जिल्ह्याची दुसऱ्या जिल्ह्याशी मारामारी सुरू झाली की एका चाळीवरून दुसऱ्या चाळीवर दगड फेकायला सुरुवात व्हायची. शिगा काठ्यांचा सर्रास उपयोग व्हायचा. नंतर पोलिस येत आणि लोकांना पकडून घेऊन जात. मला तेव्हा या मारामारीचे कारण कळत नसे. आता कळते, मारामारी करण्याला कारणीभूत या प्रत्येक जिल्ह्यातील मवाली असत. त्यात कुणाचा सट्टा, बिर्टींग, पटाडा असे अवैध धंदे करीत. त्यासाठी मवाली पोरांची टोळकी जवळ बाळगीत. यांच्या धंद्यावरून मारामाऱ्या होत. आता असं दोन जातींच्या किंवा जमातीच्याच मारामाऱ्या होतात तशा त्या होत असत. पण तेव्हा या मारामाऱ्या वरचेवर होत असत. कशावरूनही होत असत. कदाचिक त्या वेळी आलेली आर्थिक मंदी आणि बेकारी हीसुद्धा त्याला कारण असू शकेल. काळ साधारण १९३६ ते १९३८ हा आहे.

मी : म्हणजे बाबुराव दुसऱ्या महायुद्धाचे वारे त्याच काळात वाहू लागले होते... हिटलरचा उदोउदो चालला होता...आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे पर्वही एक नवे क्रांतिकारी वळण घेत होते...पण या जाणिवा कदाचित त्या तुमच्या वयात तुमच्या मनात चाळवल्या नसतील. होय ना ?...की तुम्हाला तशी कोणती अस्पष्ट जाणीव होत होती... ?

बाबुराव : नाही...या काळामध्ये हिटलर वगैरेंची नावे कानांवर पडत होती. स्टालिनचं नाव कानावर पडत होतं. कारण लेबर कॅम्प तसा जागृत कामगार विभाग आहे. कम्युनिस्ट पार्टीचं तिथं मोठं युनिट होतं. शाहीर अण्णाभाऊ साठे आणखी इतर कम्युनिस्ट कार्यकर्ते तिथे काम करताना आढळत होते. अण्णाभाऊंचं एक चित्र मला आठवतंय. मोठं कपाळ, मोठं डोकं. अस्ताव्यस्त पडलेले केस. बसलेले गाल. एकदम. त्यामुळे लांबोळा दिसणारा चेहरा. बारीक मान. अंगावर अर्धा सील्कचा शर्ट. दुटांगी धोतर. असे सडपातळ अंगाचे. एकदम सडपातळ. हाडकुळे म्हणाना. असे अण्णाभाऊ तेव्हा दिसत. अण्णाभाऊंच्याबरोबर नेहमी त्यांच्यापेक्षा लहान व मोठ्याही माणसांचा घोळका असे. अण्णाभाऊ फार चांगल्या गोष्टी सांगत. हे त्या वेळचे अण्णाभाऊ तर इकडे आंबेडकरी चळवळीतले भीमराव कर्डक यांचे जलसे, कांबळेंचा जलसा, अडांगलेचा जलसा, शाहीर घेगडे यांचा जलसा हे कार्यक्रम अधून मधून होत असत. कम्युनिस्ट पार्टीच्या व बाबासाहेबांच्या पक्षाच्या सभा होत असत...दोन्ही चाळींच्यामध्ये जो रस्ता आहे

त्यावरच या सभा होत, त्यामुळे बहुतेक सभांनाच मी अगदी लहानपणापासून हजर असे...

मी : बाबुराव, या काळात तुम्ही बाबासाहेबांना कधी जवळून पाहिलेत का ?

बाबुराव : या काळामध्ये बाबासाहेब फारच महान पुढारी होते आणि एकदा ते लेबर कॅम्पात आले होते. पण माझ्यासारख्या मुलाला त्यांच्याजवळ जाणे शक्य नव्हते. दुरून दिसणारे बाबासाहेब मी पाहिले. दादासाहेब गायकवाडांना मात्र मी अगदी जवळून पाहिले.

मी : ते कसे काय ?

बाबुराव : एकदा ते त्यांच्या नातेवाइकाकडे आले होते. बहुधा उन्हाळ्याचे दिवस असावेत. तेव्हा अंगाबाहेर शर्ट काढून पायरीवर ते उघड्या अंगाने बसले होते. मी नि माझे वडील कुठूनतरी येत होतो. माझ्या वडिलांचं लक्ष गेलं. त्यांनी दादासाहेबांना नमस्कार केला आणि मला म्हणाले, ' हे पाहा दादासाहेब गायकवाड बसलेले आहेत.' मी पाहिलं आणि मी व वडील दादासाहेब बसले होते तिथे गेलो. वडील मला म्हणाले, ' त्यांच्या पाया पड.' मी काही त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं नाही. वडिलांना राग आला. मलाही वाईट वाटलं. दादासाहेब काय म्हणाले ते आता मला पुरेसे आठवत नाही. पण ते काहीतरी बोलले होते. ते हसले. त्यांचं ते हसणं चांगलं होतं. त्यांच्या त्या हसण्याचा परिणाम आजही माझ्या मनावर टिकून आहे.

मी : या काळातील तुमचं घरगुती जीवन कसं होतं बाबुराव ?... म्हणजे तुमची आई, वडील, भावंडे...घरात तुमच्यावर कोणते बरेवाईट संस्कार होत होते ?

बाबुराव : (खोल विचार करीत) अं...अं...नेरूरकर...खरं म्हणजे माझे आई-वडील गावी होते...मध्यंतरी बोलताना मी सांगितलं की माझ्या आईची मुले जगत नसत...म्हणून तिने मला ओटीत टाकलं होतं...मी जगावा म्हणून...हं ...त्यामुळे एक माझ्यावर आईपणाचा हक्क सांगू शकेल...मातृत्वाचा हक्क सांगू शकेल...ती म्हणजे मातंग समाजातील माझी पहिली...किंवा दुसरी आई...त्यानंतर माझ्या आईची मैत्रीण असलेली मुसलमान बाई...आणि तिसरी म्हणजे माझ्या आईची धाकटी बहीण...मावशी...ही माझी चवथी आई... एकूण चौघीजणींचा माझ्यावर आईपणाचा हक्क आहे...तर माझी मावशी मला मुंबईला घेऊन आली. त्या वेळेस माझे मामा वारलेले होते. त्यांना एकच मुलगी झाली. ती जी आता माझी बायको आहे ती. तिचं आणि माझं लग्न मी मराठी चवथीत असताना झालं.

मी : त्या वेळी तुमचं वय किती होतं बाबुराव ?

बाबुराव : चवथीतल्या मुलाचं वय ते नेमकं सांगता येणार नाही ... एक तर माझी जन्मतारीख निश्चित नाही ... आणि मला शाळेत पहिलीत किंवा बेगारीमध्ये कितव्या वयाला घातलं होतं हे मला नक्की सांगता येणार नाही ... मी एखाद्या शेतकऱ्यासारखं तुम्हाला सांगतोय ... एखाद्या घटनेवरून ... (बाबुराव क्षण-भर थांबतात व मला प्रश्न विचारतात) ... हा बॉम्बस्फोट केव्हा झाला होता ... ?

मी : मुंबईत गोदी विभागात झालेला ... होय ना ?

बाबुराव : हुं.

मी : मला वाटतं ते १९४५ साल असावं ... एप्रिल महिना ... मी त्या वेळी नाग-पूरला माझ्या काकांकडे होतो ...

बाबुराव : त्या वेळी मी मराठी शाळेत होतो आणि माझं लग्न झालेलं होतं ... म्हणजे साधारणपणे १९४४ साली ते झालेलं असावं ...

मी : बाबुराव, या एवढ्या कोवळ्या वयात हा वैवाहिक जीवनाचा अनुभव तुम्ही कसा काय पेललात ... मोकळेपणाने सांगू शकाल का ?

बाबुराव : (खळखळून खास बाबुरावी पद्धतीचं निरागस निर्मळ हसतात ... अंतर्मुख) ... हं ... (अडचणीत सापडलेले) आम्ही एकत्र खेळत होतो. (पुनः स्तब्ध) ज्या दिवशी किंवा जेव्हा आमचं लग्न झालं ... लग्न नाशिकला झालं ... आमच्या खेडेगावाला ...

मी : काय नाव त्या गावाचं...

बाबुराव : विहीतगाव...

मी : पुढे...

बाबुराव : तेव्हा आम्ही दोघेही संगतीच बाहेर जात होतो.

मी : तिचं वय किती होतं बाबुराव ?

बाबुराव : पाच सहा वर्षांची होती असेल तर ... ती अंगाने बाळसेदार होती ... मी मात्र अंगाने हाडकुळा होतो. तेव्हा माझ्या नात्यातल्या बायका बोलत, ' पोराला पोर भारी होणार ... प्वार फाट्यावानी ... आणि पोर कणगीवानी ... कसं व्हायचं ? ... ' त्यांना आमच्या पुढील वैवाहिक जीवनाची काळजी असायची.

(रविवार : बाबुरावांची मी दिवसभर वाट पाहतोय. बाबुराव अचानक दुपारी उपटतात.

मी नुकताच जेवून झोपी गेलेला. दाराची बेल किणकिणतच राहते. माझी पत्नी दार उघडते. पण मी झोपलेलाच. बाबुराव आल्याचं ती सांगते. मी मरगळलेला. कसाबसा उठतो. देह आणि मन दिवसभराच्या रिकामपणाने वेडंपिसं झालेलं ... पिचपिचलेलं... बाबुराव माझ्या अभ्यासिकेत वर्तमानपत्र वाचत बसलेले. मी तोंड बिंड धुऊन ताजातवाना होतो. खुर्ची घेऊन बाबुरावांच्या समोर बसतो. दोघांचेही मूड जड झालेले. हळूहळू वातावरण निवळू लागतं. उगीच इकड तिकडच्या गप्पा ... चहापाणी ... कुणीतरी मित्र त्याचवेळी येतात ... पुनः मैफल ... मी कावलेला ... डोक्यात तयार होऊन राहिलेल्या मुलाखतीच्या चौकटी सगळ्या विसकटून जातात ... शेवटी पुनः आम्ही अभ्यासिकेत दोघेच उरतो ... साडेसहा वाजायला आलेले ... मूड जमतायेत ... आणि पुनः बेल किणकिणते ... कुणीतरी येतोच ... तरुण कवी ... लेखक ... तर पुनः काही काळ जातो ... नंतर एकदाची मुलाखात सुरू होतेसं वाटतंय ...)

मी : तुम्ही काय केलेत पुढे मग ?

बाबुराव : तेव्हा मी बारा चौदा वर्षांचा असणार नाही का ? मराठी चवथीत होतो मी ... तर ... आता मला सांगता येईल की ही जी वडील मंडळी आम्हा दोघांची तुलना करीत होती या तुलनेतून त्यांना एक 'सेक्स' किंवा 'सेक्सलाईफ' बद्दल सूचित करायचं होतं. मीही त्या वेळी लहान होतो आणि तीही त्या वेळी लहान होती. लग्न झालेला मुलगा मी पाचवीच्या वर्गात बसून अभ्यास करीत असे. आणि लग्न झालेली मुलगी पायात जोडवी आणि गळ्यात मंगळसूत्र घालून पाटीपेन्सिल घेऊन शाळेत जात होती ... कपाळाला कुंकू ... माझी बायको तशी बुद्धीने आणि शरीरानेही 'डल्' आहे. त्यामुळे आमची दोघांची अशी जर तुलना केली तर मी विजेसारखा चपळ आहे. ती आपली मात्र गतिशून्य व जमिनीसारखी थंड आहे.

मी : बाबुराव हे तुम्ही विधान करताना सौ. बाबुराव इथे हवी होती.

बाबुराव : (हसून) ती माझ्यावर रागावणार नाही. आपला नवरा फार मोठा आहे या भाराखालीच ती दबलेली असते.

मी : लहानपणापासूनच बाबुराव तुम्हाला स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधाकडे पाहण्याची निरोगी दृष्टी प्राप्त झाली आहे असे मी म्हणू का ?

बाबुराव : (बाबुराव कागद घेऊन चित्र रेखाटतात व बोलतात) ... लहानपणीच लग्न झाल्यामुळे या संबंधाकडे पाहण्याची दृष्टी निरोगी अथवा विकृत होते असं काही म्हणता येणार नाही. तसं पाहायला गेलं तर मी मावशीकडे मुंबई शहरात होतो. मी लहान. बायकोही लहान. एकाच खोलीमध्ये आम्ही दोघेही अगदी

लहानपणापासून वावरतोय. परंतु असे असतानाही क्रांतिकारक चळवळीची आवड मी हायस्कूलमध्ये शिकत असतानाच माझ्या ठायी निर्माण झाली. म्हणजे वयाच्या सोळाव्या किंवा अठराव्या वर्षी. नवरा म्हणून वावरण्याऐवजी ... वावरणे म्हणा काही म्हणा ... मी क्रांतिकारक चळवळीकडे ओढला गेलो. आता ही गोष्ट खरी आहे. मी शिकत असतानाच मॅक्झिम गॉर्की, लेनिन, आंबेडकर, मार्क्स यांची पुस्तके वाचत होतो आणि त्याचबरोबर एका नुकत्याच वयात आलेल्या मुलीचा नवराही होतो.

मी : मग नवऱ्याची भूमिका तुम्ही कशी वठवीत होता ?

बाबुराव : (खळखळून हसतात... विचारात पडतात... बराच वेळ शांतता ...) हा प्रश्न जरा अवघडच आहे तो... असा. हे साल एकोणीसशे बावन्न चौपनचं आहे. त्या वेळी या काळात कवितेने क्रांतीने, तत्वज्ञान आणि साहित्य यांनी मी झपाटलेला होतो. शेड्यूल्डकास्ट फेडरेशनच्या सभा ... कम्युनिस्ट पार्टीच्या सभा ... सोशॅलिस्ट पार्टीच्या सभा ... सभांना मी जात होतो आणि मी खूप वाचीत होतो. त्याच वेळेला मी एक ' युवक संगर पथक ' अशी तरुणांची संघटना काढलेली होती आणि आम्ही काहीजण मिळून सशस्त्र क्रांती कशी करावी याचा विचार मैदानात बसून करीत होते. बॉम्ब बनविण्याची प्रक्रिया यासंबंधी वाचतानाही आम्ही विचार करीत असू. माझ्या एक मित्राने बॉंब कसा बनवावा हे सांगितलं होतं. फिल्मची गुंडाळी, ब्लेडचे तुकडे, सुरुंगाची दारू आणि वात हे एका कोड्यात किंवा कशात घालून वात बाहेर ठेवायची. मग आपण स्वतःच पेटवून कुणाच्या तरी अंगावर फेकायची ... म्हणजे स्फोट होईल ... तर असे विचार ... त्याचबरोबर राजकारणाचा व तत्त्वज्ञानाचाही विचार आम्ही करीत असू. पण आम्हा सर्वांना विशेष त्रास देणारा एक सवाल असे तो म्हणजे खेड्यापाड्यात दलित स्त्रियांवर होणारा अत्याचार. त्यावर आमचा एक इलाज ठरलेला असे ... की ज्या गावामध्ये असा अत्याचार होतो ते गाव पेटवून द्यावे.

मी : बाबुराव, देश या काळात स्वतंत्र झालेला होता... पंडित नेहरूसारखे राष्ट्रनेते झळाळत होते...तर तुम्हाला सशस्त्र क्रांतीची गरज का वाटत होती ? स्वातंत्र्याने हळूहळू दलितांचे शोषितांचे प्रश्न सुटतील असे तुम्हाला वाटत नव्हते काय ?

बाबुराव : देशाला स्वातंत्र्य जेव्हा मिळालं तेव्हा मी व्ह. फा. पास होऊन एका वर्षात दोन इंग्रजी यत्ता करीत होतो. परंतु अति वाचनामुळे असेल किंवा लग्न झाल्यामुळे असेल किंवा माझ्या बुद्धीप्रमाणे किंवा जी काही माझी मानसिक रचना असेल त्याप्रमाणे मी फार लवकर पाहायला शिकलो. त्यामुळे माझ्या मनात

अनेक प्रश्न निर्माण होत आणि मला भंडावून किंवा सतावून सोडीत. एका वेगळ्या कौटुंबिक किंवा सांस्कृतिक वातावरणात मी असतो तर कदाचित मी संन्यासीही झालो असतो. एकदा मी संन्यासी होण्यासाठी घरातून पळून गेलो होतो आणि आताच मला माझं आश्चर्य वाटतं...संन्यासी होणे हे मला तेव्हा अगदी निरर्थक वाटले होते. म्हणून इगतपुरीच्या डोंगरावर जाऊन राहण्याच्या-ऐवजी मी परत मुंबईत आलो.

मी : हं...हं...आणि काय केलेत...

बाबुराव : आणि मी तसा अगदी लहानपणापासूनच ' ॲक्टिव्ह ' होतो. प्रारंभी मी शेडुल्डकास्ट फेडरेशनच्या पक्ष म्हणून ज्या काही हालचाली होत त्यामध्ये भाग घेत असे. वाचनाची सवय लहानपणापासूनच असल्यामुळे प्रौढांशी वादविवाद करीत असे आणि अनेक वेळा त्यांना थक्क करीत असे. अंबिका बेहेरे यांनी गार्कीच्या गोष्टींच्या अनुवादाचे केलेले छोटेसे पुस्तक... त्यातील ' सव्वीस जणांची जीवनलता ' अशी काही तरी कथा...तर या पाचसहा गोष्टींचं पुस्तक माझ्या वाचनात आलं आणि मार्क्सवाद...म्हणजे मार्क्स, लेनिन यांची पुस्तके व पार्टीवाङ्मय वाचण्याकडे माझा कल झाला. हे सुद्धा मी सतरा अठरा वर्षांचा असताना...वाचता वाचता मी कम्युनिस्ट चळवळीकडे खेचला गेलो. केव्हा तरी कविता लिहीत होतो व सारखा अतिशय बेचैन होत होतो. अण्णाभाऊ साठे, गव्हाणकर, अमरशेख हे केव्हा तरी लेबरकॅम्पमध्ये येत असत...लेबर-कॅम्पात अण्णाभाऊ तेव्हा राहतच असत...ही फारच मोठी माणसे...म्हणून यांच्याजवळ मी जात नसे...पण त्यांची गाणी, पोवाडे ऐकत असे...अण्णाभाऊ साठेंच्या पहिल्या तमाशाचा... अकलेची गोष्ट...जो पहिला प्रयोग चाळीच्या-समोर झाला होता तो मी पाहिला होता. स्टॅलिनग्राडच्या पोवाड्याच्या तालमी मी ऐकलेल्या आहेत...अण्णाभाऊ साठेंनी बंगालच्या दुष्काळावर लिहिलेला पोवाडा...तो रचत असतानाही मी ऐकला होता.

(बाबुराव गाऊन दाखवितात...अण्णाभाऊंच्या ढंगाने....)

बंगाल मारीतो हाका । भारतीय युवका ॥
उठा आता धरा त्याला सावरून ।
सर्व जनतेचे ऐक्य उभारून ॥
निराशा दुर्बलता झुगारून...जी...जी...जी ॥

तो दुष्काळ कधी पडला हो ?

मी : १९४३ साली.

बाबुराव : त्या वेळी अण्णाभाऊ साठे आणि पार्टीचे तिथले कार्यकर्ते अण्णाभाऊंचा हा

पोवाडा चाळीच्या एका टोकाला म्हणत आणि दुसऱ्या टोकापर्यंत बंगालला मदत म्हणून कपडे धान्य पैसे गोळा करीत असत. आणि या टोळीबरोबर मी फिरत असे...कोणतं तरी आकर्षण म्हणून... अस्वल आल्यावर पोरं जातात ना त्याच्यामागून... पण अस्वलाचा दाखला हा इथे बरोबर नाही...कारण तो त्या वेळची माझी मनोरचना निश्चित करू शकणार नाही.

मी : त्या वेळी तुम्ही बंगालच्या संदर्भात काही वाचलं होतं का ?

बाबुराव : बंगालच्या दुष्काळाबद्दल माहिती देणारं वाङ्मय फक्त कम्युनिस्ट पार्टीकडे किंवा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांकडेच मिळत होतं.

मी : त्याचवेळी उर्दू लेखक कृष्णचंद्र यांच्या बंगालवरील कादंबरीचा 'अन्नदाता' म्हणून मराठीत अनुवाद झाला होता. तो तुम्ही वाचला होता का ?

बाबुराव : हां...तर 'अन्नदाता' ही कादंबरी मी वाचलेली आहे. पण ती नेमकी केव्हा वाचली हे मला आठवत नाही. परंतु मुल्कराज आनंद, सरदार जाफरी, कृष्णचंद्र, बलराज सहानी, अण्णाभाऊ साठे, अमरशेख, गव्हाणकर, जांभेकर, अशी पुष्कळशी नावे माझ्या परिचयाची झाली होती. बलराज तेव्हा लेबरकॅम्पमध्ये... मला साल नेमके आठवत नाही...येऊन राहिले होते. ही गोष्ट पुढल्या काळातील आहे. पण कवी शंकर शैलेन्द्र...जो शैलेन्द्र नावाने पुढे गाजला... हाही लेबरकॅम्पमध्ये राहत होता. अगदी त्याला नाव नव्हतं. प्रसिद्धी नव्हती तेव्हापासून मी त्याला पाहत होतो. लेबरकॅम्पमध्ये राहून मी फार मोठमोठी माणसे लेबरकॅम्पमध्येच पाहिली आणि याला कारण ती लेबरकॅम्पमधील कम्युनिस्ट पार्टी होती. लेडी माऊंटबॅटन, लेबरकॅम्पमध्ये आली होती. बंगालचे अनेक मोठे कवी लेबरकॅम्पमध्ये येऊन कार्यक्रम करून गेले आहेत. कॉम्रेड डांगे, रणदिवे आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पार्टीतील अनेक पुढारी लेबरकॅम्पला भेट देऊन गेलेले आहेत... गद्दर पार्टीचा महान पुढारी पृथ्वीसिंग...कामामारू ही ऐतिहासिक बोट...त्याच्या हाताशी मी लेबरकॅम्पात हात मिळविला आहे.

मी : बाबुराव, या काळात तुमचा मित्रपरिवार कोणत्या स्वरूपाचा होता ?

बाबुराव : या वेळेस मी डिसिल्व्हा हायस्कूलच्या मैदानाजवळील पब्लिक लायब्ररीत वाचन करीत असे.

मी : मग...

बाबुराव : इथे तसे माझे जीवाभावाचे मित्र फार कमी होते. लेबरकॅम्पातले माझे बालमित्रही आता कमी झाले होते. कुठल्या तरी एका मानसिक अवस्थेमध्ये मी

सापडलेला होतो. खिन्नता आणि लढवय्येपणा अशी काहीतरी विचित्र मनःस्थिती त्या वेळी माझी होती. कविता लिहाव्यात असेही वाटत होते आणि सशस्त्र क्रांती करावी असेही वाटत होते.

मी : बाबुराव, या प्रारंभकाळात तुम्ही केलेली एखादी कविता आठवते का तुम्हाला ?

बाबुराव : या काळामध्ये मी अक्षरशः दिवसेन्‌दिवस कवितेत राहत होतो आणि दिवसाला आश्चर्य वाटेल इतक्या मोठ्या संख्येने कविता लिहीत होतो. अशी एक कविता आठवते.

मी उभा आहे इथे हॅम्लेटसारखा
आणि माझ्यापुढे पसरला आहे प्रचंड माळ
दिसत नाही शत्रू मला
आणि मित्रही
पुलाखालून वाहून जावे जग
तसा वेळ (बाः काळ की काहीतरी) वाहून जात आहे
मी मात्र पुलाप्रमाणेच निश्चल.

दुसरी एक कविता मला आठवते...बंदुकीवर मी कविता लिहिली होती...

मी हाका मारतोय तुला
हे अदृश्य
उकळते माझे अंतःकरण
आणि होताहेत आतमध्ये स्फोट
अरे स्वातन्त्र्य,
जवळ तरी ये
हे महारवाडे बघ, हे दैन्य बघ, हे दास्य बघ, हे दुःख बघ
पण स्वातंत्र्य अदृश्यच !

अशी एक...पुढे काही तरी असे आहे की,

अरे ती माझी बंदुक तरी द्या
नाही तर ती तुक्याची वीणा तरी द्या
गावी गावी जाईन म्हणतो...
या वीणेवर क्रांतीची कीर्तने गाईन म्हणतो

असं काही तरी आठवत मला...

हे माणसा, देवधर्मदेशापेक्षा तू महान आहेस
तुझ्याच घामाचे प्राण घेऊन हे प्राणवान झाले आहेत

मी : प्राणवान ?...

बाबुराव : सजीव या अर्थाने... असे काहीतरी आहे... दुसऱ्या एका कवितेच्या ओळी आठवताहेत मला...

हे माझे हात युगायुगाचे बंदिस्त
तरीही भारताचे भाग्य विधाते आहेत
तुक्याच्या साऱ्या हाका आणि आक्रोश
आणि महाकवीच्या साऱ्या स्वप्नांचे माझे हात
उद्‌गाते आहेत.
हे माझे प्रज्ञावंत, प्रलयकारी हात, हे स्वातंत्र्या
तू क्रियाशील कर
आणि युगायुगाच्या तृष्णा दूर कर

(हसून) खूपच आठवायला लागलं हो मला.

मी : थांबा, मी थोपवून धरतो तुम्हाला. (बाबुराव पुनः खळखळून हसतात.) तर मग या काळात तुम्हाला म्हणण्यासारखा जवळचा किंवा जिव्हाळ्याचा मित्र नव्हता ?

बाबुराव : नव्हता. (पुनः कागदावर चित्र रेखाटीत) त्या अवस्थेचं खरंच वर्णन करता येत नाही, नेरूरकर, इतका मी विकल, व्याकुळ व निर्मितिक्षम अवस्थेत होतो. कवितेने आणि विचाराने माझे डोळे गच्च भरून गेलेले होते. गंगोत्रीतून जसा सतत पाण्याचा ओघ वाहत असतो तसे माझे मन विचाराने, कवितांनी गच्च भरलेले असे. गोष्टी लिहाव्यात, नाटके लिहावीत, कविता लिहाव्यात, कादंबऱ्या लिहाव्यात, भाषणे करावीत, क्रांती करावी... खूप काही काही करावे असे सारखे मला वाटत होते. परंतु हे सांगण्याची, हे बोलण्याची सोय मला लेबर-कॅम्पात नव्हती. माझे मित्र मी ज्या बौद्धिक किंवा मानसिक अवस्थेत होतो तिथपर्यंत पोचलेले नव्हते. माझ्या कुटुंबात मला ओळखणारे कुणीच नव्हते.

मी : म्हणजे कुटुंबात राहून तुम्ही परकीच होता का ?

बाबुराव : कुटुंबात आणि वस्तीत आणि समाजात आणि मित्रांत राहूनही मी परका पडत चाललो होतो. मार्ग एकच होता... मी मला कोंडून घेणे... माझ्या मनात चाललेलं वादळ... माझ्या ज्ञानाच्या आणि इतर ज्या काही तृष्णा आहेत... वाङ्मयीन... त्या गोठवून टाकणे... आणि कामगाराच्या मुलाचे एक रद्दी निरर्थक आयुष्य स्वीकारणे आवश्यक होते... आणि माझी अवस्था तेव्हा तुकारामाच्या प्रारंभीच्या अभंगामध्ये जी तगमग, तळमळ, उलझन दिसते, तशी

होती. इथे कोणातरी जाणत्या ज्ञान आणि काव्य यांच्याशी परिचय असलेल्या माणसाची आवश्यकता होती. म्हणजे तो माझ्या कविता पाहू शकला असता. माझ्या कथा ऐकू शकला असता. माझ्याशी चर्चा करून माझा प्रभाव व माझी सरस्वती (भूमी अंतर्गत वाहणारी) कशी वाहत आहे हे त्याने मला सांगितले असते. परंतु असा मित्र... मार्गदर्शक... ऐकून घेणारा वाचक... श्रावक म्हणाना... मला माझ्या त्या अत्यंत बेचैनीच्या... म्हणजे तीव्र गतीने चाललेल्या निर्मितीच्या काळात मिळालेला नाही, नेरूरकर, हे दुःख खरोखरच फार अफाट व अपार आहे. हे एकाकीपणही व एकटेपणही असह्य असं होतं. मी जर माझ्या बुद्धीचा वापर केला नसता तर वेडा झालो असतो अथवा आत्महत्या करून मेलो असतो. माझ्या त्या अवस्थेचं वर्णन मी कुठेही वाचलं नाही. किंवा मीही लिहू शकलो नाही. पण 'कवितेचा जन्म' या माझ्या कथेत माझ्या मनःस्थितीचं अल्पसं चित्रण आलेलं आहे.

मी : पहिली कथा कोणती लिहिली बाबुराव तुम्ही... सांगू शकाल का ?

बाबुराव : सांगता येईल... कॉम्रेड सुखदेव निकम यांची बायको माझी चुलत बहीण आहे. हे कम्पॉझिटर होते आणि जय गुजराथ प्रेसमध्ये कामाला होते. व्यंकटेश वकील हे हॉटेलवाले तांबे यांचे 'आहार' नावाचे मासिक चालवीत होते. या मासिकाच्या दिवाळी अंकासाठी माझी एक गोष्ट कॉम्रेड सुखदेव निकम हे घेऊन गेले आणि व्यंकटेश वकील यांनी ती गोष्ट छापली. काय गोष्टीच नाव होतं ?... 'दौलत'... वाटतं (विचारात गढलेले)... ही माझी छापलेली पहिली गोष्ट...

मी : ही संग्रहात आलीय का गोष्ट ?

बाबुराव : ती सापडलीच नाही मला...

मी : किती साल ?

बाबुराव : साल मला आठवत नाही. पण १९५२ च्या अगोदरची गोष्ट. पण त्या अगोदर मी कितीतरी वह्या भरून गोष्टी लिहिल्या होत्या आणि फाडूनही टाकल्या होत्या. ह्या 'आहार' मध्ये छापलेल्या गोष्टीमध्ये काव्य आणि तत्त्वज्ञान यांचा मिलाफ झालेला होता. माणूस देवधर्म व देशापेक्षाही मोठा असतो हा विचार त्या गोष्टीतून व्यक्त झालेला होता. 'काचेच्या तावदानावर दगड मारावा तेव्हा जशी काच खळकन खाली पडते तशी त्याने मारलेल्या हाकेने पहाट खळकन खाली पडली...' अशा वाक्याने त्या गोष्टीची काहीतरी सुरुवात आहे. कुठेतरी एक वाक्य अजूनही मला असं आठवतंय... 'तो ओरडला आणि गाढवाच्या

पाठीवर काठीचा रट्टा दिल्यावर जशी त्याची पाठ वाकते तशी तो ओरडल्याने दुपारची पाठ कचकन वाकली...' (बाबुराव गाढवाची पाठ कशी वाकते ते हाताने दाखवतात) ... अशा तऱ्हेची अनेक वाक्ये त्या गोष्टीत होती... 'त्याने हाक मारली आणि सूर्य गडबडून गेला व पश्चिमेकडे पळू लागला...' माणूस आणि निसर्ग यामध्ये निसर्गापेक्षा माणूस मोठा आहे असे त्या कथेमध्ये ध्वनित करण्याचा मी प्रयत्न केला आहे...

मी : या तुमच्या पहिल्या कथेच्या पहिल्या वाचकाच्या काही प्रतिक्रिया तुमच्यापर्यंत येऊन पोचल्या का ?... त्या तुम्हाला आठवतात ?

बाबुराव : ही कथा व्यंकटेश वकील यांना आवडली होती आणि या कथेमुळेच जय गुजरातमध्ये काम करणाऱ्या कॉम्रेड तारा रेड्डीची आणि माझी प्रथम ओळख झाली होती. त्यांनाही ती गोष्ट आवडली होती.

मी : मग तुम्ही बाबुराव सतत कथाकथन करीत राहिला का ?

बाबुराव : (बाबुराव आपल्या हातातील कागदावर रेखाटणे करण्यात मग्न...हळूहळू भानावर येत)...तर त्यानंतर माझी छापून आलेली गोष्ट...(थोडा वेळ थांबतात) ...तारा रेड्डी यांच्यामुळेच...' युगांतर ' मध्ये छापून आली. त्या गोष्टीचं नाव ' तुरुंग ' होतं. त्यानंतर या ' तुरुंग ' गोष्टीवर अण्णाभाऊ साठे यांनी टीका केली. त्या टीकेचा मी एवढा धसका घेतला की आणि माझ्या मनाला ती लागून राहिली की त्यानंतर मी मराठी, हिंदी, उर्दू या भाषेतील कथा खूप वाचल्या. हिंदी आणि मराठीमधली जागतिक लेखकांची भाषांतरे वाचली. लघुकथेचा अभ्यास करणे, म्हणजे माणसाच्या जीवनाच्या आणि चेहऱ्याचा हालचालींचा अभ्यास करणे. तर मी एक वही ठेवलेली सोबत...त्या वहीमध्ये मी टिपणे करीत असे. मग या टिपणामध्ये ' एक अशक्त मनुष्य रागावला आहे, तेव्हा तो जे शब्द उच्चारील ते शब्द...किंवा तो ज्या हालचाली करीत असेल त्या हालचाली मी वहीत टिपून ठेवीत असे. त्याचप्रमाणे तो रागावल्याच्या दुसऱ्यावर काय प्रतिक्रिया होत त्याही मी टिपीत असे. म्हणजे मानवी विकाराची आणि भाव-नांची शेकडो शब्दचित्रे वहीमध्ये नोंदली. माणसाच्या नाकाची हालचाल... उंच माणूस कसा चालतो...ठेंगणा माणूस कसा चालतो...हा माझा एक अभ्यास होता.

मी : खरं म्हणजे बाबुराव या पद्धतीने निरीक्षण करणारा मनुष्य नाटककार व्हायला हवा होता. प्रारंभीच तुम्ही का नाही नाटककार झालात ?

बाबुराव : नाटकासाठी म्हणजे मला त्यातला व्यवहार जाणवत होता. नाटक लिहिलं म्हणजे ते स्टेजवर यायला पाहिजे...यासाठी ओळख लागेल...कंपनीचा परिचय

हवा असतो...आणि पैसाही लागतो. या साऱ्यांचाच अभाव, मी ज्या वस्तीत राहत होतो तिथे जाणवत होता. साहित्य, कला, नाट्य यांचा अभ्यास आणि आवड असलेला कुणीही नव्हता आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कथा तेव्हा गाजतही होत्या व अण्णाभाऊ साठे यांनी मला दुखवलं होतं म्हणून मी चांगली कथा लिहिणे हे मनाशी पक्क केलेलं होतं. या काळामध्ये मी कितीतरी गोष्टी लिहित्या व फाडूनही टाकत्या. खूप मेहनत करूनही ती कथा नष्ट करण्याची मला हौस आहे...आजही मी खूप लिहितो आणि कुठेतरी ते विसरतो किंवा दुर्लक्ष करतो. त्यामुळे ते नाहीसे होते किंवा दोनचार पाने गहाळ झाली... दोन चार प्रकरणे हरवलीत अशा अवस्थेत सापडतं. एकच गोष्ट किंवा एकच 'थीम' ही अनेक आकाराने मनामध्ये किंवा डोळ्यांपुढे येत असते त्यामुळे पहिल्या आकाराप्रमाणे केलेलं काम मी बाजूला ठेवतो आणि नंतर दुसऱ्यांदा जसं सुचलेलं असेल त्याप्रमाणे मी लिहू लागतो. तेही नापसंत पडलेलं असतं आणि मी तिसऱ्यांदा लिहू लागतो. असं गोष्ट अनेक आकारात व प्रकारात दिसत असल्यामुळे माझ्याकडून झटपट काम होत नाही...आणि वेगानेही होत नाही. लिहिण्याचा मात्र मला कंटाळा नाही...हातात नेहमीच फाऊंटन घेऊन मी असतो...कधी रेघोट्या काढीत असतो...कधी मजकूर सुचला नाही तर चित्रे काढीत असतो वेडीवाकडी.

मी : त्यानंतर तुम्ही कथा कशा लिहीत गेला ?

बाबुराव : तर मी असा झपाटल्यासारखा, रस्त्यावर, स्टेशनवर, जिकडे तिकडे मला जे जे दिसेल ते कधी कागदावर तर कधी मनात नोंदीत होतो. त्याला कथारूप देण्याचा प्रयत्न करीत होतो. कथा लिहून होत होती आणि मला आवडली तर ती प्रकाशित करावी अशी इच्छा होत होती. परंतु एक भीती वाटत होती... आता त्या भीती वाटण्याचा जेव्हा मी विचार करतो...कशामुळे मला भीती वाटत होती ?...तर ही भीती मी ज्या जातीत, ज्या आर्थिक स्तरात, ज्या लोकांत वावरत होतो, त्यातून ही भीती... आपण काय म्हणू... न्यूनगंड किंवा हीनंगड ...असा तो प्रकार होता. आपलं लेखन, लेबर कॅम्पचं नाव...आपलं नाव बाबुराव बागूल...राहणार...माटुंगा लेबर कॅम्प...पाठीमागे एकही डिग्री नाही... कथाविषय बहिष्कृत मानलेल्या लोकांच्या जीवनातून घेतलेले...भाषा त्यांची...ह्या मला मोठ्या अडचणी वाटल्या...

मी : मग तुमची कथा नियतकालिकाकडे गेली कशी ?

बाबुराव : संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला सुरुवात झालेली होती. आचार्य अत्रे यांचे 'नवयुग' या चळवळीमध्ये चळवळीचं पुढारीपण करीत होतं आणि त्यामुळे

मला ' नवयुग ' आपले वाटले. येथे माझी गोष्ट छापली जाईल असं वाटलं.

मी : मग ?

बाबुराव : आणि मी माझी गोष्ट ' नवयुग 'च्या पत्त्यावर पाठविली.

मी : तिचं काय झालं ?

बाबुराव : पोस्टामध्ये गोष्ट पडली आणि माझ्या बेचैनीला सुरुवात झाली. गोष्ट मिळेल की नाही ?...मिळाल्यास आचार्य अत्रेसाहेब वाचतील की नाही, अशा अनेक शंका माझ्या मनात होत्या...परंतु दोनचार दिवसानंतर मला शिरीषताईंच्या सहीचं पत्र आलं...गोष्ट स्वीकारल्याचं पत्र आलं...मला भेटीला बोलविण्याचा मजकूर त्याच्यामध्ये होता...भेटीला जावं की नाही या गोष्टीचा विचार करीत मी दोन दिवस बेचैन होतो...शेवटी मोठा निश्चय करून मी ' ज्योती ' स्टुडियोमध्ये शिरीषताईंना भेटायला गेलो. वरती ऑफिस होतं. बाहेर स्टुडियोचा पहारेकरी होता आणि मी अतिशय बेचैन होतो. साहित्यिकाच्या ऑफीसमध्ये जाण्याची माझी ही पहिली वेळ होती. मी स्वभावाने तसा भीडस्त व बुजरा आहे. मी वर गेलो. बराच वेळ बाहेर थांबलो. आतमध्ये जाण्याची काही हिंमत होईना. शेवटी बराच वेळ थांबून मी परत जाण्याचे ठरविले आणि शिरीषताई मोठ्या झपाट्याने बाहेर आल्या. त्यांनीच मला विचारलं, ' कोण पाहिजे ? '... मी सांगितले, ' मी बाबुराव बागुल आहे '...आणि हे ऐकल्याबरोबर बाई ' अरे तुम्ही ? '...असे खणखणीत आवाजात म्हणाल्या...' चला...चला... आतमध्ये चला...' असं म्हणत मला त्या कचेरीत घेऊन गेल्या. मी त्यांच्या पाठोपाठ आत गेलो. आत बांदेकर खिडकीतून बाहेर पाहत सिगारेट बोटात धरून बसलेले होते. मला खुर्चीवर बसायला सांगून शिरीषताईंनी बांदेकरांना सांगितलं, ' ...हे बाबुराव बागुल ', बांदेकरही खूष. त्यांनी मला खूप प्रश्न विचारले. काय वाचता हे विचारलं. काय काय लिहिलं हेही विचारलं. तुमच्या गोष्टी तुम्ही पाठवीत चला...आम्ही छापीत जाऊ असंही ते म्हणाले...त्यांनी माझी पहिली गोष्ट ' बोव्हाडा ' ही छापली होती.

मी : ' बोव्हाडा ' म्हणजे काय बाबुराव ?

बाबुराव : जाऊ द्या हो...

मी : नाही...सांगा.

बाबुराव : नाशिकला चैत्र महिन्यामध्ये खेडेगावामधून देवीच्या प्रीत्यर्थ देवाची सोंगं काढून नाचवीत असतात...

मी : पुढे काय होतं ?

बाबुराव : हे आठ पंधरा दिवस चालतं... नंतर शेवटी देवीची मिरवणूक निघून 'बोव्हाडा' समाप्त होतो.

मी : या कथेबद्दल शिरीषताईंनी तुमच्याशी काही चर्चा केली का ?

बाबुराव : मी सांगितलं ना...या कथेसंबंधी आणि मला माहीत असलेल्या जीवनाबद्दल त्यांनी पुष्कळ प्रश्न विचारले. त्याबाबतीत मी सांगितलेल्या गोष्टी ऐकून ते दोघेही थक्क झाले...आणि त्यांनी मला 'लिहीत जा' हे सांगितलं. खरे म्हणजे माझे इतक्या उत्साहाने व आपुलकीने स्वागत झाले नसते तर कदाचित मी लिहिण्याच्या फंदातही पडलो नसतो. बाईंची मला वरचेवर पत्रे येत. मी पाठविलेल्या गोष्टींसंबंधीची मते त्या मला कळवीत. काही काटछाट करायची असेल तर त्या संबंधात विचारीत आणि माझ्या गोष्टी छापून येऊ लागल्या.

मी : पण त्याच वेळी प्रस्थापित कथाकार व समीक्षक यांचे तुमच्या कथांकडे लक्ष गेले का ?

बाबुराव : अजिबात नाही.

मी : ते लक्ष केव्हा गेले मग ?

बाबुराव : जेव्हा माझा पहिला कथासंग्रह, १९६३ साली, वामनराव भट यांनी स्वतः घरी येऊन मागून नेला आणि छापला...तेव्हा मात्र माझ्या कथांचं अभूतपूर्व असं स्वागत झालं...

मी : कुणाकुणाकडून कसे कसे स्वागत झाले हे तुम्ही सांगू शकाल का बाबुराव ?

बाबुराव : हो...तेव्हा 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक द्वा. भ. कर्णिक आणि शंकर सारडा ही समाज आणि साहित्य यावर मनःपूर्वक लक्ष ठेवणारी किंवा त्यावर प्रेम करणारी अशी मंडळी होती. सारडाने माझ्या पुस्तकावर अतिशय उत्कृष्ट असा अभिप्राय लिहिलेला होता. त्याच वेळेला त्या सालातील श्रेष्ठ दहा पुस्तके यामध्ये माझ्या पुस्तकाचा नंबर लागला होता...

मी : म्हणजे...जेव्हा मी जात चोरली होती...हेच पुस्तक का ?

बाबुराव : हं...

मी : प्रतिकूल टीका आली का ?

बाबुराव : प्रतिकूल टीका तशी आली नाही पण प्रतिकूल कृती मात्र झाली होती. दलित साहित्य चळवळीतील काही लोक...यांनी 'वाटेवरची' ही माझी गोष्ट वाचून आचार्य अत्र्यांच्याकडे एक डेप्युटेशन नेलं होतं. त्यांची नावे मला माहीत

आहेत...त्यांनी आचार्य अत्र्यांकडे तक्रार अशी केली होती की, या गोष्टीमुळे दलित स्त्रीची बदनामी झाली आहे...तेव्हा शिरीषबाई त्यांना म्हणाल्या की आपण एक कमिशन नेमू आणि त्या कमिशनने जर सांगितले की या गोष्टीमुळे दलित स्त्रीची बदनामी झाली आहे तर तुम्ही म्हणता त्याप्रमाणे बाबुराव बागूल यांच्या गोष्टी आम्ही ' नवयुग ' मध्ये छापणार नाही...ही मंडळी त्याला तयार झाली नाही परंतु एक निषेधसभा घेऊन ' रेझोल्युशन ' वगैरे करण्याचा त्यांचा विचार होता. पण कशामुळे तरी त्याला मोडता आला आणि ती सभा बारगळली...तीच मंडळी अजूनही संधी मिळेल तेव्हा माझ्यावर दात ओठ खात असतात...

मी : बाबुराव, दलित साहित्याची चळवळ त्या वेळी किंवा त्या अगोदर सुरू झाली होती काय ?

बाबुराव : झालेली होती...

मी : ती नेमकी केव्हा व कशी सुरू झाली ?

बाबुराव : याचे साल मला नेमकं आठवत नाही. पण ते सहजपणे आपल्याला शोधता येईल... दलितातून लेखक निर्माण व्हावेत याकरिता काही वाङ्मयप्रेमी मंडळींनी दलित साहित्य परिषद किंवा काहीतरी नावाची संस्था काढली होती. या संस्थेशी माझा तेव्हाही संबंध नव्हता व आताही नाही...

मी : का संबंध नव्हता ?

बाबुराव : मी पहिल्या प्रथम डॉ. आंबेडकरांचा विचार वाङ्मयात मांडला ... कथा-नायकाच्याद्वारे ... दलित जीवनाचे अगदी वेगळ्या पद्धतीने ... म्हणजे अण्णाभाऊ साठे किंवा शंकरराव खरात ... यांच्यापेक्षा वेगळ्या दृष्टिकोनाने मी मांडण्याचा प्रयत्न केला ... ही आत्मस्तुती होणार नाही ना ?

मी : का होईल ... तुम्ही वस्तुस्थिती मांडताय ना ?

बाबुराव : बरं ... असं जरी असलं तरी दलित साहित्य चळवळीतल्या मंडळीशी मिळते जुळते राहावे असे मला कधीही वाटले नाही.

मी : का पण ?

बाबुराव : त्याचे मुख्य कारण म्हणजे वाङ्मयनिर्मितीपेक्षा त्यांचे सभांच्याकडे अधिक लक्ष होते...आणि मी स्वतः अतिशय बेचैन, अशांत होतो. स्टेजवर बसून भाषणे देण्याचा मला मनःपूर्वक तिटकारा होता. अजूनही आहे. अदृश्य राहून, अपरिचित राहून, लोकांत वावरावे, बघावे, ऐकावे, वाचावे, फोटो छापून आणू नयेत,... (बाबुराव विचारात पडलेले) असे मला वाटते.

मी : हं ... हं ...

बाबुराव : जेव्हा आपण पुढारी झालेले असतो ... फोटोने अनेक लोकांच्या ओळखीचे झालेले असतो ... तेव्हा लोक आणि आपल्यात एक अदृश्य भिंत निर्माण झालेली असते...मला ती तेव्हाही नको होती आणि आताही नको आहे...

मी : बाबुराव, तुम्ही म्हणता तो अशांतपणा ... तुमची बेचैनी ... कोणत्या स्वरूपाची होती ?

बाबुराव : मी जे पाहिलं होतं किंवा पाहत होतो हे इतकं विराट आणि अफाट होतं की ते मराठी शब्दांत मांडणं खरोखरीच अवघड होतं. इतके संदर्भ त्या एका घटनेला जे कथेत मी मांडू इच्छित होतो ... त्याला होते. शब्दांत ते मांडताच येत नव्हते ... उदाहरणादाखल, 'वानर' या गोष्टीतल्या पहिलवानाला एकाच वेळेला तुफान अशी कामेच्छा झालेली आहे, दुसऱ्याच क्षणाला ती कामेच्छा संतापात परिवर्तित होते, तिसऱ्या क्षणाला त्याला कामेच्छा झाल्याबद्दलचे दुःख होते आणि या तिन्ही संदर्भांना 'सामाजिक संदर्भाचे' धागेदोरे आहेत. त्याला राग का आला ? तो राग एकदम क्रूर कठोर का झाला ? याचे उत्तर दिल्याशिवाय... याचे संदर्भ दित्या शिवाय ... राग येण्याचे कारण मिळत नाही. त्याचप्रमाणे त्याचा तो राग झटकन दुःखात परिवर्तित का झाला याचेही संदर्भ द्यावे लागतात ... म्हणजे लेखक एका बारक्या घटनेसाठी ... किंवा एक ओळीच्या वर्णनासाठी ... (दाराची घंटा वाजते. बाबुराव उठून जातात ... दार उघडतात ... आम्ही आमच्या अभ्यासिकेत साहित्यसहवासात बसलेले आहोत ... ना. व्यं. देशपांडे येतात.) एवढा तपशील द्यावा लागतो. याची प्रतिक्रिया ज्याच्यापासून निर्माण होते त्या मुळीच्याही भावनांचं वर्णन करावं लागतं. आता त्याला एवढा राग का आला ? तर त्याचे संस्कार, त्या संस्काराचेही संदर्भ द्यावे लागतात ... म्हणजे एक बारकासा ... अं ... एक बारकीशी घटना पण मला एक लेखक म्हणून ती खूप रंगछटांमध्ये व संदर्भामध्ये दिसत असते. माझ्या कथेचं बळ आणि वैगुण्य हा माझ्या फार दिसण्यात आहे. माझ्या बेचैनीलासुद्धा कारण हे फार दिसणे आणि कमी ताकदीचे शब्द किंवा शब्दसंपत्ती जवळ असणे. मला असं वाटतं. मराठी भाषा ही माणसाच्या एवढी समृद्ध आणि रंगपूर्ण नाही. ती खूप एकारलेली आहे. धार्मिक बाबतीमध्ये किंवा देवधर्माच्या बाबतीमध्ये ती थोडेसे अधिक शब्द देते. पण माणसाच्या बाबतीमध्ये किंवा माणसाच्या वासना विकाराच्या बाबतीमध्ये ती अबोल होते. असे का घडावे ? ... हा विचार ... किंवा हा प्रश्न मला आज पडतो ... तेव्हाही पडत होता ... आता वेगवेगळ्या मार्गाने शब्द ... सापडतात. तरीही माण-

साला व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा अपुरी पडते असे म्हणायला हरकत नाही. माझ्या अशांततेचे कारण इथे आहे. मी जे माणसातील निसर्गाएवढं अथांग संकीर्ण अनंत रंगाने भरलेलं निसर्ग संगीताप्रमाणे अनेक सुरांनी मुखरित होणारं, जे विराटपण आहे ... ते मला दिसत होतं ... परंतु शब्दामध्ये मात्र ते साठवता येत नव्हतं ... अशा कितीतरी घटना माझ्या कथांमधून पूर्णपणाने व्यक्त होण्याच्या राहून गेलेल्या आहेत. उदाहरणादाखल 'विद्रोह' या गोष्टी-मध्ये त्या जयला ... (जय त्याचं नाव). ... संडासातील खालच्या नरकातील घाण दिसते व रक्ताने भरलेल्या पट्ट्या दिसतात. बायकांनी टाकून दिलेल्या पाळीचे फडके दिसतात. हे सारं ... किडे दिसतात. हे पाहून त्याला किळस येत असते ... घृणा येत असते ... एक वेदनाही होत असते आणि संतापही आलेला असतो ... हे सारं लिहीत असताना मलाच होत होतं ... माझ्याच अंगावर काटे फुटत होते...पाठीची कातडी थरथरत होती...डोकं दुर्गंधीने भरलेलं होतं आणि हे शब्दांत मांडता मात्र येत नव्हतं. त्यामुळे मनाचा मोठा कोंड-मारा चालला होता. मोठी तगमग होत होती. शब्द मात्र सापडत नव्हते कारण मला त्या घृणेचंही पूर्ण चित्र उभं करायचं होतं ... पण मी जसे घृणेचे चित्र उभं करू शकलो नाही तसं त्याच्या चीड संतापाचं किंवा किळसाचं चित्रही वाचकांना दाखवू शकलो नाही. तिथेही 'त्याला घृणा आली' ... 'त्याला चीड आली' असे म्हणून एक चिंतन त्याच्या तोंडी टाकलेलं आहे. आणि स्वतःची सुटका खेदपूर्वक करून घेतलेली आहे. ... अनेक गोष्टींमध्ये मला अशी माघार घ्यावी लागलेली आहे. 'कवितेचा जन्म' ही गोष्ट लिहिताना तर माझी बेचैनी, अशांतता, पराकोटीला गेलेली होती. ही गोष्ट लिहीत असताना खूप रक्तस्राव झाल्यानंतर किंवा मैथुनानंतर जसा शीण येतो ... हे दोन्ही शीण ... दोन प्रकारचे असतात. ही गोष्ट लिहीत असताना हे दोन्ही शीण माझ्या ठायी आले होते ... किंवा माझ्या ठायी होते ... कवितेचा जन्म होतो आहे ... तेव्हा मला त्याच्या मनःस्थितीचे एकंदर देहामध्येच जे रसायन उकळतं ... त्याचे श्वासोच्छ्वासावर, डोळ्यांवर, हृदयाच्या ठोक्यावर, मेंदूवर होणारे परिणाम नोंदवायचे होते. तो अनुभव मला जाणवत होता. अगदी साक्षात जाणवत होता. पण शब्दांत मांडताना तो मोठा विलक्षण अनुभव शब्दांत मांडताच येत नव्हता ... तर अशी अनेक दृश्ये किंवा घेतलेले अनुभव त्याच्या संपूर्ण वेदनेसह, शक्तीसह, प्रकाशासह, रंगासह, दिसत असतानाही मांडता येत नाहीत हे माझ्या अशांततेचं कारण आहे ... किंवा होते ... तेव्हा शब्द शोधण्यासाठी आणि तो अनुभव त्याच्या ... आता मला इथे शब्द आठवत नाही ... त्याला काय ... अक्राळविक्राळ किंवा कोमलतेसह ... मांडताना अडचण होते.

मी : मग तुम्ही आणखी कोणत्या लेखनप्रकाराकडे वळलात का ?

बाबुराव : या वेळी मी कविता लिहीत होतो ...

मी : म्हणजे कविता अगोदर की कथा अगोदर ?

बाबुराव : कविता आधी ...

मी : पण बाबुराव, तुमची प्रतिमा कथाकार म्हणून उजळली गेली आहे ... खरं म्हणजे कवी बाबुराव बागूल जाणायला मी स्वतः फार उत्सुक आहे ... सांगाल का ?

बाबुराव : तर कविता (आपल्याच मूडमध्ये) माझे अनुभव व्यक्त करायला फार अपुरी वाटू लागली आणि त्या वेळी 'सत्यकथेतून गौरविली जाणारी कविता ही मी वाचूनही मला पुरेशी वाटत नव्हती. खूप शब्दाळ आणि तोचतोपणा असलेली. मी लिहू पाहत असलेली कविता ... तेव्हा कुणीही लिहीत नव्हते ... का लिहीत नव्हते ... हे सांगणे वेगळ्या कारणामुळे अवघड आहे. कुणावरही तो मध्यम वर्गीय आहे असा आरोप करून मोकळे होणे बरोबर नाही. त्या वेळची कविता अशीच का होती याचा शोध घेतला पाहिजे. तेव्हा मला तो घेता आला नाही आणि माझे अनुभव कवितेतून व्यक्तच होत नव्हते. म्हणून कवितेपेक्षा मोठा कॅनव्हास असलेली आणि कुठलीही सांकेतिक किंवा सौंदर्य-शास्त्रीय मर्यादा किंवा संकेत न पाळणारी अशी लघुकथा लिहायची मी ठरविली आणि त्याप्रमाणे लिहीत गेलो. लघुकथेबद्दलचं ... म्हणजे माझ्याच लघुकथे-बद्दलचं ... माझं मत मी सांगितलं आहे ... आणि अजूनही मला मराठी कविता ही माणसाला व्यक्त करते आहे असे दिसत नाही, तर काही नावाज-लेल्या कवींचाच ती प्रतिध्वनी व्यक्तवीत आहे असे मला वाटते ... कविता ही जीवनासारखीच आणि जीवनाएवढी व्हायला पाहिजे. चित्र किंवा शिल्प हे मात्र सहजपणे जीवनाएवढे होऊन जाते. अर्थात मोठ्या कलावंताचे...

मी : मग काय दलित साहित्याच्या उत्थापनाचा हा काळ समजायचा काय ? ... नेमकं दलित साहित्य प्रस्थापित मराठी दलित साहित्यापासून आपली वेगळी अस्मिता केव्हा प्रकट करू लागलं ?

बाबुराव : आता इथे ... हां ... ही चर्चा खूप मोठी होईल.

मी : हरकत नाही ... होऊ द्या ... दलित साहित्याची ऐतिहासिकता कदाचित या चर्चेतून सिद्ध करता येईलसे मला वाटते.

बाबुराव : हं... लोकशाहीची मानसिकता, लोकशाहीची वैचारिकता आणि आदर्श एकंदर मराठी साहित्याने जर व्यक्त केले असते तर 'दलित साहित्य' नावाचे

शीर्षक किंवा 'ट्रेण्ड' म्हणा... किंवा प्रवाह... मराठी साहित्यात वेगळेपणाने आलाच नसता. मराठीतील बहुतेक लेखन, काव्य, नाटके, कादंबरी, वैचारिक वगैरे हे हिंदू मानसिकताच व्यक्त करणारे लेखन आहे असे सातत्याने जाणवते. अगदी मार्क्सवाद्यांनी केलेले लेखनही याला अपवाद नाही. मला हिंदू मानसिकता, पौराणिकता किंवा विचारवत्ता व्यक्त करीत असलेले लेखन हे युग-समांतर वाटत नाही. ते मध्ययुगीन वाटते. हिंदुधर्मग्रंथांमध्ये ज्या वासना, भावना व जीवनाबद्दलच्या अनेक मर्यादा व्यक्त केलेल्या आहेत त्याचेच हे आधुनिक ललित अवतार वाटत होते. इथे हिंदू मुसलमान माणसं अमानुष होऊन नौखालीमध्ये आणि पंजाबमध्ये आणि देशामध्ये इतरत्र कत्तली करीत होते. माणसे भराभर पशुत्वात उड्या मारीत होते. माणसाला विसाव्या शतकातही या आदिम अवस्थेमध्ये कोण नेत होते त्यांना स्वतःच रोखून धरण्यासाठी एकही आदर्श... एकही तत्त्व... उभे राहत का नव्हते ?... जर लोकशाहीची मानसिकता असती... लोकशाही ही संस्कृती झाली असती... संस्कार झाले असते तर... हे दंगे झाल्या अमानुष स्वरूपाला पोचले नसते... आताचंच उदाहरण द्यायचं झालं तर मराठवाड्यामध्ये जी दंगल झाली तिचं जर आपण परिशीलन केलं तर आपल्याला हे एक प्रकारचं धर्मयुद्ध आहे असं दिसतं...

मी : बाबुराव, आपण दलित साहित्याची ऐतिहासिकता पाहत आहोत... त्या संदर्भातच तुम्ही हे बोलत आहात... होय ना ?

बाबुराव : होय. मी जे मराठवाड्याचं उदाहरण घेतलं ते भारतीय मनाचं विशदीकरण करण्यासाठी.

मी : ते कसं काय, बाबुराव ?

बाबुराव : (खोल विचारात) हे स्पष्ट करताना आपल्याला थोडा पुनः तपशीलवार विचार करावा लागेल. (कागदावर रेखाटणे करीत... एक सुंदर झाडाची आकृती तयार होते.) दलित–भारतीय दलित केव्हा जागे झाले... तर जेव्हा आपल्या देशामध्ये ब्रिटिश आले... ते सत्ताधारी झाले... ज्ञानविज्ञान आले... कारखाने आले... औद्योगिक क्रांतीने दिलेले नवे विचार आले... त्या वेळी इथल्या बुद्धिवाद्यांनी हिंदुधर्माची समाजाची समीक्षा सुरू केली... ही समीक्षा माणसाला महत्त्व देणाऱ्या लोकशाहीच्या तत्त्वज्ञानातून सुरू... झाली म्हणून हरिभाऊंना यमूचे दुःख उघडपणाने मांडण्याची हिंमत झाली. केशवसुतांना 'अंत्यजाच्या मुलास पडलेला प्रश्न' ही कविता (जोर देत) भारतीय कवितेच्या इतिहासातील पहिली कविता जन्माला आली आणि याच काळी महात्मा फुल्यांना शूद्रअति-

शूद्रांची जाणीव झाली. अनेक सुज्ञ लोकांना भारतीय माणसांची दुःखे दिसू लागली. जी ज्ञानेश्वरांनाही दिसली नव्हती व अनेक संतानांही दिसली नव्हती. ती दुःखे, दैन्य, दास्य... माणसाच्या अनेक पातळ्यांवरील गुलामगिऱ्या दिसू लागल्या. ही एकाएकी दिव्य दृष्टी कुठून आली ? तर ही दिव्य दृष्टी लोकशाहीच्या शहाणपणाने प्राप्त झाली...

मी : म्हणजे हे लोकशाहीचं शहाणपण जे तुम्ही म्हणता ते इंग्रजांनी दिलं असं तुम्ही मानता का ?

बाबुराव : इंग्रज हे युरोपमध्ये झालेल्या प्रबोधनाचे भारतातले वाहक होते. वैतरणेचं पाणी जसं इथे मुंबईत आणून टाकणारे पाईप असतात तसे...हां...तर या कालखंडामध्ये दलितांचे पहिले राजकीय संघटन...हजारो वर्षांनंतरचे...उभे राहिले... या आधी दलितांचे राजकीय संघटन कधीच उभे राहिले नाही. एवढेच नव्हे तर भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात सामाजिक दलितांतून वर आलेली राज्यकर्ती, पंडित, विद्वान , कलावंत, शूर अशी माणसेच आढळत नाहीत...कारण त्या माणसांठायी हे गुण नव्हते असे नव्हे तर वर्णव्यवस्था त्यांचा निदर्यपणे संहार करीत होती. मनूचा तो कायदा आपल्याला माहीत आहे...नुसता शब्द ऐकला तर कानामध्ये गरम शिसे ओत...नुसता शब्द उच्चारला तर जीभ कापून टाक...डोळे वर करून पाहिले की डोळे फोडून टाक...प्रेम केले परस्त्रीशी तर शिश्न कापून टाक...बरे घर बांधले तर घर पाडून टाक...आणि दोन पैसे गाठीला बांधले तर ते पैसे लुटून ने...अशा आज्ञा... असे हुकूम मनूने राजपुरुषांना देऊन ठेवले आहेत व शंबुकाचा शिरच्छेद करणाऱ्या प्रभू रामचंद्राला आदर्श आणि देव मानणाऱ्या राजपुरुषांनी हे हुकूम तंतोतंत पाळलेले असावेत...म्हणूनच दलितांतून, बुद्धिवंत, कलावंत व कर्तृत्ववान माणसे त्या काळी पुढे आली नाहीत. ती सर्व वर येताच कत्तल करून मारली गेलेली आहेत...परंतु ब्रिटिश आल्यावर...म्हणजे...नवी सत्ता प्रस्थापित झाल्यावर... सत्तेवर माणसाला मानणारा विचार आल्यावर...डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शिकू शकले. पुढारी, पंडित, मार्गदर्शक होऊ शकले. लोकशाहीमुळेच जसे बाबासाहेब पुढे येऊ शकले. त्याचप्रमाणे दुसरे अनेक लोक लोकशाहीमुळे शिक्षण घेऊ शकले...दोन पैसे जमवू शकले...त्यांचे सोने पैसे राजपुरुषांनी लुटले नाहीत...शंबूकाप्रमाणे त्यांचे शिरच्छेद झाले नाहीत...साध्या शिक्षकापासून तो देशाच्या संरक्षण व कायदेमंत्र्यापर्यंत, संविधानाचे शिल्पकार होईपर्यंत, ते प्रगती करू शकले. कारण साधीसुधी राजकीय लोकशाही...तर दलितांची चळवळ लोकशाहीमुळे वाढली आणि ती राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीकडे... जनतेच्या लोकशाहीकडे नेत असते...महाराष्ट्रात आणि भारतात चाललेली दलि-

तांची चळवळ ही लोकशाहीचाच विकास करणारी चळवळ आहे. लोकशाही आणि वर्णव्यवस्था किंवा वर्णवादी विचारव्यवस्था...या परस्परांच्या अहीनकुलाप्रमाणे शत्रू असलेल्या संस्था आहेत...लोकशाहीचा विकास होणे म्हणजे वर्णव्यवस्थेचा पराभव होणे ..लोकशाहीचा विजय म्हणजे दलितांचा विजय...दलित चळवळीचा विजय. आपल्या देशामध्ये, खेड्याखेड्यामध्ये, घराघरामध्ये, मनामनामध्ये हे लोकशाही विरोधी वर्णव्यवस्था असे युद्ध चाललेले आहे...आगऱ्यामध्ये, उत्तरप्रदेशामध्ये, बिहारमध्ये आणि मराठवाड्यामध्ये झालेल्या दंगलींत या वर्णव्यवस्थेने व तिच्या मानसिकतेने लोकशाहीवरती केलेले जबरदस्त आघात आहेत. येथे लोकशाही जर मानसिकता असती व वैचारिकता असती तर, स्पृश्य गरिबांनी अस्पृश्य गरिबांवर किंवा दलित मध्यमवर्गीयांवर हल्ले केले नसते. दलित साहित्याच्या प्रेरणा या वास्तवात आहेत...एका बाजूला औपचारिक लोकशाही आणि एका बाजूला सर्व काही व्यापून बसलेली अजस्र वर्णव्यवस्था. राज्यकर्ता वर्ग आणि बुद्धिजीवी वर्ग हा वर्णव्यवस्था आणि लोकशाहीमध्ये तडजोड घडवून आणणारा, सुवर्णमध्य सांधणारा... लोकशाहीला सामाजिक लोकशाही करू पाहणारा... बुद्धिवादी गट किंवा समूह अतिशय लहान आहे...निवडणुकीच्या राजकारणामुळे कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट या लोकशाहीच्या विकास करणाऱ्या ताकदीही तडजोडवादी भूमिका स्वीकारतात...अशा जटिल परिस्थितीमध्ये काही निष्ठावंत लोकशाहीवादी लोकशाहीचा विकास सामाजिक लोकशाहीपर्यंत करण्यासाठी आपले लेखन राबवतात. ते म्हणजे दलित साहित्यिक होत. पण यामध्ये सुद्धा काही भडंकं लोक आहेतच...

मी : म्हणजे बाबुराव, साहित्याचा समग्र विचार करताना ललित साहित्य आणि दलित साहित्य यामध्ये तुम्ही नेमका कोणता फरक करता ?

बाबुराव : कोणतेही लेखन किंवा कला हे माणसाचे चरित्र–चित्रण असते. (विचारमग्न) सर्व छोटे आणि मोठे लेखक. पुरोगामी आणि प्रतिगामी लेखक, कलावादी आणि जीवनवादी लेखक, सर्वच प्रकारचे लेखक हे माणसाच्याच वासना भावनाचे सुखदुःखाचे चित्रण करीत असतात. केवळ सुखदुःखाचे चित्रण या दृष्टीने जर विचार केला किंवा कायिक वर्णनाच्या दृष्टीने विचार केला तर या भिन्न विचारसरणीच्या लेखकांमध्ये काही फरक आढळत नाही. सुंदर स्त्रीचे वर्णन जीवनवादी लेखक कुरूप स्त्री असे कधी करणार नाही. फरक होतो केव्हा ? अनुभवाचा अर्थ...म्हणजे अनुभव घेताना आणि अनुभवाचा अर्थ लावताना. एक मनुष्य सायकलची चोरी करतो आणि त्याच्यावरून एक जगप्रसिद्ध ' बायसिकल थिप ' हा चित्रपट तयार होतो. या ' बायसिकल थिप ' मध्ये जे संदर्भ दिले आहेत ते टाळले आणि थोडेसे विकृतीकरण मिसळले तर ' बायसिकल

थिप ' बद्दल आपल्याला मुळीच सहानुभूती वाटणार नाही. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या मराठी कादंबरीत आणि नाटकांत जे गुंड आले ते बहुतकरून मुसलमान होते आणि दुष्ट मुसलमान होते. पण कृष्णचंद्राने ' तीन गुंड ' या कादंबरीत चित्रित केलेला गुंड आणि मराठी वाङ्मयातले गुंड यांचा विचार केला तर लेखकाचा दुष्टपणाच सिद्ध होतो. तर लेखक माणूस म्हणून जर लहान असेल तर तो त्याच्या अनुभवाचा अर्थही त्याच्या आध्यात्मिक उंची-प्रमाणेच लावील. पण लेखक माणूस म्हणून जर मोठा असेल तर तो त्याच्या पात्रांना शिक्षा न करता त्यांना शोधत जातो...ही घटना अशी का घडली याचे सर्व धागेदोरे अतिशय, सहानुभूतीने व बुद्धाच्या करुणेने, मार्क्सच्या चिकित्सेने, शोधीत जातो आणि मग त्याला त्या घटनेचा नेमका अर्थ कळतो. ही घटना शब्दांचे नक्षीकाम न करता अथवा मंत्रतंत्राचा विचार न करता जरी मांडली तरी उत्कृष्टच ठरते. कारण तीच आपला ' फॉर्म ' आणि आपला वेग, प्रारंभ आणि शेवट व मध्य निश्चित करून आलेली असते.

बाबुराव : (अनवधानाने)...आपण कुठवर आलो हो...तुम्ही काय विचारलं होतं नेमकं ?...

मी : दलित साहित्य आणि ललित साहित्य यात...'

बाबुराव : हां...आलं लक्षात. दलित साहित्य आणि ललित साहित्य यामध्ये जो फरक होतो त्याचे एक कारण अनुभव...अनुभवाचा अर्थ...त्याचा दृष्टिकोन...याचा विचार होतो. उदाहरणार्थ, कर्ण...कर्ण उपेक्षित आहे...कर्णाचं दुःख त्याच्या कुळीतून...म्हणजे जिथे तो जगला...तिथून आलेले आहे. काही दुःखे कर्णाची त्याच्या स्वभावातून आलेली आहेत. माणसाच्या स्वभावातून येणारी दुःखे ही मोठी सुंदर आणि काव्यात्मक असतात. हॅम्लेटचं दुःख त्याच्या स्वभावातून आहे. पण काही दुःखे ही सामाजिक असतात. या सामाजिक दुःखाचं चित्रण करण्यासाठी शास्त्रशुद्ध दृष्टिकोनाची आवश्यकता असते. कर्ण जेव्हा लिहिला गेला तेव्हा तो त्या काळाचा यथार्थ किंवा प्रातिनिधिक दलित नायक आहे. पण आजचा दलित नायक माझे दुःख माझ्या जन्मात आहे हे अमान्य करतो आणि माझ्या दुःखाला कारणीभूत वर्णव्यवस्था, धर्म, भांडवलदारी शोषणपद्धती आहे असे तो मानतो व त्याच्याविरुद्ध तो बंडाला प्रवृत्त होतो. आजचा दलित नायक त्या कर्णासारखा जर चित्रित केला तर लेखक जर मोठा असेल तर ती कादंबरी चांगली होईल परंतु ती युगाशी समांतर असलेली कादंबरी असणार नाही. म्हणून आजचा दलित नायक डॉ. आंबेडकरांसारखा, स्टॉलिनसारखा, लेनिनसारखा किंवा या व्यवस्थेविरुद्ध असंतोष प्रकट करणारा...निर्माण करणारा...असाच असेल. देव, धर्म, ब्राह्मण आणि सत्ता यांना तो कर्णाप्रमाणे शरण जाणार नाही.

मी : बाबुराव, हा दलित नायक तुम्ही जो वर्णिता तो दलित लेखकाने आपल्या लेखन-संकल्पनेतून निर्माण केलेला काल्पनिक नायकही असू शकेल का ? की त्याचे थेट वास्तवाशी व वर्तमानाशीही संलग्न किंवा समांतर नाते असेल ?

बाबुराव : वरील जी मी नावे घेतली...आंबेडकर, स्टॉलिन, लेनिन...ती आजच्या वास्तवाचेच उद्‌गार आणि आविष्कार आहेत. हे विषमतापूर्ण वास्तव नष्ट करण्या-साठी हे तीन स्वभाव पुढे आलेले आहेत. तिन्ही स्वभावाने या विषमतापूर्ण समाजाविरुद्ध व रचनेविरुद्ध झगडा दिलेला आहे.

मी : पण बाबुराव, स्टॉलिनचा निषेध त्याच्या देशातही झाला व आजही होत आहे. त्याचे नाव तुम्ही कसे घेता ? त्याला तुम्ही आंबेडकर व लेनिनच्या पंक्तीला कसे बसवता ?

बाबुराव : (तोंडात पानपट्टी कोंबीत) स्टॉलिनने जमिनीचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर राष्ट्रीयीकरणाला विरोध करणाऱ्या कुलकांचा जो कडक बंदोबस्त केला, तो मला फार आवडलेला आहे...अस्पृश्यता निवारण्यासाठी या कडक बंदोबस्ताची गरज आहे...मराठवाड्याच्या एकतर्फी युद्धाने हे अधिक स्पष्टपणे सिद्ध झालेले आहे...

मी : बाबुराव...या विषयाकडून आपण आता थोडं विषयांतर करू...महाराष्ट्रात गेल्या दोन दशकांत रंगभूमीचा परमोत्कर्ष होत असताना दिसतो...धंदेवाईक आणि प्रायोगिक दोन्ही क्षेत्रांत...दलित साहित्यिक म्हणून तुम्हाला नाटक लिहून ते रंगभूमीवर आणावेसे वाटले होते का...अजूनही वाटते का... ?

बाबुराव : मी नाटक लिहिले होते. आणि लेबरकॅम्पात त्याचे एक दोन प्रयोगही झाले होते...

मी : केव्हाची गोष्ट ही बाबुराव ?

बाबुराव : ही १९५२–५५ ची गोष्ट असेल.

मी : नाटकाचं नाव काय होतं ?

बाबुराव : भाई.

मी : त्या काळात तुम्ही 'भाई' होता... होय ना... भाईभाईचं राजकीय वाता-वरणंही त्या काळात जोरात होतं... म्हणून का ?

बाबुराव : वातावरण जोरात होतं... गोष्टसुद्धा चमत्कारिक होती ती... विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या वाचनातून मला ते नाटक सुचलं होतं. एक अफलातून संन्यस्त वृत्तीचा आणि संतप्त मनुष्य त्या नाटकामध्ये मुख्य पात्र म्हणून वावरत होतं. थीम चांगली असूनही नाटक मात्र मी चांगलं लिहू शकलो नव्हतो, पण मी ते

नाटक आणि इतरही नाटके लिहिणार आहे... मराठवाड्याच्या दंगलीवर... 'लेक्चरर' नावाचं एक नाटक माझ्या डोक्यात आहे... डॉ. आंबेडकरांच्या जीवनकालखंडावर नाटक लिहावे असे मला फार वाटते. त्याची बरीचशी सामग्री मी जमविलेली आहे... आणि मला नाटके खरोखरच फार दिसतात... हे नाटक मला सवड मिळाली तर मी लिहून काढणार आहे. खूप धमाल मचवून द्यायची आहे मला.

मी : पण बाबुराव, कादंबरीकाराची ठेवण व नाटककाराची ठेवण या दोन्ही ठेवणी प्राकृतिकदृष्ट्या पुष्कळदा भिन्न असलेल्या आढळून येतात... विजय तेंडूलकरांसारखा नाटककार उत्तम कादंबरीकार होईल असं तुम्हाला वाटतं का ?

बाबुराव : मंढेकरांचं वाक्य मी तुम्हाला सुनवितो. (खळखळून हसतात) कलावंताची कुंडली कुणी मांडू नये.

मी : ठीक आहे. त्याचा आधार कुणालाही घेता येईल... माझ्या प्रश्नाचा रोख वेगळाच होता... दलित रंगभूमी अशी वेगळी परंपरा रंगभूमीला प्राचीनकाळापासून या देशात प्राप्त झाली आहे असं तुम्हाला वाटतं का ?

बाबुराव : भारतीय नाटक हेच मुळी दलितांचं नाटक आहे. दलित नाटक आहे. नाटक पाहू नकोस अशा कठोर आज्ञा धर्माने दिलेल्या आहेत. रामजोशीचा तमाशा मोरोपंतांनी पडदा लावून ऐकला असे शांतारामच्या बोलपटात दाखविले असल्याचे मला आठवते. 'बामणा घरी लिबणं आणि महाराघरी गाणं' अशी आपल्याकडे म्हणच आहे. आणि जो निसर्गाच्या आणि जीवनाच्या जवळ असतो तो ते नृत्यगानाद्वारे प्रकट करीत असतो. चर्मवाद्य करणारे आणि वाजविणारे हे काय सोवळे ब्राह्मण असतील असं वाटत नाही. आणि याच्यातून सात सुरांची किमया उभी करणारेसुद्धा दलित रंगभूमी किंवा दलित नाटक हे माणसाच्या अधिक यथार्थ चित्रण करणारी रंगभूमी असेल... मालक, प्रेक्षक, मध्यमवर्ग,... बुद्धिजीवीवर्ग... यांची एवढीही तमा न बाळगता दलित नाटक माणसाला घेऊन रंगभूमीवर येईल... आणि तिथे जे व्यक्त होईल व बोलले जाईल त्यात कुठलीही तडजोड स्वीकारली जाणार नाही.

मी : म्हणजे तुम्ही दलित रंगभूमीबद्दल आशावादी आहात असे मी म्हणू का ?

बाबुराव : मी निःसंशयपणे असे म्हणू शकतो...

मी : ठीक आहे... मी आता तुमच्याकडे एक व्यक्ती किंवा मुंबईसारख्या शहरातील लेबरकॅम्पात राहणारा माणूस म्हणून कुतूहलाने वळतो आहे... माझ्याप्रमाणे महाराष्ट्रातील तुमच्या चाहत्यांना तुमच्या व्यक्तिगत जीवनाचे कुतूहल वाटतं

असणारच... बाबुराव, तुमचा प्रत्येक दिवस उगवतो तरी कसा आणि कसा मावळतो ?... सांगू शकाल का ?

बाबुराव : (थंडगार पाण्याचा ग्लास रिकामा करीत... दुपारचे दोन वाजलेत...) सांगू... प्रत्येक दिवस हा सारखा नसतो. घड्याळाप्रमाणेच सूर्योदय कदाचित निश्चितपणाने होत असेल. परंतु आपला लेखकाचा किंवा कुणाचाही सूर्य एखाद्या दिवशी सुखाचा असतो. एखाद्या दिवशी दुःखाचा असतो. त्यामुळे ठरलेला दिनक्रम (आपल्याच कादंबरीच्या हस्तलिखिताची पाने चाळीत व विचारमग्नतेत मूक होत)... त्याप्रमाणे बदलतो. पण मी लिहीत असलो म्हणजे पहाटेस पाच सहापर्यंतही लिहीत बसतो किंवा वाचीतही बसतो.

मी : म्हणजे तुम्ही उठता किती वाजता बाबुराव ?

बाबुराव : मी झोपलेला नसतोच...

मी : म्हणजे काय ?

बाबुराव : म्हणजे असं...

मी : योग्यासारखं काय... ?

बाबुराव : योगी वगैरे नाही... पण असं टाईमटेबलमध्ये बसलेलं असं काय आपलं काहीच नाही... आता पाहा... एखादे दिवशी मी रात्री लवकर झोपलेला असेन तर सकाळी लवकर उठतो पण दात घासण्याचे काम मात्र मी काहीतरी अकरा बाराच्या सुमारास सुरू केलेलं असतं...

मी : तंबाखूने दात घासता का ?...

बाबुराव : पावडर... पेस्ट... काहीही चालते...

मी : पण तोपर्यंत काय घेता ?

बाबुराव : चहा... पाणी... घेतच असतो...

मी : किती चहा होतो, बाबुराव ?

बाबुराव : खूप चहा पितो मी... खूप पाने खातो...

मी : दात घासण्यापूर्वी ?

बाबुराव : हुं... कामात असलो लिहिण्याच्या... विशेषतः लिहिण्याच्या... तर पाने जास्तच खातो...

मी : त्यामुळे स्फूर्ती येण्याचा भाग आहे का ?

बाबुराव : स्फूर्ती वगैरे काही येत नाही... चावल्यामुळे मन एकाग्र होण्याला मदत होत असावी... परंतु आतमध्ये जर प्रवाह खळखळत असेल... तर हॉटेल-

मध्ये, रेल्वेच्या डब्यात, बगीच्यात आणि चालत्या बसमध्येही लिहिता येते... तेव्हा स्फूर्ती वगैरे काय भानगड आहे... तिच्यासाठी दारू प्यावी लागते, सिगारेट ओढावी लागते... असे मला वाटत नाही... दारू पिऊन डोके जडच होते... माणसाचे स्वाभाविकपण निघून जाते... तेव्हा स्फूर्तीसाठी व्यसने हे खरे नाही...

मी : मग पुढचा दिवस कसा जातो ?...

बाबुराव : हां... न्याहारी बिहारी केली की बाहेर... काम असेल तर काम... नाहीतर मित्राशी गप्पा... नाहीतर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये वाचन किंवा लेखन करीत बसतो... (बाबुरावांना पुनः पानाची हुक्की येते)...

मी : बाबुराव, द्रव्यार्जनासाठी तुम्ही पूर्वी कामे केली आहेत नाही का ?

बाबुराव : लहानपणी मी मिळेल ती कामे केली.

मी : कोणती ?

बाबुराव : एका डॉक्टरकडे त्याच्या कंपाउंडरच्या हाताखाली लागणारा मुलगा म्हणून. हे काम मी केलं. रेशन दुकानावर पावत्या लिहिण्याचं आणि धान्य देण्याचंही काम केलं. लॉंड्रीमध्ये बिले लिहिण्याचं काम केलं. शिवडीला पेट्रोलचे किंवा तेलाचे डबे लोटण्याचं काम 'कॅज्युअल लेबरर' म्हणून केलं. ट्रेड युनियनच्या ऑफिसमध्ये अशी बारकी सारखी कामे करणारा म्हणून राहिलो आणि मध्य रेल्वेमध्ये कुली म्हणून भरती झालो... जिथे प्रारंभीच लोहारखात्यामध्ये मला पाठविण्यात आलं...

मी : त्या वेळी तुमचं वय किती होतं बाबुराव ?

बाबुराव : तेवीस चोवीस वर्षांचा असेन.

मी : त्या वेळी तुम्ही बाप झालेले होता ?

बाबुराव : हो.

मी : किती मुलांचे ?

बाबुराव : एकच.

मी : मग पुढे ?

बाबुराव : तर लोहार खात्यामध्ये लोखंडाच्या भट्ट्या असतात...रेल्वेला आणि आगगाडीच्या डब्याला लागणारे लहान मोठे बरेचसे सामान या लोहार खात्यामध्ये तयार केले जाते. उदाहरणादाखल आगगाडीच्या दोन डब्यांना अडकवून धरणारा

मधला लोखंडी हूक...याचं मी थोडंसं वर्णन करून सांगतो...हा लोखंडाचा हूक भट्टीमध्ये टाकलेला असतो, तो टाकून जेव्हा लाल रंगाचा पांढऱ्या रंगाचा होतो...लोखंड फार तापलं म्हणजे पांढरं होतं...तेव्हा तो लोखंडाच्या शिगेच्या आकड्याने भट्टीतून बाहेर खेचला जातो. त्यानंतर दोन्ही बाजूंना...(बाबुराव दोन्ही हातांनी क्रिया करून दाखवितात) दोन माणसं एक मोठी शीग घेऊन उभे असतात. लांब भट्टीतून दाराशी आणलेला तो पांढराफटक असा ओघळता लोखंडाचा तुकडा एकजण सांडशीने पकडतो आणि ते दोघेजण शीग पुढे करून त्या शिगेवर तोलून धरतात. पुढे दोघेजण आणि पाठीमागे एकजण असा धावत जाऊन ते ओघळत्या लोखंडाचे थेंब खाली पडत असतात. भट्टीचा आणि त्या लोखंडाचा दाह तिघांनाही होरपाळीत असतो...पळत पळत जाऊन वाफेच्या दाबांवर चालणाऱ्या हॅमरवर, तो ओघळता आणि पांढरा लोखंडाचा खंड ठेवून देतात. खाली साचा असतो आणि वरून तो दाबाचा हातोडा एक मनुष्य आदळीत असतो आणि सांडशीने ज्याने तो धरलेला असतो तो उलटीत पालटीत असतो. पुनः थोडा बहुत आकार आलेला तो लोहखंड मशीनवर न्यायचा असतो. तिथे त्याच्याभोवती फटक्यामुळे आलेले वेडेवाकडेपण कापले जाते आणि तो पुनः भट्टीत टाकला जातो. दुसरा लोखंडाचा खंड पळत तिघांनी घेऊन यायचे. पुनः तो ठोकला जातो. पुनः भट्टीत टाकला जातो...हे काम अतिशय कष्टाचे व धोक्याचे असते. हे काम मला दिलेले होते...प्रारंभी मी घाबरलो होतो. तर तेव्हा मी कविताही लिहीत होतो. कथाही लिहीत होतो आणि अव्यंग जगणे मला अधिक महत्त्वाचे वाटत होते. पण नंतर मी ते काम अतिशय समरसून केले व मला कोणत्याही प्रकारची दुखापत झाली नाही. मजा आली कामामध्ये...

मी : बाबुराव, तुमचं हे वर्णन ऐकून मॅक्झीम गोर्कीची मला आठवण होतेय...तुम्हाला आठवतं का तोही बोटीच्या बायलरमध्ये पोरवयातच काम करायचा...

बाबुराव : मला ते आता पुरेसं आठवत नाहीय...(सौ. नेरूरकर जेवणाची आठवण करून देतात. दुपारचे अडीच वाजले आहेत...आम्ही थांबलोत...बोलायचे जेवणानंतर...)

मी : किती वर्षे हे काम केलेत तुम्ही बाबुराव ?

बाबुराव : तर हे मी जे वर्णन करून सांगितले त्या लोहारखात्यामध्येच वेगवेगळ्या विभागात बदली होता होता मी पेंटशॉममध्ये गेलो आणि तिथूनच मी नोकरी सोडून मोकळा झालो. यामध्ये साधारणपणे बारा वर्षे गेली. मवाशी मी तुम्हाला जो अनुभव सांगणार होतो तो मात्र सुरतचा आहे.

मी : म्हणजे तुमच्या बदल्या होत होत्या ?

बाबुराव : सुरतला मी रेल्वेमध्येच होतो. तिथे ओघना एंजिन शेडमध्ये...हे एजिन शेड सुरतपासून दोनचार मैल आहे...तिथे एंजिनाच्या दुरुस्तींचं; रंगरंगोटीचं, साफसफाईचं काम चालतं. येथे एंजिनाचा कोळसा ज्या एंजिनाच्या पुढील भागात राहतो...बॉयलरजवळ...त्याच्या आतमध्ये जाऊन एंजिन साफ करावं लागतं. आत जाण्याचं दार लहान असतं...जे नेहमीच कोळसेवाला कोळसे टाकताना आपल्याला सिनेमात आणि कधी धावत्या गाडीतून बाहेरूनही दिसतं...आतमध्ये प्रवेश केल्यावर जरी निखारे वगैरे काही नसले तरी एक धग असते...त्याच्यानंतर हवेचा मोकळेपणा नसल्यामुळे राख आणि कोळशाचे एक गुदमरून टाकणारे वातावरण आतमध्ये असते. आत जाणे एक भयंकर शिक्षेसारखंच असतं. पुनः एंजिन शेडमध्ये काम करताना जो मुक्कादम आम्हा शिकलेल्या मुलांना मुद्दामच आत धाडायचा. बेकारीला कंटाळलेले आम्ही लोक हे असह्य होणारं काम करीत असू...

मी : बाबुराव, हा तुमचा अनुभव ऐकताना मर्ढेकरांची कविता माझ्या डोळ्यांसमोर उभी राहतेय. कोणती ती आठवतेय तुम्हाला ?

बाबुराव : हो... (आठवत)

मी : (अधीरतेने)...हा कोळसेवाला काळा, नव्या मनूतील गिरिधर पुतळा.

बाबुराव : (आठवत) हीच...

मी : या एंजिनशेडमध्ये किंवा लोखंडाच्या भट्टीत काम करीत असताना तुमचेच सहकारी तुमच्याकडे कोणत्या दृष्टीने बघत असत ?

बाबुराव : सांगतो ना, कशामुळे का होईना परंतु माझा द्वेष करीत नाहीत. माझ्या आयुष्यात जेवढे काय कामगार आले त्यांच्यापैकी कोणीही मला त्रास होईल असे केलेले नाही. मॅक्झीम गोर्कीच्या गोष्टीमध्ये त्या मिठागरातील कामगार एकमेकांचा द्वेष करीत होते. तो द्वेष काही माझ्या वाट्याला आला नाही. त्याचं कारण हे होतं की मी लोकांची पत्रे, मनीऑर्डरचे फॉर्म, रजेचे अर्ज किंवा अशाच प्रकारचे लेखन करीत असे. सतत वाचत असे आणि सर्वजण माझे बौद्धिक वर्चस्व सहजासहजी मान्य करीत असत. कदाचित माझ्या नीतीने वागण्याचाही तो परिणाम असेल.

मी : म्हणजे ही धर्मनीती का ?...

बाबुराव : हां...(विचारात गुंतत)...चोरी न करणे, लबाड न बोलणे, दारू न पिणे,

कोणाला न फसविणे ही जशी कुठल्याही लोकशाहीवादी माणसाची नीती होऊ शकते तशीच दहापाच हजार वर्षांपूर्वीच्या माणसांचीही ती नीती असू शकते. मी मागे 'बौद्ध साहित्य आणि दलित साहित्य' हा वाद चालला होता तेव्हा दोन तीन मुद्दे उपस्थित केले होते. सद्‌वर्तनी हिंदू, सद्‌वर्तनी मुसलमान, सद्‌वर्तनी खिश्चन आणि सद्‌वर्तनी बौद्ध हे सारखेच असतात. या सद्‌वर्तनावर लिहिलेली कथा किंवा कादंबरी जशी बौद्ध नसते, हिंदू नसते, तशी खिश्चनही नसते. सद्‌गुण हे जगातील सर्व धर्मांनी गौरविलेले आहेत.

मी : (थोड्याशा थट्टेने) म्हणजे बाबुराव तुम्ही सद्‌गुरू झालात का ?...

बाबुराव : (मंद सौम्य हसतात. काही बोलत नाहीत.)

मी : बाबुराव, तुमची 'जेव्हा मी जात चोरली होती' ही कथा याच वेळच्या अनुभवातून आली आहे का ? त्या कथेतील तुम्ही कोण आहात ?

बाबुराव : (पानपट्टी तोंडात कोंबत) हो, त्या कथेतील काशीनाथ सकपाळ मी आहे आणि मीही मी आहे. दलित समाजातल्या तरुणाच्या ठायी या दोन्ही प्रवृत्ती असतात. एक स्वतःचं ब्राह्मणीकरण करून घेण्याची प्रवृत्ती आणि दुसरी आंबेडकरी प्रवृत्ती.

मी : बाबुराव; डॉ. आंबेडकरांनी धर्मपरिवर्तन घडवून आणलं, त्यापूर्वीचे तुम्ही व त्यानंतरचे तुम्ही कोणकोणत्या मनोजाणिवांतून किंवा संवेदनातून जात होता हे जरा मागे वळून सांगू शकाल का ?

बाबुराव : (खूप चिंतनात गढलेले) आंबेडकरी जाणीव ही चारपाच प्रकारांनी व्यक्त होते. पहिला प्रकार असा की मला दलित राहायचे नाही. म्हणजे मला महार, मांग, चांभार राहायचे नाही. या नकारात्मक प्रवृत्तीतून जे जे म्हणून या मांग, महार, चांभार समाजाशी, संस्कृतीशी, रीतीरिवाजांशी, संबंधित आहेत किंवा जखडलेले आहेत, ते ते तोडून टाकणे. अशी पुष्कळ पात्रे एक लेखक म्हणून मला माहीत आहेत. यांच्यातील दोन उदाहरणे सांगायची म्हणजे तर एकाने आपल्या जाती गोतीशी असलेले सर्व बंध तोडून टाकले. परंतु दुसऱ्या लोकांशी आर्थिक किंवा शिक्षणाच्या अभावामुळे त्याला संबंध जोडता आले नाहीत. त्याचं अत्यंत एकाकी व्यथापूर्ण जीवन एका मोठ्या कथेचा विषय होऊ शकेल असे आहे. दुसरे एक उदाहरण असे देतो. तो शिकलेला होता आणि त्याने सर्व संबंध खालचे तोडलेले होते. मोठ्या सरकारी नोकरीला लागलेला होता. आणि त्याने आंतरजातीय विवाहसुद्धा केला होता. या मुलाकडे जेव्हा त्याचे आईबाप आले तेव्हा बायकोशी परिचय करून देताना हे माझे गाववाले आहेत व महार आहेत असा परिचय करून दिला. त्यामुळे त्याच्या आईबापांना त्याच्या

बायकोकडून उपेक्षेची वागणूक मिळाली. अशा पुष्कळ गोष्टी आहेत. या गोष्टीतील कारुण्य व दुःख हे केवळ भारतीय संस्कृतीनेच निर्माण केलेले आहे. याच्यातील दुसरी प्रवृत्ती म्हणजे मला महार राहायचं नाही. म्हणजे मला ब्राह्मण व्हायचं आहे. मला साहेब व्हायचं आहे...तर या कडव्या ब्राह्मणांची आणि दांडग्या साहेबांची कथानके सुद्धा हृदयभेदक आहेत. घरात, दारात, मुलाबाळांचं, बायकोचं, सर्वांचं तो साहेबीकरण करून टाकतो हे सर्वांनाच असह्य होतं. त्यालाही होत असतं. परंतु महार, मांग राहायचं नाही या एकाच ईर्ष्येपायी हे विषाचे घोट किंवा अग्नीचा अनुभव ते घेत असतात. ब्राह्मणीकरण करून घेतले त्यांच्या फजितीचीही आणि दुःखाचीही खूप उदाहरणे आहेत. एक ट्रॅजिडी मी तुम्हाला सांगतो. एक असाच रस्त्यावर चांभारकी करणाऱ्याचा मुलगा. गोरापान–देखणा–शिकला आणि मोठ्या नोकरीला लागला. मामलेदार वगैरे झाला. गावकऱ्यांना–तो जिथे बदलून जात असे तिथे–त्याची जात सरकारी माध्यमातूनच कळत असे. कारकून पट्टेवाले, अमकेतमके यांचेकडून गुपचूपपणे समजत असे... हा माणूस बदललेल्या गावी नेहमीच वाण्या ब्राह्मणांचं घर घेऊन राहत असे. एकदा त्याची मुलगी वारली आणि तिच्या प्रेतयात्रेला गावातील मंडळी येईनात. त्याच्यापुढे प्रश्न पडला की हा विधी करायचा कसा ? जातीच्या पद्धतीने, ब्राह्मणाच्या पद्धतीने, मराठ्याच्या पद्धतीने,...प्रेत पडलेले होते. शेवटी गावातील वृद्ध गृहस्थ आले. ते म्हणाले, 'साहेब, तुम्ही ज्या जातीगोतीचे आहात त्याप्रमाणेच विधिकर्म केलेत तर पोराला सद्गती मिळेल...तेव्हा हे प्रेत घेऊन घरी जा...किंवा तुमच्या जातवाल्यांना कळवा...' त्याने जातवाल्यांशी संबंध तोडलेले होतेच. त्यामुळे ते येईनात. शेवटी तो शरण गेला. माफी मागू लागला. तेव्हा मग जातीचे लोक आले. दुसऱ्या दिवसापासून त्याने आपले घर बदलले व हरलेल्या मनान तो त्याच्या जातीच्या वस्तीत गेला...तर त्या आंबेडकरी आंदोलनातून प्राप्त झालेल्या नकारातून या अशा प्रवृत्तीही पुढे आल्या. त्याचप्रमाणे स्वतःला दलित म्हणजे क्रांतिकारक, दलित म्हणजे बंडखोर, दलित म्हणजे लोकशाहीचा विकास करणारा, दलित म्हणजे नवी रचना करणारा आणि जुन्याचा विध्वंस करणारा अशाही प्रवृत्ती आल्या...आंबेडकरी आंदोलनातून आलेला नकार अशा दोन प्रकारे व्यक्त होतो...एक ब्राह्मण साहेब होतो... एक बंडखोर क्रांतिकारक होतो...

मी : बाबुराव ! यातूनच 'दलित ब्राह्मण' ही संज्ञा जन्माला आली काय ?

बाबुराव : मीच वापरली ती पहिल्यांदा डी. बी.

मी : आता ती चांगलीच दलितांकडूनही वापरात येताना दिसते होय ना ?

बाबुराव : होय. पण हिचा प्रभाव अजूनही समाजात आहे. अजूनही समाजात डी. बी. ची संख्या आहे. काँग्रेसशी म्हणजे सत्तेशी समझोता करावा असे या डी. बी. ना मनःपूर्वक वाटत असते.

मी : बाबुराव, 'दलितांची मानसिकता' हा शब्द तुमच्या बोलण्यातून नेहमी येत असतो. नेमकी ही कोणती मानसिकता तुम्हाला अभिप्रेत आहे ?'

बाबुराव : मी अस्पृश्य आहे ही एक जाणीव. मी अस्पृश्य आहे म्हणजे दुःख, दैन्य, दास्य जिथे एकत्रित केलेले आहे त्या वास्तवात मी राहतो. याचे भान ही दुसरी जाणीव. मी अस्पृश्य आहे म्हणजे दुःख, दैन्य, दास्य अनुभवतो आहे, भोगतो आहे, ही तिसरी जाणीव. हे सर्व देण्याला कारण जशी वर्णव्यवस्था आहे, तिची वैचारिकता आहे, तिची समाजव्यवस्था आहे, तशीच तिची अर्थव्यवस्था व राजकारणही आहे. म्हणजे अस्पृश्यतेचे उच्चाटन करणे याचा अर्थ दुःख, दैन्य, दास्याचे उच्चाटन करणे ... याचा अर्थ असा-धर्मसत्ता, दंडसत्ता, अर्थसत्ता बदलविण्याचे क्रांतिकार्य करणे. ही क्रांती संपूर्ण क्रांती असते. ही केवळ राजकीय क्रांती नसते. आर्थिक क्रांती नसते. केवळ सामाजिक व धार्मिक क्रांती नसते. तर सर्व क्रांत्यांचा समावेश झालेली ती सम्यक व संपूर्ण क्रांती असते. दलित मानसिकता म्हणजे ही सम्यक क्रांतिकारकता असते. म्हणजेच दलित वैचारिकता म्हणजे संपूर्ण सम्यक क्रांतिकारिकता होय.

मी : तुमची 'सूड' ही कादंबरी मला फार आवडते. मराठीतील एक अव्वल श्रेष्ट-दर्जाची कलाकृती व लेखनकृती आहे. मी ती पुनः पुनः वाचतो आणि थक्क होऊन जातो. बाबुराव ... या कादंबरीतील पात्रे तुम्हाला कशी कुठे भेटली होती ? ... विशेषतः तो स्वामी ... जो आजही माझ्या मनाला झपाटून राहिलेला आहे ... आणि ती ज्वाला ... जानकी ...

बाबुराव : (काहीसे आश्चर्याने) केवढी मोठी चर्चा आहे ही ...

मी : होऊ दे ... अशी चर्चा एकदाच होते ...

बाबुराव : या कादंबरीच्या लेखनाच्या वेळेला स्वप्न आणि वास्तव, विकृती आणि आदर्श, असे दोन प्रवाह किंवा दोन जाणिवा माझ्या मनात होत्या. जानकी ही तुमच्या नि माझ्या पाहण्यात किंवा प्रत्येक विवाहित पुरुषाच्या पाहण्यात येणारी स्त्री आहे आणि सत्प्रवृत्त विवाहित पुरुषाच्या ठायी तो स्वामी असतोच. देव, धर्म आणि देश यापेक्षाही माणूस मोठा आहे. हे त्या कादंबरीमध्ये दोन्ही पात्रे वेगवेगळ्या प्रसंगी बोललेली आहेत. एक लेखक म्हणून माझी ठाम श्रद्धा आहे की माणूस खरोखरीच देव, धर्म आणि देशापेक्षा मोठा असतो. पण कोणता

माणूस ? जो माणूसच असतो तो. माणसात काही माणसं माणूस नसतात, फक्त ब्राह्मण असतात. मुसलमान असतात. फक्त हिंदू असतात. फक्त पुरुष असतात. नर असतात. तो स्वामी हा फक्त मनुष्य आहे आणि जानकीची धडपड सुद्धा फक्त 'माणूस' होण्यासाठीच चाललेली आहे. म्हणून तिला स्त्रीपण नको असतं. स्त्रीपण म्हणजे मादीपण. मादीपण म्हणजे उपभोग्यपण. रचना अशी केलेली असते की स्त्रीला उपभोग्य वस्तू म्हणून अधिक सरस कसे व्हावे हा आदर्श दिलेला असतो. जागतिक वाङ्मयामध्ये अशा सरस उपभोग्य असलेल्या कामिनींची खूप वर्णने आलेली आहेत.

मी : म्हणजे 'सेक्स डॉल' किंवा 'लिंग बाहुली' म्हणूनच स्त्रीकडे पाहिलं जाते का ?...

बाबुराव : स्त्री आणि पुरुष दोन्हीही स्त्रीकडे त्या दृष्टीनेच पाहतात. याच्यातून स्त्रीचं द्रव्यमत्व सिद्ध होतं. पशूमध्ये सुद्धा मादी असते, पण ही मादी सरस मादी होण्यासाठी धडपडत नसते. कामप्रवृत्ती त्यांच्याही ठायी असते. पण (विचारात) आणि ती मानवापेक्षा कमी नसते ... तर जानकीचा जो क्षोभ आहे तो ... तसे अनेक अर्थ सांगणारा आहे. तो वर्णव्यवस्थेच्या विरोधात जातो. तो एकंदर आपले सौंदर्यशास्त्र, काव्यशास्त्र, कामशास्त्र, धर्मशास्त्र यांनी जो स्त्रियांबाबत दृष्टिकोन व त्यांचे स्थान तयार केलेले आहे त्याच्या विरोधी असतो. लुटालुटी-पर्यंत पोचलेली कामप्रवृत्ती ही शोषणव्यवस्थेचं द्योतक असते. विषमतापूर्ण समाज-व्यवस्थेत संपत्तीचा संग्रह होतो म्हणून चोर लुटारू निर्माण होतात. बळी तो कान पिळी या न्यायाने हा संग्रह होतो. स्त्रियांवर अन्याय आणि बलात्कार हे-सुद्धा त्या विषमतापूर्ण समाजाचीच मानसिकता व्यक्त करीत असतात. या अन्याय अत्याचारांचा आत्यंतिक विरोध जानकीच्या विचारातून व वर्तनातून प्रकट होतो. स्वामी मात्र वर्णविहीन, वर्गविहीन, संस्कृतिविहीन, धर्मविहीन, असा निसर्गदत्त पुरुष आहे. तिची जेव्हा खात्री होते हा तसा आहे तेव्हा त्यांचे मीलन होते.

मी : पण कुणी कुणावर मग कोणता सूड घेतला बाबुराव ? ...

बाबुराव : दोषपूर्ण समाजावर विशुद्ध किंवा परिपूर्ण माणसाने घेतला.

मी : म्हणजे जानकी ही परिपूर्ण माणूसच आहे—ती केवळ स्त्री नव्हे ... केव्हा केवळ पुरुष नव्हे. होय ना ?

बाबुराव : (फक्त मान हालवतात ... मग स्वतःशीच बोलतात) ... यज्ञातून जशी याज्ञसेनी बाहेर आली ... (आपल्याशीच)

मी : बाबुराव, 'सूड' च्या संदर्भात बोलताना 'सूड' ला प्रस्तावना लिहिणाऱ्या डॉ.

वानखडे यांची मला आता आठवण होतेय ...त्यांनी दलित वाङ्मयाची व्याख्या आपल्या प्रस्तावनेतून दिली ... आज ते आपल्यातून निघून गेलेत. त्यांच्याबद्दल तुम्हाला या क्षणाला काही सांगावंसं वाटेल का ?


बाबुराव : (भारावून) ... डॉक्टर हे अतिशय उमदे, लहान मुलासारखे सरळ साधे. लहान मूल जसं अहिंदू, अमुसलमान, अखिस्ती असते तसे काव्य आणि ज्ञान यामध्ये रममाण होणारे सद्गृहस्थ होते. त्यांच्या या साधेपणातच त्यांची दुःखेही होती. त्या दुःखाने त्यांना फार त्रास दिला व ते अधिकाधिक एकाकी होत गेले. त्यांच्या आणि आमच्या चर्चा जेव्हा समाजावर चालत तेव्हा आम्ही दोघेही एकाच विचारावर येत असू. आणि तो विचार म्हणजे 'सूड' मधले 'स्वामी.' डॉक्टर आणि माझे अनेक मित्र यांची जर तुलना केली तर डॉक्टर हे खरोखरीच खूप अहिंदू होते आणि मला अहिंदू असणे हे ज्याची मानसिकता आणि वैचारिकता पूर्णपणे बदललेली आहे अशांच्याच ठायी आढळते. द्वेष, मत्सर, अहंकार आणि तिरस्कार हे हिंदू जातिव्यवस्थेमधून प्राप्त होणारे शत्रू आहेत. डॉक्टरांच्या ठायी हे नव्हते म्हणून मी त्यांना अहिंदू म्हणतो ... जातीचा हा संस्कार किंवा जातीची ही देणगी बौद्ध होण्यासाठी नाकारणे आवश्यक असते. आणि ज्याची बुद्धी हे पाहू शकते तोच हे नाकारतो. बाकीचे मात्र क्रांतिकारक असूनही हिंदू असतात व बौद्ध असूनही हिंदू असतात.

मी : भगवान तथागत बुद्ध आणि 'सूड' मधील 'स्वामी' याचं दुरून किंवा जवळून नातं आहे का बाबुराव ?... हा मी या मुलाखतीतला तुम्हाला शेवटचा प्रश्न विचारतोय. बुद्धाला शरण जातच मला ही मुलाखत संपवावीशी वाटतेय ... त्याने जगाला भौतिक दृष्टी दिली.

बाबुराव : भगवान बुद्ध म्हणजे माणसातील परमोच्च माणूस. स्वतःला घडवीत घडवीत त्या अवस्थेपर्यंत गेलेला, पुरुषोत्तम आणि स्वतःचे स्वतःला घडवीत परमोच्चपदाला जाणारा यांच्यात फरक असतो. मला भगवान बुद्ध अत्यंत आदरणीय वाटतात कारण माणसाबद्दल आत्यंतिक करुणा आणि माणसाचे प्रश्न सोडविण्याची प्रखर बुद्धिमत्ता त्यांच्याजवळ होती ... त्यांची दृष्टी विशाल व आधिभौतिक होती. तुझे दुःख तू दूर करू शकतोस, तो म्हणतो.


(बाबुराव आणि मी, आम्ही दोघेही अंतर्मुख होतो. संध्याकाळचे पाच वाजतात. माझ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा एक घोळका अकस्मात मला भेटायला येतो आणि आमची मुलाखत तिथेच संपते.)

•



स्वगत

स्वगत



एक :

डोक्यावर मोठमोठे केस, मोठे कपाळ, मोठे डोके, मोठे डोळे, अंगात सैल सदरा, पैजामा, पायात चप्पल. डोक्यात अनंत विचार. खिशात नोकरीसाठी अर्ज, ओळखपत्रे. बगलेत एक दोन पुस्तके. हा मी रस्त्यावर.

सकाळपासून कंपन्याकंपन्यांवर भरती आहे का पाहत जाणे, असेल तिथे उभे राहणे. दुपारी दोन तीन वाजेपर्यंत नोकरी मिळते का ते पाहणे. मग थकून भागून स्टेशनवर येणारी जाणारी गर्दी बघत बसणे. कधी बागेत, कधी लायब्ररीत वाचत बसणे.

पाहणे वाढले होते. खूप दिसू लागले होते. पाहण्याच्या अभ्यासाने दृष्टी विस्तारत होती. अनुभव, माणसे, दृश्ये कळू लागली होती.

संध्याकाळी सभा संमेलनात. एखाद्या चित्रकला प्रदर्शनात.

आत खूप गर्दी वाढत होती. खळबळ वाढू लागली होती. भाषणे, संभाषणे, उद्‌गार, सूत्रे, स्वगते उचंबळून येत होती. वहीवर लिहू लागले की काही ओळी सापडत, त्या आवडत नसत.

आतली खळबळ ऐकण्यात, पाहण्यात, खिन्न कष्टी होण्यात, लुब्ध, व्याकुळ होण्यात अन् केव्हा केव्हा प्रेषितासारखे बोलण्यात जे सुख असे ते लिहिण्यात मिळत नसे. लिहिणे फार रुक्ष, निःसत्त्व वाटे.

जन्मच दुःख, दैन्य जिथे जन्मते, वाढते, तिथेच झालेला. पाहिले फक्त दुःख-दैन्य. दलितांतून येणाऱ्या माणसाचे मन फाटलेले असते. एक महावेदना सारखी वाहत असते. ती बुजली जाऊ नये. असेच वातावरण, अशीच परिस्थिती धर्माने करून ठेवलेली असते. ही वेदना माझ्याही ठायी होती.

जे बंधने तोडून स्वतःला मोकळे करू शकत नाहीत, ते बाई आणि बाटलीत देव-दैवांत ती जखम, ती वेदना बुडवू बघतात.

आंबेडकरी चळवळीतून येणाऱ्यांच्या मनात हे दुःख, ही वेदना असतेच. पण एक उग्र अहंकार, एक राग, एक सूड, नकार आणि क्रोधही असतो. कारण त्याला इतरांपेक्षा अधिक दिसते. दुःखाला, दैन्याला, दास्याला कारण आहे–जात. जातीला कारण आहे–वर्णव्यवस्था. वर्णव्यवस्था टिकवून धरणारा आहे हिंदुधर्म–हिंदुधर्म म्हणजे पक्षपाती धर्म–उच्च वर्णाला सर्व काही देणारा–आणि हीन वर्णीयांना सर्व काही नाकारणारा-क्रिमतेचा पक्का पहारेकरी. त्यांच्या व्यवस्थेमुळेच हे सर्व मिळाले. ह्या देशात जन्मल्या-मुळे हिंदुधर्म वाट्याला आला आणि हिंदुधर्मामुळे हे दुःख, दैन्य, दास्य वाट्याला आले. इथे जन्म घेतला नसता तर ! पुष्कळ पुष्कळ आठवे, आपले, सग्यासोयऱ्यांचे–मित्रांचे–त्यांच्या मित्रांचे, सग्या सोयऱ्यांचे. मग चीड येई. क्षोभ होई. स्वतःबद्दल, देशा-बद्दल, हिंदुधर्माबद्दल, इथे जन्म देणाऱ्या आईबापाबद्दलही राग येई. कशाला जन्म दिला ? या छळछावणीत ! नको–हा जन्म नको. हे जगणे नको.–हे आईबाप नकोत–हा देश नको–हा धर्म नको–हे लोक नकोत–नकार वाढत जाई. दुःख, क्षोभ होत जाई.

या दांभिकांच्या दुष्ट दुनियेत
क्षणभर नाही चैन मला...
म्हणेल केव्हा हा देश मला
ये, तरुणा, ये, ही थापी घे, हे पेन घे, हे अवजार घे
ये किमयागार ये ..... शिल्पकार ये !

सुचेल ते लिहिणे–विवंचनेत, विचारांत डुंबून दररोज सकाळी बाहेर पडून नोकरी शोधीत वणवण भटकणे. उरातील विचार, उद्‌गारांशी खेळत कष्टाचे, उपेक्षा, वंचनेचे बोजे हलके करणे. लिहिणे आणि विचार करणे ही तेव्हा दवा होती. दारूही होती.

उमरखय्याम, तुझी कविता वाचून वाटते
आपणही उमर व्हावे ... तरुण व्हावे.
पण मी जन्मलो या देशात.
इथे कोठली वही, कोठली सुरई,
इथे तर मी आजन्म कैदेत ...

ज्यांनी चूक केली येथे जन्म घेण्याची
त्यांनी ती सुधारली पाहिजे ...
भीषण युद्धे करून ... अथवा 'देशांतर करून' ...

संध्याकाळी घरी यावेसे वाटत नसे. कामावरून आलेले कामगारांचे थवे पाहून मन खिन्न होत असे. घरी जाऊ नये. नोकरी लागल्याशिवाय घरी येऊ नये. मन तडफडत असे. उदास-उदास, खिन्न वाटत असे. कोठे तरी दूर जाऊन बसावे. आणि आपल्यातच रमून जावे. पण जायचे कोठे ? सर्वत्र जाऊन आलेला असे. उद्योगाचे टापू , ऑफिसे, एम्प्लायमेंट, नोकरी करणाऱ्या मित्रांची ऑफिसे, बागा, समुद्रकिनारे. मनाला रमविणारी, वेदना देणारी अनेक दृश्ये–अनेक ठिकाणे. सर्वांचा वीट आलेला असे. भूक लागलेली असे. थकवा असे. घरी जावे. पडावे. जेवावे. थकवा गेला की वाचीत बसावे. तत्त्वज्ञानाचे पुस्तक. ते चांगले खिळवून धरते. आनंद देते.

पूल ओलांडून आत आले की अनेक ओळखीचे चेहरे दिसत. मळलेले. झिंगलेले. उदासवाणे. दोन जगांची जाणीव होई. कधी बाहेरचे सुंदर चेहऱ्यांचे, सुंदर वस्त्रांतील नीटनेटके जग आवडत असे. कधी हे मळलेले, गरिबीचे, पण आपले जग आवडत असे. कोणी भेटू नये, बोलू नये म्हणून बगलेतील पुस्तक काढून वाचीत चाळीपर्यंत जायचे. सर्वांना माहीत होते. त्यामुळे कोणाला आश्चर्य वाटत नसे. उलट एखादी आई पत्ते खेळत बसलेल्या आपल्या लेकाला ओरडे, गाबरा उठ. अभ्यास कर. तो भाऊ पय. जवा पहावा तवा तोंडापुढं पुस्तक घेऊन दिसतो अन् ... तू मड्या, तुह शिक्शान कसं व्हयाचं ...'

खरोखर, कसं त्याचं शिक्षण व्हायचं ? माझ्या मनात प्रश्न उठे. हातातले पुस्तक खाली जाई. डोक्यात विचार सुरू होत. आपल्याच विचारांत चाळीत शिरे. दगडी कोळशाच्या धुराने चाळ भरलेली असे. बारा खोल्यांतील कोणीतरी खोलीत भांडत असे. कोणी दारू पिऊन पडलेला असे. केव्हा बडबडत असे. खोलीपुढे येताना मन बेचैन होई. नोकरी नाही. मावशी बघणार. बायको बघणार. दोघीही नाराज होणार. लग्न मराठवथीत असतानाच झालेले. ती आता उपवर झालेली. इतर मुलींप्रमाणे तिला संसार पाहिजे. नवरा पाहिजे. नवरा असा. बेकार ...

कधी खोलीपुढे मित्र वाट बघत बसलेले दिसत. त्यांना चर्चा करायची असे. मी फार वाचतो म्हणून ते येत. तर कधी मावशीचे आणि बायकोचे भांडण ऐकायला शेजारी दिसत. हे भांडण पाहिले की मागे परते. पण मला बाहेर जायला मिळत नसे. रस्त्यावर दोन गटांत तुफान दगडफेक चाललेली असे. लेबर कॅम्पात दोन गटांत नेहमीच जोरदार मारामाऱ्या होत. काठ्या, कुऱ्हाडी, दगडविटांचा सर्रास वापर होई. लोकांची पळापळ होई. मारामाऱ्या फार. भांडणे फार. मुलांच्या सांस्कृतिक, भावनिक, बौद्धिक वाढीसाठी एकही दिवा कोणी पेटविलेला नव्हता. तशा तिथे दोन पार्ट्या मोठ्या. शेड्यूल्ड–कास्ट फेडरेशन अन् कम्युनिस्ट. पण याबाबत कोणीच काही केलेले नव्हते. करायला हवे होते. त्यामुळे शाळा सोडून देणाऱ्या, अधःपतित होणाऱ्या मुलांची संख्या मोठी. फार मोठी शाळा सोडून मवाली–दारुडे, गांजाडू–जुगारी मुले फार. माझ्या बरोबरीचा एक मुलगा तर खुनी म्हणून विख्यात झाला. अनेकांवर त्याने चाकू चालविले. त्याला रक्त पाहण्याचे वेड होते. अंगावर शुभ्र पोशाख पाहिला की त्याचा मनःक्षोभ होई. पुढे तो दोन खून करून पकडला गेला. लेबर कॅम्पात तरुणांची ताकद अशी वाया जाते. गुंडगिरीकडे मुले लवकर वळतात. अन् लवकर नष्ट होतात.

लेबर कॅम्पात असे वातावरण. आता थोडेसे बदलले आहे. पण शाळा सोडून बेकार बनणाऱ्यांची संख्या तेव्हाही मोठी होती. आताही आहे. मी या अधःपाताकडे जाणाऱ्या आंधळ्या प्रवाहात का सापडलो नाही ? तसे पाहिले तर मी एकटाच. आई-वडील गावी. मावशीकडे वाढलेला. तिला प्रेम अथवा काळजी अथवा जपणूक करण्याची माहिती नव्हती. कला, गुण, सद्‌गुण, हे तिला ओळखता येणे शक्य नव्हते. पैसा मिळविणे, मारामाऱ्या करून नाव कमविणे हे तिला कळणारे होते. मी तसा नसल्यामुळे आणि वाचनाची–लिहिण्याची आवड असल्यामुळे, तिला फारसा आवडत नसे. पुढे पुढे तर ती तिरस्कारच करू लागली. उपेक्षा करू लागली. भांडणे काढू लागली. जायचे कोठे ? गावी जाऊन नोकरी लागणार नव्हती. शिक्षण होणार नव्हते. लिहायला वाचायला मिळणार नव्हते. म्हणून मुंबईला राहणे भाग होते. त्यासाठी आधी नोकरी पाहिजे होती. आणि ती मिळत नव्हती. बारीक सारीक नोकऱ्या मिळत. त्या करण्यात मन लागत नव्हते. पण त्या करीत होतो आणि पुस्तके वाचीत होतो. लिहीत होतो. विचार करीत होतो.

तू जिथे दैन्यदास्य चिरंजीव करून ठेवलेस
तिथेच माझा जन्म झाला आहे
तुला वाटले असेल मीही
माझ्या पूर्वजांप्रमाणे सडून किडून मरेन.
अथवा सोबत्यांप्रमाणे वहात जाईन.

पण झाले वेगळेच.
ज्याने दुःख पाहिलेले असते
त्याला मार्गदाता म्हणतात.
मी दुःख पाहिले आहे,
म्हणून मी हात उंचावून तुला सांगतो
तुझे सर्व चिरंजीव मरणार आहेत.
प्रलय आले आहेत, मला प्रलय केले आहे !

हे देव, देवळे, हे सणवार
ही जमीन, हे आकाश, हे ग्रहगोल, तारे
हे वारे, हा समुद्र, ह्या नद्या, हे डोंगर
सर्व काही तुमचेच आहे !
माझे काय ? हे दुःख, हे दैन्य, हे दास्य...
हा देश दुःखाचे आगर आहे.
म्हणून देव देवळे फार आहेत
अन् डॉक्टर,
तुमच्या साठीही देवळे होताहेत.
त्यांना काय ?
देव हवे आहेतच. देवळे हवी आहेत.

दोन :

नोकरी मिळविण्याची धडपड चालूच होती. पायपीट चालूच होती. वेगवेगळ्या दृश्यांनी, अनुभवांनी, विचारांनी, उद्‌गारांनी मन भरत होते. अंतःकरण एक विश्वच झाले होते, तिथे सारखे काही तरी घडत होते. मोडत होते. आकारात येत होते. निराकार होत होते. मोठमोठी स्वगते उंचबळून येत होती. रस्तोरस्ती ती निनादत राहत होती. कधी देशाला, कधी धर्माला, कधी व्यवस्थेला, कधी क्रांतीला तर कधी स्वतःला उद्देशून येत होती. कधी सूत्रे, संभाषणे अथवा काही उद्‌गार उठत होते. कधी वहीत, कधी कागदावर, कधी पुस्तकावर, ते नोंदवले जात होते. मनात चाललेले हे अनंत नेत्रदीपक, रंगरस आणि तेजोमय खेळ पाहून खूप सुख वाटत होते. हे सुख खरोखरच अद्‌भुत असते. आता वाटते, ती माझ्या दुःखी कष्टी व्याकुळ मनाची माझ्याच मनोरंजनासाठी रिते, दुर्भंगलेपण येऊ नये, यासाठी केलेली करामत होती. शेकडोंनी पाने या उद्‌गारांनी भरतील असे मी लिहिले. छापले नाही. त्याचे कौतुक वाटले नाही. फाडून टाकले, हरवून गेले. फेकून दिले. पुढे पुढे तर हे लिहिणे, हे कवितेसारखे काही तरी मनात येणे, एखादी महान गोष्ट पाहून ती चार ओळींत कशी तरी बसून जाणे हे

मला आवडेनासे झाले. काही तरी मोठे लिहिले पाहिजे. तत्त्वज्ञानासारखे. महान कादंबऱ्यांसारखे. ही काय कुरकुर ? ही काय भुरभुर ? पावसाळा पाहिजे. प्रलयाचा, धबधब्यासारखा, अबघे काही दणाणून, हादरून, सोडणारा.

पण येणारे अनुभव केवढे दाहक, केवढे थरारक आणि दुभंगून टाकणारे होते. ह्या अनुभवांची अंतःकरणात होणारी निर्मिती मात्र एखादे सूत्र, एखादी भावना, राग, दुःख, खिन्नता, निराशा अथवा वासना, प्रेम होत असे. बहुधा त्या सर्व भावना शेवटी करुणा, प्रेमातच अथवा काव्य, संवाद, स्वगतात आकारत.

मला ही आत चाललेली अनुभवातली आगडोंब विझवून टाकणारी त्रुटित निर्मिती नको होती. मी ठरवून टाकले, आता विचार कथेत करायचा. मी तसा विचार करू लागलो. मनातल्या मनात कथा जमू लागल्या. काही काळाने एकाच अनुभवातून अनेक कथा दिसू लागल्या. अनेक प्रारंभ, अनेक शेवट दिसू लागले. अन् मी लिहायचे ठरवू लागलो. लिहू लागलो की मनात असलेली कथा बाजूला होई आणि एखाद्या सूत्रासारखे भले मोठे वाक्य लिहून होई. कथा संपून जाई. मोठी धडपड, मोठी खळबळ–खळखळ आत चालली होती आणि बाहेर तर जीवन नकोसे झाले होते. नोकरी मिळत नव्हती. मॅट्रिकला पुनः बसावे असे वाटू लागले. त्याऐवजी शिक्षक व्हावे असेही पटू लागले. ट्रेनिंग कॉलेजमध्ये नाव दाखल केले. एकाच वेळी एस. एस. सी. चे नापास झाल्यामुळे राहिलेले दोन विषयही घेऊन पुन्हा बसायचे.

पण ठरविल्याप्रमाणे काही होईना. अभ्यासात मन लागेना. अभ्यासाची पुस्तके आली. शिक्षकही लहान लहान वाटत. मी सर्वांपेक्षा मोठा. ट्रेनिंग कॉलेजमध्ये आवडीने वाचले ते फक्त सायन्स. सारखे वाचावेसे वाटे आणि ह्याच काळात मी एक कथा लिहिली. लीला आवटे ह्या माझ्या शिक्षिका होत्या. त्यांच्यामुळे ती कथा तारा रेडीकडे गेली. त्यांनी ' आहार 'चे संपादक व्यंकटेश वकील यांचेकडे दिली. त्यांनी ती ' आहार 'च्या दिवाळी अंकात छापली. ती वाचून शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी तिच्यावर टीका केली. ती टीका मी मान्य केली. आता मी कथेचाच अभ्यास करू लागलो. वह्या भरभरून काढू लागलो. ट्रेनिंग कॉलेजात गैरहजेरी वाढू लागली.

दोन वर्षे गेली. तरी अभ्यास संपेना. कॉलेजात नापास झालो. मॅट्रिकला गणितात नापास झालेलो होतोच. ट्रेनिंग कॉलेजात पुनः गणितात, ग्रामोद्योगात, पाठ आणि इतर काही विषयांत नापास झालो. पास होणारच नव्हतो. कथेत पास व्हायचे होते म्हणून. म्हणी, भाषा, शिव्या, शाप, माणसे त्यांचे सर्व काही वह्यांत नोंदविले जात होते. वह्या, कागद, तुकडे भरून निघत होते. तरी लिहायची हिम्मत होत नव्हती.

आता रेल्वेत नोकरी मिळाली होती. आता बरे होते. पुस्तके, मासिके खरेदी करता येत

होती. घरातील लायब्ररी वाढत होती. जैन, हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध आणि मार्क्स, डा. आंबेडकर, गांधीजी, पं. नेहरू आणि कथाकादंबऱ्या घरी येत होत्या. हिन्दीतले किती तरी लेखक, कवी आले होते. जगातील बडी बडी मंडळी हारीने फळ्यांवर आली होती.

आणि डॉ. बाबासाहेबांनी धम्मदीक्षा घेतली. आनंदी आनंद झाला आणि कथांचा समुद्र खेड्याखेड्यातून, माणसामाणसांकडून माझ्याकडे धावू लागला. लिहावेसे वाटू लागले. पण मन धजत नव्हते, वह्यांवर कथा लिहिल्या जात होत्या. फाडल्या जात होत्या.

डॉ. बाबासाहेबांचा आशीर्वाद घेऊन संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये दलित जनता सामील झाली होती. आणि हिंदुधर्माने आणि खेड्याखेड्याने जपून ठेवलेल्या जाती मागे टाकून लोक पुढे आले होते. एकमेकांचा तिरस्कार करण्याचे सोडून एकमेकांचा सत्कार करू लागले होते. ग्रामीण महाराष्ट्र जातीच्या जोखडांतून, संघटनेतून सुटून ध्येयवादाच्या–लोकशाहीच्या संघटनेत सामील होत होता. खेडेखेडे विचारासाठी, ध्येयासाठी फुटून दोन भाग होत होते. एका बाजूला अनात्मवाद, अनीश्वरवाद, अनित्यवाद, बुद्धि-प्रामाण्यवाद, लोकशाही समाजवाद मानणारा बाबासाहेबांचा समाज आणि फुटलेला अर्धा गाव होता. दुसऱ्या बाजूला स्थितिवादी गाव होता. ही दुफळी क्रांतिकारक दुफळी होती. अशी दुफळी आणि अशी एकी इतिहासात घडली नव्हती. ही दुफळी व एकी दृढ करायला पाहिजे होती. पण बाबासाहेब हे दुही आणि दुफळी एकी दृढ करण्याचे काम अर्धवट टाकून निघून गेले आणि ज्यांना ही एकी, ही दुफळी मोडून काढायची होती, लोकांना पुनः जातीच्या पिंजऱ्यात बंद करायचे होते, त्यांनी समिती फोडण्याचे ठरविले. तसे काम सुरू केले.

हे सर्व मी बघत होतो. विचार करीत होतो. लिहू इच्छित होतो. पण लिहायचे कसे ? दृष्टिकोण कोणता ? कथांचा महापूर तर उचंबळत येत होताच.

तीन :

माणूस कसा असतो ? तो द्वेष करतो. तो प्रेम करतो. त्याला शरीर असते. म्हणून त्याला वासना, भावना असतात. त्यामुळेच जीवन जगावेसे वाटते. अन् मरण नकोसे वाटते. मरण म्हणजे वासना, भावना नसणे. त्या नसत्या तर माणसाने कला, साहित्य निर्माण केले नसते.

माणसाचे शरीर आणि ह्या शरीराचे हे आविष्कार विश्वात्मक आहे. ह्या वासना, भावना वृत्ती प्रवृत्तीवर जे संस्कार होतात त्यामुळेच माणूस त्या धर्माचा, त्या देशाचा, त्या युगाचा होतो.

तूपपोळी जेवले म्हणून, धातूची भांडी वापरली म्हणून, पायात जोडे घातले म्हणून, भारी भूषणे वापरली, भारी पोषाख वापरला म्हणून अथवा माडीचे घर बांधले, वरात गावा-

तून मिरवत नेण्याचा प्रयत्न केला म्हणून अस्पृश्यांवर भारतभर अनक प्रकारचे अन्याय–अत्याचार होत आहेत. हे अन्याय–अत्याचार बाबासाहेबांनी आपल्या भाषणांत उद्धृत केले. का होतात अन्याय–अत्याचार ? कोण करतात हे अन्याय–अत्याचार ? एक किंवा अधिक माणसे एकत्र येऊन एकावर अथवा अधिकांवर अन्याय अत्याचार करतात. म्हणजे शरीरे शरीरांवर अत्याचार करतात. जी मूलतः सारखी आहेत. सारखीच व्यक्त होतात. सर्वांचे विकार, वासना, भावना, सारख्याच असतात. पण अत्याचाराला उद्युक्त झालेल्या शरीरांतील रागाला काम, क्रोधाला, द्वेष–मत्सराला प्रभावित, प्रज्वलित करतो कोण ? मुख्यतः धर्म.

परंतु कत्तली करणारा, जाळपोळ करणारा हा राग केव्हा केव्हा महान असेही कार्य करतो. राग वाईट नाही. वाईट आहे–धर्मसंस्कार. त्यातून निर्माण झालेली वैचारिकता आणि मानसिकता. म्हणजे मूलभूत मानवी प्रवृत्तीवर जेव्हा धर्माचा, संस्कृतीचा, समाजाचा आणि रूढ असलेला रूढी संकेतांचा प्रभाव पडतो तेव्हा केवळ अस्पृश्याने पायात चढाव घातले म्हणून आणि बाईने खांद्यावर पडलेला पदर पुनः डोक्यावर तात्काळ घेतला नाही म्हणून प्राण घेतले जातात आणि आज म्हणजे लोकशाहीचा विचार घेतला म्हणून आपणाला ही धार्मिक कृत्ये अन्याय–अत्याचार वाटतात. पेशवाईपासून थेट रामायण महाभारतकाळापर्यंत हे अन्याय–अत्याचार धार्मिक कृत्यांचाच भाग होते. धर्मदंड–सत्ता एक होऊन शंबुकाचा खून करते. तो खून एक धार्मिक कृत्यच मानलेला असतो. मनू आज भयंकर अन्याय–अत्याचार वाटणारी कृत्ये धार्मिक कृत्ये म्हणूनच करायला सांगत होता.

ब्रिटिश आले. नवे कायदे, नवे ज्ञानविज्ञान आले. नवी उत्पादनाची साधने आली. नवे वर्ग जुन्यातूनच उदयाला आले आणि तेव्हापासून अनेक धार्मिक, पारंपरिक धार्मिक कृत्ये अन्याय–अत्याचार या सदरात सामील होऊ लागली.

पण स्वराज्य आले, लोकशाही आली, तरी हे अन्याय अत्याचार घडत आहेत. म्हणजे हे गुन्हे घडविणारी सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, आर्थिक स्थिती कायमच आहे आणि या गुन्ह्यांना धार्मिक कृत्ये समजणारी धार्मिकताही कायम आहे. तर उलट या धार्मिक कृत्यांना गुन्हा, अन्याय, अत्याचार समजणारी वैचारिकता आणि मानसिकताही आहे. देश, समाज आणि माणूस अशा दोन युगांत, दोन सत्तांत, दोन व्यवस्थांत आहे. लिहावे कसे ? कोणती बाजू घेणे युक्त ठरणार आहे ? कोणते लिहिणे लोकशाही समाजवादाच्या, ज्ञानविज्ञानाच्या बाजूचे ठरणार आहे ? माणसाच्या मुक्तिलढ्याला मदत पोहचविणारे ठरणार आहे ?

लेखकाने बाजू घेऊ नये, लेखकाने राजकारणाचा, अर्थकारणाचा व सत्तेचा विचार करू नये असे साहित्य–शास्त्र मांडणाऱ्या अनेक पंडितांनी म्हटलेले आहे. हे मला मान्य

नव्हते. दलितांच्या व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मी सामील होतोच. राजकारण आणि अर्थकारण ही सामाजिक परिवर्तन करणारी शक्ती असते हे मला मान्य होतेच आणि कला साहित्य नेहमी सत्ताधारी वर्गाचीच बाजू घेते, हेही मला माहीत होते. अन भारताचे अभिजात संस्कृत साहित्य तर पूर्णपणे वर्णानुकूल आहे असे मला दिसत होते. संत साहित्य त्याचाच मराठी अनुवाद आहे असे मी ठरविले होतेच.

मी जन्माने दलित होतो. आर्थिक दृष्ट्याही दलित आहेच. पण विचाराने, जीवनाने आणि ध्येयवादानेही मी दलित जनतेच्या बाजूचा होतो. जर डॉक्टर बाबासाहेबांसारखे, भगवान बुद्धासारखे महापुरुष सर्व मोह धुडकारून दलित जनतेची बाजू घेतात, अनेक क्रांतिकारक दलितांचे जीवनपरिवर्तन करण्यासाठी आत्मत्याग करायला निघतात, तर मी तशी बाजू का घेऊ नये ? ज्याने दुःख पाहिले आहे, अनुभवले आहे, त्याने दलितांची बाजू का घेऊ नये ?

पण दलित जनतेची बाजू घेणे म्हणजे काय ? कसे लिहिणे ? कसा विचार करणे ? अनुभव कसा मांडणे ? एक अनुभव अनेक धाग्यादोऱ्यांनी विणलेला असतो आणि त्या अनुभवात येणारा माणूस तर मोठा रहस्यमय असतो. हा माणूस पूर्णपणे मांडायचा कसा ?

मी शोध घेत होतो. वाचीत होतो. जनता, प्रबुद्ध भारत या पार्टीपेपरमध्ये लेखन येत होते. तेही मी वाचीत होतो. ते लेखन मोठे नव्हते. त्याची सूत्रे साधारणपणे अशी होती :

(अ) उच्चवर्णीय मुलगी. अस्पृश्य मुलगा. त्यांचे प्रेम. म्हणून संघर्ष. त्यावर मात. विवाह. शेवट सुखान्त. (ब) उच्चवर्णीय मुलगी. अस्पृश्य मुलगा. त्यांचे प्रेम. संघर्ष. शेवट दुःखात्मक. असेच सस्ते लेखन सिनेमा, नाटक, काव्य, कादंबऱ्यांतून येत होते. (अ) उच्चवर्णीय मुलगा, अस्पृश्य मुलगी. त्यांचे प्रेम. संघर्ष. त्यावर मात. विवाह. शेवट सुखान्त. (ब) उच्चवर्णीय मुलगा. अस्पृश्य मुलगी. त्यांचे प्रेम.–संघर्ष. शेवट दुःखान्त...

स्पृश्य अस्पृश्य लेखकांनी मांडलेला हा फार्म्युला आंतरजातीय विवाह हा विचार घेऊन मांडला होता. आंतरजातीय विवाह अथवा स्त्री-पुरुषांचे प्रेम एवढेच प्रश्न होते काय ? मी पाहिलेले जीवन केवढे अक्राळ विक्राळ होते. तिथे दैन्य होते, दुःख होते, दास्य होते, अपमान होते, अधःपतन होते, सद्गुण होते, दुर्गुण होते. जसे व्यक्तीच्या स्वभावातून येणारे दुःख होते तसेच एकंदर समाजरचनेतून येणारे दुःखही होते. तिथे अनेक थोर कथा, अनेक महाकादंबऱ्या, अनेक महानाटके जन्म घेणार होती. त्या कथा, त्या कादंबऱ्या, ती नाटके तर कुठे दिसत नव्हती.

स्पृश्य लेखकांचे कळू शकते. त्यांना जे अनुभव मिळत होते अन् जे प्रश्न त्यांच्या संस्काराला पेलणारे होते ते त्यांनी आपल्या ताकदीने मांडले होते. पण दलित लेखकांनी

हे आंतरजातीय विवाहाच्या विचारांतून आलेले प्रतिक्रियात्मकच लेखन का करावे ? दोन जगांतील लेखकांचे हे लेखन काय एकाच मानसिकतेतून, एकाच वैचारिकतेतून येत होते ? कसे येऊ शकते ?

चार :

अस्पृश्यतेची नुसती जाणीव झाली तर हिंदु वर्णव्यवस्थेचे विश्वदर्शन होते. अस्पृश्यतेला कारण (१) धर्म आहे. (२) संस्कृती आहे. (३) धर्मग्रंथ आहेत. (४) समाजरचना आहे. (५) धर्मावलंबी अर्थरचना आहे आणि ह्या सर्वांद्वारे घडलेली मनोरचना आहे. म्हणजे अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल तर इतक्या व्यवस्था बदलाव्या लागतात व नव्या निर्माण कराव्या लागतात आणि हे काम केवढे मोठे आहे ?

ह्या जाणिवेतून येणारे दलित लेखन केवढे विदारक सत्य सांगून जाणारे होते ! किंवा दुसरी एक जाणीव आहे–

राज्य ब्रिटिशांचे आहे. ब्रिटिश साम्राज्याचे आहे. ब्रिटिशांना आपले साम्राज्य टिकवायचे आहे. आणि भारताचे शोषण करायचे आहे. १८५७ चे बंड पुनः होऊ द्यायचे नाही. बंडाचे नेतृत्व करणारे उच्चवर्णीय लोक आहेत. ते क्षुब्ध होतील असे राजकीय धोरण घ्यायचे नाही. म्हणून १८५७ च्या बंडानंतर उतारा म्हणून राणीने जाहीर केलेल्या जाहीरनाम्याच्या चौकटीतच राज्य करायचे. त्या धोरणाची अम्मलबजावणी होत होती म्हणून वर्णव्यवस्थेने निर्माण केलेली वैचारिकता, मानसिकता, समाजरचना, अर्थरचना बदलण्याचा म्हणजे अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचा प्रश्न सरकारपुढे नव्हता. पण चळवळ झाली तर थोडीशी सुधारणा करायला, किंवा तसा कायदा करायला ब्रिटिश सरकार तयार होते.

ब्रिटिशांनंतरचे दोन नंबरचे देशी राज्यकर्तेही ह्याच धोरणाचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रीय काँग्रेसचे पुढारी आणि हे दोन नंबरचे राज्यकर्ते एकाच वर्णाचे, वर्गाचे असल्यामुळे तेदेखील वेगळे मूलभूत धोरण घेऊ शकत नव्हते.

फक्त एकटे बाबासाहेब अस्पृश्यता उच्चाटनाचा प्रश्न घेऊन उभे होते. ह्या लढ्याचा विकास हा सम्यक क्रांतीत परावर्तित होतो. हे परिवर्तन, हे संस्कार, हे दोन नंबरचे राज्यकर्ते आणि काँग्रेस पुढारी करणार नाहीत. कारण त्यांचा वर्ग आणि स्वार्थही समान आहेत. म्हणून त्या सर्वांचा कट्टर विरोध होणार. हा विरोध सहन करायला संघटना हवी असते. तीदेखील उभी नव्हती. पायाच्या दगडापासून ती बांधायची होती. अशा कोंडीतून एकही प्रश्न सुटणार नव्हता. प्रश्न तर सुटले पाहिजेत. लोकांना उठून तर उभे राहता आले पाहिजे. अन् जे उठणार होते ते तर वर्णव्यवस्थेने सर्व दृष्टीने निर्बल करून ठेवलेले होते. यातून चळवळीचा एक मार्ग उभा राहतो. तो बाबासाहेबांनी

स्वीकारला आणि युगायुगाचा चिरडलेला दलित समाज उभा केला. या वेळी प्रकट होणारे लेखन–दलित जनतेची बाजू घेणारे लेखन कसे असायला हवे होते ?

हे लेखन ज्वलज्जहाल क्रांतिकारक असायला हवे होते. नवा समाज, नवा देश, नवी रचना मागणारे असायला पाहिजे होते. पण त्या वेळी जे लेखन पार्टी-पेपरमधून आले ते ब्राह्मणी आदर्श व्यक्त करीत होते. ते फडके, खांडेकर यांचे अनुकरण करीत होते. दुर्बळशा प्रतिक्रिया व्यक्त करीत होते.

पण जे फारसे शिकलेले नव्हते, त्या तमासगिरांनी, जलसाकारांनी मात्र ग्रामीण समाज व मनोरचनेवर खूप प्रखर हल्ले चढविले होते. आणि त्यांना कळलेले बाबासाहेबांचे क्रांतिकारकत्व अशिक्षित, भोळ्या भाबड्या लोकांपर्यंत नेले होते. त्यातून संघटना व्हायला आणि लढे उभे राहायला मदत झाली होती. म्हणजे जसे उच्चवर्णीय लेखक धीट होऊन वर्णव्यवस्थेच्या वैचारिकतेतूनही त्यांच्या स्वार्थामुळे बाहेर आले नाहीत, तसेच बाबासाहेबांच्या चळवळीमुळे शिक्षण घेऊ शकलेले दलित लेखकही वर्णव्यवस्थेच्या विरोधात–दुःख, दैन्य, दास्याच्या विरोधात पुढे आले नाहीत. सम्यक क्रांतीचा विचार मांडू शकले नाहीत.

क्रांतीचा विचार मांडणे म्हणजे गोऱ्या आणि काळ्या सत्ताधाऱ्यांची अवकृपा ओढवून घेणे. ते तर आदर्श म्हणून स्वीकारले होते. त्यांच्याप्रमाणे होण्याचे ठरविले होते. सर्व काही त्यांच्याप्रमाणे करण्याचे ठरविले होते. हे सर्व काही त्यांच्याप्रमाणे करण्याचे ठरविल्यामुळे विचारही त्यांच्याप्रमाणे केला जाऊ लागला. आणि विचारही तसा करण्याचे ठरविल्याने जातचोरांची, प्रस्थापितांना, उच्चवर्णीयांना शरण जाणारांची संख्या वाढत होती. एका अर्थाने वर्णव्यवस्थेची मनोवृत्ती विजयी झाली होती व डॉ. बाबासाहेबांची क्रांतिकारक मनोवृत्ती पराभूत झाली होती. हे अटळच होते. युगायुगाचे बुभुक्षित, उपेक्षित संधी मिळताच सुखाकडे, सुरक्षिततेकडे धावणारच होते. अस्पृश्यता म्हणजे हिंदु-वर्णव्यवस्थेने अचल, अभंग करून ठेवलेले दैन्य, दुःख, दास्य. त्या दुःखापासून, दैन्य-दास्यापासून ते दूर पळत होते. ह्या धावपळीत आपण बाबासाहेबांच्या क्रांतिवस्त्रालाही टाकून दिले आहे, हे त्यांच्या लक्षात राहत नव्हते. या पळणाऱ्यांना फक्त महार राहायचे नव्हते. महार दिसायचे नव्हते. त्यांना ते गत आयुष्य नको होते. जे अस्पृश्य नाहीत त्यांच्याप्रमाणे त्यांना व्हायचे होते. ते त्यांचे आदर्श होते, स्वप्न होते, ध्येय होते. अन् ते आदर्श, ते स्वप्न, ते ध्येय, साकार करताना ते ब्राह्मणच होऊन गेले होते.

हा आंबेडकरी चळवळीतून वर आलेला एक नवा वर्ग होता. हजारो वर्षांनंतर ह्या वर्गाचा जन्म झाला होता. आंबेडकरी चळवळीतून जन्मलेले हे अपत्य बाबासाहेबांचा जयजयकार करीत होते. पण त्यांचा स्वभाव, त्यांचे आदर्श, त्यांचे मन आणि त्यांचे

विचार पाहिले तर आंबेडकरी चळवळीचे ते कोणीही नव्हते. वरिष्ठ वर्गाने दारेखिडक्या उघडल्या असत्या तर हा नवा वर्ग वरिष्ठ वर्ग व्हायला तयार होता. इतका त्यांना आपल्या जन्मावद्दल, वर्णावद्दल राग होता. तिरस्कार होता. हा राग क्रांतिकारकांचा राग नव्हता, हा तिरस्कार क्रांतिकारकांचा नव्हता. तसा असता तर ते बाबासाहेबांच्या विचाराचे वाहक झाले असते. लढ्याचे ध्वजधारी झाले असते. बाबासाहेबांचे झाले असते. पण ते वरिष्ठ वर्गाची मानसिकता घेऊन स्वजन्माचा, स्वजनांचा राग, तिरस्कार करीत होते. आणि त्यामुळे त्यांच्या ठायी कोठलेही शौर्य नव्हते. ते वरच्या दारेखिडक्या तोडण्यासाठी पेटले नाहीत. पुढे आले नाहीत. तसेच स्वजनांच्यासाठी लढ्यातही आले नाहीत. ते मध्येच राहिले. खरे म्हणजे ही मधली जागा, ही त्रिशंकूची अवस्था त्यांची नव्हती. हिंदुधर्माची वर्णव्यवस्था जाती, पोटजाती, उपजाती निर्माण करते. जाती तोडत नाही. जाती एकही करीत नाही, हे ओळखू यायला पाहिजे. पण हे ओळखू आले नाही. या मध्येच तरंगणाऱ्या वर्गावर बाबासाहेब कठोर टीका करीत होते.

पण हा वर्ग उदित होणे, व तो त्रिशंकूसारखा मध्ये तरंगत राहणे अटळ होते. मी ह्या वर्गाकडे बघत होतो. त्याच्या व्यथा, वेदना, जखमा, त्याचे जळणे कुढणे, तडफडणे आणि टाहो फोडणे, त्याचा दंभ, दुष्टपणा व दुर्बलपणा पाहत होतो. आणि मला हृदय पिळवटून टाकणाऱ्या कथाच कथा, दुःखच दुःख, प्रश्नच प्रश्न दिसत होते. अन् माझे मन करुणेने दाटून येत होते. यांच्यासाठीही लढले पाहिजे. यांचा जन्म होणे, यांचे स्वभाव, यांची मने अशी विकसित होणे अटळच होते. वर्णव्यवस्था आणि तिची मानसिकता, वैचारिकता राक्षसी आहे. म्हणून यांना हे निराधाराचे–त्रिशंकूचे दुःख भोगावे लागते आहे. ह्या वर्गाची कोंडी पाहून मला एक कविता सुचली होती–

मी हात उभारून हांक मारतो आहे,
तुमच्या व्यथा पाहून माझेही मन व्याकुळ झाले आहे.
तुमच्यासाठी अन् यांच्यासाठी—
मी रणांत उभा आहे शस्त्रसज्ज होऊन–
या मित्रांनो या, तुमचे गंध टिळे, तुमचे सोवळे घेऊन या...
फक्त मी बोलतो तेच बोला...

खरे म्हणजे कथा लिहायला पाहिजे होत्या. मी त्यांच्याकडे जसा आपलेपणाने पाहत होतो तसा सर्वांकडेच बघत होतो. पण माझी खात्री झाली होती की सारे झटकून टाकले पाहिजे. जनतेची एकजूट कम्युनिस्टांच्या नात्याने तोडून टाकली गेली होती आणि भली भयंकर यादवी सुरू केली गेली होती.

अभावग्रस्तात यादवी लवकर पेट घेते. वृत्ती त्रस्त असते. आत भडके असतात. युद्धप्रवृत्ती जागी झालेली असते. शत्रू समोर नसतो. तो हवाच असतो. नेत्याने शत्रू दाखवून

दुःख दूर करण्याचे विधायक, रचनात्मक, संघर्षात्मक कार्यक्रम घ्यायचे असतात. असे कोठलेही (दलित जनतेचे प्रश्न) घेतले की वर्णव्यवस्थेला, भांडवलशाहीला, प्रस्थापितांना हादरे बसत असतात. म्हणून त्यांना दलित जनतेची संघ ना फुटलेली हवी असते. अन् तिची फाटाफूट लवकर होते. फक्त पेटवून द्यायचे असते. सुके गवत जळत जाते. तसे सुके गवत जळत होते. आणि जाळणारे मोठमोठ्याने बाबासाहेबांचा जयजयकार करीत होते.

पाच :

आणि तिकडे सर्व पक्ष कोणी हळहळत तर कोणी खुष होऊन ही यादवी तटस्थ होऊन पाहत होते. मला ही यादवी पाहवत नव्हती. यादवी करणारे कोण आहेत, यादवीला सुरुवात का झाली आहे. त्यांच्यात फायदा कोणाचा आहे, काय करायला पाहिजे, कम्युनिस्ट, काँग्रेस, सोशालिस्टांनी काय भूमिका घेतल्या पाहिजेत, त्यांना दलितांतील सुज्ञांनी कशी साद दिली पाहिजे याचे आराखडे माझ्या डोक्यात येत होते. मी माझे विचार बोलत होतो. पण यादवी थांबत नव्हती. तिला निर्णायक स्वरूप येत होते. मला वाटत होते. येथे कम्युनिस्टांनी अथवा सोशालिस्टांनी निर्णायक भूमिका घ्यायला पाहिजे. मार्क्सवाद हा दैन्य, दुःख, दास्याच्या विरोधी आहेच. म्हणजे तो जसा भांडवलशाहीच्या, साम्राज्यशाहीच्या विरोधी आहे तसाच तो वर्णव्यवस्थेच्याही विरोधी आहे. म्हणून या डाव्या पक्षांनी अस्पृश्यतेचा प्रश्न उठवावा. हा प्रश्न कसाही उठवला तरी तो एकाच वेळी आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक संघर्ष उभे करतो. भारतीय क्रांतीचा खराखुरा लढा अस्पृश्यता उच्चाटनाच्या लढ्यातूनच विकसित होणारा आहे. म्हणून शूद्र, अतिशूद्र, अत्यंजसमाज हाच केन्द्र केला पाहिजे. त्यालाच नेता मानला पाहिजे.

मी विचारीत होतो, भांडवलशाही साम्राज्यशाहीला विरोध म्हणजे नेमका कोणाचा पुरस्कार ? सर्वाधिक दलित पीडित जनतेचाच पुरस्कार. म्हणजेच ग्रामीण जनतेचा पुरस्कार. म्हणजे वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक रचनेला विरोध. हा विरोध जसा जातिसंस्था मोडून काढतो, तशीच शेतीची आणि समाजाची, संस्कृतीची पुनर्रचना मागतो. वर्गकलह हा आहे. साहित्यात येणारा वर्गकलह हाच यायला पाहिजे. महाड पाणी सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह हा केवळ पाण्याचा आणि देवळाचा सत्याग्रह नाही. तर तो सामाजिक, सांस्कृतिक संघर्ष आहे. वर्गकलह आहे. हा वर्गकलह लोकशाहीचे सांस्कृतिकीकरण, सामाजिकीकरण मागतो. आणि ज्ञानविज्ञानाचा पुरस्कार करतो. माणसाच्या प्रतिष्ठेची मागणी करतो. पण हा वर्गकलह या लेखकांनी आपल्या लेखांतून प्रकट केला नाही.

हा दृष्टिकोन आपण मांडला पाहिजे. पण तो अतिशय वरच्या पातळीवरून मांडला पाहिजे. पण कसा ?

त्याला सर्व संदर्भ दिले पाहिजेत. कलाकृतींना केवळ भावनांचा नाही, तर शास्त्रीय ज्ञानाचा आधार दिला पाहिजे. लेखकाला सर्व बाजूचे ज्ञान पाहिजे. आकलन पाहिजे. आणि मी कथा, दीर्घकथा लिहिण्याचे ठरविले. त्यासाठी आराखडे तयार केले. माणसे, स्वभाव, त्या व्यक्तीच्या हालचाली, खोडी, निश्चित केल्या. अन् एक वैचारिक सूत्रही निश्चित केले. ते असे...

जातीच्या संघटना जे बहुसंख्य आहेत, सबल आहेत, सधन आहेत त्यांना सत्तेवर जाण्यासाठी उपयोगी ठरतात. (हे एका बौद्ध सुशिक्षित तरुणाला आकलन होते.) त्याचप्रमाणे दंडसत्ता त्या जातीच्यापाशीच स्थिर करण्यालादेखील जातीच्या संघटना मोलाचे साह्य करतात. म्हणजे लोकशाही जातिसंघटना मजबूत करीत स्वतःलाच खतम करते.

बरे, सत्ता एका (बहुसंख्य) जातीच्या हाती स्थिर झाली की इतर दुसऱ्या अल्पसंख्य जातीही आपल्या संघटना करू लागतात. त्यांनाही सत्तेवर जायचे असते. त्या बौद्ध तरुणाला हे अमान्य असते. पण याच्या बापाला, चुलत्याला आणि त्याच्या भावांनाही जातीची संघटना केली पाहिजे असे वाटते. ते तसे कार्य सुरू करतात. संघर्ष सुरू होतात. गुळाचे व्यापारी गुंडाप्पा कुलकर्णी आपल्या अस्तित्वासाठी धडपडत असतात. जे बहुसंख्य आहेत त्यांच्याशी मिळते जुळते घेतात. त्यांचा मुलगा संजय आणि मुलगी कल्पना यांना हे धोरण आवडत नाही. कल्पना सोशालिस्ट पार्टीशी संबंधित असते. त्यांची आणि बौद्ध तरुणांची मैत्री असते. ते दोघेही इलेक्शनच्या वेळी ताजी होणारी वैरे, हिंदू मानसिकतेतून प्रकट होणारे जातीय अहंकार, जातीय तिरस्कार, तुच्छता बघत असतात. ते दोघे बोलत असतात. घडणारी भांडणे, कलह, उतू आलेला जातीय तिरस्कार, अहंकार पाहून यावर मात करण्यासाठी लोकशाही वैचारिकता म्हणजे काय हे ठायी ठायी बैठका घेऊन सांगतात. त्यांच्या बैठका उधळल्या जातात. बौद्धवाड्यात तर संजय कुलकर्णीला प्रश्न विचारला जातो, 'तुम्ही बौद्ध आहात काय ? दीक्षा घेतली काय ? तो 'नाही' म्हणतो. त्याला विरोध होतो. पुढे तो बौद्ध होतो. आणि त्यांच्या घरीही झगडा सुरू होतो.

पण (महार) बौद्धांना त्याचा विश्वास वाटत नाही. ते त्याला परकाच लेखतात. संजय वैतागतो आणि एक दिवस गाव सोडून जातो. काही महिन्यांनी त्याचे पत्र येते. तो नक्षलवादी झालेला असतो. समाज बदलण्याचे साधन विचार नसून हत्यार आहे हा विचार त्याच्या पत्रात असतो. बौद्ध तरुण विचार करीत असतो. त्याला आस्ते आस्ते दूर केले जाते. तोही तसा होत जातो. आणि एक दिवस तोही घराबाहेर जातो. त्याचेही पत्र येते. तो भिक्षू झालेला असतो. कल्पनेला वाईट वाटते. कारण तिचे त्याच्यावर प्रेम असते. ती त्याला जाऊन भेटते. त्यांचे संभाषण असे. ती म्हणते :

'माझे तुझ्यावर प्रेम होते.'

'माझेही होते.'

'बोलला का नाहीस ?'

'कसा बोलू ? एक तर तू ब्राह्मण. अन् माझ्या भावाची बहीण. अन् सोशालिस्ट. तू का बोलली नाहीस ?'

'आता बोललेय.'

'आता उपयोग काय ?'

'का ?'

'मी भिक्षू झालोय.'

'म्हणून काय झाले ? मी सोशालिस्ट आहे. संजय कम्युनिस्ट आहे तसा तू बौद्ध आहेस ... आमचा एक विचार. तुझा एक विचार. मी लग्न करू शकते. संजय करू शकतो. तूही करू शकतोस.'

'मी भिक्षू आहे.'

'उपयोग काय होणार ? तुझे कोण ऐकणार ? तुझी जात कोण विसरणार ... कोण ऐकणार ? भांडवलशाहीप्रधान समाजात तू काय भूमिका घेणार ? अन् ती प्रस्थापितांना कशी आवडणार !'

ह्या कथेचे नाव 'कोंडी' दिले. नंतर 'उडी' दिले. नंतर 'म्हातारे' दिले आणि नावाचा विचार करता करताच ही कथा राहून गेली. गहाळ झाली. पण पुढे कादंबरीच्या रूपाने 'कोंडी' ह्या नावाने अर्धी अधिक छापून आली. त्या वेळी ती एकदम वेगळी झाली होती. अनेक नवीन पात्रे त्यात आली होती. अन् कल्पना कुलकर्णी 'समता' झाली होती. पुष्कळ बदल झाले होते.

बौद्धधर्म घेतल्यामुळे खेडे पूर्वीचे राहिले नव्हते. ग्रामीण महाराष्ट्रात नवश्रीमंत वर्ग तयार झाला होता. म्हणजे एकाच वेळी खेड्यात दोन प्रवृत्ती आल्या होत्या. एक होती आंबेडकरी सांस्कृतिक क्रांतीची. दुसरी होती सरकारी मदतीतून येणारी भांडवली प्रवृत्ती. एकीला खेड्याची मानसिकता व वैचारिकता बदलायला हवी होती. दुसरीला खेड्याची जुनीच मानसिकता हवी होती म्हणजे त्यातून अविरोध नफा साठतो; स्वस्तात मजूर मिळतो; या दोन्ही प्रवृत्ती स्वभावतःच भिन्न आहेत. त्यांचे स्वार्थही समान नाहीत. वर्ग-चेतनाही भिन्न आहेत. इथे ग्रामीण भागातील प्रत्येक खेडे विचाराच्या पातळीवर दुभंगून जायला पाहिजे. म्हणजे बौद्ध आणि गावातील गरीब एकत्र यायला पाहिजेत. म्हणजे लोकशाही समाजवादाचीच चळवळ पुढे जाते. पण गावातील सधन वर्ग जातीच्या

जोरावर अशी एकी होऊ देत नाहीत. सधनाला जात त्याच्या स्वार्थासाठी उपयोगी पडते. पण निर्धनांना मात्र ती उपयोगी पडत नाही. तेव्हा त्यांनी जात सोडली पाहिजे. हा विचार मी कथेत मांडला. ह्या कथेचा नायक रस्त्यावर काम करणारा मैलकुली होता. ही कथा मी प्रकाशनासाठी पाठवू शकलो नाही.

यानंतर मी 'भाषण' नावाची एक कथा लिहिली. कथालेखन प्रकाशित झाले नव्हतेच. कधी एकदम गोंधळून जाणारा, काही न बोलू शकणारा पण चर्चा उत्तम करणारा अशी मला कीर्ती मिळत चालली होती. एकदा एका बौद्ध तरुण मंडळाच्या आंबेडकर जयंतीला मला बोलावण्यात आले. आणि मी भाषण केले. मला वाटले, आपण फार उत्तम बोललो. पण माझे भाषण ऐकून लोक फार अस्वस्थ झाले होते. फाटाफूट का झाली याचे मी माझे संशोधन सांगितले होते. पुढे मी केलेले संशोधन आणि ते भाषण आणि नंतर झालेली प्रश्नोत्तरे यावर ती कथा लिहिली होती. गोष्टीची सुरुवात अशी होती.

"तो भडवा आधेक्ष लय पैसे खातो."
"लय म्हंजी किती ?"
"त्याला हिशेबच नाही."
"प्रत्येक महिन्यात किती जमतात ?"
"परत्येक मयन्याला कोण देतो त्याला पैसं ? वाघाकडं गाय राखोळी."
'मग ?'
'जयवंतीला हो !'
'किती जमतात रुपये. दहा एक हजार ?'
'एक दोन हजार.'
'जयंती होते ?'
'करतो. नयी करील त आधेक्ष कसा व्हाईल ?'
'मग कशाला फुटलात ?'
'म्हंजी त्यालाच आधेक्ष– होवू द्यायचा ?– होवू बी दिला असता पण तो दादासायबाच्या बाजूचा भी आहे.'
'त्यात काय बिघडलं ?'
'म्हंजी ? कंबुनिस्ट ओ. तो कंबुनिस्ट आहे.'
'कम्युनिस्ट म्हणजे ?'
'धरम न मानणारे लोक.'
'तुम्ही धर्म मानता ?'
'मग ? लय ?'

' हिंदूंनी त्यांचा धर्म काटेकोर पाळावा काय ? पूर्वी जसे अस्पृश्यांना लेखीत तसे लेखावे काय ? म्हणजे शहराशहरातून, गिरण्या कारखान्यांतून, शाळा कॉलेजातून आपल्याला काढून द्यावं काय ? मनूचे कायदेकानू पुनः चालू करावे काय ? ते बहुसंख्य आहेत. हे नवे कायदे रद्द करू शकतात. '

' नको. नको. '

' अहो बहुसंख्य बदलले तर अल्पसंख्यही बदलतात. पण नुसतं अल्पसंख्य बदलले तर बहुसंख्य बदलतात असे नाही. तंटे होतात. ते बदलले पाहिजेत. जे बदललेत त्यांना मित्र म्हणून जवळ केले पाहिजे. जे बदलले त्यांनी हे नवे कायदेकानू केले, करू दिले. '

गोष्टीची सुरुवात अशी होती. आणि जवळ जवळ सर्वच गोष्ट संवाद–रूपाने घडत होती. रिपब्लिकन पक्षात फूट का झाली याची चर्चा त्या संवादातून येत होती. अभ्यास चालू होता...विश्वास वाढला होता. ललित लेखनाबरोबर इतर विषयांचे वाचन खूप करीत होतो. तत्त्वज्ञान, चरित्रे, इतिहास आणि इतर शास्त्रीय ज्ञानाची पुस्तके वाचीत होतो. माझी वैचारिकता, मानसिकता तयार होत होती; लिहिण्यासाठी, बोलण्यासाठी उत्सुकता वाढत होती. सर्वत्र फिरत होतो. फिरण्याची, चालण्याची सवय होतीच. बघणे स्वच्छ झाले होते. त्यामुळे कोणतीही घटना घडली तर तिला दुसऱ्याचा अर्थ मी स्वीकारीत नव्हतो. माझ्या दृष्टिकोनातून त्या घटनेचा अर्थ लावीत होतो. अन् त्यामुळे त्या घटनेची अदृश्य बाजू माझ्या लक्षात येत होती. बुद्ध तत्त्वज्ञानाच्या वाचनाने आधीच चांगले असलेले माझे मन अधिक स्वच्छ झाले, सुंदर झाले.

सहा :

बाबासाहेबांच्या जीवन, कार्य व लेखनातून अनेक वाङ्मयीन मूल्ये मला सापडू लागली होती. बुद्ध आणि मार्क्सने केवढे तरी धन मला दिले होते. नकार, विद्रोह, दुःखाची जाणीव, माणसाची महात्मता, ज्ञानविज्ञाननिष्ठा, अनात्म, अनीश्वर, गतिवाद, करुणा, बंधुत्व, वीरत्व इतकी मूल्ये मला प्राप्त झाली होती. व्यक्ती म्हणून तर अनेकांनी अनेक संस्कार केले होते. लहानपणी गांधीजींबद्दल जे पुढारी मंडळीकडून ऐकत होतो ते चुकीचे म्हणून टाकून दिले होते. अन् गांधीजींबद्दल आपलेपण, आदर वाटू लागला होता. त्यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात आले होते. मार्क्स–बुद्ध, मार्क्स–आंबेडकर, गांधी–आंबेडकर असे भांडण आहे असे मला वाटत नव्हते. पं. नेहरु, मानवेंद्रनाथ रॉय, राहूल सांकृत्यायन, लक्ष्मणशास्त्री जोशी, आचार्य जावडेकर, लालजी पेंडसे, शरच्चंद्र चटर्जी, प्रेमचंद, गोर्की, चेकॉव्ह आणि इतरही लेखक माझे आवडते लेखक झाले होते. आणि मी लिहीत होतो. वह्याच वह्या साठत होत्या. अनुभव वाढत होते. आणि कर्जही वाढत होते. रेल्वेच्या अपुऱ्या पगारात घरसंसार चालत नव्हता. रेल्वे

सोडावी, लेबर कॅम्पातील खोली सोडावी असे वाटत होते. पण बेकारीच्या इतक्या यातना, इतकी दुःखे सहन केली होती की सोडण्याची इच्छा होत नव्हती. अन् कर्ज एवढे वाढले होते की दुसरीकडे खोली घेणे शक्यच नव्हते. लिहायला जागा नव्हती. स्वस्थता नव्हती. वाचणे, लिहिणे बागेत अथवा हॉटेलात चाले. किंग्ज सर्कलची इराणी हॉटेले मला तासन् तास बसू देत होती. मनात खूप खळबळत होते. ह्या खळबळीला कारण जशी माझी आर्थिक गरिबी होती, कुचंबणा होती तशीच माझे अनुभव, माझे विचार, माझे वाचन आणि व्यक्त होण्याची अनिवार इच्छाही होती. आणि माणसाबद्दल वाटणारी करुणाही होती.

दलित जनतेत जन्मलेले, बाबासाहेबांना पूज्य मानणारे, आणि गरिबीतच राहणारे माझे अनेक मित्र स्वजनांबद्दल कमालीची घृणा करीत. त्यांची भांडणे, त्यांच्या शिव्या, त्यांची भाषा, त्याचे वागणे, दारू पिणे, सर्वांचाच त्यांना तिरस्कार होता. मला मात्र एवढाही राग, तिरस्कार अथवा घृणा वाटत नव्हती. माणसे चांगली असतात. वाईट असते व्यवस्था. वाईट असते परिस्थिती. जी मन घडविते. स्वभाव घडविते. जीवनप्रवाह वेडावाकडा करते. परिस्थिती आणि सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्था चांगली असेल, निरोगी असेल तर माणसे किती सुखाची, किती आनंदाची होतील ! तशी ती असतातच.

माणसेच काय, झाडे झुडपे, डोंगर, मैदाने, माळराने, नद्या, समुद्र, केवढे सुख देतात. प्राण्यांच्या लीला किती आनंददायक असतात. नुसता जमिनीवर सळसळत जाणारा साप केवढे नेत्रसुख देतो. कुसुमाग्रज तर मला त्यांनी दोन चार ठिकाणी सापाचे केलेले सुंदर वर्णन वाचून एकदम प्रिय झाले होते.

मी लिहीत होतो. माझे लेखन प्रकाशित करण्याला पाठवीत नव्हतो. तरी मी लेखक झालोच होतो. किंवा त्याहूनही अधिक चांगला झालो होतो. माझे वाचन, माझे चिंतन माझी मनोभूमिका तयार करीतच होते. मी कोण ? प्रथम मी माणूस नंतर सर्व काही.

'दलित' पणातून सुटका नाही. हिंदुसमाजरचना ह्यातून सुटू देत नाही. मी ह्या आर्थिक सीमांतून सुटत नाही. म्हणजे वरच्यांशी वृत्ती धारण करण्याचे कारण नाही. मी इथे आहे, जन्मलो आहे. याचे कारण माझा अपराध नाही. म्हणून खेद करण्याची, अनुकरण करून एकाच शरीरात, मनात दोन किंवा चार व्यक्तिमत्त्व धारण करण्याची गरज नाही. जातीला अर्थ नसतो. माणूस जगत असताना कोणत्याच जातीचा नसतो. तेव्हा जाती जी अनेक ओझी लादून देते ती ओझी मी आस्ते आस्ते टाकून दिलीच होती. पण मी दलित होतोच. मी ते स्वीकारलेच होते. बुद्धयाच स्वीकारले होते.

मी दलित आहे म्हणजे प्रस्थापित व्यवस्था, तिचे वर्ग, तिचा धर्म, तिचे विचार आणि तिचे सर्व काही मला मान्य नाही. म्हणून माझे विचार, माझे मन, हे नवे जग जीवन

निर्माण करणाऱ्याचे असले पाहिजे. पण जरी मी असा क्रांतिकारक असलो तरी मी लोकांपासून वेगळा, एकांडा नसलो पाहिजे. मी लोकांत पाहिजे पण माझी वैचारिकता, मानसिकता क्रांतिकारकाची पाहिजे. ती जर प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात नसेल तर माझी निर्मितीही तिचे वेगळेपण घेऊन येणार नाही.

घटनेचा अर्थ नीट लावता आला नाही तर अनर्थ होतो. उदाहरणादाखल एक सामाजिक अत्याचार घ्या.

अत्याचार एका स्त्रीवर झाला आहे.

कायदा म्हणतो, 'एका स्त्रीवर अत्याचार झाला. करणारा हा आहे. संशय सिद्ध झाला की शिक्षा होईल.'

अत्याचार करणाऱ्याची बाजू घेऊन एक म्हणतो, 'अत्याचार झालेला नाही. असे पूर्वीपासून चालत आलेले आहे.'

दुसरा म्हणतो, 'असेच करावे लागते. नाही तर लोक पायरीने वागणार नाहीत. धर्म टिकू देणार नाहीत.'

तिसरा म्हणतो, 'ती तिथं गेलीच का ?'

चवथा म्हणतो, 'जे तिचा नवरा करतो, अथवा करणार होता, तेच त्याने केले आहे. अब्रू वगैरे काही नाही.'

पाचवा म्हणतो, 'ती माझ्या जातीची आहे. मी अत्याचाराचा बदला अत्याचाराने घेणार ! त्याच्या जातीच्या बाईवर बलात्कार करणार.'

सहावा म्हणतो, 'मृत्युदंड.'

घटना घडलेली आहे. अत्याचार झालेला आहे. लेखकाला त्यावर लिहायचे आहे. त्याचे कलात्मक वर्णन टिकणार आहे. भविष्यकालात ते साक्षी होणार आहे. लोक कसे विचार करीत होते ? तसा का करीत होते ? त्यांची मानसिकता व विचार घडविण्याला कोणकोण कारणीभूत होते ? त्या वेळची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थिती काय होती ? माणसाकडे, स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन काय होता, घटना कशी घडली ? त्या दोघांची स्थिती काय होती ? नेमके काय घडले होते ? कसे घडले होते ?

अशा प्रश्नांना उत्तरे देण्याची जबाबदारी असते. आणि जेव्हा लेखक एवढी जबाबदारी स्वीकारतो तेव्हा तो पक्षपाती प्रवक्ता राहत नाही, तर तो शास्त्रज्ञ बनतो. पण शास्त्रज्ञ बनला तरी त्याला अत्याचार करणाऱ्याचा स्वभाव दाखवायचा आहे. तसाच अत्याचार सहन करणाऱ्याचा स्वभाव स्पष्ट करावयाचा आहे. स्वभाव घडविण्याला एकंदर परिस्थिती आणि तिचे आणि धर्माचे संस्कार स्पष्ट करायला हवेत. धर्माच्या संस्कारांतून

वासनाविकार आकार घेत असतात. हिंदुवर्णव्यवस्थेचे वैशिष्ट्य अहंकार, तिरस्कार, तुच्छता हे संस्कार आहेत. ते प्रत्येक हिंदू माणसावर होत असतात. म्हणजे माणसांच्या मूलभूत वासना विकारांना क्रौर्य, हिंस्रता हिंदुधर्माचे हे संस्कार देत असतात. म्हणजे अत्याचार घडविण्याला जसे त्याचे शरीर जबाबदार असते, तसे त्याचे संस्कार आणि ते देणारा धर्म, इतिहास आणि परिस्थितीही जबाबदार असते. म्हणजे त्याच्या शरीराला जी शिक्षा होणार आहे त्याची निम्मीअर्धी शिक्षा धर्म, इतिहास आणि परिस्थितीलाही व्हायला पाहिजे. पण शरीर साकार, साक्षात दृश्य असल्यामुळे शिक्षा शरीराला होते. धर्म, इतिहास व परिस्थिती अदृश्य असल्यामुळे कायदा आणि लोक त्यांना शिक्षा ठोठावीत नाहीत. ही शिक्षा लेखक त्यांना ठोठावीत असतो. अत्याचाराला जबाबदार ते असतातच.

म्हणजे लेखक अत्याचार करणाऱ्याला काहीशी क्षमा करतो. तसाच ज्याच्यावर अत्याचार झाला आहे त्यालाही क्षमा करतो. तिथे लेखक केवळ शास्त्रज्ञ नाही तर करुण कोमल आहे. पण हे सर्व करीत असताना, ह्या दोघांना स्पष्ट करीत असताना तो हे वास्तव, ही समाजरचना, ही मनोरचना, हे विचार आणि हे संस्कार अन् ते घडविणारा धर्म व शासन यांना बदलण्याची मागणीही करीत असतो. वक्त्याप्रमाणे त्याने ती केलेली नसते. ण ती सूचना, ती मागणी असतेच असते. ती सूचना नसेल, ती मागणी नसेल तर लेखक केवळ श्रेष्ठ आहे, किंवा साधु आहे एवढेच सिद्ध होते. तो दलित जनतेच्या बाजूचा आहे आणि क्रांतिकारकही आहे हे मात्र सिद्ध होत नाही. अन् असे सिद्ध जर झाले नाही तर लेखकाची प्रतिबद्धता, संबद्धता कोणाशी आहे हे स्पष्ट होत नाही. ही प्रतिबद्धता स्पष्ट झाली पाहिजे. मी माझी ही संबद्धता जाहीर केली आहे. ती अशी की,—

'मी दलित आहे.' पण माझ्याप्रमाणे मी दलित आहे, हे कोणीही म्हणू शकतो. मी दलित आहे आणि कर्मवाद आणि आत्मवादही मानतो, मी दलित आहे आणि विषमताही स्वीकारतो; मी दलित आहे अन् वर्णानुकूल असणारी पौराणिकता, आदर्श वैचारिकताही स्वीकारतो असे कोणी म्हणू शकतो. हा दलित साहित्याला अभिप्रेत असलेला दलित नव्हे. तो दलित साहित्यिकही होऊ शकत नाही.

तर दुसरा हेही म्हणू शकतो की, मी दलित आहे अन् मला समाजवाद मान्य नाही. मी दलित आहे पण माझा साम्राज्यवादाला आणि त्याच्या स्वाभाविक कार्याला—वसाहती युद्धे, आर्थिक साम्राज्य, फॅसीझम इत्यादींना विरोध नाही. तर असे म्हणणारे जे कोणी असतील तेही दलित साहित्यिक नाहीत. ते फक्त जातीने दलित आहेत. ते फक्त आर्थिक दृष्ट्या दलित आहेत.

दलित साहित्यातील 'दलित' ही एक वैचारिकता आहे. कला—साहित्याकडे बघण्याचा आणि ते निर्माण करण्याचा तो दृष्टिकोण आहे. हा दृष्टिकोण कोणीही स्वीकारू शकतो.

त्याला जातीचे, आर्थिक स्थितीचे प्रमाणपत्र लागत नाही. विचार, हृदय हे ते प्रमाणपत्र असावे लागते.

म्हणजे दलित साहित्यातील ' दलितत्व ' आहे तरी काय ?

जे स्वराज्यात, लोकशाहीत, कामगार सत्तेतही सर्वसामान्य जनतेच्या बाजूचे असते, त्यासाठी संघर्षरत असते, माणसाचे माहात्म्य, मुक्ती आणि माणूस म्हणून असलेली त्याची महान प्रतिष्ठा त्याला प्राप्त करून देण्यासाठी जे लढत राहते ते म्हणजे दलितत्व. म्हणजेच सम्यक क्रांतित्व ! भगवान बुद्ध ज्या अपार प्रेमाने, प्रकाशितपणाने, करुणेने माणसाकडे बघतो त्याच अपार करुणेने, प्रेमाने दलित साहित्य माणसाकडे बघते. अशा बघण्यातून, ह्या अपार प्रेम करुणेतून सम्यक क्रांतित्व साकारले आहे. ते यासाठी की मानवी समाजाचा इतिहास हा अन्याय अत्याचाराचा, युद्धाचा, पिळवणुकीचा, दडपशाहीचा, विषमतेचा, तुच्छता, तिरस्कार, श्रेष्ठ–कनिष्ठतेचा आणि अहंकाराचा इतिहास आहे. ही शेकडो वर्षांची घाण ग्रंथाग्रंथांत, शब्दाशब्दात, मनामनांत, आहे. अस्पृश्यता हे ह्या इतिहासाचेच चिरंजीव अपत्य आहे.

अस्पृश्यतेचे आयुष्य अनेक शतकांचे आहे. अनेक महापुरुष आले. त्यांनी सांगितले. लिहून ठेवले. पण त्यांच्या ग्रंथांना हे दुःख दिसले नाही. ते पाहू शकले नाही. लोकशाहीचेही असे होऊ नये. लोकशाहीचा विकास होणार आहे. यंत्रतंत्र, ज्ञानविज्ञान वाढणार आहे, वर्णव्यवस्था कोसळणार आहे, पण हे होत असतांना मनूचा वारसदार हिटलर येऊ नये, फॅसीझमचा अवतार होऊ नये, लोकशाही समाजवाद यावा आणि तो आल्यानंतरही कुठल्याही मनात, कुठल्याही शब्दात स्त्री शूद्रांचा तिरस्कार करणारा भाव उरू नये, उरला तर तो बघणारा संवेदनाक्षम सूर्यनेत्र असावा. हा संवेदनाक्षम सूर्यनेत्र म्हणजे साहित्यातील सम्यक क्रांतित्व. मना–मनाची नांगरणी करणारा बुद्ध म्हणजे हे सम्यक क्रांतित्व. ही झाली एक बाजू.

प्रत्येक लढा मग तो आर्थिक असो, सांस्कृतिक असो, राजकीय असो; हे लढे एकेरी असू नयेत. तर हे लढे सम्यक असावेत. वेतनवाढीच्या लढ्यातही वर्णव्यवस्थेने चिरंजीव करून ठेवलेली दुःखे, दैन्ये, दास्ये व इतर अनेक चिरंजीवांवर मर्मांतिक आघात झाले पाहिजेत. प्रत्येक उभारला जाणारा कारखाना आणि खोदला जाणारा कालवा, बांधले जाणारे धरण, खोदली जाणारी विहीर अन् उभारले जाणारे ज्ञान अथवा कला केंद्र हे-देखील असेच सम्यक पाहिजे.

कारखान्याने केवळ बेकारी निर्मूलन करू नये तर ह्या वर्णव्यवस्थेच्या चिरंजीवांचेही निर्मूलन करावे. सम्यक क्रांतित्व धारण करावे. भांडवलाची वाढ ह्या वर्णव्यवस्थेतून आणि तिच्या मानसिकतेतून झाली तर वर्णव्यवस्था बळकट होण्याचीच शक्यता फार आहे.

फॅसीझम येण्याची ती वाट आहे. असे विपरीत होऊ नये म्हणून दलितत्व–सम्यक क्रांतित्व पाहिजे. यंत्र, तंत्र, आणि अर्थशक्तीची वाढ आणि विकास वर्णव्यवस्थेच्या निर्दालनासाठी आहे. हा दृष्टिकोन, ही वाढ, हा विकास करताना बाळगला पाहिजे.

सात :

येथे मी जन्म घेतला म्हणून मला जात मिळाली. पण जेव्हा मी लिहू लागलो, माणसांचा विचार करू लागलो तेव्हाच मी देशातल्या आणि जगातल्या सर्व दलित उपेक्षित वंचितांचा झालो. मी तशा कथा लिहिल्या. मुसलमान, ख्रिस्ती, निग्रो हे माझे कथाविषय झाले. त्यांच्यासाठी माझ्या मनातील सर्व प्रेम, कारुण्य, क्रोध प्रकट झाला. मी सर्वांचा झालो आणि त्याचबरोबर देशोदेशी दलितांसाठी, उपेक्षितांसाठी, वंचितांसाठी लिहिणारे, कार्य करणारे, लढणारे माझे झाले. आम्ही सर्वही एक झालो. त्यांचा देश, त्यांचा धर्म, त्यांचा पक्ष काहीही असोत, पण विचार एक आहे. हृदय एक आहे. करुणा आणि क्रोध एक आहे आणि केन्द्र एक आहे आणि कार्यही एक आहे–दुःख, दैन्य, दास्य नष्ट करण्याचे.

एक लेखक म्हणून–स्वाभाविकपणेच येणारी ही व्यापकता, विश्वमान्यता मी स्वीकारली आणि बोलू लागलो. तेव्हापासून वर्णाचे आणि जातिव्यवस्थेचे संस्कार आंबेडकरी विचाराच्या आगीत जाळू न शकणाऱ्या काहींनी माझ्यावर टीका सुरू केली त्यांच्या टीकेची मला कीव येते.

' वाटेवरची ' ही माझी तिसरी किंवा चवथी कथा प्रकाशित झाली आणि ही कथा आमच्या जातीची बदनामी करणारी आहे, ह्या लेखकाचा आम्ही जाहीर निषेध करणार आहोत; याचे लेखन प्रकाशित करू नका, असे या जात्यभिमानी म्हणजेच वर्णवादी असलेल्या लोकांनी ' नवयुग 'चे संपादक आचार्य अत्रे आणि ' नवयुग 'च्या कार्यकारी संपादिका सौ. शिरीष पै यांची भेट घेऊन सांगितले. त्यांचे म्हणणे ऐकून आचार्य अत्रे आणि शिरीषताई म्हणाल्या, ' आपण कमिशन नेमू. तुम्हाला आवडणारी नावे सांगा. त्यांचे कमिशन असेल अन् ही कथा कमिशनने बदनामी करणारी ठरविली तर मग निषेध करा, ते लटपटले. पण मुंबईत माझा जाहीर निषेध होणार आहे हे मात्र जिकडे तिकडे ऐकू येत होते–प्रत्यक्ष सभा घेऊन झाला नाही हे खरे.

माझी ' पावश्या ' ही आंबेडकरी आंदोलनापूर्वीचा महार समाज आणि त्यानंतरचा महार समाज असा प्रदीर्घ कालखंड असलेली, शेकडो पात्रे, प्रसंग असलेली जवळ-जवळ त्या वेळी १,८००; १,९०० पाने व्यापून गेलेली कादंबरी 'आम्ही' मधून क्रमशः प्रकाशित होऊ लागली आणि ह्या मंडळींनी माझ्याविरुद्ध सर्वत्र प्रचार सुरू केला. दलित ब्राह्मणांपैकी अनेकांनी माझ्याशी वाद केला. ते जिंकले नाहीत. पण पुढे मासिकच बंद पडले आणि ' पावश्या ' प्रकाशित होणे थांबले. पण त्यांचा विरोध मात्र कायमच आहे. नागपूर दलित साहित्य संमेलनानंतर त्याचा मोठा स्फोट झाला. लेखकाला जसे चहाते

रसिक असावे लागतात तसे द्वेष करणारे, टीका करणारेही असावे लागतात. समतोलासाठी ते उपयोगी पडतात. असो.

मी जसा कला–साहित्याचा विचार करतो तसाच राजकारणाचा आणि अर्थनीतीचाही विचार करतो. अर्थनीतीचा, राजनीतीचा आणि संविधानाचा अन् साहित्य, विचाराचाही केंन्द्रबिंदू दलित असावा असे माझे म्हणणे आहे. ते मी मांडतो. आणि सर्व दलितांची एकता व्हावी असेही म्हणतो. कारण उच्च वर्णीय आणि प्रस्थापित जसे आज एक आहेत, संघटित आहेत, तसेच ते पूर्वीही होते. आज जशी त्यांच्या हातात राजसत्तेची सर्व केंन्द्रे, धनसत्तेची सर्व सूत्रे, ज्ञानकेंद्राची अंगेउपांगे आहेत–म्हणजे सर्व देशच त्यांच्या मुठीत आहे. तसाच पूर्वी होता. राजा जर क्षत्रिय असेल तर त्याचा प्रधान ब्राह्मण आहे. सेनापती आणि कोषाध्यक्ष उच्च वर्णीयच आहे. सरदार व दरबारी उच्च वर्णीयच आहेत. वेगवेगळ्या जातींचे असले तरी हे सर्व उच्च वर्णीय एकजुटीने त्यांचे स्वार्थ, त्यांचे स्वामीत्व सांभाळीत होते, समाजावर लादत होते. पण बाकीच्या शोषितांना मात्र एक होऊ देत नव्हते. जाती जातीत विभागून ठेवत होते. एकतेच्या, बंधुत्वाच्या-आड डोंगर होऊन उभी राहणारी युद्ध मनःस्थिती–जातीय अहंकार, तिरस्कार, तुच्छता, द्वेष, मत्सर जागृत ठेवत होते. आणि भारताच्या प्रचंड भूतकाळात हे शोषित कधीच जातिबंधने तोडून एकत्र आलेले नाहीत. तसे त्यांना कोणीच एक केले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य भारतातील अवघ्या बहिष्कृतांसाठी होते. पण बाबासाहेबांना तिथल्या प्रस्थापितांनी, प्रतिक्रियावाद्यांनी मात्र कधीच अवघ्या बहिष्कृतांचे नेते होऊ दिले नाही. ठायी ठायी त्यांना जातीच्या नावावर अडथळे घालून अडकवून ठेवले. कारण बाबासाहेबांचे नेतृत्व जर अवघ्या दलित जाती–जमातींनी स्वीकारले, ते एक झाले तर त्यांची संख्यात्मक आणि संघर्षात्मक ताकद क्रांती करण्याएवढी मोठी होते. अगदी निवडणुकीच्या मार्गाने सत्ता हस्तगत करण्याएवढी मोठी होते. हे सर्व प्रस्थापित, प्रतिक्रियावादी ओळखून आहेत! म्हणून ते दलितांच्या, श्रमिकांच्या एकजुटीचा जसा विरोध करतात, तेवढाच प्रखर विरोध जाति-संख्या तोडण्याच्या विचाराला व कार्यालाही करतात. कारण जाती जातीत मानवसमूह दुभंगणे याचा अर्थ त्यांचे वर्चस्व टिकणे. दलित–श्रमिकांची एकजूट होणे म्हणजे लोकशाहीच्या सामाजीकरणाची, लोकशाहीच्या सांस्कृतीकरणाची प्रक्रिया सुरू होणे. समाजवाद येणे. म्हणून त्यांनी बाबासाहेबांना शेवटपर्यंत अलग ठेवले. एका जातीत ठेवले. पण–

अनात्म, अनीश्वर, अनित्य (गतिवाद) बुद्धिप्रामाण्यवाद व माणसाचे शोषण, (दुःख, दैन्य, दास्य) हे विचार व कार्यक्रम म्हणून पुढे गेले की अनेक मित्र मिळतात. हे मित्र गतिवादी, भौतिकवादी, मार्क्सवादी आणि समाजवादी आहेत. हे काँग्रेस, कम्युनिस्ट

आणि सोशालिस्ट पक्षात संघटित आहेत. हे आणि आंबेडकरानुयायी एकत्र येऊन दुःख, दैन्य, दास्य याविरुद्धचा लढा पुढे नेऊ शकतात. पण ही समविचारवाल्यांची एकजूट होऊ नये असे आत्मवाद्यांना, ईश्वरवाद्यांना, स्थितिवाद्यांना आणि शब्दप्रामाण्य-वाद्यांना वाटते.

आणि त्याचप्रमाणे ओसाड माळरानात राजा होणाऱ्या एरंडांनाही वाटते. अनेक शक्ती, अनेक व्यक्ती एकत्र आल्या तर त्या दुर्बल एरंडाचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून ते गट, जात आणि जातीय वैमनस्य जोपासत असतात. फाटाफुटी जिवंत ठेवत असतात. जाती नष्ट होऊ नयेत असेच त्यांचे प्रयत्न असतात.

दलित जनतेचा एक प्रतिबद्ध लेखक म्हणून आणि लेखकाची स्वाभाविकता म्हणून मी जात, गट, वर्तुळ पक्के करत राहण्याच्या धोरणाविरुद्ध आहे.

कोठलाही लेखक हा सार्वत्रिकच असतो. कारण त्याची व्यक्त होण्याची माध्यमेच मुळी सार्वत्रिक, वैश्विक आहेत. पुस्तक, नियतकालिक हे सार्वत्रिक आहे. अन् त्यात येणारे लेखन थोर असेल, ते एका भाषेतून दुसऱ्या भाषेत, एका देशातून दुसऱ्या देशात जाणारेच आहे. आणि ते सर्वांना कळणारे आहे. त्याला कारण ते लेखन ज्याच्यावर आहे तो माणूस मुळी सर्वत्र आहे. अगदी तसाच. कारण मी जी दुःखे, दैन्ये, दास्ये अनुभवतो त्याला कारण जी विषमता आहे तीच प्रत्येक भाषेत, प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक देशात अस्तित्वात आहे. अनुभवात आहे.

ही माझी एका लेखकाची व्यापकता, स्वाभाविकता यांच्या स्वार्थाच्याआड येते ते लहानसहान कार्यकर्ते माझ्यावर चिडून आहेत. चीड व्यक्त करण्यासाठी दुसरा मुद्दा सापडत नाही म्हणून ते मला कम्युनिस्ट ठरविण्यात चढाओढीने पुढे येतात. आणि माझे दलित साहित्यासंबंधीचे विचार ऐकून दलित साहित्याच्या विरोधात असलेले प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थक त्यांच्या सुरांत सूर मिळवितात.

कम्युनिस्ट म्हणजे काय ?

मी जेव्हा स्वतःच दलित आहे; आणि माझे सर्वच नातेवाईक, आप्त आणि मित्र अजूनही जन्म घेतल्याच्या गुन्ह्यापायी अनेक यातना सहन करतात तेव्हा मी वर्ण-व्यवस्थेचे अन् तिने निर्माण केलेल्या विषमतेचे समर्थन कसे काय करू शकणार ? दलित जनतेची बाजू घेणारे बाबासाहेब कोण आहेत ?

अस्पृश्यता नष्ट करू बघणारे आणि ती नष्ट करण्यासाठी जमिनीचे राष्ट्रीयीकरण करा असे म्हणारे, अनात्म, अनीश्वरवाद सांगणारे बाबासाहेब काय शोषण-व्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत ?

गेली शेकडो वर्षे वापरली गेलेली 'दुःखा'ची संकल्पना बदलून 'शोषण' असा बुद्धाच्या दुःखाचा अर्थ लावणारे बाबासाहेब कोण आहेत ? प्रस्थापितांच्या बाजूचे ? शोषण व्यवस्थेचे प्रचारक ? नाही. बाबासाहेब परिवर्तनाचे अग्रणी आहेत.

दुःख म्हणजे शोषण असा बाबासाहेबांनी दिलेला अर्थ स्वीकारल्यावर शून्यवादाचा विचार पुढे येईल काय ? जन्म दुःखदायक म्हणून जन्म देणाऱ्या स्त्रीचा तिरस्कार कोणी करील काय ? जगणे म्हणजेच दुःख म्हणून मरण कोणी स्वीकारील काय ? आणि स्मशानवास करणे, जगण्याबद्दल अनासक्ती दाखविणे असे कोणी मानील काय ?

दुःख म्हणजे शोषण असा विचार स्वीकारला की जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलतो. शोषणविरहित समाज निर्माण करण्याचा आशावाद व लढाऊपणा कलावंताचे ठायी येतो. आणि मानवी वासना–भावनातून येणारे दुःख सहनीय होते. माझा दृष्टिकोण हा आहे.

म्हणून मी दलितांची दुनिया शिरावर धारण केली आहे. म्हणून माझे लेखन दलित साहित्यातील आहे असे मी मानतो. मी जन्मलो हेच त्याचे कारण नाही, तर मी तसा विचार करतो म्हणून. जन्मापेक्षा विचार स्वीकारणे ही खरी संबद्धता आहे.

देव–धर्म, स्वर्गनरक या संकल्पनांप्रमाणेच विषमता प्राचीन आहे. ह्या संकल्पनांनी जसे सर्व काही व्यापून टाकले आहे, तसेच विषमतेनेही सर्व काही व्यापले आहे. माणूस पदोपदी विषमतेचे पालन करतो. विषमतेच्याविरुद्ध असलेलेही विषमता पाळतात. कारण विषमता देव–धर्माप्रमाणेच माणसाचे मर्म बळकावून बसली आहे. ती संस्कार, पद्धती आणि संस्कृतीच झाल्यामुळे सहनीय झालेली आहे. जगणे म्हणजे सहन करणेच अधिक असते. माणूस पुष्कळ सहन करतो. देवाच्या, पूर्वजन्माच्या, पापपुण्याच्या नावाने खूप सहन करतो. विषमतापूर्ण समाजव्यवस्थेच्या समर्थकांनी गेल्या शेकडो वर्षांत लक्षावधी निमित्ते आणि भ्रम निर्माण करून ठेवलेले आहेत.

आजही विषमतेचे राखणदार अनेक भ्रम, अनेक गुंगीची औषधे निर्माण करीतच आहेत. कारण त्यांना विषमता टिकवून ठेवायची आहे.

हे ज्यांना कळते, आणि ज्यांनी दुःख, दैन्य, दास्य पाहिली आहेत तेच क्रांतिकारी सामाजिक बांधिलकी मानतात. तेच दलित जनतेशी संबद्ध होतात. आणि स्वतःला सामान्य जनतेच्या बाजूचा आहे असे उद्घोषित करून घेतात आणि कार्य करतात.

मी असाच एक कार्यकर्ता आहे. पण लिहिणारा.


मला गाणी गाता येतात विषमतेच्या निषेधाची आणि त्याच्या पुरस्काराची. तो–ज्याला


वर्णव्यवस्थेने तुच्छ तिरस्कृत ठरविले होते तो–! आणि ज्याला शोषणव्यवस्था चिरडते आहे–तो! मी त्याला माझ्या कलानिर्मितीचा नायक केला आहे. तुम्हीही त्याला आपल्या विचाराचा आणि देशाच्या सर्व गतिविधी-चाही नायक मानावे असे मला वाटते. युगाने मानले आहेच. तुम्ही ही मानावे. एवढे झाले की अनेक यशे साकार होतील.

सौंदर्य माणसात आणि त्याच्या जगण्यात असते, निसर्ग सतत सौंदयपूर्ण असतो. माणूसही असतो पण व्यवस्था दुःख, दैन्य, दास्य आणि कुरूपता निर्माण करते. केवळ काहींच्या स्वार्थासाठी.

हे लक्षात आले अन् लिहिले की दलित साहित्य होते-दलित साहित्य म्हणजे क्रान्तित्व! सम्यक !

•






दलित साहित्य म्हणजे
सूडवाद्यांचे साहित्य नाही

दलित म्हणजे हे जग आणि जीवन
नव्याने मांडणारा

दलित हाच युगनायक !

दलित साहित्य
म्हणजे सूडवाद्यांचे
साहित्य नाही



बंधुभगिनींनो,

आपण माझा फार मोठा सत्कार करीत आहात असे मला वाटते आहे. एवढ्या मोठ्या सत्काराजोगे लेखन-कार्य मी केलेले नाही. माझ्यापेक्षा वयाने मोठे असे लेखक आहेत. त्यांचे लेखनही मोठे आहे. खरे म्हणजे तेच या सन्मानाचे अधिकारी आहेत. मी फार अल्प लेखन केले आहे. मी लिहितो ते प्रक्षोभक असले तरी ते संख्येने खूप कमी आहे. मला अजून खूप लिहायचे आहे. मी पाहिलेली माणसे अजून शब्दांत आणायची आहेत. अनेक अनुभव मांडायचे आहेत. लिहायचे किती आहे ! तरी आपण मला एवढा मोठा सन्मान देऊ केला आहे. आणि तोही एका महान गावी. जिथे दलितांच्या मुक्तीची भारतीय इतिहासातील पहिली लढाई झाली तिथे.... भगवान बुद्धाएवढेच परममंगल युद्ध बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झाले तिथे. महाड दलितांचे तीर्थक्षेत्र आहे. अशा तीर्थक्षेत्रात आपण माझा गौरव करीत आहात ही माझ्या आयुष्यातील परम आनंदाची गोष्ट आहे असे मी मानतो.

आणि अत्यंत नम्रतेने आपल्या प्रेमाचा स्वीकार इथे उपस्थित असलेल्या माझ्या बांधवांच्या संमतीने करतो.

आपण माझ्यावर खूप प्रेम करता हे मी अनेक ठिकाणी अनुभवले आहे. पण मी-देखील अगदी तुकारामाप्रमाणे तुमच्यावर प्रेम करतो आहे. माझ्या लेखनाचे नायकत्व मी तुम्हाला दिलेले आहे. तुमचे चरित्रगायन करण्याचे मी ठरविले आहे. कारण तुमचे गीतगायन कोणीच केलेले नाही. तुम्ही चरित्रनायक नव्हते म्हणून नव्हे तर ज्यांनी गावे त्यांचे गळे स्वतंत्र नव्हते. माझा गळा, माझा आवाज मात्र स्वतंत्र आहे. म्हणून मी तुम्हाला गायचे ठरविले आहे. कारण या दुर्दैवी देशात तुमचा आणि माझा जन्म एकाच तुरुंगात झालेला आहे. बाबासाहेब येण्यापूर्वी आपण एकाच काळोखाचे कैदी होतो. एकाच दुःखात खितपत होतो. आपणाला आज प्रकाश मिळाला आहे, परंतु अस्पृश्यता गेलेली नाही. दुःख मात्र संपलेले नाही, आणि म्हणून दलित साहित्यही संपणार नाही. अस्पृश्यतेशी आणि दास्याशी, विषमतेशी आणि दुःखाशी दलित साहित्याचे वैर आहे. जोपर्यंत अस्पृश्यता, दास्य हे या देशात असेल, या जगात असेल, तोपर्यंत दलित साहित्य आहे, हे निश्चित आहे. माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते ते दलित साहित्य असते. मागे एकदा आमच्या मित्राने आम्ही वंशवादी आहोत अशी आम्हाला शिवीगाळ केली होती. पण आम्ही निक्षून सांगतो आहोत की, आम्ही वंशवादी असू कसे ? वंश आणि वर्णश्रेष्ठत्वाच्या खांडव वनात आम्ही भाजून निघालो आहोत. या देशातील वर्ण किंवा वंशवाद किती भयंकर असतो याचा आम्हाला अनुभव आहे. आणि म्हणून त्याचा आम्ही विरोध करतो. हा विरोध आजचा नव्हे. डॉ. बाबासाहेबांनी चळवळ सुरू केली तेव्हापासून आम्ही वर्ण आणि वंशवादाच्या विरोधी आहोत. त्याचे शेकडो पुरावे आहेत.

आम्ही तुच्छतावादी नाही. आमच्या अल्पस्वल्प लेखनात कुठल्याही जातीविरुद्ध प्रचार केलेला आढळत नाही. एकंदर सामाजिक, मानसिक व वैचारिक व्यवस्थेविरुद्ध आम्ही आहोत. उलट अत्यंत अवघड कार्य आम्हाला करावे लागत आहे. अनेक सुधारकांना, विचारवंतांना त्यांचे शत्रू दिसत होते. त्यांनी ज्यांना शत्रू लेखले होते ते त्या त्या काल-खंडात बरोबरही होतं. मार्क्सवाद्यांना आणि समाजवाद्यांना त्यांचे शत्रू दिसतात. अनेक राजकीय पक्षांना त्यांचे विरोधक शत्रू दिसतात, पण आमचा शत्रू तर अदृश्य आहे. तो ग्रंथात आहे, भाषेत आहे, शब्दांत आहे, विचारात आहे. तो मनात आहे. प्रचंड असूनही सर्वव्यापी आणि अदृश्य असलेल्या शत्रूबरोबर आमचे युद्ध सुरू झालेले आहे.

हे युद्ध तसे फार पूर्वीपासून, ब्रिटिश सत्ता इथे प्रस्थापित झाल्यापासून, सुरू झाले आहे. अनेक हिंदू समाजसुधारकांनी ह्या माणसाच्या अदृश्य शत्रूविरुद्ध हल्ले केले आहेत. पण हे

हल्ले हवे तेवढे जोरदार नव्हते. कारण ह्या लढणाऱ्या लोकांचे लक्ष्य फार मर्यादित होत. हिंदू कुटुंबांची–त्यातल्या मध्यमवर्गीय हिंदु कुटुंबाची–सुधारणा त्यांना करायची होती. कौटुंबिक सुखात वाढ होईल अशी व्यवस्था त्यांना आणायची होती. ती आणण्यासाठीही त्यांना छळ सहन करावा लागला. पण तो त्यांनी सहन केला आणि त्यातूनच सुधारणेचा रथ पुढे गेला. सामाजिक पुनर्रचनेचा विचार थोडे बळ घेऊन उठला.

पण मोठ्या खेदाने कबूल करावे लागते की, आमच्या सुधारकांनी संपूर्ण भारतीय समाजाचा विचार कधी केला नाही. त्या विचारासाठी एकही सुधारक, युरोपातील सुधारक जसे फाशी गेले, आगीत जाळले गेले, देशोधडीला लागले, पण तसे इथे झाले नाही. इथे सुधारणेला प्रतिकूल नसणारी सत्ता होती. हिंदू-मुसलमानांची सत्ता असती तर कदाचित त्यांना देहदंड सोसावे लागले असते. परंतु सत्ता अनुकूल असूनही कोणाही समाजसुधारकाने संपूर्ण समाजपुनर्रचनेचा, अस्पृश्यता नष्ट करण्याचा, विचार मांडलेला नाही. का मांडला नाही ? कारण त्यांची जातिनिष्ठा हेच त्याचे कारण आहे. आणि जातिबहिष्काराचे भय आहे. त्यांना आहे ही व्यवस्था हवी आहे. कारण त्या समाजरचनेत त्यांना हवे तेवढे सर्व दिलेले होते. ज्यांना सर्व मिळालेले असते ते सर्वंकष बंडाचे विचार कसे मांडू शकतील ? आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे प्रखर विचार कोणीही मांडलेले नाहीत.

भारतीय असंतोषाचे जनक असलेले लोकमान्य टिळक आणि त्यांच्या बरोबरीचे अनेक नेते बहिष्काराला वचकून वागले आहेत. बहिष्कारला शरण गेलेले आहेत. हा आपल्या भारतीय नेतृत्वाचा विशेष आहे. कारण आपले नेतृत्व अजूनही इतरांना संधी आणि शिक्षण न मिळाल्यामुळे मर्यादित आहे आणि हिंदुसंस्कृती आणि धर्म तर सर्वांना संधी आणि शिक्षण देण्याच्या कट्टर विरोधी आहे. राष्ट्रीय चळवळीचा इतिहास पाहिला तर जशी जशी संधी आणि शिक्षण मिळाले तसतसे त्या त्या जातिजमातीचे नेतृत्व उदयाला आले आणि ते एकमेकांविरुद्ध लढले. ते लढू नयेत असे एकाही प्रारंभीच्या नेत्याने केले नाही. सर्वांचा विकास होईल, उद्धार होईल असे कधी मांडले नाही. सर्वसंग्राहक गांधीवादही याला अपवाद नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली जसजसा अस्पृश्य एकवटू लागला तसतसा राष्ट्रीय सभेत अस्पृश्यतेचा प्रश्न अधिक प्रमाणात उठू लागला. इतिहासातही असेच घडले आहे. अनेक वेगवेगळ्या धर्मांची, जमातींची इथे आक्रमणे झाली. पण त्या आक्रमकांना या समाजात एवढाही बदल करण्याची इच्छा झाली नाही. कारण या हिंदुसमाजाची रचनाच अशी आहे की तिथे सामान्याला किंमतच नाही. त्याला माणूसच मानले नाही आणि बाकीच्यांना जगण्याचे अधिकार आहेत. सुव्यवस्थित बांधलेल्या किल्ल्यात शिरावे आणि सुरक्षित राहावे तसेच आक्रमकांचे झाले आहे. ते आले, गादीवर बसले आणि त्यांना आधीच घडवून ठेवलेले सेवक मिळाले. त्यांच्या

गादीकडे धनाचे ओघ लागले. हिंदुसमाजाची रचनाही राज्यसत्तेला एवढाही त्रास पडू नये अशीच आहे. धर्मही राजाला विष्णूचा अंश म्हणून मान्यता देऊन गेलेला आहे. हिंदूंची अनेक तत्त्वे ही सरंजामशाहीला पोषक अशीच आहेत. म्हणून अस्पृश्यतेची ओळख अनुभव नसणाऱ्या सत्तेनेही तिला आहे तशीच राहू दिली. कारण शोषकाची सर्वोत्तम व्यवस्था अस्पृश्यतेच्या उत्पादकांनी करून ठेवली होती. ती सत्तेला तर हवीच असते.

म्हणून आम्ही म्हणत असतो की, हिंदुधर्म हा सामंतशाही व्यवस्थेतून जन्मलेला, सामंतशाही व्यवस्था बळकट करणारा आणि सामंतशाही मनोवृत्तीचे पोषण करणारा आहे. सामंती व्यवस्थेत स्त्रीला आणि गुलामाला काहीही स्थान नसते. हिंदुधर्मातही त्यांना काहीही स्थान नव्हते.

त्यांना स्थान प्राप्त करून देण्यासाठी कोणीदेखील यत्न केला नाही. हिंदू संतांच्या कामगिरीचा खूप गौरव केला जातो पण हिंदू संतांनी स्त्री–शूद्रांसाठी एवढीही चळवळ केली नाही. उलट स्त्रीबद्दल अत्यंत ओंगळवाणा प्रचार केला. मोक्षाच्या मार्गातील तिला धोंड मानली. तिच्याबद्दल तुच्छता, किळस निर्माण होईल असेच ते बोलत राहिले. अस्पृश्यांना त्यांनी अपवित्रच मानले आणि एकानेही अस्पृश्यतेला टिकवून धरणाऱ्या तत्त्वाची चिकित्सा केली नाही. उलट त्याचा पुरस्कारच केला. आपल्या सुंदर आणि सामर्थ्यशाली शब्दांतून हे विष घरोघरी मनोमनी पोहचते केले आणि माणसे मोडून टाकली एकाही संताने कर्मवादाला, पुनर्जन्माला आव्हान दिले नाही. आत्मा, स्वर्ग, नरक ही काय भानगड आहे असे विचारले नाही. भोवतालचे दुःख हे परमेश्वराने दिले आहे की सामंतशाहीच्या रचनेमुळे आले आहे हे पाहिले नाही. तसे हे संतलोक राज्यसत्तेशी बांधलेले नव्हते. आता जसे काही संत धनसत्तेची, राज्यसत्तेची चाकरी करतात तसे ते चाकर नव्हते. परंतु आपल्या कुशल आणि क्रूर समाजरचनाकारांनी अशी काही रचना केली होती की, ती संतांनी बिनतक्रार मान्य केली आणि खूप कठोरपणाने स्त्री–शूद्रांची निंदा केली. स्त्रीला तर त्यांनी कमालीचे हिडीस, ओंगळवाणे चितारून ठेवले आहे.

जेव्हा पुनर्जन्म, कर्मवाद आणि मनुस्मृतीचे कायदे ते मान्य करतात तेव्हा ते सामंतशाही व्यवस्थेचा आणि अस्पृश्यतेचा पुरस्कार करीत असतात.

आणि म्हणून अनेक संत आले, त्यांच्याबरोबर त्यांनी निवडलेले देव आले पण समाज जसाचा तसाच राहिला. अस्पृश्यतेला एवढाही धक्का लागला नाही. जसे वरिष्ठ वर्गातील संतांनी, विचारवंतांनी अस्पृश्यतेचा प्रश्न कधी हाताळला नाही तसाच अस्पृश्यांनीही अस्पृश्यतेविरुद्ध एकदाही उठाव केला नाही. बाबासाहेब येईपर्यंत अस्पृश्य समाज त्यांच्यावरील गुलामगिरी बिनतक्रार मानीत होता. त्यांच्यावरील गुलामगिरी ही जमातीवर आणि धार्मिक, सांस्कृतिक आणि दंडसत्ता ज्यांच्या हाती आहे, त्यांनी निर्माण केलेली

आहे असे त्यांना कधी कळलेच नव्हते, तर ती स्वर्गातील फौजदारांनी त्यांना बहाल केलेली आहे असेच ते मानीत. गतजन्मी पाप केले आहे म्हणून हा जन्म आहे असेच त्यांचे अज्ञान त्यांना पटवून देत होते; आणि पुढला जन्म चांगला मिळावा म्हणून सारे बिनतक्रार सहन करीत होते.

त्याने एवढेही बंड करू नये म्हणून समाजरचनाकारांनी त्याला सत्ता, संस्कृती, शिक्षण आणि शस्त्रापासून दूर ठेवले होते आणि जर माणसाला असे नैसर्गिकपणे जगायला भाग पाडले तर तो माणूस असूनही माणूस राहत नाही. माणूस हा निसर्गाचा छोटासा आकार आहे. निसर्ग सतत गतिशील आहे; सृजनशील आहे. माणूसही सतत गतिशील आणि सृजनशील असला पाहिजे. माणसाचे शरीर आणि आतील शक्ती सृजनासाठी धडपडत असतात. आणि त्यांना जर तसे सृजन करायला मिळाले नाही तर त्या गंजून जातात. माणूस जनावर बनतो. आळसाच्या प्रचंड भाराखाली चिरडला जातो. मी अनेक वर्षे गावागावातून फिरतो आहे. मानवी शरीर धारण केलेली पण मुर्दाड बनलेली माणसे मी पाहिली आहेत. मानवी शक्तीचा, उत्साहाचा, श्रमाचा, बुद्धीचा निष्ठुरपणे झालेला आणि होणारा संहार पाहून मी भडकून जातो. पण भडकून उपयोग काय ? ज्यांनी ही करणी केली त्यांना थोडेबहुत औदार्य मिळाले असेल, शांतपणाने लुटीवर जगता आले असेल. कारण त्यांच्या सुखसमृद्धीला विरोध करणारे त्यांनी असे विष देऊन गारद केले होते. पण त्यांच्या गारद होण्याने प्रतिकारच गारद झाला होता. परकी आक्रमकांचा विजय झाला होता.

आणि केव्हा केव्हा तो निर्मिती करायला मिळावी, अंगातील शक्ती प्रकट करता यावी, माणूस म्हणून जगण्यातील, हातात हत्यारे घेऊन लढण्यातील मौज चाखता यावी म्हणून परकीय सत्तेला सामील झाला होता. मुसलमानांची ताकद वाढविणारे, ब्रिटिश कंपनीचे सैनिक होऊन लढणारे–लोक अस्पृश्यच होते. पण ते फार थोडे होते. येथल्या निष्ठुर व्यवस्थेने मात्र तो संहार अजूनही थांबविलेला नाही. आदिवासी आणि भटके लोकांची प्रचंड ताकद अजून कुजते आहे. कामक्रोधांत ती व्यक्त होते आहे. माणसाची आपल्या देशाएवढी निर्दय नासाडी जगाच्या पाठीवर कोणी केली नसेल.

भारतात असलेल्या आणि जगात असलेल्या दासप्रथेत केवढातरी फरक आहे. कारण भारत सोडून जगातील गुलामांनी बंडे केलेली आहेत. मार्क्स म्हणतो याप्रमाणे भारत सोडून बाकीच्या जगाचा इतिहास हा वर्गकलहाचा इतिहास आहे. पण भारतीय पुढाऱ्यांनी मात्र हे बंडच मोडून टाकले होते. दुःखाला कारण स्वर्गातील देव आणि दैव अथवा गतजन्माचे पाप केल्यामुळे इथे ज्यांनी बंड करून उठावे ते बंड करून उठले नाहीत. आणि त्यामुळे भारतीय जीवन, माणसे, सडून गेली.

ब्रिटिश इथे येईपर्यंत संपूर्ण भारतीय जीवन असेच होते. ब्रिटिशांबरोबर यंत्रयुग आले. नवे विचार आले आणि थोडीशी खळबळ होऊ लागली पण तळवट शांतच होता. अजूनही परंपरेने चिरडून टाकलेला केवढा तरी जनविभाग शांत आहे. बाबासाहेब आले आणि खालचे खवळून उठले. या खळबळीतून आणि बाबासाहेबांच्या विचारांतून दलित साहित्य जन्माला आले.

दलित साहित्य म्हणजे सूडवाद्यांचे साहित्य नाही. दलित साहित्य हे विद्वेष पसरविणारे साहित्य नाही. दलित साहित्य हे माणसाच्या महत्त्वेचा आणि मुक्तीचा प्रथम पुरस्कार करते आणि तसेच ती एक ऐतिहासिक गरजही आहे. म्हणून स्वतःला वेगळे नाव धारण करते. दलिताने लिहिलेली आणि अमेरिकेतील कोणा एकाने लिहिलेली कविता कविताच असू शकते. ती चांगली वाईट नंतर ठरू शकते पण ती कविताच असते. हे जसे खरे आहे, तर मग हे नाव का धारण केलेले आहे ? त्याला दोन कारणे आहेत. एक कारण तुम्ही आहात आणि दुसरे कारण आजपर्यंतचे भारतीय साहित्य आहे आणि हा देश आहे.

तुम्ही कसे आहात याचा आपण आधी विचार केला पाहिजे. तुम्ही आंबेडकरी आंदोलनांतील आग प्राशून अग्निमय झालेले आहात. या गावी जो चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला त्या वेळी बाबासाहेबांनी तुमच्या त्या सभेची फ्रेंच राज्यक्रांतीच्या राष्ट्रीय सभेशी तुलना केली होती. आणि समता, स्वातंत्र्य व बंधुभाव व्यक्त करणारे ठराव तुम्ही मंजूर केले होते. तसेच १७ ठराव क्रांतिकारक फ्रेंच राष्ट्रीय सभेने १७८९ साली केले होते.

महाडच्या या सभेत बोलताना बाबासाहेब म्हणाले होते की, या क्रांतीला युरोपच्या इतिहासकारांनी नाव ठेविले होते. पण मी त्या क्रांतीला नावे ठेवू शकत नाही. कारण त्या क्रांतीतून आलेल्या विचाराने युरोपच्या भाग्योदयाचे दरवाजे उघडले. युरोपचे कल्याण झाले. तसेच या सभेने या देशात कल्याण होईल असे बाबासाहेब म्हणाले होते. आणि तुम्हाला क्रांतिकारक मानले होते.

तुम्ही क्रांतिकारक आहातच. बाबासाहेबांच्या चळवळीतून तुम्ही खूप नाकारण्याचे शिकला आहात. तुम्ही खूप नाकारून गेला आहात. तुम्ही अनेक रूढिरिवाज, संकेत, देव आणि धर्म नाकारला आहे. ही नाकारण्याची शक्ती कमी नाही आहे. ती मोठमोठ्या विचारवंतांनादेखील पेलविता आलेली नाही.

मोठ-मोठे समाजसुधारक बहिष्काराला घाबरून गेले होते. खुद लोकमान्य टिळकांनी लोकमतापुढे नमून स्वतःला शुद्ध करून घेतले होते. पण तुम्ही माणसाला मोडून काढणारे किती संकेत जाळून भस्म केले ? अगदी चळवळीच्या सुरुवातीलाच तुम्ही अपूर्व धाडस दाखविले होते. ज्या मनुस्मृतीपुढे सर्व शासकांनी आणि मरणाला आपल्या

डोळ्यांनी बघणाऱ्या संतांनी मस्तक झुकविले होते, ती मनुस्मृती तुम्ही याच गावी अग्नीच्या मुखी दिली होती आणि संबंध भारतात खळबळ उडवून दिली होती.

अनेक अर्थाने तुम्ही मोठे आहात–मार्क्स ज्या क्रांतिकारकाचे वर्णन करतो त्या वर्णनाप्रमाणे तुम्ही आहात. आणि भगवान बुद्धाच्या व्याख्येतही तुम्ही सहज समाविष्ट झालेले आहात.

तुम्हांत युग निर्माण करण्याची शक्ती आहे हे आम्हाला पटले आहे म्हणून आम्ही तुमचे नाव आमच्या साहित्याला धारण केले आहे. कारण तुम्ही पुढे जाणारे आहात. आज या घडीला सर्व जनसमूहाने-राष्ट्राने भविष्याच्या मुठीतले भव्य घ्यायला पुढे जायला हवे. परंतु आज आपणाला असे दिसते आहे की, अनेक संस्था, अनेक राजकीय पक्ष आणि व्यक्ती इतिहासाकडे पळत आहेत. इतिहासातील नायकांकडून प्राण आणि प्रेरणा घेत आहेत. इतिहासातील युद्धे आणि वैरे पुन्हा उकरून काढीत आहेत. हे भविष्याकडे पाठ फिरवून मागे जाणे जिवंतपणाचे लक्षण ठरू शकत नाही. कारण भविष्यकाळावर त्यांचा विश्वास नाही. भविष्यकाळावर जर त्यांनी विश्वास टाकला तर त्यांचा वर्गीय अहंकार नष्ट करावा लागेल. त्यांना त्यांचा तो वर्गीय अहंकार टाकायचा नाही, म्हणून ते इतिहासाकडे पळत आहेत. आणि तुम्ही मात्र पुढे जात आहात, प्रकाश शोधीत आहात.

तुमच्या पायाखाली वर्तमान आहे, आणि डोळ्यांपुढे भविष्यकाळ आहे. तुमचा इतिहास हा माणसाला मुक्ती देणारा इतिहास आहे. तुमचा आदर्श डॉक्टर बाबासाहेबांप्रमाणे ज्ञानपूजक आहे आणि करुणेचा सागर भगवान बुद्ध आहे.

दलित साहित्याला प्रेरणा प्रेरक आणि प्रकाशित आहे. या देशात माणसाचा भयंकर अवमान झालेला आहे. माणसांचा एका व्यवस्थेने कोंडी करून मुडदा पाडलेला आहे. आणि म्हणून दलित साहित्य माणसाला केंद्र करते. माणसाच्या स्वातंत्र्याचा प्राणपणाने उच्चार करते. माणसाला महान मानते आणि देवधर्माला माणसाहून लहान मानते. माणूस म्हणजे महाकाव्य... माणसाच्या भावना म्हणजे महान ऋतू. माणसानेच हे जग नटविले आहे आणि माणसाचेच हात प्रगतीचे रथ होत असतात. माणसाच्याच कष्टाळू करकमळांतून क्रांत्या जन्म घेत असतात असा आमचा विश्वास आहे. म्हणून हे युग आम्हाला आमचे युग वाटते. कारण या युगाने माणसाला मुक्ती दिली आहे.

माणूस आमच्या विचाराचा केंद्र असल्यामुळे माणसाला खुनी, व्यभिचारी, पापी मानणारा आणि मुंगी लेखणारा प्रकार आम्हाला तुच्छतावादी वाटतो. तुच्छतेचा आम्हाला प्रचंड अनुभव आहे. ही तुच्छता माणसाचा अवमान करते आणि वर्ण, जाति-व्यवस्थेचा पुरस्कार करते. ही विचारधारा मांडणारे लेखक एके काळी ज्यांनी तुच्छता निर्माण केली त्याच वर्गातून आलेले आहेत.

या महाड गावी १९२७ साली माणसांचा केवढा दिव्य भव्य संताप प्रकट झाला होता. त्या दिव्यभव्य संतापाचे एकाही मराठी लेखक कवीने चित्रण केलेले नाही. त्या संतापातून प्रकाश जन्म घेत होता. मुक्ती अवतरत होती पण एकाही वर्तमानपत्राने त्याची दखल घेतली नाही. महारमाटे म्हणून ज्यांचा आम्ही गौरव करतो त्या महार-माट्यांनी देखील त्या संतापाची अवहेलनाच केलेली आहे. भगवान बुद्धाएवढेच महान असलेल्या त्या महाडच्या युद्धावर एकही कादंबरी नाही, असे का व्हावे ? या प्रश्नाचे उत्तर शोधीत असताना असे आढळून येते की, मराठीचा लेखकवर्ग हा फार हिंदू आहे आणि तो फार हिंदू असल्याकारणाने गावाजवळच्या महारमांगवाड्यात तो कधी डोकावला नाही. तो फक्त डॉ. केतकरांनी म्हटल्याप्रमाणे सदाशिवपेठी वाङ्मय लिहीत राहिला.

हिंदुत्ववाद्याच्या चळवळी वाढल्या तेव्हा मुसलमानांच्याविरुद्ध लिहू लागला आणि गांधीवादी चळवळीने जोर पकडला. हिंदु-मुसलमान ऐक्याची, अस्पृश्यतेच्या उच्चाटनाची चळवळ जेव्हा लोकमान्यता पावली तेव्हा मात्र काही कादंबऱ्यांतून उप-नायक, नायिका ह्या अस्पृश्यातून येऊ लागल्या. पण त्या पुष्कळ अंशाने खोट्या होत्या. आणि मध्यमवर्गीय होत्या. काळाराम मंदिर सत्याग्रह आणि असेच अनेक लढे अस्पृश्यांनी दिले पण ते साहित्यात अवतरले नाहीत.

ते न अवतरण्याचे कारण लेखक अनुभव घ्यायला भितात आणि वाचकालाही दचकून असतात. ज्या बहिष्काराला अनेक सुधारक पुढारी घाबरले होते, त्याच बहिष्काराला लेखक घाबरत असतात काय ? की, त्यांच्यावर अगदी लहानपणापासून झालेले तुच्छतेचे संस्कार त्यांना महारवाड्यात जाऊ देत नाहीत ?

हे संस्कारच त्यांना रोखत होते हेच आम्हाला खरे वाटते. कारण मराठी कादंबऱ्यातील आणि नाटकांतील स्त्री ही पारंपरिक आहे. जुन्या शास्त्रपुराणांतील स्त्रियांप्रमाणेच ती लेखकांनी उभी केलेली आहे, कारण तसे दाखविल्याशिवाय लेखकाला समाधान मिळणार नसते. दलित साहित्याने मात्र हे संस्कार झुगारले आहेत. म्हणून माणसाचे, त्यांच्या सुखदुःखाचे, वासना भावनांचे ठसठशीत चित्रण होऊ शकेल. दुःखाला आणि ज्याला अद्याप मराठीने प्रेमकरुणेने आलिंगन दिले नाही त्या अनेक बहिष्कृतांना ते मराठीत आणतील. मराठी केवळ सदाशिव पेठेतील माणसांची न राहता अनेक माणसांनी गजबजून जाईल. अनेक शब्द आणि प्रतिभा मराठीत येतील आणि मराठी साहित्य खूपखूप माणसाचे होईल.

•

दलित म्हणजे हे
जग आणि जीवन
नव्याने मांडणारा



अध्यक्ष महाराज आणि परम प्रिय बंधुभगिनींनो,

दलित जनतेच्या मुक्तिसंग्रामाच्या इतिहासात या शहराला अतिशय महत्त्व आहे. या शहरात आपल्या सर्वांना संगती घेऊन डॉ. बाबासाहेबांनी धम्मचक्र प्रवर्तन केले आणि भारतीय मानसिकता, वैचारिकता आणि पौराणिकता बदलविण्यासाठी एका सांस्कृतिक क्रांतीचे उद्‌घाटन केले. त्या सांस्कृतिक क्रांतीला, त्या धम्माला, तो धम्म पहिल्या प्रथम सांगणाऱ्या त्या भगवान बुद्धाला आणि डॉ. बाबासाहेबांना मी अभिवादन करतो. बाबासाहेबांसमवेत दीक्षाभूमीवर जमलेल्या त्या दलित जनतेला आणि सांस्कृतिक क्रांतीचा प्रथम हुंकार ऐकणाऱ्या त्या दीक्षाभूमीलाही मी अभिवादन करतो.

बंधूंनो आणि भगिनींनो, जेव्हा जेव्हा आपण असे पावसाळी ढगांप्रमाणे जमून येतो तेव्हा तेव्हा तुम्हाला, मला आणि आपल्या सर्व जनतेला असा आनंद होतो, तसा तृप्तीसाठी युगे युगे तळमळणाऱ्या या तृषित भूमीला आणि दलित जनतेच्या प्रज्ञावंत

प्रलयंकारी सृजनशील हातातून व्यक्त होऊ पाहणाऱ्या भारताच्या भवितव्यालाही आनंद होत असतो. माझी ही विधाने ऐकून कोणाला वाटेल मी तुमची प्रशस्ती करतो आहे. पण प्रिय मित्रांनो, तसे नाही. भारताची भाग्यविधात्री जनता दलित जनताच आहे असा माझा दृढ विश्वास आहे. तसा इतिहासही साक्षीला आहे.

स्त्री, शूद्र अतिशूद्रांच्या मुक्तीसाठी लढणारे कोण होते ? मैदाने आणि कायदे-कौन्सिले या प्रश्नासाठी हलवून सोडणारे कोण होते ? अस्पृश्यतेविरुद्ध, विषमतेविरुद्ध सतत संघर्ष करणारे कोण होते ? आणि लोकशाहीला वर्णवादाच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी अनित्यवाद, अनीश्वरवाद, अनात्मवाद, बुद्धिप्रामाण्यवाद सांगणारे कोण होते ? केवळ दलितजनतेचे नेते आणि भावी भारताचे प्रवक्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित जनता.

पण बाबासाहेब येण्याआधी दलित जनतेला आपल्या दुःखाविरुद्ध, दैन्यदास्याविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य का प्राप्त झाले नाही ? पूर्वी होता तसाच आजदेखील कर्म, पुनर्जन्माचा, पूर्वकर्माचा, पूर्वपापाचा विचार लोकांत आहे. परमेश्वरावर, त्याच्या स्वर्ग-नरकावर, ग्रहगोलावर, नशीब, दैवावर जसा आता विश्वास आहे तसाच पूर्वीही होता. परंतु आज बंडे होऊ शकतात, देवधर्माच्या आणि प्रियजनांच्याविरुद्ध लोक बोल शकतात तसे त्या वेळी लोक का बोलू शकत नव्हते ?

आज लोकांना प्राप्त झालेले सामर्थ्य हे आजच्या ज्ञानविज्ञानाचे सामर्थ्य आहे. ह्या युगाने अनेक परमेश्वर, अनेक धर्म, अनेक अलोट शक्तीच्या संकल्पना नष्ट करून टाकल्या आहेत. अनेक शोषणसत्ता उधळून टाकल्या आहेत. अन् जे दडपलेले होते त्यांच्या हातात शासनसत्ता दिल्या आहेत. म्हणून अस्पृश्यतेच्या आणि विषमतेच्या, पावित्र्य-अपावित्र्याच्या संकल्पना ग्रंथांत, देवळांत, घराघरांत आणि मनामनांत अस्तित्वात असूनही डॉ. बाबासाहेब वर्णवादी हिंदुधर्मांच्याविरुद्ध आंदोलन करू शकले. हे क्रांतिकारी युग नसते, त्याचे ज्ञानविज्ञान नसते, त्याने निर्माण केलेली औद्योगिक शहरे नसती, श्रमिक वर्ग नसता, त्यांचे लढे नसते, लोकशाही समाजवादी तत्त्वज्ञान नसते तर शंबूकाप्रमाणेच बाबासाहेबांवर कोणत्याही सत्ताधारी रामराजाने शस्त्र चालविले असते. एकलव्याप्रमाणे बाबासाहेबांचेही सामर्थ्य हिरावून घेतले असते. आणि कर्णाला जसे त्याच्या पराभवासाठी अनेक शिव्याशाप मिळाले तसे बाबासाहेबांनाही मिळाले असते अन् कर्णाला जसे पराभूत केले तसेच नव्या कृष्ण-अर्जुनाने बाबासाहेबांनाही पराभूत केले असते, पण ते बाबासाहेबांचा पराभव करू शकले नाहीत. आपण शिकतो आहोत म्हणून, आपण शिकवितो आहोत म्हणून, एकाही मनूने आपल्या कानांत शिसे ओतून अथवा आपल्या जिभा कापून आपल्याला हालहाल करून ठार मारले नाही अथवा खांडव वनाप्रमाणे अर्वाचीन अग्नीने, कृष्णाने, अर्जुनाने आपली सभासंमेलने घेरून भस्मसात केली नाहीत याचे कारण काय आहे ?

असे अद्‌भुत घडण्याचे कारण हे युग आहे. त्याचे ज्ञानविज्ञान आणि तत्त्वज्ञान आहे. यंत्राचा अवतार इथे प्रकट झाला तेव्हापासून मनूचा पराभव सुरू झाला. मनूच्या विजयासाठी अनेक शास्त्री-पंडित धावले पण ते मनूचा विजय करू शकले नाहीत. कालचक्र उलटे फिरवू शकले नाहीत. मनूचा पराभव होत होता. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा तर मनू काळोखात फेकला गेला आणि बाबासाहेबांचा विचार कायदा झाला, संविधान झाला.

शासन सत्तेवर लोकशाहीला बसविले असले तरी, मनूला काळोखात फेकले असले तरी तो मेला नाही. तो अजून ग्रंथाग्रंथांतून, पोथ्यापोथ्यांतून, देवळांदेवळांतून जिवंत आहे. म्हणून मनामनांतून तो वास करतो आहे. त्याने निर्माण केली तीच समाजरचना अद्यापही आहे. तशीच प्रचंड अशी अर्थसत्ताही त्यांच्याच काबूत आहे आणि त्यांचेच लाडके लोक सर्व सत्ताकेंद्रांवर आहेत. म्हणून भारत एकाच वेळी दोन जगांत, दोन सत्तांत, दोन जीवनपद्धतींत आणि दोन स्मृतींत जगतो आहे. देश आणि लोक असे द्विधास्थितीत आहेत. विजय कोणाचा, पराभव कोणाचा व्हावा हे ठरविण्यासाठी भूमिका घेणे आवश्यक आहे. कला-साहित्याने आपली भूमिका पार पाडायला पाहिजे. सिनेमा, नाटकांनी ते कोणाच्या बाजूचे आहेत हे स्पष्ट केले पाहिजे. भारतीय भांडवलशाहीने, ती वर्णव्यवस्थेच्या बाजूची आहे की लोकशाहीच्या बाजूची आहे हे जगजाहीर करायला पाहिजे.

पण मित्रांनो, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही, लोकशाही आल्यानंतरही कला-साहित्याने, सिनेमा-नाटकांनी, ज्ञानप्रसार केंद्रांनी अग्नीसारख्या वाढत असलेल्या भारतीय भांडवलशाहीने ते कोणाच्या बाजूचे आहेत हे स्पष्ट केलेले नाही, हे स्पष्ट करणे जरुरीचे आहे. कारण स्वातंत्र्य लोकशाही येऊनही, पब्लिक व प्रायव्हेट सेक्टरसारखी वाढ होऊनही, खेड्यापाड्यात यंत्राचा आणि बिजलीचा प्रवेश होऊनही जुनीच समाजव्यवस्था, संस्कृती, पौराणिकता व विचारपद्धती जशीच्या तशी अस्तित्वात आहे. बाबासाहेबांना हवे असलेले लोकशाही मानसिकीकरण व सांस्कृतीकरण अद्यापिही झालेले नाही. एवढेच नव्हे तर वर्णीय, जातीय द्वेषमत्सरावर, अहंकार-तिरस्कारावर व शब्दप्रामाण्यावर आधारलेले लेखन पवित्र ग्रंथ म्हणून अजूनही पूजनीय आहे. या सामाजिक व मानसिक अवस्थेत हुकूमशाही अथवा लष्करशाही अथवा फॅसीझम सहज लोकशाहीचा पाडाव करून सत्तेवर येऊ शकतो व वर्णव्यवस्था पूर्वीप्रमाणे पुन्हा रूढ करू शकतो. अस्पृश्यता पुन्हा काटेकोरपणे अमलात आणू शकतो. अन् मनूने सांगितलेल्या शिक्षा शूद्र-अतिशूद्र व स्त्रियांना फर्मावू शकतो. मनू तर हिटलरचा गुरू शोभेल असा आहे. हिटलरच्या छळवादाला देवाचा व धर्माचा पुरेसा पाठिंबा नव्हता. इथे तर वर्णवादी देवांचा अन् धर्माचाच पूर्ण पाठिंबा आहे.

म्हणून मी इथल्या कला–साहित्याला, तत्त्वज्ञान, साहित्य, शिक्षण केंद्राला व अर्थसत्तेला विचारले होते तुम्ही कुणाच्या बाजूचे आहात ? वर्णवादी पौराणिकतेच्या बाजूचे की

अनात्मवादाच्या, अनीश्वरवादाच्या व बुद्धिप्रामाण्यवादाच्या बाजूचे ? तुमचे आदर्श लोकशाही समाजवादाचे, शोषणमुक्तीच्या लढ्यांतील वीर, हुतात्म्यांचे आहेत की वर्ण-विषमतावादी पुराणे तुमचे आदर्श आहेत ? तुमचे कथानायक शूद्रातिशूद्रातले आहेत की पुराण पोथ्यांतले, देवळांत देव बनवून ठेवलेले वर्णवादी योद्धे आहेत ? तुमचा विशेष पाठिंबा कुणाला आहे ? आम्हाला, आमच्या तत्त्वज्ञानाला की त्या शोषणावर, छळवादावर आधारलेल्या विषमतावादी तत्त्वज्ञानाला ?

या प्रश्नांना उत्तर देऊन कोणीही आपली बाजू स्पष्ट केलेली नाही. ज्यांनी स्पष्ट केली आहे त्या विचारधारेचे नाव ' दलित साहित्य ' आहे. या धारेने आपली लोकशाही समाजवादी निष्ठा दलित हे नामाभिधान घेऊन जगजाहीर केले आहे.

अनेकांना ' दलित ' हा शब्द फार खटकतो. आपण दलित शब्दाच्या ज्या व्याख्या केल्या आहेत, त्या व्याख्यांतील अर्थ जाणवून ते घाबरलेले आहेत. म्हणून ते आपल्यात यादवी पेटवून घेण्यासाठी दलित या शब्दाला नाना अर्थ चिकटवून ठेवतात. परंतु बंधूंनो, आपण जगजाहीर केले आहे की, दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा. आपण जाहीर केले आहे की दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा. आपण जाहीर केले आहे की दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक ' शस्त्रे ' आणि ' शास्त्रे ' उपलब्ध करून दिलेली आहेत तो. या आपल्या दलिताच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो एशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा येतात. आपल्या देशातील अस्पृश्य, आदिवासी, शोषित, पीडित येतात. असे असूनही ते आपल्याला नावे ठेवीत असतात. याचे कारण आपली ही व्यापकता विश्वात्मकता त्यांना नको आहे. पूर्वीप्रमाणेच आपण जातीच्या जंगलात अडकून राहावे, पूर्वी प्रमाणेच आपण पूर्व पापपुण्याच्या काळोखात तडफडत राहावे, पूर्वीप्रमाणेच आपण दुःख देणाऱ्याला अदृश्य करणाऱ्या दांभिक परमेश्वराच्या नावाने टाहो फोडावे आणि पुढील जन्मी सुख मिळेल या आशेवर दुःख, दैन्य, दास्य सहन करावे असे त्यांना वाटते. तुक्या, चोख्याप्रमाणे आपणही विठ्ठलाच्या नावे आकांत करावेसे वाटते. पण आपण जाहीर केले आहे की आम्हाला ' सम्यक परिवर्तन ' हवे आहे. बंधुभगिनींनो, दुःखातून आणि दैन्यातून वर आलेल्याचा वैरी सहज जीव घेतात. क्षुल्लक कारणासाठी उपेक्षितात, यादव्या होत असतात. ज्यांना आपल्यातील संघटना नको ते दलित या शब्दाचे वेगवेगळे अर्थ लावीत राहतील, लावू देत.

बंधूभगिनींनो, दलित साहित्यात आत्मवादाचा, ईश्वरवादाचा पुरस्कार करणारे लेखन आले आहे काय ? फुले, आंबेडकरी विचारांचा विच्छेद करणारे म्हणजे स्वर्ग, नरक, नियती, देव, अवतार आले आहेत काय ? वर्णवादी वैचारिकता अथवा आदर्श दलित साहित्याने

व्यक्त केले आहेत काय ?

आपणाला खात्रीपूर्वक सांगता येईल की, तसे काहीही आलेले नाही. दलित साहित्य ज्यांच्या वधासाठी, निषेधासाठी, बहिष्कारासाठी हिंदुधर्म आणि दंडसत्ता व तिचे साहित्य सतत क्रियाशील होते, त्यालाच आपण भारताच्या अर्थनीतीचा, राजनीतीचा व संविधानाचाही केन्द्र करावा, अधिनायक करावा असे आपण म्हणतो आहोत. कन्हाडच्या संमेलनात मात्र या आपल्या आदिनायकाच्या संदर्भात, आपल्या आदर्शाबाबत काहीही चर्चा झाली नाही. आपले कार्य आणि विचार याचा उल्लेखही झाला नाही. यातून फक्त ते कुणाच्या बाजूचे आहेत हे स्पष्ट होते.

बंधूनो, त्यांना भूतकाळ आहे तो त्यांच्या वर्चस्वाचा आणि स्वामित्वाचा सुवर्णकाळ होता. पण तो आपल्या दुर्दैवाचा, दास्याचा आणि दुःखाचा काळ होता. आपल्या पुढे हे ज्ञानविज्ञानाचे क्रांतिकारक युग, त्याचे संपूर्ण–कोठार उघडून उभे आहे. भविष्यकाळ आपण आपल्यासाठी रचावा असेच आजच्या ज्ञानविज्ञानाचे म्हणणे आहे. आपण भविष्याच्या रचनेचा विचार करण्यासाठी जमलो आहोत. हे दलित साहित्य संमेलन एका अर्थाने भारतीय साहित्य, समाज आणि भारताचे भवितव्य रचणाऱ्या साहित्यिकांची संसद आहे. या संसदेचे म्हणजे साहित्य संमेलनाचे मी उद्घाटन करीत आहे.

साहित्य म्हणजे शस्त्रसामुग्री, लोकांच्या बंधनमुक्ततेसाठी आणि शोषणमुक्ततेसाठी वापरल्या जाणाऱ्या शस्त्रागाराचे व शास्त्र–गृहाचेही उद्घाटन करीत आहे.

मित्रांनो, इथे जिचे उद्घाटन बाबासाहेबांनी केले होते, ती 'सांस्कृतिक क्रांती' दिशादिशात नेऊ या, मनामनात नेऊ या. अनात्मवाद, अनीश्वरवाद, आणि लोकशाही समाजवाद वर्णवादावर आणि विषमतेवर विजय मिळवीलच. असे उद्घोषित करून मी या संमेलनाचे उद्घाटन करीत आहे. आपणही मला सन्माननीय संधी दिलीत म्हणून मी आपले आभार मानू काय ? पण हे उद्घाटन मी केले नाही. आपण केले आहे. सर्वांनी केले आहे. तेव्हा आभार कुणाचे मानू ? संघर्षात आणि बौद्ध तत्त्वज्ञानात ' अहं 'ला स्थान नसते एवढे सांगून मी थांबतो. जयभीम !

•

दलित
हाच
युगनायक !



आपण मला दिवाळी अंकाच्या प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून बोलाविले, त्या वेळेस आपल्याला जे मी पत्र लिहिले ते खरे होते. मला अगदी आश्चर्य वाटू लागले होते. मी त्यानंतर विचार करू लागलो की, या वर्षी आपण काही लिहिलेले नाही ! सर्व वर्षात. दिवाळी अंकांमध्येसुद्धा मी सातत्याने लिहीत नाही. तरी मला बोलाविले आहे तेव्हा कारण काय झाले असावे याचा मी शोध घेऊ लागलो. पुण्याचं मराठी साहित्य संमेलन माझ्या डोक्यात होतं, तर तेही कारण असू शकेल असं वाटलं होतं. परंतु नंतर मला असे वाटले की हेहीसुद्धा कारण नसावे. मुख्य कारण असे की, मी जे लिहितो त्याबद्दल पत्रकारांना थोडेसे प्रेम वाटतेय ! त्या प्रेमाचेच हे फळ आहे. तर मी जे लिहितो ते माणसांबद्दल ! आता माणसांतही भेद असतात, त्यांच्यात वर्ग असतात, वर्ण असतात, तरीही यांच्यामधला जो सर्वात गरीब मनुष्य आहे त्या माणसाला मी माझा नायक– माझ्या विचारांचे केंद्र– मानलेले

आहे ! आता हे मीच मानलेले आहे असे नव्हे, तर माझा असा समज आहे की, या युगानेच हे मानलेले आहे. आज जगामधील सारा इतिहास आपण पाहतो, तेव्हा हा सामान्य मनुष्यच प्रचंड उलाढाल्या करतो आहे, क्रांत्या करतो आहे, हजारो वर्षांच्या ज्या काही संकल्पना होत्या-देवाधर्माबद्दलच्या होत्या तो हा कोसळून पाडतो आहे आणि एक नवीनच जग निर्माण करतो आहे. माझे लेखन किंवा आम्ही जे लिहितो– जे स्वतःला सामान्य जगाशी बांधलेले लेखक ते युगाला समांतर असे लेखन करतात. दुसरी एकच त्यामध्ये गोष्ट असते की, हा जो मनुष्य आहे तो या लेखनात असतो. मी नेहमी हा विचार मांडतो की, आमचे जे वाङ्मय आहे या वाङ्मयामध्ये अगदी संस्कृतापासून हा गरीब, दलित मनुष्य, सामान्य माणूस कधीही आलेला नाही. शूद्र– अतिशूद्र वाङ्मयामध्ये आलेलाच नाही. मी प्रतिप्रश्न असा करतो की, का येऊ शकला नाही ? याचं जीवन, जीवन नव्हतं का ? दुःख नव्हतं का ? दैन्य नव्हतं का ? कारुण्य नव्हतं का ? तेव्हा मग मला त्यातील सूत्र कळले की, वाङ्मय हेसुद्धा वर्गाशी, वर्णाशी, शासनाशी, धर्मसत्तेशी, दंडसत्तेशी बांधलेले असते. ज्या वर्गात जो वर्ण सत्तेवर असेल, म्हणजे ज्याच्या हातात दंडसत्ता, धर्मसत्ता असेल तेच काव्याचे, नाटकाचे नायक होत असतात. मी अगदी बारकाईने थोडासा विचार केला तेव्हा मला आढळून आले की, जे सत्तेवर होते तेच पोथीपुराणांचे नायक बनले.

सत्ताधारीच नायक बनले !

पोथीपुराणांच्या दंतकथा मी पाहिलेल्या–खूप ऐकलेल्या आहेत. लोककथांमध्येसुद्धा महार, मांग, चांभार हा कधी गोष्टीचा नायक आढळून आला नाही. क्वचित प्रसंगी न्हावी हा गोष्टीमध्ये येतो. पुढे त्यातून मला हे आढळले की, जे सत्तेवर आहेत तेच देवळातील देवसुद्धा आहेत. जे सत्तेवर नव्हते त्यांना देवळातील देवपण मिळालेले नाही. म्हणजे त्या वेळचा राज्यकर्ता जो वर्ग होता, तो देवळातील देव झाला, पोथी–पुराणांचा नायक झाला. त्यांची युद्धे ही पुराणे झाली आणि युद्ध ह्या पुराणकथा व पवित्र कथा झालेल्या आहेत ! उदाहरण घ्या, रावण ! दशहरा–दहा तोंडांचा रावण हरला म्हणून दसरा, कोणीतरी नरकासुराचा वध केला म्हणून काहीतरी, राम जिंकला म्हणून दिवाळी ! कोणी काही तरी जिंकले म्हणून सण ! जे सत्ताधारीवर्ग होते ते त्या वर्गातील बांधलेले आहेत. आपली सर्व संस्कृती शोधली तर त्यात द्वेष, मत्सर आणि वर्गीय अहंकार हीच त्रिसूत्री दिसून येते. हे सारे वाङ्मय एका वर्गाशी बांधलेले आहे हा माझा मुद्दा आहे. म्हणून मी ठरविले की, या वाङ्मयाचे आदर्श आपण घ्यायचे का ? उदाहरणार्थ, परवाच्या दिवशी मी माझ्या मित्राच्या कवितेच्या पुस्तकाला प्रस्तावना दिली. त्यामध्ये मी असे म्हटले, राम आणि रावण यांचे युद्ध झाले. या युद्धाचे सण झाले. या युद्धाचे नायक देवळातले देव बनले आहेत. पोथी-पुराणांचे नायक झाले. परंतु आज जी युद्धं झालेली आहेत, महात्मा गांधीजींनी एक युद्ध केलं, त्या युद्धातून

काय घडलं ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी युद्ध केलं, त्यातून काय घडलं ? लेनिनने युद्ध केलं, त्यातून काय घडलं ? अमेरिकेत अब्राहम लिंकननी एक युद्ध केलं किंवा आजच्या अनेक वैज्ञानिकांनी, बुद्धिवाद्यांनी युद्धे केली–त्या सर्व युद्धांतून ज्ञानाची मुक्ती झाली, माणसाची वृद्धी झाली, विज्ञानाची प्रगती झाली. पुष्कळ गोष्टी घडलेल्या आहेत. ही जी प्राचीन मध्ययुगातील, प्राचीन युगातील, पुराणकाळातील युद्धे झाली, त्यांत राम विजयी होतो, शंबुकाचा शिरच्छेद होतो आणि सीतेला वनवास सहन करावा लागतो. आणखी अशा पुष्कळ गोष्टींतही जी युद्धे होतात, माणसाचे स्वातंत्र्य त्याला मिळालेच नाही–माणसाची मुक्ती झालेली नाही. ज्ञानाने स्वातंत्र्य मिळाले नाही. एक अशी कठीण पोलादी व्यवस्था निर्माण केली तरीही या युद्धांचे आदर्श स्वीकारायचे आणि हे युद्ध करणारे जे योद्धे होते ते विजयी होत–त्यांना आदर्श म्हणून स्वीकारायचे काय ? हा प्रश्न आमच्या वाङ्मयामध्ये आम्हाला नेहमीच पडतो. आणि ते आम्ही नाकारायचे काय ? हे आदर्श ! पुण्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (पु. भा. भावे) हे ज्यांचा गौरवून उल्लेख करतात ते आमचे आदर्श आहेत का ? त्यांनी ज्या प्रकारचे युद्ध केले, त्या युद्धातून माणसाची मुक्ती झालेली नाही. त्या युद्धातून वर्णव्यवस्था दृढ झाली. स्त्रियांचे दास्य अधिक वाढले आणि माणसाचे शूद्रत्व किंवा अस्पृश्यता, विषमता अधिक बळकट झाली म्हणून हे आदर्श आणि हे नायक आमचे नायक नव्हेत, आमचे आदर्श नव्हेत. यावर आमच्या वाङ्मयाची उभारणी कधीही होणार नाही. तर मग आमच्या वाङ्मयाची उभारणी कशावर होणार ? आम्ही असे म्हटले की, आज जे माणसासाठी लढत आहेत, मग ते वेगवेगळ्या क्षेत्रांतील असतील, रसायनशास्त्राच्या क्षेत्रातील, पोलादाच्या क्षेत्रातील, पौराणिक क्षेत्रातील असतील किंवा वैद्यकशास्त्रातील किंवा इतिहास, समाजक्रांत्या वगैरेमधील असतील. हे जे नवे नायक आहेत हे आमचे पौराणिक पुरुष झालेले नायक आहेत. आमच्या नायकांचा हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी पुढील तुलना मी आपल्यापुढे स्पष्ट मांडतो.

नवा नायक !

कर्ण हा मराठी कादंबरीमध्ये आणि वाङ्मयामध्ये अतिशय लोकप्रिय झालेला मराठी नायक आहे. कर्णालाच का नायकत्व येते ? मी माझ्या एका निबंधामध्ये तुलना केली की, ' कर्ण ' हा जन्म मानतो आणि स्टॅलिन हा जन्म मानीत नाही. कर्ण जन्म हे दुःख आहे हे मानतो, स्टॅलिन जन्म हे दुःख आहे असे मानत नाही. येथे मी आंबेडकरांचे नाव घेतलेले आहे. इकडे एका बाजूला कर्ण आणि दुसऱ्या बाजूला आंबेडकर आणि स्टॅलिन ! असे दोन खालच्या वर्गातले मी नायक घेतलेले आहेत. कर्ण धर्म मानतो. ही दोन्ही माणसे धर्माची जी काही अवस्था आहे तिला मानीत नाहीत. कर्ण, जी काही धर्माची वैचारिकता आहे ती मानतो. ही दोन्ही माणसं धर्माची जी वैचारिकता आहे ती मानत नाहीत. कर्ण ही जी काही एकंदर अवस्था आहे; ब्राह्मण,

क्षत्रिय अशा ज्या श्रेणी आहेत; त्या साऱ्या श्रेणींना पूज्यत्व देतो. ह देत नाहीत. श्रेणींना श्रेष्ठत्व देत नाहीत. उलट ते नाहीसे करावे असे प्रयत्न करतात.

या कादंबरीचा नायक कसा असावा ? मी माझ्या मित्रांना सांगितले की, माझ्या कादंबरीचा नायक हा कर्णासारखा असू नये. जर कर्णासारखा असेल तर एका अर्थाने आपण वर्णव्यवस्था मानतो, आपण दास्यत्व मानतो, विषमता मानतो. आजच्या युगाशी समांतर अशी मानसिकता मांडायची असेल तर आपला नायक हा स्टॅलिनसारखा असायला पाहिजे. आपला नायक हा माओसारखा असायला पाहिजे. आपला नायक हा डॉ. आंबेडकरांसारखा असायला पाहिजे. तरच आपण नवा नायक घडवू शकतो, नवी वैचारिकता मांडू शकतो, नवी मानसिकता मांडू शकतो आणि म्हणून आम्ही एक सूत्र मांडलेले आहे की, हे जे जुने आहे, त्या सर्वांना नाकारतो. आणि मग लोक आम्हांला प्रश्न विचारतात तुम्ही जर सर्व काही पौराणिक नाकारता तर माणसाला पौराणिकता कोठून देणार ? भाषेचे काय करणार ? माणसाच्या भाषेचे काय करणार ?

नवीन भाषा घडवायला हवी !

माणूस हा इतका प्रभावी, प्रतिभाशाली आहे, इतका गतिमान आहे की, तो आपली भाषा शोधून काढीत असतो, आपली प्रतिमा शोधून काढीत असतो, आपले अलंकार शोधून काढीत असतो. आपल्या भाषेशी समझोता करीत असतो. भाषा ! मध्यंतरी मी एका माझ्या मित्राशी बोलताना किंवा एका प्रस्तावनेमध्ये विचार मांडला होता की, आपली मराठी भाषा इतकी काही अध्यात्माशी–त्या पुराणव्यवस्थेशी बांधलेली आहे की, आजचा आपला आशय व्यक्त करण्यासाठी शब्द सापडणे मुष्किल होऊन जाते. आजची भाषा ही आपण आज घडविली पाहिजे. यासाठी मी माझी भाषा लोकांच्याकडे जाऊन आणि विशेषतः बायकांची भाषा अभ्यासून घडविण्याचा प्रयत्न केला. मुद्दा हा आहे की, आम्ही जे नाकारतो त्याच्या पाठीमागे–दुसरे एक कारण आहे. उदाहरणार्थ, आम्ही इतिहास नाकारतो. जर इतिहास नाकारला तर तुम्हाला असे आढळून येईल की, राज्यप्राप्ती करण्यासाठी, जमिनीच्या विस्तारासाठी, काही हिंदू राजा–राजांमध्ये युद्धे झाली, काही मुसलमान–मुसलमान राजांमध्ये युद्धे झाली. आपल्या पहिल्या प्रबोधन काळामध्ये जेव्हा ब्रिटिशांच्याविरुद्ध आपण लढाई सुरू केली तेव्हा प्रत्यक्षात ब्रिटिशांच्या विरोधात बोलता येत नसल्यामुळे, बंधन असल्यामुळे आपण आपले खलनायक मुसलमानांना केले. आपल्या संबंध नाटकांमधील आणि कादंबऱ्यांमधील जास्तीत जास्त खलनायक शोधले तर मुसलमान आहेत. का ? का मुसलमान आहेत ? माझे असे म्हणणे आहे की, हे जे त्या मधल्या प्रबोधनकाळामध्ये एक हिंदुत्व त्यात मिसळले आणि आमचाच इतिहास आणि आमचीच पुराणं–आमचा भूतकाळ हा अतिशय मोठा आहे हे ज्यांना सांगायचे होते त्यांनी हे मांडले ! मी त्यांना हा प्रतिप्रश्न केला की, तुम्ही भूतकाळच का निवडला ? वर्तमानकाळ का नाही निवडला ? वर्तमानकाळामध्ये

जगाच्या पाठीवर पुष्कळ गोष्टी घडत होत्या. माणसांना पुष्कळ देणग्या मिळत होत्या. लोकशाहीच्या लढ्यासाठी आणि माणसाच्या स्वातंत्र्यासाठी पुष्कळ इतिहास घडत होते. या इतिहासाची प्रेरणा घेऊन, बळ घेऊन, आपण या प्रश्नाकडे जायला हवे होते. पण आपला प्रबोधनकाळ पहिला, दुसरा म्हणा–किंवा स्वातंत्र्याच्या लढाईचा दुसरा काळ होता–तो परत इतिहासाकडे पळाला. मी असा प्रतिप्रश्न केला की, हे इतिहासाकडे जे पळणे आहे, त्याच्या पाठीमागे एकच गोष्ट आहे की, या स्वातंत्र्ययुद्धाचा जो नायक आहे, नेता आहे, पुढारीपण करणारा वर्ग आहे, त्या वर्गाला जुन्या व्यवस्थेमध्ये पुष्कळ काही प्राप्त झालेले आहे. म्हणून–ज्यामध्ये आपल्याला उच्च स्थान होते, उच्च दर्जा होता, ज्याच्यामध्ये आपण सर्व श्रेष्ठ होतो, त्या समाजाकडे तो पळत गेला. हे त्याचे जे पळणे आहे या पळण्यातून मग इतिहासामधील जी युद्धे आहेत ती हिंदू–मुसलमानांची युद्धे झाली. दोन युद्धे झाली, दोन सत्ताधाऱ्यांमधील लढाई आणि तिच्यामध्ये, दोन वर्गांमध्ये दोन सत्ताधाऱ्यांमधील लढाया, दोन जाती–जमातींमधील लढाया, धर्मांमधील लढाया निर्माण झाल्या अशी चित्रित झाली आणि हिंदू–मुसलमानांचे कायमचे वैर निर्माण झाले. आमच्यासारखे त्या वेळी हजर असते तर आम्ही हा जो भाग आहे–दोन सत्ताधाऱ्यांचा, मग ते हिंदू असोत, मुसलमान असोत, आपल्या सत्ताविस्तारासाठी ज्या लढाया केल्या त्या लढायांना मी अगदी त्या स्वरूपातच मांडले असते. अगदी दोन राज्ये लढत आहेत असेच मांडले असते.

जसा रामाला आम्ही राजा म्हणतो तसेच रावणालाही आम्ही राजाच म्हणतो. रावणाचं आपल्या पुराणात जसं राक्षसीकरण केलेलं आहे, ते राक्षसीकरण आम्ही जसं अमान्य केलं–तसंच रामाचे उदात्तीकरणही आम्ही अमान्य करतो. या दोघांना सत्ताधारी आणि दोन राज्यकर्ते या स्वरूपात आम्ही घेतो आणि त्या तऱ्हेने त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न करतो. आपल्या सर्व मराठी वाङ्मयामध्ये जुन्याचे ओझे आहे, ह्या ओझ्यातून पुष्कळसे प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि मग त्या प्रश्नांचा जेव्हा आम्ही विचार करतो की, आजही स्वातंत्र्य प्राप्त होऊनही अस्पृश्यता आहे, विषमता आहे आणि याबद्दलची तुच्छताही आहे. आत्महत्येचे मोठे प्रमाण स्त्रियांचे आहे. अवमानात स्त्रियांच्याच अवमानाची भाषा सर्वांत पहिली. अतिशय मवाली लोकांची भाषा मी ऐकतो. चांगल्या सुशिक्षित लोकांची ऐकतो, खेडवळांची भाषा ऐकतो आणि सर्वांच्या भाषेमधून स्त्रियांबद्दलचे जे शब्दप्रयोग, दृष्टिकोन येतात ते सर्व स्त्रियांचे अवमान करणारे आणि त्यांना तुच्छ लेखणारे असतात. हे निघून जावे, टाळावे म्हणून मग आमचा असा प्रयत्न असतो की, आपण हे सारे काही टाकले पाहिजे आणि नवे स्वीकारले पाहिजे. या नव्या स्वीकारण्यामधून आमच्या वाङ्मयाला काही प्रेरणा आलेल्या आहेत... ! आता उदाहरणादाखल मघाशी आपल्यापुढे मी मांडलेला जो मुद्दा आहे– नकाराचा. की, हे नाकारल्यामुळे आम्हाला काही प्रेरणा मिळाल्या हे

बाकीच्यांनी स्वीकारल्यामुळे–बहुसंख्य लोकांनी स्वीकारल्यामुळे अजून अस्पृश्यता आहे, विषमता आहे, स्त्रियांबद्दलची तुच्छता आहे.

तर ही अस्पृश्यता पाहा, ह्याचे अधिक बारकाईने चित्रण केले तर मी असं शोधतो की, आपल्या देशामध्ये एकाच ठिकाणी एकाच वेळेला लोकशाही आहे आणि त्याच वेळी मनूचंही राज्य आहे. मानवी मनाचा मी लेखक म्हणून जेव्हा तपास करतो, त्या वेळेस लोकशाहीचा संस्कार किंचितच त्यांच्या ठायी आढळतो. आजही कितीतरी वर्तमानपत्रांत एखादी ओळ त्याला आढळून येते किंवा राजकारणामधून केव्हातरी कुणीतरी प्रवचन, भाषण करतो, त्या वेळेस त्याला लोकशाही आढळून येते. परंतु आपल्या भारतीय माणसाची मानसिकता शोधून काढली, वैचारिकता शोधून काढली, त्याची भाषा पाहिली, तर ही भाषा वर्णव्यवस्थेचीच भाषा आहे. त्याच्या मनावरील संस्कार हे वर्णव्यवस्थेचेच संस्कार आहेत. पुराणकाळाचेच संस्कार आहेत. माणूस लोकशाहीमध्ये अजून आलेलाच नाही. लोकशाहीत दुसरी एक गोष्ट आढळते की आपण जी आधुनिक साधने वापरतो–मोटार गाडी, यंत्र, टेलिफोन, वायरलेस, विद्युत् उपकरणे वगैरे वापरतो–हे सर्व वापरीतं असताना आपले मन मध्ययुगाशी जखडलेलं आहे. आपला अहंकार, तिरस्कार यांचा जर शोध घेतला तर, मी माणसाच्या मनाचे, रागाचे शोध घेत गेलेलो आहे. तर मला असे आढळते की, रागामध्ये कुणीतरी एक बाई कुणाबरोबर तरी बोलते म्हणून तिच्या नवऱ्याला किंवा भावाला राग येतो. तो तिचा खून करतो किंवा तिला मारतो. मी हे शोधतो की, ह्याला हा राग का आला ? मी एक उदाहरण देतो. मी जे 'आम्ही' नावाचं मासिक काढीत होतो तेव्हा माझ्याकडे ज्या गोष्टी येत त्या गोष्टींमध्ये दलित स्त्रियांवर–दलित मुलींवर बलात्कार झाल्याच्या गोष्टी अधिक असावयाच्या, मला प्रश्न पडायचा की, यात जी तरुण पोरं साऱ्या गोष्टी पाठवताहेत, त्या गोष्टींमध्ये बलात्काराचाच मुख्य भाग का आहे ? तेव्हा मी त्याचा विचार केला आणि त्यानंतर मला असे आढळून आले की, त्याच्यामध्ये त्यांची एक भावना असते. एका वेगळ्या पद्धतीने तिची मांडणी केली. मी असं म्हटलं, एका तरुण स्त्रीवर बलात्कार झालेला आहे. एक काय म्हणतो की, ती जर त्या पाटलाच्या शेतामध्ये गेली नसती तर तिच्यावर बलात्कार झाला नसता. तेव्हा ती गेली म्हणून बलात्कार झाला, हा गुन्हा तिचाच आहे, त्याचा नव्हे. दुसरा म्हणतो, तिच्यावर जो बलात्कार झालेला आहे, त्याच्यात विशेष काय घडले आहे ? तिचा नवरा जे करतो, तेच त्या पाटलाने केलेले आहे. तेव्हा याच्यामध्ये विशेष काही नाही. तिसरा म्हणतो, ही नीती इतिहासापासून, पुराणकाळापासून चालू आहे. नेहमीच स्त्रियांवरती बलात्कार झालेले आहेत आणि त्या बलात्काराच्या गोष्टी इतिहासामध्ये, पुराणामध्ये आपण वाचतो. चवथा म्हणतो, हे विशेष असे काहीच नाही, बाई आहे आणि पुरुष आहे. त्याच्या अंगात अधिक बळ आहे आणि तो ते बळ दाखविणारच आणि त्याने ते दाखविले आहे. अशी नऊ-दहा उदाहरणे मी घेतलेली आहेत आणि

नंतर विचारले की, आपण याचा विचार करू या !

दोन शरीरं आहेत. एक स्त्रीचं आहे, एक पुरुषाचं आहे. दोघांच्याही प्रकृती म्हणजे वासना, ही निसर्गशीलता आहे आणि अनादी काळापासून आलेली आहे. माणसाच्या शरीराचा तो आविष्कारच आहे, तर या वासनेवरती हे बाकीचे संस्कार आहेत. द्रौपदीचे वस्त्रहरण करणारा, शूर्पणखेची विटंबना करणारा, पुराण काळामध्ये अनेक जनानखाने भरून काढणारा, सोळा सहस्र नारी करणारा, हे असे जर संस्कार नसते, निदान ते तसे दाखले नसते तर माणसाच्या कामवासनेवर हे संस्कार नसते; हा इतिहास नसता तर ही कामवासना अशी विस्तृत झाली नसती; तर कामवासना ही स्वाभाविक आहे ! आणि ही शरीरातही असतेच आणि ती दोन शरीरं जवळ आल्यामुळे नंतर कदाचित ती उत्तेजितही होऊ शकेल, परंतु तिच्यावर हे जे संस्कार होत आहेत त्या संस्कारांचा आपण विचार करायला पाहिजे. म्हणून मी म्हटलं की, अशी एखादी कथा लिहिताना, अशी एखादी बलात्कार कथा लिहीत असेन, त्या वेळेस मी एक गोष्ट मात्र त्यात निश्चितपणे मांडेन आणि ती गोष्ट अशी की, त्या वासनेवर ज्या ज्या गोष्टींचा संस्कार झालेला आहे त्या त्या गोष्टींनाही मी गुन्हेगार समजेन आणि त्या संस्कारांनाही मी गुन्हेगार समजेन. त्या संस्कारांतून कामवासनेचे विकृतीकरण झाले आहे असे मी मांडीन आणि त्याच्यातले सूत्र नक्की सापडेल की, माणसाच्या रागलोभाच्या षड्रिपूंचेसुद्धा या व्यवस्थेमध्ये–या विषमतेच्या व्यवस्थेमध्ये हे विकृतीकरण झालेले आहे. हे विकृतीकरण जर आपल्याला एखादी अशी गोष्ट मांडायची असेल तर याचा आपल्याला सूक्ष्मपणे विचार करायला पाहिजे की, माणसाच्या रागापाठीमागे कोणकोणत्या गोष्टींच्या प्रेरणा असतात, माणसाच्या कामप्रवृत्तीमागे कुटल्याकुटल्या गोष्टी असतात ! तर त्या गोष्टी या विषमतापूर्ण समाजाने आणि जो याच्या आधीच्या आदिमकाळाचा आपल्या वर्ग-व्यवस्थेशी निर्माण केलेली जी विषमता आहे ती आम्ही लक्षात घेतो. तिचे संस्कार असतात हे आम्ही लक्षात घेतो आणि हे लक्षात घेतले असल्यामुळेच याच्याविरोधी आपण लिहिले पाहिजे हे त्याच्यातून लक्षात येते.

दलित साहित्याच्या संदर्भात किंवा दलित हे नाव घेण्यामध्ये माझे असे म्हणणे आहे की, दलित हा आजच्या युगाचा नायक आहे. दलित हा आजच्या संबंध क्रांतिकारक उलथा-पालथीचे केंद्र आहे आणि दलित हा इतिहास, पुराणांनी उपेक्षित, वंचित आणि तिरस्कृत ठरविलेला असा समाज आहे. जो श्रम करतो त्या श्रम करणाऱ्याचे नेहमीच या विषमतापूर्ण समाजामध्ये तिरस्कृत, तुच्छ म्हणूनच वर्णन केलेले आहे आणि त्याला तसं ठेवण्यामध्ये त्यांचे स्वार्थ साधले जात असत. असा हा जो दलित आहे, ज्याची या सर्व संस्कृत वाङ्मयामधून आणि इतिहासामधून, शास्त्रांमधून आणि पुराणांमधून उपेक्षा केलेली आहे, तो उपेक्षित आम्ही आमचा नायक ठरविलेला आहे आणि तो यासाठी ठरविलेला आहे की, जो जातीने कोणी आहे हा त्याच्यातील महत्त्वाचा भाग नाही; तर

त्याची उपेक्षा झालेली आहे आणि या युगाने त्याला शिरोधार्य मानलेले आहे त्याला आम्ही नायक केलेला आहे, श्रेष्ठ मानलेले आहे, तो अधिक संख्येनं आहे म्हणून ! दलित हे नाव घेण्याच्या पाठीमागे हाच एक उद्देश आहे की, दलित म्हणजेच क्रांतिकारक, दलित म्हणजे सम्यक परिवर्तन.

अस्पृश्यता व विषमता

हे सम्यक परिवर्तन घेऊन आम्ही असे म्हणतो की, अस्पृश्यता आहे आणि विषमताही आहे. आता ही विषमता केवळ आर्थिकच विषमता नसते, तर या विषमतेला संस्कृतीचा, धर्माचा, संस्कारांचा, परंपरांचा, अनेक शास्त्रपुराणांचा आणि देवधर्माचा असा प्रचंड आधार आहे. हा प्रचंड आधार असलेली विषमता जर उन्मळून टाकायची असेल तर काय करायला पाहिजे ? उदाहरणादाखल मी असे म्हटले की, अस्पृश्यता आहे किंवा विषमता आहे. या विषमतेला धर्माचा आधार आहे. म्हणजे-याचेच स्पष्टीकरण करताना- आज लोकशाही आली, अस्पृश्यता गेली ? गेलेली नाही ! लोकशाही आली, विषमता गेली ? गेलेली नाही ! भांडवलशाहीची प्रगती होते. आपल्या भारतीय भांडवलशाहीने एक युद्ध जिंकलेलं आहे म्हणजे इतका आपला उद्योगधंदा विकसित आणि प्रबळ झालेला आहे. असं झालं असतानासुद्धा विषमता आहे आणि अस्पृश्यताही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणि महात्मा गांधी, बॅरिस्टर सावरकर आणि इतर अनेकांनी अस्पृश्यतेविरुद्ध फार मोठा संघर्ष केला तरी ही अस्पृश्यता आहे. म्हणजे वैचारिक पातळीवर संघर्ष चाललेला आहे. हे मी मान्यच करतो की, पहिल्यांदा जेव्हा ब्रिटिश इथे आले त्याच वेळेला अस्पृश्यांचं पहिलं राजकीय संघटन झालं ! ब्रिटिश जेव्हा इथे आले–इथे कायद्याचं राज्य सुरू झालं–नवे यंत्र तंत्र आले त्याच वेळी स्पृश्यांपैकी किंवा शूद्रांपैकी लोकांचे संघटन इथं उभं राहिलं आणि आपण कोण आहोत हे त्यांना कळलं. आणखी यांनी वर्णव्यवस्थेच्याविरुद्ध आवाज उठविला जेव्हा येथे यंत्र तंत्र आले, नवे उद्योगधंदे आले, डॉक्टर आले, इंजिनियर आले आणि अनेक भांडवलशाहीच्या यंत्रणेतून येणारे जे अनेक उद्योगधंदे येतात ते उद्योगधंदे आले, तेव्हा ब्राह्मण –जो धर्मावर अवलंबून असतो, धर्मावर ज्याची उपजीविका असते, तो ब्राह्मणवर्ग हिंदु धर्माची समीक्षा करायला उभा राहिला. म्हणजे यंत्राने इतक्या गोष्टी घडविल्या की, ब्राह्मणांतलेच विद्वान हे ब्राह्मणी धर्माचे समीक्षक बनले, टीकाकार बनले, त्याच्या विरोधात उभे राहिले, जे दडपलेले होते, ते शूद्र-अतिशूद्र उभे राहिले. ते सुद्धा कधी ? ब्रिटिशांची राजवट आली तेव्हा. यांच्या आधीच्या इतिहासामध्ये अस्पृश्यांचं कधीही राजकीय संघटन झालेलं नाही ! याच्या आधीच्या शूद्रांपैकी कुणीही इतिहासामध्ये धर्माच्याविरुद्ध उभा राहिला नाही. याच्या आधीच्या इतिहासामध्ये ब्राह्मण कधीही हिंदू धर्माच्या किंवा वर्णव्यवस्थेच्याविरुद्ध बोललेले नाहीत. तेव्हा यालाही वाचा फोडण्याचे मुख्यतः कारण म्हणजे नवा उद्योगधंदा होता, नवे ज्ञान होते, विज्ञान होते.

परंतु हे जसं खरं होतं, तसंच येथे आजही येथील भांडवलशाहीच्या यंत्र-उद्योगाचा विकास होत असतानासुद्धा अस्पृश्यता जर घालवायची असेल तर आर्थिक बदल करायला पाहिजेत. मी असं म्हणतो की, भारतीय भांडवलदारी कशी आहे ? तर भारतीय भांडवलशाही ज्यांना एके काळी धर्मानेच जमिनीधारण करण्याचा अधिकार दिला होता, ज्यांना संपत्ती धारण करण्याचा अधिकार दिला होता, त्या धर्माच्याचपैकी लोक भांडवलदार म्हणून पुढे आलेले आहेत. एखादा अपवादात्मक आहेच. त्यांच्यापैकी दोन, चार नावे पुढे निघू शकतील. आता तुम्हाला हेही माहीत आहे की, मी अस्पृश्याची व्याख्या अशी करतो की, ज्याला सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये काहीही स्थान नव्हतं आणि ज्याला निषेध आणि नकार दिला होता असा जर कोणी असेल तर तो अस्पृश्य आणि ज्याचा नकार आणि निषेध केलेला नव्हता तो म्हणजे स्पृश्य ! मग तो उत्पादक प्रक्रियेमध्ये कुठेतरी भागीदारी करू शकतो आणि ज्ञान मिळवू शकतो, संपत्ती मिळवू शकतो, सैनिक होऊ शकतो, सत्ताधारी होऊ शकतो. काय वाटेल ते होऊ शकतो. जीवनाच्या वाटेवरती ज्यांना जाता येईल, ज्यांना ज्यांना संधी दिलेली आहे, धर्मानं होकार, अधिकार दिलेले आहेत ते स्पृश्य ! मनुस्मृती जर तुम्ही वाचली तर एखाद्या शूद्रानं जर संपत्ती साठविली असेल तर ती संपत्ती राजपुरुषाला लुटून न्यायचा अधिकार दिलेला आहे. एवढेच नव्हे तर, त्या शूद्राकडे त्याची बायको, कन्या असेल तर तिलासुद्धा ओढून, लुटून नेण्याचा राजपुरुषाला अधिकार दिलेला आहे. तर अशा तऱ्हेने, म्हणजे एके काळी अस्पृश्य म्हणजे जिथे दारिद्र्य, दैन्य यांनी चिरंजीव करून ठेवलेले असे लोक. त्या दारिद्र्य आणि दैन्य चिरंजीव करून ठेवलेल्या लोकांतूनच मी वर आलो आहे. मी कधी कधी माझ्याच म्हणण्याचे उदात्तीकरण करतो किंवा काव्यात्मकता करतो. मी म्हणतो मी दैन्य पाहिलेलं आहे, मी दारिद्र्य पाहिलेलं आहे. तेव्हा माणूस मला मोठा वाटतो, तेव्हा माणसापेक्षा देव मोठा वाटत नाही–माणसापेक्षा देश मोठा वाटत नाही–माणसापेक्षा धर्म मोठा वाटत नाही, कारण हे की, दैन्य दिसलेले असते त्यालाच माणूस दिसलेला असतो. तो माणूस केवळ भारतातलाच नसतो, केवळ महार नसतो, केवळ मांग नसतो तर तो जागतिक होतो. माणसाचं शरीरच मुळी हे विश्वात्मक आहे असे मी म्हणतो तेव्हा रशियन माणसाची गोष्ट किंवा फ्रेंच माणसाची गोष्ट किंवा अमेरिकन माणसाची गोष्ट किंवा ऑस्ट्रेलियन माणसाची गोष्ट आम्हाला जी कळते–त्याचे सुखदुःख कळते. त्याच्या भावना या सारख्याच आहेत. हे सारखेपण शरीरातूनच प्राप्त झालेले आहे. शरीराच्या आविष्कारातून झालेले आहे. तेव्हा आम्ही असं म्हणतो की, माणसाला जात नसते, माणसाला देशही नसतो, माणूस विश्वात्मक असतो. ही विश्वात्मकता दैन्याच्यामुळेही सहजपणे साधून जाते आणि म्हणून आमचे म्हणणे असे आहे की, ज्यांनी दैन्य पाहिलेले आहे, ज्यांनी दास्य पाहिलेले आहे, ही

माणसं देवाला–ज्यानं हे दृढ केलेलं आहे–धर्माला–ज्याने दैन्य आणि दास्य दृढ केलेले आहे आणि देशालासुद्धा की जो हे टिकवून धरतो, सीमाबद्ध करतो त्याला आम्ही मानत नाही ! आमचा देश हेच आमचे आज जग आहे. या जगातून आम्ही अनेक संकल्पना, अनेक ज्ञान-विज्ञान, अनेक यंत्र तंत्र स्वीकारलेली आहेत. तेव्हा काही तरी दूरभिमान बाळगायचा, कुणीतरी म्हणायचं, महाराष्ट्राला इतिहास आणि बाकीच्यांना भूगोल आहे, अशा प्रकारची भाषा आम्ही वापरण्याचे टाळतो. कारण याच्यामधून जी दर्पोक्ती असते त्या दर्पोक्तीचा इतिहास जेव्हा आम्ही पाहू लागलो की सोळाव्या शतकामध्ये आम्ही कोठे होतो, सतराव्या शतकामध्ये आम्ही कोठे होतो ? त्याच्या आधी कुठे होतो ? मध्य युगामध्ये आम्ही कुठे होतो ? पुराण युगामध्ये आम्ही कुठे होतो ?

विसाव्या शतकाने आम्हाला अस्तित्व दिले !

तेव्हा ध्यानात येते की, या सबंध हजारो वर्षांच्या इतिहासामध्ये आम्ही कुठेही नव्हतो. फक्त आम्हाला अस्तित्व प्राप्त झालेलं आहे या विसाव्या शतकामध्ये, या विसाव्या शतकाच्या ज्ञानविज्ञानामुळे आणि त्याचे जे तत्त्वज्ञान आलेले आहे त्या तत्त्वज्ञानामुळे आलेले आहे. जे तत्त्वज्ञान समाजवादाचा घोष करते, त्याच्यामुळे आलेले आहे. तेव्हा आमचे जे काही आहे ते फक्त विसाव्या शतकाचे ज्ञान, तत्त्वज्ञान आणि विज्ञान आहे. या विज्ञानाच्या ताकदीवरच आम्ही उभे राहणार. बाकीचा इतिहास हा आमच्या शत्रूंचा होता. बाकीचा इतिहास पुराण युगातील होता, त्याच्याशी आमचा संबंध नाही. आमचा संबंध फक्त आजच्या, वर्तमान युगाशी येतो. ज्यानं आम्हाला युक्तीचे धडे दिले, तत्त्वज्ञान दिले आणि यंत्रतंत्र दिले, त्याच्याशीच संबंध आहे. हेच मानत असल्यामुळे मग जेव्हा मनुष्य पुराणकाळातील गोष्टी मानतो–त्या वेळी त्याला त्याची जात आठवते, त्याचा वंश आठवतो. मग तो अतिशय दरिद्री जरी असला, अतिशय दलित जरी असला तरी तो दलितांच्या रांगेमध्ये जाऊन उभा राहत नाही; कारण त्याला असं वाटत असतं की, मी एका विशिष्ट वंशातला आहे. ज्या वंशाने इतिहासामध्ये स्थान मिळविले आहे, किंवा विशिष्ट जातीचा आहे किंवा विशिष्ट आडनावाचा आहे, विशिष्ट कुळीचा आहे, माझ्या कुळीनं पुराणकाळामध्ये जे स्थान प्राप्त केलेले आहे, त्याचा जो हा दुरभिमान आहे तो निरर्थक आहे; जो आजच्या ज्ञानविज्ञानापुढे टिकूच शकत नाही. तो नाहीसा व्हावा म्हणून आम्ही लेखनाला, या युगाला, या युगाच्या ज्ञानाला आणि तत्त्वज्ञानालाच मानतो आणि बाकीचे सारे नाकारतो; या नाकारण्यातून थोडेसे काही बळही प्राप्त होते. काही भाषेचे प्रश्न निर्माण होतात. आता उदाहरणार्थ, मघाशी भगिनी हा शब्द वापरताना माझ्या डोक्यात गोंधळ निर्माण झाला. कारण मी जेव्हा त्या शब्दाची व्युत्पत्ती पाहतो, त्याबेळेस मी हादरून जातो. भगवान हा शब्द वापरायचा म्हणजे भगवान गौतम बुद्ध असे म्हणण्याच्याऐवजी सिद्धार्थ गौतम बुद्ध म्हणणे मला अधिक, सोयीचे वाटते. कारण त्यात ' भग ' या शब्दाची

उत्पत्ती भोग आहे. मग तीत त्या वळचेच्या साऱ्या वेदकाळाचा पूर्वीचा इतिहास दिसतो की ज्या वेळेस सैनिकच धावत आले, किंवा प्रवासी धावत आले, ज्यांच्याजवळ स्त्रियाच नव्हत्या. ज्याला स्त्रिया प्राप्त होतात तो भगवान होतो, भाग्यवान ठरतो, असं काही तरी माझ्या डोक्यात येतं म्हणून भगवान हा शब्द वापरताना मी थोडासा घुटमळतो. पुष्कळशा गोष्टी अशा की, माझ्या अडचणी लेखक म्हणून निर्माण होतात, काही शब्द वापरताना होतात; परंतु नाइलाजाने मी ते वापरतो. मुद्दा एकच आहे की, आम्ही जो विचार करतो तो विचार फक्त या विसाव्या शतकातलाच आहे. या शतकाने जे आम्हाला सामर्थ्य दिले आहे, ते सामर्थ्यच आमचा समाज वापरतो. आमचा इतिहास, आमचा आदर्श, हे विसाव्या शतकातले. आणि यावरच आमचे नायक आम्ही बेततो. याच्यावरच आम्ही आमचे लेखन उभे करतो. आमचा नायक हा रामासारखा, कर्णासारखा होऊ नये. आमची नायिका सीतेसारखी किंवा पंचमहाबंदनीय ज्या काही सती आहेत त्यांच्यासारखी होऊ नये तर ती आजची स्त्री व्हावी.

आजची आदर्श नायिका !

म्हणून नोरा ही आमची आदर्श नायिका आहे. मॅक्झिम गोर्कीच्या 'आई' मधली आई ही आमची आदर्श नायिका आहे. तेंदूलकरांच्या 'सखाराम बाईंडर' मधील चंपासारख्या अनेक स्त्रिया आहेत की त्यांना कुठेतरी आपण शोधत गेलो, तर त्यांच्यामधून आपल्याला सीतेचे आणि सावित्रीचे–आणखी कोणाकोणाचे अंश आढळून येतात. मीही तशी स्त्री चित्रित करीन. परंतु माझी म्हणून जी नायिका असेल, ती मात्र आजची असेल. मग मी कधी तिला नोरासारखी उभी करीन–कधी आजच्या वाङ्मयातली करुणा, किंवा आज मला समाजामध्ये आढळतात यांच्यासारखीच मी तिला उभी करीन. परंतु जर प्रतिभावान लेखक असेल आणि जो जीवनाकडे आणि माणसाकडे बारकाव्याने पाहत असतो, तो कधीही एकसुरी होऊ शकत नाही. उदाहरणादाखल 'संघर्ष' नावाची जी मी कादंबरी लिहितो आहे, त्या कादंबरीचा नायक एक मांग मुलगा आहे. माझा नायक बी. ए. झालेला आहे. त्याचा संघर्ष आपल्या कुटुंबियांशी, जाती बांधवांशी सांस्कृतिक पातळीवर चालूच आहे. तो राहतो तेथे बहुसंख्याक बौद्ध आहेत, त्या बौद्धांचे पुढारीपण आहे, त्यांच्यामध्ये भांडणे आहेत, त्यांच्याशी त्यांचा एक संघर्ष चालूच आहे. म्हणजे इकडे सांस्कृतिक, तिकडे राजकीय, तिसऱ्या बाजूला आर्थिक, चवथ्या बाजूला ट्रेड युनियन आणि राजकीय पक्ष व संघटना यांच्याशी त्याचे संघर्ष चालूच आहेत. अशा चार-पाच संघर्षांच्या पार्श्वभूमीवर तो उभा आहे. याच्यामधील जी माणसं आहेत, जे रागलोभ आहेत, त्या रागलोभाचेसुद्धा एक जुन्या संस्कारातून आलेले वर्णन आहे.

परिणाम संस्कारांचा !

आता माझ्या या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी सांगतो की 'वारसा' नावाची माझी एक

गोष्ट आहे. तर ती गोष्ट अगदी सत्य घडलेली आहे. धारावीच्या झोपडपट्टीमध्ये ती मुलगी राहत होती. मी तिला नेहमीच पाहत होतो. या मुलीची वेणी अगदी तिच्या पोटरीवर पडेल इतकी लांब असायची. ही मुलगी अगदी लहानपणापासून दुसऱ्यांच्या घरी काम करून एस. एस. सी. झाली आहे. त्याच्यानंतर तिला नौकरी मिळाली ती कुठल्यातरी ऑफिसमध्ये. एस. एस. सी. झाल्यानंतर कामाला जाऊ लागली. माझ्या गोष्टीतला जो नायक आहे, तो सरदार घराण्यातला आहे. लहानपणी तो एका कोवळ्या मुलीला घेऊन पळून आलेला असतो आणि पळून आल्यापासून त्याचे आपल्या जुन्या घराण्याशी संबंध राहत नाहीत. तो येथे येऊन दादा होतो आणि बरीचशी संपत्ती मिळवतो, हातभट्टी चालवतो, दारूचे अड्डे चालवतो–त्याच्यातून पुष्कळ संपत्ती मिळवतो. कारण त्याचा त्या वस्तीवर वचक आहे–म्हणजे दादालोकांमध्ये जे आढळते, तेही त्याच्यामध्ये आढळते. क्रूर आणि चांगलेपणा ह्या दोन्ही गोष्टी त्याच्यामध्ये सरमिसळ आहेत. त्याने ही मुलगी पाहिल्यानंतर सारखं त्याच्या कानामध्ये गुणगुणत असतं ऐकलेलं एक कीर्तन ? त्या कीर्तनामध्ये, दुर्योधन आणि कर्ण ही मंडळी जेव्हा मयसभा पाहायला जातात, त्या वेळी त्यांना भिंतीच्या टिकाणी पाणी आणि पाण्याच्या टिकाणी भिंत दिसते. त्यामुळे एकदा द्रौपदी हसलेली असते. त्या द्रौपदीचे हसणे आणि तिथे त्या कीर्तनकाराने जे वर्णन केलेले आहे तिच्या मानेचे, वक्षस्थळाचे, तिच्या हालचालीचे, तिच्या केसांचे, तिच्या वेणीचे, हे सारे वर्णन त्याला तिथे आठवत असते आणि ते आठवलं म्हणजे, ती मुलगी त्याच्या डोळ्यापुढे येत असते. त्याला नेहमी वाटत असते की, ज्या दुर्योधन, दुःशासन आणि कर्णाने द्रौपदीचा अपमान केला, तिची वस्त्रं फेडली, तसेच आपणही करायला पाहिजे. आणि तो तसा प्रयत्न करतो. तरी या 'वारसा' मध्ये आणि या गोष्टीमध्ये तपशील पुष्कळ आहे आणि याच्यात याचं मन घडविण्यामध्ये किंवा याची जी सहज कामप्रवृत्ती आहे तिच्यावर ह्या कथेचे संस्कार आहेत. तेव्हा त्याच्यावर भर देण्यासाठी मी त्या गोष्टीचे नाव 'वारसा' दिले होते. तर माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी मी जे आपल्यापुढे मांडले त्यामध्ये एक गोष्ट खरी आहे. त्यासाठी पुन्हा मी स्पष्ट करतो ती ही की, आजचे हे युग, या युगाचा इतिहास, त्याचे ज्ञान–तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे आमचे आहे. गत युगातलं काहीही आणायचं नाही, असे आम्ही ठरविले आहे; या ठरवण्यातून दलित वाङ्मयाचा जन्म झालेला आहे. दलित म्हणजे कोणी जात नव्हे, कोणी वर्ग नव्हे, तर एक शोषितवर्ग आहे अशी आमची धारणा आहे. ते या देशाचे क्रांतिकारक आहेत. हे जग बदलून टाकणारे आहेत. येथील सर्व व्यवस्था, येथील राज्यव्यवस्था, येथील वैचारिकता, येथील मानसिकता आणि येथील तत्त्वज्ञान हीसुद्धा ते बदलणारे आहेत. ते बदलल्याशिवाय गत्यंतरच नाही आणि त्यांनी ते बदलवलं नाही तर अस्पृश्यतेची, विषमतेची भावना इथेच राहणार. कारण, तीस वर्षांच्या लोकशाहीनंतर किंवा तीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर भांडवलशाहीच्या एवढ्या विकसित अवस्थेनंतरही इथे अस्पृश्यता आहे आणि ती मनामनामध्ये, घराघरामध्ये

अजूनही आहे याचे मुख्य कारण, संस्कार करणारे शोधप्रवाह सतत चालू आहेत आणि ते ग्रंथांतून, दंतकथांतून, रूढींतून, संकेतांतून, ज्ञानेश्वरीतून, तुकारामाच्या गाथेतून, अनेक पौराणिक पुस्तकांतून होत असतात. हा प्रवाह जर रोखायचा असेल तर नवा वैचारिक प्रवाह, नवा नायकांचा प्रवाह, नव्या तत्त्वज्ञानाचा प्रवाह हा प्रभावी ठरला पाहिजे. यासाठी आम्ही या बाजूने उभे आहोत. दलित साहित्य म्हणजे या विसाव्या शतकाचे साहित्य, दलित साहित्य म्हणजे विसाव्या शतकाचे स्वगत आणि मनोगत त्याचे उद्‌गार ! त्याचे तत्त्वज्ञान आणि त्याचा इतिहास आणि आजचे नायक म्हणजेच दलित साहित्याचे नायक !

•

REFBK-0023320

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2cey
23320
निबंध

वाचकांना विनंती

बाबुराव बागूल यांचे
दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान
हे पुस्तक आपण वाचलेच आहे.
आपली स्पष्ट व निर्भीड प्रतिक्रिया
अपेक्षित आहे. तसेच,
या पुस्तकाच्या चित्रसंकल्पनाबाबत,
रचनेबाबत व भावी प्रकाशनांसंबंधी
आपल्या सूचना व अभिप्राय जाणून घेण्यास
आम्हांस आनंद वाटेल.

बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस
१४१, उंटखाना, नागपूर ४४० ००९

पूर्व प्रकाशन संदर्भ

१. **कोळोख्याच्यां कैद्यांची क्रांतिमान कैफियत !**
(पूर्व शीर्षक : दलित साहित्याला नैसर्गिक स्वातंत्र्य हवे,
समुद्राचे, उधाणाचे, वाऱ्याचे, ताऱ्याचे !)
मराठवाडा : दिवाळी अंक १९६९, वर्ष बाविसावे, अंक–८२
संपादक : अनंत भालेराव, मराठवाडा कार्यालय,
सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद

२. **दलित साहित्य : हे तर माणसाचे साहित्य !**
सिंहगर्जना : दिवाळी विशेषांक : १९७५
संपादक : म. बा. मेश्राम, सावकार पेठ, यवतमाळ

३. **भारतात फॅसिझमची बीजे आहेत**
साधना : दिवाळी अंक, १९७५
संपादक : यदुनाथ थत्ते, साधना प्रेस,
४३०–३१, शनिवार, पुणे, ४११ ०३०

४. **मराठवाडा जातीय दंगल : एक शोध**
अस्तित्व : मराठवाडा हिंसाचार विशेषांक, मार्च–जून, १९७८
वर्ष दुसरे, अंक पहिला–दुसरा
संपादक : अविनाश डोळस, मनोहर जिलठे;
वर्मा बिल्डिंग, खडकेश्वर, औरंगाबाद

५. **हिंदू साहित्य व जातिवाद**
पूर्वा : महाराष्ट्र साहित्य संमेलन विशेषांक
फेब्रुवारी, १९८० : वर्ष तिसरे
संपादक : श्री. दिनकर साक्रीकर, पूर्वा प्रकाशन,
साहित्य सहवास, ' झपूर्झा ',
अ–७, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

६. **ढासळते किल्ले : जाती**
साधना : वर्ग–वर्ण निराकरण विशेषांक,
वर्धापनदिन १५ आगस्ट, १९८० वर्ष ३३, अंक १–२
संपादक : यदुनाथ दत्तात्रय थत्ते; साधना प्रेस, पुणे–३०

७. **दलित चळवळ पुन्हा विघटनाकडे ?**
दैनिक केसरी, पुणे रविवार दिनांक ३ आगस्ट, १९८० व
रविवार दिनांक १० ऑगस्ट, १९८०

' दलित साहित्यिक अंतर्मुख होणार का ? '
या प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या केसरीतील
रविवार दिनांक १५ जून १९८० च्या लेखाच्या संदर्भात.

८. **दलित साहित्याची दिशा : ऑडिट**
ऑडिट : लेखक –प्रल्हाद चेंदवणकर
प्रथमावृत्ती : ऑगस्ट, १९७६
पृष्ठ ७ ते १० व ६९ ते ८६ मधील प्रस्तावना
अभिनव प्रकाशन, ५३, गुरुनानक रोड, दादर, मुंबई १४

९. **उत्थानगुंफा : जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर काव्यलेणे**
(पूर्व शीर्षक : ' उत्थानगुंफे 'च्या निमित्ताने)
उत्थानगुंफा : लेखक–यशवंत मनोहर
प्रबोधन : दलित साहित्य संमेलन विशेषांक : १९७८
दुसरे दलित साहित्य संमेलन,
दिनांक १४ व १५ जानेवारी, १९७८ मुंबई
संपादक : वामन निंबाळकर, ७१, रामबाग ले-आऊट, नागपूर ९

१०. **आठवणीचे पक्षी : धुमसणारे पंख**
(पूर्व शीर्षक : आठवणीचे पक्षी : प्रस्तावना)
आठवणीचे पक्षी : लेखक–प्र. ई. सोनकांबळे
प्रथमावृत्ती : २७ जानेवारी, १९७९, पृष्ठ ९–२०
सौ. कुमुदिनी प्र. सोनकांबळे, चेतना प्रकाशन,
२५४, ' अनुभूती ' नंदनवन कॉलनी, औरंगाबाद, ४३१ ००१

११. **दलित साहित्याचा आजचा समर्थ लेखक : बाबुराव बागूल**
(पूर्व शीर्षक : दलित साहित्याचा
आजचा बुजुर्ग लेखक : बाबुराव बागूल)
माय मराठी : दलित साहित्य विशेषांक
एक मुलाखत : प्रकाश खरात, मुंबई; किरण तांबे
वर्ष अेकेचाळीसवे, अंक आठवा, ऑगस्ट, १९७५
कार्यकारी संपादक : डॉ. बलवंत पाटील
प्रकाशन श्री. रमेश मुळगुंद, मार्फत बृहन्महाराष्ट्र भवन,
पहाडगंज पोलीस स्टेशनसमोर, नवी दिल्ली–१

१२. **बाबुराव बागूल : दलित जीवनाचा क्रांतदर्शी भाष्यकार**
(पूर्व शीर्षक : बाबुराव बागूल :
एक मुलाखत–प्र. श्री. नेरुरकर)

आयुध : दिवाळी अंक, नोव्हेंबर, १९७८
कार्यकारी संपादक : प्र. श्री. नेरुरकर
प्रकाशक : श्री. म. कृ. सामंत, अध्यक्ष, सुविचारधारक मंडळ,
रानडे रोड, दादर, मुंबई, ४०० ०२८

१३. **स्वगत**
जेव्हा मी जात चोरली होती : लेखक–बाबुराव बागूल
द्वितीयावृत्ती : एप्रिल, १९७६, पृष्ठ, १२६–१५६
वामन विष्णु भट, अभिनव प्रकाशन, ५३, गुरुनानक मार्केट
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

१४. **दलित साहित्य म्हणजे सूडवाद्यांचे साहित्य नाही**
श्री. बाबुराव बागूल यांचे अध्यक्षीय भाषण
महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलन, महाड
दिनांक १३ व १४ फेब्रुवारी १९७१ अधिवेशन दुसरे
प्रतिष्ठान : वर्ष विसावे, अंक ७, मार्च, १९७१
संपादक : प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. नरहर कुरुंदकर
कार्यकारी संपादक : सुधीर रसाळ; प्रकाशक : गो. मा. पवार,
मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

१५. **दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडणारा**
पहिले दलित साहित्य संमेलन, नागपूर; उद्घाटकीय भाषण
दिनांक १७ व १८ जानेवारी; १९७६
दलित साहित्य संमेलन स्मरणिका : १९७६
प्रमुख संपादक : प्रा. यशवंत मनोहर
प्रकाशक : प्राचार्य सूर्यभान वाघमारे
उपाध्यक्ष, दलित साहित्य संमेलन
पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर

१६. **दलित हाच युगनायक !**
दिनांक २५ नोव्हेंबर १९७७ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघात
दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना केलेले भाषण
साप्ताहिक युगांतर : वर्ष २४, अंक २९
संपादक : श्रीकांत लाड, भारतीय कम्युनिस्ट पक्ष,
महाराष्ट्र कौन्सिल, ३१४, राजभुवन,
सरदार पटेल रोड, मुंबई ४०० ०१४
भाषणाला लेखाचे रूप कुमारी विजया परब यांनी दिले आहे.

REFBK-0023320
REFBK-0023320